टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या
तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखातंर्गत
समाजशास्त्र विभागात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता
सादर केलेला शोधप्रबंध

# "पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास"

## विशेष संदर्भ - उस्मानाबाद जिल्हा

# Sociological Study of Pardhi Society

with special Reference to Osmanabad District


**संशोधिका**

**प्रा. सुलभा लिंबराज कोरेकर**

नळदुर्ग जि. उस्मानाबाद

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड**

समाजशास्त्र विभाग प्रमुख

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर



**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ**

**गुलटेकडी, पुणे ४११०३७**

**एप्रिल - २०१३**

# प्रतिज्ञापत्र

मी, प्रा. सुलभा लिंबराज कोरेकर प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, "पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ - उस्मानाबाद जिल्हा" हा शोधप्रबंध मी स्वतः माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्री. श्रीकांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. या प्रबंधातील सर्व माहिती मी निवडलेल्या विषयावर आधारलेल्या संदर्भ ग्रंथांतून संकलित केली असून त्याचा योग्य तो उल्लेख योग्य त्या ठिकाणी केलेला आहे. सदर माहितीचा उपयोग या प्रबंधाव्यतिरिक्त इतर कोठेही केलेला नाही. तसेच हा शोधप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठात किंवा संशोधन संस्थांमध्ये सादर करण्यात आलेला नाही.

**ठिकाण :-** **संशोधिका**

**दिनांक :-** / / **प्रा. सुलभा लिंबराज कोरेकर**

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते की, **प्रा. सुलभा लिंबराज कोरेकर** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता **"पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा"** या विषयावर सादर केलेला शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. हा शोधप्रबंध तयार करण्यासाठी वापरलेल्या संदर्भ ग्रंथांचा योग्य तो निर्देश या अहवालात करण्यात आलेला आहे. हा शोधप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठात किंवा संशोधन संस्थांमध्ये सादर करण्यात आलेला नाही.

**ठिकाण :-** **मार्गदर्शक**

**दिनांक :-** / /

**प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड**

समाजशास्त्र विभाग प्रमुख

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर

# ◈ ऋणनिर्देश ◈

"पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ - उस्मानाबाद जिल्हा" या विषयावरील शोधप्रबंध विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करतांना अत्यंत आनंद होत आहे. प्रबंध पूर्णत्वाच्या कामी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांच्याविषयी या ठिकाणी कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे नैतिक कर्तव्य आहे.

माझे मार्गदर्शक व आदरणीय गुरुवर्य प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड यांच्या क्रियाशील मार्गदर्शनामुळे आणि विशेष सहकार्यामुळे मी हा प्रबंध पुर्ण करु शकले. त्यांनी योग्य वेळी योग्य मार्गदर्शन, उपयुक्त सूचना व सल्ला आणि विषयाच्या मुळांशी जावून तांत्रिक व शास्त्रशुध्द मार्गदर्शन केले. त्यांचा शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील अनुभव व वास्तवतेशी जवळीक असणारे मार्गदर्शन या प्रबंधाच्या जडणघडणीत उपयुक्त ठरले आहे. सरांनी मला शिष्य म्हणून स्विकारुन आत्मविश्वास वाढवला त्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी राहीन.

आदरणीय श्री. डॉ. दिपक टिळक, (कुलगुरु, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे) आदरणीय श्री. डॉ. विजय कारेकर, (अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे) आदरणीय डॉ. उमेश केसकर (कुलसचिव), मा. प्रा. डॉ. श्री. विशाल जाधव (समाजशास्त्र विभाग प्रमुख) व त्यांचे सहकारी यांनी विद्यावाचस्पती पदवीसाठी मला या संशोधन विषयाचा अभ्यास करण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

ग्रामीण भाग, जेमतेम शैक्षणिक वातावरण व सोयी-सुविधा अपुऱ्या असतानाही ज्यांनी कमालीच्या दुरदृष्टीने संस्काराबरोबरच दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देऊन जीवनात समर्थपणे उभे राहण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन व आधार दिला, ते माझे वडील श्री. लिंबराज कोरेकर व आई सौ. सरस्वती कोरेकर आणि माझ्या सासुबाई श्रीमती मथुराबाई कदम यांनी दिलेल्या प्रेमाच्या, आशिर्वादाच्या व संस्काराच्या शिदोरीवरच शैक्षणिक क्षेत्रात मी इथेपर्यंत पोहोचू शकले. त्याबद्दल मी कायम त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते.

संशोधन कार्यासाठी सतत प्रेरणा व प्रोत्साहन देणारे बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष स्वर्गीय श्री. शिवाजीराव पाटील बाभळगांवकर, महाराष्ट्र राज्याचे दुग्धविकास व पशुसंवर्धन मंत्री व उस्मानाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. मधुकररावजी चव्हाण साहेब, बालाघाट शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, शिक्षणमहर्षी आदरणीय श्री. सि.ना. आलुरे गुरुजी (बाबा), बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. नरेंद्रजी बोरगांवकर साहेब या सर्व मान्यवरांचे याठिकाणी ऋण व्यक्त करते. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्गचे प्राचार्य श्री. डॉ. एस. डी. पेशवे सर, उपप्राचार्य श्री. प्रा. एन.एम.माकणे सर यांचेही मी आभार मानते.

प्रस्तुत संशोधनासाठी विविध संदर्भांचा अभ्यास करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर, डॉ. बा.आं.मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स् ॲण्ड इकॉनॉमिक्स् पुणे, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे, टाटा सामाजिक विज्ञान संस्था तुळजापूर, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, राज्य मागासवर्ग आयोग पुणे येथील ग्रंथपालांचे अमुल्य सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. श्री. आर. जे. साळुंके, पोलिस निरीक्षक, दक्षतापथक व जातप्रमाणपत्र तपासणी समिती पुणे, श्री. अरविंद कुमार झा, आय.एफ.एस. अधिकारी पुणे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद येथील प्रकल्प कार्यालय अधिकारी कु. भालेकर मॅडम, डॉ. सुरेश पाटील पुणे या सर्वांचेही अमुल्य सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करते.

संशोधन काळात पारधी वस्त्यांच्या प्रत्यक्ष भेटीदरम्यान श्री. तिपण्णा कलकोटे सर, माझी मैत्रीण प्रा. डॉ. जयश्री घोडके, तत्कालीन जिल्हा पोलिस प्रमुख डॉ. संजय दराडे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक श्री. शेवगण साहेब, आमचे स्नेही श्री. अशोक तांबे, श्री. परमेश्वर काळे, श्री. गिरीश प्रभुणे, श्री. गजेंद्र गुंजकर, यांनी आवश्यक माहिती देऊन जे सहकार्य केले त्याबद्दल मी या सर्वांचे आभार व्यक्त करते. पारधी समाजाशी सुसंवाद साधत असताना महाराष्ट्र राज्य महावितरण मंडळ नळदुर्गचे कर्मचारी श्री. शहाजी पवार, पोलिस कॉन्स्टेबल श्री. कल्याण पवार, उस्मानाबाद येथील श्री. अनिल काळे, एकलव्य सेवा प्रकल्प यमगरवाडी येथील श्री. उमाकांत मिटकर, श्री. अनिल घुगे, श्री. अण्णासाहेब मगर, श्री. सुपनार सर यांचे बहुमुल्य सहकार्य लाभले त्याबद्दल मी या सर्वांचे आभार व्यक्त करते.

संशोधन काळात श्री. व सौ. प्रदीप कदम, श्री. व सौ. गजानन कदम, तसेच श्री. प्रा. बालाजी जाधव व सौ. आरती जाधव (पुणे), श्री. व सौ. रमेश मनाळे,(मुंबई) माझे बंधू प्रा. डॉ. श्री. व सौ. संजय कोरेकर, प्रा. श्री. व सौ. संदीप कोरेकर तसेच माझ्या मोठ्या बहिणी सौ. सुजाता, सुनिता, सुरेखा या सर्वांनी सातत्याने मला प्रेरणा दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करते.

माझे पती प्रा. डॉ. श्री. अशोक कदम व माझी मुले चि. अभिषेक व चि. आदित्य यांनी संशोधन काळात मला समजून घेऊन अमुल्य सहकार्य केले. त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते.

माझ्या शोधप्रबंधाचे संगणकीय काम करणारे श्री. अनिल विभुते आणि श्री. संजय चव्हाण यांचेही मी आभार व्यक्त करते. सहकार्य व मार्गदर्शन करणाऱ्या सर्वच व्यक्तींचा याठिकाणी नामोल्लेख करणे शक्य नसल्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या ज्यांनीज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचेच मी येथे आभार मानते.

संशोधिका

प्रा. सुलभा कोरेकर

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| **१** | **प्रस्तावना** | **१-५७** |
| | १.१ भारतीय समाज व्यवस्था | ०१ |
| | १.२ आदिवासी समाज | ०३ |
| | १.३ जगातील आदिवासी | ११ |
| | १.४ भारतातील आदिवासी | १२ |
| | १.५ भारतीय आदिवासीच्या समस्या व उपाय | २० |
| | १.६ घटनात्मक तरतुदी व आरक्षण | २६ |
| | १.७ महाराष्ट्रातील आदिवासी | ३० |
| | १.८ भटक्या विमुक्त जाती-जमाती | ३८ |
| | १.९ पारधी जमात - एक दृष्टीक्षेप | ४२ |
| | संदर्भ सूची | ५१ |
| **२** | **संशोधन क्षेत्र व संशोधन पध्दती** | **५८-१२०** |
| | २.१ अभ्यास क्षेत्राची ओळख | ५८ |
| | २.२ संदर्भ साहित्याचा आढावा | ७४ |
| | २.३ संशोधन आराखडा | ९४ |
| | २.४ संशोधन समस्या | ९५ |
| | २.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये | ९५ |
| | २.६ संशोधनाच्या मर्यादा | ९७ |
| | २.७ सैध्दांतिक आधार | ९९ |

| | | |
|---|---|---|
| | २.८ गृहितके | १०३ |
| | २.९ संशोधन पध्दती | १०३ |
| | २.९.१ नमुना निवड | १०३ |
| | २.९.२ तथ्य संकलन | १०७ |
| | २.९.३ विश्लेषण व निर्वचन | १०९ |
| | २.१० प्रकरण नियोजन | १०९ |
| | संदर्भ सूची | ११२ |
| **३** | **पारधी समाजाचा समाजशास्त्रीय आढावा** | **१२१-२१७** |
| | ३.१ पारधी जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी | १२२ |
| | ३.२ पारधी जमातीतील कुलनामे | १२५ |
| | ३.३ पारधी जमातीतील उपजाती | १२७ |
| | ३.४ पारधी जमातीची न्यायव्यवस्था | १३१ |
| | ३.५ गुन्हेगार जमाती कायदा | १३३ |
| | ३.६ पारधी समाजाचा सामाजिक व संस्थांत्मक आढावा | १३९ |
| | ३.७ शासकीय योजना | १८० |
| | संदर्भ सूची | १९७ |
| ४ | **अभ्यास माहितीचे विश्लेषण** | **२१८-३२२** |
| | ४.१ कौटुंबिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण | २१९ |
| | ४.२ वैवाहिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण | २२७ |
| | ४.३ धार्मिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण | २४० |

| | | |
|---|---|---|
| | ४.४ सामाजिक व सांस्कृतिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण | २५६ |
| | ४.५ आर्थिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण | २७८ |
| | ४.६ शैक्षणिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण | २९३ |
| | ४.७ शासकीय योजनाविषयक माहितीचे विश्लेषण | ३०२ |
| | ४.८ सामाजिक समस्याविषयक माहितीचे विश्लेषण | ३०९ |
| | ४.९ सामाजिक सुधारणाविषयक माहितीचे विश्लेषण | ३१८ |
| **५** | **सारांश, निष्कर्ष व शिफारशी** | **३२३-४१३** |
| | ५.१ सारांश | ३२३ |
| | ५.२ निष्कर्ष | ३५२ |
| | ५.३ शिफारशी | ३५५ |
| | ५.४ परिशिष्टे | |
| | ५.४.१ छायाचित्रे | ३५९ |
| | ५.४.२ नकाशे | ३६७ |
| | ५.४.३ मुलाखत अनुसूची | ३७० |
| | ५.४.४ सामान्य ग्रंथ सूची | ३८२ |
| | ५.४.५ गोषवारा (Final Synopsis) | ३९६ |

# तक्ता सूची


| प्र. क्र. | तक्ता तपशील | पृ. क्र. |
|---|---|---|
| **१** | **प्रस्तावना** | |
| १.१ | २००१ च्या जनगणनेनुसार राज्यनिहाय आदिवासी लोकसंख्या दर्शविणारा तक्ता | १८ |
| १.२ | महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येतील वृध्दी दर्शविणारा तक्ता | ३२ |
| १.३ | महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे स्त्री-पुरुषनिहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता | ३३ |
| १.४ | २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या दर्शविणारा तक्ता | ३४ |
| १.५ | महाराष्ट्रातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविणारा तक्ता | ३६ |
| १.६ | १९८१ व १९९१च्या जनगननेनुसार महाराष्ट्र राज्यातील पारधी जमातीची जिल्हानिहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता | ४६ |
| १.७ | २००१ च्या जनगननेनुसार पारधी जमातीची महाराष्ट्रातील जिल्हानिहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता | ४८ |
| **२** | **संशोधन क्षेत्र व संशोधन पध्दती** | |
| २.१ | २००१ च्या जनगननेनुसार उस्मानाबाद जिल्ह्याची लोकसंख्याविषयक माहिती दर्शविणारा तक्ता | ६७ |
| २.२ | उस्मानाबाद जिह्याची तालुकानिहाय आदिवासी लोकसंख्या दर्शविणारा तक्ता | ६८ |
| २.३ | उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाची तालुकानिहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता | ६९ |
| २.४ | उस्मानाबाद जिल्ह्याची वयोगटानुसार लोकसंख्या दर्शविणारा तक्ता | ६९ |
| २.५ | उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय सर्वसाधारण आणि आदिवासी साक्षरता प्रमाण दर्शविणारा तक्ता | ७० |
| २.६ | उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी उत्तरदाते नमुना निवड दर्शविणारा तक्ता | १०६ |

| | | |
|---|---|---|
| **३** | **पारधी समाजाचा समाजशास्त्रीय आढावा** | |
| ३.१ | महाराष्ट्र राज्यातील पारधी लोकसंख्येतील वाढ दर्शविणारा तक्ता | १२२ |
| ३.२ | उस्मानाबाद जिल्हा पारधी स्त्री- पुरुष प्रमाण दर्शविणारा तक्ता | १४० |
| ३.३ | २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील व उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वसामान्य व आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविणारा तक्ता | १४८ |
| ३.४ | महाराष्ट्र राज्यातील पारधी समाजाची साक्षरता दर्शविणारा तक्ता | १४९ |
| ३.५ | महाराष्ट्र राज्यातील एकूण आश्रमशाळा व वसतिगृहांची माहिती दर्शविणारा तक्ता | १५२ |
| ३.६ | उस्मानाबाद जिल्हा उपयोजना क्षेत्रांतील अंतर्गत व बाह्य आदिवासी लोकसंख्या दर्शविणारा तक्ता | १९३ |
| ३.७ | उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी विशेष योजना दर्शविणारा तक्ता | १९४ |
| **४** | **अभ्यास माहितीचे विश्लेषण** | |
| ४.१ | उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या दर्शविणारा तक्ता | २१९ |
| ४.२ | उत्तरदात्यांची कुटूंब पध्दती दर्शविणारा तक्ता | २२० |
| ४.३ | उत्तरदात्यांच्या वास्तव्याचा कालावधी दर्शविणारा तक्ता | २२० |
| ४.४ | उत्तरदात्यांचे लिंग व वयनिहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता | २२१ |
| ४.५ | उत्तरदात्यांच्या घरातील सुविधा दर्शविणारा तक्ता | २२२ |
| ४.६ | उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्रियांना निर्णय स्वातंत्र्य दर्शविणारा तक्ता | २२३ |
| ४.७ | उत्तरदात्यांनी कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया केली आहे का ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २२४ |
| ४.८ | उत्तरदात्यांची कुलनिहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता | २२४ |
| ४.९ | उत्तरदाते घरी कोणते इंधन वापरतात? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २२५ |
| ४.१० | उत्तरदात्यांची मुले रिकाम्या वेळेत काय करतात? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २२६ |
| ४.११ | उत्तरदात्यांच्या घराजवळ दारूविक्री होते का? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २२७ |

| | | |
|---|---|---|
| ४.१२ | उत्तरदात्यांचे  वयोगटनिहाय विवाहावेळचे वय यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २३० |
| ४.१३ | उत्तरदात्यांचा लिंगनिहाय वैवाहिक दर्जा दर्शविणारा तक्ता | २३१ |
| ४.१४ | पारधी जमातीत प्रचलित विवाह प्रकारासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २३२ |
| ४.१५ | उत्तरदात्यांचे विवाहाबद्दलचे मत दर्शविणारा तक्ता | २३३ |
| ४.१६ | पारधी जमातीत विवाहवयात वाढीचे कारण दर्शविणारा तक्ता | २३४ |
| ४.१७ | पारधी जमातीत हुंडा कोणाकडून घेतला जातो? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २३५ |
| ४.१८ | पारधी जमातीत विवाहविधी कोण करतो? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २३६ |
| ४.१९ | पारधी जमातीमध्ये प्रचलित विवाहपध्दत कोणती? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २३७ |
| ४.२० | पारधी जमातीत विवाहासाठी मुला - मुलींच्या मताला प्राधान्य दिले जाते का ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २३८ |
| ४.२१ | पारधी जमातीत घटस्फोट कोणामार्फत घेतला जातो यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २३९ |
| ४.२२ | उत्तरदाते  देवपूजा करतात का? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २४४ |
| ४.२३ | पारधी जमातीमध्ये धार्मिक विधी कोण करतो? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २४६ |
| ४.२४ | उत्तरदाते करीत असलेल्या उपवासाचा उद्देश कोणता ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २४९ |
| ४.२५ | उत्तरदाते नवस करतात का ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २५० |
| ४.२६ | उत्तरदाते देवदेवतांना पशूबळी देतात का या संबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २५० |
| ४.२७ | उत्तरदाते कोणत्या पशूचा बळी देतात यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २५१ |
| ४.२८ | उत्तरदाते करीत असलेल्या बलिदानाच्या कारणासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता | २५४ |
| ४.२९ | उत्तरदात्यांचे इतर जाती-जमातीशी असलेल्या सामाजिक संबंधाचे स्वरुप दर्शविणारा तक्ता | २५६ |
| ४.३० | उत्तरदात्यांना इतर समाजाकडून मिळणाऱ्या सहकार्यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २५७ |
| ४.३१ | उत्तरदात्यांना मिळणाऱ्या स्वजमातीच्या सहकार्यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २५८ |

| | | |
|---|---|---|
| ४.३२ | पारधी संस्कृतीसंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २५९ |
| ४.३३ | उत्तरदाते मद्यपान केव्हा करतात? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २६० |
| ४.३४ | पारधी वस्तीतील सुविधासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २६३ |
| ४.३५ | उत्तरदात्याचे स्वतःचे घर आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २६३ |
| ४.३६ | उत्तरदात्यांच्या घराच्या प्रकारासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २६३ |
| ४.३७ | उत्तरदाते मतदान करतात का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २६६ |
| ४.३८ | उत्तरदात्यांच्या भाषेत बदल झाला का आणि झालेल्या बदलाच्या कारणांची माहिती दर्शविणारा तक्ता | २६६ |
| ४.३९ | उत्तरदात्यांचा पोषाख कसा आहे? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २६९ |
| ४.४० | उत्तरदात्यांना स्वतंत्र स्मशानभूमी आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २७१ |
| ४.४१ | पारधी जमातीत जातपंचायत असावी का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २७२ |
| ४.४२ | पारधी जमातीतील जातपंचायतीच्या निर्णय प्रक्रियेची माहिती दर्शविणारा तक्ता | २७३ |
| ४.४३ | जातपंचायतीला असलेल्या कायद्याच्या बंदीसंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २७६ |
| ४.४४ | पारधी जमातीला पोलिसांकडून योग्य न्याय मिळतो का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २७७ |
| ४.४५ | उत्तरदाते शिकार करतात का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २८० |
| ४.४६ | उत्तरदात्यांना शिकार व्यवसायात येणाऱ्या अडचणी यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २८३ |
| ४.४७ | उत्तरदात्यांचे लिंग व शिक्षणनिहाय एकव्यावसायिक /बहूव्यावसायिकांचे प्रमाण यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २८४ |
| ४.४८ | उत्तरदात्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न किती आहे? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २८८ |
| ४.४९ | येणाऱ्या उत्पन्नातून उत्तरदात्यांच्या दैनंदिन गरजा भागतात का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २८९ |
| ४.५० | उत्तरदात्यांचे आर्थिक तुट भरुन काढण्याचे मार्ग यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २८९ |
| ४.५१ | उत्तरदात्यांच्या घरातील व शेतीविषयक वस्तुबद्दलची माहिती दर्शविणारा तक्ता | २९० |

| | | |
|---|---|---|
| ४.५२ | उत्तरदाते बँक खातेदार आहेत का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २९२ |
| ४.५३ | उत्तरदात्यांच्या मुलांनी कोणता व्यवसाय करावा? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २९२ |
| ४.५४ | उत्तरदात्यांची शैक्षणिक स्थिती दर्शविणारा तक्ता | २९३ |
| ४.५५ | उत्तरदात्यांचा लिंगनिहाय शैक्षणिक स्तर दर्शविणारा तक्ता | २९३ |
| ४.५६ | उत्तरदात्यांच्या मुलांची शैक्षणिक स्थिती दर्शविणारा तक्ता | २९४ |
| ४.५७ | उत्तरदात्यांच्या वस्तीमध्ये/ जवळ शाळा आहे का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २९४ |
| ४.५८ | उत्तरदात्यांच्या मुला-मुलींचा शैक्षणिक दर्जा यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २९५ |
| ४.५९ | उत्तरदात्यांची मुले आश्रमशाळेत जातात का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २९७ |
| ४.६० | उत्तरदात्यांची मुले आश्रम शाळेत जाण्याची कारणासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २९७ |
| ४.६१ | उत्तरदात्यांची मुले आश्रम शाळेत न जाण्याची कारणासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २९८ |
| ४.६२ | उत्तरदात्यांची मुले शाळेत न जाण्याची /शाळा अर्धवट सोडण्याची कारणे यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २९९ |
| ४.६३ | उत्तरदात्यांच्या मुलांना शिक्षण घेतांना भाषेसंबंधी अडचण येते का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०० |
| ४.६४ | उत्तरदाते शिक्षकांना भेटतात का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०० |
| ४.६५ | उत्तरदात्यांना मुलांसाठीच्या शैक्षणिक सवलतीची माहिती आहे का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०१ |
| ४.६६ | उत्तरदात्यांच्या मुलांना शिक्षणविषयक सवलतींचा फायदा मिळाला आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०१ |
| ४.६७ | उत्तरदात्यांना शासकीय योजनांची माहिती आहे का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०२ |
| ४.६८ | उत्तरदात्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०३ |
| ४.६९ | उत्तरदात्यांना शासकीय योजनांचा लाभ न मिळण्याच्या कारणासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०३ |

| | | |
|---|---|---|
| ४.७० | उत्तरदात्यांनी पारधी समाजासाठी असलेल्या कोणत्या योजनेचा लाभ घेतला आहे? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०४ |
| ४.७१ | उत्तरदात्यांकडे शासकीय कागदपत्रे आहेत का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०६ |
| ४.७२ | उत्तरदात्यांना कोणत्या योजनांची गरज आहे? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३०७ |
| ४.७३ | उत्तरदात्यांना प्रगतांकडून कशी वागणूक मिळते? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१० |
| ४.७४ | उत्तरदाते कामानिमित्त स्थलांतर करतात का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३११ |
| ४.७५ | उत्तरदात्यांना स्थलांतर थांबावे असे वाटते का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१२ |
| ४.७६ | उत्तरदात्यांचा चोरी किंवा गुन्ह्याशी संबंध लावला जातो का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१२ |
| ४.७७ | उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य अटकेत किंवा तुरुंगात आहेत का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१३ |
| ४.७८ | उत्तरदात्यांना पोलिसांकडून मिळणारी वागणूक यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१४ |
| ४.७९ | उत्तरदात्यांना गुन्हयासंदर्भाने पोलिसांनी पकडण्याच्या कारणासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१५ |
| ४.८० | उत्तरदाते गुन्हेगारी चक्रातुन बाहेर पडण्यासाठी कोणाची मदत घेतील ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१६ |
| ४.८१ | उत्तरदात्यांना इतरापेक्षा आपण मागासलेले आहोत असे वाटते का? असल्यास कोणत्या बाबतीत ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१७ |
| ४.८२ | पारधी जमातीतील सुशिक्षीत लोक जमातीसाठी काम करतात का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१८ |
| ४.८३ | उत्तरदात्यांना पारधी जमातीसाठी स्वयंसेवी संस्थेच्या कार्याची माहिती आहे का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१८ |
| ४.८४ | उत्तरदात्यांना जमातीच्या सुधारणेसाठी प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्याची माहिती आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३१९ |
| ४.८५ | उत्तरदात्यांचा राजकारणातील सहभाग यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | ३२० |
| ४.८६ | उत्तरदात्यांना सामाजिक परिवर्तनासाठीची प्रेरणा कोणाकडून मिळते? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता | २३१ |

# "पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास
# विशेष संदर्भ - उस्मानाबाद जिल्हा"

**१. प्रस्तावना :-**

भारतीय समाजात विविध धर्म, भाषा, वंश, जाती आणि जमातींचा समावेश असून त्यामुळे जीवनपध्दती संदर्भाने समाजव्यवस्थेत वैविध्य दिसून येते. भारतीय समाजाचा महत्वाचा घटक असलेल्या आदिवासी समाजातील भटक्या व विमूक्त जाती व जमाती, स्वातंत्र्याच्या ६० वर्षानंतर आजही सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत.

जगाच्या कोणत्या तरी भूभागावर जे आपले पाय रोवून स्थिर राहिले, दुर्गम जंगल, नद्या, डोंगरकपारीत ज्यांचे वास्तव्य आहे त्यांना खऱ्या अर्थाने आदिवासी म्हणतात. 'आदिवासी' हा इंग्रजीतील 'ॲबोरिजीन्स' या इंग्रजी शब्दाचा रुढ मराठी पर्याय आहे. दऱ्याखोऱ्यातील व जंगलातील वास्तव्यामुळे त्यांना गिरीजन असेही संबोधले जाते. आदिवासी समाज विविध वैशिष्ट्यांनी ओळखला जातो व वर्गीकृत केला जातो. आदिवासीसाठी भारतीय संविधानात 'अनुसूचित जमाती' असा शब्दप्रयोग केला आहे.

भारतात २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या शेकडा ८.२ टक्के इतकी आदिवासी लोकसंख्या आहे. तर महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येच्या शेकडा ८.८५ टक्के इतकी आदिवासी लोकसंख्या आहे. महाराष्ट्रातील आदिवासींचे वास्तव्य सह्याद्री, सातपुडा, गोंडवन इ. विभागात असून राज्याच्या अनूसुचित जमातीच्या यादीमध्ये एकूण ४७ जमाती समाविष्ट आहेत. त्यापैकी एक पारधी जमात आहे.

पारधी ही मुळ आदिवासी जमात असून १८७१ च्या ब्रिटीशकालीन गुन्हेगारी कायद्यामुळे तिची अद्यापही गुन्हेगार जमात म्हणून सामाजिक ओळख आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, सोलापूर, यवतमाळ, जळगांव, धुळे, अहमदनगर आणि उस्मानाबाद या जिल्ह्यात पारधी जमातीचे वास्तव्य असून राज्यात २००१ च्या जनगणनेनुसार तिची एकूण लोकसंख्या १५९८७५ इतकी आहे. संशोधन क्षेत्र असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण पारधी लोकसंख्या १५१५५ इतकी असून जिल्ह्याच्या एकूण आदिवासी लोकसंख्येत तिचेशेकडा ५४.४ टक्के इतके प्रमाण आहे. पारधी जमातीमध्ये विविध पोटजाती असून निरक्षरता, परंपरागत जीवनशैली, प्रथा, परंपरा, दारिद्र्य इ. अनेक कारणांमुळे ही जमात अद्यापही मागासलेले जीवन जगत आहे. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे पोलीसांकडून होणारे अटकसत्र, सामाजिक जीवनात प्रगत समाजाकडून होणारी उपेक्षा व अवहेलना, शिक्षणाबद्दल

अनास्था, आर्थिक विपन्नावस्था इ. सामाजिक शाप सोबत घेऊन पारधी समाज आपले अस्तित्व टिकविण्यासाठी धडपड करीत आहे.

**२. संशोधन क्षेत्र व संशोधन पध्दती :-**

**अभ्यासविषयाचे महत्त्व :-** प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे व विकासासाठीच्या शासकीय योजनांचे यशापयश अभ्यासून उपाय सुचविणे हा आहे. त्यांच्या मागासलेपणाची स्थिती व त्यातील बदलासंदर्भाने त्यांची मते व इतर समाजाच्या संपर्कामुळे त्यांच्यावर झालेले परिणाम इ. बाबींचा अभ्यास करणे हा सुध्दा प्रस्तुत संशोधनाचा हेतू आहे.

प्रस्तुत संशोधनात उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी जमातीचा सामाजिक व संस्थात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. वेगवेगळ्या जमातींचा काही प्रमाणात अभ्यास झालेला असला तरी महाराष्ट्रातील पारधी जमातीचा अभ्यास व संशोधन अल्पच आहे. प्रस्तुत संशोधनांतर्गत पारधी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास करुन काढलेल्या निष्कर्षाच्या आधारे जमातीच्या प्रगती व विकासासाठी उपाय योजना सुचविणे हा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे शासन, राजकीय-सामाजिक कार्यकर्ते, सर्वसामान्य जनता, अभ्यासक, विचारवंत व पारधी जमातीला या अभ्यासाचा उपयोग होऊ शकेल असा विश्वास वाटतो. पारधी जमातीची सद्यःस्थिती व त्यांच्या समस्यांचा अभ्यास करुन काढलेल्या निष्कर्षाअंती त्यावरील सुचवलेली उपाययोजना अंमलात आणणे जमातीच्या प्रगतीसाठी व विकासासाठी गरजेचे आहे. त्या दृष्टीने उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास हा विषय महत्त्वाचा वाटतो.

**संदर्भ साहित्याचा आढावा :-**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून समाजशास्त्रज्ञांनी आणि संशोधकांनी आदिवासी जमातींचा अभ्यास केलेला आहे. भारतातील आदिवासी जमातीवर ज्या अभ्यासकांनी, संशोधकांनी संशोधन केले आहे, त्याचा याठिकाणी आढावा घेण्यात आला आहे. तसेच भटक्या विमुक्तांवरील संदर्भ साहित्याचाही आढावा घेतला आहे.

पारधी जमातीवरील संशोधन विशेषतः प्रकाशित लिखाण अतिशय अल्प आहे. पारधी जमातीसंदर्भात जे कांही लिखाण झालेले आहे, त्यातून या जमातीच्या एकंदरीत जीवनसंस्कृतीचे आकलन होण्यास काही अंशी मदत होते. याठिकाणी खरात शंकरराव (भटक्या विमुक्त जाती व त्यांचे प्रश्न) कालेलकर गो. मं. (मुंबई इलाख्यातील जाती), प्रभूणे गिरीश (पारधी), रसेल आणि हिरालाल (The Tribe and castes of central provinces of india), एन्थोवेन(The Tribe and

castes of Bombay), के. एस. सिंग (People of India), गारे गोंविद (महाराष्ट्रातील आदिवासी जमाती), पिंगळे भीमराव (वनवासी व उपेक्षित जग), पं. जोशी महादेवशास्त्री (भारतीय संस्कृती कोश) इत्यादींनी केलेले आदिवासी पारधी जमातीचे लिखाण विशेष उल्लेखनीय आहे. यात प्रामुख्याने पारधी जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक जीवन, शैक्षणिक अनास्था आणि विकासाच्या समस्या याबाबत वर्णन केलेले आहे.

**संशोधन पध्दती :-**

**उद्दिष्ट्ये :-**

प्रस्तुत संशोधनाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत -

१. पारधी समाजाच्या कौटुंबिक, वैवाहिक जीवनाचा आढावा घेणे.

२. पारधी समाजाच्या शैक्षणिक जीवनाचा अभ्यास करणे.

३. पारधी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचे आकलन करणे.

४. पारधी समाजाच्या आर्थिक व व्यावसायिक जीवनाचे विश्लेषण करणे.

५. पारधी समाजाचे सामाजिक प्रश्न आणि सुधारणा चळवळी या अनुषंगाने आढावा घेण आणि उपाय सुचविणे.

**गृहीतके :-**

प्रस्तुत संशोधनासाठी पूढील विधाने गृहितकृत्याच्या स्वरुपात निवडली आहेत.

१. पारधी समाज मागासलेला आहे.

२. शिक्षणाचे व साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

३. तो आर्थिकदृष्ट्या विवंचनेमध्ये जीवन जगतो.

४. प्रगत समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक आहे.

५. पारधी समाजात अनेक रुढी-परंपरा, अंधश्रध्दा अस्तित्वात आहेत.

६. पारधी समाजाचे जीवन अनेक समस्यांनी व्यापले आहे.

**व्याप्ती :-** प्रस्तुत संशोधनासाठी 'उस्मानाबाद जिल्हा' हे संशोधनाचे क्षेत्र असून जिल्ह्यातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, कौटुंबिक, इ. जीवन व समस्या अभ्यासणे आणि शासकीय योजनांचे यशापयश अभ्यासण्यापर्यंत व्याप्ती राहील. प्रस्तुत संशोधनासाठी २००१ ते २०१२ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी 'अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखड्याची निवड केली असून तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**प्राथमिक तथ्य :-**

तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोताद्वारे माहिती घेताना मुलाखत अनुसूचीच्या आधारे माहिती घेण्यात आली आहे. तसेच सहभागी - असहभागी निरीक्षण, सर्वेक्षण या साधनांचाही वापर केला असून शास्त्रीय पध्दतीने निवडलेल्या गावातील वस्त्यांना भेटी देऊन तथ्य संकलन केले आहे.

**दुय्यम तथ्य :-**

आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये, शासकीय कार्यालये, समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, पोलिस खाते, सामाजिक संस्थांचे सेवा प्रकल्प इत्यादी घटकांकडून आवश्यक आकडेवारी व माहिती घेतली आहे. तसेच अनेक ज्ञापकांचीही मदत घेतली आहे. याशिवाय विविध लेखकांची पुस्तके, विविध विद्यापीठाची ग्रंथालये, वर्तमानपत्रे, योजना पुस्तिका इत्यादी दुय्यम स्त्रोतांचाही संशोधनासाठी उपयोग केला आहे.

**नमुना निवड :-**

प्रस्तुत संशोधन विषयासाठी प्रश्नावलीच्या माध्यमातून आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील ३०० पारधी उत्तरदात्यांची लोकसंख्येच्या घनतेनुसार सहेतुक नमुना निवड पध्दतीने निवड केली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील आठ तालुक्यांपैकी सहा तालुक्यांत १०५ पारधी वस्त्या आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी गावाची (वस्तीची) निवड करतांना जास्त लोकसंख्या असणाऱ्या वस्तीची निवड करण्यात आली. निवडलेला नमुना गट प्रातिनिधीक असावा यासाठी उत्तरदाता म्हणून कुटुंब प्रमुखच निवडण्यात आला.

**मुलाखत अनुसूची :-**

संशोधनाच्या संदर्भात माहिती घेताना प्रत्यक्ष निरीक्षण व मुलाखत अनुसूचीचा वापर करुन आवश्यक असलेली माहिती भरुन घेतली आहे. जमातीत अशिक्षितांचे प्रमाण जास्त असल्याने संशोधिकेने पारधी कुटूंबांच्या घरी जाऊन मुलाखत अनुसूची भरुन घेतल्या.

**तथ्य विश्लेषण :-**

मुलाखत अनुसूची भरुन झाल्यावर प्राप्त माहितीची क्रमवारी लावून योग्य रीतीने विश्लेषण केले. प्राप्त माहिती वेगवेगळ्या स्वरुपाची असल्याने प्रश्नावलीतील मुख्य घटकांचे वर्गीकरण केले.

मिळालेल्या माहितीचेही संख्यात्मक आणि गुणात्मक वर्गीकरण केले. संशोधन विषयांतर्गत स्वतंत्र विभाग करुन त्या त्या विभागाचे विश्लेषण करुन या संशोधनांती निष्कर्ष काढण्यात आले.

उत्तरदात्यांकडून खालील विविध घटक शिर्षकांतर्गत माहिती मिळविली आहे. १. वैयक्तिक २. कौटुंबिक ३. वैवाहिक ४. सामाजिक व सांस्कृतिक ५. जातपंचायत ६. धार्मिक ७. शैक्षणिक ८. आर्थिक ९. शासकीय योजना १०. सामाजिक प्रश्न

प्रस्तुत संशोधनातील सदर माहिती फक्त पारधी जमातीशी संबंधित आहे.

**मर्यादा :-**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासातील मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

१. नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या उत्तरदात्यांकडून कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक आर्थिक व शासकीय योजना संदर्भाने प्रश्न इ. माहिती मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने मिळवून अभ्यासांती काढलेले निष्कर्ष परिपूर्ण व अचूक असावेत यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. तरीही उत्तरदात्यांचा प्रतिसाद व अचूक आणि नेमकी माहिती मिळण्यासंदर्भाने कांही उणिवा असण्याची शक्यता आहे.

२. प्रस्तुत संशोधनातून काढलेले निष्कर्ष हे प्रातिनिधीक स्वरुपाचे आहेत.

३. प्रस्तुत संशोधन उस्मानाबाद जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

४. या संशोधनात पारधी जमातीच्या राजकीय व आरोग्यविषयक जीवनाच्या अभ्यासाचा समावेश नाही. म्हणून प्रस्तुत विषयावर अजून सुक्ष्म संशोधन करण्यास वाव आहे.

५. औपचारिक शिक्षणाच्या अभावामुळे तार्किकदृष्ट्या सुसंगत अशी माहिती देण्यात पारधी कुटुंबे काही अंशी असमर्थ होती.

६. दुय्यम स्त्रोतातील माहिती व वस्तुस्थिती यात काहीशी तफावत जाणवली.

७. पारधी जमातीच्या उत्तरदात्याचे पूर्वगृह, भाषा, इत्यादी मर्यादित आहेत.

८. प्रस्तुत संशोधन विषयाचा कालावधी २००१ ते २०१२ असा मर्यादितच आहे.

**प्रकरण नियोजन :-**

"पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ-उस्मानाबाद जिल्हा. " या संशोधन विषयाच्या सर्व घटकांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला असून विषयाचे घटकनिहाय अहवाल लेखन खालीलप्रमाणे केले आहे.

**प्रकरण १ - प्रस्तावना**

"पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास" या संशोधन विषयाच्या पहिल्या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना करुन भारतीय समाज रचना, जाती व्यवस्था, आदिवासी जमाती, आदिवासी समुदायाचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, जगातील आदिवासी, भारतातील आदिवासी आणि महाराष्ट्रातील आदिवासींचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमाती, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती आणि पारधी जमातीचे वास्तव्य व लोकसंख्या इत्यादीचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण २ - संशोधन क्षेत्र व संशोधन पध्दती**

या प्रकरणात संशोधन आराखड्याची मांडणी करत असताना संशोधन समस्या, संशोधनाची उद्दीष्ट्ये, संशोधनाच्या मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पध्दती, नमुना निवड आणि संशोधनासाठी अवलंबलेली पध्दत व तंत्रे, तथ्य संकलन, अहवाल लेखन, संशोधन साहित्याचा विस्तृत आढावा, संशोधन अहवालाची उपयूक्तता इ. विविध संशोधन टप्प्यांची विस्तृत मांडणी करण्यात आली आहे.

**प्रकरण ३ - पारधी समाजाचा समाजशास्त्रीय आढावा**

या प्रकरणात पारधी समाजाचा पूर्वेइतिहास, जमातीचा उगम, उपजाती, न्यायव्यवस्था व गुन्हेगारीच्या कायद्याचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच त्यांचे कौटुंबिक, वैवाहिक आणि शैक्षणिक जीवनाच्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. पारधी कुटुंब व्यवस्था, वैवाहिक जीवन, शैक्षणिक स्थिती व समस्यांचा आढावा घेण्यात आला आहे. पारधी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना त्यांची साक्षरता, धार्मिक जीवन, अंधश्रध्दा, आर्थिक क्रिया, कायदे, शासकीय योजना, शासनाचे प्रयत्न व सुधारणा इत्यादी संदर्भाने आढावा घेण्यात आला आहे. पारधी जमातीचा हा समाजशास्त्रीय आढावा दुय्यम स्त्रोंताच्या आधारे घेण्यात आला आहे.

**प्रकरण ४ थे- अभ्यास माहितीचे विश्लेषण**

या प्रकरणात मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले असून विषयाला अनुसरुन कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक समस्या व शासनाचे प्रयत्न इत्यादी संदर्भाने प्रश्न विचारुन प्रत्यक्ष प्राथमिक स्त्रोतांच्या आधारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रकरण ५ - सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी**

संशोधनाचे हे महत्त्वाचे प्रकरण असून या प्रकरणात पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यासांतर्गत उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले आहेत. आणि सारांशरुपाने समाजाची सद्यस्थिती व समस्या लक्षात घेवून शिफारशीच्या स्वरुपात काही उपाय सुचविण्यात आले आहेत.

प्रस्तुत संशोधनातुन प्राप्त निष्कर्ष व त्या अनुषंगाने सुचविण्यात आलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे-

**३. निष्कर्ष :-**

१. संशोधनासाठी निवडलेले सर्वच उत्तरदाते विवाहीत असून त्यापैकी ८६.३३ टक्के पुरुष आणि १३.६७ टक्के स्त्रिया आहेत.

२. संशोधनासाठी निवडलेल्या कुटुंबप्रमुख उत्तरदात्याचे ३१ ते ५० या वयोगटातील प्रमाण ५१ टक्के आहे. त्यापैकी ७ टक्के स्त्रिया आहेत. कुटुंबात ५ ते ७ सदस्य असण्याचे प्रमाण ५४ टक्के आहे. ८०.६७ टक्के विभक्त कुटुंबपध्दती असूनही जास्त कुटुंब सदस्य संख्या असण्यामागे ९४ टक्के कुटुंबनियोजनाबाबतचे अज्ञान हे कारण आहे.

३. जिल्ह्यात काळे कुळाचे प्रमाण ४५ टक्के आहे. गावपारधी आणि फासेपारधी या पारधी जमातीच्या दोन पोटजाती असून त्यांच्यात श्रेष्ठ कनिष्ठता जोपासली जाते.

४. पारधी जमात कायमस्वरुपी एकाच ठिकाणी वास्तव्य करुन राहत नाही. पण सद्यस्थितीत १५ पेक्षा अधिक वर्षे एकाच ठिकाणी वास्तव्य करणारे ८४.३३ टक्के उत्तरदाते आहेत. कुळ कायद्यांतर्गत जमीन हस्तांतरण तरतुदीनुसार वास्तव्याचा कालावधी जास्त असल्यास जागा स्वमालकीची होईल या अपेक्षेने वास्तव्याचा कालावधी जास्त सांगितला गेला.

५. पारधी कुटुंबातील सुविधांचा विचार केला असता ७० टक्के कुटुंबात वीज, ७४ टक्के कुटुंबात पाणी आणि ७३ टक्के कुटुंबात स्नानगृहाचा अभाव आहे. ७५ टक्के पारधी कुटुंबे इंधन म्हणून लाकडाचा वापर करतात. यावरुन आजही हा समाज इंधनासाठी वनसंपत्तीवर अवलंबून असल्याचे स्पष्ट होते.

६. ८९.६७ टक्के कुटुंबातील स्त्रियांना निर्णय स्वातंत्र्य नसल्याचे आढळले. यावरुन स्त्रियांचा दर्जा दुय्यम असल्याचे स्पष्ट होते. मुलांच्या सामाजिकरणाच्या दृष्टीने मुलांनी रिकामा वेळ विधायक पध्दतीने व्यतित करणे गरजेचे आहे. पण जमातीत २३. ६७ टक्के भटकणे, १३.६७ टक्के

शिकार करणे, ७.६७ टक्के भीक मागणे आणि ३४ टक्के घरातील काम असे मुलांनी रिकामा वेळ घालविण्याचे प्रमाण असून ही बाब चिंताजनक आहे.

७. १५ ते १८ वर्षे या वयोगटात विवाह झालेले ७२.३३ टक्के उत्तरदाते आहेत. यावरुन बालविवाहाचे प्रमाण जास्त आढळले. यात स्त्रियांची संख्या जास्त असल्याचे स्पष्ट होते. जमातीत बहुविवाह प्रचलित असल्याचे ८१ टक्के उत्तरदात्यांनी सांगितले. बहुविवाहात बहुपत्नी विवाह जास्त प्रमाणात प्रचलित आहे. जमातीत वधुमुल्याची प्रथा आहे. पण सद्य:स्थितीत ते ५३.३३ टक्के वराकडून तर १०.६७ टक्के वधुकडून घेतले जाते. ३६ टक्के उत्तरदाते विवाहाचा खर्च दोन्ही बाजुने करतात, ही नवीन बाब सामाजिक स्वास्थ्य वाढवणारी आहे.

८. सर्वच उत्तरदात्यांनी विवाहवयात वाढ झाल्याचे सांगितले. प्रगतांच्या संपर्कामुळे ४०. ६७ टक्के , कायद्याचा परिणाम म्हणून २९.३३ टक्के आणि शिक्षणामुळे म्हणून २७ टक्के अशी या बदलाची कारणे आहेत. विवाह ठरवतांना ९३ टक्के पालक मुला-मुलींच्या मताला प्राधान्य देतात याचे कारण पूढील वैवाहिक जीवन स्थिर रहावे हे असते.

९. जमातीचा विवाह विधी जमातीतील अनुभवी व्यक्तींकडून करण्याचे प्रमाण ७०.३३ टक्के आहे. जमातीत प्रथम पारंपारिक विवाह होतो. ७१ टक्के पारधी लोकांनी आधूनिक म्हणजे हिंदू विवाह पध्दतीचा स्वीकार केल्याचे आढळले. नोंदणी विवाह आणि सामुहिक विवाह सोहळे याबाबत अज्ञान व नापसंती आढळली.

१०. घटस्फोटाची प्रक्रिया अत्यंत लवचिक आहे. आजही जमातीत घटस्फोटासाठी ६१.३३ टक्के उत्तरदाते जातपंचायतीचाच आधार घेतात. विधवेला पूर्नविवाह करण्याची परवानगी आहे. यावरुन विवाह संस्था लवचिक आहे हे स्पष्ट होते. पण विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंधांना आक्षेप आहे. विवाह विधीचे स्वरुप अत्यंत साधे आहे. आधूनिक पध्दतीने म्हणजे हिंदूप्रमाणे विवाह होतात पण प्रथमतः जमातीच्या नियमांचे पालन व पूर्तता केली जाते.

११. पारधी आपला धर्म हिंदू सांगतात. जमातीचे धर्मसंकेत व नियमांचे पालन अत्यंत कटाक्षाने केले जाते. दैनंदिन जीवनात प्रत्येक घटनेला धार्मिक आधार आहे. धार्मिक बाबतीत स्त्रियांवर अत्यंत खडतर बंधने आहेत. जमातीचा देवावर प्रचंड विश्वास आहे. पारधी भविष्यासंबंधी तसेच शिकार व इतर प्रतिकूल कारणांसाठीही धर्माचा आधार घेतात. धर्मावरील या श्रध्देतून अनेक अंधश्रध्दांची निर्मिती झाली आहे. त्याचे अनेक नियम असून त्यांचे पालन बंधनकारक असते. धार्मिक अंधश्रध्देतून जमातीत अनेक अरिष्ट ओढवतात.

१२. जमातीत कूळ व आडनावानुसार वेगवेगळे कुलदैवत आहे. कुलदैवत व घरातील देव हे सोने चांदीचे प्रतिकरुप असतात. त्याला पातर असे म्हणतात. घरातील देवाची पूजा फक्त पुरुषच करतात. स्त्रियांना अशूभ मानुन स्त्रियांचा वावर किंवा सावलीही देवावर पडू दिली जात नाही. पारधी हिंदू देवदेवतांनाही पूजतात. जमातीत ९८.६७ टक्के नवस करतात. तर १०० टक्के उपवास करतात. संकट निवारण, समाधान, यश इ. साठी नवस व उपवास केले जातात.

१३. पारधी जमातीचा देवकारण हा वार्षिक धार्मिक विधी असून प्रत्येक कुळाची या धार्मिक विधीची जागा ठरलेली असते. त्या जागेला पवित्र स्थान म्हणून महत्व असते. हा विधी प्रचंड खर्चिक असतो. या विधीत केवळ एक पारंपारिक प्रथा म्हणून पशूबळी देण्याचे प्रमाण ५९ टक्के आहे. तर सुखप्राप्तीसाठी पशूबळी देण्याचे प्रमाण ३४.३३ टक्के आहे. बलिदानाप्रसंगी बकरा, कोंबडा आणि सर्वाधिक ७२.३३ टक्के रेड्याचा बळी दिला जातो. त्या पशूच्या रक्तात देवाची प्रतिमा बुडवून ते रक्त प्रसाद म्हणून पितात. या विधीच्या खर्चासाठी प्रसंगी चोरी करुनही पैसा गोळा केला जातो. या अंधश्रध्देबद्दल साधक बाधक चर्चा किंवा चिकित्सा करण्याची मानसिकता जमातीत दिसत नाही.

१४. जमातीत धर्मांतराचे एकही उदाहरण नाही. ते आपला धर्म हिंदूच सांगतात. पण न्याय मिळत नसल्याची खंत आहे. भावी पिढीने हातात शस्त्र घेऊन न्याय मिळवण्याचा प्रयत्न करण्याची वेळ येऊ न देता व त्यांचा नक्षलवादी चळवळीशी संबंध येण्यापूर्वीच हिंदू म्हणून सन्मान मिळणे व त्यांचे सामीलीकरण होणे आवश्यक आहे.

१५. स्वातंत्र्योत्तर काळात जमातीचा विविध माध्यमातून इतर समाजाशी संपर्क व सामाजिक संबंधात वाढ अपेक्षितच होती. या संबंधाचे स्वरुप ६० टक्के प्रासंगिक, १८ टक्के जवळचे असे असल्याचे आढळले. प्रासंगिक स्वरुपाचे संबंध तात्पूरते असुन त्यात जवळीकतेचा अभाव असतो. प्रासंगिक स्वरुपाच्या संबंधाचे प्रमाण जरी जास्त असले तरी हे संबंध जाणीवपूर्वक ठेवले जातात. कारण इतर जाती जमातीशी संबंध न ठेवल्यास संशयी दृष्टिकोन बळावतो व इतर समस्यांना तोंड द्यावे लागते. १८टक्के पारधी, संबंध येत नाहीत असे मत नोंदवतात. यावरुन आजही इतर जमातीपासून अलिप्तता दिसून येते. जमातीअंतर्गत सहकार्य न मिळण्याचे प्रमाण ६९. ६७ टक्के आहे. आपापसातील भांडणे, वैरभाव, संशयी वृत्ती, संघटनशक्तीबाबत अज्ञान इत्यादी कारणांमुळे पारधी छोट्या - छोट्या वस्तीत विभागले गेले आहेत.

१६. श्रेष्ठ-कनिष्ठतेची मानसिकता व न्यूनगंडाची भावना यामुळे जमातीत परात्मवृत्ती आढळते. स्वतःची न्याय ओळख व्यवसायामुळे होती पण या शिकार व्यवसायावर कायद्याने बंदी आली. परिणामी जमातीअंतर्गत स्वतः ची संस्कृती कनिष्ठ वाटण्याचे प्रमाण ६७ टक्के आहे.

१७. पारध्यांमध्ये ९२ टक्के मद्यपानाचे प्रमाण आहे. स्त्री-पुरुष, मुले सर्वच मद्यपान करतात. मद्यपानाला धार्मिक मान्यता आहे. पाहुणचारात मांसाहार व मद्यपानाला महत्व आहे. कालौघात दारुविक्री व्यवसाय करण्याचे हेच कारण असावे.

१८.पारधी वस्ती गावापासून दूर असल्याने अनेक असुविधांना तोंड द्यावे लागते. वस्तीमध्ये स्वच्छतागृह ९०.६७ टक्के, दवाखाना ६७.६७ टक्के, बाजार ६२.६७ टक्के आणि २१ टक्के मनोरंजनाची साधने नसण्याचे प्रमाण आहे. व्यक्तिगत पातळीवर, रेडिओ व मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो.

१९. पारध्यांच्या जीवनात घर या मूलभूत गरजेबाबत अत्यंत केविलवाणी अवस्था आहे. स्वतःचे घर असल्याचे प्रमाण ४७.६७ टक्के तर नसल्याचे प्रमाण ५२.३३ टक्के इतके आहे. राहती जागा मालकीची नाही व घराचा निकृष्ट प्रकार, अपूरी जागा, तात्पुरता निवारा अशा स्थितीत ४१ टक्के पत्राशेडमध्ये राहतात तर १० टक्के झोपडीत राहतात. घराचा प्रकार कोणताही असो, राहती जागा स्वमालकीची नसणे अथवा त्यांची सरकारी दप्तरी नोंद नसण्याचे प्रमाण ७६ टक्के आहे.

२०. सद्यः स्थितीत भाषेत बदलाचे प्रमाण ९८ टक्के असून हा बदल जाणीवपूर्वक करण्याचे प्रमाण २१ टक्के आहे. तर प्रगतांच्या संपर्कामुळे भाषेत बदल होण्याचे प्रमाण ७२ टक्के आहे. जमातीच्या पारंपारिक पोषाखात ८३.३३ टक्के बदल झाला आहे. जमातीत मृत व्यक्तीचे दफन करण्याचे प्रमाण ९७ टक्के आहे.

२१. जमातीत आजही १०० टक्के जातपंचायतीचे अस्तित्व आहे. जातपंचायत असावी असे ७८ टक्के पारधी म्हणतात. जातपंचायतीत कौटुंबिक कलह, अनैतिक संबंध, चोरी, फसवणूक, प्रथा-परंपरांचे उल्लंघन, घटस्फोट इ. बाबतची प्रकरणे चालवून न्यायनिवाडा केला जातो. सामाजिक बहिष्कार, जबर आर्थिक दंड, व निषिध्द धार्मिक गोष्टी शिक्षा म्हणून जबरदस्तीने करण्यात भाग पाडणे असे जातपंचायतीतील शिक्षेचे स्वरुप असते. कांही शिक्षांचे स्वरुप विचित्र व अनाकलनीय असून ते मागासलेपणाचे निदर्शक आहे. ८० टक्के उत्तरदात्यांना जातपंचायतीला कायद्याने बंदी हे माहिती आहे. तरीही जातपंचायत असावी असे ७८ टक्के पारधी म्हणतात.

यावरुन प्रचलित शासकीय न्यायव्यवस्था योग्य न्याय देईल यावर जमातीचा विश्वास नाही, हे स्पष्ट होते. म्हणूनच पोलिसांकडून योग्य न्याय मिळत नाही असे ६९.६७ टक्के उत्तरदात्यांनी सांगितले.

२२.जमातीचा पारंपारिक व्यवसाय शिकार असून वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे या व्यवसायावर बंदी आली. परिणामी उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला. त्यामुळे ३७.३३ टक्के सद्यःस्थितीत शिकार करीत नाहीत. तर १६ टक्के आजही शिकार करतात. क्वचित प्रसंगी शिकार करण्याचे प्रमाण ४६.६७ टक्के आहे. या व्यवसायात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी ८६.६७ टक्के पारधी, वन्यजीव कायद्याचा परिणाम म्हणून शिकार हा व्यवसाय बंद पडल्याचे सांगतात.

२३.सद्यःस्थितीत इतर अनेक व्यवसाय करुन उदरनिर्वाह केला जातो. जमातीच्या पारंपारिक व्यवसायावर कायद्याने बंदी आल्याने शेती, मजूरी, पशूपालन, शेतराखण, भिक्षा, ऊसतोड मजूरी, बांधकाम, दारुविक्री, हमाली असे इतर व्यवसाय असून फक्त ४ टक्के नोकरी करतात. अपुरे शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षणाचा अभाव, परंपरांचे पालन, देवकारणातील खर्च, नकारात्मक मानसिकता, उदरनिर्वाहाचे निश्चित साधनाचा अभाव यामुळे आर्थिक गरजा भागवणे कठीण झाले असून हा समाज आर्थिक विवंचनेत जगतो आहे.

२४. जमातीत ८१.३३ टक्के उत्तरदात्यांचे कमाल वार्षिक उत्पन्न ३० हजार रु. म्हणजे मासिक २५००/- रु. आहे. त्यामुळे येणाऱ्या उत्पन्नातून दैनंदिन गरजा भागत नसल्याचे प्रमाण ९०.३३ टक्के इतके आहे. ही आर्थिक तुट भरुन काढण्यासाठी अनेक चांगले वाईट मार्ग अवलंबले जातात. उत्तरदात्यांकडे असलेल्या वस्तुबद्दल माहिती घेतली असता जास्तीत जास्त ६८ टक्के मोबाईल धारक आहेत. तर ४४.३३ टक्के लोकांकडे रेडिओ आहे. दूचाकी, दूरदर्शन संच, घड्याळ, शिवणयंत्र, बैलगाडी इ. असण्याचे प्रमाण अत्यंत अल्प आहे.

२५. आर्थिक घडामोडीत बँक व्यवहार महत्वाचा घटक असून ७८.६७ टक्के पारधी बँक खातेदार नाहीत. निरक्षरता व आर्थिक विवंचनेमुळे बँकेत खाते असण्याची गरज वाटत नाही असे मत व्यक्त केले गेले. जमातीत भावी पिढीने आधूनिक व्यवसाय करावा असे ९५.३३ टक्के उत्तरदात्यांना वाटते.

२६. राजकीय जागृतीबाबत अज्ञान आढळते. मतदान करण्याचे प्रमाण ७० टक्के असले तरी त्यांच्यातील राजकीय जागृती खरी नाही. कारण मतदान करण्यासाठी पैसा, ओळख, व्यक्ती हे निकष मानले जातात. राजकीय सत्ता कोणाचीही असो, फरक पडत नाही अशी मानसिकता जमातीत आढळली.

२७. पारधी जमातीत शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये इतर जमातीच्या तुलनेत पारधी मुलांची संख्या अत्यंत कमी असून पालक आणि मुले दोघांनाही शाळा व शिक्षणाबद्दल आकर्षण नाही. जमातीत ६९.३३ टक्के निरक्षरता आहे तर फक्त ३.६७ टक्के स्त्रिया साक्षर आहेत. शिक्षणाचा स्तर उंचावलेला नाही. उत्तरदात्यापैकी फक्त १५ टक्के प्राथमिक, १२.३३ टक्के माध्यमिक शिक्षण घेतलेले आहेत.

२८. मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत पालकांमध्ये अल्प प्रमाणात जागृतता आली असली तरीही अद्याप ५१ टक्के पालकांची मुले शाळेत जात नाहीत. इमारतीचा अभाव, शैक्षणिक वातावरणाचा अभाव इ. मुळे मुलांना शिक्षणात गोडी वाटत नाही. जिल्ह्यात फक्त ८.६७ टक्के पालकांनी मुलांना आश्रमशाळेत पाठवले आहे. यावरुन आश्रमशाळेस मिळणारा प्रतिसाद अत्यल्प असल्याचे स्पष्ट होते.

२९.शैक्षणिक अडचणी दूर करण्यासाठी अनेक शैक्षणिक सवलती दिल्या जातात. पण या शैक्षणिक सवलतीबद्दल ६१.३३ टक्के उत्तरदात्यांना माहितीच नाही तर ३८.६७ टक्के उत्तरदात्यांना माहिती आहे पण त्यांना त्यांचा लाभ मिळवण्यात अनेक अडचणी येतात. ६९.३३ टक्के उत्तरदात्यांनी लाभ मिळाला नसल्याचे सांगितले. या शैक्षणिक वस्तुस्थितीतुन जमातीचा शैक्षणिक मागासलेपणा स्पष्ट होतो.

३०. ४०.३३ टक्के उत्तरदात्यांना शासकीय सवलतीची माहिती आहे. तर ५९.६७ टक्के उत्तरदात्यांना या योजनांची माहिती नाही. यावरुन शासनाच्या कल्याणकारी योजना जमातीपर्यंत पोहोचवण्यासाठी शासकीय प्रयत्न आणखी वाढविण्याची गरज आहे हे लक्षात येते. जिल्ह्यात शासकीय योजनांचे लाभधारक ३१.३३ टक्के आहेत. तर ६८.६७ टक्के लाभापासून वंचित आहेत. योजना आहेत हे माहिती आहे पण त्या नेमक्या काय आहेत व त्याचा लाभ कसा मिळवावा हेच माहिती नाही असे ८६.८९ टक्के उत्तरदात्यांनी सांगितले. यामागे गरिबी, अज्ञान, शासकीय कागदपत्रांचा अभाव, इ. कारणे आहेत.

३१. जिल्ह्यात पारधी विशेष योजना अंतर्गत १७ योजना राबविल्या जातात. त्यापैकी कांही मोजक्याच योजनांचा लाभ जमातीला झाल्याचे सर्वेक्षणादरम्यान आढळले. पारधी विशेष योजनांचे एकूण लाभधारक १९.६७ टक्के आहेत तर शैक्षणिक योजनांचा लाभ ९ टक्के उत्तरदात्यांच्या पाल्यांना झाला आहे. इतर सार्वजनिक लाभाच्या योजनांतर्गत २.६७ टक्के लाभधारक असून गटार, स्वच्छतागृह, पाण्यासाठी सार्वजनिक कुपनलिका असे या योजनांचे स्वरुप होते. फक्त ३१.३३

टक्के उत्तरदात्यांना वरील स्वरुपात योजनांचा लाभ झाला आहे तर ६८.६७ टक्के उत्तरदाते अद्यापही शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. मात्र शासकीय आकडेवारी वेगळेच चित्र दर्शविते.

३२. योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय कागदपत्रांची गरज असते. त्यापैकी ५४.३३ टक्के रहिवासी प्रमाणपत्र, ५७.३३ टक्के जातप्रमाणपत्र, ६२.३३ टक्के शिधापत्रिका तर ६९ टक्के मतदान ओळखपत्र असे शासकीय कागदपत्रे उपलब्ध असण्याचे प्रमाण आहे. अशी कागदपत्रे मिळवतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. जमातीच्या प्रगतीसाठी शासन विविध योजना तयार करते पंरतु त्यासाठी जमातीची सद्यःस्थिती व गरजा काय आहेत याचा विचार केला जात नाही. म्हणूनच व्यवसायासाठी शासनाने मदत करावी असे २४ टक्के उत्तरदात्यांना वाटते. २२.३३ टक्के उत्तरदाते घर व २० टक्के उत्तरदाते शेतीची मागणी करतात. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे पोलिसांच्या त्रासाला व कोर्ट कचेरीला सामोरे जावे लागत असल्याने १५.३३ टक्के उत्तरदाते शासनाकडून कायदेविषयक मदतीची अपेक्षा करतात.

३३. शासकीय योजनांचा लाभ घेताना अज्ञान, निरक्षरता, गरिबी, शासकीय कागदपत्रांचा अभाव, मदतीचा अभाव इ. अडथळे असून भ्रष्टाचार, फसवणूक, पक्षपातीपणा, अधिकाऱ्यांचे असहकार्य व दूय्यम वागणूक अशा समस्यांना सामोरे जावे लागते. यावरुन अंमलबजावणीतील त्रुटी तसेच प्रगतांचे असहकार्य, जमातीचे असंघटन आणि शासनाचे दूर्लक्ष या बाबी स्पष्ट होतात.

३४. पारधी जमातीचे सामाजिक जीवन अनेक समस्यांनी व्यापले आहे. व्यसनाधिनता, प्रगतांचा नकारात्मक दृष्टीकोन, अंधश्रध्दा, गुन्हेगारीचा शिक्का, आर्थिक विवंचना, निरक्षरता या प्रमुख समस्या असल्याचे लक्षात येते. आजही या समस्यांची तीव्रता जाणवते. कारण ४१.६७ टक्के उत्तरदाते प्रगतांकडून वाईट वागणूक मिळते असे सांगतात तर ३१ टक्के उत्तरदाते सर्वसाधारण वागणूक मिळते असे मत नोंदवतात.

३५. उदरनिर्वाहाची साधने अपूरी असल्याने दैनंदिन गरजा भागविण्यासाठी जमातीला सतत स्थलांतर करावे लागते. स्थलांतराचा कालावधी कमी जास्त असतो. जमातीत स्थलांतराचे प्रमाण ८४.३३ टक्के आहे. त्यामागे प्रगतांची उपेक्षा, पोलिसांचा त्रास, उपजिवीकेची अपूरी साधने, दीर्घकालीन रोजगाराचा अभाव ही प्रमुख कारणे असल्याचे आढळले.

३६. चोरी किंवा गुन्ह्याशी पारधी लोकांचा संबंध लावण्याचे प्रमाण ६५.६७ टक्के इतके आहे. सर्वच पारधी जमातीला गुन्हेगार समजणे चुकीचे व अन्यायकारक आहे. कारण गुन्हेगारी सर्वच समाजात

कमी जास्त प्रमाणात आढळते. गुन्हेगारी कृत्यातील सहभागासंदर्भाने ७ टक्के उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्य अटकेत आहेत. ९० टक्के उत्तरदात्यांनी पोलिसांकडून मिळणारी वागणूक वाईट असते असे सांगितले. या दुष्टचक्रातुन सुटकेसाठी शासनानेच मदत करावी असे ५२.३३ टक्के उत्तरदात्यांना वाटते. तर ३४ टक्के उत्तरदाते सामाजिक कार्यकर्त्यांकडून मदतीची अपेक्षा करतात. १३.३३ टक्के लोकांनी पोलीसांनीच विश्वास दाखवावा अशी अपेक्षा करतात.

३७. पारधी स्वत:ला आजही अनेक बाबतीत मागासलेले समजण्याचे प्रमाण ९८ टक्के इतके आहे. शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, व्यवसाय, नोकरी, घर, भटकंती, स्थलांतर अशी अनेक कारणे मागासलेपणाची भावना निर्माण करतात. या दयनीय अवस्थेतुन बाहेर पडण्यासाठी सक्षम नेतृत्वाची व सामाजिक बांधीलकीची गरज अपेक्षित आहे. पण जमातीतील सुशिक्षित लोक जमातीसाठी कार्य करण्याचे प्रमाण फक्त २८.६७ टक्के आहे. तर ६९.६७ टक्के लोकांनी स्वजमातीतुन सहकार्य मिळत नाही असे सांगितले.

३८. जमातीचा राजकीय सहभाग व जाण अत्यंत कमी आहे. ९७ टक्के उत्तरदात्यांचा राजकीय सहभाग नसल्याचे आढळले. यावरुन जमातीत प्रभावी नेतृत्वाचा अभाव आणि राजकीय जागृतीबाबत अज्ञान दिसुन येते. जमातीला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रभावी नेतृत्व आणि संघटन न लाभल्याने आजही मागासलेपणा दुर झाला नाही. आज पारधी जमातीत अल्प प्रमाणात का होईना परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. परिवर्तनासाठीची प्रेरणा शासन आहे असे ४९.३३ टक्के उत्तरदाते सांगतात. तर २९ टक्के उत्तरदाते सामाजिक कार्यकर्ते परिवर्तनाची प्रेरणा देतात असे सांगतात. ११.६७ टक्के उत्तरदाते जमातीतूनच प्रेरणा मिळत असल्याचे सांगतात. यावरुन शासकीय पातळीवरुन सकारात्मक बदल घडू शकतात असा विश्वास जमातीला आहे हे स्पष्ट होते.

## ४. शिफारशी :-

पारधी जमातीच्या समाजशास्त्रीय अभ्यासांती प्राप्त निष्कर्षांचे अध्ययन करुन जमातीच्या विकास व सर्वांगीण प्रगतीसाठी पुढील शिफारशी सूचवत आहे -

१) पारधी जमातीची लोकसंख्या नक्की किती आहे? याविषयी निश्चित व विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध नाही. त्यामुळे केंद्र शासनाने त्यांची स्वतंत्र जनगणना करावी. या जनगणनेपूर्वी सर्व पारधी लोकांनागावपातळीवर मेळावे घेऊन जात प्रमाणपत्रांचे वाटप करावे. जेणेकरुन त्यांची गणना करणे सुलभ होईल. जनगणनेमधून प्राप्त आकडेवारी व माहिती ही

जमातीची सद्यस्थिती जाणण्यासाठी उपयुक्त ठरेल आणि त्यायोगे प्रगती व विकासाच्या योजना आखणे व त्यांचे प्राधान्यक्रम ठरवणे सोपे होईल.

२) पारधी जमातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये आहे. मात्र काही पोटजातींचा समावेश भटक्या व विमुक्त जाती-जमातींच्या शासकीय यादीमध्ये आहे. सर्व पोटजाती या मानववंशदृष्ट्या व प्रत्यक्ष व्यवहारात पारधी जमातीच्याच असून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक स्थितीत साम्य असल्याने सर्व पोटजातींचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करावा.

३) सामाजिक व आर्थिक जीवनाच्या अभ्यासांती असे लक्षात आले की समाजात स्थलांतर थांबावे असे सर्वाना वाटते. त्यामुळे गृहबांधणी कार्यक्रम हाती घेऊन सर्वांना संपुर्ण शासकीय अनुदानाने घरे बांधून द्यावीत.

४) उदरनिर्वाहाचे निश्चित साधन नसणे हे स्थलांतराचे प्रमुख कारण असून नवीन वस्तीत रोजगाराच्या व उपजीविकेसाठीच्या आवश्यक संधी उपलब्ध करुन द्याव्यात.

५) शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सशक्त माध्यम आहे. पारधी जमातीत शिक्षणांचे प्रमाण अत्यल्प असून निरक्षरता हे अनेक समस्यांचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे जमातीसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यंत महत्वाचे आहे. या अतंर्गत पारधी वस्तीतच, किमान माध्यमिक स्तरापर्यंत शाळा सुरु कराव्यात. या शाळा सर्व शैक्षणिक सोयीसुविधांनी युक्त असाव्यात व या शाळांच्या माध्यमातून शिक्षण, निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था व शैक्षणिक सवलती पुर्णतः मोफत उपलब्ध करुन द्याव्यात.

६) शासनाने पदवीपर्यंतचे शिक्षण पुर्णतः मोफत उपलब्ध करुन द्यावे. पदवीनंतरच्या शिक्षणासाठी भरीव विद्यावेतन किंवा शिष्यवृत्तीची तरतूद करावी. शैक्षणिक प्रगतीसाठी पारधी जमातीचा प्रतिसादही महत्वाचा असून ज्या कुटुंबातील मुले शिक्षण घेत नाहीत अथवा शाळा अर्धवट सोडतात त्यांच्यासाठी स्थानिक पातळीवर प्रयत्न करावा व मोफत शैक्षणिक सुविधा, प्रवास सवलत देऊन पाल्य व पालकांमध्ये शिक्षणांबद्दल गोडी वाढेल अशा प्रलोभनांची योजना आखावी.

७) शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी कठोरपणे करावी व त्यामध्ये कसूर वा भ्रष्टाचार करण्याऱ्या व्यक्तीस कठोर शिक्षेची तरतूद असावी.

८) जात प्रमाणपत्राच्या वाटपासोबतच शिधापत्रिका, रहिवासी प्रमाणपत्र, मतदान ओळखपत्र इ. महत्वाची शासकीय कागदपत्रे सामुदायिक मेळाव्यांच्या माध्यमातून वाटप करावीत. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेमधून विशेष बाब म्हणून सवलत मिळावी.

९) पारधी वस्त्यांना महसूली गावाचा दर्जा द्यावा जेणेकरुन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वस्तीमध्ये वीज, पाणी, दवाखाना इत्यादी सार्वजनिक सोयी सुविधा उपलब्ध होतील.

१०) पारधी जमातीच्या विकासासाठी स्वतंत्र योजना आखाव्यात. या योजनांची माहिती पारधी समाजाला प्रचाराच्या माध्यमातून मिळावी. या योजनांचे अनुदान हे इतर ठिकाणी खर्च न करता त्यासाठीच खर्ची पडावे.

११) शासकीय सेवेतील अनुसूचित जमातीसाठीच्या नोकरीच्या आरक्षणातंर्गत लोकसंख्येच्या आधारावर पारधी जमातीसाठी स्वतंत्र आरक्षण असावे.

१२) पारधी जमातीचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी स्वतंत्र राजकीय आरक्षणाची तरतूद करावी.

१३) जातपंचायतीच्या माध्यमातून जमातीचे संघटन टिकून असून याच माध्यमातून जमातीतील अनुभवी, प्रतिष्ठित व्यक्तींच्या मदतीने अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी व जमातीच्या सामाजिक, धार्मिक प्रगतीसाठी प्रबोधन करावे.

१४) इतर व्यवसायाकडे जमातीला कल वाढत असून या व्यवसायासाठी आवश्यक भागभांडवल, प्रशिक्षण, भौतिक सुविधा व अनुदान शासनाने उपलब्ध करुन द्यावे.

१५) गुन्हेगारी/ चोरीच्या संशयावरुन पारधी लोकांचे धरपकड सत्र पुर्णतः थांबाव. वास्तविक गुन्हेगारास विशिष्ट जात वा धर्म नसतो व गुन्हेगारवृत्ती समाजाच्या सर्वच स्तरात आढळते. त्यासाठी संपूर्ण पारधी जमातीस जबाबदार धरणे पुर्णतः चुकीचे आहे. कसलाही पुरावा नसताना केवळ पारधी आहे म्हणून पकडून अटकेत टाकणाऱ्या पोलिस खात्यातील व्यक्तीस कठोर शिक्षेची तरतूद करावी.

१६) प्रगत समाजाने पारधी समाजाकडे बघण्याचा आपला नकारात्मक दृष्टिकोन सोडून द्यावा व पारधी जमातीने त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा. जेणेकरुन परस्पर सहकार्यातून प्रगतीचे मार्ग खुले होतील.

१७) ज्या ठिकाणी जमातीचे लोक शासकीय रिकाम्या जागेवर राहतात. त्या जमीनी त्यांना हस्तांतरीत कराव्यात या संदर्भाने ज्यांच्यावर कोर्टात केस चालू आहेत त्या त्वरीत मागे घ्याव्यात.

१८) पारधी जमातीची जीवनशैली व उपजिविका ही वनसंपत्तीवर अवलंबून असल्याने वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे त्यांच्या उपजिविकेचे साधन धोक्यात आले. म्हणून जमातीचा जंगलावरील हक्क अबाधित राखताना त्यांच्यासाठी आरक्षित जंगले निर्माण करावित व त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी जमातीवरच सोपवावी.

१९) पारधी जमात इंधनासाठी जंगलावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच जमातीत अद्यापही शिकार केली जाते.शिकार व जंगल तोड या बाबी पर्यावरणास हानी पोहचवणाऱ्या व वनसंपत्तीचा नाश करणाऱ्या आहेत त्यामुळे पर्यायी उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे.

२०) पारधी अत्याचाराच्या घटनांनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा गैरफायदा घेवून धर्मांतराची चर्चा केली जाते. शासनाचे दुर्लक्ष व प्रगतांची उपेक्षा यामुळे जमातीने नक्षलवादी चळवळी सारखी संघर्षात्मक भुमिका स्विकारु नये यांची काळजी घ्यावी. हिंदू धर्माचाच एक भाग असलेल्या या जमातीला प्रगत समाजाने हिंदू म्हणून सन्मान मिळवून देणे गरजेचे आहे.

| | |
|---|---|
| **संशोधिका** | **संशोधन मार्गदर्शक** |
| **प्रा. सुलभा कोरेकर** | **प्रा. डॉ. श्री. श्रीकांत गायकवाड** |

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

### १.१ भारतीय समाजव्यवस्था :-

आशिया खंडातील एक विशाल व जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून भारत ओळखला जातो. "भारताचे क्षेत्रफळ जगाच्या क्षेत्रफळाच्या २.४% असून, जगात क्षेत्रफळाच्या दृष्टीने रशिया,कॅनडा, अमेरिका, चीन, ब्राझील व ऑस्ट्रेलिया नंतर भारताचा सातवा क्रमांक लागतो." [१] अगदी प्राचीन काळापासुन भारतवर्ष या नावाने ओळखला जाणाऱ्या भारतात भाषिक, जातीय, वांशिक, धार्मिक, भौगोलिक, सांस्कृतिक इ. अनेक प्रकारची विविधता आहे. "भारतीय समाजात विविध सांस्कृतिक गट अनेक वर्ष एकत्र नांदत आहेत. त्यांनी आपापल्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांची देवाण-घेवाण केली आणि त्यातुनच भारतीय संस्कृती निर्माण झाली. " [२] संस्कृतीमुळे प्रत्येक समाजाचे वेगळेपण टिकून राहते. डॉ. इरावती कर्वे यांनी "संस्कृती म्हणजे विशिष्ट समाजाची जीवनपध्दती " [३] असे म्हटले आहे.

भारतीय समाज सांस्कृतिकदृष्ट्या आत्मनिर्भर असून भारताची संस्कृती व्यापक व समृध्द आहे. या देशातील प्रत्येक गट, जात, धर्म हे आपल्या संस्कृतीद्वारे आपले वेगळेपण टिकवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे या देशातील नागरिकांची ओळख देशावरुन होण्याऐवजी ती त्याच्या धर्म व जातीवरुन होऊ लागली. कार्यातील व व्यक्तीतील फरक लक्षात घेऊन कार्य व्यवस्थित पार पाडले जावे या उद्देशाने समाजातील विविध कार्याचे वाटप करण्यासाठी ज्या व्यवस्थेचा अवलंब केला जातो त्या व्यवस्थेला सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था असे म्हणतात. कोणत्याही समाजाचे प्रतिबिंब हे त्या समाजात प्रचलित असलेल्या सामाजिक स्तरीकरणात उमटलेले असते. प्रत्येक समाजाला स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी काही मूलभूत गरजांची पूर्तता करावी लागते. त्यासाठी कांही कार्ये पार पाडावी लागतात. ही कार्ये समान नसतात. तशा व्यक्तीही समान नसतात. यासाठीच सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था असते. पास्कल गिल्बर्टच्या मते, सामाजिक स्तरीकरण म्हणजे समाजाची अशी कायम गटात विभागणी की, ज्या गटातील परस्परसंबंध श्रेष्ठत्व - कनिष्ठत्वाच्या कल्पनेवर आधारलेले असतात. सामाजिक स्तरीकरणाच्या आधाराचे स्वरुप समाजपरत्वे भिन्न स्वरुपाचे असून वय, लिंग, शारिरीक क्षमता, वांशिक भावना, बौध्दिक कौशल्य, संपत्ती, धर्मविषयक ज्ञान इ. घटकांना सामाजिक स्तरीकरणाचे प्रमुख आधार मानले जातात.

**जाती व्यवस्था :-**

जात ही सामाजिक स्तरीकरणाची अशी व्यवस्था आहे की, ज्यात तत्वतः व्यक्तीला सामाजिक दर्जा बदलता येत नाही. व्यक्तीला जन्मामुळे मिळालेला दर्जा मरेपर्यंत कायम राहतो. व्यवसाय, जीवनपध्दती, निवासस्थान, जोडीदार, निवडीचे क्षेत्र, मित्र समुह इ. बाबी जन्मानेच निश्चित केल्या जातात. जातीव्यवस्था हे पारंपारिक भारतीय समाजरजनेचे प्रमुख लक्षण असून हिंदू समाजरचनेमध्ये जातीची श्रेष्ठ ते कनिष्ठ अशी उतरती श्रेणी आहे. प्रा. सी. एच. कुले यांच्या मते "संपूर्णतः अनुवंशिकतेवर आधारलेल्या वर्गास जाती असे म्हणतात." [४]

जाती व्यवस्थेची उपयुक्तता कधी काळी होती. श्रमविभाजन, सामाजिक नियंत्रण, सामाजिक व आर्थिक सुरक्षितता, बलुतेदारी इ. मुळे भारतीय समाजरचना स्वयंपूर्ण होती. पण काळाच्या ओघात या स्तरीकरणात अनेक दोष निर्माण झाले. श्रेष्ठ - कनिष्ठता, अस्पृश्यता, यामुळे समाजात कायमचे गट पडले आणि जाती - जातीतंर्गत दुरावा निर्माण झाला.उच्च जातींनी अस्पृश्यांवर अनेक निर्बंध लादून त्यांना सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक अधिकारापासुन वंचित ठेवले. गुणवान, कर्तृत्ववान व्यक्तींना व्यवसाय स्वातंत्र्य नव्हते. परिणामी, समाजात आर्थिक विषमता वाढीस लागली व व्यावसायिक गतिशीलतेअभावी आर्थिक प्रगती खुंटली.

लोकशाहीत अपेक्षित असलेली जीवनपध्दती व जातीव्यवस्थेने प्रत्यक्षात प्राप्त होणारी जीवनपध्दती यात तफावत असल्याने जातीव्यवस्था ही भारतीय लोकशाहीत अडथळा बनली आहे. आजही काही परंपरावादी जाती व्यवस्थेला पूर्णपणे नाकारत नाहीत. सामाजिक सुधारणेचे प्रयत्न केले जात आहेत व त्यामुळे बदल, सुधारणा होत असल्या तरी मानसिकता बदलेली नाही. कारण प्रत्येकालाच स्वजातीचा अभिमान आहे. जात सोडायला कोणीही तयार नाही. परिणाम नवीन समस्या, नवीन अडचणी निर्माण होतात. मानसिक मागासलेपणा आर्थिक मागासपणाकडे नेतो आणि तो विकासात अडथळा बनून राहतो.

भारतीय समाज हा वैशिष्ठ्यपुर्ण व विविध प्रकारच्या मानवसमूहाच्या मिश्रणांनी तयार झाला असून येथील प्रत्येक मानवसमूहाची स्वतंत्र जीवनपध्दती आहे. म्हणून भारताला जगाची छोटी प्रतिकृती म्हटले जाते. भारतीय समाजाचे सांस्कृतिक भिन्नतेवर आधारित तीन प्रकारच्या समुदायात पुढीलप्रमाणे विभाजन केले जाते.

१. नागरी समुदाय (Urban Community)

२. ग्रामीण समुदाय (Rural Community)

३. आदिवासी समुदाय (Tribal Community)

पाषाण युगापासून आजपावेतो जगातील मानवाचा जीवनप्रवास हेच सुचवतो की, जगाच्या कोणत्या तरी भूभागावर तो आपले पाय रोवून स्थिर आहे. कांहीजणांनी नैसर्गिक सहवासात राहणे पसंत केले तर काहींनी त्यातूनही औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या शहरात राहणे पसंत केले. पण काहींनी मात्र दूरवर दुर्गम जंगलाच्या व नद्या नाल्यांच्या डोंगर कपारीत आपले संसार थाटले. त्यांना खऱ्या अर्थाने आदिवासी म्हणता येईल. त्यांनाच आपण जंगलचे राजे, आदिम / आदिवासी असेही म्हणतो.

## १.२ आदिवासी समाज

जगाच्या बहुतेक सर्वच भागात आदिवासी जमाती आढळतात. विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावांनी संबोधले जाते. "अमेरिकेत रेड इंडियन्स, ऑस्ट्रेलियात ॲबोरिजीन्स, युरोपीय देशात जीप्सी तर आफ्रिकी आणि आशियाई देशांमध्ये 'आदिवासी' या नावांनी त्या परिचित आहेत. " [५] आदिवासी जमातीच्या उत्पत्तीविषयी विविध विचारप्रवाह प्रचलित असून याबाबतीत आज विपूल संशोधन साहित्य उपलब्ध आहे. आदिवासी जमातीची स्थलांतरे व स्थित्यंतरे हा मानववंशशास्त्रीय व समाजशास्त्रीय अभ्यासात एक महत्वाचा विषय ठरला आहे.

ब्रिटीश कालखंडात ब्रिटीश प्रशासकीय अधिकारी व मानवशास्त्रज्ञ यांचा जनगणनेच्या संदर्भाने आदिवासींशी संपर्क आला त्यावेळी आदिवासींचे सांस्कृतिक व धार्मिक जीवन हिंदूपेक्षा वेगळे होते. त्यामुळे त्यांची गणना नेमकी कोणत्या गटात व धर्मात करावी आणि त्यांना कोणते संबोधन द्यावे हा प्रश्न निर्माण झाला.

"सन १८९१ च्या लोकसंख्या अहवालात लोकसंख्या आयुक्त बेन्स जे.ए. यांनी जातींना त्यांच्या परंपरागत व्यवसायावर आधारित वर्गीकृत केले आणि त्यांनी 'वन्य जमाती' या नावाने जमातीची नोंद घेतली." [६] १९०१ च्या जनगणना अहवालात रिझले सर हर्बर्ट यांनी जमातींना 'प्रकृतीवादी' म्हटले आहे. १९११ च्या लोकसंख्या अहवालात प्रकृतीवादी किंवा 'जमाती' धर्माला मानणारे लोक, तर १९२१ च्या जनगणना अहवालात त्यांची 'पहाडी' व 'वन्य जमाती' नावाने गणना केली आहे. "१९३१ च्या जनगणना अहवालात हटन जे.एच. यांनी त्यांना आदिम वा आदिवासी जमाती (Primitive Tribes)

असे म्हटले आहे." [७] भारत सरकार अधिनियम १९३५ मध्ये आदिवासींना, 'मागासलेल्या जमाती' असे नाव दिले गेले. सन १९४१ च्या लोकसंख्या अहवालात त्यांना केवळ 'जमाती' म्हटले गेले.

"ब्रिटीश अधिकाऱ्यांनी त्यांना प्राणीपूजक (Animistic), प्राचीन, अगदी मुळचे रहिवासी म्हणून संबोधले. पुढे हिंदू व आदिवासी यांच्यात सामाजिक, सांस्कृतिक संबंध आल्याने व पूर्वीचे सामाजिक दुरत्व कमी झाल्याने त्यांना हिंदू धर्माचे आचरण करणाऱ्या वन्य जमाती (Hill Tribes) असे संबोधले गेले. त्या नंतरच्या काळात त्यांना केवळ 'जमाती' असे म्हटले गेले. पाश्चांत्य अभ्यासकांच्या मते जमात म्हणजे 'सामान्यतः ' भौगोलिक दृष्टीने अलग / अंशतः अलग एक वांशिक समूह आहे." [८] त्यांना एका निश्‍चित क्षेत्राच्या मर्यादेत ओळखता येते. तसेच त्यांच्या सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक परंपरा व प्रथा वेगळ्या आहेत. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय आदिवासींच्या अभ्यासातील दृष्टीकोनात वरील विशेष संदर्भ बदललेला आहे.

आदिवासी हा इंग्रजीतील 'अॅबोरिजिनस' या शब्दाचा रुढ मराठी पर्याय आहे. ते वनात वस्ती करुन राहतात म्हणून त्यांना वनवासी म्हटले गेले. त्यांच्या मनात दडलेली कमीपणाची, मागासलेपणाची भावना दूर व्हावी हा उद्देश वनवासी ऐवजी आदिवासी ही संज्ञा वापरुन साध्य करता येईल. 'आदिवासी' म्हणजे मूळ रहिवासी' या शब्दात जो आत्मसन्मान आहे, तो वनवासी या संज्ञेत नाही.

आदिवासी किंवा आदिम समाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाला विचारवंत, अभ्यासक व मानवशास्त्रज्ञांनी विविध नावांनी संबोधले आहे. "प्रसिध्द मानवशास्त्रज्ञ रिसले, लॅस्सी, ग्रिगसन, शूबर्न, टॅलेंट, सेडविक, मार्टिन तसेच भारतीय समाजसुधारक ए.व्ही. ठक्कर यांनी या लोकांना 'आदिवासी' असे म्हटले आहे." [९] "एल्विनने बैगा जमातीला आदि स्वामी (Aboriginals) असे म्हटले आहे." [१०] याशिवाय मागासलेल्या जमाती, (Backward Tribes), गुन्हेगार जमाती (Criminal Tribes) इ. नावांनीही संबोधले जाते.

प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ डॉ. घुर्ये यांनी त्यांना "तथाकथित मूळचे रहिवासी (So called Aboriginal) व मागासलेले हिंदू (Backward Hindus) असे म्हटले आहे." [११] राज्यघटनेत (Tribe) हा शब्द वापरलेला असला तरी त्याची व्याख्या केलेली नाही. "भारताचे राष्ट्रपती घटनेच्या ३४२ (i) कलमान्वये अधिसूचा काढून एखाद्या आदिम जमातीला अनुसूचित जमात (Scheduled Tribe) म्हणून घटनेच्या ५ व्या अनुसूचिमध्ये समाविष्ट करु शकतात. अशा प्रकारे

तिला अनुसूचित जमात असा दर्जा प्राप्त होतो. म्हणजेच राज्यघटनेतील तरतूदी या 'अनुसूचित जमाती' या घटनात्मक संकल्पनेशीच संलग्न आहेत. त्यांच्यासाठी घटनेने अनेक तरतुदी केलेल्या आहेत." [१२]

आदिवासीसाठी भारतीय राज्यघटनेत केलेला 'अनुसुचित जमात' हा उल्लेख डॉ. घुर्येनी मान्य केला आहे. "आदिवासी शब्दास सर्वसंमत असा निःसंदिग्ध अर्थ प्राप्त करुन देण्याचे कार्य विविध मानवशास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी केले आहे. मानवशास्त्रामुळे आदिवासींच्या अध्ययनास महत्व प्राप्त झाले असून मानवशास्त्रज्ञांच्या मते, आधूनिक जटिल संस्कृतीचा अभ्यास करण्यापूर्वी आदिवासींच्या साध्या संस्कृतीचे अध्ययन केल्याने त्याआधारे जटिल संस्कृती समजून घेणे सोपे होते. मानव समाजाच्या सर्व घटकांचा सारखा विकास घडवून आणण्यासाठी आदिवासींचा अभ्यास महत्वाचा आहे." [१३] आदिवासी कोणास म्हणावे, यासाठी अभ्यासकांनी व विचारवंतांनी केलेल्या व्याख्या पूढील प्रमाणे :-

१. "अनुसूचित जमातींना आदिवासी, मुळ निवासी, आदिम, आदिम जाती व टोळया, वन्यजाती व गिरीजन अशी वेगवेगळी नावे आहेत. तेच आदिवासी होत." [१४]

२. "आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानवसमाज सोडून त्यांच्याही पूर्वी भारतात राहणाऱ्या किंवा बाहेरील देशातुन येऊन वने व पर्वत आदींच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना वन्य जमाती किंवा आदिवासी म्हणतात." [१५]

३. "समान नाव असणारा, एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इ. बाबतीत समान विधीनिषेधांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटूंबाचे किंवा कुटूंब समुहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी होत." [१६]

४. "पशूपाल जगात, पशूपूजक जगात, पहाडी, जंगली जगात, प्राचीन जंगलात राहणारे गिरीजन वनवासी म्हणजे आदिवासी" [१७]

५. "भौगोलिकदृष्ट्या इतरांपासुन नेहमीच दूर म्हणजे गिरीकंदात राहिल्यामुळे जंगलात राहणारा निसर्गाच्या सहवासात वाढलेला म्हणजे आदिवासी. " [१८]

थोडक्यात, आदिवासी म्हणजे अतिशय अप्रगत असे समजणे चुकीचे ठरते.कारण मानववंशशास्त्रज्ञांनी वैज्ञानिक पध्दतीने आदिवासी समाजाच्या व्याख्या करुन हे चुकीचे ग्रह दूर केले आहेत. यासाठी त्यांनी आदिवासी समाजाच्या केलेल्या खालील व्याख्या अभ्यासणे आवश्यक आहे.

१. गिलीन व गिलीन :- "एका विशिष्ठ भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा, पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात." [१९]

२. डॉ. रिव्हर्स :- "ज्या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात, युध्द वगैरे सारख्या उद्दिष्ट पूर्तीकरिता एक होऊन झटतात अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात. " [२०]

३. डब्लू.जे. पेरी :- "समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एका सामान्य भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात. " [२१]

४.इंपिरियल गॅझेट नुसार "समान बोलीभाषा बोलणाऱ्या एकाच भूभागात राहणाऱ्या, सुरुवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेल्या पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटूंबांच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात." [२२]

५. डी.एन. मुजुमदार यांनी केलेली विस्तृत व्याख्या पुढीलप्रमाणे -

"समान नाव असणारा, एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इ. बाबतीत समान निषेधनियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटूंबाचे किंवा कुटूंब समूहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी होय." [२३]

६. ई.बी. टायलर यांनी मानवशास्त्र शब्दकोशात पूढीलप्रमाणे व्याख्या केली आहे -

" एका सामाजिक भूप्रदेशात राहणारा व एक बोलीभाषा, सांस्कृतिक एकजिनसीपणा आणि एकात्मिक सामाजिक संगठन असलेला सामाजिक गट म्हणजे आदिवासी जमात होय. त्यांचे समान पूर्वज, समान देवता आणि सामान्यतः समान नेतृत्व असते. त्यांच्या गटातील कुटूंबे आर्थिक, सामाजिक, धार्मिक तसेच कौटूंबिक आणि रक्तसंबंधी धाग्यांनी परस्परांशी संलग्न असतात." [२४]

"इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या १९५३ च्या अहवालात असे नमूद केले आहे की, जगात विविध ठिकाणी सापडणाऱ्या मूळ रहिवासी गटांना लावता येईल असे एक परिणाम किंवा एक व्याख्या सांगता येत नाही."[२५] आदिवासी समाज किंवा जमात या संज्ञेच्या व्याख्येबाबत एकमत नसले तरी विविध स्तरावर केलेल्या व्याख्यांमधून पुढीलप्रमाणे काही ठळक वैशिष्ट्ये पुढे येतात.

### १.२.१ आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये :-

उपरोक्त दिलेल्या आदिवासी समाजाच्या विविध व्याख्यांच्या आधारावरुन आदिवासी समाजाची निश्चित अशी वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) विशिष्ट भूप्रदेश :-**

कोणताही समाज हा एक प्रादेशिक समूह असतो आणि त्याविना समाजाचे अस्तित्व नसते. आदिवासी समाजही या नियमाला अपवाद नाही. सर्वसामान्यपणे बाह्य संपर्कापासून अलिप्त व दुर्गम अशा डोंगराळ भागात त्यांचे वास्तव्य असते. त्यामूळे त्यांच्याशी संपर्क साधणेही कठीण असते. इतर समाजापासून ते शक्य तितके अलिप्त असतात. काही आदिवासी समूह उदा. नागा, कूकी, जानसारी, खासी कचाटी, थारु इ. अजूनही सतत भटकंती करतात. मात्र ज्या प्रदेशात त्यांची भटकंती चालू असते त्या भूप्रदेशाला ते आपला भूप्रदेश मानतात.

**२) प्रमाण लघुता :-**

इतर कोणत्याही समाजाशी तूलना करता आदिवासी समाज आकाराने लहान असतो. त्यांची लोकसंख्या मयादित असते. ज्या विशिष्ट भुप्रदेशावर ते राहतात तोही मर्यादित असतो. लोकसंख्या व भूप्रदेश दोन्ही मर्यादित असल्याने सामाजिक संपर्काचे क्षेत्रही मर्यादितच असते व त्यावर मर्यादा असतात.

**३) समान रक्तसंबंध :-**

आदिवासी समाजातील लोक परस्परांना रक्तसंबंधित मानतात व आपल्या सर्वांचा पूर्वज एकच आहे अशी त्यांची धारणा असते. या दोन्ही धारणांमूळे त्यांच्यात एकमेकांबद्दल विलक्षण बांधिलकी, प्रेम, आपूलकी व साहचर्य निर्माण झालेले असते.

**४) स्वतःची बोलीभाषा व लेखनकलेचा अभाव :-**

स्वतःची बोलीभाषा हा आदिम समाजातील सर्व व्यक्तींना एकत्र जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. मात्र भारतातील सर्व आदिवासीची बोलीभाषा एकच नसून प्रत्येक आदिवासी जमातीची वेगळी भाषा आहे. "भाषेला लिपी नसल्याने त्यांची लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्यप्रचार, नृत्ये, कोडी, उखाणे इ. साहित्य पूढील पिढीस तोंडीच हस्तांतरित होते. परिणामी आदिम समाजात वाङ्मयनिर्मिती आढळून येत नाही. केवळ बोलीभाषेस लिपी नसल्याने कला, ज्ञान व धर्मशास्त्र यांची प्रगती होऊ शकली नाही." [२६]

### ५) वैशिष्ट्यपूर्ण जीवनपध्दती :-

आदिवासी समाजाची जीवनपध्दती वेगळी व वैशिष्ट्यपुर्ण असून त्यांच्या स्वतंत्र अशा प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा व रितीरिवाज आहेत, त्याद्वारे समाजातील लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण केले जाते. या प्रथा-परंपराचा भंग करणे हा मोठा सामाजिक गुन्हा ठरतो. सांस्कृतिक जीवन समान असल्याने त्यांचे खाणे-पिणे, आचार-विचार, केशभूषा, वेशभूषा व एकूण जीवनविषयक दृष्टीकोन यांमध्ये समानता आढळते. परिणामी, यांच्यात सामाजिक ऐक्यभाव असतो. एकूणच आदिवासी समाजातील लोकांचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन प्रगत समाजापेक्षा भिन्न आणि वैशिष्ट्यपूर्ण असते.

### ६) विशिष्ट नाव :-

आदिवासी समुदायाचा उल्लेख विशिष्ट नावाने केला जातो. उदा. नागा, गोंड, खासी, थारु, वारली, कातकरी इत्यादी. तेथील भूभाग, टेकड्या, नद्या, वनस्पती, प्राणी आणि त्या वन्यजातींच्या भाषेतून या नावाचे स्पष्टीकरण करता येते. जमातीच्या नावामागे काही इतिहास तसेच सांस्कृतिक पार्श्वभूमीसुध्दा असते.

### ७) साधी अर्थव्यवस्था :-

आदिम समाजाची अर्थव्यवस्था साधी असते. बाजारपेठ, पैसा मिळविणे या उद्देशाऐवजी केवळ गरजांचा विचार करुन उत्पादन घेतात. परिणामी, अर्थव्यवस्था निर्वाहप्रधान असते. मर्यादित तंत्रज्ञान, जुजबी हत्यारे, अवजारे आणि साधी अर्थव्यवस्था यांच्या एकत्रित परिणामाने वस्तूसंचय अगर साठा करणे अशक्य असते. नफ्याची प्रेरणा, पैशाचा वापर, बाजारपेठा इ. गोष्टींचा अभाव असतो व श्रमविभाजन आणि विशेषीकरण असत नाही. एकूणच आदिवासींचे आर्थिक जीवन खडतर असते. श्रमविभाजन प्रामुख्याने लिंगभेदावर आधारलेले असून व्यक्तिगत हितापेक्षा सामुहिक हिताचा विचार महत्त्वाचा ठरतो. सामूहिक आर्थिकजीवन हे आदिम समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

### ८) मर्यादित तंत्रज्ञान :-

आदिवासी समाजात तंत्रविद्येचा वापर अत्यंत मर्यादित असतो. आर्थिक क्रियेसाठी लागणारी साधने उदा. शिकारीसाठी वापरले जाणारे भाले, धनूष्य-बाण, मासेमारीसाठीचे जाळे, सापळे, होड्या इ. साधी असून ते स्वतः आदिवासीच बनवतात. त्यांचे वास्तव्य दुर्गम डोंगरदऱ्यात व जंगलात असल्याने त्यांचा बाह्य जगाशी संपर्क नसतो. त्यामुळे विकसित तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत लवकर पोहोचत नाही.

### ९) आदिवासी धर्म :-

आदिवासी समाजातील लोक धर्म व धर्माचरण याला विशेष महत्त्व देतात. त्यामूळेच ते निसर्गाची मनोभावे पूजा करतात. निसर्गपूजा, पूर्वजपूजा, पंचमहाभूतांची पूजा इ.ना त्यांच्या जीवनात निश्चित स्थान व प्रतिष्ठा असते. या सर्व शक्तींना ते शरण जातात. आदिवासी धर्मात प्रार्थना, पूजा, नवस, बळी देणे इ. बाबींचा समावेश असतो. काही मानवशास्त्रज्ञ असे मानतात की, आदिवासी लोक धर्म व जादूमध्ये फरक करत नाहीत. धर्म आणि जादू या दोन्ही बाबी एकमेकांत गुंफलेल्या असुन आदिवासींवर दोन्हींचा प्रभाव असतो.

### १०) जातपंचायत :-

आदिम समाजात जातपंचायतीला विशेष महत्त्व असून प्रत्येक जमातीची वेगळी जातपंचायत असते. या जातपंचायतीमध्ये वयोवृध्द व अनुभवी लोकांचा सदस्य व प्रमूख म्हणून समावेश असतो. ही जातपंचायत जमातीअंतर्गत निर्माण झालेले पेचप्रसंग मिटविणे, संघर्ष सोडविणे, न्यायनिवाडा करणे, जमातीतील सदस्यांच्या वर्तनावर लक्ष व नियंत्रण ठेवणे इ. कार्ये पार पाडत असते. थोडक्यात जातपंचायत न्यायदानाचे कार्य करुन परंपरेने चालत आलेल्या चालीरिती, रुढी, परंपराची अंमलबजावणी करते.

### ११) जमात प्रमुख :-

प्रत्येक आदिवासी समाजात एक जमात प्रमुख अगर नायक किंवा नेता असतो. तो शुर, धाडसी, युध्दकलेत निपुण, प्रशासन कौशल्यप्राप्त व सर्वमान्य असतो. जमातप्रमूख जमातीच्या सुरक्षिततेच्या संदर्भात बांधिल असून तो युध्द, संरक्षण, अंतर्गत व्यवस्था, न्यायदान इ. कार्ये जातपंचायतीच्या मार्गदर्शन व सल्ल्याने पार पाडत असतो. म्हणूनच डॉ. डी.एन. मजुमदारांनी आदिम समाजात राजकीय संघटन असते असे म्हटले आहे.

### १२) अंतर्विवाही समूह :-

आदिवासी समूहाचे सदस्य विवाहाच्या बाबतीत नियमांचे पालन करतात. जमातीबाहेरच्या व्यक्तीबरोबर विवाह निषिध्द ठरविणे हा अंतर्विवाहाचा नियम असून या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस समाजातून बहिष्कृत केले जाते. वांशिक एकता टिकविण्याच्या दृष्टीने अंतर्विवाह हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**१३) विवाहाचे करारात्मक स्वरुप :-**

आदिवासी समाजात विवाहाभोवती धार्मिक संस्कार, पावित्र्य इ. कल्पनांचे वलय नसते व विवाह हा एक करार मानला जातो. जातपंचायतीच्या निर्णयाद्वारे घटस्फोट घेतला जातो आणि तो सहजपणे मान्य होतो. विवाहाला करारात्मक स्वरुप असल्याने आदिवासी समाजात विवाहपूर्व लैंगिक संबंधाला फार विरोध नसतो.

**१४) सामाजिक एकजिनसीपणा :-**

समान बोलीभाषा, समान धर्माचरण, समान संस्कृती व समान सामाजिक नियम इ. मुळे आदिवासी लोकांच्या संपूर्ण आचारविचारात एकजिनसीपणा दिसून येतो व सामाजिक एकजिनसीपणा हे आदिवासी समाजाचे प्रमूख वैशिष्ट्य मानले जाते. रितीरिवाज, धर्मश्रध्दा, व परंपरा यांचा जनमानसावर कमालीचा प्रभाव असतो आणि त्याचे पालन अत्यंत काटेकोरपणे केले जाते. ते जीवनातील सर्व घटनांची चिकित्सा याच निकषांवर करीत असल्याने जीवनात घडणाऱ्या एखाद्या घटनेविषयीच्या प्रतिक्रियेत सर्वामध्ये कमालीचे साम्य असते. थोडक्यात त्यांच्या आचरणात भिन्नता आढळत नाही.

**१५) संथगतीने परिवर्तन :-**

आदिवासी समाजावर धर्म, रुढी, परंपरा इ. चा जबरदस्त प्रभाव असल्याने तसेच शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण, प्रगत समाजाशी संपर्काचा अभाव इ. कारणांमुळे हा समाज परिवर्तनाला फारसा अनूकूल नसतो. त्यामुळे समाज स्थितीप्रिय बनतो व समाजात परिवर्तनाचा वेग कमी असतो.

वरील विविध वैशिष्ट्यांमुळे आदिवासी समाज हा इतर समाजापेक्षा वेगळा असतो.

**१.२.२ जाती व जमाती :-**

उपरोक्त नमूद केलेल्या आदिवासी जमातीच्या वैशिष्ट्यावरुन आदिवासी जमात कोणास म्हणावे, या प्रश्नाचे उत्तर मिळते. पण बऱ्याचदा जात व जमात या शब्दांच्या वापरामध्ये गल्लत होते. या दोन्ही समाजगटांचे स्वतंत्र प्रभावी विश्व असुन जाती व जमाती या दोन्ही स्वतंत्र समाजसमूह आहेत.

- **जाती व जमातीमधील फरक**

जाती व जमातीमधील फरक पुढीलप्रमाणे आहे

जातीसंस्थेचा मूख्य आधार जन्म असून जन्माने जात ठरते. ज्या जातीत व्यक्तीचा जन्म झाला त्याच जातीचे सदस्यत्व त्या व्यक्तीला मिळते. जमातीचा आधार जन्म नसुन तो विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या, समान रक्तसंबंध असणाऱ्या लोकांचा समुह आहे. जात हा एक अंतर्विवाही

समाजगट आहे. एकाच जातीतील स्त्री-पुरुष विवाहास जाती संस्था मान्यता देते. मात्र आंतरजातीय विवाहाला विरोध करते. पण इतक्या काटेकोरपणे अंतर्विवाहाच्या बंधनाचे पालन जमातीमध्ये आढळत नाही. किंबहुना भिन्न जमातीत रोटी-बेटीचे व्यवहार होऊ शकतात. विशिष्ट जातीच्या व्यक्तींनी त्या जातीचेच व्यवसाय केले पाहिजेत असे व्यवसायविषयक बंधन जातीसंस्थेत असते. मात्र अशा बंधनाची जमातीमध्ये सक्ती नसते.

जातीचे वास्तव्य केवळ एकाच भू-प्रदेशावर मर्यादित नसुन सजातीय लोक विविध ठिकाणी विखुरलेले असतात. पण प्रत्येक जमातीचे वास्तव्य विशिष्ट भू-प्रदेशावर असते व त्यामूळेच जमातीतील लोकांमध्ये प्रादेशिक एकतेची भावना असते. जातीमध्ये एक जात दुसऱ्या जातीहून श्रेष्ठ अशी क्रमवार रचना असुन त्यांच्यात उच्च-नीचतेची भावना असते मात्र जमातीमध्ये अशी भावना दिसुन येत नाही. जातीच्या आधारे धार्मिक विधी पार पाडणाऱ्या लोकांची एक नवीन जात अस्तित्वात आली. पण विशिष्ट धार्मिक विधीच्या पालनातून जमातीचा उदय झालेला नाही. जातीमध्ये गोत्राला महत्त्व असते तर जमातीमध्ये कुलाला महत्त्व असते. गोत्राचा उगम कोणीतरी ऋषी किंवा महापुरुष असतो. तर कुलाची उत्पत्ती ही सजीव किंवा निर्जीव वस्तुपासुन झालेली असते.

बदलत्या काळाप्रमाणे उपरोक्त जाती व जमातीची वैशिष्ट्ये हळूहळू पण निश्चितपणे अस्तंगत होत आहेत. कारण आदिम जमातीचा जसजसा इतर समाजसंस्कृती विशेषतः हिंदू संस्कृतीशी संपर्क येत गेला तसतसा त्याचा प्रभाव अल्पसंख्य असलेल्या आदिवासी समाजावर पडत गेला. आर्थिक कारणांमुळे शहरांमध्ये स्थलांतर केलेल्या आदिवासीच्या जीवनपध्दतीत अशा प्रकारेच कायापालट होत आहे.

### १.३ जगातील आदिवासी

"आदिम जमाती किंवा आदिवासी जगभरात आढळतात. जगातील जवळपास ७० देशांमध्ये त्यांचे वास्तव्य आढळते. तथापि यापैकी बऱ्याच देशांमध्ये त्या अल्पसंख्याक ठरल्या असून काही देशामधील त्यांचे एकुण लोकसंख्येतील शेकडा प्रमाण, ब्राझील - ०.१%, भारत - ७.५%, पेरु - ४०%, बोलिव्हिया - ६६% व ग्रीनलँड - ९०% असे आहे." [२७] राष्ट्रीय सीमांमूळे मूळ आदिवासी जगभरात अनेक देशांत विभागले गेले आहेत. उदा. - मिझो व लूशाई जमातीचे लोक भारत व म्यानमार या दोन्ही देशांत वास्तव्य करतात. एस्किमो लोक कॅनडा, ग्रीनलंड, अमेरिका, रशिया या देशांमध्ये पसरलेले आहेत तर आफ्रिकेतील फूलानी जमातीचे लोक आठ देशामध्ये आढळतात.

"जगातील काही मुळ आदिवासी खालीलप्रमाणे -

१) कांगो खोऱ्यातील पिग्मी लोक २) अरबस्तानच्या वाळवंटातील बदाऊन लोक

३)आर्क्टिक प्रदेशातील एस्किमो ४) मध्य आशियातील किरगिझ

५) कलहारी वाळवंटातील सान किंवा बूशमेन ६) ऑस्ट्रेलियातील अबोरिजिनस

७) पूर्व आफ्रिकेतील मसाई " [२८]

## १.४ भारतातील आदिवासी :-

भारतातील आदिवासी समाज हा नागरी व ग्रामीण समाजापेक्षा भिन्न स्वरुपाचा आहे. आदिवासी समुदायाच्या बदलाची गती मंद आहे. हा समुदाय अति दुर्गम भागात वास्तव्य करुन असल्याने त्यांची स्वतःची वेगळी जीवन पध्दती आहे. सामाजिक एकजिनसीपणा, लेखनकलेचा अभाव, साधी अर्थव्यवस्था, शैक्षणिक मागासलेपण, कर्जबाजारीपण, निकृष्ट दर्जाचे राहणीमान इत्यादी स्वरुपाची वैशिष्टये आढळतात. प्रत्येक आदिवासी समुदायाची वेगळी ओळख आहे. भारतात मोठया संख्येने पसरलेल्या या आदिवासी जनसमुहांना अनेक नावांनी ओळखले जाते. "भारतीय आदिवासी जमातीची कुठल्याही स्वरुपाची पूर्णमान्य व्याख्या अजून प्रचलित होवू शकली नाही. अनेक मानववंशशास्त्रज्ञानी वेगवेगळयाजमातीच्या व्याख्या दिलेल्या आहेत. पण त्या केवळ परिस्थितीक आहेत व त्या कुठल्यातरी एका जमातीसाठी उपयुक्त ठरतात. त्यामुळे त्यांची उपयोगिता सिमीत आहे." [२९] आदिवासी भारताचे मुळ रहिवासी असल्याने त्यांना पराक्रमी इतिहास आहे. प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ विलास संगवे म्हणतात की, "शबरी भिल्लीण आणि महाभारतातील हिडींबा या स्त्रिया आदिम जमातीतल्याच होत्या, आर्यांच्या भारतातील आगमनाला येथील आदिवासीकडून कडाडून विरोध झाला. आदिवासींना ऋग्वेदात दस्यू किंवा दास म्हटले आहे. रामायण महाभारताच्या काळापासून जुन्या वाङःमयात त्यांचे वर्णन कावळ्यापेक्षा काळे, धरतीचे पापी प्राणी, चपट्या नाकाचे, लुटारु, राक्षस, नरभक्षक वगैरे उपहासात्मक व हीन लेखणाऱ्या शब्दांनी केलेले आढळते."[३०] "भारतीय स्मृतीग्रंथात आदिवासीचा उल्लेख असून स्मृतीकारांनी त्या अनुलोम-प्रतिलोम संकरातून निर्माण झाल्या असे म्हटले आहे."[३१] "आदिवासी मूळचे याच भूमीवरचे असल्याने त्यांना भूमीजन किंवा भूमीज असेही म्हणतात. नेहमी अरण्यात राहणारे म्हणून अरण्यक असेही म्हणतात."[३२]

"आर्य भारतात येण्यापूर्वी येथे लहान मोठ्या टोळ्यांनी आदिवासी समाज राहत होता." [३३] भारताच्या इतिहासात आदिवासी जमाती स्थानिक राजांच्या सैन्याचा भाग म्हणून लढल्याची अनेक

उदाहरणे आहेत. "राजा शिवाजीस रामोशी व कोळी जमातीचे सहाय्य मिळाले होते." [३४] "आदिवासींची पिळवणुक करणाऱ्याविरुध्द मध्यप्रदेश व आंध्रप्रदेश या राज्यात सुमारे ७५ बंडे झाली. यातील अधिकांश ब्रिटीश राज्यकर्त्यांच्याविरुध्द होती. " [३५] भारतीय स्वातंत्र्यलढयातही आदिवासी समाज अग्रस्थानी होता. पण स्वातंत्र्यानंतरही त्यांच्याकडे विशेष लक्ष न दिल्याने आणि आदिवासींची अर्थव्यवस्था ही शेती व जंगलांवर आधारीत असल्याने त्यांच्यात फारसा बदल झाला नाही. भारतातील आदिवासी जनसमूह आदिम, वनवासी, आदिवासी इ. वेगवेगळयानावाने ओळखले जातात. भारतीय राज्यघटनेत त्यांचा उल्लेख अनुसुचित जमाती असा करण्यात आला आहे.

जगामध्ये सर्व देशात आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. "विशेषतः आशिया, आफ्रिका आणि अमेरिका या खंडातील देशात आजही आदिवासी जमाती मोठया प्रमाणावर अस्तित्वात आहेत. मात्र आधूनिकीकरणामुळे यूरोप खंडात आदिवासी जमात ओळखणे कठीण आहे." [३६] "३२,८७,७८२ चौ.कि.मी. क्षेत्रफळ असलेल्या भारत देशात १९% भूभागात आदिवासीचे वास्तव्य आढळते." [३७] "भारतात २६ राज्यामधील १८७ जिल्ह्यांत आजमितीस एकूण ५०० पेक्षा अधिक आदिवासी जमाती असून २००१ च्या जनगणनेनूसार त्यांची एकुण लोकसंख्या ८,४३,२६,२४० इतकी असून त्यांचे एकूण लोकसंख्येच्या ८.२% इतके शेकडा प्रमाण आहे. " [३८] इ. स. १९३५ मध्ये ब्रिटिश संसदेने कायद्याद्वारे काही विभागांना काही प्रमाणात स्वायत्तता देऊन विधिमंडळे बनवण्यात आली. दलित आणि आदिवासींना सामाजिक न्याय व प्रतिनिधित्व मिळण्याच्या हेतूने त्याची एक सुची बनविण्यात आली. अशा प्रकारे 'अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती' हे शब्द व्यवहारात आले.

"स्वातंत्र्यानंतर ही सुची बनविण्याचे अधिकार राज्यघटनेनूसार राष्ट्रपतीस प्राप्त असून भारतीय राज्यघटनेत 'अनूसुचित जमात' या शब्दाला व्याख्या नाही. घटनेच्या ३४२ व्या कलमात अनुसुचित जमात म्हणजे राष्ट्रपतींनी बनवलेल्या अनुसुचित जमातीच्या सुचीतील जमात असेच म्हटले आहे. " [३९] मात्र एकदा राष्ट्रपतींनी पहिली यादी जाहीर केल्यानंतर त्यामध्ये बदल व दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे, अशी घटनेत तरतूद आहे. त्यानुसार अनुसुचित जमातीची पहिली सुची १९५० मध्ये जाहीर झाली. त्यानंतर १९५६ व १९७६ साली संसदेने कायद्याद्वारे बदल व दुरुस्ती करुन नवीन सुची तयार केली. सध्या १९७६ मध्ये बनवण्यात आलेली यादी अंमलात आहे.

### १.४.१ भारतीय आदिवासी समाजाचे वर्गीकरण :-

अभ्यासकांच्या सोयीसाठी प्रादेशिक, भाषिक, वांशिक व सांस्कृतिक या निकषांवर आदिवासींचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे. -

**अ) आदिवासी समाजाचे प्रादेशिक वर्गीकरण (Regional classification of tribal society)**

भारतात १९९१ च्या जनगणनेनुसार जम्मू व काश्मीर, सिक्कीम, पंजाब, हरियाणा, दिल्ली इ. राज्ये तसेच चंदीगड व पाँडेचरी हे केंद्रशासीत प्रदेश वगळता सर्वत्र आदिवासी समाजाचे वास्तव्य असून आदिवासी समाजजीवनावर तेथील भूप्रदेशाचा हवामानाचा व संस्कृतीचा परिणाम झालेला असतो. त्यादृष्टीने अभ्यासक भारतातील आदिवासी जमातीना पाच प्रादेशिक विभागात पुढीलप्रमाणे विभाजीत करतात -

१. "उत्तरपुर्व विभाग (ईशान्य विभाग) :- या विभागात आसाम, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, नागालँड, त्रिपूरा, मणिपुर इ. प्रदेशाचा समावेश असुन त्यात गारो, कूकी, मिझो, खासी, मुंडा, सेमा, नागा, रियांग, मिरी, आपातानी इ. जमाती राहतात.

२. उत्तर पश्चिम विभाग (हिमालयलगतचा विभाग) :- यात उत्तर व वायव्य भारत, हिमाचल प्रदेश हा प्रदेश अंतर्भूत असुन गूर्जर गड्डी, थेरु, जौन्सारी इ. जमाती राहतात.

३. मध्य आणि पुर्व भारत :- यात प. बंगाल, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश हे विभाग येतात आणि बैंगा, बोडो, जूआंग, कोल, खोंड, संथाल, उरॉव, हो, मूंडा, लेपचा, कोरवा, भिल्ल आणि पहाड्यिा इ. जमातींचा समावेश होतो.

४. दक्षिण भारत :- या विभागात तामीळनाडू, केरळ, कर्नाटक व आंध्रप्रदेश इ. राज्ये समाविष्ट असुन त्यात टोळ, कोल, कादर, चेंचू, कोया, गोंड, चोलानायकेन, गडबा इ. जमाती राहतात.

५. पश्चिम भारत :- यात राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र ही राज्ये अंतर्भुत असून भिल्ल, गराशिया, सहारिया, गोंड, कोलाम, परधान, कोळी, ठाकर, कातकरी, काथोडी, वारली, पावरा, मूण्डा, कोल, खोंड, दुबला, कोंकणा इ. जमाती येथे वास्तव्य करतात." [४०]

**ब) भाषा या निकषावर आधारित वर्गीकरण**

इ. स. १८९० मध्ये सर ग्रियर्सन यांनी विविध भारतीय भाषांची व बोलीभाषांची पाहणी केली. त्यानूसार भारतात ५४४ बोलीभाषा व १७९ भाषा आढळून आल्या आहेत. यातील १७९ भाषापैकी

११६ भाषा ह्या आदिवासींच्या भाषा आहेत व भारतातील केवळ १ टक्के लोक त्या भाषा बोलतात. तसेच 'People of India Project' या अंतर्गत केलेल्या मानववंशशास्त्रीय (Anthropological) सर्वेक्षणात भारतात ४६१ आदिवासी समुदाय ओळखले गेले. ज्या भाषा समूहाची भाषा आदिवासी बोलतात त्या निकषावर आधारित वर्गीकरण खालील प्रमाणे -

१) **"ऑस्ट्रिक भाषा समूह** (Austric language group) **:-** यामध्ये कोल, मूण्ड, खासी, निकोबारी, कोरकू, संथाल, गडबा इ.चा समावेश होतो. या भाषा गटातील तीन महत्त्वपूर्ण भाषा समूह पूढीलप्रमाणे-

i. **खासी समूह :-** या समूहातील भाषा आसाममधील खासी लोक बोलतात.

ii. **निकोबार समूह :-** निकोबार बेटांवर वास्तव्य करणारे आदिवासी या समूदायातील भाषा बोलतात.

iii. **मूंडा व कोल भाषा समूह :-** या भाषा समूहामध्ये कोरकू, भूमित, सावरा, खड्यिा, संथाली इ. भाषेचा समावेश होतो.

२) **तिबेटी-चिनी भाषा समूह** (Tibeto-chinese language group) :- या गटामध्ये तिबेटी, ब्रम्ही आणि स्थायी चिनी भाषा प्रमूख आहेत. भारतात ही भाषा बोलणाऱ्या नागा, खासी, कूकी व अबोर, डाफला, माईरिस, मिकीर इ. जमाती आहेत.

३) **द्रविडीयन भाषा समूह** (Dravidian language group) :- द्रविड भाषा समूह हा अधिक संपन्न गट आहे. इ. स. पू. ३५०० काळात द्रविडी लोक भारतात आले व त्यांच्यासोबतच ही भाषा भारतात आली. याचे साधारणतः दोन गट पडतात -

१. संपन्न द्रविड भाषा - यात तामीळ, मल्याळम, कन्नड, तेलगू या चार भाषांचा समावेश होतो.

२. असंपन्न द्रविड भाषा - तोडा, गोंडी, उराँव, माल्टो, बुही, तूलू आणि कूई इ. भाषांचा यात समावेश होतो.

या भाषेमध्ये लिपीचा अभाव असल्याने वाङ्मय उपलब्ध नाही.

४) **इण्डो-यूरोपियन भाषा समूह** (Indo-European language group) :- या गटांतर्गत हिंदी, पंजाबी, गूजराती, उड्यिा व बंगाली भाषा समाविष्ट आहेत. यामध्ये भिल्ल वारली, ठाकर इ. जमातींचा अंतर्भाव होतो. " [४१]

**क) आदिवासींचे वांशिक वर्गीकरण :-**

वांशिक वर्गीकरणामध्ये त्वचेचा वर्ण, शरीराची ठेवण, वजन, कवटीचे घनत्व, हनूवटी, ओठ, भूवया, कानाची पाळी, उंची, केस इ. शारिरीक लक्षणांचा एकत्रित अभ्यास करुन मानवसमूहाचा वंश निश्चित केला जातो.

"इ. स. १९०१ मध्ये सर हर्बर्ट रिस्ले यांनी भारतीयांच्या वांशिक वर्गीकरणाचा अभ्यास करुन भारतात खालील सात मानववंश आढळतात असे प्रतिपादन केले.

१) **इंडो-आर्यनः-** या वंशाचे लोक पूर्व पंजाब, राजस्थान व काश्मीर येथे आढळतात. लांब डोके, अरुंद नाक, उजळ रंग, उंचीपूरी शरीरयष्टी, काळे डोळे आणि भरपूर केस ही शारिरीक वैशिष्ट्ये त्यांच्यात दिसून येतात.

२) **द्रविडीयन :-** तामीळनाडू, हैद्राबाद, छोटा नागपूर आणि द.मध्य प्रदेश येथे या वंशाच्या लोकांचे वास्तव्य असुन त्यांच्यात लांब डोके, रुंद नाक, काळाकूट्ट रंग, कमी उंची, काळे डोळे आणि कुरळे केस ही वैशिष्ट्ये आढळतात.

३) **मंगोलॉईडः-** रुंद डोके, रुंद नाक, पिवळसर झाक असलेला काळा रंग, बुटकेपणा, पापणीवर कातडीचा पडदा आलेले डोळे, विरळ केस ही शारिरीक वैशिष्ट्ये असलेली या वंशाची माणसे नेपाळ, भूतान, सिक्कीम, आसाम, दार्जिलींग, ब्रम्हदेश व हिमालय भागात राहतात.

४) **आर्यद्रवीड :-** भारतातील उत्तरप्रदेश, बिहार व राजस्थानचा काही भाग येथे राहणारे या वंशाचे लोक लांब डोके, मध्यम रुंदीचे नाक, तपकिरी रंग ते काळा रंग आणि कमी उंची या वैशिष्ट्यांनी ओळखले जातात.

५) **मंगोलो - द्रविडीयन :-** रुंद व गोल डोके, रुंदपणाकडे झुकणारे मध्यम नाक, काळा रंग, बूटकी उंची, भरपूर केस या शारिरीक वैशिष्ट्यांचे लोक बंगाल व ओरिसा येथे राहतात.

६) **सिंथो द्रविडीयन :-** रुंद डोके, पातळ नाक, उजळ रंग, मध्यम उंची, विरळ केस ही वैशिष्ट्ये प्रामुख्याने मध्यप्रदेश, सौराष्ट्र आणि कूर्ग भागातील जंगलात राहणाऱ्या लोकांत आढळतात.

७) **तूर्को इराणीयन :-** या वंशाचे लोक बलूचिस्तान, अफगाणिस्तान भागात आढळतात. रुंद डोके, लांब पण तरतरीत नाक, उजळ रंग, अधिक उंची, चेहऱ्यावर व डोक्यावर विपूल काळे व करडे केस ही शारिरीक वैशिष्ट्ये त्यांच्यात दिसून येतात. " [४२]

मात्र सर हर्बर्ट रिस्ले यांचे हे वर्गीकरण त्यांनी वंशगटाला दिलेली नावे ही मूलतः भाषा गटाची आहेत व निग्रीटो वंशाचा समावेश नाही या दोन आक्षेपामूळे सर्वमान्य झाले नाही. इ. स. १९३१ मध्ये "डॉ. बी. एस. गूहा यांनी केलेले भारतातील आदिवासींचे वांशिक वर्गीकरण पुढीलप्रमाणे -

१) **निग्रीटो :-** मध्यम, गोल व लांब डोके, रुंद व चपटे नाक, काळा रंग, पाच फूटापेक्षाही कमी उंची, कूरळे केस इ. शारिरीक वैशिष्ट्ये दक्षिण भारतातील पलीयन, इरुला, कादर या लोकांत आढळतात.

२) **प्रोटो ऑस्ट्रोलॉईड :-** लांब डोके, तपकिरी किंवा पूर्ण काळा रंग, कमी उंची, मोठया आकाराचे मांसल ओठ, चपटे व मूळात दबलेले रुंद नाक, कूरळे केस अशी शारिरीक वैशिष्ट्ये या लोकांत दिसून येतात.

३) **मंगोलाईड :-** या वंशाचे लोक आसाम, बंगाल, सिक्कीम, भूतान इ. भागात राहणारे असून त्यात मिझो, लेपचा यांचा समावेश होतो. लक्षणीय हनूवटी असलेला सपाट चेहरा, पापणीवर अधिक पडदा असलेले बदामासारखे पण तिरपे डोळे, विरळ केस आणि पिवळसर रंग ही वैशिष्ट्ये त्यांच्यात आढळतात.

४) **मेडिटरेनियन :-** लांब डोके, मध्यम उंची, अगदी गडद काळा रंग, मध्यम बांधा, पातळ ओठ, रुंद चेहरा आणि काळे व कूरळे केस अशी वैशिष्ट्ये असलेला हा वंशगट आहे.

५) **रुंद डोक्याचे लोक :-** लक्षणीय असणारे रुंद डोके हे शारिरीक वैशिष्ट्य असणारा हा गट डोंगर भागात वास्तव्यास असतो. प्रामूख्याने हैद्राबाद व तिन्ने खोऱ्यात हे लोक आढळतात. " [४३]

६) **"नॉडिक :-** लांब डोके, भव्य कपाळ, लक्षणीय हनूवटी असलेला चेहरा, सरळ व लांब नाक, मध्यम बांधा, पातळ ओठ, काळे मूलायम केस, उजळ रंग ही वैशिष्ट्ये असणारे लोक पंजाब, काश्मीर व राजस्थान भागात आढळतात. "हटन यांनी भारतातील जमातीना वांशिक आधारावर मुख्यतः निग्रीटो आणि ऑस्ट्रोलॉईड यांना प्रमुख मानले आहे." [४४]

सारांश, भारतीय आदिवासी एका विशिष्ट वांशिक गटाचे नसून अनेक वंशाची कमी अधिक वैशिष्ट्ये त्यांच्यात आढळतात. त्यातही प्रामुख्याने निग्रिटो, प्रोटो ऑस्ट्रोलाईड व मंगोलियन या तीन वंशाची वैशिष्ट्ये प्राधान्याने आढळतात.

**ड) आदिवासींचे सांस्कृतिक वर्गीकरण :-**

"डॉ. एल्वीन यांनी भारतीय आदिवासी कोणत्या सांस्कृतिक स्तरावर जीवन जगत आहेत त्यावरुन खालील चार गटात आदिवासींचे वर्गीकरण केले आहे.

१. **खरे गिरीजन :-** हे लोक खऱ्या अर्थाने आदिम जीवन जगताना आढळतात. ते अतिशय मागासलेले असतात.

२. **बदलत असणारे आदिवासी :-** हे खऱ्या गिरीजनांपेक्षा काहिसे व्यक्तीवादी असून यांच्यात गरीब श्रीमंत असा भेद केला जात आहे.

३. **पूर्णतः बदललेले आदिवासी :-** यांच्यात बाह्यजगाच्या संपर्कामूळे आमूलाग्र बदल झाल्याचे जाणवते. धर्मांतरामूळे केवळ नावापूरते आदिवासी असून हे आदिवासी आपल्या मुळ आदिम जीवनापासून खुप दूर गेलेले आहेत.

४. **स्वत:ची संस्कृती टिकवून धरणारे खानदानी आदिवासी :-** प्रगत समाजाशी आलेल्या संपर्काने प्रगत समाजातील सुविधा आणि भौतिक साधनांचा स्वीकार व वापर तरीही आपले परंपरागत सांस्कृतिक जीवन आणि वारसा टिकवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असे हे आदिवासी असून यांच्यामध्ये खानदानी परंपरा, स्वाभिमान आणि आत्मविश्वास पूरेपूर भरलेला असतो. " [४५]

प्रत्यक्षात, वांशिक वर्गीकरणाला आधुनिक मानवशास्त्रात विशेष आधार नाही. भाषिक वर्गीकरणामध्ये मुळ भाषेवर झालेले मराठी, हिंदी अथवा इतर भाषांचे आक्रमण इतके झाले आहे की, त्यामुळे भाषिक वर्गीकरणावरही मर्यादा येतात. सांस्कृतिक वर्गीकरणामध्ये आधु निक जीवनशैलीचा समावेश पहावयास मिळतो आणि सांस्कृतिक अंगाने त्यांचे वेगळेपण पहावयास मिळते.

### १.४.२ भारतीय आदिवासी लोकसंख्या :-

इ. स. २००१ च्या जनगणनेनुसार राज्यनिहाय भारतीय आदिवासी लोकसंख्या पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्र. १.१**

**२००१ च्या जनगणनेनुसार राज्यनिहाय आदिवासी लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | राज्य/केंद्रशासित प्रदेश | एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या | *टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | मिझोराम | ८८८५७३ | ८३९३१० | ९४.५ |
| २. | नागालँड | १९९००३६ | १७७४०२६ | ८९.१ |
| ३. | मेघालय | २३१८८२२ | १९२८६२ | ८५.९ |
| ४. | अरुणाचल प्रदेश | १०९७९६८ | ७०५१५८ | ६४.२ |
| ५. | मणिपूर | २१६६७८८ | ७४११४१ | ३४.२ |
| ६. | छत्तीसगड | २०८३३८०३ | ६६१६५९६ | ३१.२ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ७. | त्रिपूरा | ३११९२०३ | ९९३४२६ | ३१.०५ |
| ८. | झारखंड | २६९४८२९ | ७०८७०६८ | २६.३ |
| ९. | ओरिसा | ३६८०४६६० | ८१४५०८१ | २२.१ |
| १०. | सिक्कीम | ५४०८५१ | १११४०५ | २०.६ |
| ११. | मध्यप्रदेश | ६०३४८०२३ | १२२३३४७४ | २०.३ |
| १२. | गुजरात | ५०६७१०१७ | ७४८११६० | १४.८ |
| १३. | राजस्थान | ५६५०७१८८ | ७०९७७०६ | १२.६ |
| १४. | आसाम | २६६५५५२८ | ३३०८५७० | १२.४ |
| १५. | जम्मू आणि काश्मिर | १०१४३७०० | ११०५९७९ | १०.९ |
| १६. | महाराष्ट्र | .९६८७८६२७ | ८५७७२७६ | ८.९ |
| १७. | आंध्रप्रदेश | ७६२१०००७ | ५०२४१०४ | ६.६ |
| १८. | कर्नाटक | ५२८०५६२ | ३४६३९८६ | ६५.६ |
| १९. | पश्चिम बंगाल | ८०१७६१९७ | ४४०६७९४ | ५.५ |
| २०. | हिमाचल प्रदेश | ६०७७९०० | २४४५८७ | ४.० |
| २१. | उत्तरांचल | ८४८९३४९ | २५६१२९ | ३.० |
| २२. | केरळ | ३१८४१३७४ | ३६४१८९ | १.१ |
| २३. | तामिळनाडू | ६२४०५६७९ | ६५१३२१ | १.० |
| २४. | बिहार | ८२९९८५०९ | ७५८३५१ | ०.९ |
| २५. | उत्तरप्रदेश | १६६१९७९२१ | १०७९६३ | ०.१ |
| २६. | गोवा | १३४७६६८ | ५६६ | ०.०४२ |
| | | **केंद्रशासित प्रदेश** | | |
| २७. | लक्षद्विप | ६०६५० | ५७३२१ | ९४.५ |
| २८. | दादर व नगर हवेली | २२०४९० | १३७२२५ | ६२.२ |
| २९. | दमन आणि दिव | १५८२०४ | १३९९७ | ८.८ |
| ३०. | अंदमान व निकोबार | ३५६१५२ | २९४६९ | ८.३ |
| | भारत | १०२८६१०३२८ | ८४३२६२४० | ८.२ |

Source : Government of India-2006, Ministy of Information and Borad Casting, New Delhi.

टीप :- १. *टक्केवारी - एकुण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी

२. २०११ ची लोकसंख्या उपलब्ध होऊ शकली नाही.

देशातील आदिवासी लोकसंख्येचे राज्यनिहाय विभाजन कशा पध्दतीने झाले आहे याची आकडेवारी तक्ता क्र. १.१ मध्ये दिली आहे. तक्ता क्रमांक १.१ मधील आकडेवारी स्पष्ट करते की, साधारणत: काही अपवाद वगळल्यास भारतातील सर्वच राज्यांमध्ये आदिवासी लोकसंख्या वास्तव्यास असल्याचे पाहावयास मिळते. मिझोराम या राज्यात सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असल्याचे दिसते. या राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी ९४.५ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे, तर त्या खालोखाल नागालँडमध्ये ८९ टक्के आदिवासी वास्तव्यास असल्याचे दिसते. सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या गोवा आणि उत्तरप्रदेश या एकूण लोकसंख्येने मोठ्या असलेल्या राज्यात आदिवासींचे प्रमाण केवळ ०.१ टक्के इतके अल्प असल्याचे पाहावयास मिळते.

लक्षद्विप या केंद्रशासित प्रदेशामध्ये ९४.५ टक्के इतकी सर्वाधिक तर अंदमान आणि निकोबार या ठिकाणी ८.३ टक्के इतकी सर्वांत कमी आदिवासी लोकसंख्या पाहावयास मिळते. हरियाणा, पंजाब, चंदिगड, दिल्ली, पॉडिचेरी या राज्य तथा केंद्रशासित प्रदेशांमध्ये आदिवासी लोकसंख्या आढळून येत नाही. देशात आदिवासी लोकसंख्या ८ कोटी ४३ लाख २६ हजार २४० इतकी असून एकूण लोकसंख्येशी त्याचे प्रमाण ८.२ टक्के एवढे आहे.

**१.५ भारतीय आदिवासींच्या समस्या व उपाय :-**

भारतीय लोकसंख्येच्या शेकडा ८% प्रमाण असलेल्या आदिवासी समाजाच्या समस्यांकडे दूर्लक्ष करुन भारताचे कल्याणकारी राज्य किंवा महासत्ता बनण्याचे स्वप्न अपूर्णच ठरेल. आदिवासींच्या पारंपारिक जीवनपध्दतीमूळे निर्माण होणाऱ्या समस्या व इतर संस्कृतीच्या संपर्क व सहवासामूळे निर्माण होणाऱ्या समस्या अशाप्रकारे आदिवासींच्या समस्याचे एकूण स्वरुप आहे.

आदिवासीच्या समस्यांचे स्वरुप बिकट, विदारक व गूंतागूंतीचे आहे. पारंपारिक जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांमध्ये नवनवीन आजार, रोगराई, अन्नाचा तुटवडा, बेरोजगारी, बेकारी इ. समस्यांची भर पडली. परिणामी, आदिमांच्या जीवनात उदासीनता, नैराश्य निर्माण झाले. सत्यप्रिय, कष्टाळू, साधाभोळा, प्रामाणिक व धर्मवेडा आदिवासी या समस्यांपूढे शरणागती पत्करुन आपल्या अस्तित्वाची लढाई हारतो की काय अशी परिस्थिती निर्माण होते आहे. त्यांच्या समस्यांचा विचार करता उपायांचा प्रश्न किती बिकट आहे यावर ठक्करबाप्पा म्हणतात. "If we bestow a little serious thought, we will realize what a great and pressing problem it is to improve the social and economic or moral and material conditions of aborigines. It is

no exaggeration if I say that the adivasis are the poorest section of Indian population not excepting harijans." [४६]

"आपण जर थोडासा गंभीरपणे विचार केला तर भारतातील आदिवासींची सामाजिक व आर्थिक किंवा भौतिक आणि नैतिक सुधारणा करण्याचा प्रश्न किती बिकट आणि निकडीचा आहे हे आपल्याला समजून येईल. हरिजनांची परिस्थिती लक्षात घेतल्यानंतरसुध्दा भारतीय आदिवासी हा सर्वात दरिद्री वर्ग आहे असे म्हटले तर त्यात मुळीच अतिशयोक्ती होणार नाही. प्रगत समाजाच्या जीवनशैलीचे अर्धवट अनुकरण व पारंपारिक जीवनपध्दतीचाही पूर्णपणे न केलेला त्याग यामुळे त्यांच्या समस्यांवर उपाययोजना करताना त्यांची सध्याची नाजूक मानसिकता काळजीपूर्वक हाताळणे गरजेचे आहे.

डॉ. डी. एन. मुजुमदार म्हणतात . "The search for panacea is human, but it has always eluded our grasp, as it always will. There is no one solution to tribal problems; there is no platform to demand it." [४७]

'रामबाण उपाय शोधण्याच्या प्रयत्नाचे स्वरुप मानवी हवे. पण या प्रयत्नांना मानवी स्पर्शही नाही व असणारही नाही. आदिमांच्या समस्यांवर केवळ एकमेव तोडगा काढणे हे जसे शक्य नाही, तसेच त्या तोडग्याची मागणी करण्यासाठी एक व्यासपीठही नाही.'

या समस्यांची कारणमीमांसा करताना डॉ. मुजुमदार यांनी दोन प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत -

**१) एकांतवास :-** बहुसंख्य आदिवासी हे दूर्गम (Isolation) डोंगराळ प्रदेश, घनदाट जंगल अशा ठिकाणी इतर समाजापासून दूर एकांतवासात वास्तव्य करतात. या एकांतवासामूळे पोस्ट, तारायंत्र, दूरध्वनी इ. दळण-वळणांच्या साधनांचा अभाव तसेच कच्च्या व पक्क्या रस्त्यांचा अभाव असतो. परिणामी, सांस्कृतिक देवाण-घेवाण अवघड व जवळपास अशक्य होते. आणि या दोषातूनच दारिद्र्य, उपासमार, अज्ञान, अनारोग्य, नैसर्गिक संकटे इ. समस्या निर्माण होतात.

**२) संपर्क (Contact) -** सर्वच आदिवासी दीर्घकाळ एकांतवासात राहिले नाहीत. जेव्हा काही आदिवासींचा विकसित समाजाशी संपर्क आला तेव्हा त्याचा आदिवासींना फायद्यापेक्षा तोटाच झाला. उदा. ब्रिटीश राजवटीत ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आदिवासींना धर्मांतरासाठी प्रवृत्त केले. त्याला प्रत्यूत्तर म्हणून हिंदू मिशनरी देखील आदिवासी जमातीत शिरले. धर्मांतराच्या या प्रक्रियेमध्ये आदिवासींनी ना जुनी संस्कृती सोडली, ना नवी पूर्णपणे स्विकारली. त्यामुळे धर्म, भाषा, रुढी,

परंपराविषयक नव्या सांस्कृतिक समस्या निर्माण झाल्या. परिणामी "भौतिक व अभौतिक संस्कृतीत समान परिवर्तन न झाल्याने सांस्कृतिक पाश्चायनाची स्थिती निर्माण झाली. (Cultural Lag)." [४८] प्रगतांनी आपले आर्थिक हितसंबंध वृध्दींगत करण्यासाठी जंगलतोड, चहा कॉफीचे मळे, खाणी इ. च्या माध्यमातून अकुशल, अज्ञानी आदिवासींना वेठीस धरुन आदिवासींना त्यांच्याच क्षेत्रात वेठबिगार, कर्जबाजारी बनवून त्यांचे आर्थिक शोषण केले. त्यांच्या जमिनीही हडप केल्या. यातुनच आदिवासींच्या आर्थिक समस्या निर्माण झाल्या.

या कारण मिमांसेवरुन आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक आणि आरोग्यविषयक विविध समस्या आहेत हे दिसुन येते.

**अ) आर्थिक समस्या :-** आदिवासींना अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांच्या आर्थिक दु:स्थितीतून खालील समस्या निर्माण झाल्या आहेत.

१. शेतीविषयक समस्या :- भौगोलिक पृथकतेमुळे स्थानांतरीत किंवा बदलती शेती हा आदिवासींच्या परंपरागत जीवनपध्दतीचा भाग आहे. पण ही शेती अत्यंत मागासलेली असून, नवीन अवजारे, उत्तम बी-बियाणे, विविध प्रकारची खते इ.चा वापर ठाऊक नसल्याने येणारे पीक अपूरे व निकृष्ट असते. त्यामुळे त्यावर वर्षभर आपली गुजराण होणे कठीण असते. त्यामुळे गरजा व खर्च भागविण्यासाठी कर्ज काढणे अपरिहार्य बनते व कर्जबाजारीपणा ही समस्या निर्माण होते.

२. जंगलविषयक नवे कायदे :- आदिवासी हे जंगलाचे अनभिषिक्त राजे होते. संपूर्ण जंगलावर त्यांचा अधिकार होता. जंगलतोड करुन परंपरागत शेती केली जात असे. ब्रिटीश कालखंडात नवीन जंगलविषयक कायदे निर्माण झाले. त्यामूळे पशुंची शिकार करणे, दारु गाळणे, मध गोळा करणे इ. गोष्टीवर निर्बंध आले. या जंगलविषयक कायद्याचे स्वरुप आदिवासींना प्रतिकूल असल्याने आदिमांचे आर्थिक स्वातंत्र्य संपूष्टात आले व त्यांच्या आर्थिक जीवनावर विपरित परिणाम झाला.

३. वेठबिगारी व कर्जबाजारीपणा:- आदिवासीची परंपरागत अर्थव्यवस्था साधी व वस्तुविनिमयावर आधारित होती. पण पैसा हे विनिमय माध्यम असलेल्या आधुनिक अर्थव्यवस्थेचा आदिवासी समाजात शिरकाव झाला आणि नोटा, नाणी इ. च्या अचूक ज्ञानाअभावी आदिवासींचे व्यापारी, सावकार, कंत्राटदार, महाजन इ. कडून प्रचंड आर्थिक शोषण झाले. कर्जफेडीसाठी वेठबिगारीपणा सुरु झाला. तसेच आपल्या जमिनीही ते गमावून बसले आणि भुमिहीन मजूरासारखी त्यांची अवस्था झाली.

४. जंगल कामगारांचे शोषणः- जंगल परिसरात रस्त्यांची बांधणी, दुरुस्ती, तसेच ऊसतोडणी, द्राक्षतोडणी, जंगलातील औषधी वनस्पती उपलब्ध करणे इ. विविध कामासाठी दलालामार्फत आदिवासी कामगार उपलब्ध झाले. नाममात्र मजूरीदर, आर्थिक अज्ञान इ. बाबींमुळे त्यांचे आर्थिक शोषण केले गेले. शिवाय स्थलांतराचा प्रश्न निर्माण झाला. कामाच्या ठिकाणी निकृष्ठ निवास व्यवस्था, आरोग्य सुविधांचा अभाव यामुळे त्यांच्या समस्या आणखी वाढल्या.

**ब) सामाजिक व सांस्कृतिक समस्या :-**

१. धर्मावर आक्रमण - ख्रिश्चन धर्मप्रसारक तसेच हिंदूचा वाढता संपर्क यामुळे त्यांच्या मूळच्या धर्मश्रध्दांना तडा गेला. धर्मांतरित व परंपरागत धर्मनिष्ठ असे दोन गट पडले आणि एकजिनसी असलेल्या आदिवासींचे सामाजिक विभाजन झाले. या सामाजिक विभाजनामुळे त्यांच्यात सांस्कृतिक तणाव निर्माण होऊन परस्परांत द्वेष, मत्सर इ. भावना वाढीस लागल्या. अशाप्रकारे आदिवासी एकात्मता भंग पावली व नवीन धर्माचा स्वीकार ही बाब मूख्य धर्माच्या त्यागामुळे होणारी हानी भरुन काढून शकली नाही.

२. विवाहसंस्थेत वधुमुल्य व बालविवाहाची प्रथा - आदिम समाजात बालविवाहाची प्रथा कधीच नव्हती व वधुमुल्य ही संकल्पनाही प्रतिकात्मक होती. मात्र प्रगतांच्या विशेषतः हिंदूच्या संपर्कामुळे या दोन्ही वाईट प्रथांचा आदिवासी समाजामध्ये शिरकाव झाला. वधुमूल्य चढ्या भावाने व पैशाचे स्वरुपात मागितले जाऊ लावले. याला विरोध असणाऱ्या आदिवासींनी मूली पळवणे सुरु केले. वाढत्या वधुमुल्यासाठी कर्ज घेतले जाऊ लागले. अशाप्रकारे स्त्री-पुरुष संबंधाकडे निकोप दृष्टीने पाहणाऱ्या व प्रेमाला सर्वाधिक प्राधान्य देणाऱ्या आदिवासी समाजामध्ये आधुनिक समाजांच्या संकूचित मतांचा शिरकाव झाला.

३. युवागृहांचे पतन :- युवागृहे ही जमातीतील युवक-युवतींना सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक शिक्षण व संस्कार देणारी संस्था होती. मात्र संकूचित वृत्तीच्या आधुनिक व प्रगत समाजाकडून युवागृह म्हणजे मौजमजेचे स्थान, अनैतिकतेचा कळस अशी टीका होऊ लागली. परिणामी, युवागृहांचे पतन झाले. त्यांच्याजागी अन्य शिक्षणसंस्थेचे प्रतिरोपण न झाल्याने नवीन पिढीकडे परंपरागत संस्कृतीचे हस्तांतर कठीण बनले.

४. व्यसनाधिनताः- मद्यपान हे आदिम समाजात खोलवर रुजलेले आहे.

विचारवंत सिमिंग्टन म्हणतात "They drink as a race, their children are brought up to it, and no man or woman can avoid the habit. They will drink if they can beg or borrow the means to do it. The Bhills, varlis and others as a whole are a race of drunkards and is scarcely possible for any individual among them to take himself an expection to the general rule. In a word, they have no freedom of choice....... In my opinion, therefore, prohibition if feasible, is required more in these area than in place where individual freedom of choice is at any rate possible and where racial damage is not obvious. " [४९]

-Report by Symington

"सर्व आदिवासी जमातच व्यसनी असते. त्यांच्या मूलांना लहानपणापासुनच पिण्याचे धडे मिळतात. कोणतीही व्यक्ती, स्त्री असो की पुरुष, या व्यसनापासुन वाचू शकत नाही. कुठुनही उसनवारी करुन अगर भीक मागुन दारु विकत घेण्याइतके पैसे मिळाले की हे लोक दारु पितात. भिल्ल, वारली वा इतर आदिवासी जमाती व्यसनाधीन असल्याने त्यातील एखाद्या व्यक्तीला या व्यसनातून मुक्त होणे क्वचितच शक्य होते. थोडक्यात या जमातींना व्यसनमुक्त होण्याची मूभा नसते....... ज्या ठिकाणी व्यक्तीला आत्मनिर्धाराने व्यसनमुक्त होण्याचे स्वातंत्र्य असु शकते किंवा ज्या भागात व्यसनामुळे सर्व जमातीचे अध:पतन होण्याचा धोका इतका भयंकर नसतो अशा ठिकाणापेक्षा या आदिवासी भागात दारुबंदीची, जर ती कायद्याने घडवून आणणे शक्य असेल तर, अधिक आवश्यकता आहे, असे माझे मत आहे "

मोहाची फूले, तांदळाचे पीठ, ताड, माड इ. पासुन बनविलेल्या परंपरागत दारु किंवा ताडी माडीमध्ये मादक पदार्थाचे प्रमाण कमी असते. पण यावर शासकीय बंदी असल्याने त्याची जागा मद्यार्काचे जास्त प्रमाण असणाऱ्या हातभट्टी व कारखान्यातुन तयार होणाऱ्या दारुने घेतली. परिणामी, मद्यसेवनामुळे शरीरावर, कार्यक्षमतेवर, मानसिकतेवर व कौटुंबिक जीवनावर विपरित परिणाम झाला.

५. वेषभुषेतील बदल : - प्रगत समाजाच्या संपर्कात आल्याने आदिवासींना त्यांच्या अर्धनग्नतेचा संकोच वाटू लागला. त्यामुळे त्यांनीही पूर्ण पोषाख वापरणे सुरु केले. मात्र दररोज स्नान, साबणाने कपडे धुणे इ. ते करत नसल्याने अस्वच्छता व त्वचेचे रोग यांना निमंत्रण मिळाले. नैसर्गिक परिस्थितीशी जुळणारा व आर्थिकदृष्ट्या किफायतशीर असणाऱ्या पारंपारिक पोषाखाचा त्याग करणे त्यांच्यादृष्टीने समस्या निर्माण करणारे ठरले.

६. भाषाविषयक प्रश्न :- बाह्य संस्कृतीच्या संपर्कामुळे आदिवासींनी प्रगतांच्या भाषेचा स्वीकार व वापर सुरु केला. त्या त्या समाजाची भाषा ही समाजाच्या सांस्कृतिक मुल्यांना प्रतिबिंबित करते. मात्र स्वभाषेचा त्याग व नवीन भाषा पूर्णपणे आत्मसात न होणे यामुळे त्यांच्या सांस्कृतिक जीवनात पोकळी निर्माण झाली आहे.

७. धर्म व जादु यांचा अस्त : - धर्म व जादू यावरील असणाऱ्या आदिवासी समाजाच्या श्रध्देचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यांच्या वैयक्तिक व सामुदायिक अडचणींचे निवारण धर्म व जादूमुळे होत होते. शिवाय त्यांना मानसिक शांती व समाधान मिळत होते. मात्र धर्मांतर वा प्रगतांच्या संपर्कामुळे आदिम जीवनातील धर्म व जादू यांचा प्रभाव कमी होत आहे. त्यामुळे धर्माच्या आधारावर उभी असलेली त्यांची सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थाच कोलमडत आहे. धर्म व जादू यांचे व्यावहारिक मूल्य लक्षात न घेता त्याचे उच्चाटन अन्यायकारक ठरत आहे.

**क) आरोग्यविषयक समस्या :-**

पूर्ण पोषाख वापरण्याच्या सवयीचा अभाव, कपड्याची अस्वच्छता तसेच पावसाळयात ओले कपडे वापरणे इ. मुळे चर्मरोग व न्युमोनियासारख्या आजारांना आदिवासी नेहमीच बळी पडतात. पोटभर व नियमित जेवणाचा अभाव, अपार कष्ट, व्यसनाधिनता, आरोग्यासंबंधी अज्ञान आधूनिक वैद्यकीय उपचारासंबंधी नकारात्मक मानसिकता, अंधश्रध्दा, स्त्रियांचे लैंगिक शोषण इ. अनेक कारणामुळे आदिवासी समाजाच्या आरोग्यविषयक समस्या अत्यंत गंभीर आहेत.

**समस्यांवरील उपाय :-**

आदिवासीच्या विविध समस्यावर उपाययोजना करण्यासाठी खालील तीन दृष्टीकोनातुन विचार मांडले गेले -

**१. अलगता (Isolationism) :-** हा दृष्टिकोन १९३१ सालच्या जनगणनेचे आयुक्त असणारे हटन यांनी मांडला आणि मानववंशशास्त्रज्ञ व मिशनरी असलेल्या डॉ. व्हेरियन एलव्हीन यांनी या विचाराचा पाठपूरावा केला. "प्रगत समाजाच्या संपर्कातुन आदिवासींच्या समस्या निर्माण झाल्या असुन त्यांना शक्य तितके प्रगत समाजापासून अलग ठेवण्याच्या हेतुने आदिवासींना राष्ट्रीय उद्याना (National Park) मध्ये ठेवले जावे जेणेकरुन स्वतःच्या संस्कृतीचे जतन करणे, प्रगतांच्या संस्कृतीचे आक्रमण थोपवणे, आर्थिक पिळवणूक थांबवणे इ. हेतू साध्य होतील. मात्र हा दृष्टीकोन ख्रिश्चन धर्मप्रसारासाठी

पूरक असुन, अलिप्तवादाने सांस्कृतिक देवाणघेवाण होणार नाही व आदिवासीच्या समस्या वाढतील म्हणून हा दृष्टिकोन आता मागे पडला आहे." [५०]

**२. सामीलीकरण (**Assimilation**):-** हा दृष्टीकोन उपरोक्त दृष्टिकोनाच्या अगदी उलट असुन आदिवासीचे अस्तित्व वेगळे न ठेवता नागरी समाजाशी त्यांचे जाणीवपूर्वक विलीनीकरण सुचविणारा आहे. या दृष्टीकोनांचा डॉ. घूर्ये व ठक्करबाप्पा यांनी हिरिरीने पूरस्कार केला. "प्राचीन काळापासून अभावितपणे हे सामिलीकरण घडत आलेले आहे. मात्र यातून गरीबी व धर्मांतर सामाजिक दर्जा, स्वतःच्या संस्कृतीचे जतन व संवर्धन या समस्या सुटणार नाहीत." [५१]

**३. एकीकरण** (Integration):- हा दृष्टिकोन उपरोक्त दोन्ही दृष्टिकोनाचा सुवर्णमध्य साधणारा असुन "एकीकडे आदिवासीच्या मूळ संस्कृतीचे जतन व संवर्धन करणे पण त्याचबरोबर त्यांनी राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्यासाठी संरक्षण व सवलती देऊन त्यांच्या समस्येचे निराकरण करणे असा हा मार्ग होय. या मार्गाचा पं. नेहरुंनी पुरस्कार केला व इ.स. १९५७ पासुन आदिवासी कल्याण योजनांच्या माध्यमातुन त्यांची अंमलबजावणी सुरु केली." [५२]

## १.६ आदिवासीसाठींच्या घटनात्मक तरतुदी आणि आरक्षण

२६ जानेवारी १९५० पासून भारतीय संघराज्य स्थापन झाले आणि राज्यघटनेची अंमलबजावणी सुरु झाली. त्याअंतर्गत अनेक वर्षे विकासापासून कोसो मैल दूर असलेल्या गावगाड्याबाहेरच्या आदिवासींचे सामाजिक आणि आर्थिक हितसंबंध जोपासणे, सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे, राहणीमानाचा दर्जा उंचावून, प्रगत समाजाच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करुन आदिवासींना मूख्य प्रवाहात आणणे इ. उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी खालीलप्रमाणे मूलभूत घटनात्मक तरतूदी करण्यात आल्या -

**अ) सामाजिक सुरक्षा :-** आदिवासीच्या सामाजिक सुरक्षेसंबंधी पूढील कलमांद्वारे घटनात्मक तरतूदी करण्यात आल्या आहेत. कलम १७ अनुसार "अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरुपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र उपराध असेल." [५३] कलम २३ (१) अनुसार "माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरुपातील वेठ यांना मनाई करण्यात आली आहे आणि उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

कलम २३ (२) अनुसार "सार्वजनिक प्रयोजनांकरता सक्तीने सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टींमुळे प्रतिबंध होणार नाही व असे सेवाबंधन लादताना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरुन राज्य कोणताही भेदभाव करणार नाही." [५४] कलम २५ (२) अनुसार "सामाजिक कल्याण व सुधारणा याबाबत अथवा सार्वजनिक स्वरुपाच्या हिंदू धार्मिक संस्था, हिंदूचे सर्व वर्ग व पोटभेद यांना खूल्या करण्याबाबत उपबंध करणाऱ्या कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. " [५५]

उपरोक्त विविध कलमांद्वारे घटनेने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तथा अन्य सर्व स्तरावरील मागास समाज घटकास सामाजिक संरक्षण प्राप्त करुन दिले आहे.

**ब) शैक्षणिक, सांस्कृतिक तथा विकास :-** अनुसूचित जाती तथा अनुसूचित जमाती यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक जडणघडणीबरोबरच विकासाच्या दृष्टीने खालील कलमांद्वारे घटनेत तरतुद करण्यात आली आहे. कलम १५ (४) अनुसार "अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या सामाजिक घटकांना शैक्षणिक, सामाजिक गतिशीलता प्राप्त करुन देण्यासाठी राज्य या कलमाद्वारे प्रयत्न करेल." [५६] कलम २९(१) अनुसार "भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा अधिकार असेल. (२) राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही कारणावरुन प्रवेश नाकारला जाणार नाही. कलम ४६अनुसार "राज्य हे दूर्बलतर जनवर्ग, आणि विशेषतःअनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील, आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकरचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करील." [५७]

थोडक्यात कायद्यासमोर समानता असेल. धर्म, वंश, लिंग, किंवा भाषा, जन्मस्थान यावरुन भेदभाव केला जाणार नाही. तसेच सार्वजनिक सेवा योजनांच्या बाबतीत समान संधी दिली जाईल.

**क) सेवा सुरक्षा :-** आदिवासींसाठी घटनेतील तरतूदीनुसार सेवेत स्थान व सुरक्षितता खालील घटनात्मक तरतूदीद्वारे प्रदान करण्यात आली आहे.

कलम १६ (४) अनुसार "सरकारच्या विविध विभागातील शासकीय सेवेमध्ये ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधीत्व नाही अशा वर्गाकरीता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणत्याही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही."[५८] कलम ३३५ अन्वये "मध्यवर्ती तथा राज्य शासनाच्या सेवेतील भरती करतेवेळी प्रशासनातील सेवा तथा पदावरील अनुसूचित जाती आणि जमातीच्या दाव्याची दखल घेतली जाईल." [५९] कलम ३३८अनुसार "१) अनुसूचित जाती आणि जमातीकरिता एक विशेष प्रशासकीय अधिकारी असेल, ज्याची नियुक्ती राष्ट्रपती करतील. २) अनुसूचित जाती आणि जमातीकरिता राज्यघटनेच्या मर्यादित सुरक्षाविषयक सर्व बाबींचा शोध घेणे, त्याबरोबरच या सुरक्षिततेच्या कार्याच्या संदर्भात राष्ट्रपतीना अहवाल देणे, राष्ट्रपती असे सर्व अहवाल संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यास सांगतील." [६०]

**ड) राजकीय सुरक्षा :-** आदिवाीच्या राजकीय सुरक्षेसंबंधी काही तरतूदी राज्यघटनेत करण्यात आलेल्या असून त्या पुढीलप्रमाणे-

कलम ३३२अनुसार : "अनुसूचित जाती व (आसामच्या स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजाती खेरीज करुन) अनुसूचित जनजाती यांच्याकरता प्रत्येक राज्याच्या विधानसभेत जागा राखून ठेवल्या जातील. "[६१] कलम ३३० (१) अनुसार लोकसभेत -

(क) अनूसूचित जाती,

(ख) आसामच्या स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजातीखेरीज करुन इतर अनुसूचित जनजाती आणि

(ग) आसामच्या स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजाती याच्याकरता जागा राखून ठेवल्या जातील.

(२) "अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित करण्यात येणाऱ्या जागांची संख्या ही त्या राज्यातील एकूण लोकसंख्येतील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या प्रमाणात असेल." [६२]

उपरोक्त विविध घटनात्मक कलमांनुसार आदिवासींच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय नोकरीविषयक हक्कांचे संरक्षण करण्यात आले आहे.

**आरक्षण आणि सामाजिक न्याय :-**

सामाजिक न्याय म्हणजे देशातील सत्ता आणि साधनसंपतीमध्ये देशाच्या प्रत्येक नागरिकाला त्याच्या कूवतीनुसार समानतेच्या तत्वावर वाटा मिळणे आणि परंपरागत विषमतावादी समाजरचनेत मागे राहिलेल्यांना विशेष संधी देऊन सर्वाच्या सोबत आणण्याचा प्रयत्न करणे होय.

सामाजिक न्यायाचा मूख्य उद्देश देशामध्ये सामाजिक आणि आर्थिक समानता प्रस्थापित करणे हाच असतो. "भारतीय घटनेने १६ (४) कलमानुसार मागासलेल्या जाती-जमातीसाठी विशेष तरतूदी करण्याचा हक्क राज्यांना दिलेला आहे. या कलमानुसार मागास जाती, भटक्या जमाती आणि आदिवासी जमातींसाठी खास राखीव जागांची तरतूद करण्यात आलेली आहे." [६३] "१९९४ पासून 'अ' गटातील १४ विमूक्त जातींसाठी ३% ब गटातील २८ भटक्या व तत्सम जातींसाठी २.५% क गटातील धनगर आणि इतर भटक्या जमातींसाठी ३.५% टक्के, ड गटातील भटक्यांसाठी २% असे एकूण ११% आरक्षण भटक्या विमूक्तांसाठी देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींसाठी एकूण ०७% आरक्षणासाठी तरतूद आहे." [६४]

महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये ३८ व्या क्रमांकावर पारधी, आदिवेचर, फासेपारधी, लंगोटीपारधी, बहेलिया, चित्तापारधी, टाकणकार, टाकिया या पारधी उपजातींचा समावेश आहे तर विमूक्त जाती 'अ' वर्गाच्या यादीमध्ये क्र. ०८ वर पालपारधी व क्र. ९ वर राजपारधी, गावपारधी, हरणशिकार या पारधी उपजातींचा समावेश आहे." [६५]

**अतिमागास आदिवासी जमाती :-**

एका सांस्कृतिक गटाच्या प्रभावामूळे दुसऱ्या सांस्कृतिक गटाचा जीवनप्रवाह प्रभावित होऊन परिवर्तीत होणे याला सांस्कृतिकरणाची प्रक्रिया (Acculturation) असे म्हणतात. ही प्रक्रिया प्रत्येक गटाला, जमातीला किंवा त्यातील काही लोकांना आलेल्या संधी, त्यांनी केलेले प्रयत्न, व हालचाल तसेच दुसऱ्या संस्कृतीच्या पडणाऱ्या प्रभावाला मिळणारा प्रतिसाद इ. गोष्टीवर अवलंबून असते. जंगलवनात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या जमातीपैकी काही जमातीमध्ये ही सांस्कृतीकरणाची प्रक्रिया जलद झाल्याने ते मुळ स्थितीपासून बरेच दूर गेले. मात्र, "ज्या जमाती अजुनही सांस्कृतिकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ट स्तराला आहेत अथवा ज्यांच्या मुळ स्थितीत अजुन तुलनात्मकदृष्ट्या फारसा फरक झाला नाही त्यांना अतिमागास जमाती (Primitive Tribes or Primitive Tribal groups) असे म्हटले जाते." [६६] "एखाद्या जमातीस अतिमागास आदिवासी जमात संबोधण्यासाठी खालील निकष वापरले जातात." [६७]

१) त्यांची वस्ती दुर्गम (inaccessible) अशा रानावनात, पर्वतात, दऱ्याखोऱ्यात असते.

२) त्यांचे जीवन एकांतवासी (secluded, isolated) असते व बाह्यजगाशी फारच मर्यादित संपर्क येतो.

३) त्यांची अर्थव्यवस्थासुध्दा अतिमागास (Primitive) असुन ते शिकार, जंगल वेचणे तसेच फिरती शेती (shifting cultivation) यावर निर्वाह करतात.

४) आपल्या बोलीभाषा व त्यातील लोकसाहित्य यांचे ज्ञान व वापर त्यांच्या दैनंदिन जीवनात असतो.

५) देवदेवता, पूजाविधी, सामाजिक निषेध आणि जादूटोणा इ. गोष्टींचा सामाजिक जीवनात श्रध्देने वापर चालू असतो.

भारत सरकारच्या गृह खात्याने खालील तीन निकष निश्चित केले व त्यापैकी किमान एका निकषाची पूर्तता करणाऱ्या आदिम जमातीस अतिमागास आदिवासी जमात घोषित करण्यात येते.

१) "इतर जमातीशी तूलना करता लोकसंख्यावाढीचा दर अतिशय कमी असल्याने छोटा समूह म्हणुन अस्तित्व असणे.

२) तंत्रज्ञान अतिशय साधे व अत्यंत मर्यादित वापर आणि शिकार करणे व जंगलातून अन्न गोळा करणे यावरच उदरनिर्वाह असणे.

३) साक्षरतेचे प्रमाण इतर जमातीच्या तुलनेत अत्यल्प असणे. " [६८]

## १.७ महाराष्ट्रातील आदिवासी :-

लोकसंख्येच्या व क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतात तिसऱ्या क्रमांकाचे असलेले "महाराष्ट्र हे राज्य १५° उत्तरेस ते २२° उत्तरेस स्थिर आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३०,७७७ लाख वर्ग किलोमीटर असून त्याचे भारताच्या क्षेत्रफळाच्या शेकडा ९.६६% एवढे प्रमाण आहे. " [६९] त्यापैकी ०.५० लाख चौ. किमी क्षेत्र आदिवासी उपयोजना क्षेत्राखाली येते. राज्याच्या एकूण क्षेत्राशी हे प्रमाण १६.४९% एवढे आहे. "२००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील आदिवासी लोकसंख्या ८५.७७ लाख असून राज्याच्या ९६८.७९ लाख इतक्या एकूण लोकसंख्येच्या हे प्रमाण शेकडा ८.८५% इतके आहे. " [७०] महाराष्ट्रातील एकूण ८५.७७ लाख आदिवासीपैकी ७४.८६ लाख आदिवासी ग्रामीण भागात राहतात तर उर्वरित १०.९१ लाख शहरी भागात राहतात. "आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत अनुक्रमे मध्यप्रदेश, ओरिसा, बिहार, गुजरात या राज्यानंतर महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक आहे. " [७१]

"राज्यातील बहुसंख्य आदिवासी ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, नांदेड, अहमदनगर, अमरावती, यवतमाळ, रायगड, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, भंडारा या जिल्ह्यात केंद्रीत आहेत. आदिवासी जमातींचा विचार करता त्यांत भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कोकणा, कातकरी,

ठाकर, गावीत, कोलाम, कोरकू, आंध, मल्हारकोळी, धोडिया, दुबळा, माडियागोंड, परधान, पारधी ह्या जमातीचा प्रामूख्याने समावेश होतो." [७२]

महाराष्ट्रात आदिवासीच्या अनेक जमाती आढळून येतात. मात्र प्रत्येक जमातीची स्वतंत्र ओळख व अस्तित्व असून प्रत्येक जमातीचे सामाजिक, आर्थिक जीवन तसेच चालिरीती, धार्मिकता, सांस्कृतिक वैशिष्ट्ये इ. पैलु त्यांचे वेगळेपण जपणारे आहेत. आदिवासी ज्या भौगोलिक क्षेत्रात वास्तव्य करतात तेथील निसर्ग, पर्यावरण इ. बाबींचा त्यांच्या जीवनशैलीवर प्रभाव जाणवतो. मात्र सर्वसामान्य आदिवासीचे जीवन, जीवनमुल्ये ही सभोवतालच्या निसर्गाला, पर्यावरणाला पूरक असतात व या संदर्भाने त्यांच्यात सारखेपणा आढळतो.

महाराष्ट्रातील आदिवासींचे आर्थिक जीवन मागासलेले आहे. शेती, शेतमजुरी आणि जंगलकाम ही त्यांच्या उपजीविकेची साधने असून आदिवासी समाजात सुमारे ४०-४५% इतकी शेतमजूरांची संख्या असून जे इतर शेतजमीनमालक आहेत तेही पारंपारिक पध्दतीने शेती करतात. परिणामी आर्थिक मागासलेपण कायम आहे.

**१.७.१ महाराष्ट्रातील आदिवासींचे क्षेत्रनिहाय विभाजन:-**

राज्यामध्ये ज्या भागात आदिवासी राहतात त्या भागाचे भौगोलिकदृष्ट्या खालीलप्रमाणे विभाग पडतात.

**१. सह्याद्री विभाग:-** या विभागात ठाणे, नाशिक, पुणे, अहमदनगर, रायगड इ. जिल्हे प्रामूख्याने येतात. या जिल्ह्यांच्या डोंगराळ प्रदेशात महादेव कोळी, वारली, कातकरी, कोकणा, ठाकर, ढोरकोळी व मल्हार कोळी या जमाती प्रामूख्याने आढळतात.

**२. सातपूडा विभाग:-** या विभागात धूळे, जळगाव, अमरावती, औरंगाबाद इ. जिल्हे येतात. या जिल्ह्यांमध्ये भिल्ल, गावीत, धनका, पावरा, दुबळा, पारधी, कोलाम, तडवी व मावची या जमाती प्रामूख्याने आढळतात.

**३. गोंडवन विभाग:-** विदर्भातील डोंगराळ आणि जंगलमय प्रदेश विशेषत: चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, नागपूर व नांदेड इ. जिल्ह्याचा या विभागात समावेश होतो. यात गोंड, माडिया गोंड, कोरकू, कोलाम, परधान, आंध, थोटी या जमाती वास्तव्य करताना आढळतात.

ठाणे जिल्ह्यात वारली, कातकरी, ठाकूर, कोकणा व मल्हारकोळी या जमातीची वस्ती प्रामूख्याने आढळते. धूळे जिल्ह्यात भिल्ल, कोकणा, मावची, पावरा, धानका व गावीत या जमातीची तर अहमदनगर व पूणे जिल्ह्यात महादेव कोळी व ठाकर या जमातीची प्रमुख वस्ती आहे. रायगड

जिल्ह्यात ठाकर, कातकरी आणि नाशिक जिल्ह्यात महादेव कोळी, कोकणा, ठाकर, भिल्ल या जमाती आढळतात. अमरावती जिल्ह्यात कोरकू, यवतमाळ जिल्ह्यात कोलाम, गोंड व आंध आणि चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात गोंड, माडिया गोंड, परधान व हलबा या प्रमूख आदिवासी जमाती आढळतात.

"भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कातकरी, ठाकर आणि गावीत ह्या प्रमूख जमातीची लोकसंख्या महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ८०% इतकी असून एक लाखाहुन अधिक लोकसंख्या असलेल्या जमातीमध्ये या प्रमख जमातींचा समावेश होतो. महाराष्ट्रातील १५ तालुक्यात आदिवासींचे संख्याधिक्य ५०% हून अधिक तर १९ तालुक्यात हे प्रमाण २५ ते ५० % आणि ३३ तालुक्यात ते ५ ते २५ % आढळते. " [७३]

**१.७.२ महाराष्ट्रातील आदिवासींच्या लोकसंख्येची वैशिष्ट्ये :-**

महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येची लोकसंख्येतील वृध्दी, स्त्री-पुरुष निहाय वर्गीकरण, राज्याची जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या आणि राज्यातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण इ. काही प्रमूख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

**तक्ता क्र. १.२**

**महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येतील वृध्दी दर्शविणारा तक्ता**

**(आकडे हजारात)**

| वर्ष | महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या | महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्येची राज्यातील एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९५१ | ३५९,५६ | १४,९४ | ४.१५ |
| १९६१ | ३९५,५४ | २३,०७ | ५.८३ |
| १९७१ | ५०४,१२ | ३८,४१ | ७.६२ |
| १९८१ | ६२७,८४ | ५७,७२ | ९.१९ |
| १९९१ | ७८९,३७ | ७३,१८ | ९.२७ |
| २००१ | ९६८,७९ | ८५,७७ | ८.८५ |

(स्त्रोत :- आदिवासी विकास आणि वास्तव - डॉ. तेगमपुरे मारोती , चिन्मय प्रकाशन औरंगाबाद २००९ पृ. क्र. ३३)

तक्ता क्रमांक १.२ मधील आकडेवारी स्पष्ट करते की, महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या १९५१ ते २००१ या कालावधीमध्ये वाढली आहे. १९५१ मध्ये एकूण लोकसंख्येच्या ४.१५ टक्के असलेली आदिवासी लोकसंख्या २००१ मध्ये ८.८५ टक्के इतकी झाली आहे. १९९१ मध्ये हे प्रमाण ९.२७ टक्के

होते. १९५१-२००१ या काळात राज्यातील आदिवासी लोकसंख्येमध्ये ४.७० टक्क्याने वाढ झाल्याचे दिसते.

आदिवासी लोकसंख्येचे स्त्री-पुरुषनिहाय वर्गीकरण पुढील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. १.३**

**महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे स्त्री-पुरुषनिहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता**

**(आकडे हजारात)**

| वर्ष | एकूण लोकसंख्येतील मुलींचे प्रमाण | आदिवासी लोकसंख्येतील मुलींचे प्रमाण |
|---|---|---|
| १९६१ | ९४१ | ९८७ |
| १९७१ | ९३० | ९८२ |
| १९८१ | ९३४ | ९८३ |
| १९९१ | ९२७ | ९७२ |
| २००१ | ९३३ | ९७७ |

(Source: - १. Govt. of Maharashtra, Annual Report २००४-२०५ Ministry of Tribal Affairs, New Delhi, P-३१

२. वर्मा आर. सी. आदिवासी जमाती - काल, आज आणि उद्या, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, २००३, पृष्ठ क्रमांक - १३.)

तक्ता क्र. १.३ मधील आकडेवारी स्पष्ट करते की, एक हजार आदिवासी मुलांमध्ये मुलींचे प्रमाण १९६१ मध्ये ९८७, १९७१ मध्ये ९८२ तर १९८१ मध्ये ९८३ एवढे वाढले. नंतरच्या काळात मात्र त्यामध्ये घट होऊन २००१ मध्ये ९७७ एवढे झाले. असे असले तरी एकूण लोकसंख्येच्या एक हजार मुलांमधील मुलींचे प्रमाण मात्र आदिवासींच्या तुलनेत कमी असल्याचे दिसते. एकूण लोकसंख्येच्या मुलांमधील मुलींचे प्रमाण १९६१ मध्ये ९४१ होते ते सातत्याने कमी होऊन २००१ मध्ये ९३३ एवढे झाले. यावरुन एक बाब अधिक स्पष्ट होते ती म्हणजे, एकूण लोकसंख्येतील मुलींच्या प्रमाणापेक्षा आदिवासी लोकसंख्येतील मुलींचे प्रमाण जास्तच आहे. लिंग निदान चाचण्याबाबत आदिवासीमध्ये असलेले अज्ञान आणि आदिवासींमध्ये स्त्री-पुरुष भेद न करणे हे मुख्य कारणे असल्याचे दिसून येते.

२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या अभ्यासली असता एकूण लोकसंख्येशी त्यांचे शेकडा प्रमाण लक्षात येते.

**तक्ता क्र. १.४**

**२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

**(लोकसंख्या हजारात)**

| अ.क्र. | जिल्हा | लोकसंख्या | | आदिवासी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | आदिवासी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | मुंबई उपनगर | ८६४० | ७१ | ०.८२ |
| २. | मुंबई शहर | ३३३८ | २१ | ०.६२ |
| ३. | ठाणे | ८१३२ | ११९९ | १४.७४ |
| ४. | रायगड | २२०८ | २६९ | १२.१८ |
| ५. | रत्नागिरी | १६९७ | २० | १.१८ |
| ६. | सिंधूदूर्ग | ८६९ | ०५ | ०.५८ |
| ७. | नाशिक | ४९९४ | ११९४ | २३.९१ |
| ८. | धूळे | १७०८ | ४४४ | २५.९९ |
| ९. | नंदूरबार | १३१२ | ८६० | ६५.५३ |
| १०. | जळगाव | ३६८३ | ४३६ | ११.८४ |
| ११. | अहमदनगर | ४०४१ | ३०३ | ७.५ |
| १२. | पूणे | ७२३२ | २६२ | ३.६२ |
| १३. | सातारा | २८०९ | २२ | ०.७८ |
| १४. | सांगली | ५८४ | १८ | ०.६९ |
| १५. | सोलापूर | ३८५० | ६९ | १.७९ |
| १६. | कोल्हापूर | ३५२३ | २१ | ०.६० |
| १७. | औरंगाबाद | २८९७ | १०० | ३.४५ |
| १८. | जालना | १६१३ | ३२ | १.९८ |
| १९. | परभणी | १५२८ | ३५ | २.२९ |
| २०. | हिंगोली | ९८७ | ८७ | ८.८१ |
| २१. | बीड | २१६१ | २४ | १.११ |
| २२. | नांदेड | २८७६ | २५४ | ८.८३ |
| २३. | उस्मानाबाद | १४८७ | २८ | १.८८ |
| २४. | लातूर | २०८० | ४८ | २.३१ |
| २५. | बूलढाणा | २२३२ | ११५ | ५.१५ |
| २६. | अकोला | १६३० | १०० | ६.१४ |
| २७. | वाशिम | १०२० | ७१ | ६.९६ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| २८. | अमरावती | २६०७ | ३५७ | १३.६९ |
| २९. | यवतमाळ | २४५८ | ४७३ | १९.२४ |
| ३०. | वर्धा | १२३७ | १५४ | १२.४५ |
| ३१. | नागपूर | ४०६८ | ४४४ | १०.९१ |
| ३२. | भंडारा | ११३६ | ९८ | ८.६ |
| ३३. | गोंदिया | १२०१ | १९६ | १६.३१ |
| ३४. | चंद्रपूर | २०७१ | ३७५ | १८.११ |
| ३५. | गडचिरोली | ९७० | ३७२ | ३८.३५ |
| | महाराष्ट्र | १६८७९ | ८५७७ | ८.८५ |

Source: - Govt. of Maharashtra, Annual Tribal Sub-Plan २००५-०६, Tribal Development, Mumbai, P-३९९

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, २००१ मध्ये आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी सर्वाधिक शेकडा प्रमाण नंदूरबार जिल्ह्यात ६५.५३% इतके असून त्याखालोखाल गडचिरोली जिल्ह्यात ३८.३५% इतकी आदिवासी लोकसंख्या आहे. सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या सिंधूदुर्ग जिल्ह्यात असून ती केवळ ०.५८% इतकी आहे. विभागनिहाय आदिवासी लोकसंख्येचे विश्लेषण करीत असताना ती नाशिक विभागात सर्वाधिक म्हणजे २०.५७% आहे. त्याखालोखाल नागपूर विभागात १५.३४% असून सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या पुणे विभागात आहे व ती केवळ १.९६% टक्के आहे असे स्पष्ट होते.

**तक्ता क्र. १.५**

**महाराष्ट्रातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविणारा तक्ता**

| वर्ष | एकूण साक्षर लोकसंख्या | | | आदिवासी साक्षर लोकसंख्या | | | एकूण लोकसंख्या व आदिवासी साक्षरतेतील फरक (%) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | एकूण | स्त्रिया |
| १९६१ | ४२.०४ | १६.१७ | २९.८२ | १२.५५ | १.७५ | ७.२१ | २२.६१ | १४.४२ |
| १९७१ | ५१.०४ | २६.४३ | ३९.१३ | १९.०६ | ४.२१ | ११.२४ | २७.८९ | २२.२२ |
| १९८१ | ५८.६५ | ३४.६३ | ४७.०२ | ३२.३८ | ११.९४ | २२.२९ | ३४.०८ | २२.६९ |
| १९९१ | ७६.५६ | ५२.३ | ६४.८७ | ४९.०८ | २४.०८ | ३६.७७ | २८.१ | २८.२२ |
| २००१ | ८६.६ | ६७ | ७६.९ | ६७ | ४३.१ | ५२.२ | २४.७ | २३.३९ |

Source:- १९६१ ते १९९१ पर्यन्तची आकडेवारी - Navinchandra Jain, Tribals in Maharashtra State, Areport, Tribal Situation in India in Vidyut Joshi (Ed.) Ravat Publications Jaipur - P-९९.

२००१ ची आकडेवारी - Govt. of Maharashtra, Annual Tribal Sub-Plan २००५-०६, Tribal Development, Dept., Mumbai, - P-४३७

उपरोक्त तक्त्यावर दृष्टिक्षेप टाकल्यास असे दिसून येते की, १९६१ ते २००१ या कालावधीमध्ये कायम पण एकूण लोकसंख्येच्या तूलनेत आदिवासीमधील साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. एकूण आणि आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचा फरक हा १९६१ मध्ये २२.६१% इतका होता तर २००१ मध्ये यात पून्हा वाढ होऊन २४.७% पर्यन्त पोहोचला आहे. १९६१ मध्ये केवळ ७.२१% साक्षर असलेली आदिवासी लोकसंख्या २००१ मध्ये ५२.२% पर्यन्त येऊन पोहचली असून याच कालावधीमध्ये आदिवासी पुरुष साक्षरतेचे प्रमाण १२.५५% वरुन ६७% पर्यन्त पोहोचले आहे, तर स्त्री साक्षरतेच्या बाबतीत मात्र शोचनीय अवस्था असल्याचे पाहवयास मिळते. १९६१ मध्ये केवळ १.७५% साक्षर असलेल्या आदिवासी स्त्रिया २००१ मध्ये ४३.१% पर्यन्त पोहोचल्या असल्या तरी एकूण लोकसंख्येतील स्त्रीसाक्षरतेच्या प्रमाणाशी तूलना केल्यास ४३.१% ही आकडेवारी जवळपास २३.९% एवढी मागे आहे.

**१.७.३ महाराष्ट्रातील आदिवासी जमाती :-**

महाराष्ट्रातील आदिवासी जमाती १७ जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात विखूरलेल्या असून त्यांची संख्या प्राधान्याने धूळे, नाशिक, ठाणे, रायगड, पूणे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर आणि नांदेड या जिल्ह्यात आढळून येते. आदिवासी जमाती आणि त्यांचे भौगोलिक क्षेत्र यांचे नाते अतूट आहे. जसे गोंड म्हटले की चंद्रपूर व गडचिरोलीचा गोंडवन प्रदेश, भिल्ल म्हटले की धूळे व जळगाव जिल्ह्यातील सातपूडा पर्वताचा प्रदेश, कोकणा म्हटले की सुरगाणा, पेठ आणि डांग चा प्रदेश, कोरकू म्हटले की अमरावतीचा मेळघाट प्रदेश, वारली म्हटले की ठाण्यातील डहाणू, जव्हार, मोखाडा, तलासरीचा जंगलपट्टीचा प्रदेश, ठाकर, महादेव कोळी म्हटले की सह्याद्रीच्या पूर्व पश्चिम उतारावरील पूणे, अहमदनगर, नाशिक, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील डोंगराळ आणि पठारी प्रदेश अशी ढोबळ मानाने विभागणी झालेली आहे.

"महाराष्ट्र राज्यातील आदिवासी तथा अनुसुचित जमातीच्या यादीत खालील एकूण ४७ जमातीचा समावेश आहे. त्यापैकी दोन जमाती दुरुस्तीद्वारे वगळण्यात आल्या असून The scheduled castes and scheduled tribes orders (Amendment) act २००२ (No १० of २००३) नुसार ही संख्या आता ४५ झाली आहे. यापैकी १९ जमाती संख्याधिक्याने एक लाखापेक्षा अधिक जनसंख्येच्या आहेत." [७४]

"महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास खात्याने प्रसिध्द केलेल्या माहिती पुस्तिकेनुसार महाराष्ट्रातील आदिवासी जमाती खालीलप्रमाण आहेत. " [७५]

| | |
|---|---|
| १. आंध | २५. कोकणा |
| २. बैगा | २६. कोल |
| ३. बारडा | २७. कोलाम |
| ४. बावचा-बामचा | २८. ढोर कोळी |
| ५. भाइना | २९. महादेव कोळी, डोंगरकोळी |
| ६. भारिआ, भुमिआ | ३०. मल्हार कोळी |
| ७. भत्रा | ३१. खोड |
| ८. भिल्ल, तडवी, पावरा, वसावा, वसावे | ३२. कोरकू |
| | ३३. कोया |
| ९. भूजिआ | ३४. नागेशिआ |
| १०. बिजवार | ३५. नाइकडा, नायका, कपाड्या इ. |
| ११. बिरहुल, बिरहोर | ३६. ओरान |

१२. चोधरा, दुरुस्ती अन्वये गाळण्यात आली
१३. धनका
१४. धनवर
१५. धोंडिआ
१६. दुबला
१७. गावित, पडवी, गामिन, मावची
१८. गोंड
१९. हलबा, हलबी
२०. कमार
२१. कातकरी, काथोडी ढोर, सोन
२२. कवर, कंवर
२३. खैरवार
२४. खरिआ
३७. परधान
३८. पारधी
३९. पारजा
४०.पटेलिआ
४१. पोमिआ
४२ रथवा
४३. सवर
४४. ठाकूर
४५. थोटी, दुरुस्तीअन्वये वगळयात आली
४६. वारली
४७. विटोलिआ, बरोडिआ

**१.८ भटक्या-विमुक्त जाती-जमाती :-**

इंग्रजांनी इ.स. १८७१ मध्ये गुन्हेगारी कायद्याद्वारे देशातील काही जमातींना गुन्हेगार जमाती म्हणून घोषित केले. यामुळे या जातीतील सर्व लोकांवर जाचक बंधने लादली व त्यांना समाजापासून वेगळे पाडण्यात आले. वेळोवेळी या कायद्यात बदल व दुरुस्ती करुन कायदा आणखी कठोर करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्यानंतर इ.स.१९५२ मध्ये हा गुन्हेगारी जाती जमाती कायदा तत्कालीन पंतप्रधान पं. नेहरुंनी रद्द केला आणि सुमारे ८१ वर्षे गुन्हेगार जात हा कलंक असलेल्या जातींना विमुक्त जातीजमाती म्हणून घोषित करण्यात आले.

व्याख्या व वर्गीकरण :-

गावगाड्याच्या एकूण समाजरचनेत अनेक उच्च-नीच जातींचा समावेश असून विविध जातींना त्यात स्वतःची भूमिका होती. मात्र काही गावगाड्याबाहेरील जाती या सतत भटकंती करत डोंगरदऱ्यातुन आणि जंगलातून वास्तव्य करीत आपली उपजिवीका करीत राहिल्या. त्यांना समाजाने सामावून घेतले नाही अथवा गावगाड्यात प्रवेश मिळाला नाही. गावगाड्यात किंवा ग्रामरचनेत ज्या जातींना स्थान प्राप्त झालेले नाही अशा भटक्या जातींचे वर्गीकरण निरनिराळ्यातत्वांवर केले जाते.

१९५४ मध्ये बेकन यांनी दोन प्रकारात त्यांचे वर्गीकरण केले.

१. भटके २. अर्धभटके

पहिल्या प्रकारात अशा जाती येतात ज्यांना कुठेही घर नसते, कोणतेही गाव नसते आणि सदैव या गावाहून त्या गावास असे उपजिवीकेसाठी त्यांना सहकूटूंब भटकावे लागते. दुसऱ्या प्रकारात अशा जातींचा समावेश असतो की ज्या कूठेतरी स्थायी जीवन जगतात, मात्र वर्षातून काही महिने व्यवसायाच्या स्वरुपामुळे किंवा पोट भरण्यासाठी त्यांना भटकावे लागते.

इन्सायक्लोपीडीया ऑफ सोशल सायन्सेस मध्ये पूढीलप्रमाणे भटक्या जमातींचे वर्गीकरण आढळते." [७६]

१. शिकारी व संग्राहक भटके

२. पशुपालक जाती

३. कृषिजीवनाधिष्ठित भटक्या जाती.

हे वर्गीकरण भटक्या जातींचे व्यवसाय व अर्थकारण या तत्वावर आधारलेले आहे.

"भारतातील विमुक्त-भटक्या जातीजमातींच्या अभ्यासाचे उद्‌गाते राघवय्या यांनी पुढीलप्रमाणे वर्गीकरण सुचविले आहे. " [७७]

१. परंपरेने भटक्यांचे जीवन जगण्याऱ्या जमाती

२. पशुपालक जमाती

३. मोसमी भटके किंवा व्यवसायाच्या निमित्ताने वर्षातून काही काळ भटक्यांचे जीवन जगणारे

४. गुन्हेगारांच्या भटक्या जमाती

५. व्यावसायिक भटके

६. भिक्षा मागुन जगणारे भटके

नरेंद्र गोपालराव यांनी २५ फेब्रूवारी १९७० रोजी भटक्या जमाती दिनाच्या (Nomadic Tribe's Day) निमित्ताने प्रकाशित स्मरणिकेत एका लेखात भटक्या जातींची व्याख्या पूढीलप्रमाणे केली आहे -

परंपरेने भटक्यांचे जीवन जगणाऱ्या जातींना काही आर्थिक आणि सांस्कृतिक कारणपरंपरेने भटक्यांचे जीवन जगावे लागले आहे की काय हे पहाणे आवश्यक ठरते.

(The term nomadic groups should be applied to these cultured or ethnic groups or large segments there of who are traditionally nomadic and bound to nomadism by their economic pattern rooted in their culture.)

"नरेंद्र गोपालराव यांनी भटक्या जातींचे वर्गीकरण पूढीलप्रमाणे केले आहे. " [७८]

१. पोट भरण्यासाठी ज्यांना भटकंती करावी लागते किंवा अन्न मिळविण्यासाठी ज्यांना भटकावे लागते अशा जाती

२. पशुपालक जमाती किंवा व्यवसाय शोधासाठी भटकणाऱ्या जाती

३. व्यावसायिक भटके, रंजन करणारे, गुन्हेगार आणि स्थलांतरित भटके

महाराष्ट्रात ज्या फिरस्त्या जाती आहेत त्यांचे वर्गीकरण स्थूलमानाने पूढीलप्रमाणे करता येईल -

१. शिकारी जमाती - उदा. फासेपारधी, शिकलगार, वैदू इ.

२. पशुपालक जमाती - उदा. गोपाळ, गोल्ला, मैराळ, दांगट वगैरे

३. रंजन करणाऱ्या जाती - उदा. चित्रकथी, कोलाटी, सापगारुडी, मदारी, सय्यद हळदीवाले, मांग-गारुडी वगैरे.

४. भविष्य सांगणा-या आणि भिक्षूक जमाती - उदा. तिरमाळी, मेढंगी, कूडबूडे जोशी, ठोके जोशी, डमरुवाले सरोदे, काशीकापडी, वासुदेव वगैरे.

५. निरनिराळे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिक जाती - उदा. कैकाडी, वडार, बंजारा, बेलदार इ.

६. देवतेला नवस म्हणून वाहिलेल्यांमधून निर्माण झालेल्या आणि भगतांच्या जाती - उदा. वाघे, गोंधळी, आराधी, जोगती इ.

७. पंथीय मागते - यात संसाराचा त्याग करुन संन्याशाची दिक्षा घेतलेल्या निरनिराळ्यापंथाच्या लोकांचा समावेश असतो. उदा. नाथजोगी, दसनामी.

८. जात मागते - यांत अशा जातींचा समावेश होतो ज्या विशिष्ट जातीचे मागतेपण वंशपरंपरेने चालते. डक्कलवार हे फक्त मांगाकडुनच भिक्षा मागतात.

९. अपंग, तीर्थयात्रा करणारे - यांच्या विशिष्ट जाती नसतात.

समाजामध्ये भिक्षा मागुन जगणाऱ्या हिजड्यांचा किंवा जान्यांचा यातच समावेश असतो. फरक एवढाच की याची स्वतंत्र  अर्धीजात मानली जाते. प्रत्येक जातीत असलेल्या साडेबारा जाती पैकी अर्धी जात ही नपूंसकाची असते. सर्व जातीतील अशा अर्ध्या जातीतील लोक एकत्र येऊन बहूचार देवीच्या उपासनेची दिक्षा घेतात आणि त्यांची स्वतंत्र  जात बनते.

**महाराष्ट्रातील विमुक्त व भटक्या जमाती :-**

" महाराष्ट्र शासनाने दि. २५ जून २००८ च्या शासन निर्णयापर्यन्त अद्ययावत असलेल्या विमुक्त जमाती तसेच भटक्या जमाती म्हणून घोषित केलेल्या जाती पूढीलप्रमाणे - " [७९]

**विमुक्त जाती - अ**

१. बेरड
२. बेस्तर
३. भामटा
४. कैकाडी
५. कंजारभाट
६. कटाबू
७. बंजारा
८. वगळले
९. राजपारधी
१०. राजपूत भामटा
११. रामोशी
१२. वडार
१३. वाघरी
१४. छप्परबंद

**भटक्या जमाती - ब**

१. गोसावी
२. बेलदार
३. भराडी
४. भूते
५. वगळले
६. चित्रकथी
७. गारुडी
८. घिसाडी
९. गोल्ला
१०. गोंधळी
११. गोपाल
१२. हेळवे
१३. जोशी
१४. काशी कापडी
१५. कोल्हाटी
१६. मैराळ
१७. मसनजोगी
१८. नंदीवाले
१९. पांगुळ
२०. रावळ
२१. सिक्कलगर
२२. वगळले
२३. वैदु
२४. वासुदेव
२५. भोई
२६. बहुरुपी
२७. ठेलारी
२८. ओतारी

**भटक्या जमाती - क**

२९. धनगर

**भटक्या जमाती - ड**

३०. वंजारी

**विमुक्त जमाती - ब**

३१. मरीआईवाले, कडक लक्ष्मीवाले, मरगम्मावाले

३२. गिहार / गहरा

३३. गुसाई / गोसाई

३४. मुस्लीम मदारी, गारुडी, सापवाले व जादुगर

३५. भारतीय इराणी

३६. गवळी, मूस्लीम गवळी, गवलान, गवालवंश

३७. दरवेशी, वाघवाले, शाह (मुस्लीमधर्मीय), अस्वलवाले

पारधी ही मूळ आदिवासी असलेली, मात्र  गुन्हेगारी कायद्यामुळे गुन्हेगार जमात म्हणून ओळखली जाणारी तर स्वातंत्र्योत्तर काळात विमुक्त जमात अर्थात अनुसुचित जमात म्हणून आता ओळखली जाते.

**१.९ पारधी जमात - एक दृष्टीक्षेप**

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी पारधी जमात मूळ भारतीय वंशाची  असून भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीपासून ही जमात अनेक टप्प्यांमधून गेली आहे.  जंगलातील प्राण्यांची व पक्ष्यांची शिकार करुन त्यावर उपजिवीका करणारी पारधी ही भटकी जमात आहे.  संस्कृत भाषेतील "पारध" म्हणजे शिकार, म्हणून शिकार करणारा असा अर्थ पारधी या शब्दास प्राप्त झालेला आहे.  रानावनात पशु - पक्ष्यांची शिकार करणे व गावगाड्यातील लोकांना हे शिकार केलेले प्राणी विकणे आणि पारध्यांच्या बायकांनी भीक मागणे अशा प्रकारे पारधी जगत असत.  शिकारीच्या निमित्ताने रानावनांत भटकत असल्यामुळे हे लोक अत्यंत मागासलेले असून अनिष्ट चालीरीती रुढी, परंपरा यामध्ये गुरुफटलेले आहेत.  आजही उपजिवीकेचे कायमस्वरुपी साधन नसल्याने ते भटकतच आहेत. "भटक्या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्द 'नेमो' या शब्दापासून प्रचलित झाली असावी.  नेमो शब्दाचा अर्थ चारणे किंवा पशुपालक असा होतो." [८०] गवताळ प्रदेशात काही काळाकरीता किंवा नेहमी गुरे

चारण्याच्या निमित्ताने भटकणाऱ्या जनसमूहास ग्रीक भाषेत नोमॅड असे म्हणतात. The Royal Anthropological Institute of Great British या संस्थेने भटकेपणाची केलेली व्याख्या अशी - "Nomadic People are those dependent principally on Hunting or Collecting for their Supplies having no permanent abodes" [८१] शिकार करुन उपजीविका करणारे शिकारीसाठी सतत भटकंती करीत असतात. पारधी स्वतंत्रपणे किंवा सामूहिकपणे शिकार करतात. ज्या जंगलातून शिकार मिळत असे त्या जंगलावर ताबा मिळवण्यासाठी व त्या जंगलातून दळणवळणासाठी रेल्वेमार्ग टाकण्याच्या उद्देशाने भारतात हजारो गोऱ्यांच्या फौजा दाखल झाल्या व जंगलतोड करून रेल्वेमार्ग तयार करायला सुरुवात केली. गोऱ्यांचा हा डाव ओळखुन आदिवासींनी लाकडी साहित्याला आगी लावून लोखंडी रुळ वितळवून प्रचंड हानी केली. त्यांना काबूत ठेवण्यासाठी इंग्रजांनी १८७१ साली भारतात जन्मतःच गुन्हेगारीचा कायदा लागु केला. जंगलावर निर्बंध येऊन, वन्य प्राण्यांची शिकार करणे हा गुन्हा ठरविण्यात आला. दुसरीकडे राजेशाही नष्ट झाल्यामुळे पारध्यांचा राजाश्रयही गेला. ब्रिटीश सरकारने १८७१ च्या गुन्हेगारी कायद्यान्वये भारतातील जवळ जवळ १९८ जमातींना गुन्हेगार ठरविले. या १९८ पैकी महाराष्ट्रात १४ गुन्हेगार जमाती होत्या. यापैकीच एक असलेल्या पारधी जमातीच्या लोकांना सेटलमेंटमध्ये डांबण्यात आले. आपल्या अंमलाखालील प्रदेशात शांतता व सुव्यवस्था राखणे हे आपले मुख्य ध्येय आहे असा पूकारा इंग्रज करीत होते. गुन्हेगारी रोखण्यांच्या नावाखाली त्यांच्या हालचालीवर अनेक निर्बंध घातले होते. अशा प्रकारे देशभर जमातींच्या वसाहती स्थापन केल्या गेल्या. त्यांना सेटलमेंट (तीन तारी कुंपन) असे म्हणत. १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले. १९५० ला भारताचे प्रजासत्ताक जाहीर झाले. देश सर्वार्थाने गुलामीतून मुक्त झाला. पण या जमाती मात्र तशाच राहिल्या. त्यांच्या हालअपेष्टा, छळ, उपासमार अशा समस्या राज्याचे मुख्यमंत्री आणि देशाच्या पंतप्रधानापर्यंत पोहोचल्या. तत्कालीन पंतप्रधान पं. नेहरुनी सोलापूरच्या वसाहतीला भेट देण्याचे आश्वासन दिले आणि या जमातीच्या राष्ट्रीय अधिवेशनात १३ ऑगस्ट १९५२ रोजी पं. नेहरुनी सोलापूरला येवून सेटलमेंट तोडून या जमातींना गुन्हेगारी जमाती कायदा नष्ट / रद्द करुन स्वातंत्र्य बहाल केले. सर्व गुन्हेगार जमाती मुक्त झाल्या. त्यांनाच विमुक्त असे म्हटले जाते. आजच्या एक्स - गुन्हेगार / विमुक्त जमाती या पूर्वी गुन्हेगार जमाती होत्या. तर पूर्वीच्या गुन्हेगार जमाती या भटकणाऱ्या जमाती असून त्या भारतातील मुळ आदिवासी जमाती होत्या. राष्ट्राच्या (अस्तित्वात असलेल्या) कायद्याविरोधी समाजविघातक, कायद्याने प्रतिबंध

केलेले कृत्य जो करतो, त्याला गुन्हेगार म्हणतात. गुन्हेगारीचे कृत्य हे समाजविरोधी, कायद्याच्या विरोधी असते. दुदैवाने समाज विरोधी अथवा कायद्याच्या विरोधात एकही कृत्य न करणाऱ्या अनेक जाती जमातींना हा गुन्हेगार जातीचा कलंक कायम सोबत करत आला आहे.

### १.९.१ पारधी जमातीचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश -

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वतंत्र भारतात २६ जानेवारी १९५० रोजी नवीन राज्यघटना अमलात आली. या संविधानात आदिवासी जमातींच्या हितसंरक्षणासाठी व प्रगतीसाठी अनेक महत्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या. आदिवासींचे जीवन अधिक दुर्बल व असहाय्य असल्याने त्यांच्यासाठी काही विशेष तरतुदी केलेल्या आहेत. यात पारधी जमातीचाही समावेश आहे. महाराष्ट्रातील गोंड, भिल्ल, कोलाम, महादेव कोळी, आंध, वारली या जमातींप्रमाणेच पारधी ही महाराष्ट्रातील एक आदिवासी जमात असून भारतीय संविधानानुसार पारधी जमात ही अनुसुचित जमात आहे. घटनेने पारधी जमातीला इतर आदिवासी जमातीप्रमाणे अधिकार दिले आहेत. व पारधी जमातीचा आदिवासी म्हणून समावेश केलेला आहे हे खालील संदर्भावरुन स्पष्ट होते. भारतीय संविधानात अनुसुचित जमातीत सर्वसाधारणपणे डोंगराळ प्रदेशात आणि जंगलात वास्तव्य करणा-या आणि आधूनिक संस्कृती तसेच जीवन पध्दतीपासून अलिप्त आहेत अशा लोकांचा समावेश करण्यात आलाआहे. म्हणून आदिवासी म्हणजे 'अनुसूचित जमात' असे समीकरण रुढ झाले आहे. "केंद्रशासनाच्या सन १९७६ मधील आदेशान्वये महाराष्ट्र राज्यातील ४७ जमाती अनुसूचित जमाती म्हणून जाहीर केल्या आहेत. त्या आदेशातील अ.क्र. ३८ वर पारधी, आडवी चिंचर, फासेपारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, चित्ता पारधी, हरणशिकारी, टाकणकार, टाकिया यांचा समावेश केलेला आहे." [८२] "महाराष्ट्र शासन अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती सुधारणा कायदा १९७६ च्या आदेशातील यादीत अ.क्र. ९ वर राजपारधी, पालपारधी, गांवपारधी यांचा विमुक्त जातीत समावेश केलेला आहे." [८३]

गुन्हेगार जमाती कायदा नष्ट झाला तरीही कायद्यातील दुरुस्ती आणि गुन्हेगार जमातींच्या पुनर्वसनाचे प्रयत्न पारध्यापर्यंत पोहोचले नाहीत. अजुनही पारधी जमात गुन्हेगार म्हणून बदनाम झालेली आहे. पारधी म्हणून त्यांच्यावर अत्याचार झाल्याच्या घटना आजही घडतात. उस्मानाबाद जिल्ह्यातील ढोकी, शेळगाव, चिंचपूर, कळंब, काठेवाडी ही हत्याकांडे पारधी वस्त्यांवरचीच आहेत. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे त्यांना कोणी भीक देत नाही. कामावर ठेवत नाही. ही वस्तुस्थिती

स्वातंत्र्योत्तर काळातही आहे. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे पारधी समाजाला प्रगतीचे, संधीचे दरवाजे बंद राहिले. गुन्हेगारी शिवाय जगता येत नाही असा समज या समाजाचा झाला आहे. याला शासन आणि समाज व्यवस्था जबाबदार आहे. पारधी रहिवाशी असलेला पुरावा,जन्माचा जातीचा दाखला सादर करता येत नाही. पोटासाठी चोऱ्यामाऱ्या करणारे, भटकंती करणारे पारधी, अशी ओळख घेऊन सार्वजनिक ठिकाणी व कारागृहात अनेक कुटूंबाचा अंत झाला. दुःख, दारिद्र्य व उपेक्षांचे ओझे घेऊन पारधी जन्माला येतो व मरतो. भूक, दुय्यम वागणूक, संस्काराचा अभाव या तीन गोष्टीमुळे पारधी गुन्हेगार बनतात. पण सर्वच पारधी गुन्हेगार असतात हा समज समाजशास्त्रीयदृष्ट्या चुकीचाआहे. पारधी संशयाने पकडला जातो. खरे चोर प्रस्थापित समाजातलेही असू शकतात. कष्ट करुन जगणाऱ्याला जगु न देता अनेकवेळा पारध्याला गुन्हा किंवा चोरी करण्यास प्रस्थापितांकडूनच प्रवृत्त केले जाते. चोरीतील ९०% फायदा इतरांना आणि १०% फायदा पारध्यांना अशी स्थिती आहे. सत्तेच्या, पदाच्या दुरुपयोगामुळे या देशात भ्रष्टाचार व गुन्हेगारी कृत्ये झाकली जाण्याची गुन्हेगारी तर त्याहून भयंकर स्वरुपाची आहे. महाराष्ट्रात बऱ्याच भटक्या, विमुक्त जमाती गावठी दारु गाळण्याचा व्यवसाय करतात. पारधी जमातीतील बरेचसे लोकही हा व्यवसाय करतात. पण प्रशासनाने गावठी दारु गाळणे व विक्रीवर बंदीचे आदेश दिले. आता प्रश्न असा आहे की, शिकारीवर बंदी, दारुवर बंदी, जंगलात वास्तव्यावर बंदी, मजुरी करुन पोट भरेल इतके उत्पनही प्राप्त होत नाही अशा विचित्र कोंडीत हा समाज सापडला आहे.

ज्या टोळ्यांचा चरितार्थाचा धंदाच चोऱ्या करणे हा आहे, अशा टोळ्यांतील लोकांची सपूर्ण जमातच जन्माने गुन्हेगार ठरवली हे कितपत योग्य आहे? गुन्हे करुनच त्यांना आपले जीवन व्यतित करावे लागते याला जबाबदार कोण? शासन समाज की ते स्वतः ? गुन्हा करणे हा त्यांच्या चरितार्थाचा धंदा कसा आहे याचा थोडक्यात इतिहास असा की, निसर्गाधिन जीवन जगणाऱ्या मुळ भारतीय आदिवासी जमातीं आणि आर्य यांच्यातील युध्दात आदिवासींचा पराभव झाला. त्यामुळे दऱ्याखोऱ्यातील भटकंतीचे जीवन त्यांच्या वाट्याला आले. त्यांनी उपजिवीकेसाठी शिकार हा व्यवसाय स्विकारला. या व्यवसायाच्या निमित्ताने शिकारीचा छंद असलेल्या राजांशी संपर्क आला. शिकारीचे कौशल्य आणि कसब, अंगभूत शौर्य, लढाऊ बाणा, बेडरपणा या गुणांमुळे राजांवर त्यांचा विशेष प्रभाव पडला आणि अनेक राजांनी या आदिवासी जमातींना सैन्याचा भाग बनवून राजाश्रय दिला. कालांतराने ब्रिटीश राजवटीत राजाच्या सैन्याची जागा ब्रिटीश तैनाती फौजांनी घेतली.

परिणामी, आदिवासीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. आदिवासी जमाती पून्हा मुळ जीवनशैलीकडे वळाल्या. पण इंग्रजांनी जंगले ताब्यात घेतली. त्यामुळे आदिवासींच्या जंगलातील संचारावर बंदी आली. ब्रिटीशांबद्दल आदिवासी जमाती मध्ये असंतोष निर्माण झाला. याचा परिणाम म्हणजे १८५७ च्या उठावात आदिवासींचा सहभाग व योगदान खुप मोठे आहे. या अपयशी लढयानंतर त्यांच्यापुढे पुन्हा चरितार्थाचा प्रश्न निर्माण झाला आणि चोरी करण्याशिवाय पर्यायच उरला नाही. पिढयानूपिढया चोरी करणे हेच उपजिवीकेचे साधन बनले.

**१.९. २ वास्तव्य आणि लोकसंख्या :-**

सन १९८१ व १९९१ च्या जनगणनेनुसार फासे पारधी ही जमात प्रामुख्याने अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, सोलापूर, उस्मानाबाद, यवतमाळ, जळगांव, धुळे, अहमदनगर इ. जिल्ह्यामध्ये वास्तव्य करीत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्यातील पारधी जमातीची जिल्हानिहाय लोकसंख्या खालीलप्रमाणेः-

**तक्ता क्र. १.६**

**१९८१ व १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील पारधी जमातीची जिल्हानिहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | जिल्हा | १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | अमरावती | १३९४३ | १८४२४ |
| २. | अकोला / वाशिम | ११२७१ | १६६६३ |
| ३. | जळगाव | १२७७४ | १४०६४ |
| ४. | बुलढाणा | ९९०८ | १२१४० |
| ५. | सोलापूर | ७३३२ | ८४७० |
| ६. | धुळे / नंदूरबार | ६३६७ | ७८२८ |
| ७. | उस्मानाबाद / लातूर | ५४५१ | ७७४१/४६३ |
| ८. | यवतमाळ | ४४१० | ७००१ |
| ९. | पुणे | २७२० | ४७२३ |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १०. | अहमदनगर | ३६१८ | ४६५८ |
| ११. | मुंबई आणि उपनगरे | २१९७ | ३५४९ |
| १२. | नाशिक | २२२३ | ३३०८ |
| १३. | परभणी / हिंगोली | २३३१ | २४८५ |
| १४. | वर्धा | १७४८ | २२८१ |
| १५. | बीड | २०७९ | १९९२ |
| १६. | नागपूर | १३०० | १५३२ |
| १७. | नांदेड | ८३८ | १११४ |
| १८. | ठाणे | ४९४ | १०२३ |
| १९. | चंद्रपूर / गडचिरोली | ११०९ | ९०२/२०९ |
| २०. | सांगली | ७१५ | ७६२ |
| २१. | औरंगाबाद / जालना | ६९८ | ६९४/६२५ |
| २२. | साताराङ्िं | ५११ | ४७१ |
| २३. | कोल्हापूर | ८५२ | ३६९ |
| २४. | रायगड | १०० | १२८ |
| २५. | भंडारा / गोंदिया | ८४ | १०२ |
| २६. | रत्नागिरी (सिंधुदुर्गसह) | ४२ | ६०/३२ |
| **एकूण महाराष्ट्र** | | **९५११५** | **१२३८१३** |

संदर्भ - आदिवासी संशोधन पत्रिका TRTI पुणे सप्टेंबर, २००१ पृ. -७७

वरील तक्त्यातील आकडेवारीवरुन अमरावती, अकोला, बुलढाणा आणि उस्मानाबाद, सोलापूर या जिल्ह्यात पारधी लोकसंख्या अधिक असून त्यात सतत वाढ होताना निदर्शास येते. अचूक जनगणनेअभावी वाढत्या लोकसंख्येचा व त्या प्रमाणात त्यांच्या विकासाचा विचार होत नाही.

**तक्ता क्र. १.७**

**२००१ च्या जनगणनेनुसार पारधी जमातीची महाराष्ट्रातील जिल्हानिहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | जिल्हा | लोकसंख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | अमरावती | २०५६८ |
| २. | अकोला | १७५७८ |
| ३. | जळगाव | १६८४९ |
| ४. | बुलढाणा | १६४२८ |
| ५. | उस्मानाबाद | ९९५९ |
| ६. | सोलापूर | ९५१९ |
| ७. | धुळे | ९२३६ |
| ८. | यवतमाळ | ८१२९ |
| ९. | पुणे | ७२३० |
| १०. | अहमदनगर | ६२९३ |
| ११. | नाशिक | ३५६६ |
| १२. | बीड | ३४४९ |
| १३. | ठाणे | २९११ |
| १४. | वाशिम | २८४४ |
| १५. | नांदेड | २७१३ |
| १६. | वर्धा | २६१९ |
| १७. | परभणी | २२४१ |
| १८. | नागपूर | २१७९ |
| १९. | मुंबई - उपनगर | २०८३ |
| २०. | मुंबई | १६३० |
| २१. | चंद्रपुर | १६०४ |
| २२. | औरंगाबाद | १६०३ |
| २३. | सातारा | १४४२ |
| २४. | हिंगोली | १४०५ |
| २५. | जालना | १२३९ |
| २६. | सांगली | ११२५ |
| २७. | नंदुरबार | १०४३ |
| २८. | कोल्हापूर | १०१७ |

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| २९. | लातूर | ५४३ |
| ३०. | रायगड | ३६४ |
| ३१. | गडचिरोली | १५३ |
| ३२. | भंडारा | १२१ |
| ३३. | रत्नागिरी | ८९ |
| ३४. | सिंधुदुर्ग | ५६ |
| ३५. | गोंदिया | ४७ |
| | **एकूण महाराष्ट्र** | **१,५९,८७५** |

(स्त्रोत - आदिवासी संशोधन पत्रिका Vol. XXI No. २ सप्टेंबर २००७ पृ.क्र. ८०)

वरील तक्त्यामधील आकडेवारीवरुन हे स्पष्ट होते की, अमरावती, अकोला, जळगांव, बुलढाणा, उस्मानाबाद, सोलापूर या जिल्ह्यात पारधी लोकसंख्या अधिक आहे तर सातारा, रायगड, रत्नागिरी, भंडारा, सिंधुदूर्ग या जिल्ह्यात त्याचे अत्यंत कमी वास्तव्य आहे.

"पारधी लोकांची मुख्य वस्ती खानदेशात असली तरी नाशिक, सोलापूर, विजापूर, बीड या जिल्ह्यातही हे लोक आढळतात. कच्छ (गुजरात) व मध्यप्रदेशातही यांची थोडीशी वस्ती आहे." [८४]
"महाराष्ट्रात फासेपारधी ही उपजात सर्वत्र आढळते. त्यातही मुख्यतः खानदेशातील धूळे व जळगाव जिल्हे, पूणे जिल्ह्यातील इंदापूर, बारामती दौंड तालुके, अहमदनगर जिल्हातील श्रीगोंदा व पारनेर तालुके, सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील लवंग (Lavang), माळीनगर ही गावे व करमाळा तालुका तर मराठवाडा विभागात परभणी जिल्ह्यातील सेलू, गंगापूर, मानवत तसेच बीड जिल्ह्यातील वाळूज, पिंपळ, चिखली, आष्टी व सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुका आणि नाशिक जिल्हा येथे यांचे वास्तव्य आढळते." [८५]

### १.९.३ सद्यस्थिती :-

पारधी समाजाचा गुन्हेगार जमात म्हणून कलंक शासकीय पातळीवर दुर झाला खरा, पण त्यानंतरची त्यांची वाटचाल अत्यंत खडतर, दिशाहीन बनली. आजही पारधी जमात लोकांच्या आणि पोलिसांच्या दृष्टीने गुन्हेगार समजली जाते. स्वातंत्र्योत्तर काळात हॅबिच्यूअल अफेंडर्स ॲक्टचा गैरवापर करुन पारधी वस्त्यावर छापे टाकून बायकामुलांसह या लोकांची लांडगेतोड करण्याचे पोलिसांचे काम आजही चालुच आहे. सेंटलमेंटमधून मूक्त पारधी जमातीने स्वतःच्या गावाच्या हद्दीत वास्तव्य करण्यास गावकऱ्यांचा विरोध असतो, खेड्यांमध्ये शेतकाम मिळणे कठीण असते. शिक्षणाबद्दलची

अनास्था, अंगमेहनतीच्या कामाची सवय नाही, आर्थिक नियोजन व संस्काराचा अभाव, पारंपारिक श्रध्दा, अंधश्रध्दा इ. अनेक घटकही त्यांच्या प्रगती व सुधारणामध्ये अडथळा बनले आहेत. वर्षानुवर्षे गावगाड्याशी कसलाही संबंध नसल्याने व रानावनातील वास्तव्य यामुळे आधुनिक दळणवळणाची साधने तसेच तंत्रज्ञानाच्या माहिती व वापराचा अभाव इ. अनेक कारणांमुळे पारधी समाज आजही मागासलेपण, आर्थिक विपन्नावस्था, शासन व समाजाकडून अवहेलना, पोलिस प्रशासनाकडून संशयी व अपमानास्पद वागणूक इ. सामाजिक शाप सोबतीला घेऊन आपले अस्तित्व टिकवण्याची केविलवाणी धडपड करत आहे.

# <u>संदर्भ सूची</u>


१. India २००० - Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India, Page No. १

२. डॉ. काचोळे दा. धों. - भारतीय समाजरचना, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद (१९९४) पृ क्र. ०२

३. कर्वे इरावती - आमची संस्कृती , देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स पुणे (२०१०) - पृ.क्र. ०१

४. डॉ. काचोळे दा.धों. - भारतीय समाजरचना, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद (जुलै २००७) पृ.क्र. २०६

५. वर्मा आर.सी. - भारतीय जमाती काल, आज आणि उद्या- माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली (२००३) पृ. क्र. १

६. Baines A. - Census of India, १८९१ Report Vol. १ pt १ page no. ३२०

७. Hutton J.H. (१९३८) - Census Report of India New Delhi , १९३१ Vol. १ Page १

८. वर्मा रुपचंद - भारतीय जनजातीयाँ-अतीत के झरोखेसे, नई दिल्ली, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार (१९७७) पृ. क्र. ७-८

९. Ghurye G..S. - The Scheduled Tribes २nd Edition, Popular Book Depot Bombay, (१९५१) P. ९

१०. Elwin V. - The Baiga, London PP. ५१९

११. Ghurye G..S. - The Aborigines So-called and their Future, Popular Book Depot Bombay (१९४३) Page. ३६,

१२. डॉ. देवगांवकर शैलजा, डॉ. देवगावकर श.गो. - आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन, नागपूर प्र. आ. (२००१) पृ.क्र. १

१३. जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश खंड - २, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई (१९७६) पृ. क्र. २९

१४. तत्रैव - पृ. क्र. २४२

१५. डॉ. पिंगळे भिमराव - वनवासी व उपेक्षित जग, अभिनव प्रकाशन बीड. प्र.आ. (१९९०) पृ.क्र. ४७

१६. प्रा.डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती (१९८६) पृ. क्र. ०३

१७. ॲड. मोरे माधव बंडू - आदिवासी बोलू लागला, सुगावा प्रकाशन पुणे , (२००२) पृ. क्र ०१

१८. डॉ. गारे गोविंद - भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. (१९९३) पृ.क्र. ८७

१९. Gillin and Gillin (१९५०) - Cultural Sociology, the Macmillan Co. New York, P. २८२

२०. प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे , (१९८६) पृ.क्र. ०३

२१. प्रा. कोंडेकर अशोक - समाजशास्त्र - महाराष्ट्र लोकसेवा आयोग, राज्यसेवा मुख्य परिक्षा, के. सागर पब्लिकेशन्स पुणे, (२००७)- पृष्ठ क्र. १६९.

२२. तत्रैव - पृ. क्र. १६९

२३. डॉ. देवगांवकर शैलजा , डॉ. देवगावकर शं.गो. - आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन नागपूर, प्र.आ. (२००१), पृ.क्र. ०२

२४. तत्रैव - पृ. क्र. ०२

२५. श्री. लामखडे मा.रा. - आदिवासी ठाकर आणि त्यांची लोकगीते, पद्मगंधा प्रकाशन एरंडवन पुणे (२००३), पृ.क्र. १७

२६. प्रा. ठाकूर सुंदरसिंह - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र , निर्मल प्रकाशन नांदेड, प्रथम आवृत्ती (२००६) पृ.क्र. १५

२७. हुसेन माजिद - मानवी भुगोल (मराठी अनुवाद) , प्रा. ए.व्ही. भागवत, प्रा.संजीव नलावडे, प्रा. इरावती नलावडे, डॉ. प्रवीण सप्तर्षी, प्रा. मुकूंद नातु, आणि श्रीकांत क्षीरसागर - के.सागर पब्लिकेशन्स पुणे, चौथी आवृत्ती (२०११) पृ.क्र. ४३५

२८. घाटे निरंजन - आदिवासींचे अनोखे विश्व, मनोविकास प्रकाशन पुणे , प्रथम आवृत्ती (२००९) पृ.क्र. २५८

२९. दास शिवतोष - भारत की जनजातीयाँ, किताबघर,दिल्ली (१९८३) पृ. क्र. ९५

३०. संगवे विलास - सामाजिक मानवशास्त्र,पॉप्युलर प्रकाशन मुंबई (१९७६) पृ. क्र. ९४

३१. जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश खंड २ , महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई (१९७६) पृ.क्र. २९

३२. गारे गोंविद - भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन औरंगाबाद द्वि.आ. (१९९३) पृ. क्र. १

३३. हाकारा - महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे , त्रैमासिक एप्रिल (२००९) , पृ.क्र. ५

३४. जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश खंड २ , महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई (१९७६) पृ.क्र. २९

३५. तत्रैव - पृ.क्र. २९

३६. डॉ. देवगावकर शैलजा, डॉ. देवगावकर श.गो. - आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन, नागपुर प्रथम आवृत्ती (२००१) पृ.क्र.१

३७. डॉ. मेहता प्रकाशचंद्र - आदिवासी संस्कृती एवं प्रथाएँ, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली ,प्रथम संस्करण(२००९) पृ.क्र.१

३८. डॉ. तेगमपुरे मारोती - आदिवासी विकास आणि वास्तव, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद , प्रथम आवृत्ती२००९ पृ.क्र.१६

३९. डॉ. देवगावकर शैलजा, डॉ. देवगावकर शं.गो. - आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन, नागपुर प्रथम आवृत्ती (२००१) पृ.क्र.१

४०. प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे (१९८६) पृ.क्र. १३

४१. डॉ. साळुंखे संजय भा. - आदिवासी समाजशास्त्र ,कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद , प्र. आ. (२००९) पृ.क्र.२३

४२. Risley H.H. - The People of India, Culcutta. (१९६८)

४३. डॉ. साळुंखे संजय भा. - आदिवासी समाजशास्त्र, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद (२००९) पृ. क्र. २०

४४. तत्रैव - पृ. क्र. २२

४५. प्रा. ठाकूर सुंदरसिंह - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र , निर्मल प्रकाशन नांदेड, प्रथम आवृत्ती (२००६) पृ.क्र. ३५

४६. प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, (१९८६) पृ.क्र. ३५१

४७. तत्रैव - पृ. क्र. ३५२

४८. रावत हरिकृष्ण - समाजशास्त्र विश्वकोश (Encyclopaedia of Sociology) रावत पब्लिकेशन्स, जयपूर एवं नई दिल्ली २००२ पृ. क्र. ६७

४९. प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी , कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, (१९८६) पृ.क्र.३६१

५०. तत्रैव - पृ. क्र. ३६७

५१. तत्रैव - पृ. क्र. ३६९

५२. तत्रैव - पृ. क्र. ३७२

५३. Ghosh S.K. - the Constitutional of India, Law Publishers Allahabad, (१९८५) P. ०९

५४. गायकवाड प्रदीप - भारताचे संविधान (अनूवादित) समता प्रकाशन, लष्करी बाग, नागपूर २००४ पृ. क्र. २११

५५. तत्रैव - पृ. क्र. २१६

५६. तत्रैव (घोष एस. के) - पृ. क्र. ०९

५७. पुर्वोक्त - पृ. क्र. १५

५८. तत्रैव (घोष एस. के) - पृ. क्र. ०९

५९. भारत सरकार - भारत का संविधान, विधी और न्याय मंत्रालय नई दिल्ली, (१९७३) पृ. क्र. १७९

६०. तत्रैव - पृ. क्र. १८०

६१. तत्रैव - पृ. क्र. १७७

६२. तत्रैव - पृ. क्र. १७६

६३. तत्रैव (घोष एस. के) - पृ. क्र. ०९

६४. वाणी प्रकाश - जात प्रमाणपत्र आणि वैधता तपासणी, सामाजिक कृती संस्था जळगांव, प्र. आ. (२०१०) पृ . क्र. २२

६५. महाराष्ट्र शासन निर्णय - निर्णय क्रमांक संकीर्ण - २००८ /यादी/पृ.क्र. ५५३/मावक ५, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मुंबई, दि. २६/०९/२००८

| | | | |
|---|---|---|---|
| ६६. | डॉ. देवगावकर शैलजा,<br>डॉ. देवगावकर श.गो. | - | आदिवासी  विश्व, आनंद प्रकाशन नागपुर, प्र. आ. (२००१) पृ.क्र.४ |
| ६७. | तत्रैव | - | पृ. क्र. ५ |
| ६८. | An Overview of tribal Reaserch Studies | - | Edited by Navinchandra Jain, Dr. Robin D. Tribhuvan - Forword by Prof. R.K. Mutatkar - TRTI, Pune - (1995) Page No.04 |
| ६९. | डॉ. साळुंखे संजय भा. | - | आदिवासी  समाजशास्त्र,कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद , प्रथम आवृत्ती (२००९) पृ.क्र.३० |
| ७०. | डॉ. तेगमपुरे मारोती | - | आदिवासी  विकास आणि वास्तव, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद - प्रथम आवृत्ती (२००९) पृ.क्र.०९ |
| ७१. | डॉ. साळुंखे संजय भा. | - | आदिवासी  समाजशास्त्र , कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद , प्रथम आवृत्ती (२००९) पृ.क्र.३० |
| ७२. | डॉ. गारे गोविंद | - | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे (२००२) पृ. क्र.११ |
| ७३. | तत्रैव | - | पृ. क्र. १२ |
| ७४. | तत्रैव | - | पृ. क्र. ३९ |
| ७५. | आदिवासी विकास विभाग माहिती पूस्तिका सन -२०११-१२ | - | आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन  पृ.क्र. ४३  ते ४८ |
| ७६ | मांडे प्रभाकर | - | गावगाड्याबाहेर , परिमल प्रकाशन औरंगाबाद  प्र. आ. , (१९८३) पृ.क्र. १ |
| ७७. | प्रा. राठोड मोतीराज | - | गुन्हेगारी जमाती कायदा आणि परिणाम, निर्माण संस्था पुणे, संस्करण (जानेवारी २०१२), पृ.क्र.३ |
| ७८. | मांडे प्रभाकर | - | गावगाड्याबाहेर , परिमल प्रकाशन औरंगाबाद , प्र. आ. (१९८३) पृ.क्र. ४ |

७९. वाणी प्रकाश - जात प्रमाणपत्र आणि वैधता तपासणी, सामाजिक कृती संस्था जळगाव, जुन २०१० पृ.क्र.२२ ते २६

८०. मांडे प्रभाकर - गावगाड्याबाहेर,परिमल प्रकाशन औरंगाबाद , प्रथम आवृत्ती, (१९८३) पृ.क्र. २

८१. प्रा. मोतीराज राठोड - गुन्हेगारी जमाती कायदा आणि परिणाम - निर्माण संस्था पुणे, संस्करण जानेवारी २०१२ - पृ.क्र.२

८२. आदिवासी संशोधन पत्रिका - आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, (सप्टेंबर - 2001) पृ.क्र. ७७

८३. डॉ. देवगावकर शैलजा - महाराष्ट्रातातील निवडक जाती जमाती श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, आवृत्ती (२००१) पृ.क्र.१

८४. पाटील पंढरीनाथ - भटके भाई बंद, सुरेश एजन्सी पुणे, प्र. आ. (१९९०) पृ.क्र. ८९

८५. Singh K.S. - People of India - Maharashtra Part - III Vol. XXX Page No. 1655

## प्रकरण २ रे

# संशोधन क्षेत्र व संशोधन पध्दती

**प्रस्तावना :-**

भारतातील महाराष्ट्र राज्य हे एक औद्योगिकदृष्ट्या प्रगत व सर्वांगीण विकासात आघाडीवर असलेले राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राला अनेक थोर साधू,संत, राष्ट्रपुरुषांच्या व सामाजिक सुधारकांच्या दैदिप्यमान कर्तृत्वाने उजळून निघालेला वैभवशाली इतिहास लाभला आहे. या संशोधन कार्यासाठी, सांस्कृतिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात आघाडीवर असलेला महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हा संशोधनाचे कार्यक्षेत्र म्हणून निवडला आहे. अर्थात पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास उस्मानाबाद जिल्हा क्षेत्रापर्यंत मर्यादित आहे. या संशोधन कार्यासाठी निवडलेल्या कार्यक्षेत्राची भौगोलिक व प्राकृतिक रचना माहीत असणे अगत्याचे वाटते. उस्मानाबाद जिल्ह्याची लोकसंख्या, साक्षरतेचे प्रमाण, जिल्ह्यातील महत्वाची ठिकाणे, जिल्ह्याची सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक परिस्थिती, उद्योग व व्यवसाय इ. बाबींची माहिती असणे हे संशोधनासाठी उपयुक्त ठरेल.

**२.१ अभ्यास क्षेत्राची ओळख :-**

**२.१.१ महाराष्ट्र -**

**१. क्षेत्रफळ व भौगोलिक स्थान :-**

भारतातील २८ घटक राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक प्रगत राज्य असून या राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा राजस्थान, मध्यप्रदेशानंतर भारतात तिसरा क्रमांक असुन महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ०३,०७,७१३ चौ.कि.मी. आहे.

"महाराष्ट्राचा अक्षवृत्तीय विस्तार १५° ४४` उत्तर अक्षवृत्त ते २२° ०६` उत्तर अक्षवृत्त असुन रेखावृत्तीय विस्तार ७२° ३६` पुर्व रेखावृत्त ते ८०° ५४` पूर्व रेखावृत्त असा आहे. साधारणत: त्रिकोणाकृती आकार असलेल्या महाराष्ट्राची पूर्व-पश्चिम लांबी सुमारे ८०० किमी असून दक्षिणोत्तर रुंदी सुमारे ७२० कि. मी. आहे." [१]

**२. सीमा :-**

"महाराष्ट्राला वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्यप्रदेश, पूर्वेस छत्तीसगढ, आग्नेयेस आंध्रप्रदेश व दक्षिणेस कर्नाटक आणि गोवा राज्यांच्या सीमा लाभल्या आहेत. " [२]

**३. महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ती :-**

महाराष्ट्र या शब्दाची व्युत्पत्ती आणि त्याचा अर्थ याबाबत विद्वानांमध्ये एकमत नाही. इतिहासाचे अभ्यासक चिं. वि. वैद्य यांच्या मते " इ. स. पू. ६०० च्या सुमारास आर्य लोक भारतात आल्यानंतर येथे गोपराष्ट्र, पांडूराष्ट्र व मल्लराष्ट्र इ. वसाहती स्थापन झाल्या. यातील 'मल्लराष्ट्र' म्हणजे महाराष्ट्र होय." [३] तेंव्हा मल्लराष्ट्र व महाराष्ट्र हे एकाच अर्थाचे दोन शब्द प्रचारात होते. म.म.पां.वा. काणे यांच्या मते " 'महान राष्ट्र' यावरुन महाराष्ट्र या शब्दाची व्युत्पत्ती झाली आहे." [४] महाराष्ट्र हे नाव कोणत्याही वंशावरुन किंवा जातीवरुन पडलेले नसुन ते देशाच्या विस्तारावरुन पडले असावे. "साधारणपणे इ.स. पूर्व ३०० च्या सुमारास महाराष्ट्र हे नाव पडले असावे. तसेच प्राचीन काळी देशाच्या विस्तारावरुन त्या प्रदेशाला तशी नावे पडल्याची उदाहरणेही मिळतात. त्यामुळे ही व्युत्पत्ती अधिक ग्राह्य मानली जाते." [५]

**४. महाराष्ट्राचा संक्षिप्त इतिहास :-**

रामायण-महाभारत काळातील महाराष्ट्राचे चित्र स्पष्टपणे दिसत नाही. रामाच्या काळापूर्वी महाराष्ट्र पूर्व व पश्चिम भाग वसले गेले होते. इ. स. पूर्व दूसऱ्या शतकापासून ६ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रात मोठया प्रमाणात स्थित्यंतरे झाली. मौर्य, सातवाहन, राष्ट्रकूट, वाकाटक, चालुक्य, शिलाहार, मोगल इ. अनेक राजघराण्यांनी महाराष्ट्रात राज्य केले. "आर्यन आणि द्रविड या दोन्ही संस्कृती मिळून महाराष्ट्राची संस्कृती तयार झाली. " [६] "महाराष्ट्राच्या दृष्टीने सातवाहन काळ हा सुवर्ण युगाचा काळ होता."[७]

चालुक्य काळात स्थापत्य कलेत प्रगती झाली तर यादवांच्या काळात महाराष्ट्राची भरभराट झाली. यादव घराणे हे दख्खनचे शेवटचे प्राचीन हिंदू घराणे होते. औरंगाबाद जवळील देवगिरी ही यादवांच्या साम्राज्यांची राजधानी होती. यादवांचे हे वैभवशाली साम्राज्य अलाउद्दीन खिलजीने संपुष्टात आणले. त्यानंतर महाराष्ट्रात गोवळकोंड्याची निजामशाही, विजापुरची आदिलशाही व मोगल सम्राटांची सत्ता होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी यवनांच्या ताब्यातील महाराष्ट्राला मुक्त करुन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यामुळे छत्रपती शिवरायांना महाराष्ट्राचे मानबिंदू म्हटले जाते. शिवरायांनी महाराष्ट्राला स्वाभिमानी व सदाचारी जीवन जगण्याची शिकवण दिली.

कालांतराने ब्रिटीशांनी संपूर्ण भारतात आपले राज्य प्रस्थापित केले. व सुमारे १५० वर्षाच्या ब्रिटीश राजवटीतुन १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला.

### २.१.२ मराठवाडा :-

महाराष्ट्राच्या चार प्रादेशिक विभागांपैकी मराठवाडा हा एक विभाग असून मराठवाड्याची भूमी वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठवाड्याने प्राचीन काळापासून आजपर्यंत अनेक चढ-उतार पाहिले आहेत. प्राचीन व मध्ययुगीन काळात भारताच्या व महाराष्ट्राच्या जडण-घडणीत मराठवाड्याचे योगदान मोलाचे आहे. मराठवाड्याच्या भौगोलिक परिस्थितीचा मराठवाड्याच्या इतिहासावर दुरगामी परिणाम घडून आला आहे. "मराठवाडा ही अनेक संतांची आणि कवींची जन्मभूमी व कर्मभूमी आहे. मराठी भाषा आणि सांस्कृतिक परंपरेच्या विकासाला संतांनी मोठा हातभार लावला असुन आद्यकवी मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, गोरा कुंभार, हंसराज, संत दासगणू, समर्थ रामदास यांसारखे अनेक संत या भूमीने देशाला दिले. " [८]

मराठवाड्यास प्राचीन काळापासून सांस्कृतिक, वैभवशाली परंपरा लाभली आहे. "यादवांच्या काळात 'देवगिरी' व सातवाहनांच्या काळात 'पैठण' ही राजधानीची शहरे प्रसिध्दीस आली होती. या प्रदेशातील राजांनी देशपातळीवरील राजधानीच्या शहराची स्थापना केली." [९] आज मराठवाडा मागासलेला असला तरी सातवाहन काळात या विभागात समृध्द बाजारपेठा होत्या. "सातवाहन काळात आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत व्यापारात मोठया प्रमाणात वाढ झाली. महाराष्ट्राची गलबते रोम, अथेन्सला पोहचू लागली. भारतीय उत्पादनाला पाश्चात्य बाजारपेठा उपलब्ध झाल्या." [१०] मराठवाड्यात अनेक राजघराण्यांची सत्ता होती. त्यात सातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, यादव, मोगल या सत्ता प्रमुख होत्या. या सर्व सत्तांनी सांस्कृतिक क्षेत्रात केलेले योगदान वैभवशाली समजले जाते. देशाच्या सांस्कृतिक इतिहासात मराठवाड्याने आपला वेगळा ठसा उमटवला आहे. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले पण त्यावेळी मराठवाडा हा तत्कालीन हैद्राबादच्या निजाम राजवटीचा भाग होता. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा मुक्ती संग्राम निर्णायक स्थितीला असताना तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी सैन्य पाठवून मराठवाड्याला दि.१७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाच्या तावडीतून मुक्त केले. अशा प्रकारे खऱ्या अर्थाने मराठवाडा स्वतंत्र झाला. "१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. याच दिवशी मराठवाडा महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झाला. तो आजही महाराष्ट्रातच कायम आहे." [११] २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संघराज्याची स्थापना झाली आणि भारतीय संविधानानुसार देशाचा कारभार सुरु झाला.

भारतीय संविधानात समता आणि न्यायाचे तत्व मान्य करुन जातीव्यवस्थेच्या आधारावर निर्माण झालेली विषमता दुर करण्याच्या आणि अनुसुचित जाती आणि जमातींचा विकास करण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात आदिवासींना भारतीय नागरी हक्क देऊन सन्मानित केले. "घटनेतील भाग २ कलम ५ प्रमाणे या संविधानाच्या प्रारंभी भारताच्या राज्य क्षेत्रात ज्या व्यक्तीचा अधिकार आहे, आणि (क) जी भारताच्या राज्यक्षेत्रात जन्मली होती किंवा (ग) जी प्रारंभीच्या व लगतपूर्वी किमान ५ वर्षे इतका काळ भारताच्या राज्यक्षेत्रात सामान्यतः निवासी आहे, अशी व्यक्ती भारताचा नागरिक असेल." [१२]

आदिवासी जमाती या भारताच्या मुळ रहिवासी असल्याने त्यांचे नागरिकत्व अबाधित राहण्यासाठी घटनेत विविध कलमांतर्गत तरतूद केल्याचा उल्लेख आहे.

"कलम १० या भागात पुर्वगामी तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीखाली जी भारताची नागरीक आहे किंवा असल्याचे मानले जाते. अशा प्रकारे व्यक्तीचे नागरीकत्व संसद जो कोणताही कायदा करील त्याच्या तरतुदीच्या अधिनतेने चालु राहील." [१३] तसेच भारतीय नागरीक म्हणून सार्वजनिक सेवायोजनाच्या बाबतीत समान संधी देऊन ज्या-त्या प्रवर्गासाठी राखीव जागा ठेवण्याची तरतुदी करण्यात आल्या.

**२.१.३ उस्मानाबाद जिल्हा :-**

जिल्ह्याच्या या शहराचे पूर्वीचे नाव धारापुर किंवा धाराशिव असे होते. येथे धारासुरमर्दिनी देवीचे मंदीर असुन बहुधा या देवीच्या नावावरुन धाराशिव हे नाव पडले असावे. जेव्हा उस्मानाबाद जिल्हा हैद्राबादच्या निजाम राजवटीखाली होता तेव्हा जिल्ह्याचे ठिकाण नळदुर्ग हे शहर होते. हैद्राबाद राज्यात नळदुर्ग जिल्हा हा सर्वात मोठा जिल्हा होता. १९०४ साली नळदुर्गहून धाराशिवला जिल्हा केंद्र हलविण्यात आले. शेवटचा निजाम मीर उस्मान अली याच्या राज्यारोहणाप्रसंगी १९१० साली धाराशिवचे उस्मानाबाद असे नामकरण झाले." [१४] ज्येष्ठ नागरिक अजूनही धाराशिव असाच नामोल्लेख करतात. इ.स. १८६० पूर्वी नळदुर्ग जिल्ह्यात ७ तालुके होते. त्यापैकी कळंब, परंडा व धाराशिव या तीन तालुक्याचे महसूली उत्पन्न हैद्राबादचा निजाम स्वतःच्या वैयक्तिक खर्चासाठी वापरत असे. त्याला सर्फेखास असे म्हटले जात असे. निजामांनी ब्रिटीश सरकारकडून कर्ज म्हणून प्रचंड रक्कम घेतली होती. त्याची परतफेड म्हणून नळदुर्ग व अन्य तीन जिल्हे इंग्रजांना तात्पुरत्या स्वरुपात

बहाल केले होते. नंतर निजामाने वऱ्हाड प्रांत इंग्रजांना देऊन नळदुर्ग व अन्य जिल्हे परत मिळविले. १९४८ साली भारतीय संघराज्यात हैद्राबाद संस्थानाच्या विलीनीकरणानंतर १९५० साली झालेल्या तालुक्यांच्या पुनर्रचनेत उस्मानाबाद जिल्ह्यात औसा, उमरगा व भूम हे नवीन तालुके निर्माण झाले.

सोलापूर जिल्ह्यातील ११ गावे या जिल्ह्यात व या जिल्ह्यातील ५१ गावे सोलापुर जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आली. १९५६ च्या राज्य पूनर्रचनेत मराठवाडा मुंबई राज्यात आला. तेव्हा जिल्ह्यात आठ तालुके होते. त्यावेळी बिदर जिल्ह्यातील अहमदपूर, निलंगा, उदगीर हे तालुके या जिल्ह्यात समाविष्ट झाले. अशा प्रकारे ११ तालुक्यांचा हा जिल्हा झाला.

१६ ऑगस्ट १९८२ मध्ये या जिल्ह्याचे पुन्हा विभाजन होवून लातुर हा नवा जिल्हा निर्माण झाला. आता "उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, कळंब, भूम, परंडा व नवीन झालेले वाशी व लोहारा अशा एकुण ८ तालुक्यांचा समावेश आहे." [१५]

**विस्तार :-**

हा जिल्हा मराठवाड्याच्या अतीपूर्वेकडील असून त्याचा विस्तार १७°.३५' ते १८°.४०' उत्तर अक्षांश आणि ७५°. १६' अंश ते ७६.४' अंश पूर्वरेखांश असा आहे. जिल्ह्याच्या दक्षिण - पश्चिमेस सोलापूर, उत्तर पश्चिमेस अहमदनगर, उत्तरेस बीड, ईशान्य व पूर्व दिशेला लातुर व दक्षिणेला कर्नाटक राज्यातील बीदर व गुलबर्गा हे जिल्हे आहेत." [१६]

"जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७५१२.४ चौ. कि. मी. असून आकारमान लक्षात घेता महाराष्ट्रात त्याचा २४ वा क्रमांक लागतो. जिल्ह्याच्या एकुण क्षेत्रापैकी २४१.४ चौ. कि.मी. क्षेत्र म्हणजेच ३.२१% नागरी क्षेत्र असून उर्वरित ७२७१.० चौ.कि.मी. क्षेत्र म्हणजेच ९६.७९% ग्रामीण क्षेत्र आहे." [१७] २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकुण ७२९ गावे आहेत. ३१/३/२०१० अखेर एकुण ६२२ ग्रामपंचायती होत्या.

**अ) जिल्ह्यातील महत्त्वाची ठिकाणे :-**

**१. उस्मानाबाद :-**

बालाघाट डोंगररांगाच्या कुशीत वसलेले हे शहर असून शहराच्या वैभवात भर टाकणारी अनेक महत्त्वाची ठिकाणे परिसरात आहेत. "शहराच्या परिसरातील डोंगरश्रेणीत असलेली प्राचीन व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची जैन लेणी या धाराशिव लेणी म्हणून प्रसिध्द आहेत. त्यामध्ये पार्श्वनाथाची भव्य मुर्ती आहे. तिच्या मागे सात तोंडे असलेला फणा काढलेला नागराज आहे. " [१८]

उस्मानाबाद येथील हजरत खाजा शमशोद्दीन गाझी दर्गा हे एक वैशिष्ट्यपूर्ण धार्मिक स्थान असून या दर्ग्याला हिंदू व मुस्लिम सारख्याच भक्तीभावाने जातात.

या दर्ग्याच्या पाठीमागेच ग्रामदैवता श्री. धाराशूर मर्दिनीचे मोठे मंदिर आहे. नवरात्रात येथे जत्रा भरते व जत्रेत मोठ्या प्रमाणात लोक सहभागी होतात.

**२. तेरः-**

महाराष्ट्रातील प्राचीन काळातील "दक्षिणेतील एक प्रमुख औद्योगिक केंद्र आणि व्यापारी पेठ म्हणून प्रसिध्द असलेले नगर किंवा तगरपूर म्हणजेच आजचे तेर होय." [१९] आज येथे बौध्द काळातील मोठा स्तुप आहे. संत गोरोबा काका यांचे हे जन्मगाव असून "उस्मानाबादपासून २३ कि. मी. अंतरावर असणाऱ्या तेर गावच्या एका रामलिंग रामतुरे या साध्या निरक्षर माणसाने केवळ चौकस बुध्दी व ऐतिहासिक गोष्टी जमवण्याचा छंद या जोरावर वस्तु जमविल्या आणि लाख मोलाचा हा ऐतिहासीक वस्तुंचा ठेवा उदार अंतःकरणाने २२ जानेवारी १९७१ रोजी शासनास सुपूर्द केला. तो ठेवा म्हणजे तेर येथील प्रख्यात कै. रामलिंगप्पा लामतुरे वस्तुसंग्रहालय होय." [२०]

**३. नळदुर्गः-**

नळदूर्ग येथे भुईकोट किल्ला असून तो बोरी नदीच्या काठावर आहे. हा किल्ला एकशे तीन एकर जमिनीवर बांधलेला असून त्याला एकशे चौदा बुरुज आहेत. "नळदूर्गचा संबंध पुरातन काळातील 'नल-दमयंती' शी जोडला जातो." [२१] नळदूर्ग किल्ला अजिंक्य समजला जातो कारण त्याच्या विशिष्ट रचनेमुळे शत्रुला तो जिंकणे कठीण आहे. पाणी महालाने किल्ल्याच्या नैसर्गिक सौंदर्यात भर टाकली आहे. पाणी महालावर दोन धबधबे असुन ते 'नर' व 'मादी' या नावाने ओळखले जातात. किल्ल्यात भव्य असा 'उपल्या बुरुज' असून या बुरुजावर तोफ व महाल आहे. पाणी महालात 'रंगमहाल' व 'गणपती महाल' असे दोन महाल आहेत.

**४. परंडाः-**

"परंड्याची प्राचीन नोंद 'पलियंडा' या नावाने मिळते." [२२] येथे प्राचीन किल्ला असून हंसराज स्वामीचा मठ्ही येथे आहे. तसेच येथे ख्वाजा बद्रोद्दीन शहीन चिश्ती या सूफी संताचा दर्गा आहे. परंड्याचा किल्ला स्थापत्य कलेचा एक उत्कृष्ट नमूना असून किल्ल्याची रचना संरक्षणदृष्ट्या अतिशय बळकट आहे.

**५. मुरुमः-**

"उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील मुरुम या गावचे प्राचीन नाव 'मोरंबपूर' आहे. मुरम्ब आणि मोरब अशी रुपांतरेही काही शिलालेखात आढळतात. येथील चालुक्यकालीन शिलालेखात या स्थलाचा 'राजधानी' म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. आज इथे प्राचीन मंदिरे नसली तरी त्यांचे अवशेष मात्र सर्वत्र दिसतात. 'मरु' हा कानडी शब्द असून त्याचा अर्थ वेढलेला असा होतो. या स्थलनामातील दुसरा शब्द 'अंबा' वृक्षनाम आहे. आम्रवृक्षांनी वेढलेले अशी स्थलनामाची व्युत्पत्ती असावी." [२३]

**६. तुळजापूर (महापूर):-**

तालुक्याचे मुख्य ठिकाण आणि महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पीठ असलेल्या "तुळजापूरचे चौदाव्या शतकातील शिलालेखात महापूर असे नाव देण्यात आले होते. जुन्या कागदपत्रात याचे नाव चिंचपूर असे आहे. भवानी शक्तीपीठाची स्थापना झाल्यानंतर ते तुळजापूर बनले. तुळजाभवानी मंदिराचा अनेकवेळा जीर्णोध्दार झालेला असून मुळचे मंदिर मात्र यादवकालीन असावे असे वाटते." [२४]

**७. अणदूरः-**

"आनन्दुरु / आनंदपूर" या संस्कृत नामाचे हे कानडी रुप असून अणदूरचे ते जुने नाव होय." कल्याणच्या चालुक्य राजवटीत हे प्रशासकीय मुख्यालय व व्यापारपेठ म्हणुनही हे गाव प्रसिध्द होते." [२५] येथील खंडोबा मंदीर प्रसिध्द आहे.

**ब) उस्मानाबाद जिल्ह्याची प्राकृतिक रचना :-**

**१. नद्याः-**

मांजरा, सीना, तेरणा, बोरी, बेनितूरा, याशिवाय उल्का, चांदणी, हरणी, खैरी, बाणगंगा, भोगावती व तावरजा या नद्या उस्मानाबाद जिल्ह्यात आहेत.

तेरणा नदी जिल्ह्याच्या पश्चिमेकडून पूर्वेकडे उस्मानाबाद व उमरगा तालूक्यातुन वाहते व पूर्वेकडील सिमेवर मांजरा नदीस मिळते. "वंजरा हे मांजरा नदीचे हे प्राचीन नाव असून ती बीडच्या पश्चिमेस बालाघाट डोंगरामध्ये उगम पावून बीड, उस्मानाबाद, कर्नाटक आणि आंधप्रदेश या मार्गे शेवटी ती आंध्र-महाराष्ट्र सीमेवर गोदावरीस मिळते. ही मराठवाड्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी नदी आहे." [२६] बालाघाटात उगम पावणारी आणि बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यांच्या पश्चिम सरहद्दीवरुन

वाहणारी सीना नदी प्राचीन काळी सिंहा या नावाने ओळखली जात असे. "बोरी ही भीमा नदीची उपनदी असून ती तुळजापूर तालुक्यातून वाहते. पूढे सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करुन सीना नदीस मिळते." [२७] देवबेट टेकडीवर उगम पावलेली बेनितूरा ही नदी उमरगा तालुक्यातून वाहते. भोगावती नदीच्या काठावर उस्मानाबाद हे शहर वसलेले असून शहराच्या अगदी मध्यभागातून भोगावती नदी वाहते.

उस्मानाबाद जिल्ह्याचा बराच भूभाग हा बालाघाट पठाराचा आहे. यामध्ये उस्मानाबाद भूम, कळंब व तूळजापूर तालूक्याचा काही भाग व उमरगा तालुक्याचा समावेश होतो.

उस्मानाबादच्या पश्चिमेस 'हातलादेवीचा' डोंगर म्हणून ओळखली जाणारी एक मोठी टेकडी आहे. बालाघाट, येरमाळा, उस्मानाबाद, येडशी, तुळजापूर व नळदूर्ग येथेही बालाघाटचे डोंगर आहेत.

**२. हवामान व पर्जन्यमानः-**

जिल्ह्यातील हवामान प्रामुख्याने कोरडे असून पावसाळा साधारणतः जुनच्या मध्यापासून सुरु होतो व सप्टेंबरच्या अखेर संपतो. सप्टेंबर अखेर ते नोव्हेंबर मध्यापर्यंत हवामान दमट असते. त्यानंतर जानेवारी अखेरपर्यंत हिवाळा असतो. फेब्रुवारी ते मार्च दरम्यान हवामान कोरडे असते. एप्रिल ते जुन पर्यंत उन्हाळा असतो. उन्हाळयात सामान्यतः वादळी वारे वाहतात.

दक्षिण पठारावरील इतर जिल्ह्याप्रमाणे उस्मानाबाद जिल्ह्यात देखील दक्षिण पूर्व मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. २००९ मधील जिल्ह्याचे सरासरी पर्जन्य ७३९.९३ मि. मि. होते." [२८]

**३. जमीनः-**

जिल्ह्यातील जमीनीची दोन विभागात विभागणी करता येते.

१. काळी व सुपीक मातीचा थर असलेली जमीन

२. हलक्या प्रतीची जमीन

जमीनीच्या या वैशिष्ट्यामुळे या भागात खरीप व रब्बी या दोन्ही हंगामातील पीके घेतली जातात. कळंब व उस्मानाबाद या तहसीलचा समावेश या विभागात होतो. या तहसीलच्या पूर्व भागात खरीप व पश्चिमेकडील भागात रब्बी पीके घेतली जातात. दुसऱ्या विभागात प्रामुख्याने सुपीक जमिनीचा समावेश आहे. येथे रब्बी पीके घेतली जातात." [२९]

**४. पीके:-**

शेती हाच उस्मानाबाद जिल्ह्याचा प्रमुख व्यवसाय आहे. जिल्ह्यात खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामात विविध प्रकारच्या पिकांचे उत्पादन घेतले जाते. "या दोन्ही हंगामात सर्वात जास्त एकदल धान्याचे क्षेत्र आहे. त्यानंतर द्विदल व त्याखालोखाल तेल वर्गीय धान्ये असा क्षेत्रानुसार पिकांचा क्रम लागतो." [३०]

"खरीपातील तूर हे महत्त्वाचे कडधान्य आहे. रब्बी पिकांमध्ये ज्वारी, गहू, हरभरा, करडई ही महत्त्वाची पीके असून रब्बी ज्वारीचे २००२-२००३ मधील जिल्ह्यातील क्षेत्र २५१३९८ हेक्टर म्हणजेच निव्वळ कसलेल्या क्षेत्राच्या ३९.२७% होते. तेलबियांचे पिकामध्ये मुख्यतः सूर्यफूल, करडई, भुईमूग, कारळी व जवस ही पीके घेतली जातात. व्यापारी पिकांमध्ये ऊस व कापूस ही महत्त्वाची पीके आहेत." [३१]

**५. पीक उत्पादन:-**

"सर्वसाधारणपणे जिल्ह्यातील जमिनीचा पोत चांगला असल्यामुळे पाऊस पुरेपूर झाल्यास पीके चांगली येऊ शकतात. कोरडवाहू पिकाचे प्रमाण जास्त असल्यामुळे पीके व त्यांचे उत्पादन पावसाच्या प्रमाणावर अवलंबून असते.

जिल्ह्यात फळामध्ये आंबे, द्राक्षे, पेरु ही प्रमुख फळे आहेत. २००२-०३ साली फळबागा व भाजीपाला या दोन्ही पिकांचे प्रमाण निव्वळ कसलेल्या क्षेत्राच्या १.३७% होते." [३२]

**६. शेतजमिनीचा वापर:-**

"जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ७४८४७८ हेक्टर आहे. यापैकी जंगलातील क्षेत्र ४०६३ हेक्टर तर पडिक जमीन क्षेत्र ६२२४ हेक्टर आहे. लागवडीलायक पण वापरात नसलेली जमीन ४०८१२ हेक्टर तर झाडेझुडपे व फळबाग या खालील जमीन १६११ हेक्टर होती." [३३]

**७. वनक्षेत्र:-**

"वनविभागाने पुरविलेल्या माहितीनुसार २००९-२०१० मध्ये जिल्ह्यातील जंगलव्याप्त क्षेत्र ५०.७४ चौ. कि. मी. आहे. जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या तुलनेत हे क्षेत्र ०.६७% म्हणजे नगण्य आहे. पर्जन्यमान व पर्यावरणाचा समतोल आदिबाबत सुधारणा होण्यासाठी जंगलव्याप्त क्षेत्रात वाढ होणे अत्यावश्यक आहे." [३४]

## ८. उद्योग व्यवसाय:-

औद्योगिक विकासाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास उस्मानाबाद जिल्ह्याकडे अविकसित जिल्हा म्हणून पाहिले जाते.

शेती व्यवसायाबरोबरच जिल्ह्यात दुग्धव्यवसाय व पशुसंवर्धन हे महत्त्वाचे व्यवसाय केले जातात. जिल्ह्यात अनेक छोटे-मोठे उद्योग तोट्यात असल्यामूळे बंद पडत आहेत. सहकारी साखर कारखाने, तेलगिरण्या, हातमाग असे मोठे व छोटे उद्योग जिल्ह्यामध्ये आहेत. जिल्ह्यातील कृषी उत्पादनाच्या प्रमूख बाजारपेठा उस्मानाबाद, कळंब, उमरगा, तुळजापूर, येथे आहेत तर उस्मानाबाद, भूम, कळंब येथे औद्योगिक वसाहती आहेत.

"ज्वारी, शेंगदाणे, तेल, भुईमुग, उडीद, कापूस आदि माल जिल्ह्यातून बाहेर पाठवला जातो; आणि मीठ, लसूण, कापड, यंत्रे, कागद, रॉकेल इ. माल बाहेरुन जिल्ह्यात आणला जातो." [३५]

## क) उस्मानाबाद जिल्ह्याची लोकसंख्या :-

**तक्ता क्र. २.१**

**उस्मानाबाद जिल्ह्याची लोकसंख्याविषयक माहिती दर्शविणारा तक्ता**

| लोकसंख्या | परिमाण | जिल्हा | महाराष्ट्र |
|---|---|---|---|
| ग्रामीण | हजारात | १,२५३ | ५५,७७८ |
| नागरी | हजारात | २३३ | ४१,१०१ |
| एकूण | हजारात | १,४८६ | ९६,८७९ |
| पुरुष | हजारात | ७६९ | ५०,४०१ |
| स्त्रिया | हजारात | ७१७ | ४६,४७८ |
| स्त्रिया प्रति हजार पुरुष | संख्या | ९३२ | ९२२ |
| अनुसूचित जाती लोकसंख्या | हजार | २४६ | ९,८८२ |
| एकुण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | १६.५३ | १०.२ |
| अनुसूचित जमाती लोकसंख्या | हजार | २८ | ८,५७७ |
| एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | १.८७ | ८.८५ |
| घनता (लोकसंख्या प्रति चौ. कि. मी.) | संख्या | १९८ | ३१५ |

[स्त्रोत - जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१० - जिल्हा - उस्मानाबाद.]

वरील तक्त्यात जिल्ह्यातील लोकसंख्येची सविस्तर माहिती दिली असून ती २००१ च्या जनगणनेनुसार देण्यात आली असून या तक्त्यावरुन जिल्ह्यात ग्रामीण लोकसंख्या जास्त असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. २.२**

**उस्मानाबाद जिल्ह्याची तालुकानिहाय आदिवासी लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | तालूका | एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | उस्मानाबाद | ३५९२३४ | १०३०५ | २.८७ |
| २. | कळंब | १८८२३७ | ३८५४ | २.०५ |
| ३. | उमरगा | २४१३३९ | ४९७६ | २.०६ |
| ४. | तुळजापूर | २५०१४९ | २६८८ | १.०७ |
| ५. | भूम | ११६८९४ | १३११ | १.१२ |
| ६. | परंडा | १२५१३६ | १०११ | ०.८१ |
| ७. | लोहारा | ११०१६३ | १२८६ | १.१७ |
| ८. | वाशी | ९५४३४ | २४२६ | २.५४ |
| | **एकूण** | **१४८६५८६** | **२७८५७** | **१.८७** |

[स्त्रोत :- आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, औरंगाबाद]

उपरोक्त तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की, उस्मानाबाद व उमरगा तालुक्यात आदिवासींचे प्रमाण सर्वात जास्त आहे. त्याखालोखाल कळंब, तुळजापूर, वाशी येथे आहे तर भूम, परंडा व लोहारा तालुक्यात हे प्रमाण कमी आहे.

जिल्ह्याचे एकूण लोकसंख्येशी तालुकानिहाय लोकसंख्येच्या विभागणीची टक्केवारी "उस्मानाबाद २४.१७%, कळंब १२.६६%, उमरगा १६.२३%, तुळजापूर १६.८३%, परंडा ८.४१%, भूम ७.८६%, वाशी ६.४२% व लोहारा ७.४१% अशी आहे." [३६]

**तक्ता क्र. २.३**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाची तालुकानिहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | तालूका | एकूण लोकसंख्या | पारधी लोकसंख्या | पारधी लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | उस्मानाबाद | ३५९२३४ | ३६०० | १.०० |
| २. | कळंब | १८८२३७ | ३८५५ | २.०४ |
| ३. | उमरगा | २४१३३९ | १५०० | ०.६२ |
| ४. | तुळजापूर | २५०१४९ | १५०० | ०.५९ |
| ५. | भूम | ११६८९४ | १२०० | १.०२ |
| ६. | परंडा | १२५१३६ | १००० | ०.७९ |
| ७. | लोहारा | ११०१६३ | ५०० | ०.४५ |
| ८. | वाशी | ९५४३४ | २००० | २.०९ |
| | **एकूण** | **१४८६५८६** | **१५१५५** | **१.०२** |

(स्त्रोत :- आदिवासी विकास निरीक्षक, उस्मानाबाद कार्यालय, सर्वेक्षण अहवाल २००१ पृ.क्र. १२ )

वरील तक्त्यात जिल्ह्यातील तालुकानिहाय पारधी जमातीची लोकसंख्या दर्शविली आहे. जिल्ह्यात पारधी लोकसंख्येचे प्रमाण जास्त असून कळंब, वाशी, उस्मानाबाद, तुळजापूर, भूम आणि परंडा या तालुक्यात यांचे वास्तव्य आढळते. उमरगा, लोहारा तालुक्यामध्ये अल्प वास्तव्य आहे. मात्र उपरोक्त पारधी लोकसंख्येची आकडेवारी विश्वासार्ह आढळली नाही.

**तक्ता क्र. २.४**

**उस्मानाबाद जिल्ह्याची वयोगटानुसार लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | वयोगट | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ० ते १४ | १७.४९% |
| २ | १५ ते १९ | ०८.६८% |
| ३ | २० ते २४ | ०८.१६% |
| ४ | २५ ते ३९ | ०७.३९% |
| ५ | ४० ते ४९ | ०९.८१% |
| ६ | ५० ते ५९ | ०६.८४% |

[स्त्रोत:- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०१० जिल्हा - उस्मानाबाद पृ. क्र. ०५.]

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी वरीलप्रमाणे आहे. वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते की, कार्यक्षम अशा १५ ते ४९ वर्ष वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण सुमारे ३४.०४ % आहे.

**तक्ता क्र. २.५**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय सर्वसाधारण आणि आदिवासी साक्षरता प्रमाण दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | तालुका | सर्वसाधारण साक्षरता प्रमाण | आदिवासी साक्षरता प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | ७२.४५ | ४८.७३ |
| २ | कळंब | ७०.८१ | ३८.७९ |
| ३ | उमरगा | ६८.१९ | ५४.१४ |
| ४ | तुळजापूर | ६७.८२ | ५१.४९ |
| ५ | भूम | ६६.४६ | ४२.०३ |
| ६ | परंडा | ६४.२७ | ४४.०२ |
| ७ | लोहारा | ६८.२० | ५५.६० |
| ८ | वाशी | ६८.१० | ३६.६९ |
| | **एकूण** | ६८.२८% | ४६.४३% |

(स्त्रोत- Census of India 2001)

टीप :- जनगणना २०११ ची आकडेवारी उपलब्ध नाही.

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासी लोकसंख्येचे साक्षरतेचे प्रमाण कमी असून जिल्ह्याची एकूण साक्षरता ६८.२८ टक्के एवढी आहे तर आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ४६.४३ टक्के इतके आहे. आदिवासी साक्षरतेचे कमी असलेले प्रमाण चिंताजनक आहे.

राज्यात उस्मानाबाद जिल्ह्याचा साक्षरतेमध्ये चोवीसावा क्रमांक लागतो. यावरुन जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण व आदिवासीचा शैक्षणिक मागासलेपणा लक्षात येतो. जे वर्ग सामाजिक किंवा आर्थिक कारणांमुळे शैक्षणिक प्रक्रियेतून वंचित आहेत ते आजही ज्ञानशक्तीपासून, आर्थिक व राजकीय भागिदारीपासून वंचित राहिल्यामूळे अपेक्षित सामाजिक परिवर्तनाच्या नेमके उलटे हे चित्र आहे.

**शैक्षणिक सुविधा :-**

"२००९-२०१० च्या अखेर जिल्ह्यातील प्राथमिक शाळांची संख्या १२०१, माध्यमिक शाळांची संख्या ३२८ आणि उच्च माध्यमिक शाळांची संख्या ८६ इतकी होती तर महाविद्यालयांची संख्या ५७ होती.

२००९-२०१० या वर्षात एकूण विद्यार्थ्यांपैकी १,७५,१२४ विद्यार्थी प्राथमिक शाळेत, १,०१,६३८ विद्यार्थी माध्यमिक व ४९,१४१ उच्च माध्यमिक शाळेत तर २५,४५५ इतके विद्यार्थी महाविद्यालयीन संस्थेत शिक्षण घेत होते." [३७]

**सहकार :-**

"उस्मानाबाद जिल्ह्यात २००९-२०१० या वर्षात सहकारी संस्थांची संख्या ४,२५१ होती. या संस्थांच्या सभासदांची संख्या आठ लाख नऊ हजार होती. २००९-२०१० या वर्षात एकूण ८६८ सहकारी पतसंस्था होत्या. त्यापैकी ४७२ कृषी सहकारी पतसंस्था होत्या आणि उर्वरित ३९६ या बिगर शेती पतसंस्था होत्या. वरील वर्षात एकूण ३,३८३ इतर संस्था होत्या. एकूण संस्थेपैकी उत्पादन संस्था सर्वात जास्त म्हणजे २,०५९ होत्या. त्यापैकी १५८० दुग्धव्यवसाय संस्था होत्या. मात्र प्रत्यक्षात १,५१५ दुग्ध सहकारी संस्था कार्यरत आहेत. खाजगी प्रकल्प वाढत आहेत. शेतकऱ्यांच्या पतपुरवठ्याच्या मागणीची पुर्तता करण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कार्यरत आहे." [३८]

**दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे :-**

"जिल्ह्यातील ग्रामविकास खात्याने घेतलेल्या २००५ च्या गणनेनुसार १६,८५८ शहरी व ९३,३०५ ग्रामीण कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील आहेत." [३९]

**सार्वजनिक आरोग्यः-**

"जिल्ह्यात २००१ च्या जनगणनेनुसार १० रुग्णालये, ०८ दवाखाने, ४२ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत, तर २०६ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे आहेत." [४०]

**ड) सांस्कृतिक महत्त्वः-**

प्राचीन काळापासून उस्मानाबाद जिल्ह्याला समृध्द सांस्कृतिक वारसा लाभला आहे. तसेच जिल्ह्यात धार्मिक व सांस्कृतिक एकता दिसून येते. जिल्ह्यातील मंदिरे व पर्यटन स्थळे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यामूळे जिल्ह्याची एक वेगळी ओळख तयार झाली आहे. जिल्ह्यातील काही प्रमुख धार्मिक स्थळे पुढीलप्रमाणे -

**१. तुळजापूरः-**

बालाघाटच्या पायथ्याशी तुळजाभवानीचे पूरातन मंदीर आहे. महाराष्ट्राच्या साडेतीन पीठांपैकी एक पीठ आहे. हे मंदिर हेमांडपंथी बांधणीचे असून तुळजाभवानी माता ही सर्व जातिधर्माचे अधिष्ठान

आहे. महाराष्ट्र कुलस्वामीनी श्री. तुळजाभवानी देवीच्या या प्राचीन मंदिरामुळे जिल्ह्यास आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

**२. येरमाळाः-**

उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील येरमाळा येथे एका डोंगरावर 'येडाई' या देवीचे मंदिर आहे. यात्रेनिमित्त खुप मोठया संख्येने भाविक इथे जमतात.

**३. तेर :-**

प्राचीन काळी तगर या नावाने ओळखले जाणारे हे शहर ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे असून येथे संत गोरोबा काका यांचे मंदिर आहे. तसेच जैन मंदिरही आहे.

**४. परंडाः-**

परंडा शहराच्या उत्तरेस सोनारी या गावी श्री काळ भैरवनाथाचे मंदिर आहे. तसेच शाहदत्ता आलमप्रभू यांची समाधी आहे. भूम तालुक्यातील ईट जवळील बेलेश्वराचे मंदिर हे तर स्थापत्यकलेचा अप्रतिम नमुना आहे.

कुंथलगिरी येथे जैन मंदिर असून हे मंदिर जैनांचे तीर्थक्षेत्र आहे. याशिवाय अणदूर येथील खंडोबा मंदिर, येडशी येथील रामलिंग देवस्थान ही प्रेक्षणीय स्थळे असून सिध्देश्वर मंदिर, (वडगाव सिध्देश्वर) रामतीर्थ मंदिर (नळदूर्ग) येथील पर्यटन स्थळांचा विकास करण्यात येत आहे.

"जिल्ह्यातील मंदिरे, किल्ले, मठ, दर्गा, इ.मूळे जिल्ह्याचे ऐतिहासिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्व लक्षात घेऊन सामाजिक वनीकरणही करण्यात आले आहे." [४१]

**२.१.४ उस्मानाबाद जिल्ह्याची राजकीय व सामाजिक परिस्थिती :-**

महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जडणघडणेत उस्मानाबाद जिल्ह्याचा सहभाग मोलाचा आहे. "जिल्ह्यात एक लोकसभा मतदार संघ, उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, भूम-परंडा हे चार विधानसभा मतदार संघ, जिल्हा परिषद, आठ नगरपालिका व आठ पंचायत समित्या आहेत. " [४२] "जिल्ह्यात निजाम राजवटीच्या प्रभावामुळे भाषिक भिन्नता आढळते. जिल्ह्यात सहा साखर कारखाने आहेत. तरीही औद्योगिकदृष्टया, जिल्हा मागासलेला आहे." [४३]

हैद्राबाद मुक्तीसंग्रामात जिल्ह्यातील जनतेने मोठया प्रमाणात सहभाग नोंदवला होता. उस्मानाबाद जिल्हा हा हैद्राबाद संस्थानातील सरहद्दीचा जिल्हा असल्यामूळे स्वातंत्र्य संग्रामात या जिल्ह्याचे कार्य व महत्त्व फार मोठे आहे. सरहद्दीवर कँपस् उघडून स्वातंत्र्याच्या आंदोलनास प्रेरणा व गती देणे, जनतेला

रझाकारांच्या अत्याचारापासून संरक्षण देणे याबाबत उस्मानाबाद जिल्ह्याने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

"उस्मानाबाद जिल्ह्यात १९२१ साली तुळजापूर तालुक्यातील हिप्परगा (नरसोबाचे) इथे राष्ट्रीय शाळेची स्थापना झाली. शाळेचे मुख्याध्यापक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ हे काम पहात होते. देशासाठी जगणारे व लढणारे तरुण कार्यकर्ते तयार करणे हे शाळेचे उद्दिष्ट होते. " [४४] "उस्मानाबाद जिल्ह्यात १९२४ साली आर्य समाजाची स्थापना करण्यात आली." [४५] जिल्ह्यातील बापूराव मास्तर, रामभाऊ मैंदरकर, तुळजाराम सुरवसे यांनी राजकीय, सामाजिक व धार्मिक कार्यास गती देऊन मराठवाडा मुक्ती संग्राम आंदोलनाची पूर्वतयारी केली.

"२० फेब्रूवारी १९४७ रोजी हुतात्मा बाबुराव बोरगावकर आणि निलय्या स्वामी या दोन हिंदू पुढाऱ्यांची रझाकारांनी हत्या केली. " [४६] अशा अनेक हुतात्म्यांच्या बलिदानाने पावन झालेला आजचा उस्मानाबाद जिल्हा प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातून लातूर जिल्हा वेगळा झाल्यानंतर लातूर जिल्ह्याने मोठी प्रगती केली. पण त्या तुलनेत उस्मानाबाद मागासलेला राहिला.

"१९३७ साली स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्वाखाली उस्मानाबाद येथे पहिला सत्याग्रह झाला. या सत्याग्रहात अनेकांनी सहभाग घेतला. आर्य समाजाच्या विचाराने भारावलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील जनतेने स्वातंत्र्य आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली." [४७]

जिल्ह्याने वैद्यकीय क्षेत्रातून, राजकारणातून, शिक्षणाद्वारे सामाजिक क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. सामाजिक क्षेत्रात स्त्रिया, दूर्बल घटक, जाती-जमाती यांच्यापर्यंत विकास गंगा पोहचवण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

## २.२ संशोधन साहित्याचा आढावा:-

**प्रस्तावना -**

भारतीय आदिवासी जमातीवर अभ्यासकांनी, संशोधकांनी केलेल्या अभ्यासाचा, संशोधनाचा आढावा या ठिकाणी घेण्यात आला आहे.

आदिवासी पारधी जमातीचा अभ्यास करण्याअगोदर आदिवासी समुदायाची संकल्पना, व्याख्या, वैशिष्ट्ये, त्यांची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी, त्यांच्या समस्या, मागासलेपण, स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील झालेले बदल, त्यांची प्रगती, याचा अभ्यास मार्गदर्शक असून पूर्वीचे संशोधन / संदर्भ प्रस्तुत अभ्यासास पूरक ठरतात. या दृष्टीने आदिवासी संदर्भ साहित्याचा आढावा नक्कीच उपयोगी ठरेल . उपलब्ध संशोधन साहित्यामूळे प्रस्तूत अभ्यासाची दिशा ठरवता येते. प्रत्यक्ष संशोधन कार्याला सुरुवात करण्यापूर्वी नेमके प्रस्तुत अथवा त्याच्या जवळपास संशोधन झालेले आहे का? आणि झाले असल्यास त्या संशोधनाचा प्रस्तुत संशोधनाला कितपत व कसा उपयोग होईल हे पाहणे आवश्यक असल्याने आदिवासी समाजजीवनाचा आढावा घेण्यासाठी आदिवासी संशोधनावर आधारित पूस्तके, पाहणी अहवाल, संशोधने, सरकारी अहवाल, भटक्या जमातीवरील पूस्तके व अहवाल इ.चा अभ्यास करुन अनुसूचित जमातीच्या जीवनावर दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच प्रत्यक्ष संशोधन विषयासंबंधित संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला असून प्रस्तुत संशोधन समस्येवर आतापर्यंत लिहिली गेलेली पूस्तके व झालेल्या संशोधन कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. जेणेकरुन आतापर्यंत झालेल्या संशोधन कार्यापेक्षा प्रस्तुत संशोधन कार्य कोणत्या बाबतीत भिन्न आहे याची कल्पना येईल.

### २.२.१ आदिवासी समाज व भटक्या विमुक्तावरील संदर्भ साहित्य :-

**१.** "R. V. Russell and Rai Bahadur Hiralal (१९१९- Vol IV)" [४८]

'The Tribes and castes of the central provinces of India.'

या ग्रंथात लेखकांनी महाराष्ट्रातील विविध जमातीच्या उत्पत्तीबद्दल विस्तृत विवेचन केले आहे. गोंड, भिल्ल, पारधी, कोरकू, परधान इ. जमातींची माहिती अनेक मुद्यांच्या आधारे दिली आहे. या जमातीतील पोटजमाती, त्यांचे धार्मिक, वैवाहिक, पारंपारिक, सांस्कृतिक जीवन, आहार-पोषाख, शिकार आणि गुन्हेगारी इ. संदर्भाने सविस्तर आढावा घेतला आहे.

**2.** Ghurye G.S.- 'The Scheduled Tribes ' [49] :-

या ग्रंथात लेखकाने भारतातील आदिवासी जीवनाचा सखोल अभ्यास केला असून डॉ. घुर्येनी भारतीय आदिवासींना 'मागासलेले हिंदू' ही संज्ञा वापरली आहे. त्यांनी महादेव कोळी या आदिवासी जमातीचा अभ्यास केला असून त्यांच्या संशोधनाचा मुख्य भर सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर आधारीत आहे. त्याचप्रमाणे त्यांनी भारतीय आदिवासींच्या समस्यांचे विवरण व निराकरण करण्याचे मार्ग सुचविले आहेत.

**३. मांडवकर भाऊ - 'कोलाम' [५०] :-**

प्रस्तुत संशोधनपर ग्रंथात लेखकाने 'कोलाम' जमातीवर संशोधन करुन या जमातीच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. कोलाम जमातीचा विस्तृत असा अभ्यास करुन इतर आदिवासी जमातीतील तिचे स्थान दर्शविणारा व जमातीच्या जीवनाचा सर्वांगिण वेध घेणारा हा ग्रंथ आहे.

**४. चव्हाण रामनाथ -'जाती आणि जमाती' [५१] :-**

या पूस्तकात शेकडो वर्षे उपेक्षित राहिलेल्या तळागाळातील उपेक्षित समाजाची दुःखे अतिशय प्रभावी शब्दांत मांडली आहेत. भटकंती, असंघटन, शिक्षणाचा अभाव, अंधश्रध्दा ही मागासलेपणाची कारणे सांगितली आहेत. जाती आणि जमातींचा चांगला अभ्यास मांडून, समाजातील परिवर्तनाचा मागोवा घेत विवेचन केले आहे.

**५. डॉ. गारे गोविंद - 'आदिवासी लोककथा' [५२] :-**

गेल्या अनेक वर्षापासून आदिवासीत रमलेल्या या विचारवंत लेखकाने आदिवासींच्या जीवनावर आणि समस्यावर विविध प्रकारच्या ४० ग्रंथांचे लेखन केले आहे.

'आदिवासी लोककथा' हा आदिवासी जमातींची सांस्कृतिक आणि सामाजिक ओळख करुन देणारा ग्रंथ आहे. डॉ. गारे यांनी प्रस्तुत पूस्तकात 'कोकणा' बोलीतील लोककथा, 'वारली' लोककथा, भिल्ल-पावरा जमातीच्या लोककथा, गोंड, परधान व माडिया जमातींच्या लोककथा आणि आदिवासींच्या संकीर्ण कथा समाविष्ट केल्या आहेत.

**६. डॉ. पिंगळे भीमराव -'वनवासी व उपेक्षित जग' [५३]**

या पूस्तकात आदिवासी जीवनाची खरी ओळख करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे रीति-रिवाज, परंपरा, जीवन जगण्याची पध्दती, त्यांची निवासस्थाने या सर्व बाबींवर प्रकाश टाकला आहे. कोलाम, कातकरी, गोंड, कोरकू, ठाकूर, तडवी, परधान, पावरा, भिल्ल, महादेव कोळी, माडीया,

वारली, या महाराष्ट्रात आढळणाऱ्या जमातींच्या समाजव्यवस्थेचा अभ्यास तसेच ग्रंथात समाविष्ट असलेली महाराष्ट्र शासनाची अनुसुचित जाती-जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती, इतर मागासवर्गीयांची यादी अध्ययनासाठी महत्त्वाची, मार्गदर्शक ठरु शकते.

**७. प्रा. नाडगोंडे गुरुनाथ द. -'भारतीय आदिवासी'** [५४]

या ग्रंथात आदिवासी कोणाला म्हणावे? आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये, आदिम विवाहसंस्था, कुटूंब संस्था, आप्तसंबंध, अर्थव्यवस्था, आदिवासींचा कायदा, धर्म व जादू इ. विवेचन केले आहे. तसेच लेखकाने महाराष्ट्रातील वारली समाजाचा सविस्तर अभ्यास करून भारतातील आदिवासींचे भाषिक, भौगोलिक, वांशिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या वर्गीकरण केले आहे.

या पूस्तकात आदिमांच्या प्रश्नांचे चिंतन आणि त्यावरील उपाययोजना याचेही विवरण केले आहे.

**८. डॉ. कदम नागनाथ धों. -'महाराष्ट्रातील भटका समाज - संस्कृती व साहित्य'** [५५]

या पूस्तकात महाराष्ट्रातील भटका समाज, भटक्या विमुक्तांचे स्वरुप, त्यांची उपेक्षा, त्यांची निवेदने, न्यायनिवाडा आणि याच्या अभ्यासावरुन काढलेले निष्कर्ष महत्त्वाचे आहेत. या ग्रंथात महाराष्ट्रातील एकूण १४ भटक्या विमूक्त जमातींच्या अंतरंगाचा परामर्श घेतला आहे. भटक्या समाजाच्या समस्या अभ्यासून त्यावर उपाय सुचविले आहेत. लेखकाने मांडलेल्या भटक्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक समस्या लक्षात घेता सुचविलेले उपाय तेवढेच अभ्यासपूर्ण आहेत.

**९. लक्ष्मण माने- विमूक्तायन - 'महाराष्ट्रातील विमूक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास'** [५६]

प्रस्तुत संशोधन ग्रंथात लेखकाने विमूक्त जमातींच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा आढावा घेतला आहे. भारतातील भटक्या विमुक्त जमातींच्या मुळ उगमांचा शोध घेताना ३ प्रमुख विभाग केले आहेत.विमूक्त जमातींची ऐतिहासिक पार्श्वभूमी विषद करताना सुमारे ५ हजार वर्षापूर्वीपासून ते आजपर्यंतची स्थित्यंतरे, ब्रिटिश कायदे व जमातीचे कायदे यांच्यातील संघर्ष आणि संघर्षाची परिणतीतून हे निसर्ग पूत्र गुन्हेगार ठरले व या जमाती 'गुन्हेगार जमाती' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. या सर्व जमातींचा सखोल अभ्यास हाच या ग्रंथाचा संशोधनविषय आहे. लेखकाने 'गुन्हेगार जमाती कायदा' ची वाटचाल, गुन्हेगार जमाती दुरुस्ती कायदा, वसाहती, वसाहतींचे कामकाज, वसाहतीतील सोयी इ.चा आढावा घेतला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात वसाहती कायदा, गुन्हेगारीचा शिक्का, जमातींच्या सवलती इ. बरखास्त झाल्याने जमाती बेवारशी झाल्या. महाराष्ट्रातील

विमूक्त जमातींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास लेखकाने शास्त्रीय संशोधन पध्दतीने केला असून या संशोधनामध्ये महाराष्ट्रातील जमाती, त्यांच्या वस्त्या, लोकसंख्या, त्यांची घरे, शिक्षण, आर्थिक क्रियेचे स्वरुप, त्यांच्या राहणीमानाचा दर्जा यांचे सर्वेक्षणद्वारे सखोल विश्लेषण केले आहे. विमूक्तांसाठीच्या सुविधा, जमाती व गुन्हेगारीचे स्वरुप, शासकीय योजना, जातपंचायत, जमातींचे बदलते धार्मिक जीवन, होणारे बदल, राजकीय परिस्थिती इत्यादिचा सविस्तर आढावा घेतला आहे. वरील सर्व अभ्यासावरुन लेखकाने काढलेले निष्कर्ष आणि सुचविलेल्या शिफारशी अत्यंत महत्त्वाच्या व मार्गदर्शक आहेत.

**१०. इरावती कर्वे - 'आमची संस्कृती'** [५७]

इरावती कर्वे यांनी सन १९४८ ते १९६० च्या दरम्यान केलेले लेखन या पूस्तकात समाविष्ट आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजात जे विचारमंथन चालू होते त्याचे दर्शन या पूस्तकातील लेखांमधून होते. संस्कृती म्हणजे काय? हिंदू संस्कृती, नवीन हिंदू कायद्याचे समाजशास्त्रीय परीक्षण, शिक्षण, स्त्री, भारतीय भाषा आणि भारतातील वन्य समाज असे लेख लिहिले असून लेखिकेने'भारतातील वन्य समाज' या लेखात इ.स.१९५१ ची भारतातील आदिवासींची लोकसंख्या, भाषा, आचार विचारातील विविधता, आदिमांच्या विकासासाठीची सरकारी व्यवस्था, तरतुदी, व त्यातील उणिवा काय आहेत हे मोजक्या शब्दात व स्पष्टपणे सांगितले आहे. 'मागासलेले कोण?' याचा निर्णय आजही होत नाही. कोट्यावधी रूपये खर्चूनही त्यांच्या वाट्याला किती जातात हे पाहिलेले बरे अशी सुचनाही त्यांनी केली आहे. या पूस्तकात वेगवेगळ्या प्रांतातील मुख्य वन्य जमाती व त्यांची वस्तीस्थाने दिली आहेत.

**११. गोदावरी परुळेकरः- 'जेव्हा माणूस जागा होतो'** [५८]

हे पूस्तक लिहितांना 'वारली' आदिवासी किंवा त्यांच्यासारखीच आजही ज्या शेतकऱ्यांची परिस्थिती आहे त्यांच्या जीवनाचे चित्र समाजासमोर उभे व्हावे हा मुख्य हेतू लेखिकेचा होता. जंगलाचे ठेकेदार, मक्तेदार, जमीनदार यांच्या जुलूमाविरुध्द वारल्यांनी केलेल्या बंडाचे विवेचन या पूस्तकात केले असून 'वारली' जमातीच्या विफल जीवनाचे वास्तव, आदिवासीवरील अत्याचार, जमीन मालकांकडून होणारा छळ आणि या विरोधात आदिवासी वारल्यांनी केलेले बंड, या सर्वांमुळे आदिवासींमध्ये आत्मविश्वास जागा होवून वारलीमध्ये आमुलाग्र बदल झाला. तरीही आदिवासींची आजची परिस्थिती सुधारली आहे असे म्हणणे चूकीचे होईल. अनेक प्रश्न आजही तसेच आहेत. पण

अन्यायाला ठोकर देण्यासाठी तयार झालेला वारली समाज प्रगतीची पूढची पावले उचलल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास लेखिकेने व्यक्त केला आहे.

**१२. प्रभाकर मांडेः - 'भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या'** [५९]

लेखकाने या पूस्तकात भारतीय आदिवासींच्या संदर्भात लिहिताना भारतीय आदिवासींचे स्थान, त्यांची वस्तीस्थाने, लोकसंख्या याची माहिती देवून आदिवासी हे मुख्यतः हिंदूच आहेत असे प्रतिपादन केले आहे. त्यांचे भावजीवन आणि कलाजीवन, स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे महत्त्वाचे योगदान, धर्मांतराची समस्या, आदिवासी स्त्रियांच्या समस्या इ.चे विस्तृत विवेचन केले आहे. भारतातील आदिवासींची एकूण मानसिकता लक्षात घेऊन त्यांच्या विकासविषयक समस्यांच्या स्वरुपावर या पूस्तकात प्रकाश टाकला आहे.

**१३. खडसे भा. कि. - 'भारतीय सामाजिक समस्या'** [६०]

या पूस्तकात भारतीय समाजाचा महत्वपूर्ण घटक असलेल्या आदिवासी समाजाची भारतातील वस्तीस्थाने, आदिवासींचे भाषीक, वांशिक इत्यादी निकषावर वर्गीकरण, याची अभ्यासपूर्ण मांडणी केली असून स्वांतत्र्योत्तर काळात आदिवासी समाजाची विकास प्रक्रिया त्यामुळे होत असलेले सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक बदल याविषयीचे लिखाण केले आहे.

**१४. प्रा. मुठे सुमन - 'आदिवासी स्त्री-जीवन'** [६१]

आदिम संस्कृतीतील 'स्त्री' या महत्त्वाच्या घटकावर प्रा. सुमन मुठे यांनी विविध पैलूंवर विस्तृतपणे प्रकाश टाकला आहे. भारतातील आदिवासीच्या विविध जमातीतील स्त्री जीवनाचा आढावा घेताना आदिवासी स्त्रियांचे आरोग्याचे प्रश्न, आधूनिक स्त्री दर्जा व भारतीय आदिवासी स्त्रीचा दर्जा याबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण विवेचन केले आहे. आदिवासी स्त्री जीवन, विविध राज्यातील आदिवासी स्त्रीबद्दलचे विचार, सद्यःस्थिती सामाजिक दर्जा, कष्ट, इ.च्या अभ्यासाचा केलेला हा प्रयत्न स्तुत्य आहे.

**१५. डॉ. मेहता प्रकाश चन्द्र - 'आदिवासी संस्कृती एवं प्रथाएँ '** [६२]

जगातील अनेक देशात आदिवासी राहतात. त्यांना देशपरत्वे विविध नावाने ओळखले जाते. भारतात ही ५०० पेक्षा अधिक आदिवासी जमाती राहतात. प्रत्येक जमातीची स्वत:ची विशिष्ट संस्कृती, बोलीभाषा, रिती-रीवाज असतात. आणि हे वेगळेपणच त्यांची ओळख आहे. आदिवासी समुदाय १५० पेक्षा अधिक भाषा आणि २२५ बोलीभाषा बोलतात असे प्रस्तावनेत नमुद केले आहे. आदिवासी समुदायाची ओळख करुन देण्याच्या हेतुने या पूस्तकाच्या सुरुवातीला आदिवासींची क्षेत्रवार

विभागणी दिली आहे. तसेच, त्यांची लोकसंख्या, योजना, विकास या घटकांचा विस्तृत अभ्यास केला आहे. भारतातील विविध आदिवासी समुदायांपैकी काही प्रमुख जमातींची विस्तृत ओळख करुन देणे हेच या पूस्तकाचे प्रयोजन आहे. अगरिया, कथौडी, गोंड, भिल्ल, खासी, नागा, संथाल अशा १५ आदिवासी जमातीची संस्कृती, प्रथा इ.चे विस्तृत विवेचन या ग्रंथात केले आहे.

**१६. प्रा. ठाकूर सुंदरसिंह - 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र'** [६३]

प्रस्तूत ग्रंथात भारतीय आदिवासी समाज, व्याख्या, वैशिष्ट्ये, वर्गीकरण, आदिवासींची विवाह संस्था, कुटुंब संस्था, धर्म व जादू, कायदा व न्यायपध्दती, आप्तसंबंध, त्यांच्या सामाजिक समस्या आणि त्यावरील उपाय याविषयी विवेचन केले आहे. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी विकास व स्वातंत्र्योत्तर आदिवासी कल्याण कार्यक्रम, घटनात्मक तरतुदी, इ. चे सविस्तर विवेचन केले आहे.

**१७. डॉ. जाधव सुदाम - 'आदिवासी साहित्य'** [६४]

या संशोधनपर पुस्तकात लेखकाने आदिवासी लोकसाहित्याचा विस्तृत अभ्यास मांडला आहे. आदिवासींचे सांस्कृतिक जीवन, शैक्षणिक जीवन, आदिवासी पारंपारिक लोककथा, लोकगीते, रुढी-परंपरा, दैवत कथा, लोकजीवन व ज्यांनी आपल्या प्राचीन संस्कृतीचा ठसा कायम ठेवला आहे, त्या भिल्ल, कोकणा, वारली ठाकूर, कातकरी, यांच्या लोकगीतांचा या ग्रंथात परामर्श घेतला आहे. लोकगीतातील आदिवासी स्त्रीजीवनाचा मागोवा घेत तिचे कष्टमय जीवन दर्शविले आहे. आदिवासी कला, शिक्षण, व्यवसाय, विकास योजना या संदर्भाने लेखकाने अभ्यासाअंती निष्कर्ष काढले आहेत.

**१८. डॉ. मांडे प्रभाकर - 'गाव गाड्याबाहेर'** [६५]

अनेक शतके गावगाड्याच्या संपर्कात येऊनही भटक्यांचे जीवन जगणाऱ्या अनेक जाती ग्रामसंस्थेत दाखल होऊ शकल्या नाहीत. या जातींना गावगाड्याबाहेर राहुनच भटक्यांचे जीवन जगावे लागत आहे. अशा विमुक्त-भटक्या जातीजमातींपैकी काही दूर्लक्षित जातींच्या जीवनसरणींची, स्वतंत्र जातपंचायतीची, त्यांच्या रुढ असलेल्या गुप्त बोलीभाषेची, गुन्हेगार जमातीच्या कायद्याचा त्यांच्यावर झालेल्या परिणामांची सविस्तर चर्चा करुन, गावगाड्याबाहेरील या जातीच्या समस्यांचा उहापोह प्रस्तुत ग्रंथात केला आहे. सुरुवातीलाच भटक्या जातींचे वर्गीकरण दिले असून भटक्या जाती आणि त्यांची कथा, व्यथा, व्यवसाय, उत्पत्ती, पोटभेद, जीवनाचे विविध पैलू, विधी, संकेत इ.चा सविस्तर वेध घेतला आहे. प्रस्तुत पुस्तकातील प्रत्येक जातीची माहिती अत्यंत सखोल आणि अभ्यासपूर्ण आहे.

**१९. डॉ. गारे गोविंद - 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'** [६६]

प्रस्तुत ग्रंथात आदिवासी संकल्पना, आदिवासी समाजाची लक्षणे, जाती आणि जमाती यातील भेद याचे सविस्तर विवेचन आढळते. महाराष्ट्रातील आदिवासी त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन, आदिवासी विकासाची संकल्पना, कायदे, विकासाच्या योजना, याबद्दलचीही माहिती दिली आहे. याशिवाय महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमाती, त्यांची वांशिक वैशिष्ट्ये, त्यांच्या सामाजिक व धार्मिक रुढी, सामाजिक आर्थिक परिस्थिती आणि त्यांचा पुर्वे इतिहास सांगितलेला आहे. महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमाती, महाराष्ट्रातील अल्पसंख्याक आदिवासी जमाती, आणि आदिवासी जमातीशी नामसाधर्म्य दाखविणाऱ्या जाती-जमाती, त्यांची जीवनपध्दती, श्रमपरिहाराची साधने, त्यांचे धाडसी लौकिक जीवन, यासह ते निसर्गाच्या सानिध्यात आपले जीवन कसे व्यतित करतात याचे स्पष्ट चित्र रेखाटले आहे. आदिवासी जमातींच्या भवितव्याच्या दृष्टीने बिगर आदिवासींचा प्रश्न या विषयी एक स्वतंत्र प्रकरण ग्रंथात आहे. तसेच आदिवासी जमातीची जमातनिहाय व जिल्हानिहाय सांख्यिकी माहिती ग्रंथात दिली आहे.

**२०. डॉ. सौ. देवगांवकर शैलजा, डॉ. देवगांवकर शं. गो. - 'आदिवासी विश्व'** [६७]

प्रस्तुत पुस्तकात भारतातील विविध भागात राहणाऱ्या भिन्न, वांशिक मूळ असलेल्या तसेच वेगवेगळ्याबोलीभाषा बोलणाऱ्या आदिमांची माहिती दिली आहे. आदिवासींचे समाजजीवन, जीवनचक्रातील विविध विधी, धर्मकल्पना व देवदेवता, सण व उत्सव, लोकसाहित्य व आर्थिक सामाजिक जीवन आणि विकासाचे प्रश्न या सर्वांचा परामर्श या पुस्तकात घेतला आहे. केवळ भारतातीलच नव्हे तर अमेरिकेच्या नैऋत्य भागातील प्रमुख आदिवासींमध्ये जाऊन केलेल्या अध्ययनाचीही माहिती दिली आहे. 'आदिवासी विश्व उलगडताना प्रस्तुत ग्रंथात चार विभाग केले आहेत. पहिल्या विभागात आदिवासी जमाती आणि त्यांचे वर्गीकरण करुन भारतातील काही आदिवासी जमातींची माहिती दिली आहे. दुसऱ्या विभागात उत्तर अमेरिकेतील काही आदिवासी जमाती व त्यांच्या लोकसाहित्याचे विवेचन आहे. तिसऱ्या विभागात आदिवासींच्या कला-लोकसाहित्य, सण, लोकगीते, नृत्ये, बोलीभाषा इ.ची माहिती दिली आहे. चौथ्या विभागात आदिवासींची विकास प्रक्रिया शिक्षणविषयक योजना, आरोग्य, शेती पध्दती इ.चा सर्वांगीण परामर्श घेतला आहे.

२१. **Y.P.S. Tomar and Dr. Robin D. Tribhuwan -**

**'Development of Primitive Tribes in Maharashtra; Status, Continuity and change'.** [68]

प्रस्तुत पुस्तकात अतिमागास जमातीवरील संशोधन व विकास आराखडा दिला आहे. भारत सरकारने विविध निकषांच्या आधारे ७५ आदिवासी जमातींना अतिमागास जमाती म्हणून घोषित केले आहे. या जमाती भारतातील एकूण १५ राज्य व केंद्रशासित प्रदेशात वास्तव्य करतात. कातकरी, कोलाम व माडिऱ्या या तीन अतिमागास जमातीचा चिकित्सक अभ्यास या पुस्तकात मांडला आहे. या संशोधनाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र असून या अभ्यासपर पुस्तकात उपरोक्त तीन अतिमागास जमातींच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक पैलूंचा आढावा घेतला आहे. त्यांची सद्य:स्थिती, मुलभूत सुविधासंबंधीचे प्रश्न याचा अभ्यास करुन, तसेच शासकीय पातळीवर त्यांच्यासाठी राबवण्यात येणाऱ्या योजना, त्या योजनांचे फलित, अंमलबजावणीतील त्रूटी, यांचा अभ्यास केला आहे. या अभ्यासाआधारे सदरील पुस्तकात त्यांच्या गरजा ओळखून शेती, सिंचन व्यवस्था, आदिवासी कल्याण योजना, रोजगार निर्मिती, आर्थिक पूनर्वसन इ. उपाय त्यांच्या विकासासाठी, प्रगतीसाठी सुचविले आहेत.

**२२. खरात शंकरराव - 'भटक्या विमुक्त जाती व त्यांचे प्रश्न'** [६९]

या पुस्तकात माणूस, समाज, गुन्हा, गुन्हेगार व गुन्हेगारी समाजशास्त्रातील विचार प्रवाह इत्यादीचा वेध घेतला असून गुन्हेगार जमाती कोणत्या? त्या गुन्ह्याकडे का वळल्या? याचा ऐतिहासिक मागोवा याठिकाणी घेतला आहे. भटक्या विमुक्तांचा मुक्तिसंघर्ष, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे स्वरुप सांगताना अनेक उदाहरणे दिली आहेत. तसेच भटक्या-विमुक्तांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय जीवन रेखाटले आहे. भटक्या विमुक्त स्त्रियांचे प्रश्नही मांडले आहेत.

**२३. कालेलकर गोविंद मंगेश - 'मुंबई इलाख्यातील जाती'** [७०]

२० व्या शतकाच्या सुरुवातीला एन्थोबेन हे इंग्रज समाजशास्त्रज्ञ तत्कालीन मुंबई प्रांतात म्हणजे आजच्या महाराष्ट्रात सामाजिक संशोधनाचे काम करीत होते. त्यांनी मुंबई प्रांतात सर्वत्र फिरुन विविध जाती-जमातींची खूप माहिती गोळा केली. ही माहिती एकत्रितपणे 'Tribes and castes of Bombay' या पूस्तकात प्रसिध्द केली. या पुस्तकात एकंदर ४८३ जमातींची माहिती दिली आहे. ही माहिती अत्यंत महत्त्वाची असून या पुस्तकाचाच मराठी अनुवाद लेखकाने केला आहे. लेखकाने प्रत्येक जमातीचे

संक्षिप्त पण अत्यंत अभ्यासपूर्वक वर्णन केले आहे. ही माहिती संशोधकांना, लेखकांना अत्यंत उपयूक्त ठरेल असे वाटते.

**२४. प्रभुणे गिरीश - 'पारधी'** [७१]

प्रस्तूत पुस्तकात समाजाने वेशीबाहेर ढकललेल्या आणि खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यापासून आजही वंचित राहिलेल्या एका अन्यायग्रस्त जमातीची म्हणजेच पारधी जमातीची आक्रोशकथा मांडली आहे. त्या जमातीच्या व्यथा, वेदनांशी समरस होऊन उत्कर्षासाठी झटणाऱ्या एका तळमळीच्या कार्यकर्त्याने मांडलेली ही कैफियत असून भटक्या विमुक्तांच्या कामानिमित्त फिरतांना अगदी जवळून लेखकाला पारधी समाजाचं जे दर्शन झाले, त्याद्वारे पारधी समाजाचा जीवन पट मांडण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय जमातीची इतरही माहिती लेखकाला मिळाली. या लेखनात पारधी जमातीवरील अनेक अन्याय-अत्याचाराच्या कहाण्या, जातपंचायत, जगण्यासाठी चाललेली जीवघेणी धडपड, पोलिसांचे अटकसत्र, पारधी करीत असलेल्या हत्या, दरोडे, यामधून घडणाऱ्या घटना याचे प्रत्ययकारी विवेचन केले आहे. पारधी कोण? कुठून आले? त्यांची भटकंती, कायदे, यासंदर्भाने विविध घटनांचा आढावा घेतला आहे. पारधी स्त्री जीवन, स्त्रीसंबंधीत अघोरी प्रथा, रुढी-परंपरा, अंधश्रध्दा, देव-देव, इ.चा वेध अत्यंत बारकाईने घेतला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने, समाजाने या जमातीच्या प्रथमवसनाची जबाबदारी घेऊन विकास करायला हवा होता. पण याकडे दूर्लक्ष झाल्याची खंत लेखक व्यक्त करतो. लेखकाने अनेक बिकट प्रसंगांना तोंड देत आपले सामाजिक कार्य चालूच ठेवले आहे. प्रगत समाज व पारधी यांच्यातील दरी नष्ट व्हावी हाच या लेखनाचा उद्देश असल्याचे गिरीश प्रभूणे सांगतात.

**२५. गायकवाड लक्ष्मण - 'वकिल्या पारधी'** [७२]

पारधी समाजाच्या धक्कादायक जीवनाचा पट उलगडणारी ही कादंबरी आहे. पशुतुल्य जीवन जगणाऱ्या पारधी समाजाच्या जीवघेण्या वेदना, हालअपेष्टा, गुन्हेगारीचा कलंक याचे चित्रण अनेक घटनांमधून मांडले आहे. पारधी समाज अनेक मुलभूत सोयींपासून वंचित आहे. इंग्रजांचे आगमन, इंग्रजांच्या कारवायांना विरोध केल्याने इंग्रजांनी मारलेला गुन्हेगारीचा शिक्का, पारध्यांचा प्रगतांशी संपर्क, त्यातुनही त्यांची झालेली फसवणूक, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्यांच्या वाट्याला आलेली वंचितता या सर्वांचा वेध या कादंबरीत घेतला आहे.

### २६. माने लक्ष्मण - 'भटक्याचं भारुड' [७३]

१९९० ते १९९६ या काळात लक्ष्मण माने राज्यपालांचे नामनियुक्त सदस्य म्हणून महाराष्ट्र विधान परिषदेत कार्यरत होते. त्या काळातील त्यांच्या विधानपरिषदेतील निवडक भाषणांचा संग्रह म्हणजे हे पुस्तक होय. या पुस्तकातील समाविष्ट त्यांच्या भाषणाचा मुख्य रोख भटक्या विमुक्तांचे प्रश्न, राखीव जागा, सवलती, गुन्हेगार जमाती कायदा, पोलीसी छळ, आरोग्य, आदिवासी जीवनसंस्कृती, स्त्रियांची उपेक्षा हा आहे. भटक्या विमुक्त जमातींसाठी शासनाकडून होत असलेले प्रयत्न आणि त्यांचे यश-अपयश यांच्यापेक्षा समग्र परिवर्तनासाठी प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा लेखक व्यक्त करतात. भटक्या विमुक्तांच्या प्रश्नासंदर्भाने अत्यंत अभ्यासपूर्ण मत लेखकाने आपल्या भाषणातून मांडले आहे.

### २७. गायकवाड लक्ष्मण - 'उचल्या' [७४]

१९८७ मध्ये प्रकाशित झालेल्या लक्ष्मण गायकवाड यांच्या या आत्मकथनातून भटक्या विमुक्त जमातींपैकी गुन्हेगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाथरवट जमातीत जन्मलेल्या लेखकाने आपल्या जन्मापासूनच्या संघर्षपूर्ण काळाला उजागर केले आहे. एका जमातीची हजारो वर्षांपासूनची ठसठसीत वेदना शब्दबध्द करताना. पोलीसी अत्याचार, जात-पंचायत, लेखकाचे बालपण, शिक्षण, भूक, दारिद्र्य इ. अनेक कंगोऱ्याचे दर्शन ह्या आत्मकथनातून घडते. या जमातीचे जीवन पशूलाही लाजवणारे आहे. लेखकाच्या जीवनातील विविध अनुभव, प्रसंग हे समकालीन भटक्या विमुक्तांच्या वास्तवाला अभिव्यक्त करतात.

### २८. मोरे विमल - 'पालातली माणसं' [७५]

या पुस्तकातील लेखात भटक्या विमुक्त जमातीच्या स्त्रियांचे लाचार, अगतिक, पशुतूल्य जीवन, त्यांच्या व्यथा, वेदना, इत्यादीवर प्रकाश टाकला आहे.

भटक्या विमुक्त जमातीमधील नंदीबैलवाले, पारधी, गोसावी, घिसाडी, मांगगारुडी, रामकोंडाडी, डवरी, कोल्हाटी, गोपाळ, डोंबारी अशा दहा जमातींमधील स्त्रियांचे जीवन, त्यांच्या हाल-अपेष्टा, त्यांची सुख-दुःखे, आशा-आकांक्षा त्यांच्याच शब्दात समोर आणण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे.

### २९. प्रभुणे गिरीश - 'पालावरच जिणं' [७६]

गिरीश प्रभूणे यांच्या या पुस्तकातील कथांनी भटके-विमुक्त समाजाच्या स्थितीचे यथार्थ दर्शन घडविले आहे. या कथा वाचतांना भटके विमुक्त समाजाविषयी दयेची व आपलेपणाची भावना निर्माण होते. पारधी, नंदीबैलवाले, वैदू, भिल्ल, बंडी धनगर, मरिआईवाले, ओतारी, शिकलगार यांच्या सामाजिक जीवनाचा वेध घेतला असून भटक्या विमुक्त विकास परिषदेचं काम करताना या जमातींच्या समक्ष भेटीसाठी पायात भिंगरी बांधून भ्रंमती केली आणि भटक्यांच्या भीषण समस्यांची ओळख अनेक प्रसंगातून करुन दिली आहे.

### ३०. काळे किशोर शांताबाई - 'कोल्हाटयाचं पोर' [७७]

कोल्हाटी समाजात एका कलावंतीणीच्या पोटी जन्म घेऊन डॉक्टर झालेल्या पोराची ही कथा आहे. कोल्हाटी समाजातील कलावंताच्या वाट्याला आलेले जीवन, तिच्याकडून तिच्या मुलांची होणारी आबाळ, तिचं जीवन, त्यातून निर्माण होणारी गुन्हेगारी, समाजाचा कोल्हाटी स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन या सर्व गोष्टी लेखकाने या आत्मकथेत मांडल्या आहेत.

### ३१. अत्रे त्रिंबक नारायण - 'गुन्हेगार जाती ' [७८]

हे पुस्तक श्री त्रि.ना.अत्रे यांनी १९११ मध्ये तत्कालीन मुंबई प्रांताचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस श्री एम. केनेडी यांच्या 'Criminal classes in the Bombay Presidency' या इंग्रजी पुस्तकावरुन लिहिले आहे. या पुस्तकात प्रत्येक गुन्हेगार जातीची माहिती, त्या जातीची वस्ती, लोकसंख्या, भाषा, सांकेतिक शब्द, उपजीविकेची इतर साधने, वेषांतर, गुन्हे, गुन्ह्याची पध्दत, गुन्हयाची हत्यारे, चोरीच्या मालाची निर्गती अशा प्रमुख मुद्याच्या आधारे दिली आहे. प्रत्येक जात कोणती सांकेतिक भाषा वापरते, त्या शब्दांचे अर्थ काय आहेत यांची यादीच प्रत्येक जातीच्या प्रकरणात दिली आहे. प्रस्तुत पुस्तकात बंजारा, बेरड, भामटे, भिल्ल, छप्परबंद, कैकाडी; कातकरी, कोळी, मांग गारुडी, पारधी, रामोशी, वाघरी, वडार इ. मुंबई इलाख्यातील गुन्हेगार जातीची माहिती दिली आहे. याच पुस्तकात मुंबई इलाख्यात येणाऱ्या इतर प्रांतातील गुन्हेगार जातीं उदा. बौरी, पठाण, औधिये, बेरीये, लंगोटी पारधी, चंद्रवेदी, भत्रे, नौसारिये, हबुरे, इ. चीही माहिती दिली आहे.

**२.२.२ आदिवासी समाजावरील संशोधन :-**

**१. श्री. ऊईके हमराज उदयभान - 'आदिवासी (प्रधान) लोकसाहित्यातील स्त्री-पुरुष चित्रण' (मराठी शोधप्रबंध) डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद** [७९]

संशोधकाने आदिवासी लोकसाहित्याचा अभ्यास केला असून आजही आदिवासीमध्ये मोठ्या प्रमाणात जो सामाजिक, राजकीय, आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपण आहे त्यामागील कारणांचा मागोवा घेणे, त्यांच्या समस्या व पारंपारिक जीवन यांचा शास्त्रशुध्द अभ्यास करणे हे या अभ्यासाचे प्रयोजन होते. आदिवासी संकल्पना स्पष्ट करुन संशोधकाने आदिवासी प्रधान समाजाचे सण-उत्सव, रुढी, परंपरा, जातपंचायत, व्यवसाय-उद्योगधंदे, राहणीमान, लोकसमजुती, राजकीय, शैक्षणिक जीवन इ.चा अभ्यास केला आहे. आदिवासी लोकगीतात प्रधान जमातीच्या लोकगीताचे स्थान तसेच आदिवासी लोकसाहित्यातून आढळणारे स्त्रीजीवन यासंदर्भाने पावरा भिल्ल, कातकरी, ठाकर, गोंड, वारली इ.चे अध्ययन केले आहे.

तसेच आदिवासी प्रधान स्त्रीचा सामाजिक व राजकीय क्षेत्रातील सहभाग, तीचे धार्मिक जीवन, लोकसाहित्यातून आढळणारे स्त्री जीवनाचे वेगळेपण इ.चे अध्ययन केले आहे. आदिवासी लोकसाहित्यातून अभिव्यक्त घेणारे पुरुष चित्रण करतांना पावरा भिल्ल, माडिया गोंड, कोरकू गोंड, ठाकर, कातकरी, वारली, कोकणा यांचा अभ्यास केला आहे. प्रधान पुरुषाचा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक जीवन व हिंसक चळवळीशी संबंध तसेच आदिवासी (प्रधान) लोकसाहित्याचे वाङमयीन महत्त्व सांगताना त्यांच्या लोककथा, लोकगीते, नृत्यगीते, म्हणी, उखाणे बोलीभाषा, शब्द इत्यादिची मुलाखतीद्वारे माहिती मिळवून निष्कर्ष काढले आहेत.

**२. प्रा. जाधवर रमेश बलभीम - 'डॉ. गोविंद गारे यांच्या आदिवासी साहित्याचा विवेचक अभ्यास' - (मराठी शोधप्रबंध) डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद** [८०]

प्राचीन काळापासून आजपर्यंत आदिवासी समाज ज्या स्वरुपाचे जीवन जगत आला आहे, त्या जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न गारे यांनी केला आहे. आदिम समाजाची वाटचाल, त्यांचे जीवन, समस्या, संस्कृती, धर्मांतर, शासकीय योजनांचे यशापयश इ. स्वरुपात त्यांनी अवलोकन केले आहे. या सर्व डॉ. गोविंद गारे यांच्या साहित्याचा संशोधकाने वेध घेतला असून डॉ. गारे यांनी केलेल्या महाराष्ट्रातील, मध्यप्रदेशातील आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक जीवनाचा, आर्थिक, सामाजिक जीवनाच्या अभ्यासाचा परामर्श घेतला आहे. तसेच महाराष्ट्रातील गोंड, परधान, कोलाम, बंजारा,

भिल्ल, कोरकू, कातकरी, कोलाम, ठाकूर यासारख्या जातीचा मानववंशशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करुन निष्कर्ष काढले आहेत. प्रस्तुत संशोधकाने पुढील उद्दिष्ट्ये निश्चित केली होती.

१. आदिवासी जीवनातील विविध समस्यांचा आढावा घेणे.

२. त्यांचा धर्म, निसर्ग, हवामानविषयक ज्ञान, वनौषधी, त्यांचा उपयोग इ.चा आढावा घेणे.

३. आदिवासी जीवन उद्‌ध्वस्त होण्याची कारणे शोधणे.

४. आदिवासींसाठीचे कायदे, तरतुदी, वास्तव अभ्यासणे.

५. आदिवासी व नक्षलवादी यांच्यातील परस्परसंबंध शोधणे.

६. महाराष्ट्रातील आदिवासी लोकगीतांचा लोकसाहित्याच्या दृष्टीने विचार करणे.

७. बोलीभाषांच्या संदर्भातील भवितव्याचा विचार करणे.

गोविंद गारे यांनी आदिवासी बांधवांच्या व्यथा उघड्या डोळ्यांनी पाहिल्या आहेत व त्या आपल्या लेखनातून शासन व सामान्यापर्यंत पोहचविल्या आहेत. साहित्यिक डॉ. गारे यांचा परिचय, व्यक्तीमत्व, त्यांचे लेखन इ.चा उल्लेख करुन संशोधकाने डॉ. गारे यांनी लिहिलेल्या, संकलित केलेल्या, संपादित साहित्याचा या संशोधनात आढावा घेतला आहे.

**२.२.३ आदिवासी जमातीवरील संशोधनाचा आढावा :-**

आदिवासी जमाती संदर्भात झालेले संशोधन अल्प असून या ठिकाणी अनेक विद्यापीठात पीएच.डी.पदवीसाठी आदिवासीच्या संबंधाने झालेल्या संशोधनाचा व साहित्याचा आढावा घेतला आहे. संशोधनासाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास करुन प्रस्तुत संशोधन कार्य सुलभ व्हावे या हेतुने हे प्रबंध अभ्यासले आहेत.

**१. प्रा. शिकलगार आदम महमद - 'पुणे जिल्ह्यातील नागरी वसाहतीतील स्थलांतरीत शिकलगार जमात' - (अर्थशास्त्र शोधप्रबंध) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.** [८१]

पुणे जिल्ह्यातील स्थलांतरीत शिकलगार जमातीच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करताना शिकलगार जमातीच्या पुर्वइतिहासाचा प्रश्नावलीद्वारे आढावा घेऊन जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक स्थलांतर, स्थलांतराचे नियम, कारणमिमांसा, परिणाम करणारे घटक इ. संदर्भाने अध्ययन केले आहे. शिकलगार जमातीची सामाजिक, आर्थिक व राजकीय सद्यः स्थितीची माहिती प्रश्नावलीद्वारे मिळवली आहे. संशोधनाची उद्दीष्ट्ये व गृहितके आखुन शास्त्रीय संशोधन पध्दतीद्वारे मिळवलेल्या तथ्याचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढले आहेत आणि शेवटी शिफारशी सुचवल्या आहेत.

**२. श्री. सहारे पद्माकर नागजी - 'नाशिक जिल्ह्यातील कोकणा जमातीचा सामाजिक-सांस्कृतिक अभ्यास' - (समाजशास्त्र शोधप्रबंध) डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद** [८२]

प्रस्तुत संशोधनात आदिवासीमधील कोकणा जमातीच्या सुक्ष्म व सखोल अध्ययनातंर्गत कोकणा जमातीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सास्कृतिक, जीवनाची सद्यस्थिती सांगून, वर्णन आणि विश्लेषणातून त्यांच्यातील सामाजिक बदलाचे आणि सामाजिक समस्यांचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत संशोधकाने पु ढील उद्दिष्ट्ये निश्चित केली होती.

**१)**कोकणा जमातीच्या सामाजिक सांस्कृतिक स्थितीचे आकलन करणे. २) समाजाच्या सामाजिक सांस्कृतिक जीवन प्रवाहाशी सामील होण्याच्या दृष्टीने कोकणा जमातीच्या बाह्य समाजाशी होणाऱ्या आंतरक्रिया व आंतरसंबंधात्मक प्रक्रियांचा अभ्यास करणे. ३) अनुसूचित जमातींच्या विकासाकरिता शासनाने राबविलेल्या सवलती व कल्याणकारी कार्यक्रमांची कोकणा जमातीच्या संदर्भात यशस्वीता अभ्यासणे.

प्रस्तुत संशोधनात सामाजिक सांस्कृतिक जीवनाच्या विविध घटकांवर भर दिला आहे. सामाजिक घटकात कुटुंब व्यवस्था, वैवाहिक जीवन, आंतरक्रिया, शैक्षणिक व्यवस्था, आर्थिक व्यवस्था, आरोग्यविषयक दक्षता, सामाजिक नियंत्रणाची कार्यव्यवस्था, आदिवासींकरिता राबविलेल्या कल्याणकारी योजना इ.चा अभ्यास केला आहे.

सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास करतांना त्यांचा धर्म, श्रध्दा, जीवन चक्र, जन्म-मृत्यू, विवाह इ. तसेच भाषा, लोककथा, लोकगीते, लोककला इ. अभ्यास करुन मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण केले आहे. डॉ. सहारे यांनी या अध्ययनाद्वारे 'कोकणा उत्तरदात्यामध्ये १५ ते १७ वयोगटातील १७.५ टक्के स्त्री-पुरुष व १८ ते २० वयोगटातील ४९.५ टक्के पुरुष उत्तरदात्यांच्या बाबतीत रुढ बालविवाह झाल्याचे दिसून आले, म्हणजेच प्रचलित कायद्याप्रमाणे (पुरुष व स्त्रियांसाठी अनुक्रमे २१ व १८ वर्षे) विवाह करण्याच्या बाबतीत फारसा कटाक्ष दिसत नाही, एक पत्नी पध्दत रुढ असल्याचे आढळले, परंतु बहूपत्नी विवाहाला समाज संमती दिसते जसे कि अध्ययनात ३.५ टक्के पुरुष उत्तरदात्यांना दोन पत्नी असल्याचे आढळते, पुनर्विवाहास संमती असून एका पुरुषांने किंवा स्त्रिने आयुष्यात दोन/तीन वेळा लग्ने केल्याचे दिसले व अध्ययानातील १७ टक्के उत्तरदात्यांनी पुनर्विवाह केल्याचे लक्षात आले आहे ' असे निष्कर्ष नोंदवले आहेत.

**३. डॉ. साळूंके संजय भा. - ' गोंड आदिवासी जमातीचे सामाजिक आणि आर्थिक अवलोकन' (समाजशास्त्र शोधप्रबंध)- डॉ. बा.आं.म.वि. औरंगाबाद [८३]**

प्रस्तुत संशोधनात आदिवासी गोंड जमातीचा सखोल अभ्यास केला असून आदिवासी समुदायाच्या पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेत संशोधकाने भारतीय समाजव्यवस्था, जातीव्यवस्था आणि आदिवासी समुदायाच्या सामाजिक जीवनाचा आढावा घेतला आहे.

या संशोधनात प्रामुख्याने आदिवासी गोंड जमातीच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास केला आहे. गोंड जमातीचे आदिवासी जमातीतील स्थान, समाजरचनेतील स्थान, गोंड जमातीचा पूर्व इतिहास अशा रितीने जमातीच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर स्थितीचा अभ्यास केला आहे. गोंड जमातीच्या कौटूंबिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनाचे सविस्तर विवेचन करुन गोंड जमातीचे आर्थिक जीवन, सामाजिक परिवर्तन, परिवर्तनाचे परिणाम, शैक्षणिक स्थिती, राजकीय जाणीवा, आरोग्य, समस्या इ.चा विस्तृत अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधकाने पुढील उद्दिष्ट्ये निश्चित केली होती.

१. गोंड जमातीचे सामाजिक, आर्थिक अवलोकन करणे.

२. शिक्षणामुळे त्यांच्या जीवनात झालेले परिवर्तन जाणून घेणे.

३. त्यांच्या आर्थिक जीवनाचे अवलोकन करणे.

४. धार्मिक वर्तनाचे अवलोकन करणे.

५. मूळ संस्कृती व वाढत असलेल्या प्रमाणकशुन्य भावनेचा अभ्यास करणे.

६. आरक्षण, राजकारण, बिगर आदिवासींचा प्रश्न इ.चा मागोवा घेणे.

७. आरोग्यविषयक माहिती घेणे.

प्रस्तुत संशोधकाने या संशोधनाद्वारे 'गोंड समाजाने प्रत्येक खेड्यात आपले स्वतंत्र वस्तीस्थान टिकवले आहे. ९५.६८ टक्के गोंडांना मराठी भाषेचे ज्ञान आहे, गोंड समाजामध्ये दारुचे व्यसन मोठ्या प्रमाणावर आहे, त्याच्यामध्ये संयुक्त कुटुंब पध्दत प्रचलित असून कुटुंब नियोजनाविषयी कमी उत्साह आढळतो, या समाजात बालविवाहाची प्रथा पूर्वी नव्हती व आजही नाही, त्यांची न्याय व्यवस्था स्वतंत्र असून जातपंचायतीचे अस्तित्व कायम आहे, त्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असून आर्थिक उत्पन्न अपुरे आहे, आरोग्यविषयक सोयी सुविधाच्या आभावामुळे आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात

आढळतात, राजकीय जागृतीचे प्रमाण कमी आहे व शासकीय योजनासंबंधी त्यांच्यात अज्ञान असून अद्यापही हा समाज मागासलेला आहे. ' इ. महत्त्वपुर्ण निष्कर्ष नोंदविले आहेत.

**४. प्रा. डोंगरे महादेव दत्तू - 'पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीचा सामाजिक आर्थिक अभ्यास' - टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे** [८४]

संशोधकाने, पुणे जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना कातकरी जमातीच्या कुटुंबाचे मूळ स्थान, त्यांच्या वास्तव्याचा कालावधी, कुटुंब व्यवस्था, कातकरी जमातीचे पोटभेद, विवाह, घटस्फोट, सण-उत्सव, देव-देवता, अंधश्रध्दा, अंत्यसंस्कार इ.चे अध्ययन केले आहे.

तसेच शैक्षणिक स्थिती, आरोग्य इ. घटकांच्या आधारे कातकरी जमातीच्या समाजजीवनाचे विश्लेषण केले आहे. आर्थिक जीवनाचा अभ्यास करताना आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत, मालमत्ता, व्यावसायिक स्थिती, शासकीय योजना, कामासाठी स्थलांतर, व्यसनाधिनता, गावकारभारातील सहभाग आणि त्यांच्या समस्या इ. घटकांची माहिती निरीक्षण व मुलाखत अनुसूचीच्या आधारे घेतली आहे.

शेवटच्या प्रकरणात मिळविलेल्या माहितीच्या आधारे गृहीतकाची पडताळणी करुन शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण व वर्गीकरण करुन निष्कर्ष काढले आहेत आणि शिफारशी सुचविल्या आहेत.

**५. प्रा. गायकवाड यशवंत जंगलू - 'उस्मानाबाद जिल्ह्यातील आदिवासी पारधी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास'- डॉ.बा.आं.म.वि. औरंगाबाद** [८५]

या प्रबंधात पारधी जमातीच्या लोकसंस्कृतीमधील लोकसाहित्याचा व त्यातील लोकगीतांचा अभ्यास केला आहे. बहुतांशी निरक्षर पारधी जमातीमध्ये अलीकडे जरी शिक्षणाचा प्रसार होत असला तरी लिखित साहित्याची निर्मिती करण्यापर्यंत हे शिक्षण पारधी समाजात अजून पोहोचलेले नाही. कोणतेही साहित्य हा सामाजिक जीवनाचा आरसा असतो. म्हणूनच पारधी लोकगीत ही त्यांच्या जीवनाशी एकरुप झालेले आपणास पहावयास मिळते. पारधी गीते, कथा, इ.मधून त्यांचे त्यांच्या मनातील भ्रमाचे, अभाससृष्टीच्या कल्पनेचे चित्रण आपल्याला दिसते. त्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या गीतांमधून पहाण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. पारध्यांचे जीवन हे जंगलाशी संबंधित असल्याने त्याचे प्रतिबिंब त्यांच्या गीतात पहावयास मिळते. पारधी कथा, पारध्यांचे शिवप्रेम व पारध्याच्या स्वभावाचे वर्णन या कथांमधून संशोधकाने शोधले आहे. पारधी जमातीची देवीवर खुप श्रध्दा असते. म्हणून देवीच्या जत्रा, बलिदान इ. पध्दती रुढ आहेत. पारधी या आदिवासी जमातीमध्ये

आदिम संस्कृतीच्या खुणा मोठ्या प्रमाणात सापडतात. पारधी जीवनातील सर्व अंगांना सामावून घेणारी व्यापकता या पारधी लोकगीतामध्ये दिसून येते. पारधी स्त्रीची अंगाईगीते सुध्दा देवींच्या नामस्मरणाचे दर्शन घडवतात. पारधी कथेमध्ये अद्भूत रंजकता दिसून येते. संशोधकाने प्रस्तुत प्रबंधात संशोधन पध्दतीचा अवलंब करुन पारध्यांच्या लोकसाहित्याबद्दल कांही विशेष वर्तविली आहेत. पारधी मोकळेपणाने आपल्या लोकगीतातून सौंदर्याची भूरळ प्रकट करतो, पारधी गीतात एखादी भावना टोकाला जाऊन रंगविली जाते. पारध्यांची शिकारगीते समूहमनातुन निर्माण झालेली आहेत. शेवटी बदलत्या काळात लोकसाहित्याचे लोकधन जपले पाहिजे अशी सूचना संशोधकाने केली आहे.

**६. डॉ. मोरे कल्याण विठ्ठल - 'धुळे जिल्ह्यातील कोकणी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास' - डॉ.बा.आं.म.वि. औरंगाबाद.** [८६]

प्रस्तुत संशोधकाने पुढील उद्दिष्ट्ये निश्चित केली होती

१. कोकणी जमातीमधील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात होणारे परिवर्तन व प्रगतीच्या संदर्भात आढावा घेणे.

२. बिगर आदिवासी व कोकणी जमात यांच्यातील आंतरक्रिया व आंतरसंबंध तपासून पाहणे.

३. आदिवासींच्या विकासाकरिता शासनाने देऊ केलेल्या सवलतींचा व कल्याणकारी योजनांचा त्यांना कितपत फायदा झाला ते पाहणे.

४. कोकणी आदिवासींच्या भवितव्याविषयी तसेच त्यांची एकंदरीत परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने त्यांची मते तपासून पाहणे.

५. कोकणी जमाती अंतर्गत बदल तसेच बाहेरच्या संपर्कामूळे त्यांच्या समुदायात विषयाच्या अभिवृत्तीत होणारा बदल जाणून घेणे.

६. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या त्यांच्यात अगोदरची असलेली जनजातीची वैशिष्टये आज जशीच्या तशी राहिलेली नाहीत. तरी या सर्वांचे अवशेष बाकी आहेत का? याविषयीची माहिती मिळवणे.

संशोधकाने वरील उद्दीष्टये ठरवून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजही त्यांची समाधानकारक प्रगती न झाल्याने जमातीची धर्म, रुढीप्रियता, परंपरा यांची जोपासना या सर्वांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या शैक्षणिक अडचणी व सामाजिक, आर्थिक समस्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. इतरांच्या तुलनेत प्रत्येक बाबतीत ते मागासलेले आहेत असे संशोधकाचे मत आहे. शासनाच्या विकासाच्या योजना आणि त्या माध्यमातून कोकणी आदिवासींचा विकास कितपत झालेला आहे. ? या

योजना त्यांच्यापर्यंत पोहोचल्याच नाहीत का, याबद्दल त्यांना काय माहिती आहे, हे तपासण्याचा संशोधकाचा संशोधनामागचा हेतू आहे.

### ७. Dr. Arvind Kumar Jha - 'A study of pardhi's Struggle for survival VIS A VIS Wild life protection Acts : An anthro-ecological study' [८७]

उपरोक्त अभ्यासपुस्तकामध्ये डॉ. अरविंदकुमार झा यांनी वन्यजीव संरक्षण कायदा आणि पारधी समाजाच्या जीवनावर त्याचा झालेला परिणाम यासंबंधी अभ्यासपुर्ण विवेचन केले आहे. प्रारंभी पारधी समाजाचा इतिहास, कौटुंबिक जीवन, सामाजिक चाली, रुढी-परंपरा, आर्थिक व व्यावसायिक जीवन इ. ची ओळख करुन देऊन वन्यजीव संरक्षण कायद्याची निर्मिती व त्यामागील इतिहास याची विस्तृत माहिती दिली आहे. शिकार हा पारंपारिक व्यवसाय असल्याने पारधी लोकांच्या शिकार करण्याच्या पध्दती, त्यांचे कौशल्य यावर विवेचन करुन ब्रिटीशांनी केलेला वन्यजीवन संरक्षण कायदा, त्यामध्ये केलेले बदल याची नोंद घेतली आहे. पारधी समाजाचे वने व जंगले यावरील अवलंबित्व मांडताना त्यांच्या जीवनातील जंगलाचे महत्त्व सांगून त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवन संपुर्णपणे जंगलावर आधारित असल्याचे स्पष्ट केले आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे वन्य पशुपक्षांच्या शिकारीवर बंदी आली. उपजीविकेचे साधनच नाहिसे झाल्याने पारधी समाजाचे आर्थिक जीवन मोठ्या संकटात सापडले. इंधन, औषधे, आहार याबाबीची जंगल संपत्तीमधून पूर्तता होत होती. एवढेच नाही तर त्यांच्या उपजाती शिकार व्यवसायावरुन पडलेल्या असल्याने त्यांची स्वतःच्या समाजातील सामाजिक ओळख संकटात आली. यावर उपयायोजना सुचविताना जंगल आणि पारधी समाज यांचे अस्तित्व परस्परावर अवलंबून असून एक संपले तर दुसरा आपोआप संपेल म्हणून पारधी समाजाला आरक्षित जंगले निर्माण करुन द्यावीत व त्यांची संवर्धनाची जबाबदारीही त्यांच्यावर सोपवावी असा मध्यममार्ग सुचवला आहे.

**८. शेळके प्रताप शिवाजीराव - 'उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक अभ्यास (कळंब ता. संदर्भात)' (अर्थशास्त्र एम. फील. प्रबंध) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे** [८८]

संशोधकाने उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुका मर्यादित पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक समस्या संदर्भाने अभ्यास केला आहे. त्यांची जातपंचायत, भटकेपणा व इतिहास या

विषयीच्या प्राथमिक माहितीचा आढावा घेऊन समाजाच्या विकासासाठी त्यांचे आर्थिक व सामाजिक प्रश्न समजून घेण्यावर भर दिला आहे. पारधी समाजाची वैशिष्ट्ये, आर्थिक जीवन, व्यसनाधिनता, कर्जबाजारीपणा, दारिद्र्य या मुलभूत बाबीविषयी अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी

१. पारधी समाजाजवळ मुलभूत गरजा भागविण्याचे कायमस्वरुपी साधन नाही.

२. पारधी समाजातील बहुसंख्य लोक आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास आहेत.

३. पारधी समाज हा सतत भटकंती करणारा आहे.

ही गृहितके निश्चित केली करुन त्यानुसार कळंब तालुक्यातील उत्तरदात्यांकडून माहिती संकलित केली आहे. संकलित माहितीच्या आधारे 'या समाजात अल्पवयीन विवाहाचे १००% प्रमाण, विज्ञानावरील अविश्वास, सामाजिक व राजकीय संघटनाबद्दल उदासिनता' इत्यादी महत्वपूर्ण निष्कर्ष नोंदविले आहेत. या निष्कर्षांच्या आधारे जातपंचायत बंद करावी, आश्रमशाळा, बाजारपेठ इ. उपलब्ध करुन द्याव्यात, जाती जमातीमधील भेद नष्ट करावा, आर्थिक प्रगतीसाठी बचतगट स्थापन करावेत इ. शिफारशी केल्या आहेत.

# संशोधन पध्दती

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेचा प्रमुख आधार हा जातीव्यवस्था असून घटनेने प्रत्येकाला स्वातंत्र्य दिले असले तरी त्याची सामाजिक स्तरावर अंमलबजावणी करण्यात यश येताना दिसत नाही. महाराष्ट्रात विकासाचा प्रादेशिक व सामाजिक अनुशेष दिसुन येतो. विकासाच्या प्रक्रियेत काही घटक मागेच राहिले. त्यामुळे त्यांच्या मागासलेपणाची नेमकी स्थिती किंवा अवस्था कशी आहे हे अभ्यासणे महत्वाचे आहे.

राज्याच्या विविध भागात आदिवासी जमाती विखुरल्या आहेत. त्यांचा एकत्रित संशोधनाद्वारे आढावा घेणे कठीण आहे. महाराष्ट्रातील ४७ अनुसुचित जमातीपैकी एक असलेल्या पारधी या आदिवासी जमातीच्या वास्तव्याचा ठराविक एक असा जिल्हा नसून ते अनेक भागात कमी अधिक संख्येने विखुरलेले आहेत. त्यांना उपजीविकेसाठी नेहमी स्थलांतर करावे लागते. त्यामुळे भटकंतीचे जीवन हीच त्यांची ओळख आहे.

पारधी जमातीच्या वस्तीसाठी उस्मानाबाद जिल्हा प्रसिध्द आहे. म्हणुन मी उस्मानाबाद जिल्ह्यातील आदिवासी पारधी समाजाचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाचे कार्यक्षेत्र म्हणून उस्मानाबाद या एका जिल्ह्याची निवड केली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात प्रामुख्याने भूम, तुळजापूर, परंडा, वाशी, कळंब येथे मोठया संख्येने पारधी वस्त्या आढळतात. हा समाज मागासलेला असून त्याची आजची स्थिती नेमकी कशी आहे? त्यांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक जीवन व सामाजिक समस्या यांचा अभ्यास करण्यासाठी मी प्रस्तुत संशोधन विषय निवडला आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रशासनाने अनेक शासकीय योजना राबवून पारधी समाजाला प्रगत प्रवाहात सामील करुन घेण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न किती यशस्वी झाला? पारधी जमातीत सामाजिक, शैक्षणिक इ. परिवर्तन घडवून आणता आले का? याचाही अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला आहे.

'पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ - उस्मानाबाद जिल्हा' या प्रस्तुत अभ्यास विषयात संशोधन करण्यासाठी पुढील संशोधन पध्दतीचा व तंत्राचा अवलंब केला आहे.

## २.३ संशोधन आराखडाः-

कोणतेही कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी सर्वप्रथम त्या कार्याचा आराखडा आखावा लागतो. संशोधकाला त्या कार्याचे पध्दतशीर नियोजन, त्याची रुपरेषा आणि मांडणी करावी लागते. 'संशोधन आराखडा' ही सामाजिक संशोधनातील एक प्रमुख पायरी आहे. संशोधनाचा विषय, उद्देश, संशोधनाचे क्षेत्र, संशोधनास आवश्यक असणारी माहिती संकलित करणे, तथ्य संकलन पध्दती व तंत्र, नमुना निवडीचे आधार, तथ्य संकलनाची साधने इ. सर्व गोष्टी प्रथमतः निश्चित कराव्या लागतात.

वेबस्टर्स इंटरनॅशनल डिक्शनरी नुसार "संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परिक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पध्दतशीरपणे केलेले परिश्रम होय. " [८९]

संशोधन ही एक बौध्दिक प्रक्रिया असून तिच्याद्वारे नवीन ज्ञान प्रकाशात आणले जाते. किंवा जुन्या ज्ञानातील उणिवा सुधारल्या जाऊन त्यात नवीन ज्ञानाची भर टाकली जाते. "कोणतेही संशोधन जेव्हा सामाजिक तथ्ये, घटना, सिध्दांत किंवा नवीन ज्ञान ह्या बाबतीत संबंधित असते, तेव्हा त्याला सामाजिक संशोधन म्हणतात. " [९०] सामाजिक संशोधनाचा संबंध सामाजिक घटनांशी असून सामाजिक घटनांचा अभ्यास समाजसुधारणा, प्रगतीसाठी अत्यंत उपयूक्त ठरतो.

"संशोधनाचे दोन प्रकार आहेत.

१. मौलिक किंवा शुध्द संशोधन

२. व्यावहारिक किंवा क्रियाभिमुख संशोधन. " [९१]

प्रस्तुत संशोधन विषयासाठी क्रियाभिमुख संशोधनाचा अवलंब केला आहे.

संशोधन सुरु करण्यापूर्वी प्रथम संशोधन आराखडा तयार करावा लागतो. आराखड्यामुळे त्या कार्याला सुसूत्रपणा, व्यवस्थितपणा येतो. सामाजिक संशोधनातील 'संशोधन आराखडा' मध्ये संशोधन विषय, उद्देश, अध्ययन क्षेत्र, कालावधी, तथ्य संकलन, नमुनानिवडीचे आधार, साधने, माहितीचे विश्लेषण इ. गोष्टींचा विचार करावा लागतो. त्यामूळे वेळ, शक्ती, पैसा इत्यादीची बचत होते आणि येणाऱ्या अडचणींची ओळख होते. म्हणून आराखडा महत्त्वाचा असून रॉबर्ट एल. एकॉफ यांच्या मते "निर्णय क्रियान्वीत करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निर्धारित करण्याच्या प्रक्रियेला आराखडा म्हणतात. " [९२]

सेल्टिज, जहोडा, डवॉईश व कुक यांच्या मते "संशोधनाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी निष्कर्षाची संबंधता व संशोधन कार्यातील मितव्यय यांची सांगड घालता येण्याच्या दृष्टीने तथ्याचे संकलन आणि विश्लेषण करण्यासाठी आवश्यक अटींची नियोजित व्यवस्था म्हणजेच संशोधन आराखडा होय. " [१३]

सामाजिक संशोधनासाठी संशोधन आराखडा आवश्यक असून तो संशोधनाच्या उद्दीष्टाप्रमाणे बदलत असतो. "सामान्यपणे संशोधन आराखड्याचे चार प्रकार पडतात.

१. अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा

२. वर्णनात्मक संशोधन आराखडा

३. निदानात्मक संशोधन आराखडा

४. प्रयोगात्मक संशोधन आराखडा " [१४]

प्रस्तुत संशोधनासाठी, संशोधन विषय तसेच संशोधनांची उद्दिष्टे यांचा विचार करुन अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखड्याची निवड केली आहे. कारण अन्वेषणात्मक अध्ययनामुळे संशोधकाला त्या विषयाशी संबंधित असणाऱ्या विविध पैलूंची माहिती होते.

### २.४ संशोधन समस्या:-

प्रस्तुत संशोधनाचा विषय 'पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास-विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा' हा आहे. या संशोधनातून पारधी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक जीवनाचा आढावा घेण्यात आला आहे. यामधून त्यांचे जीवनातील अनेक सामाजिक, आर्थिक इत्यादी समस्यांनी व्यापले आहे हे लक्षात येते. आपल्या मागासालेपणाची जाणीव व त्यामागची कारणे याबाबत हा समाज अनभिज्ञ आहे. पारंपारिक जीवनशैली आणि प्रगतांच्या संपर्कामुळे त्यामध्ये होणारे बदल यामुळे हा समाज स्थितंरातून जात आहे. या स्थितंतराचाही आढावा या संशोधनातून घेतला आहे. त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी व आर्थिक जीवन उंचावण्यासाठी शासकीय स्तरावर होत असलेल्या प्रयत्नांच्या अभ्यासाचाही प्रस्तुत संशोधनात समावेश आहे.

### २.५ संशोधनाची उद्दीष्टे:-

डॅनियल किट्झच्या म्हणण्यानुसार "परिचयात्मक अध्ययनाचा उद्देश गृहीत कृत्याची चाचणी घेणे नसून मिळालेल्या माहितीचे वर्णन करणे हा असतो." [१५]

पारधी समाज हा आदिवासी समाज असला तरी इतर आदिवासी समाजाच्या समस्या आणि पारधी समाजाच्या समस्या यामध्ये भिन्नता आहे. स्वातत्र्योत्तर काळात गुन्हेगारीच्या शिक्क्यातून

शासकीय मुक्ती मिळाली तरी सामाजिक समस्येच्या रुपाने ती अजूनही अस्तित्वात असून याशिवाय अनेक आर्थिक, शैक्षणिक समस्यांनी त्यांचे जीवन व्यापले आहे.

प्रस्तुत संशोधनाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत -

१. पारधी समाजाच्या कौटुंबिक, वैवाहिक जीवनाचा आढावा घेणे.

२. पारधी समाजाच्या शैक्षणिक जीवनाचा अभ्यास करणे.

३. पारधी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनाचे आकलन करणे.

४. पारधी समाजाच्या आर्थिक व व्यावसायिक जीवनाचे विश्लेषण करणे.

५. पारधी समाजाचे सामाजिक प्रश्न आणि सुधारणा चळवळी या अनुषंगाने आढावा घेणे; आणि उपाय सुचविणे.

**संशोधनाची व्याप्ती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी 'उस्मानाबाद जिल्हा' हे संशोधनाचे क्षेत्र असून जिल्ह्यातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, कौटुंबिक, इ. जीवन व समस्या अभ्यासणे आणि शासकीय योजनांचे यशापयश अभ्यासण्यापर्यंत व्याप्ती राहील. प्रस्तुत संशोधनासाठी २००१ ते २०१२ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

**अभ्यासाचे वेगळेपण :-**

अनेक संशोधकांनी आदिवासी समुदाय आणि जमाती संदर्भाने विविध विषयांचा अभ्यास केला आहे. पण ते अल्प असून मागिल काही काळापासून विविध लेखन व संशोधनातुन महाराष्ट्रातील आदिवासींची सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक स्थिती व जीवनपध्दती पूढे येत आहे. सर्व जमाती सारख्याच विकासाच्या स्तरावर नाहीत. त्या स्थित्यंतराच्या वेगळयाटप्प्यावर आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात मिश्र आदिवासी जमाती २% असून पारध्यांचे जीवन मागासलेले आहे. पारधी जमातीला इतर समाजाप्रमाणे निश्चित उपजिवीकेचे साधन नाही. गुन्हेगारी जमातीचा शिक्का असल्यामुळे जीवनाला स्थैर्य नाही. स्वातंत्र्याच्या ६० वर्षानंतरही हे चित्र फारसे बदलले नाही.प्रगत समाज आणि पोलिसांचा संशय, भटकंती यामुळे उध्वस्त जीवन जगणाऱ्या पारधी समाजाची वस्तुस्थिती या संशोधनातुन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्याबद्दलचे पूर्वग्रह बदलुन त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

**संशोधनाचे महत्त्वः-**

आदिवासी समूदाय हा इतर कोणत्याही समूदायापासून अनेक दृष्टीनी वेगळा असल्याचे प्रचितीस येते. आदिवासींमधील अलगत्वाची भूमिका राष्ट्रीय एकात्मतेला धोका असल्याने त्यांना प्रगत प्रवाहात आणणे, त्यांच्या विकासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. पण आदिवासी जीवनावर अध्ययनाची गती कमी आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचा विविध अंगानी अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

विशिष्ट जातीच्या सर्वच लोकांचा अभ्यास अतिशय कठीण आहे; पण ठराविक भागातील ठरावीक जमातीचा अभ्यास सर्वांगाने करुन त्यांच्या समग्र जीवनाचे विविध पैलू समजण्यास मदत होते.

स्वातंत्र्योत्तर काळातील विकास प्रक्रिया लक्षात घेता त्यांना अलग ठेवून, त्यांच्या संस्कृतीला जपणे शक्य नाही. त्यांच्यातील सामाजिक, सांस्कृतिक आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण व दुरत्व कमी करुन त्यांना समाजाच्या, राष्ट्राच्या मूख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

भटकंती, अस्थिर जीवन जगणाऱ्या पारधी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, जातपंचायत आर्थिक, व्यावसायिक जीवनासंबंधी अधिकृत अशी संशोधित व वस्तुनिष्ठ माहिती तसेच संदर्भ अल्प प्रमाणात उपलब्ध आहेत. म्हणून हे संशोधन महत्त्वाचे आहे.

उपेक्षा, वंचना, गुन्हेगारीचे जीवन, योग्य नेतृत्वाचा अभाव, शैक्षणिक दृष्टीकोनाचा अभाव, फसवणूक इ. मुळे अत्यंत दयनीय जीवन त्यांच्या वाट्याला आले आहे. आणि यामूळेच त्यांच्या व्यक्तीगत व सामाजिक विकासाला खीळ बसली असून या अध्ययनामुळे सध्याच्या विकासासाठीच्या शासकिय प्रयत्नांच्या यशापयशाची चिकीत्सा करण्यास मदत होईल.

**२.६ संशोधनाच्या मर्यादाः-**

प्रस्तुत संशोधन विषयातील अभ्यासाच्या मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

१. नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या उत्तरदात्याच्या कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व शासकीय योजना इ. संदर्भाने प्रश्न मुलाखत अनुसूचीच्या साहाय्याने काढलेले निष्कर्ष परिपूर्ण व अचूकपणे काढण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही उत्तरदात्यांच्या प्रतिसादाबाबत अचूक व नेमकी माहिती संदर्भाने कांही उणिवा असण्याची शक्यता आहे.

२. प्रस्तुत संशोधनातुन काढलेले निष्कर्ष हे प्रातिनीधीक स्वरुपाचे आहेत.

३. प्रस्तुत संशोधन उस्मानाबाद जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

४. या संशोधनात पारधी जमातीच्या राजकीय व आरोग्यविषयक जीवनाच्या अभ्यासाचा समावेश नसल्याने प्रस्तुत विषयावर सूक्ष्म संशोधनास वाव आहे.

५. औपचारिक शिक्षणाच्या अभावामुळे तार्किकदृष्ट्या सुसंगत अशी माहिती देण्यात ही कुटुंबे असमर्थ होती.

६. दुय्यम स्त्रोंतातील माहिती व वस्तुस्थिती यात काहीशी तफावत जाणवली.

७. पारधी जमातीच्या उत्तरदात्याचे पूर्वगृह, भाषा, इत्यादी मर्यादितआहेत.

८. प्रस्तुत संशोधन विषयाचा कालावधी २००१ ते २०१२ एवढा मर्यादीत आहे.

## २.७ सैध्दांतिक आधार

१. समाजशास्त्रीय सैध्दांतिकदृष्ट्या विचार करता समाजातील उपेक्षित वर्गाच्या संदर्भाने सापेक्ष वंचितता सिध्दांत, (Relative Deprivation theory) वंचितांचा अभ्यास/लोकउठावात्मक दृष्टीकोन (Subaltern Studies) आणि परात्मीकरण (Alienation Theory) या सिध्दांताला अनुसरुन पारधी समाज जीवनाची व मागासलेपणाची मिमांसा करता येईल.

सापेक्ष वंचिततेचा सिध्दांत दोन पैलुंना अनुसरुन विकसित झाला आहे. पहिला पैलू म्हणजे सामाजिक गतिशीलता आणि दूसरा पैलू म्हणजे सामाजिक संघर्ष होय. रॉबर्ट मर्टन यांनी सर्वप्रथम १९५० मध्ये आणि त्यानंतर १९६६ मध्ये रेन्सीमन यांनी विधायक संदर्भ समुहाच्या जीवन पध्दतीच्या संदर्भात इतर गटात होणाऱ्या सामाजिक गतिशीलतेच्या (Social mobility) अनुषंगाने सापेक्ष वंचिततेच्या सिध्दांताचे विश्लेषण केले आहे. एका सामाजिक समुहाला विशिष्ट बाबीचा लाभ झाला तर दूसरा समूह मात्र त्या लाभापासून वंचित राहिला. त्यामुळे तो समूह इतर समाजाच्या तुलनेत स्वतःला लाभापासून वंचित मानतो.

कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगल्स आणि अबर्ले (Aberle) यांनी १९६६ मध्ये सामाजिक संघर्षाच्या अनुषंगाने सापेक्ष वंचितता सिध्दांताची मिमांसा केली. त्यांच्या मते 'भौतिक स्थिती, दर्जा, वर्तन अपेक्षा आणि वस्तुस्थिती यातील नकारात्मक भेद म्हणजे सापेक्ष वंचितता होय'. सुप्रसिध्द विचारवंत गुर्र (Gurr) यांनी १९७० मध्ये सापेक्ष वंचितता सिध्दांताचे आर्थिक स्थिती, राजकीय शक्ती आणि सामाजिक दर्जा या दृष्टीकोनातुन महत्त्वकांक्षात्मक वंचिंततेआधारे विश्लेषण केले. याचाच अर्थ "जेंव्हा लोकांमध्ये आपण कांही गोष्टीपासुन वंचित आहोत, आपणाशी इतरांप्रमाणे योग्य व्यवहार केला जात नाही अशी भावना निर्माण होते तेंव्हा ते सामाजिक चळवळ निर्माण करतात." [९६] म्हणजेच समाजातील ही विषमता निर्माण होण्यास आर्थिक, राजकीय आणि सामाजिक स्थिती जबाबदार आहे. पारधी हा स्वतःला मुळनिवासी म्हणवणाऱ्या समाजाचा प्रतिनिधी असूनही वंचिततेच्या भावनेमुळे, समाजाच्या नकारात्मक मानसिकतेमुळेच अगतिकपणे वागतो आहे आणि वंचिततेचे जीवन जगतो आहे. "भारतातील सामाजिक चळवळीच्या उदयाचा विचार केल्यास सापेक्ष वंचितता हा घटक सर्वात प्रबळ ठरतो. कारण भारतातील बहुसंख्य जनता ही सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक बाबतीत वंचिततेचे जीवन जगत आहे." [९७] पारधी समाजात वरील सर्वच बाबींचा अभाव असल्याने पारधी मागासलेपणाचे जीवन जगतो आहे. पैसा

हे स्वीकृत अंतिम ध्येय असले तरी तो मिळविण्याच्या संधीचा अभाव तेथे आहे. समाजमान्य मार्गाने त्यांना यश मिळत नाही. परिणामी उपजिवीकेसाठी गैरमार्गाचा अवलंब केला जातो. इतर घटकाबरोबरच्या वंचिततेच्या प्रबळ जाणिवेतुनच अशा प्रकारचे वर्तन घडुन येते असे म्हणता येईल.

**२. लोकउठावात्मक दृष्टीकोन -** [९८]

इटालियन तत्वज्ञ आणि इतिहासकार ॲटानियो ग्रामची (१८९१-१९३७) यांने 'सबाल्टर्न सिंध्दात' मांडला. यातील वर्गसंघर्षाची भूमिका नाकारुन डॉ. रणजित गुहा यांनी समाजातल्या 'आहे रे' व 'नाही रे' या गटांऐवजी त्यांनी अभिजन (Elitist) आणि वंचित (Subaltern) असे दोन गट गृहीत धरुन चिंतन केले. अशा प्रकारे भारतात सबाल्टर्नवादाची पायाभरणी करण्याचे श्रेय डॉ. गुहा यांना जाते. समाजातील दुर्लक्षित, वंचित लोकांच्या अस्मिता शोधण्याचा प्रयत्न येथे केला आहे. प्रभाव गटाने नोंदवलेला इतिहास नाकारुन समाजातील वंचित गटांनी आपला स्वतःचा इतिहास शोधला पाहिजे ही भूमिका डॉ. गुहांनी मांडली. डॉ. गुहांच्या या भूमिकेमुळेच १९२२-२३ मधील गुजरातमधील आदिवासीचे उठाव, गुजरातमधील भिल्ल व सावकारांचा संघर्ष इ. प्रश्नांचा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणे शक्य झाले.

आदिवासी पारधी समाजाची एक लढवय्यी जमात म्हणून ओळख असून स्वातंत्र्य लढ्यात या जमातींचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांचा इतिहास लिहिला गेला पाहिजे. वंचितांचा इतिहास डावलून इतिहास / समाज रचना पूर्ण होत नाही. स्वतःला मुळनिवासी म्हणणाऱ्या आदिम समाजाचा पारधी हा प्रतिनिधी असल्याचा पुरावा इतिहासामध्ये सापडतो. अप्रगत मानवी समाजाची आजच्या प्रगत आधूनिक समाजाकडे होणारी वाटचाल महत्त्वाची असून भारतीय संस्कृती वाचवण्याचा व टिकविण्याचा प्रयत्न या वंचित गटाने केला आहे. पण विकासापासून वंचित राहिलेल्या पारधी समाजात अस्वस्थता आढळते. १९७० च्या दशकात वंचित आदिवासी गटाच्या परिवर्तनाच्या दिशेने झालेल्या इतिहासाचे पुनर्लेखन व्हावे असा विचार वाढीस लागला. वंचितांची समाजरचना, सामाजिक संबंध, वरिष्ठांकडून मिळालेली हीनतेची वागणूक सामाजिक व आर्थिक स्वरुपाचे अत्याचार, विषमतावादी दृष्टीकोन, त्यांच्या अज्ञानाचा- दारिद्र्याचा घेतलेला गैरफायदा, अन्यायी कायदे, इ. सारखे घटक लोक-उठावाला कारणीभूत ठरले.

ग्रामचीच्या 'Subaltern ' इतिहास लेखनाला श्री. रणजित गुहा यांनी १९८२ मध्ये प्रकाशित केलेल्या सबाल्टर्न स्टडीज - १ या ग्रंथामुळे चालना मिळाली.

३. **हर्बर्ट स्पेन्सर (१९५५)** "प्राणीसृष्टीतच जीवनसंघर्ष होत असे नाही तर मानव समाजात सुध्दा तो चालु होता." [९९] या पृथ्वीवर अनेक समाज निर्माण झाले पण काही काळाच्या ओघात नष्ट झाले. सभोवतालच्या वातावरणात ज्या मानव समाजाला जूळवून घेता आले किंवा वातावरण व समाज यांचे संयोजन घडून आले ते जिवंत राहू शकले. आणि जे तग धरुन राहिले त्यांनासुध्दा संघर्ष करावा लागला.

पारधी समाज हा स्वतःला मुळ निवासी म्हणवणाऱ्या आदिवासी समाजाचा प्रतिनिधी असल्याचा पुरावा इतिहासात असून तेव्हापासूनच्या प्रवाहात हा समाज तग धरुन आहे. अतिप्राचीन व कमालीच्या अप्रगत मानवी समाजाची प्रगत आधुनिक समाजाकडे होणारी वाटचाल हा स्पेन्सरचा सिध्दांत होय. जीवन अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागतो. जो सबळ आहे तो टिकेल म्हणजेच जगेल यावर संघर्ष सिध्दांतकारांनी भर दिला आहे. पारधी याच अस्तित्वासाठी धडपडत आहे. समाज, सत्ता, प्रतिष्ठा, अशा घटकांशी त्याची फारकत झाली आहे. वरील बाबींचे वितरण समानतेच्या आधारावर आधारित नसून असमानतेच्या तत्वावर आधारलेले आहे. तसेच प्रचलित नवीन शोध, नवीन मुल्यांचा उदय यामुळे सर्व क्षेत्रात जुन्या मुल्यांना नवीन मुल्यांकडून धक्का बसला आहे. नवीन घटकांचे ज्ञान नसल्यामुळे जुन्या-नव्याची सांगड घालताना संघर्षाला सामोरे जावे लागते. आज समाजात अधिकारी व्यवस्थेशिवाय कोणतीही संघटना अस्तित्वात येत नाही. या व्यवस्थेत आज्ञा देणारा नैतिकता व कायदा झुगारुन सबळ म्हणून आज्ञा देत असेल तर आज्ञा पालन करणारा त्याकडे दुर्लक्ष करतो. परिणामी संघर्ष उद्‌भवतो. पारधी या सर्व वातावरणात जुन्या-नव्याची सांगड घालत, परिस्थिती समायोजन साधत म्हणजेच तग धरण्यासाठी संघर्ष करीत या प्रगत समाजात वाटचाल करीत आहे तो दैनंदिन जीवनाचा गुंता सोडवण्यात, परंपरा जपण्यात, आणि येणाऱ्या अनेक समस्यांना तोंड देत जगत आहे.

**४. कार्ल मार्क्स :-**

"Alienation is the activity or process by which one becomes stranger to oneself" "परात्मीकरण ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यात स्वतः व्यक्ती स्वतःसाठी परकी बनते." [१००] व्यक्ती व समाजाच्या सामाजिक जीवनामध्ये इतिहासातील घडामोडी, इतर समाजाचा संपर्क आणि सभोवतालच्या परिस्थितीमध्ये होणारे बदल इ. कारणांमुळे स्वतःची पारंपारिक जीवनशैली, व्यवसाय, सामाजिक प्रतिष्ठा, स्वतःची ओळख यात अनेक बदल घडून येतात. हे बदल नकारात्मक, अस्वीकार्य आणि व्यक्ती व समाजाची संस्कृती व ओळख नाहीशी करणारे असतील तर त्या व्यक्ती व समाजात परात्मतेची भावना निर्माण होते.

ब्रिटीशांच्या आगमनापूर्वी आदिवासी पारधी समाज हा शिकार व्यवसाय करीत जंगलाच्या सानिध्यात वास्तव्य करुन, आपली स्वतंत्र ओळख असलेली पारंपारिक संस्कृती, रुढी, परंपरा इत्यादीची जपणुक करत आपले जीवन व्यतित करीत होता. इंग्रजांनी वन्यजीव संरक्षण कायद्याद्वारे जंगलसंपत्ती ताब्यात घेतली. त्यामुळे पारधी समाजाच्या उदरनिर्वाहाच्या साधनाचा प्रश्न निर्माण झाला. इंधन, आहार, वनौषधी इ. संदर्भानेही त्याचे जंगलावरचे अवलंबित्व नाहीसे झाले. अज्ञान व इतर व्यवसायांच्या कौशल्याअभावी चोरी, लुटमारीकडे हा समाज वळला. त्यामुळे ब्रिटीशांनी पारधी जमातीला गुन्हेगार जात ठरवले. परिणामी त्यांची सामाजिक प्रतिष्ठाही धोक्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळात नवजीवनाला प्रारंभ करताना पारंपारिक जीवनशैली, निरक्षरता, व्यावसायिक कौशल्याचा अभाव, आर्थिक दारिद्र्य, भटकंतीची सवय, व्यसनाधिनता, रुढी, पंरपरा इ. मुळे अडथळयांचा सामना करणे कठीण बनले. व्यवसायावर आधारित पोटजाती असल्याने व शिकारीवर बंदी आल्याने जमातीअंतर्गत स्वतःची सामाजिक ओळख नष्ट होऊ लागली. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे समाजाची प्रतिष्ठा व स्वतःची ओळख हरवली गेली. या सर्व स्थित्यंतरामुळे पारधी समाजात परात्मतेची भावना निर्माण झाली आहे.

## २.८ गृहितके :-

संशोधनासाठी गृहितकृत्यांची योजना आखताना सामाजिक शास्त्रात संशोधकाला संशोधनविषयाला अनुसरुन गृहितके विचारात घ्यावी लागतात.

गुडे आणि हॅटच्या मते "गृहितकृत्य म्हणजे असे अनुमान की, जे तथ्य निरीक्षणावर आधारलेले असून त्यामूळे भावी संशोधन कार्याला चालना मिळते." [१०१]

गृहितकृत्य म्हणजे गृहित धरलेले विधान, तत्व अथवा अट होय.

यावरुन असे म्हणता येते की, सिध्दांत जर अनुभवविश्वाच्या संकल्पनीकृत प्रतिकृती असतील तर अनुभवविश्व आणि सिध्दांत यांच्यात एक दुवा असावयास हवा. सैध्दांतिक व्यवस्थेच्या प्रमेयांना प्रतिबिंबित करणाऱ्या गृहितकृत्यांना असे दुवे म्हणता येईल. प्रस्तुत संशोधनासाठी पुढील विधाने गृहितकृत्याच्या स्वरुपात निवडली आहेत.

१. पारधी समाज मागासलेला आहे.

२. शिक्षणाचे व साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

३. तो आर्थिकदृष्ट्या विवंचनेमध्ये जीवन जगतो.

४. प्रगत समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक आहे.

५. पारधी समाजात अनेक रुढी-परंपरा, अंधश्रध्दा अस्तित्वात आहेत.

६. पारधी समाजाचे जीवन अनेक समस्यांनी व्यापले आहे.

## २.९ संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन विषयाचे संशोधन क्षेत्र उस्मानाबाद जिल्हा आहे. जिल्ह्यातील आठ तालुक्यातील तालुकानिहाय सर्व पारधी वस्ती संख्या लक्षात घेता जिल्ह्यातील त्यांचे प्रमाण लक्षात येते. प्रस्तुत संशोधनासाठी वैज्ञानिक पध्दतीचा वापर केला असून तथ्य संकलनासाठी सहभागी व असहभागी निरीक्षण, मुलाखत अनुसूची व सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. शास्त्रीय पध्दतीने माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम तंत्राचा अवलंब करुन संशोधन करण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टे निश्चित केली आहे.

### २.९.१ नमुना निवड :-

प्रस्तुत संशोधन विषयासाठी प्रश्नावलीच्या माध्यमातून उपयुक्त माहिती संकलित करण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील ३०० पारधी उत्तरदात्यांची लोकसंख्येच्या घनतेनुसार सहेतूक नमुना निवड

पध्दतीने निवड केली. संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे संकलन प्रश्नावलीमधील विविध प्रश्न विचारुन करण्यात आले आहे.

**२. क्षेत्र निवड :-**

प्रस्तुत संशोधनाचे उस्मानाबाद जिल्हा हे कार्यक्षेत्र आहे. जिल्ह्यात एकूण आठ तालुके असून जिल्ह्यातील पारधी जमातीची लोकसंख्या १५,१५५ इतकी आहे. ती जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या १.०२ टक्के इतकी आहे. तर जिल्ह्याच्या आदिवासी लोकसंख्येच्या ५४ टक्के पारधी लोकसंख्या आहे.

**पारधी पेढ्यांची तालुकानिहाय यादी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. **उस्मानाबाद** | १. जुना बस डेपो | २ इंदिरानगर | ३. तांबरी विभाग |
| | ४. शिंगोली | ५. सांजा | ६. बुकनवाडी |
| | ७. तेर | ८. ढोकी | ९. पळसप |
| | १०. कसबे तडवळा | ११. वरुडा | १२. शिंदेवाडी |
| | १३. गावसूद | १४. झरेगाव | १५. कौडगांव |
| | १६. कोंड | | |
| २. **तुळजापूर** | १. मंगरुळ पाटी | २. कामठा | ३. काक्रंबा वाडी |
| | ४. ताकविकी | ५. नांदूर्गा पेढी | ६. मगरसांगवी |
| | ७. येवती | ८. मानेवाडी | ९. सिंदगाव |
| | १०. अणदूर | ११. यमगरवाडी | १२. तुळजापूर (खुर्द) |
| | १३. नळदुर्ग | | |
| ३. **वाशी** | १. वाशी | २. बारलोणी | ३. शेंडी |
| | ४. कासार खणी | ५. इंदापूर | ६. कागदी गोलेगांव |
| | ७. पार्डी | ८. कन्हेरी | ९. सरमकुंडी |
| | १०. रामकुंड | ११. ईट | १२. अंथ्रुड-पखरुड |
| | १३. लोणखस | १४. लाखणगाव | १५. खामकरवाडी |
| | १६. तेरखेडा | | |
| ४. **भूम** | १. बस स्टॅन्डमागे | २. इंदिरानगर | ३. दावलमलीक जवळील |
| | ४. गोलेगांव | ५. वंजारवाडी | ६. वाल्हा |

| | | | |
|---|---|---|---|
| | ७. चिंचपूर | ८. सोन्नेवाडी | ९. भवानवाडी |
| | १०. बावी | ११. डोकेवाडी | |
| ५. **परंडा** | १. हंगेवाडी | २. अनाळा | ३. रोहकल |
| | ४. पांढरेवाडी | ५. इनगोंदा | ६. जवळा |
| | ७. ब्रम्हगाव | ८. खासगाव | ९. बंगाळवाडी |
| | १०. सिरसाव | ११. ऐनापूरवाडी | १२. परंडा |
| | १३ टाकमोंडवाडी | | |
| ६. **कळंब** | १. गायरान | २. मार्केट यार्ड | ३. सावरगाव |
| | ४. इंदिरा नगर | ५. शेळका धानोरा | ६. मोहा |
| | ७. मस्सा | ८. कन्हेरवाडी | ९. अंदोरा |
| | १०. मांडवा | ११. इटकूर | १२. टोकणी |
| | १३.घोगा, इटकूर | १४.बिच्छाची, इटकूर | १५. कोठाळवाडी |
| | १६. वाकडी | १७. वाकडी चवाळी | १८. पाथर्डी |
| | १९. पारा जोगेश्वरी | २०. पारा गायरान | २१. लाखनगाव |
| | २२.कमळेश्वरी पिंपळगाव | २३. शिराढोण | २४. चोराखळी |
| | २५. येरमाळा | २६. नागझरवाडी | २७. खामसवाडी |
| | २८. कोथळा | २९. गोविंदपूर | ३०. खामसवाडी कमसर |
| | ३१. भाटशिरपूरा | ३२. दत्तनगर | ३३. तेरणा कारखाना |
| | ३४. ढोकी | ३५. तडवळा | ३६. भिकार सारोळा |
| ७. **उमरगा** | निरंक | - | - |
| ८. **लोहारा** | निरंक | - | - |

जिल्ह्यात एकूण १०५ वस्त्या आहेत. याशिवाय भटकंतीमुळे इतरत्रही अनेक ठिकाणी यांचे वास्तव्य आढळून आले.

**३. तालुका निवड :-**

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद, तुळजापूर, भूम, परंडा, वाशी, कळंब या सहा तालुक्यांमध्ये पारधी वस्ती संख्या अधिक आहे. लोहारा आणि उमरगा तालुक्यात त्याचे अत्यंत तुरळक

व अपवादात्मक वास्तव्य असल्याने हे दोन तालुके वगळण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सहा तालुक्यातील पारधी वस्ती संख्या आणि तेथील उत्तरदात्यांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. २.६**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी उत्तरदाते नमुना निवड दर्शविणारा तक्ता**

| तालुका | वस्ती संख्या | नमुना कुटुंब संख्या |
|---|---|---|
| उस्मानाबाद | १६ | ५० |
| तुळजापूर | १३ | ४५ |
| वाशी | १६ | ५० |
| परंडा | १३ | ४५ |
| भूम | ११ | ५० |
| कळंब | ३६ | ६० |
| **एकूण** | **१०५** | **३००** |

लोहारा आणि उमरगा तालुक्यात यांचे प्रमाण अत्यल्प असल्याने इतर तालुक्यांतील गावांची नमुना गावे म्हणून निवड केली. गावाची निवड करतांना तेथील लोकसंख्येची घनता लक्षात घेऊन वस्त्यांची निवड केली.

**४. गाव निवड :-**

उस्मानाबाद जिल्ह्यात ७२९ गावे व १०५ पारधी वस्त्या असल्याची अधिकृत माहिती मिळाली. याशिवाय प्रत्यक्ष सर्वेक्षणादरम्यान इतर ठिकाणीही यांचे वास्तव्य असल्याचे आढळले. प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षणासाठी गावाची निवड करताना जास्त पारधी लोकसंख्या असणाऱ्या गावांतील वस्त्याची नमुना गावे म्हणून निवड करण्यात आली आहे.

**५. कुटुंबाची निवड :-** कुटुंबाची निवड करताना खालील चारही गटातील कुटुंबांना योग्य प्रतिनिधीत्व मिळेल अशा पध्दतीने निवड केली.

१. शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही विभागातील कुटुंबे.

२. भटकंती करणारी आणि स्थिर जीवन जगणारी कुटुंबे

३. स्त्री-पूरूष, विशेष कुटुंबप्रमुख, वयस्कर व्यक्ती इ.

४. नोकरदार / कार्यकर्ते यांची कुटुंबे.

निवडलेला नमुना गट प्रातिनिधीक असावा म्हणून उत्तरदाता म्हणून कुटुंब प्रमुखच निवडला जेणेकरुन संपूर्ण सुसंगत माहिती घेणे सुलभ झाले. ज्यांनी जमातीतील बदल अनुभवला आहे तेच पूर्वीची आणि सद्य स्थिती यांची माहिती ते देवू शकतील या उद्देशाने कुटुंबकर्ता, अनुभवी, विवाहित व्यक्ती इ.ची निवड केली. सहा तालुक्यातील वस्ती आणि कुटुंबसंख्येच्या प्रमाणात निवडक कुटुंबाकडून अनुसूची भरुन घेण्यात आली. वस्ती संख्या जास्त असली तरी वस्तीत कुटुंबसंख्या कमी असल्याने जास्तीत जास्त वस्त्यांना भेटी द्याव्या लागल्या. या सर्वेक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या अनुसूचीची १० विभागात विभागणी केली होती.

**२.९.२ तथ्य संकलन:-**

कोणत्याही संशोधनातील तथ्य संकलन ही महत्त्वाची प्रक्रिया असून तथ्य संकलनाचे प्रश्नावली, मुलाखत अनुसुची, निरीक्षण, सर्वेक्षण इ. अनेक मार्ग आहेत.

"पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा" या प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी मुलाखत अनुसूची या तंत्राचा वापर केला. तसेच सहभागी निरीक्षण, असहभागी निरीक्षण, कॅमेरा या साधनांचाही वापर केला. शास्त्रीय पध्दतीने निवडलेल्या प्रत्येक गावास वारंवार भेटी दिल्या. विविध धार्मिक विधीस उपस्थित राहूनही तथ्य संकलन केले.

**प्राथमिक तथ्य :-**

"कोणत्याही संशोधन अध्ययनात प्राथमिक स्त्रोत व द्वितीयक स्त्रोत असे तथ्य संकलनाचे दोन स्त्रोत असून निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली इ. द्वारे संकलित तथ्यांना 'प्राथमिक तथ्ये' असे म्हणतात." [१०२]

प्राथमिक स्त्रोतामध्ये अनुसूची तंत्राचा वापर केला आहे. "मुलाखत अनुसूची ही एक प्रकारे प्रश्नावली असून मुलाखत घेणारा संशोधक उत्तरदात्यांना प्रश्न विचारुन इतर व्यक्तीसमोर ती भरण्याचे कार्य करतो." [१०३]

अनुसुची हे तथ्य संकलनाचे प्रभावी साधन आहे. अनुसूचीचे स्वरुप संशोधन विषयानुसार बदलते. प्रस्तुत संशोधनासाठी "मुलाखत अनुसूची" या तंत्राचा अवलंब केला आहे. मुलाखत अनुसूचीत संशोधक व संशोधनाचे एकक यांच्यात प्रत्यक्ष संबंध येतो. संशोधक प्रश्नावलीनुसार प्रश्न विचारतो आणि उत्तरदात्याने दिलेली उत्तरे अनुसूचीतील रिकाम्या जागेत नोंदवली जातात. या ठिकाणी निरीक्षणावरही भर दिला जातो. प्रत्यक्ष निरीक्षण करुन नोंदी घेतल्या जातात.

सदरील संशोधनासाठी अनुसूची तंत्राचा वापर केला; कारण -

१. साक्षरतेचा अभाव तसेच कोणत्याही प्रकारचे औपचारिक शिक्षण नसल्यामूळे या तंत्राची निवड केली.
२. अनुसूची तंत्रामूळे उत्तरदात्याकडून पाहिजे तशी सत्य माहिती व विषयास अनुसरुन सहाय्यक प्रश्नही विचारता आले.
३. अनुसूची भरून घेताना 'प्रत्यक्ष मुलाखत' या तंत्राचा अवलंब केला. जेणेकरुन सत्य माहिती मिळण्यास मदत होईल. आणि निरीक्षणही साध्य होईल.
४. मुलाखत घेण्याअगोदर त्यांना विश्वासात घेण्याचे आवश्यक कार्य केले.
५. मुलाखत सुरु करण्यापूर्वी वस्ती, परिस्थिती, सोयी, समस्या, मुले, गाव इ. वर चर्चा करुन त्यांच्या मनावरील ताण कमी केला.
६. परिस्थिती व निरीक्षणावरुन उत्तरांची सत्यता पडताळता येते. आणि नवीन प्रश्न व उपप्रश्न विचारता आले.
७. प्रथम निरीक्षणाद्वारे उपलब्ध साधनांची उदा. घरे, जमीन, सोयी, सवलती इ.ची माहिती घेतली. आणि तेथील प्रमूखाला भेटून चर्चा करुन भेटीचा उद्देश सांगून संशोधनाची भूमिका स्पष्ट केली.
८. तथ्य संकलन करतांना त्यांचे सामाजिक जीवन, बोलीभाषा, धर्म, शिकार, व्यसन, साधने, समस्या पोलीस इ.वर सामान्य प्रश्न विचारुन मूलाखतींची बैठक तयार केली. जेणेकरुन माहिती मिळवणे सोपे झाले.
९. त्यांच्या भाषेत संवाद साधण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी प्राथमिक स्त्रोत बनुन मदत केली. त्यामुळे सुक्ष्म माहिती मिळविता आली.
१०. मुलाखत अनुसूचीशिवाय इतर माहितीचे टिपण व नोंदी घेतल्या. कार्यकर्त्यांच्या मूलाखतीचाही अहवाल लेखनासाठी उपयोग झाला.
११. शासकीय अधिकारी, बिगर शासकीय संस्था इतर आदिवासी, बिगर आदिवासी लोकांशी चर्चा करुन आवश्यक माहिती मिळविली.

**दुय्यम तथ्यः-**

आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये, शासकीय कार्यालये, पंचायत समिती कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा परिषदेचा समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, पोलीस खाते, विषयासंबंधित तज्ञ व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते इत्यादी कडून आवश्यक आकडेवारी व माहिती

घेतली. तसेच अनेक ज्ञापकांची मदत घेतली. विविध लेखकांची पूस्तके, विविध विद्यापीठांची ग्रंथालये, सामाजिक संशोधन संस्था, अहवाल, संशोधन पत्रिका, वर्तमानपत्रे, शासकीय पत्रके, योजना पूस्तिका इ. दूय्यम स्त्रोतांचा संशोधनासाठी मोठा उपयोग झाला.

**२.९.३ तथ्य विश्लेषण व निर्वचन:-**

जमा केलेल्या तथ्याचे काळजीपूर्वक परीक्षण केले व मुलाखत अनुसूची भरुन माहिती संपादित केली. प्राप्त माहिती वेगवेगळ्या स्वरुपाची असल्याने प्रश्नावलीतील मुख्य घटकाचे वर्गीकरण केले. मिळालेल्या माहितीचे संख्यात्मक आणि गुणात्मक वर्गीकरण करुन अनावश्यक माहिती वगळली. तसेच दुय्यम स्त्रोताकडून मिळालेल्या विश्वसनीय माहितीचे विश्लेषण वर्णनात्मक पध्दतीने केले. तथ्यांचे सांकेतीकरण व सारणीकरण केले. कांही प्रश्न सामान्य, सरळ कोष्टकात ठेवले व त्यांचे विश्लेषण केले. तर कांही माहितीचा परस्पर संबंध जोडून दुहेरी तक्यात बसवून सविस्तर विश्लेषण केले. सर्व माहितीच्या विश्लेषणासाठी संशोधन विषयाचे स्वतंत्र विभाग करुन विभागांतर्गत विश्लेषण करुन संख्याशास्त्रीयदृष्ट्या निष्कर्ष काढले.

प्रबंधात शेवटी अनुसूची जोडली असून पुस्तके, ग्रंथ, मासिके, अहवाल, शासकीय माहिती इत्यादींची ही संदर्भ सूची जोडली आहे.

**२.१० प्रकरण नियोजन:-**

"पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा. "

या संशोधन विषयासंबंधीत सर्व घटकांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला व विषयाचे अहवाल लेखन घटकनिहाय करण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रकरण नियोजन केले आहे.

**प्रकरण १ - प्रस्तावना**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या पहिल्या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना करुन भारतीय समाज रचना, जाती व्यवस्था, जमाती, आदिवासी समुदायाचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, जगातील आदिवासी, भारतातील आदिवासी आणि महाराष्ट्रातील आदिवासींचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. या प्रकरणात भारतीय आदिवासींच्या समस्या, उपाय, घटनात्मक तरतुदी व आरक्षण तसेच महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमाती आणि पारधी जमातीचे वास्तव्य व लोकसंख्येचा ही आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण २ - संशोधन क्षेत्र व संशोधन पध्दती**

या प्रकरणात संशोधन आराखड्याबाबतची मांडणी करत असताना विविध संशोधन टप्प्यांची विस्तृतपणे मांडणी करुन संशोधन समस्या, संशोधनाची उद्दीष्ट्ये, संशोधनाच्या मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पध्दती, नमुना निवड, संशोधन क्षेत्राची निवड (व्याप्ती / क्षेत्र) तालुक्याची, गावाची, वस्त्यांची निवड, संशोधनासाठी अवलंबिलेली पध्दती व तंत्रे, तथ्य संकलन, अहवाल लेखन, संशोधन साहित्याचा विस्तृत आढावा, संशोधन अहवालाची उपयूक्तता इ. घटकांची माहिती देण्यात आली आहे.

**प्रकरण ३ - पारधी समाजाचा समाजशास्त्रीय आढावा**

या प्रकरणात पारधी समाजाचा पूर्वेइतिहास अभ्यासण्यात आला आहे. पारधी जमातीचा उगम, उपजाती, न्यायव्यवस्था व गुन्हेगारी कायद्याचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच जमातीच्या कौटुंबिक, वैवाहिक आणि शैक्षणिक जीवनाच्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. पारधी कुटुंब व्यवस्था, वैवाहिक जीवन, शैक्षणिक स्थिती, शैक्षणिक समस्यांचा आढावा घेण्यात आला आहे. पारधी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना त्यांच्या शिक्षणाचे प्रमाण, धार्मिक जीवन, अंधश्रध्दा, आर्थिक क्रिया, कायदे, शासकीय योजना, शासनाचे प्रयत्न व सुधारणा इत्यादी संदर्भाने आढावा घेण्यात आला आहे. या प्रकरणात पारधी जमातीच्या सामाजिक जीवनाचे दुय्यम स्त्रोतांच्या आधारे विवेचन करण्यात आले आहे.

**प्रकरण ४ थे- अभ्यास माहितीचे विश्लेषण**

या प्रकरणात मुलाखत अनुसूचीच्या साह्याने मिळवलेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले आहे. प्राप्त तथ्यांचे सांकेतीकरण व सारणीकरण केले. कांही प्रश्न सामान्य, सरळ कोष्टकात ठेवले व त्यांचे विश्लेषण केले. तर कांही माहितीचा परस्पर संबंध जोडून दुहेरी तक्यात बसवून सविस्तर विश्लेषण केले. सर्व माहितीच्या विश्लेषणासाठी संशोधन विषयाचे स्वतंत्र विभाग करुन विभागांतर्गत विश्लेषण करुन संख्याशास्त्रीयदृष्ट्या निष्कर्ष काढले. संशोधन विषयाला अनुसरुन कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक समस्या व शासनाचे प्रयत्न इत्यादी संदर्भाने प्रश्न विचारुन प्रत्यक्ष प्राथमिक स्त्रोतांच्या आधारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रकरण ५ वे - सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी**

या प्रकरणात पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करुन उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले आहेत. सारांशरुपाने समाजाची सद्यस्थिती व समस्या लक्षात घेवून काही उपाय सुचविण्यात आले आहेत. प्रस्तुत संशोधनाला अनुसरुन निष्कर्ष व त्या अनुषंगाने शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

**संशोधनाचा उपयोग :-**

प्रस्तुत संशोधनाने पारधी जमातीच्या सामाजिक, शैक्षणिक , धार्मिक व आर्थिक जीवनावर प्रकाश पडतो. त्यांच्या विकासासाठी अजूनही सर्वागीण प्रयत्नांची गरज आहे. त्यांच्या अडचणींचे निराकरण होण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल.

सामाजिक शास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सा. संस्था जमातीचे कार्य करणारे यांनाही या संशोधनाचा फायदा होणार आहे. सामान्य जनतेला पारधी समाजाचे आकलन होऊन, त्यांच्या मानसिकतेत बदल होईल. प्रगतांचा संशयी दृष्टीकोन नाहिसा होण्यासाठी प्रस्तुत संशोधन फायद्याचे ठरेल असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत विषयावरील संशोधन उस्मानाबाद जिल्हा परिषद, जिल्हा पोलिस खाते यांनाही उपयुक्त ठरेल. कारण जमातीचा सर्वांगीण आढावा घेतला असल्याने जमातीचे मागासलेपण, गुन्हेगारीची कारणे, शासकीय योजनांची उपयुक्तता, लाभधारकांच्या अडचणी, त्यांसदर्भाने सुचविलेल्या सुधारणा यांचा अभ्यास केला आहे.

केंद्र सरकार, राज्य सरकार आणि जिल्हा परिषद इ. सर्व पातळयांवर जमातीच्या विकासासाठी प्रयत्न करत आहेत. पण त्या प्रयत्नांना कितपत यश आले हे या संशोधनातील निष्कर्षातून प्राप्त होईल व ते पुढील विकासाचे धोरण, शासकीय योजना व त्यांची अंमलबजावणी करतांना उपयोगाचे ठरेल.

स्वतः पारधी समाजाला हे संशोधन उपयुक्त ठरेल. त्यांचे सामाजिक जीवन, रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, न्यायव्यवस्था, धार्मिकता , शैक्षणिक उदासिनता, आर्थिक प्रगतीचा आढावा शासनाचे प्रयत्न, याची जाण करुन देण्यासाठी हे संशोधन उपयोगी ठरेल. स्वतःच्या मागासलेपणातून पडण्याचा प्रयत्न ते करतील. प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित संशोधन करणाऱ्या इतर संशोधकांनाही हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे. प्रस्तुत विषयाशी संबंधित नवीन संशोधकांना हा विषय नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

# संदर्भ सूची


१. महाराष्ट्र वार्षिकी - द युनिक ॲकॅडमी पूणे, संपादक - तुकाराम जाधव, (२००८-२००९) पृ.क्र. ३१४

२. तत्रैव - पृ. क्र. ३१४

३. तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश - खंड १२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई (१९८५) पृ. क्र. १४७०

४. तत्रैव - पृ. क्र. १४७१

५. तत्रैव - पृ. क्र. १४७१

६. डॉ. केतकर श्रीधर - प्राचीन महाराष्ट्र , वरदा बुक्स पुणे, (जानेवारी १९८९) पृष्ठ क्र. ०७

७. डॉ. कठारे अनिल, डॉ. नगराळे एम. एस. - मराठवाड्याचा इतिहास-प्रारंभ ते १९६०, कल्पना प्रकाशन नांदेड, (नोव्हे. १९९९) पृष्ठ क्र. ७५

८. तत्रैव - पृष्ठ क्र. ४४०

९. भांडवलकर एस.एस, डॉ. हणवते यु. एस. - मराठवाड्याचा इतिहास, अभिजीत पब्लीकेशन लातूर (जून १९९९) प्र. क्र. ०१

१०. डॉ. रोडे सोमनाथ - मराठवाड्याचा इतिहास, अभिजीत पब्लीकेशन लातूर (जुन १९९९) पृ. क्र. ५९

११. डॉ. कठारे अनिल, डॉ. नगराळे एम. एस. - मराठवाड्याचा इतिहास-प्रारंभ ते १९६०, कल्पना प्रकाशन नांदेड, (नोव्हे. १९९९) पृष्ठ क्र. २९८

१२. विधी व न्यायमंत्रालय, भारत सरकार - भारताचे संविधान (दि. २७ सप्टेंबर २००६ पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे) (सहावी आवृत्ती २००६) पृ. क्र. ३

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | तत्रैव | - | पृ. क्र. ०४ |
| १४. | प्रा. काळे भगवान | - | मराठवाडा : काल आणि आज (पूर्वार्ध) संकेत प्रकाशन जालना, प्रथम आवृत्ती (१९८६) पृ. क्र. ६९ |
| १५. | Dr. Sharma, Pathan and Others | - | Intellectual Sandharbh Maharashtra (State and Districts At a Galance) |
| १६. | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | - | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. (२०१०) प्र. क्र. ०१ |
| १७. | तत्रैव | - | पृ. क्र. ०२ |
| १८. | तत्रैव | - | पृ. क्र. ०२ |
| १९. | प्रा. काळे भगवान | - | मराठवाडा काल आणि आज संकेत प्रकाशन जालना, पृ. क्र. ८३ |
| २०. | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | - | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. (२०१०) प्र. क्र. ०३ |
| २१. | डॉ. कठारे अनिल, डॉ. नगराळे एम. एस. | - | मराठवाड्याचा इतिहास-प्रारंभ ते १९६०, कल्पना प्रकाशन नांदेड, (नोव्हे. १९९९) पृ. क्र. ४२७ |
| २२. | तत्रैव | - | पृ. क्र. ४३१ |
| २३. | प्रा. काळे भगवान | - | मराठवाडा : काल आणि आज (पूर्वार्ध) संकेत प्रकाशन जालना, प्रथम आवृत्ती (१९८६) पृ. क्र. ७८ |
| २४. | तत्रैव | - | पृ. क्र. ८४ |
| २५. | तत्रैव | - | पृ. क्र. ६४ |
| २६ | तत्रैव | - | पृ. क्र. ५७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २७. | डॉ. कठारे अनिल, डॉ. नगराळे एम. एस. | - | मराठवाड्याचा इतिहास-प्रारंभ ते १९६०, कल्पना प्रकाशन नांदेड, (नोव्हे. १९९९) पृष्ठ क्र. ३२ |
| २८. | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | - | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई (२०१०) पृ. क्र. ०३ |
| २९. | तत्रैव | - | पृ. क्र. ०४ |
| ३०. | तत्रैव | - | पृ. क्र. ०७ |
| ३१. | तत्रैव | - | पृ. क्र. ०७ |
| ३२. | तत्रैव | - | पृ. क्र. ०७ |
| ३३. | तत्रैव | - | पृ. क्र. ०६ |
| ३४. | तत्रैव | - | पृ. क्र. ०५ |
| ३५. | महाराष्ट्र वार्षिकी २००८-२००९ | - | द युनिक ॲकॅडमी पूणे, संपादक - तुकाराम जाधव, पृ.क्र. ३१४ |
| ३६. | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | - | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई (२०१०) पृ. क्र. १२ |
| ३७. | तत्रैव | - | पृ. क्र. ०४ |
| ३८. | तत्रैव | - | पृ. क्र.०५ |
| ३९. | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | - | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई (२०१०) पृ. क्र. ०४ |
| ४०. | तत्रैव | - | पृ. क्र. ०५ |
| ४१. | तत्रैव | - | पृ. क्र. ०५ |
| ४२. | तत्रैव | - | पृ. क्र. १० |
| ४३ | तत्रैव | - | पृ. क्र. ०८ |

४४. तत्रैव - पृ. क्र. १८

४५. तत्रैव - पृ. क्र. १८

४६. पोतदार वसंत ब. - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, सन्मती मुद्रणालय शुक्रवार पेठ सोलापूर, द्वि. आवृत्ती (१९८४) पृ. क्र. ०२

४७. डॉ. कठारे अनिल, डॉ. नगराळे एम. एस. - मराठवाड्याचा इतिहास-प्रारंभ ते १९६०, कल्पना प्रकाशन नांदेड, (नोव्हे. १९९९) पृष्ठ क्र. २१९

४८. R.V. Russell and Rai Bahadur Hiralal - The Tribes and Castes of the central provinces of India, Rajdhani Book centre Delhi (१९१६)

४९. Ghurye G.S. - The Scheduled Tribes २nd Edition, Popular Book Depot Bombay, (१९५१) P. १०

५०. मांडवकर भाऊ - कोलाम, सेवा प्रकाशन अमरावती, प्र. आ. (१९६६)

५१. चव्हाण रामनाथ - जाती आणि जमाती, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, (१९८९)

५२. डॉ. गारे गोविंद - आदिवासी लोककथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पूणे, (२००३)

५३. डॉ. पिंगळे भीमराव - वनवासी व उपेक्षित जग, अभिनव जीवन प्रकाशन बीड, (१९६२)

५४. प्रा. नाडगोंडे गुरुनाथ द. - भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे (१९८६)

५५. डॉ. कदम नागनाथ धों. - महाराष्ट्रातील भटका समाज, प्रतिमा प्रकाशन संस्कृती व साहित्य पुणे, (१९९०)

| | | | |
|---|---|---|---|
| ५६. | माने लक्ष्मण | - | विमूक्तायन, य.च. प्रतिष्ठान मुंबई, (१९९७) |
| ५७. | कर्वे इरावती | - | आमची संस्कृती, देशमुख ॲण्ड कंपनी पब्लिशर्स पुणे, (२००६) |
| ५८. | परुळेकर गोदावरी | - | जेव्हा माणूस जागा होतो, मौज प्रकाशन मुबई, (२००६) |
| ५९. | मांडे प्रभाकर | - | भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, (२००६) |
| ६०. | खडसे भा. कि. | - | भारतीय सामाजिक समस्या, श्री मंगेश प्रकाशन नागपूर प्र. आ. (१९७८) |
| ६१. | प्रा. मुठे सुमन | - | आदिवासी स्त्री जीवन, सुगावा प्रकाशन पुणे, (२००१) |
| ६२. | डॉ. मेहता प्रकाश चन्द्र | - | आदिवासी संस्कृती एवं प्रथाएँ, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस प्रायवेट लि. दरिया जंग नई दिल्ली. (२००९) |
| ६३. | प्रा. ठाकूर सुंदरसिंह | - | आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, निर्मल प्रकाशन नांदेड, (२००६) |
| ६४. | डॉ. जाधव सुदाम | - | आदिवासी साहित्य, सुलबा प्रकाशन औरंगाबाद (१९९९) |
| ६५. | डॉ. मांडे प्रभाकर | - | गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद, (१९८३) |
| ६६. | डॉ. गारे गोविंद | - | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, (२००२) |

६७. डॉ. सौ. देवगांवकर शैलजा - आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन नागपूर, (२००१)

डॉ. देवगांवकर शं. गो.

६८. Y.P.S. TomarDr. Robin D. Tribhuwan - Development of primitive Tribes in Maharashtra status, continuity and change TRTI Pune (२००४)

६९. डॉ. खरात शंकरराव - भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन पुणे, प्र.आ. (२००३)

७०. कालेलकर गोविंद मंगेश - मुंबई इलाख्यातील जाती , वरदा प्रकाशन पुणे, (१९९९)

७१. प्रभुणे गिरीश - पारधी , राजहंस प्रकाशन पुणे, द्वि.आ (२००६)

७२. गायकवाड लक्ष्मण - वकिल्या पारधी , मॅजिस्टिक प्रकाशन, मुंबई, द्वि.आ. (२००६)

७३. माने लक्ष्मण - भटक्याचं भारुड, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई (२००३)

७४. गायकवाड लक्ष्मण - उचल्या, श्रीविद्या प्रकाशन , शनिवार पेठ पुणे, दु.आ. (२००६)

७५. मोरे विमल - पालातली माणसं, पद्यगंधा प्रकाशन, (२००७)

७६. प्रभुणे गिरीश - पालावरचं जिणं, साप्ताहिक विवेक मुंबई, (२००३)

७७. काळे किशोर - कोल्हाट्याचं पोर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई (२००८)

| | | | |
|---|---|---|---|
| ७८. | अत्रे त्रि.ना. | - | गुन्हेगार जाती, वरदा प्रकाशन पुणे, (२००९) |
| ७९. | श्री. उईके हमराज उदयभान | - | आदिवासी (प्रधान) लोकसाहित्यातील स्त्री - पुरुष चित्रण (Ph.D. प्रबंध मराठी) डॉ.बा.आं.म. विद्यापीठ औरंगाबाद |
| ८०. | प्रा. जाधवर रमेश बलभीम | - | डॉ. गोविंद गारे यांच्या आदिवासी साहित्याचा विवेचक अभ्यास (Ph.D. प्रबंध मराठी) डॉ.बा.आं.म. विद्यापीठ औरंगाबाद (२०१०) |
| ८१. | प्रा. शिकलगार आदम महमद | - | पुणे जिल्ह्यातील नागरी वसाहतीतील स्थलांतरीत शिकलगार जमात (Ph.D. प्रबंध समाजशास्त्र) टि.म.वि. पुणे (१९९९) |
| ८२. | श्री. सहारे पद्माकर नागजी | - | नाशिक जिह्यातील कोकणाजमातीचा सामाजिक - सांस्कृतिक अभ्यास. (Ph.D. प्रबंध समाजशास्त्र ) डॉ. बा.आं.म.वि. औरंगाबाद (२००४) |
| ८३. | श्री. साळुंके संजय भा. | - | गोंड आदिवासी जमातीचे सामाजिक आणि आर्थिक अवलोकन - (Ph.D प्रबंध समाजशास्त्र) डॉ. बा.आं.म. वि. औरंगाबाद (२००८) |
| ८४. | प्रा. डोंगरे महादेव दत्तु | - | पुणे जिह्यातील कातकरी जमातीचा सा. आर्थिक अभ्यास (Ph.D. प्रबंध अर्थशास्त्र) टि.म. वि. पुणे |
| ८५. | प्रा. गायकवाड यशवंत जंगलू | - | आदिवासी पारधी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास (Ph.D. प्रबंध मराठी ) डॉ. बा.आं.म.वि. औरंगाबाद (२००६) |
| ८६. | श्री. मोरे कल्याण विठ्ठल | - | धुळे जिल्ह्यातील कोकणा जातीचा समाजशास्त्रीय अभ्यास (अप्रकाशित Ph.D. प्रबंध) डॉ. बा.आं.म.वि. औरंगाबाद (२००२) |

८७. Dr. Jha Arvind Kumar - A Study of pardhi's Struggle for survival VIS. A VIS Wild life protection acts : An Anthro - Ecological Study (२००३)

८८. शेळके प्रताप शिवाजीराव - उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक अभ्यास (कळंब तालुका संदर्भात) एम.फील. प्रबंध (२०१०)

८९. डॉ. भांडारकर पु. ल. - सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर, तृ. आ. (१९८७) पृ. क्र. १०

९०. प्रा. घाटोळे रा.ना. - समाजशास्त्रीय संशोधन - तत्वे व पध्दती, श्री.मंगेश प्रकाशन नागपूर, (२००३) पृ.क्र. ५

९१. डॉ. पाटील वा.भा. - संशोधन पध्दती - प्रशांत पब्लिकेशन, जळगाव (२०१०) पृ.क्र. १३

९२. प्रा. घाटोळे रा.ना. - समाजशास्त्रीय संशोधन - तत्वे व पध्दती - श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर (२००३) पृ.क्र. ५४

९३. Selltiz, charie, Johoda, Morie, Deitsch, Morton and cook, - Research Method Social Relations, Halt Rinehart and Winston Inc. New York, (१९५९) P. No. ५०

९४. डॉ. ढगे एस. के.
डॉ. हासे सी. पी. - संशोधन पध्दती, के एस. पब्लिकेशन पुणे, प्र. आ. (२०११) पृ. क्र. १११

९५. Festinar Leon and Daniel Katz (Eds.) - Research Methods in the behavioural Science - Halt Rinenart & Winston New York Page No. ७४

९६. डॉ. आगलावे प्रदिप - समाजशास्त्रीय संकल्पना, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९९६) पृ. २७९

| | | | |
|---|---|---|---|
| ९७. | प्रा. कांबळे. सी.टी. , प्रा. पवळे टी. एस. | - | भारतातील सामाजिक चळवळीची रुपरेषा, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स, नांदेड (२०१०) पृ. ३२ |
| ९८. | डॉ. धारणकर सरल | - | इतिहासाचा अभ्यास आणि संशोधन, बिना प्रकाशन नाशिक |
| ९९. | Herbert Spencer | | The Principles of Sociology, Appleton, New York 1891 - P. No. 100. |
| १००.. | M. Francis Abraham | - | Modern Sociological Theory, An Introduction, Published by Oxford University press. New Delhi (2002) P. 195 |
| १०१ | Goode, Willion J and Hatt Paul K | - | Methods in Social Research, Mc Groaw-Hill, International Book Company, New Delhi, (1981) P. No. 56 |
| १०२. | डॉ. बोधनकर सुधीर, प्रा. अलोनी विवेक | - | सामाजिक संशोधन पध्दती, श्रीसाईनाथ प्रकाशन नागपूर (२००७) पृ. क्र. २६५ |
| १०३. | तत्रैव | - | पृ. क्र. १९२ |

## प्रकरण तिसरे

# पारधी समाजाचा समाजशास्त्रीय आढावा

### प्रस्तावना

२००१ च्या जनगणनेनुसार भारतीय आदिवासीची एकूण लोकसंख्या ८.५ कोटी एवढी असून त्यापैकी सुमारे ८५.७७ लाख आदिवासी महाराष्ट्रात वास्तव्य करतात. सुमारे १ अब्ज २१ कोटी एवढ्या एकूण भारतीय लोकसंख्येच्या तुलनेत ही संख्या कमी असली तरी ती कमालीचे दारिद्र्य व आत्यंतिक मागासलेपणाने ग्रासलेली आहे. "२००१ जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ९६८.७९ लाख एवढी असून त्यापैकी शेकडा ८.८५ इतके आदिवासी आहेत." [१] "महाराष्ट्रात प्रामुख्याने नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ इ. जिल्ह्यात आदिवासी पारधी जमातीचे वास्तव्य आहे." [२]

"महाराष्ट्रात भिल्ल, गोंड, महादेवकोळी, मल्हार कोळी, वारली, कोकणा, कातकरी, कोलाम, ठाकर, कोरकू, आंध, परधान, पारधी इ. एकुण ४७ आदिवासी जमाती असून आदिवासी लोकसंख्येच्या संदर्भाने देशात महाराष्ट्राचा चौथा क्रमांक लागतो." [३] महाराष्ट्रातील आदिवासी जमातीची सामाजिक धर्माचाराची जडणघडण एकसारखी नाही. "प्रत्येक जमात आदिवासीच असली तरी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर उभी आहे." [४] त्यापैकी एक पारधी जमात आहे.

आदिवासी पारधी जमात ही पूर्वी गुन्हेगार जमात, विमुक्त जमात आणि वर्तमानात अनुसूचित जमात म्हणून ओळखली जाते. मात्र ही स्थित्यंतरे पारधी जमातीला अजूनही पुर्णपणे समजलेली नाहीत. प्रगत समाजाने इतर आदिवासी आणि विमुक्त जमातींना सामावून घेतलेले आहे. मात्र पारधी जमात यापासून वंचित आहे. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे प्रगत व इतर समाज अजूनही पारधी जमातीपासून अंतर ठेवूनच असतात. यामुळे सामिलीकरणाची प्रक्रिया मंद झाली आहे.

"महाराष्ट्रातील शेकडा ८.८५ टक्के इतक्या आदिवासी लोकसंख्येपैकी १.८ टक्के एवढी लोकसंख्या पारधी जमातीची असून महाराष्ट्रात पारधी जमात सर्वाधिक संख्येने अमरावती जिल्ह्यात असून ती २०५६८ इतकी आहे." [५]

पारधी जमातीच्या लोकसंख्येमध्ये मागील काही दशकामध्ये सतत वाढ होत आहे.

**तक्ता क्र. ३.१**

**महाराष्ट्र राज्यातील पारधी लोकसंख्येतील वाढ दर्शविणारा तक्ता**

| वर्ष | पारधी लोकसंख्या | झालेली वाढ |
|---|---|---|
| १९६१ | २१४१७ | - |
| १९७१ | २४९५६ | ३५३९ |
| १९८१ | ९५११५ | ७०१५९ |
| १९९१ | १२३८१३ | २८६९८ |
| २००१ | १५९८७५ | ३६०६२ |

स्त्रोत :- गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती - पृ. क्र.२३५ आणि वार्षिक आदिवासी उपयोजना २००९-१० महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग पुणे पृ. ४९५

आदिवासीच्या अचूक जनगणनेअभावी उपरोक्त आकडेवारी कितपत विश्वासार्ह मानावी हा प्रश्न आहे.

महाराष्ट्रातील पारधी जमात स्वांतत्र्योतर काळात अनेक स्थित्यंतरांमधून जात आहे. पूर्वापार चालत आलेली पारधी संस्कृती, त्यातील रुढी-परंपराचे पालन, पिढीजात मागासलेपण, पारंपारिक शिकार व्यवसाय, गुन्हेगारीचा शिक्का, प्रगतांचा अविश्वास हे संचित एकीकडे तर इतर समाजाशी संपर्क, शिक्षणाशी होऊ पाहणारी तोंडओळख, शासन स्तरावर चालू असलेले विकासाचे अपूरे प्रयत्न या अनेक बाबीमुळे पारधी समाजात होत असलेल्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक इ. बदलांचा अभ्यास करणे हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे.

आदिवासीचे आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण हे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे.

**मागासवर्ग (Backward class ) -** "स्वतःच्या सामाजिक, आर्थिक, दयनीय स्थितीमुळे जे मागासलेले असून, ज्यांच्याकडे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे, जे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या समाजाच्या संपन्न वर्गाच्या तुलनेत कमजोर आणि निम्नस्तरावर आहेत, त्यांना भारतीय संविधानात मागास / मागासवर्ग या नावाने संबोधले जाते." [६]

## ३.१ पारधी जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

### पारधी शब्दाचा अर्थ व उगम -

पारधी ह्या शब्दाचे मूळ 'पारध' हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ शिकार करणे असा होतो. सांस्कृतिक, सर्वसाधारण, कायदेशीर आणि विविध मानववंशशास्त्रीय ज्ञानशाखांमध्ये 'पारधी' हा शब्द शिकार करणारा, फाशांच्या मदतीने वन्यजीव-पशूपक्षी पकडणारा आणि चोरी करणारा अशा विशिष्ट

मानवसमूहाला उद्देशून वापरला आहे. थोर मानववंशशास्त्रज्ञ रसेल आणि हिरालाल यांच्या मते पारधी हा शब्द मराठीतील पारध शब्दावरुन तयार झाला आहे. ते अरण्यातील पशू-पक्षी पकडणे, मारणे यासाठी फासाची मदत घेतात व त्यावरच उपजिवीका करतात. "पारध म्हणजे शिकार, मृगया, परिधि म्हणजे फासा, परिद-व्याध म्हणजे शिकारी, म्हणूनच पारधी म्हणजे शिकार करणारा." [७] पारधी ही जमात प्रामुख्याने महाराष्ट्र व मध्यप्रदेशात वास्तव्य करते. ती विविध भागात वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते. महाराष्ट्रात फासेपारधी, मुंबई इलाख्यात टकारी किंवा भामटे, उत्तर भारतात भवरा (बहेलिया किंवा बौरिआ) मध्य भारतात लंगोटीपारधी, कच्छ, खानदेश आणि धारवाड या ठिकाणी कांही मुसलमान पारधीही आढळतात. शिवाय मोहिया, अटवीसंचार, आंधप्रदेशात नहार आणि "कर्नाटकात रानपारध्यांना हक्कीपीक्की (Hakki Pikki) म्हणतात. हेच गुजरातमध्ये वाघरी नावाने ओळखले जातात." [८] या जमातीच्या उगमाची/पूर्वजांची सखोल व अचूक माहिती अद्यापही उपलब्ध नाही. त्यांची भटकंतीची जीवनशैली तसेच कालौघात इतर स्थानिक समाजाशी आलेला संपर्क आणि वास्तव्यामुळे त्यांच्यात झालेली सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतरे यामुळे त्यांच्या मुळ वंशासंदर्भात (उगमासंदर्भात) त्यांची मते ही त्या-त्या ठिकाणच्या वस्तीतील वयस्कांच्या स्मरणशक्तीवर आधारित आहेत. शिकार हा देवाने दिलेला व्यवसाय आहे म्हणून 'पारधी' असा ठाम दावा ते करतात. "कांहीजण स्वतःला महाभारतात उल्लेखलेल्या पारधी महादेवाचे वंशज मानतात, ज्याने जंगली अस्वलाची शिकार करण्यासाठी थेट अर्जूनाला आव्हान दिले होते." [९] मात्र याबद्दल कोणत्याही पूराव्याची इतिहासात नोंद नाही. त्यांच्याकडून अनेक आख्यायिका ऐकिवात आहेत. पण त्यासंबंधी कोणताही पूरावा देण्यास ते असमर्थ आहेत.

"पारधी स्वतःला राणाप्रतापाचे वंशज मानतात." [१०] ते स्वतःला विंध्य व सातपूडा पर्वतातील रहिवाशी मानतात. त्यांना मेवाडे असेही म्हटले जाते. त्यावरुन ते राजपूताना (राजस्थान) प्रांतातील मेवाडचे असावेत. मुळात पारधी जमात अस्तित्वात नव्हतीच. पारधी मुळचे रजपूत, राणा प्रतापाचे सैनिक होते. राजस्थानात १८ जून १५७६ च्या हळदीघाटच्या युध्दात राणा प्रतापाचा पाडाव झाला. तरी त्यांनी संपूर्ण प्रदेशावर अकबराचे स्वामीत्व प्रस्थापित होऊ दिले नाही." [११] अकबर पकडेल आणि धर्मांतर करावे लागेल या भितीपोटी अनेक स्वाभिमानी रजपूतांच्या टोळयांनी राजस्थानातून गुजरातमध्ये पलायन केले. त्यांना प्रस्थापितांनी आश्रय न दिल्याने रानावनात भटकंती करुन उपजीविका करावी लागली आणि "ते स्वतःला 'पराश' म्हणवू लागले. (पराश-शिकारी)" [१२] पराश

म्हणजेच 'आजचे पारधी' ही नवीन ओळख घेतली. त्यांची आणि रजपूतांची आडनावे आणि राजस्थानी बोलीचा वापर यामुळे त्यांचे राजस्थान उगम निश्चित होते. "सध्याच्या पारधी लोकांच्या पूर्वजांनी २५० वर्षापूर्वी गुजरातकडून महाराष्ट्राकडे स्थलांतर केले. व येथेच स्थायिक झाले. जुनागडची अंबिकादेवी हे त्यांचे कुलदैवत आहे यावरुन ते गुजरातकडचे आहेत हे सिध्द होते." [१३] पारधी जमातीच्या वंशावळीबद्दल आजही सविस्तर माहिती संकलितपणे आढळत नाही. रजपूत राजांचे राज्य गेले म्हणून राज्य पुर्नस्थापित होईपर्यंत "आसनावर बसणार नाही, आसनावर झोपणार नाही, पायात वहाणा घालणार नाही, डोक्यावर शिरस्त्राण घालणार नाही, ताजे अन्न खाणार नाही, नवे कपडे घालणार नाही अशा शपथा घेतल्या." [१४] दरम्यान ते दोन गटात विभागले गेले. "राजपारधी जे गावकुसाबाहेर मेवाडमध्येच राहिले आणि फासेपारधी डोंगरदऱ्यात शिकार करीत राहिले." [१५] पारधी जमातीचे हे दोनच प्रकार आहेत. इतर नावे व्यवसायावरुन व निरीक्षणाने ठरवली आहेत. पारध्यांच्या वंशावळीची नोंद ठेवणाऱ्या भाटांच्या नोंदीनुसार - "या जमातीचे लोक राजस्थानातून गुजरात व मध्यप्रदेशमार्गे प्रथम महाराष्ट्रातील खानदेशात आले. म्हणनूच खानदेशांत त्यांची मोठ्या प्रमाणात वस्ती आहे." [१६] पारधी जमातीच्या पूर्वेतिहासाबद्दल अनेक मतप्रवाह आहेत. पारध्यांच्या एका कथेनुसार "पारध्यांचे पूर्वज गोंड होते. त्याला महादेवाने फासे टाकण्याची कला शिकवली, ज्यामुळे तो गोळी मारुन प्राणी मारण्याच्या पापापासून वाचू शकेल. तेंव्हापासून ते केवळ फासे, जाळे आणि सापळे लावुनच शिकार करु लागले." [१७] मानववंशशास्त्राच्या एका मतप्रवाहानुसार "पारधी हे राजपूत आणि बावरी या जातीच्या संकरातून निर्माण झाले असावेत. तो निम्नदर्जाच्या कोळी, वाघरी, धनगर, कब्बालीगर आणि कोर्चर इत्यादी जमातीच्या मिश्र समूह आहे." [१८] रसेल आणि हिरालाल यांच्या मते "पारधी जमात ही बवेरिआ किंवा तत्सम राजपूत जमाती, गोंड व इतर जमातीचे बहिष्कृत इत्यादीच्या मिश्रणातून बनलेली एक मिश्र जमात बनली आहे." [१९] पारधी जमातीच्या उगमाबद्दल के.एस.सिंग म्हणतात "पारधी लोक स्वतःला 'रामायण' चे रचनाकार महर्षी वाल्मिकी यांचे वंशज मानतात. महर्षी वाल्मिकी स्वतः पारधी होते असे पारधी लोक मानतात." [२०] पारधी उगमाचा आणखी एक मतप्रवाह म्हणजे "पारधी जमात ही उत्तर भारतातल्या 'बौरिया' या जमातीचा भाग आहे."[२१] पोलिसांच्या दप्तरी उपलब्ध असलेल्या माहितीनुसार पारधी हे बौरिया या अनेक गुन्हेगारी जमातीचा उद्गम असलेल्या समाजाचा भाग आहे. (Bauria and Moghya is a Cast of thieves and robbers in Marwar and elsewhere, professing like others low tribes in Rajputana, to be

descended from Rajpoots. They are employed as village watchman but are also well-known professional thieves. These peoples are styled Bauria to the north of the Arvali Range and Moghya to the south. Their villages are on the confines of tonk, Meywar and Gwaliar, as well as in Nimbahera, Neemuch and Marwar. They eat flesh and drink spirit.)" [२२] "चोरी व दरोडा घालणे हा मुख्य व्यवसाय असलेली, राजपूताना येथे आढळणारी रजपूत वंशीय बौरिया या जमातीचे मारवाड व आसपासच्या भागात वास्तव्य आहे. त्यांना गावशिवाराच्या रक्षणाचे काम दिले जाते पण ते सराईत गुन्हेगार म्हणूनच प्रसिध्द आहेत.

उत्तर भारतात पारधी जमातीशी बहेलिया/बौरिआ ही साम्य दाखवणारी जमात आहे. मध्य भारतात म्हणजेच (खानदेश, विदर्भ, नागपूर, मध्यप्रदेश) येथे पारधी व बहेलियात वेगळेपण दाखवणे कठीण आहे असे रसेल यांचे मत आहे.

थोडक्यात पारधी ही जमात मूळची राजस्थानमधील, मारवाड प्रांतातील आहे. ते राजस्थानातून गुजरात व मध्यप्रदेश मार्गे महाराष्ट्रात आले. आज पारधी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात वस्ती करुन आहेत. महाराष्ट्रातील अमरावती, जळगाव, नाशिक, नगर, सोलापूर, पुणे, बीड, उस्मानाबाद या जिल्ह्यांत बहुसंख्येने आढळतात. पारध्यांच्या विविध पोटजाती या मुख्यतः मेवाड व गुजराती भाषेच्या मिश्रणातून तयार झालेली वाघरी भाषा बोलतात. तसेच त्यांच्या राजस्थानी पोषाखावरुन त्यांचे मूळ स्थान लक्षात येते.

**३.२ पारधी जमातीची कुलनामे:-**

कुलाची निर्मिती कोणत्या तरी विशिष्ट पूर्वजापासून झाली आहे असा दृढविश्वास समाजातील प्रत्येक सदस्याचा असतो. पण तो पूर्वज कोण हे ज्ञात असतेच असे नाही.

पारधी हे मूळ आदिवासी आहेत. रानावनात भटकणाऱ्या अनेक जमातीपैकी एक पारधी जमात आहे. या जमातीत देवक मानण्याची प्रथा नाही असे मत आदिवासी जमातीचे गाढे अभ्यासक व पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे माजी संचालक डॉ. गोविंद गारे यांनी मांडले आहे.

पण प्रसिध्द मानववंशशास्त्रज्ञ व भटक्या जमातीचे अभ्यासक ऐन्थोवेन म्हणतात की, पारधी जमातीमध्ये देवक मानले जाते व या जमातीत खालील सहा देवकांची पूजा केली जाते-

"१. अराई झुडपाचे काटे २. बोरीच्या झाडाचे काटे ३. शमीची पाने ४. आंबा ५. जांभूळ ६. उंबर. सगोत्र  देवकात विवाह निषिध्द मानतात." [२३]

पारध्यांमध्ये परंपरेप्रमाणे काळे, शिंदे पवार, दाभाडे, भोसले, साळुंके, सोनवणे, राणे, चव्हाण इ. आडनावे आढळतात. "त्यांच्यात आडनावे हीच कुळे असून पवार, भोसले, चौहान, माने, रावत, यादव, तिरोळा, खारुजा, काळे, सोळंकी, सिंधिया, फुलमाळी ही कुळे पालपारधीमध्ये आढळतात." [२४] फासेपारध्यांची सहा कुळे पुढीलप्रमाणे-  खोडीयार, पीपळाजीया, हरकत, सवोदिया (सावंडीया) कोरबीया, वीखोतीया ही सर्व नावे गुजराती आहेत.  हे सर्व गुजरातमधून कोल्हापूर जिल्ह्यात आले आणि कालांतराने त्यांनी मराठी नावे धारण केली.  खोडीयार, पीपळाजीया, हरखत हे काळे आडनावाने ओळखले जातात.  तर सवोदियांनी चव्हाण आडनाव धारण केले आहे.  कोरब आणि इखोत पवार या आडनावाने ओळखले जातात.  इतर समाजाशी संपर्कात असतांना हे वरील नावाने ओळख सांगतात. पण त्यांचे परस्परसंबंध हे मूळ गुजराती नावानेच (कुळावरुन) असतात." [२५]  "महाराष्ट्रातील फासे पारध्यांमध्ये सोनोने, दाभाडे, साळुंकी, पवार, चव्हाण, शिंदे आणि सूर्यवंशी अशी सात कुळे आहेत." [२६] याला पूरावा म्हणजे यांच्यात हीच आडनावे आढळतात.  टाकणकार यांच्यात माळवे, चौहान, सोळंकी, राठोड, पवार, कवडे ही कुळे आहेत. तर ऐन्थोवेनच्या मते दाभाडे, माळवे, शेले ही कुळे आहेत. पारध्यांमध्ये फासेपारधी हे इतर उपजातीबरोबर रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत. ते आहारावरुन स्वतःला श्रेष्ठ मानतात. तसेच धार्मिक कार्याचे नेतृत्वही त्यांच्याकडे असते. पारधी अंतर्विवाही आहेत. पण सगोत्र विवाह (समान आडनावात) निषिद्ध मानतात. पालपारध्यांमध्ये पवार स्वतःला श्रेष्ठ मानतात. पवारांमध्ये दोन आडनावे आहेत. (१)झाडीवाले पवार (झारोळी) (२) धार पवार. यांच्यातही श्रेष्ठ कनिष्ठता जोपासली जाते.  "पारधी जमातीतील सिसोदिया, पवार, सोळंकी, चव्हाण, राठोड, इ.कुळे  ही राजपूत जमातीच्या कुळासारखीच आहेत. ही कुळे बावरिया व तत्सम राजपूताना प्रदेशात आढळणाऱ्या जमातीकडून त्यांच्यात आली असावीत. "लंगोटी पारधीमध्ये चव्हाण, पोहार व साळुंकी ही तीन गोते आहेत." [२७]  चित्तापारध्यांमध्ये पवार, काळे व चव्हाण ही तीन कुळे आहेत. तसेच राजपारध्यांमध्ये भोसले, चव्हाण, काळे अशी कुळे आढळतात.  पारध्यांनी आपल्या पोटजातीमध्ये निरनिराळ्या कुळांच्या नावाने देवतांची  विभागणी केली आहे.

पारध्यांच्या सर्व कुळांत देवीची पूजा महत्त्वाची असते. प्रत्येक कुळाची प्रतिष्ठा, मानपान हे परंपरेने ठरवलेले आहेत. प्रत्येकाचा दर्जा ठरलेला असून रोटी-बेटी व्यवहार, परंपरा इ.चे अलिखित

नियम आहेत. पाल पारध्यांमध्ये पवार स्वतःला श्रेष्ठ मानत असले तरी पारंपारिक दर्जानुसार पवार हे कूळ / आडनाव या जमातीतील अत्यंत हलके समजले जाते.

**३.३ पारधी जमातीतील उपजातीः-**

पारधी जमातीचे अनेक ठिकाणी वास्तव्य असल्याने व विविध व्यवसाय करीत असल्याने ती वेगवेगळया नावाने ओळखली जाते. "या जमातीचे 'गावपारधी' व 'फासेपारधी' असे दोन प्रमूख पोटभेद असून त्यातही अनेक पोटभेद आहेत." [२८] प्रदेशपरत्वे पारध्यांना वेगवेगळी नावे आहेत. महाराष्ट्रात पारध्यांना फासेपारधी म्हणतात; तसेच पाल पारधीही म्हणतात. "विजापूर जिल्ह्यात 'आटवी संचार' म्हणतात तर 'मुंबई इलाख्यातील जाती' या ग्रंथात पारध्यांना 'टकारी' आणि 'भामटे' असेही म्हटले आहे." [२९] पारधी स्वतः गावपारधी, राजपारधी, पालपारधी व चित्तेपारधी तसेच घोडेपारधी, भिल्लपारधी (टोणगे कापणारे), माकडवाले पारधी, गायपारधी असे भेद सांगतात. हे लोक शिकारी आणि भटके असल्यामूळे इतर जमातींनी वाळीत टाकलेले, निराश्रित लोक या जातीत आले, हे रजपूत, कोळी, वाघरी, धनगर, कोरचर या त्यांच्यातील पोटजातीच्या नावावरुन दिसून येते. "पारधी, फासेपारधी, हरणपारधी, कोरचर आणि वाघरी या महाराष्ट्रातील मुख्य जाती मानल्या जातात. प्रत्येक उपजात स्वतःला श्रेष्ठ मानते. दुसऱ्या उपजातीबद्दल काहीही माहिती नाही असे सांगतात. प्रत्येक उपजातीत कुळी, बोली, परंपरा, रुढी, जातपंचायत, विधी इ. बाबतीत भिन्नता आढळते." [३०] "कर्नाटकात फासेपारध्यांना हरणशिकारी, अडवीचिंचर / चिगरी बेटगीर असे म्हणतात. त्यांची तेल वेचण्या म्हणून एक जात आहे. ते नारायण तेल वेचतात." [३१] आंध्रप्रदेशात पिट्टा लोलू किंवा फांस पारधी किंवा निरशिकारी असे म्हणतात. "मध्यप्रदेशात (बस्तर जिल्हा) नहार या नावाने ओळखले जातात. बहेला, बेहेलिया आणि चित्तापारधी या उपजाती तेथे आढळतात." [३२]

पारध्यांमध्ये असलेल्या विविध उपजातीनुसार त्यांच्या मुख्य व्यवसायात विविधता आढळते. प्रत्येक पोटजात वेगळया वांशिक मुळातून आलेली असावी. केवळ दारिद्र्य, मागासलेपणा, भटकेपणा आणि गुन्हेगारी याबाबतीत मात्र साम्य आढळते. रसेल आणि हिरालाल यांच्या मते, पारध्यांमध्ये अंतर्विवाह संबंध करणारे बरेच गट आहेत, त्यापैकी प्रमुख उपजाती शिकार करणाऱ्या पारध्यांच्या असून ते तीक्ष्ण शस्त्रे वापरतात. पारधी जमातीतील उपजाती खालीलप्रमाणेः-

| | |
|---|---|
| १. फासे पारधी (अटवी संचार) | ७. गायपारधी |
| २. भिल्ल पारधी (शिकारी) | ८. वाघरी |
| ३. लंगोटी पारधी | ९. राजपारधी |
| ४. हरण पारधी (चिगरी बेटगीर) | १०. गावपारधी |
| ५. बहेलिया | ११. पालपारधी |
| ६. टाकणकार | १२. बंदरवाले |
| | १३ शिशी के तेलवाले |

**१. फासे पारधी:-**

"फासेपारध्यांना अटवी संचार असे म्हणतात. डोंगरदऱ्यात सापळे, जाळी व फासांच्या सहाय्याने शिकार करुन उपजिवीका करणाऱ्यांना फासेपारधी म्हणतात. हे फासाने पक्षी पकडतात. वेगवेगळे पक्ष्यांसाठी वेगवेगळे फासे तयार करतात. धुळे, जळगाव आणि आसपासच्या क्षेत्रात वास्तव्य करणारी ही जमात असून ते रुढीप्रिय, अशिक्षित व मागासलेले आहेत. ही जमात शिकारीवरच जगते."[३३]

भारत सरकारने वन्यजीव संरक्षण कायदा करुन शिकार, प्राणी पाळणे, यावर बंधने आणली. त्यामुळे शिकार करणे या मुळ व्यवसायावरच गदा आली. अलिकडे मोलमजूरी करुन, शेतराखण करुन मिळणाऱ्या धान्यावर ते जीवन जगत आहेत. बायका कुणब्याचे मन रिझवून शेत लुटतात. त्यांच्याजवळ गाई, म्हशी, कोंबड्या, कुत्री इ. पाळीव प्राणी असतात. ही जमात ग्रामीण व नागरी भागातही आढळते.

**२. भिल्लपारधी :-**

भिल्लाप्रमाणे जंगलाच्या आश्रयाने राहणारे म्हणून हे पारधी स्वतःची ओळख भिल्लपारधी म्हणून करुन देतात. "शिकार हा त्यांचा प्रमूख व्यवसाय, गुन्हेगारीतही अत्यंत तरबेज असून हे लोक स्वतःला धनगर पारधी असेही म्हणवून घेतात. त्यांना चोराशे किंवा पठाण पारधी असेही म्हणतात. जंगलातील औषधी वनस्पती गोळा करुन, प्राणी, पक्षी यांची शिकार करुन उपजिवीका करतात. ते तीरकमठ्याने प्राण्यांची शिकार करतात. इतर पारधी उपजाती बरोबर ते रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत. भिल्ल पारधी हे बंदूकीने शिकार करतात. म्हणून ते वेगळे मानले जातात."[३४]

**३. लंगोटी पारधी:-**

"यांची वस्ती मध्यप्रदेशात जास्त प्रमाणात असून कमरेला फक्त लंगोटी घालुन भटकणाऱ्याला लंगोटी पारधी म्हटले जाते. या जमातीच्या वेशावरुनच त्यांना लंगोटी पारधी हे नाव पडले असावे. यांच्यात गुन्हेगारी प्रवृत्ती अधिक आढळते. अगोदर हे वाघाच्या कातडीची लंगोटी वापरत. हे लोक मराठी व उर्दू बोलतात. देवकार्यात रेड्याचा बळी दिला जातो. " [३५]

**४. हरण पारधी:-**

"जंगलात हरणाची शिकार करणारा तो हरण पारधी. कर्नाटकात यांना हरणशिकारी / चिगरी बेटगीर म्हणतात. हे रानोमाळ भटकत मिळेल त्या मार्गाने आपली उपजीवीका करतात. हे दीर्घकाळ एका ठिकाणी वास्तव्य करीत नाहीत. हरणपारधी हरणाची शिकार अत्यंत सावधपणे, फास लावून करतात. फास लावताना हरणाला फासाचा वास कळतो म्हणून तो वाऱ्याच्या विरुध्द दिशेने लावला जातो. हरणाचा फास वेगळ्या प्रकारचा असतो. हा फास पारधी घरीच तयार करतात. " [३६]

**५. बहेलिया:-**

" बैलाच्या आडून हरणासाठी जाळे लावणाऱ्यांना बहेलिया म्हणतात. उत्तर हिंदूस्थानात त्यांना बहेलिया हे नाव असून विदर्भ भागांत बहेलिया व पारधी मिसळून गेलेले आहेत. त्यांना वेगळे ओळखता येत नाही. त्यांच्या भाषेत मारवाडी आणि हिंदीचे मिश्रण आढळते. बहेलियामध्ये कारजात नावाची पोटजात आढळते." [३७]

**६. टाकणकार :-**

पारधी जमातीची ही व्यावसायिक उपजात असून जात्याची पाळी दुरुस्त करणेवरुन हे नाव पडले आहे. रसेल व हिरालाल यांच्या मते, "बावरिया किंवा तत्सम राजपूत उपजाती, गोंड आणि इतर जमाती यांच्या संकरातून ही जमात तयार झाली आहे. ही भामटाची उपजात आहे असे एन्थोवेन म्हणतात. त्यांना टाकिया असेही म्हटले जाते. त्यांची मातृभाषा मारवाडी असून सध्या मराठीचा वापर केला जातो. हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून लंगोटी पारध्यांप्रमाणेच यांच्यातही गुन्हेगारी प्रवृत्ती अधिक आढळते. " [३८]

**७. गाय पारधी:-**

गाईवर बसून फिरणारा तो गायपारधी. गाईचा वाहन म्हणून उपयोग केला जातो. ते गाईवर सामान लादून आणि स्वतः बसून गावोगाव हिंडतात. एवढेच नाही तर ते गाईला वेसन टोचतात.

गायपारधी रानात गाईच्या आड दडून बेसावध पक्ष्यांवर किंवा प्राण्यांवर फासे टाकतात. त्यासाठी गाईला प्रशिक्षित केले जाते. "गायपारधी व फासेपारधी हे गावपारध्यांना निम्न दर्जाचे समजतात व त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत. ते स्वतःची ओळख राजपारधी म्हणूनही करुन देतात. गाईला ते पवित्र मानतात व गाईच्या साथीने ते शिकार करतात. जंगलातील हिंस्त्र वनगाईवर ताबा मिळवून त्यांचा वाहन म्हणून वापर करतात." [३९]

**८. वाघरी पारधीः-**

"वाघूरीने (दोरीच्या जाळीने) सशाची शिकार करणारे ते वाघरी पारधी. वाघूर म्हणजे पक्षी पकडावयाचे दोरीपासून बनविलेले जाळे / लगाम होय. त्या जाळ्याने पशू पक्षांना पकडून त्यांची शिकार करुन त्यावर उपजिवीका करणारी ही उपजात आहे. " [४०]

**९. राजपारधीः-**

"राजदरबारी शिकार पूरविणारे ते राजपारधी होत. महाराष्ट्रात विशेषतः विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्र या भागातील पारध्यांचा जात समूह स्वतःची ओळख राजपारधी अशी करुन देतो. हा राजपारधी समाज इतर सर्व पारधी समाजाला कमी लेखतो. त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार करीत नाही. ते मराठी आणि गुजराती या मिश्र भाषा बोलतात. गायपारधी, फासेपारधी स्वतःची ओळख राजपारधी म्हणून करुन देतात. हे गावाच्या बाहेर पाल ठोकून राहतात. राजपारध्यांत भोसले, काळे, चव्हाण अशी कुळे आहेत. राजपूत, कोळी, वाघरी, धनगर, कोरचर या जातींच्या लोकांस राजपारध्यांनी आपल्यात सामावून घेतले. त्यांच्यात अनेक बोलीभाषा असल्याचे हेच कारण असावे. " [४१]

**१०. गाव पारधीः-**

"गाव पारधी हे गावाच्या आश्रयाने राहतात. इंग्रजांच्या काळात हे गुन्हेगार म्हणून नोंदले गेले होते. त्याकाळी जे पारधी गुन्हेगार म्हणून इंग्रजांनी बंदीस्त केले होते त्यापैकी काही आजही त्याच ठिकाणी स्थिर झालेले आढळतात. पण नंतरच्या काळात गावगाड्याशी ज्या पारधी जमातीचा संबंध आला किंवा गावाशेजारीच ज्यांनी आपली वस्ती कायम केली ते गावपारधी म्हणून स्वतःची ओळख सांगू लागले. " [४२]

११. पाल पारधी:-

"पाल आणि पारध या दोन शब्दापासून पालपारधी हा शब्द तयार झाला आहे. ते वनसंपत्तीवर जगतात आणि पालात राहतात. यांच्या बोलीभाषेवरुन राजस्थान हे त्यांचे उगम निश्चित होते. महाराष्ट्रातील यवतमाळ व चंद्रपूर या जिल्ह्यात यांचे वास्तव्य आहे. निरशिकारी , लंगोटपारधी आणि टाकणकार या पालपारधीच्या पोटजाती असून त्या सर्व अंतर्विवाही आहेत." [४३]

१२. बंदरवाले:-

"माकडाचे खेळ दाखवत ठिकठिकाणी हिंडतात म्हणून त्यांना बंदरवाले पारधी म्हणतात. बंदरवाले व चित्तापारधी एकच आहेत असे कांही पारध्यांचे मत असून त्यांना व्यवसायावरुन हे नाव मिळाले. इतर पारधी व यांच्यात फारसा फरक नाही." [४४]

१३. शिशी के तेलवाले:-

'सुसरीचे तेल विकणारे ते शिशी के तेलवाले' असून सुसरीचे तेल औषध म्हणून विकतात. म्हणून त्यांना शिशी के तेलवाले म्हणतात.

या वरील पारधी जमातीच्या उपजातीशिवाय मीर, कोरचर, मेवारी, गोंड पारधी, महादेव पारधी, घोडे पारधी, इ.आणखीही काही पोटजातींची नोंद आढळते. पारध्याच्या प्रत्येक पोटजातीची भाषा, व्यवसाय, रुढी-परंपरा, कुलदैवते भिन्न आहेत.

## ३.४ पारधी जमातीची न्यायव्यवस्था :-

पारधी जमात वर्षानुवर्षे आपले वेगळे अस्तित्व टिकवून जगत राहिली आहे. त्यातुनच जमाती अंतर्गत जमातीच्या जगण्याचे अलिखीत नियम तयार करण्यात आले व ते पिढ्यानुपिढ्या चालत राहिले. पुढे ते स्वसंरक्षण म्हणून टिकवून ठेवण्यात आले. एका जमातीने दुसऱ्या जमातीशी कोणता व कसा व्यवहार करावा किंवा एका जमातीतील तत्सम उपजमातीशी किंवा पोटजातीशी कोणते व्यवहार किंवा संबंध ठेवावेत याचे स्पष्ट संकेत जगण्यातील अनुभवातून व तयार केलेल्या अलिखित नियमावलीतून दिले गेले. त्यानुसार वर्तन न करणाऱ्या व्यक्तीस विशिष्ट शिक्षेची तरतुद करण्यात आली. त्यामुळे जमातीच्या अलिखीत नियमांचे किंवा संकेतांचे पालन केले जाऊ लागले. यासाठी जमातीचे नियंत्रण करणारी किंवा जमातीचे स्वतंत्र आणि वेगळे अस्तित्व ठेवण्यासाठी कार्यरत असलेली जातपंचायत नावाची स्वतंत्र न्यायव्यवस्था अस्तित्वात आली आणि पिढ्यान -पिढ्या ती अस्तित्वात राहु शकली. इतर विमुक्तांप्रमाणेच पारधी जमातीत जातपंचायतीला मान्यता आहे.

जातपंचायत हे पारध्यांचे पारंपारिक न्यायालय किंवा पवित्र न्याय मंदिर मानले जाते. "पारधी आपल्या जातपंचायतीला 'जातगाव' असे म्हणतात व जातपंचायत बसणे याला पंचायत बखेडा असे म्हणतात. " [४५] प्रत्येक पोटजातीची जातपंचायत वेगळी असते. तिचे स्वरुप, संकेत, नियम आणि शिक्षांचे प्रकार निरनिराळे आहेत. पारधी जमातीत न्यायनिवाडा हा जमातीमध्येच केला जातो. "गावपारध्यांमध्ये 'पवार' आडनावाचे घराणे प्रमुख असुन पंचायतीचे प्रमुख पद परंपरेने पवार त्याच्याकडे असते, तर फासेपारध्यांमध्ये पंचप्रमुख असणाऱ्या पाटील यास पुढारी असे म्हणतात. हे पद परंपरागत असून काळे आडनावाच्या व्यक्तीला ते मिळते." [४६] स्थानिक जातपंचायतीत एखादे प्रकरण मिटले नाही तर वादी - प्रतिवादीस वरच्या पंचायतीत जाता येते. त्याला वरच्या कोर्टात अपील करणे असे म्हणतात. जातपंचायतीत प्रचलित न्यायालयातील शब्दही उच्चारले व वापरले जातात. उदा. आरोपी, फिर्यादी, अपील, साक्षीपुरावे इ. तसेच रुढ कलमांचा उच्चार करुन खटला दाखल केला जातो. उदा. खुन झाला तर ३०२ चा कज्जा असे म्हणतात. जातपंचायतीतील पंच व्यक्तींना कायद्याची कलमे तोंडपाठ असल्याचे आढळते. कलमानुसार शिक्षा सुनावली जाते. पण शिक्षेचे स्वरुप जमातीच्या नियमानुसार असते.

**जातपंचायतीचे नियम -** जातपंचायत ज्या ठिकाणी बसते त्या जागेला अतिशय महत्त्व दिले जाते. ती जागा पवित्र स्थळ मानले जाते. जातपंचायतीस उपस्थित असलेल्या लोकांना अतिशय शिस्तीने वागावे लागते. पंचायतीत खटल्यावर चर्चा चालु असतांना एखादी व्यक्ती दारु पिऊन आल्याचा संशय आला तरी त्यास पाचशे रुपयाचा दंड केला जातो व पंचायत उठेपर्यंत त्याला ही रक्कम भरावी लागते. त्याने जर रक्कम भरली नाही तर ती भरेपर्यंत त्याला जातीबहिष्कृत केले जाते. तसेच पंचायत चालु असताना गांजा ओढण्यास सक्त मनाई असते. एखाद्याने या नियमांचे उल्लंघन केले तर त्याला जाब विचारला जातो आणि ३०० रु. दंडाची शिक्षा दिली जाते. (काळानुसार शिक्षेच्या व रकमेच्या स्वरुपात बदल होत आहे.) दंड न भरल्यास सर्वासमोर फोकाचा मार दिला जातो. पंचायतीच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर पत्ते खेळण्यासही बंदी आहे. तसे केल्यास दंडाची शिक्षा सुनावली जाते. हे सर्व नियम अलिखीत असतात पण याची कल्पना सर्वांना असते. त्यामुळे सहसा जातपंचायतीच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही याबाबत दक्षता घेतली जाते. अशा प्रकारे जमातीत जातपंचायतीचे पावित्र्य जपले जाते. जातपंचायत हे पारधी जमातीचे न्यायदानाचे माध्यम असून न्यायाची अंमलबजावणी कठोरपणे केली जाते. "न्यायनिवाड्यात पारंपारिक मुल्ये व मागील प्रकरणांचा अचूक

व नेमका संदर्भ ही पंचाची वैशिष्ट्ये आहेत. जातपंचायतीमध्ये पंचाच्या अद्भुत व अचाट स्मरणशक्तीचा प्रत्यय येतो." [४७]

जातपंचायतीचे व्यवहार गुप्तपध्दतीने चालतात. पंचायत कोठे बसणार, किती वाजता बसणार याविषयी फक्त जमातीच्या लोकांनाच माहिती असते. पोलिसांना माहिती होवू नये याची काळजी घेतली जाते आणि तशी शंका वाटल्यास लगेच ठिकाण बदलले जाते. कारण जातपंचायतीसाठी एकाच ठिकाणी मोठ्या संख्येने तथाकथित पारधी गुन्हेगार एकत्र आलेले असतात, जी पोलिसांच्या दृष्टीने एक सुवर्णसंधी असते. एखादया गंभीर गुन्हा / प्रकरणावर दोन महिनेपर्यंतसुध्दा चर्चा चालते. जोपर्यंत निकाल होत नाही तोपर्यंत कामकाज चालते. "जातपंचायत बसण्याच्या ठिकाणी देवाचे अस्तित्व म्हणून प्रतिकरुपात दगडाला शेंदूर लावून नारळ फोडला जातो. ऊद - कापूर लावला जातो. आणि कामकाजाला सुरुवात केली जाते. खटला दाखल करण्याची फी म्हणून प्रथम १२५ रुपये पंचासमोर ठेवावे लागतात." [४८]

पारधी समाजात पुरुषाप्रमाणे स्त्रीलाही जातपंचायतीत पुरुषांच्या बरोबरीने असलेले स्थान हे एक खास वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. स्त्री स्वतःची तक्रार स्वतः मांडू शकते.

### ३. ५ गुन्हेगार जमाती कायदा :-

ज्या टोळयांच्या चरितार्थाचा धंदा चोऱ्या करणे आहे, अशा टोळयांना गुन्हेगार जमाती म्हणतात. "राष्ट्राच्या (अस्तित्वात असलेल्या) कायद्याविरोधी समाजविघातक, कायद्याने प्रतिबंध केलेले कृत्य जो करतो, त्याला गुन्हेगार म्हणतात." [४९] या जमातीतील लोक गुन्हे करुनच आपली उपजिवीका करतात. चोरी, लुट, दरोडा यावरच चरितार्थ चालतो. Criminal Tribes Act - १८७१ या कायद्यान्वये घोषित गुन्हेगार जमातीवर अनेक बंधने आली. जन्माला आलेल्या मुलांच्या कपाळावरही गुन्हेगार म्हणून शिक्का पडत असे. "महाराष्ट्रात बेरड, भामटा, कैकाडी, कंजारभाट, कटाबू, बंजारा, पारधी, राजपूत भामटा, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद, राजपारधी बेस्तर या जमातींचा समावेश गुन्हेगार जमातीच्या यादीत होता." [५०] पारधी जमात आणि गुन्हेगारी यांचा अतिशय निकटचा संबंध आहे. किंबहुना गेली १५० वर्षे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आपल्या कपाळी गुन्हेगारीचा शिक्का घेऊन ही जमात जीवन जगत आहे. या शिक्क्यामुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या कायम अपमान, अवहेलनाच सहन करावी लागत आहे. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे होणारे अत्याचार पाहून त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठा, मानसन्मान, संपत्ती, घर इ. सर्वच गोष्टींचे अस्तित्व आहे की नाही असा प्रश्न

अनेकदा निर्माण होतो. अशा या पारधी जमातीच्या अस्तित्वावर घाला घालणाऱ्या गुन्हेगार जमाती कायद्याची पार्श्वभूमी, इतिहास, उत्तरोत्तर झालेले बदल व सद्यस्थिती पूढीलप्रमाणेः-

**१. गुन्हेगारी कायद्याचे स्वरुपः-**

भारतामध्ये १९५२ साली एकूण २८ जमातींना विमूक्त जमाती म्हणून घोषित करण्यात आले. तत्पूर्वी " १८७१ पासून या जमातींना गून्हेगार जमाती म्हणून ओळखले जात होते. त्यावेळच्या मुंबई प्रांतात २८ गुन्हेगार जमाती होत्या." [५१] १८७१ चा गुन्हेगार जमातीचा कायदा लागू होण्यापूर्वीचा या जमातीचा गुन्हेगारी संबंधीचा इतिहास ज्ञात नाही अथवा त्याचा कोणताही लेखी पूरावा उपलब्ध नाही. ते लोक गुन्हेगार केव्हा आणि का झाले इत्यादी संबंधी मानववंशशास्त्रीय माहिती उपलब्ध नाही. या देशातील आदिम जमातीविषयी जगज्जेता अलेक्झांडरच्या आक्रमणापूर्वी कूठलीही माहिती कागदोपत्री उपलब्ध नाही. "शेरसिंग यांनी पंजाबच्या सांसी या जमातीचा अभ्यास केला आहे व भारतात या जातीजमातीची दखल सर्वप्रथम १७७३ साली घेतल्याचे नमुद केले आहे." [५२] गुन्हेगार जमाती कायद्यातंर्गत समाविष्ट जमाती कालौघात उपजिवीकेचे साधन निश्चित नसल्याने गुन्हेगारी स्वरुपाची कामे करुन आपली उपजीविका भागवू लागल्या. ही कृत्ये वैयक्तिक तसेच टोळी वा गट तयार करुन केली जात होती. कालांतराने हा प्रमूख व्यवसाय बनला. याचा समाज व शासन यांना त्रास होत होता. तत्कालीन ब्रिटीश अधिकाऱ्यांनी या बाबीचा भारतीय समाजरचनेशी संबंध लावला. भारतीय समाजरचनेत जातीव्यवस्था या संकल्पनेला मोठे स्थान व महत्व आहे. जात आणि व्यवसाय यांचा अतुट संबंध होता व या दोन्ही बाबी जातीव्यवस्थेमुळे जन्मतःच निश्चित होत होत्या. परिणामी उपरोक्त जमातीचा गुन्हेगारी कृत्ये करणे हा जन्मतःच व्यवसाय आहे असे अनुमान ब्रिटीशांनी काढले. "ब्रिटीशांना भारतात राज्य करीत असताना या स्वाभीमानी, लढावू असलेल्या जमातीचा प्रचंड विरोध होत होता. १८५७ च्या उठावात संस्थानिक, बंडखोर शिपाई यांच्याबरोबरच अनेक आदिम जमातीनी भाग घेतला होता." [५३] त्यामुळेही या जमातीबद्दल त्यांच्या मनात प्रचंड तिरस्कार व चीड होती.

या आदिम जमातींच्या पूनर्वसन आणि सुधारणांच्या नावाखाली "ब्रिटीश अधिकारी टी. व्ही. स्टीफन्स याने इ.स. १८७१ मध्ये गुन्हेगार जमाती कायदा मांडला. या कायद्यामागची तीन गृहीतके अशी होती-

(१) एखाद्या गटात किंवा जातीत जन्मलेली व्यक्ती जन्मजात गुन्हेगार बनते कारण ती आपल्या वडिलांचाच व्यवसाय पत्करत असते. (२) एकदा गुन्हेगार बनलेली व्यक्ती आयुष्यभर गुन्हेगार राहते

कारण त्यात मिळवलेल्या कौशल्यामुळे हेच आपल्या उपजीविकेसाठीचे साधन आहे असे ती मानते आणि गुन्हेगारी हाच तिचा व्यवसाय बनतो. (३)सतत गुन्हेगारी कृत्ये करीत असल्यामुळे व्यक्ती निर्ढावलेली गुन्हेगार बनते. नंतर तिच्यात सूधारणा करणे निव्वळ अशक्य होते." [५४] अशा व्यक्तींचा समूह म्हणजेच संपूर्ण गुन्हेगारी जमात असते. अशा जमातीला समाजापासून अलग ठेवणे, त्यांच्यावर सतत देखरेख ठेवणे व त्यांच्यापासून इतर समाजाचे रक्षण करणे हे शासनाचे कर्तव्य बनते. या भूमिकेतुनच स्टीव्हन्सने गुन्हेगार जमात कायदा मांडला व संमत करुन घेतला.

"उपरोक्त तीन बाबी लक्षात घेऊन या कायद्यान्वये घोषित गुन्हेगारी जमातींना खालील बाबीची सक्ती करण्यात आली. " [५५]

१. घोषित गुन्हेगार जमातीतील सर्व सदस्यांची नोंदणी पोलिस अधिकाऱ्याने केली पाहिजे. तसेच ठराविक कालावधीनंतर नोंदणीकृत प्रत्येक सदस्याने पोलिस अधिकाऱ्याकडे तो सांगेल त्यावेळी हजेरी दिली पाहिजे.

२. नेहमीच्या वस्तीस्थानावरुन केलेल्या किंवा करावयाच्या नियोजित स्थलांतराची किंवा वस्तीस्थान बदलण्याची किंवा वस्तीतून गैरहजर राहण्याची परवानगी संबंधित पोलीस अधिकाऱ्याकडून घेतलीच पाहिजे.

३. या कायद्याद्वारे सरकारला एखाद्या गुन्हेगार जमातीला एखाद्या विभागातून हद्दपार करण्याचे, त्यांना देशाच्या इतर भागामध्ये स्थायिक करण्याचे, स्थलांतरासाठी पास घेण्याची सक्ती करण्याचे अधिकार प्राप्त झाले होते. या नियमांचा भंग केल्यास शिक्षा देण्याचे अधिकार शासनास प्राप्त होते.

**गुन्हेगारीची कारणे :-**

"एखादी जात किंवा जमात गुन्हेगार का बनते, गुन्हेगारी करणे आपला व्यवसाय का मानते या संबंधी निरनिराळ्या शास्त्रज्ञांनी वेगवेगळी कारणमिमांसा केली आहे. त्यापैकी गुन्हेगारीची काही प्रमुख कारणे पूढीलप्रमाणे " [५६]

१. **आनुवंशिकता :-**लोंब्रोसो (Lombroso) या इटालियन डॉक्टरने १८७६ मध्ये लिहिलेल्या 'The Criminal Man' या ग्रंथात गुन्हेगारी प्रवृत्तीचा संबंध मज्जातंतुचे विकार आणि मनोविकृती यांच्याशी जोडला आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती ही अनुवंशिक असते अशी भुमिका त्याने मांडली. अशीच भूमिका फेरी (Ferri) आणि गॅरोफौलो (Garafollo) यांनीही मांडली.

मात्र इतर अनेक शास्त्रज्ञांनी उपरोक्त धारणा चूकीची आहे हे संशोधनांनी सिद्ध केले. "१९११ मध्ये गुन्हेगार जमातीच्या कायद्यात दुरुस्ती करुन गुन्हेगारांचे तीन वर्ग केले. " [५७]

अ) गुन्हेगार जमाती ज्या जन्मतःच गुन्हेगार असतात.

ब) प्रासंगिक गुन्हे करणारे.

क) भटक्या जमाती - संधी मिळताच गुन्हे करणारे.

यापैकी अनूवंशिकता हे कारण पहिल्या वर्गाला लागू केले.

२. **वातावरणाचा प्रभावः-** एखादा समाजगट गुन्हेगार ठरताना वातावरणाचा प्रभाव हे महत्वाचे कारण असते असे मत व्यक्त करताना (Facts of Crime in India, १९६२, P-२४) या ग्रंथाद्वारे गोपाल राव म्हणतात की, 'गुन्हेगारी कृत्ये करणारी भारतातील एखादी जमात जेव्हा पिढयानुपिढया तीच कृत्ये करते तेव्हा त्या जमातीतील गुन्हेगार व्यक्तींची गुन्हेगार प्रवृत्ती ही अनुवंशिकतेने आणि वातावरणाच्या प्रभावाने आलेली आहे असे सर्वसाधारणपणे म्हटले जाते. परंतू वडिलांची गुन्हेगारी प्रवृत्ती ही अपत्यात उतरल्याचा कूठलाही जीवशास्त्रीय सबळ पूरावा देता येत नाही.

भारतातील गुन्हेगार जमातीच्या कायद्यानुसार गुन्हेगार जमातीच्या कुटूंबातील ४ ते १५ किंवा नंतर ६ ते १५ वर्षे वयोगटातील मूलांना कुटूंबापासून अलग ठेवण्याची तरतुद होती. त्यामागे वातावरणाच्या प्रभावामुळे मूल गुन्हेगार बनते हाच विचार होता.

३. **मुल्यहीनत्व :-** समाजातील खालच्या स्तरातील लोकांच्या संदर्भाने ईप्सित (प्रतिष्ठा, सन्मान, समाजातील स्थान इ.) आणि ते साध्य करणाऱ्या समाजमान्य संधी यातील विसंवादामुळे त्यांच्यात स्वतःच्या सामाजिक स्थानासंबंधी नैराश्य आणि असमाधान (Status frustration) निर्माण होते. त्यातूनच संपूर्ण समुह गुन्हेगारी कृत्याकडे वळतो, अशा विचलित जीवनतत्वाची उपपत्ती अल्बर्ट कोहेन (Albert Cohen) यांनी मांडली. गुन्हेगारी कृत्ये करणे हा समाजातील एका जाती गटाचा धर्म का होतो याचे उत्तर शोधण्याचा हा एक प्रयत्न आहे.

४. **संस्कृतीमधील संघर्षः-** संस्कृतीमधील संघर्षाची परिणती ही एखाद्या समाजगटास गुन्हेगारी कृत्ये करण्यास भाग पाडणे यामध्ये होऊ शकते. कॅव्हान्स (Cavans) आणि जॉन्सन (Johnson) यांनी जमातीच्या गुन्हेगारी कृत्यांचे कारण समाजाच्या संस्कृतीच्या संघर्षात असल्याचे मत मांडले. ते म्हणतात की, 'जमातीची संस्कृती जमातीबाहेरील व्यक्तींवर हल्ले करु पाहते परंतू भारतीय कायद्यामुळे किंवा प्रादेशिक कायद्यामधील तरतुदीमुळे ते अशक्य असते अशा वेळी स्वतःच्या

नियंत्रणाची प्रणाली आणि जमातीबाहेरील समाजाचे नियम यांच्या संघर्षात ते गुन्हेगारी कृत्यांकडे वळतात'.

गुन्हेगार जमातीतील लोकांमध्ये गुन्ह्याची जाणीव त्याचप्रमाणे अपराधित्वाची जी जाणीव असते, त्यातून मुक्त होण्यासाठी स्वतःच्या कृतीचे समाधान करण्यासाठी काही रुढी, परंपरा आणि पारंपारिक मौखिक व पुराणकथासदृश कथा निर्माण करुन त्याद्वारे मानसिक संरक्षण मिळवण्याचा प्रयत्न होतो. याठिकाणी हे नमूद करणे आवश्यक वाटते की, गुन्हेगारी जमातीचे स्वतःचे नितीनियम होते. त्यांनी गुन्हे करण्याच्या पध्दती व तंत्र विकसित केले होते. मात्र या उपपत्तीआधारे एकाच स्तरातील आणि सांस्कृतिक परंपरेतील काही लोक गुन्हेगार बनतात आणि काही सुरळित जीवन जगतात यासाठीच्या कारणांची मीमांसा करता येत नाही.

५. **सहवासः-** कुटूंब व समाजात सहवासाचा परिणाम प्रभावी असतो. सदरलँड (Sutherlnind) यांनी 'इतर कृत्यासारखीच गुन्हेगारी कृत्ये सहवासातुन शिकली जातात. गुन्हेगार कुटूंबात मुलांना जन्मल्यापासून गुन्हेगारीचे शिक्षण मिळते अथवा जाणीवपूर्वक दिले जाते' अशी (differential association) उपपत्ती मांडली. अशा जमातीतील सर्व लोक गुन्हेगारी कृत्यांचे धर्मकृत्ये, जमातीचे पवित्र कर्तव्य वगैरे सबबीखाली त्याचे सामाजिकदृष्ट्या समर्थन करतात व गुन्हेगारीबद्दलची अपराधीपणाची भावना नष्ट केली जाते. परिणामी गुन्हेगारी कृत्ये करणे ही जीवनप्रणाली बनते.

६. **आर्थिक विपन्नावस्थाः-** गुन्हाशास्त्रज्ञांनी दारिद्र्य आणि आर्थिक विपन्नावस्था हेच गुन्हेगारीचे खरे कारण असल्याचे मत मांडले आहे. बिस्वास (Biswas) आणि गिलीन (Gillin) या शास्त्रज्ञांनी गरिबी आणि आर्थिक दुरावस्था हे माणसाला गुन्हेगार बनविण्यास कारणीभूत प्रमुख घटक आहेत असे म्हटले आहे.

भारतात ज्या जमाती गुन्हेगारी कृत्ये करीत होत्या त्याची कारण मीमांसा करताना सकृतदर्शनी आर्थिक विपन्नावस्था हे कारण वाटत असले तरी इतर कारणेही संयूक्तिक वाटतात.

- **गुन्हेगार जमातीचे वसाहतीकरण व सुधारणा**

१८७१ च्या गुन्हेगारी कायद्याअंतर्गत घोषित गुन्हेगार जमातींमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या हेतूने "१९०८ साली गुन्हेगार जमाती वसाहत कायदा पास करण्यात आला." [५८] या कायद्यान्वये प्रांतिक सरकारांना, वसाहती (Settlements) बनवण्याचा व त्यामध्ये गुन्हेगार जमाती सदस्यांना ठेवण्याच्या तसेच त्यांच्या मूलांना शिक्षणाची सोय व लोकांना पोलिसांच्या देखरेखीखाली व्यवसाय प्रशिक्षण

देण्याची सोय इ. तरतुदी होत्या. "१९११ मध्ये यात पुन्हा बदल करुन असामाजिक तत्वापासून या समाजाच्या हक्कांचे संरक्षण करणे व गुन्हेगार जमातीचे पुनर्वसन करणे इ. उद्देश समाविष्ट करण्यात आले." [५९] अशाप्रकारे भारतातील गुन्हेगार जातीजमातींचे वस्तीकरण करुन त्यांना सुधारण्याचे कार्य सुरु झाले. यामध्ये "१८६१ साली केलेल्या मुक्तिसेना (Salvation Army) या मिशनरी संस्थेचे कार्य मोठे आहे." [६०] या संस्थेने स्वतःच्या देखरेखीखाली १९२३ पर्यन्त भारतात एकूण ३३ वसाहती चालविल्या. या गुन्हेगार जमाती कायद्यामध्ये १९२४ साली पून्हा दुरुस्ती करण्यात आली, ज्याद्वारे वसाहत स्थापना, त्याचे व्यवस्थापन इ. संबंधीचे अधिकार प्रांतीय शासनांना बहाल केले गेले. त्यानुसार मुंबई इलाख्यात एकूण बारा मुख्य वसाहती होत्या, ज्यात पारधी जमातीची लोकसंख्या सर्वात जास्त होती.

या वसाहतीमध्ये दाखल झालेल्या जमाती सदस्यांच्या वर्तणुकीवर देखरेख ठेवणे; त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणे, त्यांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक दर्जा उंचावणे हे उद्देश समोर ठेवून वसाहतीचे कामकाज चालु होते. जोपर्यंत वसाहतींचे व्यवस्थापन मिशनरी संस्थांकडे होते तोपर्यंत हे उद्देश काही प्रमाणात साध्य होत होते. मात्र नंतरच्या काळात जसजसे वसाहतींचे व्यवस्थापन देशी सवर्ण अधिकाऱ्यांकडे सोपवले गेले तसतसे भ्रष्टाचार, पूर्वग्रहदुषित मते इ.मुळे वसाहतीच्या माध्यमातुन सुधारणा होण्याची शक्यता मावळली. अर्थात वसाहतीमधील वास्तव्यामुळे गुन्हेगारी जमातींच्या वर्तनात एकदम बदल होणे कठीण होते. जमातींचा पारंपारिक कायदा व सरकारचा कायदा, भद्र समाजाची संस्कृती व या जमातीची संस्कृती, अधिकाऱ्यांच्या रुढ नैतिक कल्पना व जमातीतील रुढ नितीकल्पना इ.मध्ये कमालीची तफावत असल्याने संघर्ष अटळ होता. या संघर्षामुळे सुधारणा व प्रगतीसाठी या वसाहती पूरक ठरण्याऐवजी जमातीसाठी जाचक होऊ लागल्या. (उदा. बहुतेक गुन्हेगार जमातीमध्ये दारु ही गोष्ट जन्म, मृत्यू आणि लग्न समारंभामध्ये आवश्यक असते, तर वसाहतीमध्ये मद्यपानास मनाई होती.) वसाहतीमध्ये संघर्ष वाढत गेला आणि सदस्यांचे पलायन करण्याचे प्रमाणही वाढत गेले. वसाहती म्हणजेच सेंटलमेंटमध्ये एकतारी कुंपण, दोनतारी कुंपण व तीनतारी कुंपण असे गुन्हाकृतीच्या गंभीरतेवरुन केलेले तीन विभाग होते. एकुणच वसाहतीमधील वर्तणुकीसाठीचे नियम, नियमभंगासाठीची शिक्षा इ. संदर्भाने वसाहतीमधील जमातीसदस्यांचे जीवन पशुतुल्यच होते. परिणामी, सेंटलमेंटना 'खुल्या कारागृहांचे' स्वरुप प्राप्त झाले.

यानंतरच्या काळात या गुन्हेगार जमातीच्या वसाहती योजनांना समाजातील बुध्दिजीवी वर्गातून विशेषतः कायदातज्ञांकडून विरोध सुरु झाला. गुन्हेगार जमाती कायदा मानवताविरोधी किंवा मानवी मूल्ये पायदळी तुडवणारा असल्याने कायदाच रद्द करण्याची मागणी होऊ लागली. "आदिम जमाती संघाचे उपाध्यक्ष ए.व्ही. ठक्कर, बिहारचे तत्कालीन गव्हर्नर एम.एस. अणे, मद्रास कोर्टाचे माजी ॲक्टींग जज, एम. व्ही. सुब्बाराव, मद्रास हायकोर्टाचे माजी न्यायाधीश दिवाण बहादूर व्ही. बसाम अय्यंगार, आंध्रप्रदेशातील आमदार व्ही. राघवय्या आणि भारताचे पहिले पंतप्रधान पं. नेहरु ही काही विरोध करणारी आघाडीची नावे सांगता येतील." [६१] पुढे १९४९ ला गुन्हेगार जमाती वसाहत कायदा रद्द झाला होता. पण नेहरुंनी १९५२ ला हा कायदा रद्द म्हणून घोषित केला आणि विमुक्त हा शब्दप्रयोग केला. या विमुक्त जमातीचे प्रश्न होते तिथेच आहेत. कारण आजही गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे पहिली धाड पारधी वस्तीवर पडते. उस्मानाबाद जिल्ह्यातील ढोकी, परंडा, भवानवाडी, शेळगाव, सिंदगांव, मंगरुळ येथील पारधी अत्याचाराच्या घटना बोलक्या आहेत.

### ३.६ पारधी जमातीचा संस्थात्मक आढावा :-

### ३.६.१ कुटुंब संस्था :-

भारतातील अनेक जाती - जमाती या प्रथा, परंपरा, समाजाचे नियम, व धर्माचे काटेकोरपणे पालन करताना निदर्शनास येतात. यापैकीच एक पारधी जमात होय. या जमातीतही समाजाचा, जमातीचा सदस्य म्हणून टिकून राहण्यासाठी, शिक्षणाचे प्रमाण कमी असले तरी समाजावरची त्यांची पकड घट्ट असल्याचे दिसून येते. समाजाच्या प्रथा परंपरा, कौटूंबिक, वैवाहिक, धार्मिक, सामाजिक रुढी यांना स्वतःच्या जीवनात त्यांनी स्थान निर्माण केले आहे. इतर समाजाच्या तुलनेत समाजपरिवर्तनाचा वेग अत्यंत मंद आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे हा समाज स्वतःचा धर्म व संस्कृती जपण्याचे कार्य आजतागायत करीत आहे. पारधी जमातीचे सामाजिक जीवन हे अप्रगत अवस्थेत असल्याचे आढळते. कारण आदिवासी समाजाचे वास्तव्य सुधारलेल्या जगापासून दूर, दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशात, जंगलात असते. त्यांची वृत्ती भटकी असल्यामुळे ते वारंवार स्थलांतर करीत असल्याने जीवन अस्थिर बनते.

"पारधी जमातीमध्ये पितृसत्ताक कुटूंब पध्दती असून वडिलांच्या नावावर घराणे ओळखले जाते. घराण्याचा वंश पित्याकडूनच चालतो." [६२] पारधी समाजात पोटजाती या स्वतंत्र असून त्यांच्यात आपआपसात कोणत्याही प्रकारे रोटी बेटी व्यवहार होत नाहीत. कारण प्रत्येक पोटजातीची भाषा,

पोषाख, व्यवसाय, कुलदैवते आणि रुढी परंपरा भिन्न आहेत. "कुटूंबात पती स्वतःच्या बायकोचा उल्लेख 'रांड' या नावाने करतो. तर पुरुषाला किंवा पतीला स्त्री किंवा पत्नीने एकेरी नावाने हाक मारण्याची पध्दत या समाजात आहे." [६३] कुटूंब ही मानवी समाजातील अत्यंत महत्वाची व मूलभूत स्वरुपाची संस्था आहे. "अगदी मर्यादित अर्थाने पती - पत्नी व त्यांची अविवाहित मुले यांचा एक निवासी गट म्हणजे कुटूंब होय." [६४] पारधी समाजात एकत्र कुटूंब अपवादानेच आढळते. विवाहानंतर मुलगा स्वतंत्र संसार थाटतो. त्यामुळे सामान्यतः एका कुटूंबात पती - पत्नी व त्यांची अविवाहित मुले असा परिवार असतो. या समाजाने आपले सामाजिक जीवन घडवताना कुटूंब व्यवस्थेचा आधार घेतल्याचे आढळते. पारधी समाज आजही जुन्या कल्पनांना सोडण्यास तयार नाही. म्हणून हा समाज इतर समाजाच्या तुलनेत मागास आहे.

पारधी समाज गावापासून दूर अंतरावर राहत असल्याने कुटूंबाच्या व स्त्रीच्या संरक्षणासाठी तो सतत दक्ष असतो. कुटूंबात स्त्रीला स्वातंत्र्य आहे. तशी अनेक बंधनेही आहेत. या परंपरागत बंधनांमुळेच या जमातीच्या कुटूंबाचे वेगळेपण लक्षात येते. पारधी समाजाचे अलिखित नियम किंवा परंपरा ह्या समाजरक्षणासाठी निर्माण झाल्या होत्या.

पारधी स्त्रियांच्या संदर्भात अतिशय कठोर नियम आहेत. स्त्रीचे चारित्र्य हे कुटूंबाची किंवा जमातीची इज्जत मानली जाते. आर्थिक व्यवहारात मात्र स्त्रिला गहाण ठेवण्याची पध्दत किंवा कर्जाच्या मोबदल्यात कर्ज फिटेपर्यंत कर्ज देणाऱ्यास मुलगी गहाण ठेवण्याची पध्दत या समाजात होती.

**तक्ता क्र. ३.२**

**उस्मानाबाद जिल्हा पारधी स्त्री- पुरुष प्रमाण दर्शविणारा तक्ता**

| जिल्हा | पुरुष | स्त्रिया | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| एकूण आदिवासी | ५१०७ | ६०११ | ११७५५ | २२८७३ |
| पारधी | ३२९६ | ३९६० | ७८९९ | १५१५५ |

**स्त्रोत :-** पारधी विशेष योजना सन २००६-०७ उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी सर्वेक्षणाची व योजनांची संक्षिप्त टिपणी - प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद

**नातेसंबंधाचे स्वरुप :-**

एफ. एम. केसिंगच्या मते, सामाजिक संघटनेचा गाभा म्हणजेच नाती गोती होत. पारधी जमातीत पूर्वीपासून नातेसंबंधाला महत्त्व आहे. ही जमात जंगलात राहत असल्याने या जमातीने आपल्या जवळच्या लोकांशी सतत संपर्क ठेवला आहे. धार्मिक विधी, सण-समारंभ, देवकारण इत्यादी

प्रसंगात नातेसंबंध जोपासले जातात. या समाजात धार्मिक प्रसंगी नातेवाईक असणे प्रतिष्ठेचे समजले जाते. कोणत्या नात्यातील व्यक्तीशी कसे संबंध असावेत हे समाजमान्य आहे. पारधी जमात अंधश्रध्दाळू असल्याने या नात्यांच्या नियमांचे पालन काटेकोरपणे केले जाते. पारधी स्वतःच्या नातेवाईकांसाठी सगे हा शब्द वापरतात. आई-वडील, बहीण-भाऊ, पती-पत्नी, पत्नीचे नातेवाईक यांच्यातील नातेसंबंध नियमबद्ध असतात. बऱ्याचवेळी या नियमांना धर्माचा आधार घेतला जातो. विवाहित बहिणीच्या हातचे खायचे नाही, फक्त पत्नी आणि आई यांनीच बनवलेले अन्न सेवन करायचे. या दोघी नसतील तर पारधी पुरुष स्वतः बनवून अन्न सेवन करतो पण नात्यातील इतर स्त्रिने बनवलेले अन्न सेवन करीत नाही.

"ज्या व्यवस्थेमुळे विविध व्यक्ती एकमेकांशी दुव्याने जोडल्या गेलेल्या, अनेक फाटे फुटलेल्या व संकीर्ण स्वरुपाच्या संबंधांनी एकत्रित बांधले जातात, ती संबंधांची रचनात्मक व्यवस्था म्हणजे आप्तसंबंध व्यवस्था होय." [६५]

समाजाच्या सामाजिक संस्थेचा गाभा म्हणजे नातीगोती असली तरी, पारधी जमातीत नाते संबंधाचे स्वरुप परस्परपूरक अशा स्वरुपाचे असून हे संबंध अस्थिर असतात. भटकंती आणि गुन्हेगारी वृत्तीमुळे जगण्याला आणि कौटुंबिक जीवनाला स्थिरत्व नसते. पती जेलमध्ये असताना पारधी स्त्री पतीला सोडवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करते अथवा दुसरा विवाह करते. पारधी विवाह संस्था ही करारात्मक असल्याने विवाह टिकवून ठेवण्यासाठी खास प्रयत्न केले जात नाहीत. पतीने पत्नीला सोडुन दिल्यास किंवा तिचा पती वारल्यास माहेरची मंडळी तिला आधार देतात, पण स्वतःच्या उदरनिर्वाहाचे साधन तिला स्वतःलाच शोधावे लागते. थोडक्यात पारधी आप्तसंबंधाचे स्वरुप दुय्यम स्वरुपाचे व आपलेपणाच्या अभावाचे आहे. बऱ्याच वेळी नात्यांमध्ये वैरभाव निर्माण झाल्याने शिघ्रकोपी पारधी लोक एकमेकांचे खुनही करतात. नात्यातील नियमांचे उल्लंघन झाल्यास एकमेकांना समजून घेतले जात नाही. त्या कारणावरुन जातपंचायत बसते. पारधी आप्तस्वकियांत दारुला आत्यंतिक महत्त्व आहे. पाहुणचारात मांसाहार आणि दारु यांचा समावेश आवर्जून असतो. दारु सेवनामुळे अनियंत्रित वर्तनातुन झालेली छोटीसी चूक स्वाभिमानाला ठेच पोहोचवते. परिणामी, नातेसबंधात दुरावा निर्माण होतो. तापट, क्रोधी व प्रबळ सुडभावना ही स्वभाववैशिष्ट्ये असल्याने अनेक अनाकलनीय घटना घडतात. जातपंचायतीसमोर घडलेली एक घटना अशी की "वाग्दत्त सुनेच्या घरी पूर्वीच्या कारणामुळे सासरा अन्न व पाणी घेत नव्हता. म्हणून मुलीच्या बापाने मुलगी

देण्यास नकार दिला. सुड म्हणून मुलाच्या बापाने मुलीच्या आईस फितवून आणून मुलाशी लग्न लावले, तर वाग्दत्त सुनेच्या बापाने दहा हजार घेऊन सर्व प्रकरण मिटवले." [६६] अशा प्रकारे स्वभावातली आणि नात्यातील ही अगतिकता पहावयास मिळते.

**३.६.२ विवाह संस्था :-**

समाजातील व्यक्तींच्या वर्तनात अनुरुपता घडवून आणण्याचे काम सामाजिक संस्थेकडून पार पाडले जाते. कुटूंबाच्या निर्मितीसाठी व समाजाच्या स्थैर्यासाठी विवाह संस्था ही प्राचीन सामाजिक संस्था आहे. समाजविकासाच्या प्रत्येक अवस्थेत विवाह संस्था ही कोणत्या ना कोणत्या स्वरुपात दिसून येते. व्यक्तीच्या लैंगिक गरजेला नियंत्रित करण्याच्या उद्देशाने विवाह संस्थेचा उदय झाला. श्री. एडवर्ड वेस्टरमार्क म्हणतात की, कायदा व रिती रिवाज यांना संमत करणाऱ्या एक किंवा अधिक पुरुष व एक किंवा अनेक स्त्रियांचे संबंध म्हणजे विवाह होय. व हे संबंध संबंधित व्यक्तीच्या व त्यांच्या मुलांच्या बाबतीत कांही हक्क व कर्तव्ये निर्माण करणारे असतात. पारधी समाजामध्ये विवाहाला विशेष महत्व दिले जाते. विवाहाच्या निमित्ताने अनेक रुढी परंपरा, आचार - विचार आढळून येतात. स्त्री व पुरुष अनेक सामाजिक संकेतांचे पालन करीत एकत्र राहतात. त्यांच्या विवाहविधीत धार्मिक क्रिया आढळत नाहीत. जोडीदार निवडताना कोणत्या वयात कोणत्या समूहातील व्यक्तीशी आणि कोणत्या पध्दतीने विवाह करावा याबाबत अनेक बंधने प्रचलित आहेत. पारधी समाजाच्या पोटजातींचे विवाहाचे प्रकार आणि नियम वेगवेगळे आहेत. फासेपारध्यांमध्ये मुलगी उपवर झाल्यावर लग्न करतात. तर गावपारधी आणि भिल्लपारधी या पोटजातीमध्ये बालविवाहाची प्रथा रुढ आहे.[६७] फासेपारधीमध्ये मुलाचे विवाहाचे वय १९ ते २२ आणि मुलीचे १६ ते १८ वर्षे आहे. तर पालपारधीमध्ये मुलाचे १८ ते २० आणि मुलीचे १२ ते १५ वर्षे हे विवाहवय मानले जाते. लग्नाला 'ब्याह' असे म्हणतात. जमातीत परस्पर बोलणी करुन विवाह ठरवण्याची प्रथा प्रचलित आहे. "विवाहाची मागणी मुलाकडून घातली जाते. दोन्ही घरातील व्यक्ती वाटाघाटी करुन लग्न ठरवतात. लग्नकार्य मुलीच्या घरी पार पडते. विवाह दिवसा न करता संध्याकाळच्या वेळी केला जातो." [६८] बालविवाह झालाच तर मुलगी वयात येईपर्यंत वडिलांकडेच राहते. मुलगी वयात आल्यावर ओटी भरुन तिच्या सासरी पाठवली जाते.

**विवाहाचे नियमः-**

विवाह इच्छुक वधुवरांना जोडीदार निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य नसते. जमातीतील नियम, प्रथा, संकेत, रीतिरिवाज यांना अनुसरुनच विवाह करता येतो. कोणत्या पुरुषाने कोणत्या स्त्रीशी लग्न

करावे किंवा करु  नये यासंबंधी अंतर्विवाहाचे व बहिर्विवाहाचे नियम आढळतात. वर्णव्यवस्थेबद्दल ते अज्ञात असले तरी रोटी -बेटी  व्यवहाराविषयी  ते कडक नियम पाळतात. जमातीबाहेरचा विवाह हा दंडास पात्र समजला जातो. "पारधी जमातीत देवकाची कल्पना आहे." [६९] पारधी समाज हा अंतर्विवाही समुह असून त्यांच्यात पवार,चव्हाण, भोसले, काळे, रावत, जाधव, सोळंकी, शिंदे इ. आडनावे असून हीच कुळे आहेत. समान आडनाव किंवा समान कुळात विवाह  हा मोठा गुन्हा समजला जातो. "एखाद्या निश्चित सामाजिक समुहातीलच व्यक्तींना लग्न करण्याचा आदेश देणाऱ्या नियमाला अंतर्विवाहाचे बंधन असे म्हणतात." [७०] या बंधनाला अनुसरुन आपला जोडीदार आपल्या समुहातीलच निवडावा लागतो. "या जमातीत अनेक अंतर्विवाही गट आहेत. जसे फासेपारधी, राजपारधी, हरिणपारधी, लंगोटीपारधी आणि टाकणकार इ." [७१] "त्यांच्यात देवक (totem) मानण्याची प्रथा आढळत नाही. " [७२] एकाच आडनावाचे पारधी स्वतःला एकमेकांचे भाऊबंद समजतात. "कोल्हापूर व कर्नाटकातील फासेपारधी अंतर्विवाही गटाचे आहेत. राजपारधी या उपजातीशी ते कसलेही वैयक्तिक संबंध ठेवत नाहीत. कारण ते स्वतःला श्रेष्ठ मानतात. फासेपारध्यांमध्ये काळे, चव्हाण, पवार हे बहिर्विवाही गट आहेत. "पती -पत्नी हे भिन्नभिन्न गटातील असावेत असा नियम असल्यास त्या विवाहास बहिर्विवाह म्हणतात." [७३] याचाच अर्थ असा की, या नियमानुसार व्यक्तीला एकाच गटातील स्त्री-पुरुषांना, एकमेकांशी विवाह करता येत नाही. कुटूंब, कुळ, आडनाव या गटाबाहेरील जोडीदार असला पाहिजे. एन्थोवेनच्या मते, "टकारीमध्ये समान  कुळ अथवा समान कुलदैवत असलेल्या कुटूंबाशी बेटी व्यवहार होत नाहीत. मात्र टाकणकारांमध्ये वधू अथवा वराचे  कुळ भिन्न असताना जर कुलदैवत कलंका देवी नसेल तर बेटीव्यवहार केला जातो." [७४] अंतर्विवाहाचे व बर्हिर्विवाहाचे नियम हे परस्पर विरोधी असले तरी कोणत्याही समाजात हे नियम एकाच वेळी कार्यरत असतात. व्यक्तीने कोणत्या गटातील व्यक्तीशी विवाहबध्द व्हावे व कोणत्या गटातील व्यक्तीशी विवाहबध्द होऊ नये हे वरील नियम स्पष्ट करतात. पण  व्यक्तीने आपल्या नात्यातील कोणत्या व्यक्तीशी विवाह करावा याविषयीचे नियम किंवा प्रथा समाजात आढळून येतात. त्या नियमानुसार होणाऱ्या विवाहाला अधिमान्य विवाह म्हणतात. पारधी जमातीत पुरुषाने आपल्या मामेबहिणीशी लग्न केल्यास अधिक चांगले  समजतात. मामाच्या मुलीशी विवाह नाही केला तर  मामा जाब विचारु शकतो. "आते बहीण, मावस बहीण  यांच्याशीही विवाह होतो. पण हा विवाह तितकासा स्वागतार्ह नसतो. दोन सहोदर भावांचे दोन सहोदर बहिणींशी लग्न होऊ शकते." [७५] अपवादात्मक परिस्थितीत मेव्हणीशी विवाह करतात.

या जमातीत साटे-लोटे पध्दतीनेही विवाह होतात. तसेच मेहूणा - मेहूणी विवाह (Sororate) आणि दीर भावजय विवाहालाही जमातीत पसंती दिली जाते. पारधी जमातीच्या विवाहविषयक नियमांनुसार अमुक दोन व्यक्तींचे लग्न निषिध्द आहे असे लग्नानंतर आढळून आले तर त्या स्त्रिने मुलांना जन्म दिलेला असला तरी लग्न मोडले जाते. जमातीतील एखाद्या पुरुषाने तिला नादी लावून भ्रष्ट केले तर भट ब्राम्हणांकडून तिचे शुध्दीकरण केले जाते व त्या पुरुषाला तिच्याशी लग्न करण्यास भाग पाडले जाते. त्या पुरुषाला आणि मुलीच्या बापाला दंड करता येतो आणि त्यांना जातीला जेवण द्यावे लागते. "विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंधांना कधीच परवानगी दिली जात नाही. याचे उल्लंघन झाल्यास नाक कापणे किंवा ओठ कापण्याची शिक्षा दिली जाते." [७६]

पारधी समाजात बुधवार, शुक्रवार व रविवारी विवाह होतो. विवाहदिनी देवक बांधले जातो. "समान देवकात लग्न करीत नाहीत."[७७] पारध्यांच्या विविध वस्त्यांमध्ये वेगवेगळे विवाह विधी आढळतात. विवाह विधीमधील पाटील हा मोठा दुवा आहे. गोत्र पाहण्यापासून ते गोत्र जोडण्यापर्यंत व विवाह जुळविण्यापासून फारकत देण्यापर्यंत पाटीलच मुख्य भूमिका बजावतो. यासाठी त्याला बिदागी द्यावी लागते. मुलीच्या बापाला मुलाच्या बापाकडून हुंडा मिळतो. म्हणजेच पारधी समाजात वधुमुल्य द्यावे लागते त्यास द्येज किंवा द्याज असे म्हणतात."[७८] सुरुवातीला ही रक्कम ठरलेली होती. पण कालपरत्वे ही रक्कम बदलत आहे. ठरलेली रक्कम एकाच वेळी देणे शक्य नाही झाल्यास ती हप्त्याने देण्याची परवानगी असते. विवाहात वधु मुल्याला फार महत्व असते. मुलीचा बाप पैशासाठी आपल्या मुलीचा विवाह अनेकांसोबत करु शकतो. म्हणूनच पारधी समाजात विवाह हा निव्वळ करार मानला जातो. लग्नानंतर ती मुलगी दुसऱ्या मुलाला आवडली आणि मुलगीसुध्दा पहिल्या पतीकडून दुसऱ्याकडे जाऊ इच्छित असेल तर जेवढा हुंडा पहिल्याने दिला होता तेवढाच हुंडा दुसरा पहिल्याला देतो व मोकळीक घेवून लग्न करतो. त्या मुलीला मुले असतील तर ती मुले तिच्या पहिल्या पतीकडेच राहतात. तसेच पहिल्या पतीने मुलीच्या वडिलांना ठरल्याप्रमाणे द्याज दिले नाही तर मुलीचे वडील मुलीच्या पहिल्या लग्नानंतरसुध्दा दूसऱ्याकडून पैसे घेऊन तिचे दुसरे लग्न करतात एखाद्याने कर्ज घेतले असले तर कर्जाच्या मोबदल्यात कर्ज फिटेपर्यंत त्या कर्ज देणाऱ्या व्यक्तीकडे मुलगी किंवा पत्नी राहते. म्हणजेच पारधी समाजात मुलगी किंवा पत्नी गहाण ठेवण्याची पध्दत होती. जर त्या स्त्रिला त्या काळात मुले झाली तर ती मुले त्या व्यक्तीकडेच ठेवून ती स्त्री कर्ज फिटल्यावर आपल्या वडिलांकडे किंवा पतीकडे निघून जाते. तसेच "नियोजित वर द्याजाची आवश्यक रक्कम जमा करण्यास असमर्थ

असेल तर तो आपल्या भावी सासऱ्याकडून ती रक्कम कर्जाने घेतो. हप्त्या-हप्त्याने ती ठरलेल्या वेळेवर परत करतो. मुलाला देज देणे शक्य नसेल तर तो भावी सासऱ्याच्या घरी कांही काळ नोकरी करतो." [७९] वधूमुल्य नेहमीच रोख स्वरुपात नसते. वराच्या दर्जानुसार वधुकडून भांडी, कपडे दिली जातात. विवाहानंतर पूरेशा जागेअभावी आपल्या जुन्या घराशेजारीच मुलगा घर करतो. विभक्त राहणे अभिमानाचे समजले जाते.

**पारंपारिक विवाह प्रथा :-**

पारधी जमातीची विवाहाची पध्दत इतरांपेक्षा वेगळी आहे. इतरांशी संबंध नसल्याने पारधी जमातीवर इतर कोणत्याही जातीचा प्रभाव पडला नाही. त्यामुळे त्यांचे रितीरिवाज, रुढी परंपरा मुळच्याच आणि पूर्वीपासून चालत आलेल्या आहेत. यास आजही अनेक आधार सापडतात. पारध्यांचा विवाह विधी अत्यंत साधा असतो. "वधू-वरांनी तांड्याभोवती सात फेऱ्या घालणे व लोकांनी अक्षता टाकणे हा विवाहात प्रमुख विधी असतो." [८०] पारध्यांच्या पोटजातीत विवाहाचे वेगवेगळे स्वरुप पहावयास मिळते. फासे पारध्यांमध्ये विवाह विधी जमातीतील अनुभवी व्यक्ती किंवा ब्राम्हणाकडून केला जातो. विवाहाचे नियम जमातीचेच आहेत. पिंपळाच्या किंवा आंब्याच्या पानाचा मंडप करतात. हाडे व पाने यांचे तोरण बांधतात. जांभळाचा पाला व भाकरी जनावराच्या लांब हाडाला गुंडाळून ते घराच्या छपरावर टांगुन ठेवतात. लग्नात देवक बसवतात व वधू-वर त्याला प्रदक्षिणा घालतात. मग त्या दोघांच्या वस्त्रांना सात-सात गाठी मारतात. अपवादात्मक परिस्थितीत पळून जावून विवाह केला जातो. विवाह विधीत हिंदूप्रमाणे इतर घटकांना ( दागिने, रुखवत, आहेर इ.) विशेष महत्व दिले जात नाही. वधूच्या गळयात काळ्या मण्याची पोत घातली जाते. लग्नात भात, गूळ व तेल असे जेवण असते. आता त्यात मांसाहाराचा समावेश झाला आहे. अक्षतेच्या अगोदर नवरा- नवरीला आंघोळ घालतात. आंघोळीचा मान नवऱ्याकडील मंडळीस असतो. हळद लावण्याचा मान नवऱ्याच्या आईचा असतो. आंघोळीनंतर मांडवातच देवदेवतांची पूजा होते. नैवेद्य म्हणून तुपभात व गुळ असतो. "बाशिंग म्हणून पिंपळाची सात पाने व कापसाची बोंडे यांची माळ दोघांच्याही डोक्याला बांधतात. ती बांधल्यावर लग्न झाले असे समजण्यात येते." [८१] नवरा नवरीला आपल्या घरी नेतो. त्यांच्या डोक्यावर देवाचे कापड धरतात व नवऱ्याची आई त्यांच्या वाटेवर हळदीत भिजलेल्या कापसाच्या बिया टाकते. या बियांपासून झाडे उगवून कापूस तयार व्हावा व त्यावरुन आपल्या मुलाने जावे म्हणजेच त्याचे पुढील आयुष्य सुखी असावे ही भावना या विधीमागे असते.

घराजवळ आल्यानंतर नवरा- नवरीच्या वस्त्रांना ज्याने गाठी मारल्या तो गाठी सोडतो. व नवरी तिच्या घरी जाते. नंतर नवरा तिच्या घरी जाऊन तिला खांद्यावर घेऊन आपल्या घरी पळत येतो. त्यानंतर जेवणाचा कार्यक्रम होतो. "जो लग्न लावतो त्यास लग्नाच्या विधीची सर्व माहिती असावी लागते. जर लग्न लावणारी व्यक्ती विधी करण्यास चुकली तर त्याला दंड केला जातो." [८२] पारध्यांच्या लग्नविधीत करमणूकही केली जाते.

*"गोडी न गोडी उतऱ्यो रे हऱ्या बाबू मोरे,*

*तेरी छोटी सी गुजरी लाल कढन लगा"* [८३]

अशा स्वरुपाची गाणी स्त्रिया म्हणतात. गाठी सोडणे, काकण सोडणे, सुपारी खेळणे, हळद खेळणे इ. गोष्टींमुळे मनोरंजन होते.

"पारधी जमातीत बहुपत्नीत्व रुढ आहे. मात्र बहुपती विवाह आढळत नाही. बहुपत्नीकत्वाची चाल असली तरी बायको सोडण्याचे प्रमाणही मोठे आहे." [८४] पहिला विवाह हाच विधीवत होतो. नंतर मात्र वधु -वरांच्या वस्त्रांना गाठी मारल्या की विवाह झाला असे समजले जाते. विवाहाच्या बाबतीत स्वातंत्र्य किंवा उदारमतवादी दृष्टिकोन आहे. हिंदू धर्माप्रमाणे विवाह बंधन टिकवून ठेवण्यासाठीचे धार्मिक नियम, प्रथा, हूंडाबळी, विधवांचे प्रश्न, परित्यक्ता अशा गुंतागुंतीमध्ये पारधी विवाहसंस्था अडकली नाही. ती स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. लग्न ठरल्यानंतर जर मुलीच्या किंवा मुलाच्या चरित्र्याविषयी एकमेकांना किंवा पंचांना संशय असेल तर लग्न विधीपूर्वी कढईतील उकळत्या तेलात टाकलेला पैसा नवरा - नवरीला हाताने काढायला पंच सांगतात. जर पैसा काढताना हात भाजला तर तो दोषी आहे असे समजून ठरलेले लग्न मोडले जाते किंवा नुकसान भरपाई दिली जाते आणि त्यांचा म्होतूर लावला जातो. "पारधी जमातीत विवाहित किंवा अविवाहित स्त्री पंचाच्या परवानगीने त्याच समाजातील तिला आवडलेल्या पूरुषाशी लग्न करु शकते. या समाजात अपवादानेही बलात्कार पहावयास मिळत नाही." [८५] पारध्यांचे पूर्वीचे विवाहाचे नियम, पध्दत, हुंडा प्रथा यात फारशी गुंतागुंत नाही.

"पारधी जमातीत घटस्फोटाची प्रथा आहे. त्यास सोडचिठ्ठी असे म्हणतात. दोघेही घटस्फोट मागू शकतात. व्यभिचार, वधुमुल्य देण्याची असमर्थता, नापसंती, इ. कारणामुळे घटस्फोट घेता येतो." [८६] तसेच बायकोशी जमत नसेल किंवा तिची वर्तणूक वाईट असेल तर नवरा तिला सोडचिठ्ठी देऊ शकतो. "घटस्फोटित स्त्रीशी लग्न करण्यासाठी अविवाहीत पुरुषाला प्रथम एका अंगठीशी लग्न करावे लागते.

नंतरच तो घटस्फोटीत स्त्रीशी लग्न करु शकतो." [८७] घटस्फोट घेण्यात कांही अडचणी जरी नसल्या तरी जमातीत घटस्फोटाचे प्रमाण कमी आढळते.

"पारधी जमातीत विधवेचा विवाह होतो. त्याला 'राधी' असे म्हणतात. विधवा विवाहाला या समाजात संमती आहे. विधवा विवाह साध्या पध्दतीने पार पाडला जातो. विधवेला आतेभावाशी लग्न करता येते. पण मावस किंवा मामे भावाशी लग्न करता येत नाही. " [८८] "आकाशात चंद्र नसताना विधवेचे लग्न करतात." [८९] विधवा स्त्रीला शक्यतो दुसऱ्याघरी जाऊ न देता भावजयीला दीर किंवा भाचा घरीच ठेवून घेतो. आणि ती सुध्दा त्यांची अंगवस्त्र म्हणून राहते.

**३.६.३ शैक्षणिक जीवन :-**

महाराष्ट्रात आधुनिक शिक्षणाची सुरुवात प्रथम मिशनऱ्यांनी १८ व्या शतकात केली. इ. स. १८४८ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यांसाठी व स्त्रियांसाठी पहिली शाळा काढून शैक्षणिक क्रांतीची बीजे रोवली" [९०] पुढे अनेक विचारवंत, सुधारक या सर्वांच्या प्रयत्नामुळे २० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये विविध शाळा व महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली. शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण काळानुरुप वाढत गेले. परंतु सर्व जाती जमातीतील लोकांना शिक्षणाची समान संधी मिळाली नाही. परिणामी ते मागासच राहिले. काळाच्या ओघात समाजामध्ये सामाजिक आर्थिक, राजकीय दृष्टीने प्रचंड विषमता निर्माण झाली. आणि दलित व आदिवासी समाज विकासाच्या प्रवाहातुन बाहेर फेकला गेला. शिक्षण हे सामाजिक, आर्थिक आणि भावनिक विकासाचे तसेच ते समाज परिवर्तनाचे एक प्रभावी माध्यम आहे. मानव आणि मानवी समाजाच्या जडणघडणीत शिक्षणाचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. जसे शिक्षण तसा देश असे चित्र जगातील सर्वच देशात आढळून येते. देशाची किंवा समाजाची प्रगती प्रामुख्याने शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबुन असते. कारण कोणत्याही देशातील समाज हा त्या देशातील शिक्षणापेक्षा प्रगत असू शकत नाही. महात्मा फुले म्हणतात - "शिक्षण हे मानवाच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे. मानवी जीवनामध्ये शिक्षणाला महत्वूपर्ण स्थान आहे. शिक्षणाशिवाय माणूस बौध्दिक गुलाम बनतो व बौध्दिक गुलामी ही सर्व गुलामीचे मुळ कारण असते." [९१] शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या सुधारणेचा पाया आहे. मागासलेल्या समाजात शिक्षण नसेल तर सामाजिक किंवा आर्थिक प्रगतीसाठी कितीही प्रयत्न केले तरी ते फोल ठरतात. याच पार्श्वभुमीवर भारतातील एकूण निरक्षरतेत आदिवासींमधील निरक्षरता अत्यंत मोठ्या प्रमाणात असुन या अज्ञानामुळे विकासाच्या मार्गात अडथळे येतात. आदिवासींचा आर्थिक विकास व्हावयाचा असेल तर त्यासंबंधीची

जाणीवही विकसित होणे अत्यावश्यक आहे. "आदिवासी जमातीच्या साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे. शेकडा ९० ते ९५टक्के लोकांना अक्षर ओळखही नाही." [९२] गावोगाव, वाड्या, वस्त्या शाळा असुनही त्या बंद आहेत. कारण शाळा ही संकल्पनाच त्यांच्या दैनंदिन जीवनात बसत नाही. खुप प्रयत्न करुनही शाळेत येणाऱ्या आदिवासी मुलांची संख्या अत्यंत कमी असते. प्रगत शैक्षणिक विचारापासुन आदिवासी आजही खुप दुर आहेत. "१९९१ च्या जणगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्याचे एकूण आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ३९.४५ टक्के इतके तर स्त्री साक्षरता २३.४३ टक्के इतकी आहे. ५४.०३ टक्के इतकी पुरुष साक्षरता असून एकूण उस्मानाबाद जिल्ह्याची साक्षरता ५४.३० टक्के इतके आहे." [९३] यावरुनच तौलनिक शैक्षणिक प्रगतीचा सर्वसामान्य अंदाज येतो.

**तक्ता क्र. ३.३**

**२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील व उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वसामान्य व आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविणारा तक्ता**

| | **सर्वसाधारण** | | **एकूण** | **आदिवासी** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | | पुरुष | स्त्री | |
| **उस्मानाबाद** | ८०.४ | ५६.९ | ६९.० | ७१.२ | ४४.५ | ५८.३ |
| महाराष्ट्र राज्य | ८६.६ | ६७.० | ७६.९ | ६७.० | ४३.१ | ५२.२ |

**(स्त्रोत :-** वार्षिक आदिवासी उपयोजना २००९-१० महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग पुणे पृ. ४६१)

उपरोक्त तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की, २००१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ५८.३ टक्के इतके असून ते सर्वसाधारण साक्षरतेच्या तुलनेत कमी आहे. महाराष्ट्रातील पारधी समाज हा शिक्षणाच्या अभावामुळे इतर समाजाच्या तुलनेत मागास राहिला आहे. या समाजात अमाप दारिद्र्य व उपासमार नित्याची आहे. राहण्याचे निश्चित ठिकाण नाही, निश्चित असा व्यवसाय व उपजिवीकेचे साधन नाही. त्यांच्यावर अंधश्रध्दांचा, परंपरांचा जबरदस्त पगडा आहे. पारधी जमातीत शिक्षणाच्या अभावामुळे अनेक समस्या निर्माण होऊन हा समाज चांगले जीवन जगणे, बचत करणे, जीवनमान उंचावणे यापासून खूप दूर आहे. पारधी जमातीत शैक्षणिक जागृती होणे गरजेचे आहे. शैक्षणिक परिवर्तनाशिवाय पारधी समाजाची प्रगती होऊन देशाच्या प्रगतीत त्यांना एक परिपूर्ण माणूस म्हणून मान्यता मिळणार नाही.

पारधी समाजात निरक्षरतेचे प्रमाण अत्यंत मोठे आहे. शिक्षणाच्या अभावामुळे पारधी लोक मागासलेले राहिले. त्यासाठी त्यांच्यात शिक्षणविषयक आवड निर्माण व्हावी, जाणीव निर्माण व्हावी, शिक्षणाचे महत्व कळावे, स्त्रीवर्गाचा खालावलेला दर्जा सुधारावा, त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार

करण्याच्या दृष्टीने शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. "घटनेच्या कलम २१(क) व कलम ४५ नुसार राज्यात सहा ते चौदा वर्ष वयाच्या सर्व बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतुद केली आहे. तसेच कलम २९ (२) अनुसार राज्यांकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतुन सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास धर्म, जात, भाषा, वंश यापैकी कोणत्याही कारणावरुन प्रवेश नाकारला जाणार नाही. आदिवासी वर्गाचा शैक्षणिक दर्जा सुधारावा या हेतुने आदिवासी भागात शिक्षण संस्था, शासकीय वसतिगृह भारतातील दुर्गम व अतिदुर्गम भागात स्थापन करण्याचा अधिकार दिला आहे. कलम ३० (१) नुसार धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याच्या व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क आहे." [९४] प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी व तालुक्याच्या ठिकाणी शासकीय वसतिगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. पण त्यांना शिक्षण देताना सामाजिक जाण असणारे शिक्षण देणे गरजेचे आहे. "औदासिन्य कमी करुन कार्यप्रवृत्त करणे जीवनाबद्दल आकांक्षा निर्माण करणे, श्रम करुन येथील माणुस स्वतःच्या पायावर उभा राहु शकतो हा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण करणे, उपयोगात न आणलेली व पडून राहिलेली जी श्रमशक्ती येथे आहे, तिचा उपयोग करुन भांडवल निर्मिती करणे, शिक्षण संपल्यावर शिक्षित माणूस याच विभागात राहील एवढा बदल त्यांच्यात निर्माण करणे गरजेचे आहे." [९५] शिक्षण हे समाजाच्या सुधारणेचा पाया आहे. मागसलेल्या समाजात शिक्षण नसेल तर प्रगतीचे प्रयोग अयशस्वी ठरतात. याच पार्श्वभूमीवर पारधी समाजाची साक्षरतेची आकडेवारी बोलकी आहे.

**तक्ता क्र. ३.४**

**महाराष्ट्र राज्यातील पारधी समाजाची साक्षरता दर्शविणारा तक्ता**

| जनगणना वर्ष | साक्षरतेचे शेकडा प्रमाण | | |
|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | स्त्रिया |
| १९६१ | १०.४४ | १७.१७ | ३.६४ |
| १९७१ | १८.१६ | २६.३७ | ९.५६ |
| १९८१ | २०.०५ | २९.८७ | ९.८८ |
| १९९१ | उ.ना. | उ. ना. | उ. ना |
| २००१ | उ.ना. | उ. ना. | उ. ना |

(**स्त्रोत :-** गारे गोविंद, महाराष्ट्राती आदिवासी जमाती - पृ.क्र. २४०)

**टिप :-** उ. ना. - उपलब्ध नाही.

वरील तक्त्यावरुन पारधी समाजाच्या शिक्षणविषयक स्थितीचा अंदाज येतो. पारधी समाजाचा शैक्षणिक मागासलेपणा वरील आकडेवारी वरुन लक्षात येतो. पारधी समाजाची प्रगती साक्षरतेवरुनच मोजल्यास साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने प्रगतीसाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. सामान्यतः आर्थिक, सामाजिक व शासकीय अशा स्वरुपाची कारणे पारधी समाजातील शैक्षणिक स्थितीस जबाबदार आहेत. पारधी मुले शैक्षणिक वातावरणाच्या व संस्काराच्या अभावी शाळेकडे आकर्षिली जात नाहीत. त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे पालक मुलांच्या शिक्षणाकडे जागरुकतेने लक्ष देऊ शकत नाहीत. पारधी जमात इतर विमुक्त जमातीपेक्षा आजही अस्थिर जीवन जगते आहे. गुन्हेगारीच्या शिक्क्यातुन कायदेशीर सुटका झाली असली तरी समाजाचा पारध्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आजही बदललेला नाही. इतर भटक्या विमुक्त जमातींच्या तुलनेत पारधी आजही उपेक्षित, वंचित आणि अस्थिर जीवन जगतो आहे. त्यांना शिक्षणाचे महत्व पटलेले नाही. उलट लहानपणापासुन त्यांना मुलांच्या श्रमाची आपल्या संसारात गरज भासते. मुक्त जीवन उपभोगणाऱ्या पारधी समाजाची रचना, चालीरिती, जीवन जगण्याची पध्दती निराळी असल्याने पुस्तके व शिक्षण, त्यांच्या मुलांच्या सामाजिक, आर्थिक गरजा पूर्ण करु शकत नाहीत परिणामी त्यांचे मन शाळेत रमत नाही. बंदिस्त वातावरणात या मुलांचे चित्त स्थिर रहात नाही. तसेच बोलीभाषेची अडचण निर्माण होते. शैक्षणिक आंतरक्रिया सुलभपणे होण्यास भाषेची अडचण येते. शाळा शिकूनही पुढे गुन्हेगारीच्या प्रकरणात नाहक अडकवले जाते. परिणामी पुढचे भवितव्य संपते या मानसिकतेमुळे शाळेबद्दल आणि शिक्षणाबद्दल सतत उदासीनता दिसून येते. शिक्षणाबद्दलची ही दुरावस्था लक्षात घेऊन शासनाने आश्रमशाळांची योजना सुरु केली आहे. "महाराष्ट्रात १९५४ पासुन ही योजना राबविण्यात येते. " [९६] महाराष्ट्रात आदिवासी समाजात इ.स. १९५१ मध्ये २ टक्केदेखील साक्षरता नव्हती. पण आश्रमशाळांच्या माध्यमातुन शिक्षण देणाऱ्या विविध योजना जमातीतील साक्षरतेचे प्रमाण वाढवीत आहेत. पण हे प्रमाण इतर समाजाच्या तुलनेत कमी आहे.

**पारधी समाजाची शैक्षणिक पार्श्वभूमी :-**

साक्षरता हे शैक्षणिक प्रगतीचे एकमेव मोजमाप होऊ शकत नाही. तरीसुध्दा एखाद्या समाजात साक्षरतेचे प्रमाण किती आहे यावरुन त्या समाजाचा सामाजिक, आर्थिक दर्जा याविषयी कल्पना येते. महाराष्ट्रातील अनेक जमातीपैकी ज्या जमाती स्थिर आहेत त्या कांही प्रमाणात शैक्षणिक प्रगती करु शकल्या आहेत. पण ज्या जमाती अस्थिर व भटकंतीचे जीवन जगतात त्या आजही समाजाच्या,

शासनाच्या आणि स्वतःच्या दर्जाच्या बाबतीत प्रगतीबाबत मागे राहिल्या. अनेक कारणांमुळे त्यांना आजही अस्थिर/ स्थलांतरीत जीवन जगावे लागते. त्यापैकीच एक पारधी जमात आहे. आजही पारधी जमातीची स्थिती दारिद्र्यामुळे शिक्षण नाही आणि शिक्षण नाही म्हणून दारिद्र्य जात नाही अशी असून या परिस्थितीत विकासाचा प्रश्न निर्माण होतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या ५० ते ६० वर्षात शासनाचा आदिम जमातीविषयी शैक्षणिक धोरण राबवून त्यांना साक्षर करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण त्या योजना या जमातीपर्यंत योग्य रितीने पोहचू न शकल्यामुळे पारधी जमातीत शिक्षणाचा अभाव दिसून येतो. शिक्षण हे बदल किंवा विकास घडवून आणणारे एक महत्वपूर्ण माध्यम आहे. "मूलतः आदिवासी भागात शाळेत जाण्यायोग्य वयाच्या एकूण मुलांपैकी फक्त १० टक्के मुले शाळेत जातात. त्यात ३६ टक्के मुले पूर्ण वेळ शाळेत हजर असतात. थोडक्यात १०० मुलांपैकी ८८ मुले ४ थी पर्यंत शिकतात. ९ मुले फक्त ७ वी पर्यंत शाळेत जातात. त्या ९ मुलांपैकी फक्त ३ मुले १० वीपर्यंत पोहोचतात व १० वी ते १२ वी पर्यंत फक्त १ विद्यार्थी पोहोचतो. यावरुन आदिवासींच्या शिक्षणाचा वेग किती आहे आणि हा ४० लाख लोकसंख्येचा समाज या गतीने शिक्षणात पुढे केंव्हा येणार असा प्रश्न उभा राहतो." [९७] या जमातीत आजही सामाजिक जाणीव व सांस्कृतिक भान निर्माण करण्यासाठी शिक्षणाची अतिशय गरज आहे. "सामाजिक व सांस्कृतिक जाणीवेची फारकत घेणारे शिक्षण टाळून दैनंदिन जीवन जगता यावे, यासाठी जीवनातील साक्षात्कार घडविणाऱ्या शिक्षणाचा शोध घेणे गरजेचे आहे." [९८]

**आश्रमशाळा :-**

"अनुसूचित जमातींच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या आहेत. तसेच त्यांना मोफत शिक्षण दिले जात आहे. मॅट्रिकनंतरच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, मुलांना राहण्यासाठी वसतिगृहे, परदेश शिक्षण शिष्यवृत्ती दिली जात आहे. जमाती क्षेत्रात लहान गावांतुन प्राथमिक व कांही ठिकाणी पूर्व प्राथमिक शाळा उघडण्यात आल्या आहेत. " [९९] घटनेच्या ४६ व्या कलमानुसार शासनाने दुर्बल घटक विशेषतः जनजाती व गिरीजन यांच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीकडे विशेष लक्ष द्यावे. असे निर्देश दिलेले आहेत. "डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी आणि सतत स्थलांतरीत होणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलामुलीच्या शिक्षणासाठी निवासी शाळांशिवाय पर्याय नाही, ही सामाजिक निकड लक्षात घेवून मुंबई राज्यात १९५३-५४ या शैक्षणिक वर्षात पहिली आश्रमशाळा स्वयंसेवी संस्थेमार्फत सुरु करण्यात आली. " [१००] ब्रिटीशांच्या

काळातही गुन्हेगारांच्या 'त्या' वसाहतीमध्ये इंग्रज अधिकाऱ्यांनी अशा स्वरुपाच्या आश्रमशाळा चालवल्या होत्या. पारधी हा एक असा वर्ग आहे की, ज्याला स्वतःचे गाव नाही, पाठीवर बिऱ्हाड घेऊन सतत हिंडणारी ही मंडळी एका जागेवर स्थिर होऊ शकत नाहीत. या मुलांच्या शिक्षणाची सोय करता येत नाही. म्हणून पुढची पिढीसुध्दा या लोकांप्रमाणे हिंडत राहते. हे लक्षात घेऊन राज्य सरकारने आश्रमशाळांची योजना आखली आहे. या जमातीच्या मुलांच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने त्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे या हेतुने तसेच दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रध्दा, धार्मिकता, गुन्हेगारी, भिक्षा इ. चे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने अनेक प्रकारचे प्रयत्न केल्याचे खालील संदर्भावरुन दिसून येते. "आदिवासींसाठी शासकीय व स्वयंसेवी अशा दोन्ही मिळून राज्यात सुमारे ७५० आश्रमशाळा तसेच ४०० मुलामुलींची वसतीगृहे आहेत. वर्षाला सुमारे २० ते २५ कोटी रुपये या योजनेवर खर्च होतात. आश्रमशाळा व वसतिगृहाच्या माध्यमातून सुमारे दोन लाख आदिवासी मुले - मुली शिक्षण घेतात. आश्रमशाळेत १ली इयत्तेपासुन १० वी पर्यंत व वसतिगृहात ११ वी पासून पदवीपर्यंत मुलांना मोफत शिक्षण दिले जाते. ही योजना आदिवासींसाठी अतिशय उपयुक्त आहे. पण आज १० वी पास झ ालेल्या किंवा कॉलेज शिक्षण पूर्ण केलेल्या आदिवासी तरुणांना पुढील मार्गदर्शन उपलब्ध होत नाही. त्यामुळे सुशिक्षीत बेकार तरुणांच्या संख्येत नवीन भर पडत आहे. त्यांच्या रोजगारासाठी शासनाजवळ खास योजना नाही. काही काळाने सुशिक्षित बेकारांची आदिवासी सेना निर्माण होण्याचा त्यात धोका आहे."[१०१] जमातीच्या मुला - मुलींच्या शिक्षणात आश्रमशाळेचा सिंहाचा वाटा आहे. "अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी जमातीच्या लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास जलद घडवून आणण्यासाठी सन १९७२-७३ पासुन शासनाने निवासी आश्रमशाळा समूह योजना कार्यान्वित केलेली आहे.

**तक्ता क्र. ३.५**

**महाराष्ट्र राज्यातील एकूण आश्रमशाळा व वसतिगृहांची माहिती दर्शविणारा तक्ता**

| विभाग | अनुदानित/शासकीय | प्राथमिक आश्रमशाळा | माध्यमिक आश्रमशाळा | एकूण | कनिष्ठ महाविद्यालये | वसतिगृहे |
|---|---|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र** | शासकीय | १३९ | ४१३ | ५५२ | १२७ | ४१४ |
| | अनुदानित | ८९ | ४६७ | ५५६ | ०२५ | ० |
| **उस्मानाबाद** | शासकीय | ०१ | ० | ०१ | ० | ०३ |
| | अनुदानित | ० | १ | ०१ | ० | - |

(**स्त्रोत :-** वार्षिक आदिवासी उपयोजना २००९-१० महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग पुणे पृ. ४६८)

या तक्त्यावरुन असे निदर्शनात येते की, आदिवासी विकास विभागामार्फत महाराष्ट्र राज्यात एकूण ५५२ शासकीय आश्रमशाळा चालवल्या जातात तर अनुदानित ५५६ आश्रमशाळा आहेत. महाराष्ट्रात राज्यात एकूण ११०८ इतकी आश्रमशाळाची संख्या आहे. आदिवासी जमातीच्या लोकसंख्येच्या मानाने आश्रमशाळांची संख्या कमी आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात एकच शासकीय प्राथमिक आश्रमशाळा व एक माध्यमिक आश्रमशाळा आहे. तर तीन शासकीय वसतिगृहे आहेत. जिल्ह्यातील पारधी लोकसंख्येच्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण ३७ अनुदानित खाजगी आश्रमशाळा आहेत." [१०२] या सर्वच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आहेत. पारधी जमातीचा समावेश शासकीय आरक्षणामध्ये आदिवासी जमात म्हणून असल्याने, या शाळांमध्ये पारधी समाजाच्या मुलांना प्रवेश नाकारला जातो. थोडक्यात, फक्त वरुडा (ता. उस्मानाबाद) येथील शासकीय आश्रमशाळेमध्ये पारधी मुलांना प्रवेश दिला जातो. "महाराष्ट्रात आश्रमशाळांमधून सन-२०१०-११ मध्ये ११०९२२ मुले आणि ९९३२२ मुली असे एकूण २१०२४४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत." [१०३] आश्रमशाळेत न जाण्याची कारणे अनेक आहेत. आश्रमशाळेबद्दल माहिती, तिथेपर्यत पोहोचण्यातील अडचणी, अशा अनेक गोष्टी किंवा अडथळे आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीत अडचण निर्माण करतात. वाड्यावस्त्यांमधून आश्रमशाळाबद्दल माहिती देणे, शैक्षणिक गळतीचे प्रमाण कमी करण्यासंबंधी मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. या मुलांना शिकवतांना असे शिक्षण दिले जावे की, शाळा सोडून ही मुले जेव्हा बाहेर पडतील तेंव्हा भिक्षा किंवा गुन्हेगारीकडे निश्चितपणे जाणार नाहीत. त्यासाठी आश्रमशाळा आणि वसतिगृहांची संख्या वाढवणे, वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीने काळाची गरज आहे. कारण आश्रमशाळा व वसतिगृहे ही आदिवासीच्या विकासाची आदर्श केंद्रे आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शासनाने अनेक योजना आदिवासी भागात आणल्या आहेत.

प्रगतांच्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सभोवतालचे वातावरण, कौटुंबिक परिस्थिती, उपलब्ध साधनसंपत्ती व प्राप्त संधी, आर्थिक परिस्थिती इत्यादीचा फायदा होतो. पण या सर्वापासुन पारधी मुले व मुली पारखी असतात. शिक्षणाबद्दल गोडी वाटणारे शैक्षणिक, कौटूंबिक वातावरणाची निर्मिती पारधवाड्यात होऊ शकत नाही. दैनंदिन जीवनानुभवातुन शिक्षण मिळाले तरच त्यांच्यातील शैक्षणिक उदासीनता कमी होईल. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. जन्मापासुन मृत्यूपर्यंत मानव नवनवीन गोष्टी शिकत असतो. ॲरिस्टॉटल म्हणतात - बालकातील जन्मजात शक्ती

व क्षमता जागृत करुन पूर्णत्वाला पोहोचविणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण." [१०४] म्हणजेच शिक्षणाने समाजाचा, देशाचा भावी नागरिक निर्माण केला जातो. "शिक्षणामुळे माणसाच्या जीवनातील वाटचाल यशस्वी होते. बालकाच्या मनात पावित्र्य, धार्मिकता, चारित्र्य संवर्धन, सामाजिक जबाबदारी, कर्तव्याची जाणीव इत्यादी मूल्ये रुजवता येतात. यातुन राष्ट्रीय संस्कृतीचे संवर्धन व प्रसार होतो." [१०५] समाजातील दारिद्र्याचे प्रमाण आत्यंतिक असल्यामुळे शिक्षणाला मिळणारा प्रतिसाद अत्यल्प आहे. शासनाने आदिवासी कल्याण योजनांच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या सोयी - सुविधा पारधी समाजालाही उपलब्ध करुन दिल्या, पण त्याचा फायदा मूठभर लोकांनाच मिळाला. पारधी स्त्री - पुरुष त्यापासुन वंचित राहिले. पुरुषांमध्ये शासकीय योजना, कागदपत्रे, शैक्षणिक सवलती इ. बाबतीत कमालीचे अज्ञान आहे. त्यामुळे आदिवासीच्या नावे फायदा घेणारे आदिवासीच आहेत असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्रातील पारधी जमात परंपरावादी आणि निरक्षर आहे. त्यांचा इतरांशी खुलेपणाने संपर्क येत नाही. त्यात सततचे स्थलांतर, काम मिळेल तिथे राहून पोट भरणारी जमात असल्यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. पारधी जमात ही अशिक्षीत व अज्ञानी असल्यामुळे भाबड्या कल्पना स्वीकारुन स्वतःची पिढी तर बरबाद केली पण पुढच्या पिढीलाही शिक्षणापासुन दूर ठेवले जाते. अनेक कारणांमुळे स्त्री - पुरुष शिक्षणापासून दूर राहतात. पारधी समाजात स्त्रिया या इतर समाजाच्या मानाने जास्त मुक्त, स्वावलंबी व कष्टाळू आहेत. पण त्याचबरोबर ती परंपरेने लादलेल्या अनेक सामाजिक व धार्मिक बंधनाने जखडली आहे. अनेक प्रकारच्या कामांमुळे स्वतःचे व मुलीचे शिक्षणाचे प्रमाण नगण्य आहे.

**शैक्षणिक जागृती :-**

पारधी जमातीची शैक्षणिक मागासलेपणातुन सुटका करण्यासाठी त्या जमातीत शिक्षणाचा प्रसार होणे गरजेचे आहे. शिक्षणामुळे फक्त नोकरी मिळावी या मर्यादित दृष्टिकोनात बदल होऊन नवी दृष्टी प्राप्त होईल, जगातील स्थितीचे ज्ञान होईल, स्वतःतील क्षमतांची, गुणांची ओळख होईल व प्रगतीला गती मिळेल या हेतुने गेल्या पन्नास वर्षापासून या जमातीची शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाचे कार्य चालु आहे. शिक्षण हे मानवी विकासाचे महत्वाचे साधन आहे. पण पारधी जमातीच्या बाबतीत नेमके हेच घडले नाही. त्यामुळे सर्वांगीण प्रगती,परिवर्तन घडून आले नाही. भटकंती, स्थलांतर, गुन्हेगारी, भिक्षा, दारु विक्री, आत्यंतिक व्यसन, पारंपारिकता यातुन त्यांची आजही सुटका झाली नाही. त्यामुळे शासकीय योजनांना या जमातीकडून योग्य असा प्रतिसाद मिळत नाही.

त्यातही आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा या जमातीला त्यांच्या आर्थिक परिस्थितीने शिक्षणापासुन वंचित ठेवले आहे. परिणामी पारंपारिक जीवनातुन त्यांची सुटका झाली नाही. त्यामुळे शिक्षणप्रसाराच्या अनेक योजना त्यातील त्रुटीमुळे पारधी जमातीपर्यंत पोहोचतच नाहीत. योग्य अंमलबजावणीच्या अभावामुळे हा समाज शिक्षणापासून दूर राहिला आहे.

**३.६.४ सामाजिक व सांस्कृतिक जीवन :-**

संस्कृती हा एका पिढीने दुसऱ्या पिढीला हस्तांतरित केलेला वारसा असतो. टायलरच्या मते "संस्कृती म्हणजे एक गुंतागुंतीची कल्पना असून तिच्यात ज्ञान, विश्वास किंवा श्रध्दा, नैतिकता, रुढी आणि कायदा व इतर पात्रतांचा समावेश होतो." [१०६] कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचे भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती या दोन भागात विभाजन होते. या सर्वांतून कोणत्याही जमातीच्या परंपरागत संस्कृतीचे चित्र प्रगट होते. आदिवासींमध्ये संस्कृतीची जपणूक करणे आणि तिच्यात बदल होऊ न देणे अशी स्ववंशकेंद्रित प्रवृत्ती असते. संस्कृती हा जीवनाचा पाया मानून आदिवासी आपले जीवन जगतात. आदिवासी संस्कृती मानवी मूल्यांनी प्रगल्भ आहे. त्यांची सुख-दुःखे संस्कृतीशी व समूहाशी एकवटलेली आहेत. आदिवासी संस्कृतीत समूह भावना प्रबल आहे. "आदिवासींचे जीवन समूहप्रधान आहे." [१०७] आदिवासी संस्कृतीत श्रम, समूह आणि सहकार्य या जीवनमुल्यांना महत्त्वाचे स्थान आहे. "संस्कारपूर्ण, संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल-विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती." [१०८] हे संस्कार कुटुंबातुन, समूहातून केले जातात. पारधी समाजही याला अपवाद नाही. पारधी समाजाने स्वतः उपेक्षित जीवन जगून संस्कृती जिवंत ठेवण्याचे काम केले आहे. या समाजाने भारतीय संस्कृतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. पारधी समाजातील देवी-देवता, कुलदेवता, धार्मिक आचरण, जीवनविषयक दृष्टिकोन यावरुन या समाजाची स्थिती लक्षात येते. पारधी समाज सतत अस्थिर जीवन जगत असल्यामुळे या समाजाचे खास असे सण-समारंभ किंवा उत्सव नाहीत. जीवनात येणारे सुख-दुःखाचे प्रसंग म्हणजेच सण-समारंभ होत. उदरनिर्वाहाच्या साधनात परिस्थितीनुसार बदल करीत पारधी जमात स्वतःची संस्कृती टिकवून आहे. या समाजाने हिंदू धर्माचे नियम व देवी-देवता, सणवार स्विकारले आहेत. त्यांचा पोषाख, बोलीभाषा, शिकारीची साधने, गुन्हेगारी कृत्ये, पाळावयाचे नियम यावरुन पारधी संस्कृती लक्षात येते. पारधी जातपंचायतीला पारंपारिक आधार आहे. "मानवी समाजातील सर्व रुढी, प्रथा, परंपरा, चालीरीती यांना उद्देशून संस्कृती हा शब्दप्रयोग केला जातो." [१०९] समाजाचा घटक म्हणून संपादन केलेले ज्ञान, नितीनियम, कायदा, सवयी या सर्वांचे गुंतागुंतीचे

संकलन म्हणजे संस्कृती होय. "संस्कृतीमध्ये धर्म ही एक घटना आहे." [११०] धर्मामुळे सामाजिक मुल्यांचे जतन होते. पारधी संस्कृतीत अलिखित ज्ञान असल्याने धार्मिक विधी व समारंभ यांच्या आधारेच ज्ञानाचे जतन व संस्कृतीचे हस्तांतरण होते व संस्कृतीचा आविष्कार होतो.

**१. सामाजिक जीवनाचे स्वरुप :-**

पारधी जमातीचा सामाजिक दर्जा व सामाजिक जीवन हे अप्रगत अवस्थेत आहे. प्रगतांचा सामाजिक जीवन जगण्याचा दृष्टीकोन जमातीत आढळत नाही. सुरुवातीपासुन जीवन जगण्याचे नियम अंगवळणी पडलेले आहेत. दीर्घकाळ वास्तव्य केल्यास गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे प्रगतांच्या संशयाला जागा मिळते. आजही त्यांना एका ठिकाणी जास्त दिवस राहता येत नाही. जमाती अंतर्गत वैरभाव जोपासला जातो. जुन्या सामाजिक नितीमुल्यांशी हा समाज समरस झालेला असून या जमातीत अनेक प्रथा परंपरेने चालत आलेल्या आहेत. त्या निष्ठेने जपण्याचे व संवर्धन करण्याचे कार्य समाजात केले जाते.

समाज जीवनात विविध संस्थांची भूमिका व कार्य अत्यंत मोलाचे व महत्त्वाचे आहे. पारधी कुटुंबसंस्था विशिष्ट नियमावर आधारलेली असून पारध्यांच्या वाट्याला स्थिर कौटुंबिक जीवन आलेच नाही. प्राचीन काळी शिकारीच्या निमित्ताने पुरुष मंडळी बाहेर पडायची. त्यात एखाद्या हिंस्त्र प्राण्याकडून पुरुष मारले जायचे. ब्रिटीशांच्या कालखंडात तर संपूर्ण जीवन अस्थिर बनले. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे पती-पत्नी आणि मुले असे एकत्र सहजीवन जगता आले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गुन्हेगारीच्या शिक्क्यातून सुटका झाली तरी प्रगतांचा, पोलिसांचा यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन मात्र बदलेला नाही. कुटुंबातील स्त्री, पुरुषाला अटकेतून सोडवण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जाते. बऱ्याच वेळी स्वतःची ओळख लपवून जगावे लागते. कौटुंबिक जीवनात फारशी आत्मीयता दिसून येत नाही. किंबहुना जीवन जगण्याच्या धडपडीत ती आत्मीयता नष्ट होते. पारधी समाजात आई-वडील विवाहीत मुलांचे ओझे होत नाहीत तर वृध्दापकाळापर्यंत उदरनिर्वाहाचे भिक्षा, शिकार, शेतराखण इत्यादी कोणतेही साधन असो, स्वतंत्र जीवन जगतात. या समाजाच्या सौंदर्याच्या खास संकल्पना नाहीत. पावित्र्य आणि चारित्र्य यावरुन सतत अनेक (परिक्षा) दिव्य करतांना दिसतात. जातपंचायतीत अनेक तंटे हे चारित्र्यावरुनच निर्माण होतात. ते सोडवण्याचे स्वरुप करारात्मक असते. याशिवाय कांही पारंपारिक अशास्त्रीय दिव्य करुन स्वतःची शुध्दता सिध्द केली जाते. समाज जीवन जगतांना पारध्यांनी जे नियम बनवले आहेत, त्यांची जास्त झळ स्त्रियांना बसते.

कुटुंबात घरातील पुरुष नसतांना परपुरुष किंवा जमातीतलाच पुरुष घरासमोरुन गेल्यास प्रथम स्त्रीवर संशय घेतला जातो. हा संशय एवढा भडकला जातो की अनेक कुटुंबे उध्वस्त होतात.

पारधी जमातीत विवाहपूर्व आणि विवाहानंतर अनैतिक संबंध ठेवणाऱ्यास जातीबहिष्कृत करण्याची शिक्षा दिली जाते किंवा दंड केला जातो. वैवाहिक जीवनात अनेक नियमांचे पालन केले जाते. पण पारधी विवाहसंस्था ही हुंडा प्रथा, हुंडाबळी, विधवांचे प्रश्न बालविवाह यासारख्या समस्यांत अडकली नाही. ती स्वतंत्र आणि वेगळी आहे. वधुमूल्याची प्रथा असल्यामुळे मूलीच्या जन्माचे स्वागत केले जाते. मुलीचा जन्म संकट मानून स्त्री-भ्रुणहत्येचे पातक त्यांच्या माथी नाही. डॉ. अमर्त्य सेन यांनी अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला आहे की सुशिक्षीत लोकांमध्येच स्त्री-भ्रुणहत्येचे प्रमाण अधिक आहे. त्याखालोखाल ग्रामीण लोकांचा सहभाग आहे. पण पारधी जमातीचा यातअत्यंत कमी सहभाग आहे. एकीकडे पारधी समाज जीवनाचा विचार करता पारधी व त्यांची संस्कृती कनिष्ठ मानली जाते. पण पारधी कुटुंबातील, समाजजीवनातील स्त्रीचा सहभाग, स्त्री-पुरुष समानता, पूनर्विवाहास संमती, विभक्त कुटूंबपध्दती, आचरणाचे नियम यांचा विचार केल्यास या सर्व बाबींचा प्रगत संस्कृतीत अभाव आहे हे लक्षात येते. जमातींनीच भारताची खरी संस्कृती टिकवून ठेवली आहे असे तज्ञांचे मत आहे.

महाराष्ट्रात राज्यात आज प्रत्येक जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात पारधी विखुरलेल्या स्थितीत वास्तव्य करतात. पारधी संस्कृती ही समस्या नाही तर पारध्यांचे इतर प्रश्न हे अधिक गहन आहेत. पारध्यांचे खरे शत्रू अंधश्रध्दा, बेकारी, शिक्षणाचा अभाव, गुन्हेगारीचा कलंक, त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये, अंगमेहनतीच्या कामाची सवय नसणे, प्रगतीच्या मानसिकतेचा अभाव, पोलिसी अत्याचार, धर्मांतराची आव्हाने, इ. आहेत.

पारधी आजही आर्थिक बाबतीत पूर्णपणे स्थिरावलेले नसून रानोमाळ भटकून मिळेल त्या मार्गाने आपली उपजिवीका करुन जगतात. ज्यांचा गावाशी संबंध आला ते गावाशेजारीच आपली वस्ती करुन राहतात. "महाराष्ट्रात हा समाज अलीकडे शेतीराखण, मोलमजुरी, शेती करुनही जगतो आहे. बायका भीक मागुन अन्न गोळा करतात. पण ही सर्व साधने कायम स्वरुपाची नाहीत किंवा वरील आर्थिक क्रियेतून त्यांचे पोट भरत नाही. परिणामी आर्थिक कमकुवतपणा, निश्चित उत्पन्नाच्या साधनाचा अभाव यामुळे त्यांना भटकावे लागते. पारध्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनामध्ये भटकणे हा धर्म मानला गेला. " [१११] पारधी जमातीची अर्थव्यवस्था ही निसर्ग संपत्तीशी

संबंधित आहे. कायद्याने निसर्ग संचारावर बंदी आली आणि पारध्यांमध्ये कमालीचे आर्थिक दारिद्र्य निर्माण झाले. थोडक्यात पारध्यांची अर्थव्यवस्था साधी व अप्रगत आहे. गरजपूर्तीसाठीच आर्थिक क्रिया केली जाते.

**२. वसतीस्थाने :-**

पारध्यांची वस्ती गावापासून बऱ्याच अंतरावर असते. वस्तीत जाण्यासाठीचा रस्ता अत्यंत दुर्गम असतो आणि तो पारध्याशिवाय इतरांच्या सहसा लक्षातही येत नाही. पारध्यांच्या लोकवस्तीत कोणतीही सुविधा नसल्याचे दिसून येते. वस्ती कायमची नसते कारण जंगलाच्या आश्रयाने पिढयानुपिढया हा समाज सतत उपजिवीकेसाठी भटकत असतो. चिखलमातीने लिंपलेल्या भिंती व वर छप्पर अशी त्यांच्या घराची ठेवण असते. चौकोनी आकाराच्या या घराला एकच दरवाजा असतो. खिडक्या नसतात. "पारध्यांच्या वस्तीला पारधवाडा किंवा पेढी असे म्हणतात. " [११२] "पारध्यांची कांही घरे म्हणजे कापडाची अथवा गवताची पाले असतात. अजुनही पारधी लोक पालात राहतांना आढळतात. २०-३० पालांचा तो समूह असतो. पूर्वी साधारणपणे आठ ते पंधरा दिवसानंतर ते एका गावाहून दूसरीकडे मुक्काम हलवत असत. गावापासुन दुर मुख्यतः ताडपत्रीची किंवा साड्यांचा वापर केलेली कापडाची पाले ठोकून ते राहत. त्यांच्या शिकारीत तरबेज असलेली कुत्री पालासमोर बांधलेली असतात. पालामध्ये कपड्यांची गाठोडी, फाटक्या वाकळा आणि जर्मनची जुनी मोजकीच भांडी, असे साहित्य असते. शिकारीसाठी वापरण्यात येणारी वेगवेगळ्या प्राण्यांसाठीची निरनिराळी फाशांची भेंडोळीही असतात. हरिण, लव्हार, मोर, चित्तर इत्यांदीसाठीचे फासे वेगवेगळे असतात. हे फासे त्यांनी स्वतःच बनवलेले असतात. पारध्यांच्या एका वस्तीत मुख्यतः नातेवाईक किंवा एकाच पोटजातीचे लोक असतात. " [११३]

लंगोटीधारक असतांना गोधडी, चादर आणि आता ताडपत्रीचे पाल असते. पाल टाकण्याच्या पध्दतीतही बदल झालेला असून पाल टाकून राहणाऱ्यांची संख्या जास्त आढळते. पारधी पूर्वी मोठ्या संख्येने एकत्र राहत असत. पण नंतर मात्र ते परस्परांबद्दल संशय, एकमेंकाबद्दल अविश्वास इत्यादी कारणामुळे विभक्त व छोट्या - छोट्या गटाने राहत आहेत, अशी माहिती सोलापूर येथील पारधी जमातीचे सुशिक्षित कार्यकर्ते श्री. परमेश्वर काळे यांनी दिली.

### ३. पोषाख

"फिरस्ते पारधी अस्वच्छ आणि अव्यवस्थित असतात. त्यांचे केस वाढलेले असतात. त्यांच्या अंगावर कमरेला अपुरे काळसर धोतर असते." [११४] पुरुषाच्या डोक्याला एक चिंधी / पागोटे असते. स्त्रिया लुगडे - चोळी किंवा घागरा नेसतात. पारध्यांचा पेहराव साधा असून स्थायीक झालेले पारधी इतर गरीब लोकांप्रमाणे पोषाख करतात. पायात पादत्राणे घालत नाहीत. "पारधी केस कापत नाहीत व विंचरतही नाहीत. ते वर्णाने काळे, धीट व सोशिक असतात." [११५] फिरत्या पारध्यांचा रंग काळा, उंची मध्यम, इंद्रिये तीक्ष्ण असतात. गुन्हा करतांना पारधी कंबर बांधतात आणि छातीवरुन कापड घेऊन त्याची मागे गाठ बांधतात. पारधी ज्या ठिकाणी राहतात तेथील वेशभूषेचा परिणाम त्यांच्यावर झाल्याचे आढळते. पुष्कळ वेळा पारधी आपण जोगी किंवा ज्योतिषी आहोत असे सांगतात. गुन्हा करायला जाताना ते वाघ्याचा / साधुचा वेश करतात. फासेपारधी कमरेला फाशांचे झुपके अडकवतात व शिकारीला जातात. त्यांची मुले अर्धनग्न - अस्वच्छ घाणेरडी असतात. आंघोळ, जेवण, खेळ, मलमुत्र विसर्जन इ. सर्व क्रिया पालाशेजारीच होतात.

### ४. अलंकार :-

जीवनातील अस्थिरतेमुळे आवड किंवा छंद जोपासण्याचा विचारही केला जात नाही. स्त्री म्हटली की निसर्गतः दागिन्यांची आवड असते, मग ती स्त्री कोणत्याही जाती धर्माची असो. पण पारधी स्त्री याला अपवाद असून "पारध्यांमध्ये स्त्रियांना दागिने वगैरेची फारशी आवड नसल्याचे आढळते. विवाहपूर्व जीवनात तर दागिनेच घातले जात नाहीत. विवाहानंतर हातात, पायात, गळयात, आणि क्वचित नाकात पारंपारिक दागिने घातले जातात. स्त्री-पुरुष दोघेही गळयात रंगीबेरंगी मण्याच्या माळा घालतात. पारधी समाजात विवाहप्रसंगीही फक्त स्त्रीच्या गळयात काळी पोत बांधली जाते. इतर दागिने किंवा अलंकार नसतात. विवाह आर्थिक परिस्थितीनुसार पार पडत असल्याने दागिन्यात विविधता आढळत नाही. हिंदू धर्मातील, स्त्रियांप्रमाणे सोने-चांदीचे दागिने आवडत असले तरी हातात गोठवजा पितळी बांगड्या घालतात. कथील, कॉपर, ब्रास किंवा इतर धातुच्या बांगड्या किंवा अलंकार घालतात. स्त्रिया पायात पैंजण, साखळ्या, जोडवी घालतात. पारधी स्त्री जे दागिने घालते त्याचा उद्देश धार्मिक व सामाजिक असतो. धर्माच्या व परंपरेच्या नावाची ती बंधने असतात. हौस किंवा सौंदर्यालंकार म्हणून दागिने वापरले जात नाहीत. बऱ्याच पारधी स्त्रिया नाक टोचत नाहीत. कपाळावर काही गोंदवत नाहीत." [११६] अलीकडे मात्र पारधी स्त्री-पुरुष दागिने घालतात. यात नथ, फुली,

जोडवी, मासोळ्या, बांगड्या, कमरपट्टा, गळ्यात मंगळसुत्र यांचा समावेश आहे., पारधी चोरी-दरोड्यात किलोने सोने मिळवतात, पण त्याचा अलंकार म्हणून वापर न करता चरितार्थाचे साधन म्हणून त्या चोरीच्या मालाची निर्गती केली जाते. पारधी स्त्रिने दागिने वापरले तर तिला चोरीची भिती नाही, कारण पारधी समाजात चोरी करायला कोण जाईल? पण दैनंदिन, अस्थिर जीवनात दागिने किंवा अलंकार कमी प्रमाणातच वापरतांना दिसतात.

**५. आहार :-**

पारधी ही एक शिकारी जमात असल्याने जंगलाच्या परिसरात राहते. "ही जमात मांसाहारी आहे. गोमांस निषिद्ध आहे." [११७] ते रेड्याचे मांस खातात. त्यांचा दैनंदिन आहार चपाती, रोटी, तुर डाळ, मसुर डाळ इ. असून अन्नासंबंधी अंधश्रध्दा नाही. ज्वारी, गहु, बाजरीची भाकरी हे त्यांचे मुख्य अन्न आहे. भात आवडतो पण महाग असल्याने कधीतरी खातात. परिसरात आढळणारा भाजीपाला त्यांच्या जेवणात असतो. फळे, कंदमुळे, मटन, मासे, डुकराचे मांसही खातात. स्वयंपाकात शेंगदाण्याचे तेल वापरतात. स्त्री - पुरुष मद्यपान करतात. पारधी घरी चहा पितात.

पारधी मांसाहारी असले तरी पारध्यांच्या स्त्रियांना कुळानुसार मांसाहाराचे नियम आहेत. "शिकार आणि भिकार" हा व्यवसाय असल्यामुळे कमी संख्येने का होईना ते भीक मागतांना दिसतात. कनिष्ठ जातीकडून ते भीक घेत नाहीत. वेगळ्याकुळाकडूनही अन्न घेतले जात नाही कारण ते स्वतःला श्रेष्ठ समजतात. रेडाबळीप्रसंगी जमातीतील लोकांना एकत्रित भोजन मिळते. शिल्लक मांस वाळवतात व राखीव अन्न म्हणून वापरतात. पारधी जंगलाच्या परिसरात रहात असल्याने आजारपणासाठी जंगलावर अवलंबून असतात. प्रत्येक वनस्पतीची औषधी माहिती व महत्व त्यांना ज्ञात असते. तसेच ते दूध व दुग्धजन्य पदार्थ सेवन करतात. स्त्री- पुरुष एकत्र जेवतात. कारण कधीकाळी स्त्रीने विषप्रयोग करण्याचा प्रयत्न केला होता असा समज आहे. पण खरे पाहता अस्थिर जीवनामुळे क्वचितच एकत्र भोजन होते. पारधी समाजात रानावनातील परंपरेने चालत असलेले मुक्त जीवन जंगल कायद्याने मर्यादित केले. त्याचा आहारावर व जीवनशैलीवर परिणाम झाला आहे. अन्नाच्या शोधात त्यांच्या जीवनातील सामान्य क्रिया गुन्हेगारी स्वरुपाच्या ठरल्या. "आजही फिरस्ते पारधी भीक मागतात. " [११८]

## ६. भाषा आणि बोलीभाषेचे भवितव्य :-

पारधी मिश्र भाषा बोलतात. पारधी जमातीची बोलीभाषा ही गुजराथी भाषेसारखी आहे. ज्या जिल्ह्यात ते राहतात त्या जिल्ह्यातील भाषाही त्यांना येते. दररोजच्या जीवनात ते बोलीभाषेचाच वापर करतात. पारधी मराठी, गुजराथी, हिंदी, कन्नड भाषा बोलतात. "ते गुजरातेतुन स्थलांतर करुन आल्यामुळे त्यांची गुजराती बोली अपभ्रष्ट झालेली आहे." [११९] पारध्यांची भाषा दुसऱ्या जमातीमधील लोकांना लगेच समजु शकत नाही. "गुजराथी, राजस्थानी आणि हिंदूस्थानी बोली मधील अनेक शब्द पारध्यांच्या भाषेत सापडतात." हल्ली घिसाडी, लमाणी मिश्र भाषा बोलतात. परजातींच्या समोर ते मोठ्याने हिंदुस्थानीत बोलतात." [१२०] "बहुतेक पारधी वाघरी भाषा बोलतात. या भाषेचे जाटांच्या भाषेशी साधर्म्य आहे." [१२१] पारध्यांची स्वकीयांमध्ये बोलण्याची एक विशिष्ट अशी गुप्त भाषा आहे. तिला ते पारोसी म्हणतात. गुन्हेगारीच्या व्यवहारात ती भाषा वापरली जाते. स्थानिक पातळीवर ते जी भाषा बोलतात ती किडीमीडी (Kidimidi) भाषा होय." [१२२] इतरांच्या समोर किंवा सार्वजनिक ठिकाणी ते पारधी भाषा बोलत नाहीत कारण पोलिस पकडतील ही भीती असते. "वाघरी भाषा मारवाड (मारवाड-मेवाड) भागातील वनवासी बोलतात. शिवाय ती भाषा मारवाडी गुजराथीच्या जवळची आहे. " [१२३] त्यांची एक अशी सांकेतिक भाषा आहे. "ही सांकेतिक / गुप्त भाषा निर्मितीचे कारण म्हणजे आशयाची गुप्तता राखणे, स्वकीय आणि परकीय कोण हे ओळखणे होय. जातीत प्रचलित असलेल्या या गुप्त भाषेमुळे जातीच्या सीमा निश्चित होतात. संकटसमयी ते आपसात या सांकेतिक भाषेच्या वापर करतात." [१२४]

पारधी भाषेतील काही समानार्थी शब्द खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| विश्वास -इख्वाख | गाव- गाम |
| देश - देख | हुंडा - द्येज |
| पाठिंबा - पाटुंबा | राखनदार - गुमास्ते |
| लक्ष्मी - इखोत | पानदेवी /पवनादेवी - जोगळ |
| आहे - छ | वर्ष - बारमाही |
| सोने - खोनुकस | चोरी - वस्सै |
| फासे - वाहार | शंभर - हो |
| घरफोडी - झंमराळु | फौजदार - राज |
| चोरी - वस्साई | पळ- मुल |
| पोलिस अधिकारी - रुपै | |

प्रदेशपरत्वे पारध्याच्या पारसीत निराळेपण आढळते. पारधी आपल्या गुप्त भाषेबद्दल जास्त बोलत नाहीत. त्यामुळे त्यांनी गुन्हेगारी वृत्तीचा पूर्णपणे त्याग केलेला नाही हे लक्षात येते. पारसी भाषेमुळे जे कार्य घडते त्यावरुन "गॅपझ्र या समाजशास्त्रज्ञाने त्यांना समाज गटांच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या भिंती असे म्हटले आहे. " [१२५]

"डेव्हिड मॉरर यांनी पारसीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. Argot is a Specialized language used by organized professional groups operating outside the laws, these groups normally constitute criminal sub- cultures, and the language is usually secret or semi - secret " [१२६] (पारसी ही गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या संघटीत व्यावसायिक टोळीची आपसात संपर्क व संवाद साधण्यासाठी वापरण्यात येत असलेली विशिष्ट सांकेतिक भाषा होय.) या संघटित टोळ्या म्हणजे गुन्हेगार जातीचे छोटे समुह होत. ही भाषा नेहमी अत्यंत गुप्त असून बाहेरील व्यक्तीस सहज समजुन घेण्यास अत्यंत कठीण असते. त्यांच्या बोलीला लिपी नसते. पारधी बोलीभाषा ही अतिप्राचीन व संस्कृतीची वाहक आहे. आजच्या विकास प्रक्रियेतील अनेक बदलाबरोबरच पारधी बोलीतही बदल आढळतो. पण नेमकी कोणती भाषा यांनी स्विकारावी असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होतो. बोलीभाषा अस्तित्व आणि संस्कृती टिकवून ठेवते तर शिक्षण घेताना प्रगतांची भाषा अवगत करावी लागते. पारधी बोलीभाषा ही प्रामुख्याने मौखिक स्वरुपातच आहे. आदिवासीच्या बोलीभाषेचे अध्ययन व संशोधनाचे कार्य यासाठी 'भाषा संशोधन व प्रकाशन केंद्र - गुजरात' ही संस्था १९९६ साली डॉ. गणेश देवी यांनी स्थापन केली. ही संस्था आदिवासींच्या विकासासाठी तसेच आदिवासींच्या कला व बोलीभाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत आहे. " [१२७]

**७. प्रसूती :-**

या समाजातील स्त्रिया बाळंतपणासाठी दवाखान्यात जात नाहीत. पारधी जमातीत मुलीचे बाळंतपण माहेरीच होते. बाळंतीणीला बाज असते. शक्यतो या जमातीत बाळंतपण पुरुषच करतात. राहत्या घरीच किंवा उघड्यावर पारधी स्त्री बाळंत होते. "बाळंत होतेवेळी त्या महिलेचा पती तिथे असतोच. एखादी महिला लवकर बाळंत होत नसेल तर पतीने / बापाने तिच्या पोटावर पाय देण्याची पध्दत आहे. " [१२८] कांही ठिकाणी बाळंतपण करण्यासाठी दुसऱ्या जातीतील सुईणीला बोलावले जाते. "या जमातीत सुईण मिळत नाही कारण सुईणीचा धंदा हलका समजला जातो." [१२९] ही सुईण किंवा

सुलभपणे बाळंतपण करणारी स्त्री एक दिवस येते. बाळंतीणीला आंघोळ घालते व निघून जाते. स्त्रीचे बाळंतपण उघड्यावर लुगड्याचा आडोसा करुन होते. भटक्यांमधील कांही जातींमध्ये महिला स्वतःचे बाळंतपण स्वतःच करतात. यात बाईच्या जीवाला धोका असतो व नवऱ्याने पोटावर पाय देऊन बाळंत करतांना कधी कधी बाई दगावते. आजही अनेक स्त्रियांची आठ- दहा बाळंतपणं होतात. बाळंतपणाच्या काळात तिच्यासाठी स्वतंत्र पाल ठोकले जाते. बाहेरुन अन्न दिले जाते. पावशेर शेंगदाणे आणि गुळावरच तिला या काळात गुजराण करावी लागते. स्त्री स्वतःच्या लेकराची नाळ स्वतःच तोडते. मुल जमाला आल्यानंतर पाच दिवस कोणीही हात लावत ाही. आईच सर्व काही करते. पाचव्या दिवशी संध्याकाळी सटवाईची पुजा करुन पाचवी साजरी करतात. त्यावेळी बाळंत झालेली स्त्री तेलाचा किंवा तुपाचा दिवा लावून पुजा करते. "मुलाचे सर्व केस देवाचे नाव घेऊन आईनेच काढावयाची पध्दत या जमातीत आहे. " [१३०] पाचव्या दिवशी मुलाचे नाव ठेवतात. नाव ठेवण्याची खास प्रथा नाही. "प्रसुतीनंतर नऊ दिवस सुवेर (जननशौच/ विटाळ) पाळले जाते." [१३१] न्हाणीपुजनाची प्रथा इतर जमातीप्रमाणे यांच्यातही दिसून येते. न्हाणीसमोर सात गारेचे दगड ठेवून त्यांची पुजा केली जाते. मुलाच्या डोक्यावरुन सात वेळा पाणी घालून न्हाणीत सोडतात. बाळाला- न्हाणीवरुन (स्नानगृह) उतरवतात. घुगऱ्या वाटून सवाष्णिंना जेवू घालतात. या वेळी पाच लहान मुलांना जेवायला घातले जाते.

गेल्या अनेक वर्षापासून पारधी समाज अनेक वाईट रुढी परंपराना बळी पडलेला आहे. त्यातच गुन्हेगारीचा शिक्का असल्याने पारधी स्त्री, पती जेलमध्ये असताना किंवा त्याचा मृत्यु झाल्यास बाळंतपणाच्यावेळी मुद्दाम गुन्हा करुन बाळंतपणासाठी तुरुंगात जाते.

### ८. पारधी परंपरा :-

पारधी लोक भटके असल्यामुळे यांच्या पोटजातीतील रुढी-परंपरांमध्ये एकजिनसीपणा आढळत नाही. हा समाज जुन्या रुढी परंपरांच्या चौकटी स्वतःचे आद्य कर्तव्य म्हणून जपत असतो. "रुढी किंवा प्रथा ही संकल्पना व्यापक असून त्यात अनेक लोकांच्या परंपरा व संकेत, सण, उत्सव, रीतिरीवाज यांचा समावेश होतो." [१३२] अनेक प्रथा-परंपरांचे पालन पारधी नित्य नियमाने, काटेकोर पणे करीत असतो. "पारधी स्त्रीचे बाळंतपण पालाच्या बाहेर झाडाझुडपाच्या आडोशाला होते. ही एक परंपराच आहे." [१३३] तसेच "स्त्रिने पाय पूर्वेकडे करुन बसावे, झोपावे कारण पश्चिमेकडे देव असतात. सिसोदिया कुळाचे पारधी सोडून इतर पारधी पलंगावर झोपत नाहीत, झोपल्यास दंड केला जातो.

शिकारीत सापडलेल्या पक्षांमधून वंशवृध्दीसाठी एक नरमादी जोडी सोडून दिली जाते." [१३४] अशा विधायक परंपरा देखील पारधी समाजात आहेत. त्यांच्या मते समाजरक्षणाचे नियम म्हणजेच पारधी समाजाच्या रुढी व परंपरा होय. अंगावरचा कपडा जमीनीवर लोळणे हे परंपरेने अपशकून मानतात. म्हणून "लंगोटी, लुंगी, काष्टासाडी असा पोशाख दिसतो." [१३५] या समाजात धार्मिक बाबतीत अनेक परंपरा प्रचलित आहेत. "कोणत्याही समाजातील वर्षानुवर्षे चालत आलेल्या, रुढी, कायदा, प्रथा, आचार - विचार, विधिनिषेध, मुल्ये, पुराणकथा व दंतकथा, लोकरीती इत्यादीचा संग्रह म्हणजे परंपरा होय." [१३६] पारधी व्यक्तीवर परंपरांचा प्रभाव दिसून येतो. जन्मापासुन ते मृत्यूपर्यंत व्यक्ती पंरपरेने ठरवून दिल्याप्रमाणेच वर्तन करते. म्हणजे अगदी अत्यंविधीसुध्दा परंपरेप्रमाणेच केला जातो. या समाजात जातीच्या परंपरा जपण्याची पध्दत रुढ आहे.

### ९. व्यसनाधीनता :-

मद्यपानाचे व्यसन या समाजात खोलवर रुजलेले दिसून येते. सिमिंग्टनच्या मते, "सर्व आदिवासी जमातच व्यसनी असते. " [१३७] पारधी समाजात दारु मोठ्या प्रमाणात पितात.

तंबाखू आणि बिडी ही परंपरागत व्यसने आहेत. या गोष्टींच्या दुष्परिणांमाबाबत त्यांना माहिती नाही. जीवनात येणारे सुख दुःखाचे प्रसंगी दारु घेण्याची प्रथा या जमातीत दिसून येते. पारध्यांच्या देवदेवात देवाला रेडा बळी देतात. तीन दिवस ही जत्रा असते. पहिल्या दिवशी रेडा बळी, दुसऱ्या दिवसी बकरा कापला जातो. आणि तिसऱ्या दिवशी दारु प्याली जाते. "पहिल्यांदा पुरुष दारु पितात व नंतर स्त्रिया दारु पितात".[१३८] मद्यपान हे पारधी जमातीच्या जीवनाचा एक भाग असून त्याला धार्मिक मान्यता आहे. त्यांच्या देव-देवतांची पूजा मांस व मद्याशिवाय होतच नाही. धार्मिक कार्यात संपूर्ण कुटुंब मद्यप्राशन करुन बेधुंद असते. सद्यः स्थितीत दारु पिणे, बाळगणे व विकणेबाबत अतिशय गुप्तता बाळगतात.

"आदिवासीच्या विविध रितीरीवाजात दारुचे महत्त्व आहे. जन्मल्यावर बाळाच्या तोंडात, मरतेवेळी, लग्नप्रसंगी, वाटाघाटी इत्यादी प्रसंगी दारु पाहिजेच." [१३९]

### १०. अंत्यसंस्कार :-

पारधी समाजात अनेक चालीरीती, संकेत, प्रथा - प्ररंपरा यांचे पालन दैनंदिन जीवनात केले जाते. मृतविधी ऐपतीप्रमाणे केला जातो. मृतांना जाळतात किंवा पुरतात. तिसऱ्या दिवशी दफनाच्या जागी थोडी काकवी आणि तुप ओततात. "परंपरेने सर्व विधी केले जातात, पण पारधींच्या धार्मिक

विधीचे स्वरुप अत्यंत साधे आहे. हे लोक दक्षिणेकडे डोके करुन प्रेत पुरतात. " [१४०] बाळंतपणात मरणाऱ्या स्त्रियांचे आणि तीर्थयात्रा करुन आलेल्या व्यक्तीचे निधन झाल्यास त्यांचे दहन केले जाते. प्रेताला आंघोळ घातली जात नाही. नुसती लंगोटी लावणारे अविवाहीत मुले प्रेत उचलतात. कुटुंबातील माणसे तिचे सुतक पाळीत नाहीत. तसेच कोणतेही विधी केले जात नाहीत.

"गाव पारधी मृताचे दफन करतात." [१४१] खोल खड्डयात प्रेताला बसवले जाते आणि मगच अंत्यविधी होतो. दहाव्या दिवशी मृत व्यक्तीच्या आवडीचे पदार्थ आणि दारु ठेवली जाते. फासेपारध्यांमध्ये प्रेत वाहुन नेण्याची पध्दत थोडी वेगळी आणि विचित्र आहे. "काठीला झोळी करुन त्या झोळीत प्रेत नेतात. दोनच खांदेकरी असतात. तेही कुटुंबातील जवळच्या नात्यातलेच असतात. "या समाजात प्रेतयात्रेत स्त्रियांना बंदी असते." [१४२] तेराव्या दिवशी बकरा कापून मृतात्मा शांत करण्याची रीत आहे. प्रेत जाळणे या समाजात निषिध्द मानले जाते. मयत झालेल्या ठिकाणी जास्त दिवस राहत नाहीत. "दिवसाचे करतात. पुरुष असेल तर बाराव्या दिवशी आणि स्त्रीचे तेराव्या दिवशी दिवस करतात." [१४३]

### ३.६.५ धर्मसंस्था :-

आदिम समाजात सर्वसाधारणपणे आढळून येणाऱ्या धर्मश्रध्दा व धर्माचरण पध्दती पारधी समाजातही असल्याचे दिसून येते. या धर्मश्रध्दांचे वेगळेपण सहज लक्षात येते. त्यांच्या संपूर्ण जीवनावर धर्माचे वर्चस्व दिसून येते. त्यांचे भावनात्मक व दैनंदिन जीवन धर्माशी संबंधित असते. तसेच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, न्यायविषयक जीवन हे त्यांच्या धर्मतत्वाशी अनुरुप असते. त्यांच्या मनोरंजनाच्या कल्पनाही यातूनच साकारल्या जातात. धर्म हे त्यांच्या समाजजीवनातील सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन आहे. धर्माचे उल्लंघन होईल असे वर्तन त्यांना मान्य नाही. पारधी समाजाचे असे कोणतेही अंग नाही की ज्याच्यावर धर्माचा पगडा नाही. कारण पारधी समाजात धर्माचे कार्य अत्यंत उपयुक्त आहे. सामाजिक नियंत्रण, समाज संघटन, आर्थिक क्रियेची सुरुवात, शिकार, चोरी इ. प्रसंगी घ्यावयाची काळजी व कौल याला धर्माचाच आधार असतो. जन्मापासुन ते मृत्युपर्यंत होणाऱ्या सर्व महत्त्वपूर्ण संस्कारात धार्मिकतेला महत्व देतात. पारधी समाजाचे आचार - विचार, श्रध्दा व दृष्टिकोन, प्रथा, परंपरा जिवंत ठेवण्याचे कार्य धर्मानेच केले आहे. पारधी समाजातील कुटूंबसंस्था, विवाहसंस्था अशा मूलभूत संस्थांना धर्माचाच आधार आहे. जीवनात येणारी संकटे, सुख - दुःख इ. ना सामोरे जाण्याची ताकद धर्मामुळे मिळते. धर्माने समाजाला एकत्रित बांधण्याचे काम केले आहे. पारधी

धर्माबद्दल अधिक संवेदनशील व श्रध्दाळू असतात. पारधी समाजात देवाचे नाव घेतल्याशिवाय पान हालत नाही. "पारधी त्यांचा धर्म हिंदू सांगतात."[१४४]

इतर कोणत्याही धर्मापेक्षा आदिवासींचा एक वेगळा आदिवासी धर्म असतो. पारध्यांसह सर्व भटके विमुक्त आदिवासी हिंदू नाहीत अशी त्यांची समजूत आहे. पण हिंदू जीवन पध्दतीच्या व्यापक संपर्कामुळे पारधी व भटके विमुक्त हे हिंदूचेच अनुकरण करतांना दिसतात. देवावर व जत्राखेत्रावर पारध्यांचा जास्त विश्वास आहे. जंगलाशी संबंध आल्यामुळे आणि भटकंतीमुळे गावगाड्याशी संबंध कमी आल्याने पारधी लोक धार्मिक कृत्यात गुरफटलेले असतात. इतर कोणताही समाज यांच्याशी संबंध ठेवण्यात धजावत नाही. चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न करतांना अविश्वासामुळे त्यांना काम मिळत नाही. नाइलाजाने त्यांना गुन्हेगारीकडे वळावे लागते आणि अशा प्रसंगी देवाचा कौल पाहण्यासाठी ते देवाचा आधार घेवून शुभाशूभ पाहतात. मुठीमध्ये कांही तांदूळ किंवा जोंधळयाचे दाणे घेतात व मोजतात. सम असतील तर शुभ मानतात, विषम असतील तर अशुभ मानतात. शुभशकून आला तरच कामगिरीवर जातात. विशेषतः जातपंचायतीमध्येही देवदेवतांची शपथ ही अंतिम मानली जाते. "दसरा या सणाला विशेष महत्व आहे. दसरा व शिमगा हे यांचे दोन मोठे सण आहेत." [१४५] लग्न, उत्सवप्रसंगी ते नृत्य करतात पण या जमातीचे स्वतःचे लोकनृत्य / लोककला नाही. सण समारंभात गीत गातात. स्त्रिया देवाची गाणी म्हणतात. उदा.

"लंबे लंबे बाल सोडिले बकऱ्यावरी।
ग माझ्या मी गं।
आई कशाला चाले बाळ तुपाला चालं कोठं।
आई कशाला गेलं बाळं।
बकऱ्याला गेलं बाळ।
बकऱ्याची झाली येळ ग माझ्या बाई।

ते नृत्यही करतात व ते खास जमातीचे किंवा पारंपारिक नसते. "पारध्यांची बोली मराठी नाही पण बहुधा गाणी मराठी असतात हे विशेष." [१४६]

### १. देवदेवता :-

"पारधी कुळात देवतांची पूजा महत्वाची असली तरी इतर लोकदेवतांनाही भजतात. त्यांच्या घरात देव नसतात."[१४७] मांढरदेवी, जरीमारी, खंडोबा, लक्ष्मी, दुर्गा, सप्तश्रृंगी, मरीआई, भवानी ही त्यांची मुख्य

दैवते आहेत. साथीचे रोग किंवा संकट आल्यास देवीचा कोप झाला असे समजतात. "देवतांची पुजा करणाऱ्याला पुढारी म्हणतात." [१४८] कोल्हापूरच्या अंबाबाईला तसेच पंढरपूरच्या पार्वती मंदिरात आणि आळंदीला ज्ञानेश्वर मंदिरात यात्रेसाठी जातात. पारधी जमातीत देवीला अत्यंत महत्व आहे. "जुनागडची अंबिका देवी ही त्यांची कुलदेवता आहे. पारधी शाक्तपंथीय आहेत."[१४९] ते कोणत्याही प्रसंगी देवाला शरण जातात. दसऱ्याला शिकारीची सर्व साधने स्वच्छ करुन पुजा करतात. सुर्य व चंद्र दररोज मरतात व दुसऱ्या दिवशी नव्याने जन्म घेतात असे पारधी समजतात. पारधी लोक कुत्रा, मांजर, खारुताई यांची शपथ घेत नाहीत. पारध्यांना हिंदू मंदिरामध्ये प्रवेश आहे. त्यांना सामुदायिक ठिकाणी पाणी भरण्यास परवानगी आहे.

पारध्यांमध्ये प्रत्येक कुळीची दैवते वेगवेगळी आहेत. कुळाच्या देवतेला साक्ष ठेवूनच हा समाज जगत असतो. त्यांच्या दैनंदिन जीवनात कुलदेवतांना महत्त्वाचे स्थान आहे. "प्रत्येक कुळामध्ये किंवा आडनावामध्ये देवतांची विशिष्ट संख्या असते. उदा. पवार - नऊ देव, चव्हाण - सात देव, काळे - सहा देव, शिंदे - तीन देव, घोसला - पाच देव, माना - सहा देव, खरिया - अकरा देव, सोळंकी - चार देव, फुलमाळी - सात देव " [१५०] गतकाळातील कुळनामामध्ये कांही बदल झालेले दिसून येतात. जसे पूर्वीचे हांडे आता चौहान, पूर्वीचे खिहाडे आता सोलंकी, पूर्वीचे झोकार्डे आता पवार आणि पूर्वीचे सोनाडे आता पाटील या आडनावाने ओळखले जातात. सर्व कुळात आईची पुजा महत्वाची मानली जाते. प्रत्येक कुळाची कुलदैवता ही स्त्री देवताच आहे. कुळाच्या देवतेचे प्रतीक बनवून संकटात व सुखात पुजले जाते. पवारांची कुलदेवता महालक्ष्मी असली तरी जमातीत तिला कोरब देवी किंवा इखोत देवी असे म्हणतात. काळे त्यांचे कुलदैवत म्हणून खोडीयार देवी किंवा हरखत देवी ही नावे सांगतात तर चव्हाण चांवडदेवी किंवा अंबाबाई हे नाव सांगतात. हरखत देवी म्हणजे पंजाबमधील हरसिध्दी माता होय. वाघाई किंवा वाघजाई म्हणजे वाघावर स्वार झालेली अशी प्रत्येक कुलदेवतेची माहिती व महती त्यांना माहिती असते. कुलदेवतावरुनच कोणत्या प्राण्याचा बळी द्यायचा आणि कोणता प्राणी निशिध्द आहे हे ठरवले जाते. पारध्यांमध्ये स्वतःचा असा पारंपारिक सण समारंभ नाही. दैनंदिन जीवनातील कोणत्याही कार्यामुळे देवाचा कोप होणार नाही किंवा धार्मिक नियमांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेतली जाते. कोणत्याही प्रकारचे लिखीत कायदे कानुन नसतांना धर्मामुळे अलिखीत स्वरुपात सर्व व्यवहार चालतात. धर्मामुळेच पारधी संस्कृती टिकून आहे असा त्यांचा विश्वास आहे. "शाहू महाराजांनी पारध्यांमधील धार्मिकता आणि प्रामाणिकपणा

ओळखला होता. पारध्यांची भाकरीची भूक ही क्रौर्याची व अवैध कृत्यांची जननी आहे हे ओळखुनच 'बांधा आणि पाडा' हा एक अनोखा उपक्रम शाहु महाराजांनी राबवला. शाहु महाराजांनी अनेक प्रसंगातुन हे दाखवून दिले की पारधी जमात ही धर्माला भिणारी, प्रामाणिक, विश्वासू, दिल्या शब्दाला जागणारी आहे. " [१५१]

**२. भगताची भूमिका :-**

पारधी समाजात भगत असतो. हा भगत जमातीतील वयस्कर पुरुष असतो. त्याच्या शरिरात खास दैवी शक्ती असते. भक्त व देव या दोघांशी तो संवाद साधतो. पुढे काय होणार आहे किंवा घडणार आहे तसेच भूतकालीन घडलेल्या घटनेची कारणे तो जाणतो. व संकटावरील उपायासाठी मार्गदर्शन करतो. पिशाच्यापासुन जमातीचे संरक्षण करतो. तो आरोग्यावरही उपाय सांगतो. मोठा आजार किंवा बाधित व्यक्ती भगताकडे जाते आणि भगत त्यांना यात्रेत बळी (रेडा) देण्याचा सल्ला देतो. बलीदानाचा विधी करुन भगताचा आशिर्वाद घेऊन चोरी - दरोड्यात गेल्यास यश मिळते असे मानले जाते. विशिष्ट धार्मिक विधी करुन भगत सकारात्मक किंवा नकारात्मक सल्ला देतो. भगत हा पिंजारलेले केस किंवा जटाधारी, गबाळा पोषाख परिधान केलेली, तेजस्वी डोळे असलेली, घागरा परिधान केलेली जमातीतील वयस्कर व्यक्ती असते. भगत धार्मिक कार्य करतो. लोकांची देवाबद्दलची श्रध्दा कायम ठेवण्याचे काम करतो. भगत जमातीचे धार्मिक शिक्षण घेतो. त्यामुळे जमातीचे लोक सतत त्यांच्या संपर्कात असतात. भगत दारुसेवन करीत नाही. भगताला त्याच्या जमातीत व एकूण जातपंचायतीत खुप महत्व व प्राधान्य असते. पारध्यांच्या पोटजातीत भगताला जोखऱ्या, पुढारी, भट, बाबा इ. विविध नावांनी ओळखले जाते. भगताच्या अंगात येते आणि भगताच्या माध्यमातून देवी शक्ती बोलते अशी श्रध्दा आहे. त्याला सर्व तऱ्हेचे मंत्र येतात. रोगनिवारक मंत्र, पीक चांगले येण्याचे मंत्र, हिंस्त्र जनावरांना काबूत आणण्याचे मंत्र त्याला येतात. पारधी जमातीत भगत हा पुरुषच असतो. एखादया स्त्रिला धार्मिक ज्ञान असले तरीसुध्दा स्त्रिया धार्मिक कार्यात अपवित्र मानल्या गेल्याने त्यांना भगताचे कार्य व दर्जा दिला जात नाही.

भगताला देवऋषी मानले जाते. कोणत्याही संकटप्रसंगी त्याला शरण जातात. "आदिवासी जीवनात देव - देवतांच्या शक्तीच्या बरोबरीची म्हणजे जादू - विद्या होय. ही विद्या ज्यास अवगत असते त्यास भगत म्हणतात. "[१५२] जादूविद्या, भविष्यकथन, रोगनिवारण, सणवार, उत्सव, सामाजिक समारंभ, लग्न कार्य, जातपंचायत, शिकारीत यश देणे अशी कार्य भगत करीत असल्याने भगताची

कामे करणे लोकांना आवडते. "मानवी व्यवहारात हस्तक्षेप करणाऱ्या काही शक्ती आहेत त्या शक्तीशी भगतांचा संबंध असतो. त्याला मांत्रिक असेही म्हणतात." [१५३]

**३. श्रध्दा :-**

पारधी समाजात अनेक श्रध्दा - अंधश्रध्दा पाळल्या जातात. जुन्या नियमांचे अंधानुकरण म्हणून अंधश्रध्दा पाळल्या जातात. या समाजात श्रध्दा आणि अंधश्रध्दा यांना दैनंदिन जीवनातील घडामोडीत बरेच महत्व आहे. अंधश्रध्देचा भाग म्हणून शकून, अपशकूनाच्या संकल्पना मानल्या जातात. पारधी समाजात देवीची भीती जास्त प्रमाणात आहे. धर्माबद्दल त्यांना भितीयुक्त आदर असतो. पारध्यांच्या संस्कृतीत लिखीत ज्ञानाचा अभाव असल्याने धार्मिक विधी व समारंभ यांच्याद्वारा ज्ञानाचे जतन होते व एका पिढीपासुन दुसऱ्या पिढीपर्यंत संक्रमित होते. दाराच्या उंबरठ्यावर डोके ठेवून पुरुष झोपत नाही. तसे केल्यास दंड केला जातो."[१५४]

एखादी व्यक्ती आजारी असेल तर तिला अंधश्रध्देपोटी भगत किंवा मांत्रिकाकडे उपचारासाठी नेले जाते. "पूर्वी रोगासाठी भगत, वैद्य / जादूगार या माध्यमातून उपचार करीत असत." [१५५] तसेच अंगात येणे, बळी देणे याला अत्यंत महत्व आहे. "पारधी केस कापीत नाहीत व विंचरीतही नाहीत." [१५६] केस देवीचा बाणा असतो अशी अंधश्रध्दा यांच्यात आहे. "मंत्र - तंत्र, बाबतीत या जमातीत अत्यंत अंधश्रध्दा आहेत." [१५७]

पारधी समाजात देवदेवता यांची पूजा पारंपारिक पध्दतीने केली जाते. "एखाद्या देवतेने इच्छा पूर्ण केल्यास विशिष्ट पदार्थ अर्पण करु किंवा तिच्यासाठी विशिष्ट व्रत करु असे अभिवचन देणे म्हणजेच नवस होय. नवस बोलण्याचा प्रघात प्राचीन काळापासून चालत आलेला आहे." [१५८] या समाजात धार्मिक कर्मकांड, नवस, प्रथा, परंपरा, इत्यादीना विशेष महत्व आहे. "एखादा नवस बोलल्यावर तो नवस फेडलाच पाहिजे नाही तर देवाचा रोष पत्करावा लागतो. रोगनिवारण, विवाह, अपत्यप्राप्ती यासाठी देवतांना विविध प्रकारचे नवस बोलले जातात." [१५९] एखाद्या संकटातुन लवकर सुटका न झाल्यास हा समाज देवाला आर्त हाक देतो व संभावित चुकीबद्दल क्षमायाचना करतो.

**देवकारण :-**

धर्मावरील श्रध्देमुळे पारधी जमात आपले स्वतंत्र जीवन जगत आहे. धर्माप्रमाणेच त्यांच्या स्वतंत्र देवता आहेत. आपल्या देवतांकरिता त्यांनी मंदिरे बांधली नाहीत, त्यांची पूजा म्हणजे या देवतांना कोंबडा - बकरा अगर रेडा बळी देणे हीच होय. "पारध्यामध्ये रेडे जत्रा ही अत्यंत पवित्र

मानण्यात येते." [१६०] बोललेल्या नवसाप्रमाणे किंवा वर्षातील ठराविक वेळी पारधी देवाला जत्रा करतात. पारध्यांमध्ये देवाला रेडा बळी देण्याची पध्दत रुढ आहे. देवीची प्रतिमा बळीच्या रक्तात बुडवतात. नंतर रेड्याच्या मांसाचा तुकडा पेटत्या होमात नैवेद्य म्हणून टाकतात. "रेड्याला होमाजवळ आणून ठार मारतात. प्रसाद म्हणून त्याचे मांस सर्वांना वाटतात. याला टोणगा मारणे असे म्हणतात." [१६१] कर्ज काढून का होईना पण देवीपूढे टोणगा बळी दिला जातो. बळी दिलेल्या ठिकाणी लोकांना वस्ती करण्यास मनाई आहे. कारण हे ठिकाण देवीचे ठाणे किंवा पवित्र ठिकाण म्हणून जाहीर केले जाते. बकरा बलिदानाच्या दिवशी मोठी चूल पेटवून कढईत तेल तापवून उकळत्या तेलातुन पुऱ्या तळल्या जातात. देवाच्या महात्म्यामुळे हात भाजत नाहीत अशी त्यांची समजूत किंवा श्रध्दा आहे. "हुबळीजवळ मे महिन्यात अमावस्येच्या पाचव्या-सहाव्या दिवशी संपूर्ण भारतातील पारधी एकत्रित येतात. या ठिकाणी दोन ते अडीच लाख पारधी जमा होतात. ५ ते ६ हजार बकऱ्यांची कत्तल केली जाते. देवी कृपेसाठी ही जत्रा केली जाते." [१६२] गोहत्या व गोमांस निषिद्ध मानले जाते. या समाजात बळी दिल्याशिवाय कोणताही उत्सव साजरा करीत नाहीत. मांसाहार आणि दारु शिवाय उत्सवाला किंवा धार्मिक आचरणाला पूर्णत्व येत नाही. रेडा-बळीच्या या जागेत जमातीतल्या देवाचा भक्त बलिदानाच्या अगोदर जमातीच्या कल्याणाची, संरक्षणाची प्रार्थना करतो. प्रत्येकजण गुंजा घेऊन आपले गाऱ्हाणे देवीला सांगतो. "लाल रंगाच्या फडक्यावर लाल काळया रंगाच्या कांही गुंजा ठेवलेल्या असतात. त्या गुंजा हाताने उचलुन अपराधाची कबूली देवीपूढे केली जाते. सम गुंजा राहिल्या तर देवीने न्याय दिला असे समजले जाते. त्यानंतर देवीमातेचा जयजयकार करुन बळी दिला जातो. हा बलिदानाचा विधी म्हणजेच त्याचे देव - कारण होय. याच प्रसंगी ते जातीचे तंटेबखेडे मिटवतात व गुन्ह्याचे बेत ठरवितात." [१६३] या ठिकाणी फार मोठा खर्च केला जातो. कांही पारधी पोटजातीत नोहारणु आणि वडादानू हे विधी अत्यंत थरारक असतात. वडादानू या विधीत स्वतःचे रक्त काढून त्या रक्ताने देवाला स्नान घालतात. त्यानंतर ते घट्ट झालेले रक्त स्वतः प्राशन करतात." [१६४]

**३.६.६ आर्थिक जीवन :-**

जीवन जगण्यासाठी मानवाला आपल्या मूलभूत गरजा भागविणे गरजेचे असते, त्यासाठी मानवाला आर्थिक क्रिया कराव्या लागतात. आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी मनुष्य उपलब्ध साधनांचे साहाय्य घेतो. यालाच आर्थिक क्रिया असे म्हणतात.

आदिमांची अर्थव्यवस्था व आधूनिक अर्थव्यवस्था यांच्यामध्ये फरक आहे, तसाच त्यांच्या जीवनापध्दतीतही फरक दिसतो. आधूनिक अर्थव्यवस्थेपेक्षा आदिम अर्थव्यवस्था वेगळी व अविकसित होती. आदिम समाजात कंदमुळे गोळा करणे, फळे गोळा करणे, शिकार, मासेमारी, शेती व गुरांची पैदास इत्यादी अर्थव्यवस्थेचे प्रकार थर्नवॉल्ड यांनी सांगितले आहेत." [१६५] आदिवासी समाज अनेक जमातील विखुरलेला असून त्याचे अस्तित्व जगभर आहे. आदिवासींच्या जीवनात कमी अधिक प्रमाणात सारखेपणा असल्यामुळे या समाजाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरुपही समाजपातळीवर असल्याचे जाणवते.

**१. अर्थव्यवस्थेची लक्षणे व प्रकार :-**

आदिम अर्थव्यवस्थेचे निर्वाहप्रधानता हे पहिले लक्षण आहे. म्हणजे अगदी मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना अक्षरशः झगडावे लागते. निसर्गातील उपलब्ध साधनांचा शोध घेणे व ती संपादन करण्यातच त्यांची दमछाक होते, तेंव्हाच त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण होतात. यालाच निर्वाहप्रधान अर्थव्यवस्था म्हणतात. आदिवासी निसर्गात उपलब्ध होणाऱ्या बाबीवर गुजराण करीत असतात. फळे गोळा करणे, शिकार, मासेमारी यासाठी तांत्रिक साधने वापरण्याचे ज्ञान त्यांना नसते. त्यामुळे मर्यादित गरजांसाठीही त्यांना प्रचंड कष्ट उपसावे लागतात. तंत्रज्ञानाच्या अभावामुळे मिळणारे उत्पादन अपूरे असते. तसेच आदिवासीच्या अर्थव्यवस्थेत अलिकडच्या काळापर्यंत पैसा नसून वस्तुविनीमय पध्दत होती. आधुनिक काळात वस्तुची जागा काही प्रमाणात पैशाने घेतली आहे. आदिमांचे आर्थिक व्यवहार सामुहिक स्वरुपाचे असतात. सर्वजण एकत्र येतात व त्यांच्या गरजा एकमेकांच्या सहाय्याने पूर्ण करतात. म्हणजे त्यांची सामुदायिक अर्थव्यवस्था असते. आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत श्रमविभागणी आहे. पण विशेषीकरण दिसून येत नाही.

एकंदरीत आदिवासींची अर्थव्यवस्था अत्यंत साधी व गुंतागुंतविरहीत आहे. त्यांच्या अर्थव्यवस्थेवर धर्माचा पगडा आहे. शिकारीला जाताना देवदेतांची पूजा, कौल घेणे, शुभ-शकून मानणे, मंत्र, तंत्र, प्रार्थना करणे इ. करतात. धर्मावरचा विश्वास व श्रध्दा, आर्थिक प्रयत्नांना यश देते असा त्यांचा विश्वास आहे.

आधूनिक अवजारांच्या अभावामुळे शारिरीक श्रम हेच त्यांचे उत्पादनाचे साधन आहे. त्यांच्या जीवनावर परंपरांचा जबरदस्त प्रभाव आहे. आर्थिक क्रियेकडे वास्तववादी दृष्टीने पाहिल्यास अन्नसंपादन आणि अन्न उत्पादन या मार्गानेच गुजराण करतात. त्यांच्या आर्थिक क्रिया निसर्ग आणि

अवगत तंत्रज्ञानावर आधारित आहेत. "खाद्य संकलन, शिकार याशिवाय भिक्षूकी, वेठबिगारी, दरोडा, चोरी याचाही अनुभव आदिवासी घेतात." [१६६] भारतातील मूळ रहिवाशी असलेली पारधी जमात शिकार करण्यासाठी पशूपक्षांची तसेच वन्य प्राण्यांची टेहळणी करीत, त्यांच्या शोधात ते सतत भटकंती करीत असतात. पारधी व्यक्तिशः स्वतंत्रपणे किंवा सामूहिकपणे शिकार करतात. आर्थिक कमकुमवतपणा आणि दूसरे निश्चित उत्पन्नाच्या साधनाचा अभाव त्यामुळे त्यांना भटकावे लागते. काही काळानंतर या जमातीला भटकण्याची सवयच लागली. भटकेपणा यांच्या जीवनातील जीवन मार्ग बनला . पुढे शिकार करण्याच्या पध्दतीवरुन पारधी समाजात उपजाती निर्माण झाल्या.

**२. उपजिवीकेची साधने :-**

परंपररेने चालत आलेले रानावनातील शिकार करत मुक्त जीवन जगतांना शासनाने जंगले संरक्षित म्हणून घोषित केली आणि एकूणच पारध्यांच्या शिकारीतुन मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम झाला आणि त्यांच्या सामान्य क्रिया गुन्हेगारी स्वरुपाच्या ठरल्या व शिकार करणे हा अपराध ठरला. बदलत्या समाज जीवनात पर्यायी व्यवसाय मिळाला नाही आणि पारध्यांच्या नशिबी गुन्हेगारी आली. पारधीही त्यात पारंगत झाले आणि अधिक बदनाम झाले. पारधी स्त्रियासुध्दा पुरुषाप्रमाणे चपळ, काटक, धाडसी व बेडर वृत्तीच्या असतात. मात्र प्रत्यक्ष चोरीत/गुन्हेगारीत स्त्रिया पूरुषांच्या सोबत नसतात. आज पारधी गुन्हेगार जमात म्हणून कुप्रसिध्द आहे. चित्तापारधी ही सर्वात खतरनाक जमात असून प्रसंगी ते खुनही करतात. लंगोटपारधी, टाकणकार या जमातीतही गुन्हेगारी प्रवृत्ती जास्त प्रमाणात आढळते. "राजपारध्यांचाही घरफोडी गुन्ह्यात सहभाग असतो. पारध्यांनी आतापर्यंत कोणताही प्रामाणिक व्यवसाय स्विकारलेला नाही." [१६७] भीक मागणे, वनौषधी गोळा करुन विकणे. शिकार इ. परंपरागत व्यवसाय असल्याने त्यांचे आर्थिक जीवन अप्रगत स्वरुपाचे आहे. घरफोडी करण्यासाठी ठराविक अशी पध्दत ते वापरत नाहीत कारण त्यामुळे टोळी ओळखून पकडले जाण्याची भीती असते. टाकणकार जात्याचा व्यवसाय करतात. पण पोलीसांचे जे ऐतिहासिक दस्तऐवज आहे, त्यात त्यांनी गुन्हे केल्याचेही आढळते. जुन्या नोंदीमध्ये हे दिवसा व्यवसायाच्या निमित्ताने फिरतांना चोरीसाठी घर शोधून रात्री त्या घरी चोरी करीत असत. चित्तापारधी चित्त्याची शिकारीसाठी मदत घेत. मात्र आज ते चित्ता पकडत नाहीत. सध्या ते छोट्या-छोट्या पक्षाच्या शिकारी करणे आणि वनौषधी विकणे यावर गुजराण करतात. चित्तापारधी गाईच्या आड लपून हरणाजवळ जायचे व हरणाची शिकार करायचे त्यावरुनच गायकेपारधी हे नाव पडले. फासे, जाळे तयार करण्याचे कौशल्य पारध्यांमध्ये

परंपरागत होते. पण वने व जंगले नष्ट झाल्याने शिकार बंद झाली. परिणामी, फासे/जाळे विणण्याचे कौशल्य त्यांनी मण्याच्या माळा विणतांना वापरले. या माळा अशा पध्दतीने विणल्या जातात की माळ तुटली तरी मणी बाहेर पडत नाहीत. अशा प्रकारे पारध्यांचे हे कौशल्य मागच्या पिढीकडून पूढच्या पिढीकडे वेगळ्यापध्दतीने हस्तांतरीत होतांना दिसते. जाळे विणणे आणि शिकारीसाठी भटकणे यातच त्यांचा वेळ जायचा. पण आता या दोन्ही गोष्टी कमी झाल्याने त्यांनी माळा विकण्यासाठी भटकंती स्विकारली. भटकंतीची सवय असल्याने त्यांना आजही स्थिर स्वरुपाचे व्यवसाय किंवा शेतीमध्ये रुची वाटत नाही. जेथे भटक्या जमातींना नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची अंमलबजावणी झाली आहे अशा भागात काही पारधी लोक सरकारी नोकऱ्यांमध्ये आढळतात.

**३. शिकार - परंपरागत व्यवसाय :-**

अतिप्राचीन काळापासून शिकार हा पिढीजात व्यवसाय, उपजिवीकेचे साधन, करमणूकीचे साधन, फूरसातीच्या वेळेतील काम आणि खेळ/छंद म्हणून केली जात असे. इतिहासपूर्व कालखंडात जेंव्हा माणूस रानटी अवस्थेत होता तेंव्हा प्राण्याचे मांस मिळवणे आणि वस्त्र म्हणून प्राण्याची कातडी यासाठी शिकार केली जात असे. प्राथमिक अवस्थेत शिकार हे अन्न मिळवण्याचे प्राथमिक साधन होते. त्याशिवाय शिंगे, हाडे यांचाही वापर साधन म्हणून केला जात होता. शिकारीतून मिळणारी साधने ही आदिवासी भटक्या जमातीची ओळख बनली. प्राचीन काव्यांमध्ये छंद आणि क्रिडा म्हणून शिकार जोपासण्याची अनेक उदाहरणे आहेत. जसा जसा काळ बदलत गेला तसा शिकार हा व्यवसाय बनत गेला आणि शिकार ही जमातीची ओळख बनली. मात्र समाजरचनेत शिकार हा व्यवसाय असणारे शुद्र वर्णात गणले जाऊ लागले. पंचतंत्रातील अनेक गोष्टींमधून शिकार व वन्यजीव यांचे परस्परावलंबीत्व दिसून येते.

शिकारीला पर्याय म्हणून पूढे पाळीव प्राणी मांसभक्षण व इतर गरजांसाठी वापरले जावू लागले. शिकारीपुढे हा पर्याय उभा राहिला. नंतर शिकार ही उपजीवीकेचे साधन न राहता राजे लोकांचे छंद किंवा खेळ बनली. परिणाम शिकारीची साधनेही बदलली. पारधी जाळे/फासे वापरायचे तर राजेरजवाडे आधूनिक साधने वापरुन शिकार करीत असल्याने शिकारीचे प्रमाण वाढले. परिणामी वन्यजीवांची संख्या कमी झाली. शिकार केलेल्या प्राण्यांच्या संख्येवरुन राजांची प्रतिष्ठा ठरायची. याचा परिणाम वन्यजीव संख्येवर झाला. स्थानिक व आदिवासी यांचा व्यवसाय शिकार हाच राहिला. याला पुरावा म्हणजे शिकारीसाठी राजे यांची मदत घेत.

वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी जंगलतोड, जंगलावर आक्रमण, परिणामी जंगली प्राण्यांचे मानवावर आक्रमण अशा प्रकारे मानवाला धोका निर्माण झाला. त्यामुळे जंगली प्राण्यांच्या शिकारीत प्रचंड वाढ झाली. ब्रिटीश काळात नरभक्षक जंगली प्राण्यांची शिकार करणाऱ्याला मोठी बक्षिसे दिली जात. शिकारीसाठीची अद्ययावत साधने आणि सरकारचा पाठिंबा, नरभक्षक प्राण्यांच्या नावाखाली शिकार याचा परिणाम म्हणजे निसर्ग संपत्तीच्या हानीमुळे पर्यावरण असमतोल निर्माण झाला. वन्यजीवांच्या संख्येत प्रचंड घट झाली. त्यामुळे शिकारीवर बंदी आली. शिकार हा गुन्हा ठरला . तरीही बेकायदा शिकार होतेच. आदिवासी व ग्रामीण लोकांकडून गरज व आर्थिक स्त्रोत यामुळे शिकार चालूच आहे. सद्यःस्थितीत समाजाची असंवेदनशीलता, प्रशासनांचे दूर्लक्ष, प्रतिष्ठितांचा छंद, इत्यादी कारणांमुळे शिकार केली जाते. आता प्रशासनातील काही संवेदनशील व्यक्तीमुळे, जागृतीमुळे तसेच समाजसेवी संघटनांच्या दबावामुळे शिकारीवरील बंदीबाबत समाज जागृत झाला आहे.

**शिकार करण्याच्या पध्दतीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

पारधी जगण्यासाठी शिकार करायचे. त्यानुसार शिकार व शिकारीच्या पध्दती त्यांना अवगत होत्या. पिंजऱ्यात बकरी ठेवणे, वाघाच्या येण्याजाण्याच्या मार्गावर विष लावलेले काटे किंवा बाण लावणे, हत्तीच्या शिकारीसाठी खड्डा तयार करणे, फासे, जाळे, चित्त्याच्या सहाय्याने, पाळीव काळवीटाच्या, बहिरससाण्याच्या मदतीने शिकार केली जात होती. मगरीची तेलासाठी विशिष्ट दोराच्या सहाय्याने शिकार केली जात होती. पारध्यांच्या शिकारीच्या पध्दतीमुळे शाहुमहाराजांनी त्यांना राजाश्रय दिला होता.

**शिकारीच्या पध्दती :-** "शिकार करण्याच्या विविध परंपरागत पध्दती पारध्यांना अवगत असून त्यापैकी काही खालील प्रमाणे-" [१६८]

**फासे आणि जाळे :-**

शिकारीसाठी जंगलात जातांना फासे, जाळे आणि प्रशिक्षण दिलेली गाय सोबत घेतली जाते. गाईच्या अवतीभोवती चारा टाकला जातो, जेणेकरुन तिथे येणाऱ्या पक्षांना पकडले जाते. पकडलेले पक्षी विकले जातात. याशिवाय लहान पक्षांना पकडण्यासाठी ४ इंच उंचीचे बांबुच्या काड्यांनी तयार केलेले साधारणतः १० ते १५ मीटर लांबीचे जाळे मोकळ्या रानात ज्या ठिकाणी पक्षांचा वावर असतो

तेथे अंथरले जाते. हे जाळे आयताकृती व चौकोनी असते. बांबुच्या काड्यांनी, नायलॉनच्या दोरीने फास तयार केलेले असतात. ते फास एकमेकावर घड्या घालुन छोट्या पेटीच्या आकाराचे होते. पक्षांना अत्यंत कमी जाडीचे नायलॉनचे फास दिसत नाहीत त्यामुळे पक्षी त्यात अडकले जातात.

**चित्त्याच्या सहाय्याने शिकार :-**

पूर्ण वाढ झालेल्या चित्त्याला फासाच्या सहाय्याने पकडले जाते. गळयाला लाकडी पट्टी लावली जाते. एकच व्यक्ती एक महिनाभर त्याला खाद्य देते. उपाशी ठेवून खाद्य दिल्याने चित्ता माणसाळला जातो. त्याला दोरी बांधून गावातुन फिरवतात. ज्यामुळे माणसाच्या सहवासाला तो सरावतो. सोबत चित्ता घेऊन हरणांच्या कळपाजवळ त्याला सोडले जाते. अशा प्रकारे चित्त्याच्या सहाय्याने शिकार मिळवली जाते. काळवीटांचे भांडण चालू असतांना चित्ता काळवीटात घुसून शिकार करतो. जर चित्त्याने शिकार नाही केली तर त्याला दोन दिवस उपाशी ठेवतात आणि शिकारीत चित्त्याला यश आले तर चित्याने पकडलेल्या प्राण्याच्या मानेचे रक्त त्याला प्यायला देतात. शिकारीनंतर पुन्हा त्याला झाकले जाते. पण ही प्रक्रिया इतकी सोपी नसते.

**पाळीव काळवीटाच्या सहाय्याने शिकार :-**

पारधी पाळीव काळवीटाच्या सहाय्यानेही शिकार करतात. १० ते १२ पाळीव काळवीटांना प्रशिक्षण देऊन शिकारीला जाताना त्यांना सोबत घेतले जाते. शिकारीच्या ठिकाणी या काळवीटांना सोडले जाते. जंगलातील इतर काळवीटांबरोबर या काळवीटांचे भांडण सुरु होते. त्याचवेळी पारधी आसपास लपून बसलेले असतात. काही वेळात पारधी समोर जातात. पारध्यांना बघताच पाळीव काळवीट बाजूला होतात. त्याचवेळी भाल्याच्या सहाय्याने पारधी काळवीटाला जखमी करतात. जखमी काळवीट उठून पुन्हा पळू शकत नाही.

**बहीरससाणाः-**

बहीरससाणा स्वतः शिकार करतो. तर तेलासाठी मगरीची शिकार केली जाते.

मगरीच्या शिकारीसाठी प्रथमतः जाळे पाण्यात अंथरले जाते. नंतर पाण्यात अन्न टाकले जाते जे खाण्यासाठी मगर येते व जाळ्यात अडकते. साधारणतः २० ते ३० लोक येऊन मगरीला पाण्याच्या बाहेर काढतात. टोकदार भाल्याच्या सहाय्याने मगरीला ठार मारले जाते. नेहमी पूस (डिसेंबर) माघ (जानेवारी) आणि चैत्र (मार्च) या महिन्यात सुसरीची शिकार केली जाते कारण या महिन्यात मगरी धष्टपूष्ट असतात. मगरीच्या शरीराचे तुकडे करुन ते जाळतात जेणेकरुन त्यातुन तेल गळते ते

बाटलीत भरुन विकतात. संधीवातात व अनैसर्गिक गाठीसाठी औषध म्हणून हे तेल वापरले जाते. पारधी मगरीचे मांस कधीच खात नाहीत.

**४. इतर व्यवसाय :-**

**१ पशुपालन :-** पोटासाठी, निसर्गावर अवलंबुन असणारा, निसर्गातील उपलब्ध वस्तूवर आपली उपजीविका करणारा पारधी समाज आज आर्थिक स्त्रोत म्हणून पशूपालन करतो. पण पशुपालनावर उपजीविका करणाऱ्याची संख्या अगदी थोडी आहे. पारधी जमातीत गाय पवित्र मानली जाते. कुत्रा शिकारीत मदत करतो म्हणून कुत्राही पाळला जातो. पशुपालन केल्याने त्या पशुपासून "दूध, मांस, कातडी, हाडे, केसापासून लोकर इत्यादी उपजीवीकेच्या वस्तू मिळतात म्हणून या प्रकारची अर्थव्यवस्था जवळ-जवळ सर्वच भटक्या जमातीत दिसून येते." [१६९] पारधी जमातही याला अपवाद नाही. सद्य:स्थितीत पारधी शेळया, मेंढया, कोंबड्या, गाई, म्हशी, कुत्रा यांचे पालन करतात. भटकंतीच्या अवस्थेतुन स्थिरावण्यास पशूपालन व्यवसाय कारणीभूत ठरतो. काही जमातीत फक्त गाईचाच वापर ओझे वाहण्यासाठी, एका ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी सामानाची ने-आण करण्यासाठी केला जात असे. पशुपालनामुळे दुध व अंडी यांचा उपयोग नित्य अन्न म्हणून केला जातो. शेतीसाठीही बैल, म्हशींचा वापर केला जातो. देवदेवतांचे नवस फेडण्यासाठीही प्राण्यांचा उपयोग केला जातो. पारध्यांना जंगलातील कुठल्याही प्राण्यांपेक्षा वनगाय हा उपयुक्त प्राणी होता. वनगाय पळण्यामध्ये इतर प्राण्यांना मागे टाकते. वनगाईमुळे पारध्यांना जंगलातल्या अनेक प्राण्यांची शिकार करणे सहजपणे शक्य होते. म्हणूनच कुठल्याही पारध्याच्या पालापुढे वनगाई दिसतात." [१७०]

**२. शेती :-** पारधी समाजाकडे पारंपारिक व्यवसाय उरलेला नाही. तसेच पारंपारिक कसबही नाही. "सर्व साधारणपणे एकूण जमातीपैकी ७०% लोक शेतमजूरी व मोल मजूरी करुन आपला उदरनिर्वाह करतात." [१७१] आज काही गावपारधी गावाजवळ स्थिर वास्तव्य करताना दिसतात. "मात्र २०% पारध्यांकडे शेतजमीनी आहेत." [१७२] त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीचीच आहे. व्यवसायाच्या अनिश्चिततेमुळे आर्थिक स्थिती वाईट आहे.

**३ मद्य विक्रीचा व्यवसाय :-** महाराष्ट्रात बऱ्याच भटक्या विमूक्त जमाती गावठी दारु गाळण्याचा व्यवसाय करतात. पारधी जमातीचे बरेचसे लोकही हा धंदा करतात. देशी दारुपेक्षा गावठी दारु अतिशय कडक, अस्सल व स्वस्त असते. मजूर वर्ग व कामगारांत गावठी दारु लोकप्रिय आहे. पण महाराष्ट्रात दारुबंदी मंत्र्यांनी देशी दारु उत्पादकांच्या दबावामुळे गावठी दारुचे धंदे आदेश देऊन बंद

केले आहेत. आज शिकारही करता येत नाही, दारु गाळता येत नाही, चोरी करता येत नाही, मजूरीने पुरेसे उत्पन्नही मिळत नाही. अशा विचित्र अवस्थेत हा समाज सापडला आहे. अलीकडे पारधी दारु गाळणे, दारुची अवैध ने-आण करणे, पांढरपेशा गुन्हेगारांना सहाय्य करणे अशी कामे करतात.

**५. उपजीविकेची इतर साधने आणि गुन्हेगारीचा उगम :-**

शिकारीचे आणि शिकारीसाठी लागणारी फासे व जाळे तयार करण्याचे कौशल्य पारध्यांमध्ये आहे. विविध पक्षी व प्राण्यांसाठी वेगवेगळी जाळी व फासे तयार करतात. शिकार हाच पारंपारिक व प्रमूख व्यवसाय असल्याने अत्यंत निरीक्षण व अभ्यासपूर्ण असा हा व्यवसाय केला जातो. प्राण्यांच्या सवयी, आवाज काढुन इतर प्राण्यांच्या सहाय्याने शिकार केली जाते. पारधी जमातीत उपजीविकेच्या स्वरुपावरुन इतर उपजमाती तयार झाल्या. "काही पारधी गावात जावून वस्तुंची विक्री करतात. त्याचवेळी चोरीची ठिकाणे शोधली जातात आणि रात्रीच्या वेळी चोरी, दरोडा घातला जातो." [१७३] फिरस्ते पारधी भीक मागतात. वनस्पतीची औषधी करुन विकतात. पारध्यांच्या व्यवसायात बदल होत आहे. "पारधी आज शिकारीसाठी फिरतांना दिसत नाहीत पण सर्रास चोरी करुनही उपजीवीका करतात."[१७४] जंगल संरक्षण, वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे शिकारीचा व्यवसाय पूर्वीप्रमाणे केला जात नाही. त्यामुळे उदरनिर्वाहासाठी चोरी केल्याशिवाय पर्याय उरला नाही. पण चोरी करुन पारध्यांचा आर्थिक दर्जा इतका उंचावला नाही की, ते मोठी घरे, हवेली बांधून राहतात कारण बचतीची सवय नसल्याने पारधी पोटासाठी लागेल एवढेच चोरी करतात. बकरीची चोरी केली जात नाही पण बकरीच्या समुहातून बोकड चोरला जातो. पारधी चोरी करतांनाही स्वतःच्या परंपरांचे, नियमांचे उल्लघंन करीत नाहीत. एखाद्या सुंदर स्त्रीची नथ चोरतांना नाक तोडतील, सोन्याच्या बांगड्या निघत नसतील तर हात तोडतील पण तिची इज्जत घेणार नाहीत". [१७५]

**गुन्ह्याचे स्वरुप व पध्दती :-** व्यावसायिकदृष्ट्या शिकार करणे, जात्याला टाकविणे, घरफोड्या आणि चोऱ्या करणे हेच पारध्यांचे परंपरागत व्यवसाय होते." [१७६] पारध्यांच्या स्त्रियाही चोरी करण्यात सहभागी असतात. "चोरी करण्याचे नियम असतात. हे लोक नियमासाठी कायदा मोडतात चोरी, घरफोडी करताना सुध्दा भगताकडून शुभशकून बघितला जातो. दिवस, वेळ, दिशा पाहून चोरी केली जाते. चोरी, घरफोडी करतांना अत्यंत बेडरपणे दरोडा घातला जातो." [१७७] स्वतःच्या पोलीस स्टेशनची आणि शेजारची हद्द सोडून दूसऱ्या हद्दीत चोरी केली जाते. मोठ्या दरोड्यापासून ते खुन करण्यापयर्तंचा धोका गुन्हेगारीत घेतला जातो. दैनंदिन जीवनात उचलेपणा, खिसे कापणे तसेच

शेतातल्या पिकांच्या चोऱ्या करतात. उभे पीक कापले जाते. शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेली कणसे रातोरात पळवली जातात. गुरे पळवली जातात. "पारधी लोक दरोडे व रस्तालूट मोठ्या व्यवस्थित रीतीने व क्रूरपणे करतात." [१७] चोरलेले दागिने भारी किमतीत विकतात. भोळसट खेडवळाला पोलिस तपास संपेपर्यंत चोरीचे दागिने बाहेर न काढण्याचा सल्ला देतात. कधी कधी सोन्याचे म्हणून खोटे दागिने विकले जातात. चोरीचा माल विकत घेणाऱ्यालाही लुबाडतात. धान्याची चोरी केली तर कणसे कुटून दूसऱ्या धान्यात मिसळतात. जेणे करुन ते ओळखता येत नाही. चोरलेल्या शेळया, मेंढया लगेच मारुन टाकतात. किंवा त्यांना दूर नेऊन विकतात.

**६. साधने :-** पारधी लोक दरोड्याच्या वेळी वेगवेगळ्या हत्यारांचा वापर करतात. चोरी प्रकरणी विरोध करणाऱ्यास हत्याराने इजा केली जाते. प्रसंगी खुनही करतात. काठ्या सुरी, कुऱ्हाडी, जंबिया आपल्या सोबत घेतात. "क्वचित प्रसंगी तलवारी, बंदुका, भालेही असतात. किंकरे कुस (नांगराचा फाळ) कुतुर्न (लाकडी दांडीची लोखंडी मेख) यांनी घरफोडी करतात." [१७९]

**३.७ वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ :-**

वन्य प्राण्यांच्या मोठ्या संख्येने होणाऱ्या हत्यांवर नियंत्रण आणणारा भारतीय स्तरावरील अशा प्रकारचा पहिला कायदा म्हणजे वन्यजीव संरक्षण कायदा-१९७२ होय. "वन्यजीव म्हणजे वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या अनुसूची १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या आणि निसर्गात सापडणाऱ्या रानटी प्राण्याच्या कोणत्याही जाती होत." [१८०] या कायद्याच्या पूर्वी अनेक राज्यात मर्यादित स्वरुपात अशा प्रकारचे अनेक कायदे अस्तित्वात होते. "त्यापैकीच एक म्हणजे मुंबई प्रांतातील १९१२ चा पक्षी व वन्यप्राणी संवर्धन कायदा होय." [१८१] या कायद्याद्वारे जंगलातील पक्षी आणि प्राण्यांची हत्या करण्यावर नियंत्रण घालण्यात आले. १९१२ च्या पूर्वी वन्य प्राण्यांनी मानवी वस्तीत त्रास दिल्यास स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांना (त्यांची शिकार करुन) बंदोबस्त करण्याचा अधिकार भारत सरकारच्या ११ सप्टेंबर १८७१ च्या कायद्यान्वये प्राप्त झाले होते. त्या अंतर्गत अशी शिकार करणाऱ्यांना बक्षीसही दिले जात होते. तसेच वन्य जीवांना जंगल संपत्ती समजुन तिचे संवर्धनही केले जात होते. या कायद्यान्वये प्रामुख्याने काही निवडक वन्यजीवांना संरक्षण प्राप्त झाले. नंतर १९५१ मध्ये मुंबई वन्यजीव व वन्यपक्षी संरक्षण कायदा अस्तित्वात आला. सुरुवातीला हा कायदा मुंबई इलाख्यापूरता मर्यादित होता. मात्र तो १९६१ साली संपूर्ण महाराष्ट्रात लागू केला. या कायद्यान्वये शिकार परवानाधारक व्यक्तिशिवाय इतरांना शिकारीसाठी बंदी होती. तसेच या कायद्यात लहान प्राणी, मादी इत्यादीच्या

शिकारीवर बंदी होती. मनुष्यहानी, पिकांची हानी करणाऱ्या प्राण्यांची शिकार वैध होती. या कायद्यात शिकार करण्याच्या काही प्रकारावर बंदी आली. थोडक्यात वन्यजीव संरक्षण कायदा हा पारधी जमातीचा व्यवसायावर परिणाम करणारा ठरला. या कायद्यामुळे पारध्यांचे परंपरागत जीवन विस्कळीत झाले. इंग्रजांनी हे कायदे करुन जंगलसंपत्तीवरील पारध्यांची मुक्त सत्ता संपूष्टात आणली. इंग्रजांच्या अगोदर जंगल प्रदेशांचे स्वामीत्व हा संघर्षाचा मुद्दा कधीच नव्हता. पारध्यांच्या या स्वायत्त जीवनावर या कायद्याने जबरदस्त आघात केला. या कायद्याद्वारे फासे अथवा जाळे, पिंजरा (आमिष दाखवून) खड्डा करुन शिकार करण्यावर बंदी आली. परिणामी पारध्यांची शिकार बंद झाली. पर्यायाने त्यांच्यापुढे उदरनिर्वाहाचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला. पोट भरण्यासाठी ते चोरी करुन लागले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यांच्यापुढे उदरनिर्वाहाच्या कायम अशा साधनांचा अभाव आहे. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, "देशाच्या आर्थिक विकासाकरिता राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आवश्यक असली तरी ती पुरेशी मात्र निश्चित नाही. राष्ट्रीय उत्पन्नाचा संबंध जोपर्यंत उत्पन्नाच्या न्याय वितरणाशी जोडला जात नाही, तोपर्यंत सर्व विकास हा निरर्थक ठरतो. उत्पन्नाच्या वाढत्या प्रमाणाबरोबर समाजातील दुर्बल घटकांचे जीवनमान जोपर्यंत उंचावणार नाही तोपर्यंत वाढत्या उत्पन्नाच्या प्रमाणास अर्थ प्राप्त होणार नाही. आर्थिक विकासासोबतच सामान्य माणसांचे राहणीमान, आरोग्य, शैक्षणिक विकास यांसह सामाजिक व आर्थिक सेवा सुविधा उपलब्ध होणे, सामूहिक निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग असणे हे झाले तरच खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येईल." [१८२]

**३.८ वनाधिकार - कायदा :-**

"या अधिनियमाला अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगलवासी वन अधिकार मान्यता विधेयक २००६ असे म्हणतात." [१८३] वनामध्ये पिढ्यानुपिढ्या राहणाऱ्या पण ज्यांच्या हक्कांची नोंद होऊ शकली नाही अशा रानांत राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या वनांवरील हक्कांना व वहिवाटीला मान्यता देणेसाठी वरील विधेयक तयार करण्यात आले. वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगल निवासी त्यांच्या वडिलोपार्जित जमिनीवरील व त्यांच्या वस्ती स्थानांवरील वन हक्कांना वसाहत काळात व स्वतंत्र भारतात वनांचे शासकीय एकत्रिकरण करतांना पुरेशी मान्यता न दिल्यामुळे त्यांचेवर अन्याय झालेला आहे. शासकीय हस्तक्षेपामुळे ज्यांना आपले निवासस्थान इतरत्र हलवावे लागले. त्यांच्या असुरक्षिततेवर उपाय करणे आवश्यक झाले आहे. त्यासाठीच देशाला

स्वातंत्र्य  मिळून इतकी वर्ष लोटल्यानंतर २१ डिसेंबर २००६ रोजी या अधिनियमास राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली.

**वन अधिकार धारण करण्याऱ्यांची कर्तव्ये :-**

कोणत्याही वन अधिकाराचे घटक आणि ज्या क्षेत्रात असे धारक आहेत तेथील गांवपातळीवरील संस्थांना खालील अधिकार आहेत.

१. वन्यजीव, वने आणि जैवविविधतेचे रक्षण करणे.

२. जवळची पाणी क्षेत्रे आणि पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राचे पुरेसे संरक्षण होत आहे याची दक्षता घेणे.

३. त्यांच्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसाला धक्का पोचवणाऱ्या विध्वंसक प्रथांपासुन वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व अन्य परंरागत जंगलवासींच्या वसतिस्थानांचे रक्षण होईल याची खबरदारी घेणे."[१८४] भारतीय स्वातंत्र्यानंतरही  पारधी  जमातीची अर्थव्यवस्था ही जंगल व जंगलातील साधनांवर कमी प्रमाणात शेतीवर अवलंबुन आहे.  परिणामी  या सर्वांचा गंभीर  परिणाम त्यांच्या अर्थव्यवस्थेवर झाला आहे.  त्यांच्या मागासलेपणाचे मुख्य कारण म्हणजे दारिद्र्य, पिळवणूक आणि शिक्षणाचा अभाव हे आहेत.  "जमिनी संबंधातील इतर कायद्यांमध्ये सुधारणा करुन सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र ३५ नुसार ज्या ठिकाणी त्यांना अनुसूचित जनजाती म्हणून घोषित केलेले आहे त्या राज्यातील किंवा राज्याच्या क्षेत्रामधील वनात राहणाऱ्या अनुसूचीत जनजातीच्या वनविषयक हक्कांना शासन मान्यता देत आहे." [१८५]   "ज्या-ज्या ठिकाणी हे लोक शासकीय, रिकाम्या जमीनीवर राहतात, शेती करतात त्या जमिनींचे कब्जे, नियमाप्रमाणे त्यांना देऊन त्या जमिनी हस्तांतरीत कराव्यात." [१८६]  शासनाच्या विविध विकास योजना त्यांच्या  सर्वांगिण परिवर्तनासाठी उपकारक आहेत. पण प्रत्यक्षात येणारे अनुभव अपायकारक आहेत.  निरक्षरता, सततची भटकंती, अटकसत्र इ. मुळे मुलभूत हक्कांचे संरक्षण होत नाही.   घटनात्मक तरतुदी, शासकीय योजनांची निश्चित माहिती नसल्याने एकूणच समस्या निर्मितीला आणि मागासलेपणाला ही परिस्थिती कारणीभूत ठरते आहे.

## ३.९   शासकीय योजना :-

**प्रस्तावना :-**

भारताचे मुळ निवासी असुनही दुर्गम स्थानी रहात असल्याने त्यांच्यावर शहरी सभ्यता आणि विकासाचा खुपच कमी प्रभाव पडला आहे.  याच कारणामुळे आदिवासी हे सतत प्रगतीच्या नवीन

संधीपासुन अलिप्त / वंचित राहिले. आणि त्यामुळेच त्यांची एक वेगळी ओळख टिकून राहिली आहे. आजही हा समाज दूर्गमस्थानी शेकडो वर्षापूर्वीची सभ्यता टिकवून पारंपारिक जीवन जगत राहतो. हेच यांच्या अविकसितपणाचे लक्षण सांगता येईल. दळणवळणाच्या साधनांच्या अभावामुळे आजही ते प्रगत संस्कृती पासून अलग आहेत. प्रत्येक जमातीचे राहण्याचे ठिकाण, विशिष्ट भुप्रदेश असल्याने प्रशासनाचे लक्ष यांच्या विकासाकडे गेलेले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र केंद्र सरकारने यांची परिस्थिती आणि अलगता यावर विशेष भर दिला. तेंव्हाच राज्य सरकार आणि इतर संस्थांनीही यांच्या विकासासाठी व सामाजीकरणासाठी जागृत होवून यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरु केले. स्वातंत्र्यापूर्वी भारतीय समाज शेकडो वर्ष परकीय सत्तेच्या अमलाखाली होता. त्यामुळे भारतीय समाजाच्या विकासात सदैव अडथळे निर्माण झाले. शासक स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी सतत संघर्ष करीत होते. रजपूतानाचा यात विशेष उल्लेख करावा लागेल. सध्याचा राजस्थान म्हणजे रजपुताना राज्यात रजपुत राजे नेहमी आपसात लढत. या रजपुत राजांमध्ये आपसातील तह, तडजोड इ. मध्ये स्थानिक आदिवासींचा महत्वाचा सहभाग होता. आदिवासी राजांच्या सैन्याचा एक भाग बनुन होते. रजपुतान्यात राजस्थान मेवाडचा महाराणा प्रताप हा विशेष उल्लेखनीय आहे. बऱ्याचदा वरील घडामोडीमुळे या जमातींना पुन्हा जंगलावर अवलंबून रहावे लागले. जंगलातील या प्रदीर्घ वास्तव्यामुळे आदिवासी विकास प्रक्रियेपासुन दूर राहिले. वनांच्या आश्रयाने राहून आदिवासींनी स्वतःची विशिष्ट प्रशासन व्यवस्था टिकवून ठेवली होती. त्यामुळे आधूनिक प्रशासकीय व्यवस्थेची त्यांना ओळख नव्हती. १८ व्या शतकात इंग्रजांच्या आगमनानेही आदिवासींच्या समस्यात भर पडली. आदिवासींनी इंग्रजांच्या विरुध्द अनेक उठावात सहभाग नोंदवला. या परिस्थितीत बदल करण्यासाठी इंग्रजांनी आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी अधिकारी नेमले. प्रशासकीय अधिकारी आणि समाजशास्त्रज्ञ रसेल, थ्रस्टन, डाल्टन, गेरिसन, गर्डन, हटन यांना सरकारद्वारा वेळो-वेळी नियुक्त केले गेले. यांनी आदिवासी व भारतातील अन्य जातींवर पुस्तके लिहिली आणि त्यांच्या समस्यांवर प्रकाश टाकून सुधारणा सुचवल्या, ज्या कागदावरच राहिल्या. पुन्हा आदिवासींना शोषणापासुन मुक्ती देऊन त्यांची संस्कृती सुरक्षित ठेवण्याच्या हेतुने १८७४ मध्ये ब्रिटीश सरकारने शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट एक्ट लागू केला आणि आदिवासींचे अधिकार सुरक्षित केले. सायमन कमिशननेही आदिवासी क्षेत्रांच्या प्रशासनिक व्यवस्थेचा विस्तृत अभ्यास केला. आदिवासी प्रगत प्रवाहापासुन दूर राहणे योग्य नाही. त्यासाठी त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे. जेणेकरुन ते जागृत होतील आणि प्रगती व विकासाचा विचार करतील या

हेतुने अनेक प्रयत्न झाले पण इंग्रजांचे हे कार्य करण्यामागचा हेतु निव्वळ विकास करणे नव्हता तर धर्मांतर करणे हा होता.

### ३.९.१ आदिवासी कल्याण कार्यक्रम :-

**स्वातंत्र्यपूर्व काळ :-** या काळात देश स्वतंत्र करणे एवढेच उद्दीष्ट असल्याने आदिवासीच्या समस्याकडे विशेष लक्ष दिले गेले नाही. तरीही गांधींच्या प्रेरणेने अनेक समाजसुधारकांनी आदिवासींचे प्रश्न सोडविण्यात हातभार लावला. ब्रिटीशांनी धर्मांतराच्या संकुचित हेतुने केलेले कार्य दिलासा देणारे होते हे नाकारता येत नाही. "१९०३ साली ॲडॅम एबी. यांनी वारल्यांकरिता लहान दवाखाना उघडला होता, १९२३ साली पालघरला ग्रामीण वसतीशाळा सुरु केली होती. इ.स. १९२२ मध्ये कै. ठक्कर बाप्पा यांनी गुजरात मध्ये 'भिल्ल सेवा' ही संस्था स्थापन केली. १९१८ साली काकासाहेब बर्वे व शंकरराव ठकार यांनी खानदेश भिल्ल सेवा मंडळ ही संस्था केली. त्याचबरोबर गोदुताई परुळेकर, कै. भाऊसाहेब हिरे, कै. बाळासाहेब खेर यांचे कार्य उल्लेखनीय आहे." [१८७] अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासी जमातींना सर्वांगिण विकास आणि प्रगत प्रवाहाशी जोडण्याचा प्रयत्न केला गेला. स्वतंत्र भारतासमोर दीर्घकाळ उपेक्षित राहिलेल्या जमातीचे प्रश्न सोडविणे हे मोठे आव्हान होते. त्याकरिता शासकीय व अशासकीय संस्थांची मदत घेण्यात आली. त्यांची शैक्षणिक, आर्थिक आरोग्यविषयक, प्रगती व्हावी यासाठी अनेक कार्यक्रम हाती घेण्यात आले.

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातही आदिवासींची भूमिका महत्वाची राहिली आहे. देशात संविधान लागू झाल्यावरच त्यांची उपेक्षा आणि संपर्क यावर विशेष सुधारात्मक उपाय केले गेले. अनुसूचित जमाती असा त्यांचा उल्लेख घटनेत केला गेला. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंनीही आदिवासींच्या विकासावर अधिक लक्ष दिले आणि १९५२ मध्ये विषद केलेल्या पंचशील सिध्दांतानुसार सामाजिक, आर्थिक विकासाची तसेच सबलीकरणाची प्रत्यक्ष तरतुद केलेली आहे. पंडित नेहरुची पंचशील तत्वे पुढीलप्रमाणे :-

१. आदिवासींना त्यांच्या स्वत:च्या क्षमता आणि प्रगतीनुसार विकासाची संधी मिळावी.
२. आदिवासींच्या जंगल व जमीनीवरील अधिकारांचा आदर केला जावा.
३. प्रशासकीय आणि विकास कामांसाठी आदिवासी गटांनाच प्रशिक्षण दिले जावे.
४. त्यांच्या सामाजिक - सांस्कृतिक संस्थांना बाधा न आणता विकास कामे केली जावीत.
५. आदिवासी विकासाचा निर्देशक पैसा न राहता त्यांच्या जीवनमानाचा दर्जा असावा." [१८८]

कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचे स्वप्न उराशी बाळगुन वाटचाल करणाऱ्या देशाला आदिवासींच्या समस्यांकडे दुर्लक्ष करुन आपली सर्वंकष प्रगती साधणे शक्य होणार नाही. समाजातील एवढा मोठा गट दीर्घकाळ उपेक्षित जीवन जगत आहे. ही स्थिती सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही योग्य नाही. म्हणूनच आदिवासींच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या राज्यात समाजकल्याण विभाग तसेच आदिवासी कल्याण विभागाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. १९५५ मध्ये आदिवासी विकासाच्या हेतुने प्रथमच अनेक विकास कार्यक्रम सुरु केले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९५६-६१) विकास क्षेत्रांचा विस्तार केला गेला. "भारत सरकारद्वारा आदिवासी समस्यांचा अभ्यास करण्यासाठी अनेक समित्या नेमण्यात आल्या. त्यापैकी वेरियर एल्विन समिती (१९६०) , श्री. यु.एन. ढेबर समिती (१९६१), रेणूका रॉय समिती (१९५९), शीलु - आओ समिती (१९६६-१९६९), अप्पु समिती (१९७१), डॉ. एम.सी दुबे समिती (१९७२) बाबा समिती (१९७१-७३) याशिवाय प्रशासकीय सुधारणा संदर्भातही समित्या व उपसमित्या स्थापन केल्या." [१८९]

आदिवासी क्षेत्राचा विकास, अभ्यासाच्या दृष्टीने दोन भागात विभाजीत केला जातो. १) आदिवासी बहुल क्षेत्र २) विखुरलेल्या क्षेत्रातील आदिवासी.

आदिवासी क्षेत्र विकासाचे केंद्र मानुन क्षेत्रिय विकासाला प्राथमिकता दिली गेली. आणि विखूरलेल्या आदिवासी लोकसंख्या क्षेत्रात त्यांच्या कौंटुबिक जीवन स्तर उंचावण्यासाठी व्यक्तीगत लाभार्थ्यांच्या योजना तयार केल्या गेल्या. पाचव्या पंचवार्षिक योजनेपासुन खऱ्या अर्थाने आदिवासींच्या विकासाला सुरुवात झाली.

भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बल घटकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी यासाठी त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणूकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभाग विविध विकासाच्या योजना राबवित आहे.

### ३.९.२ महाराष्ट्र राज्य आणि आदिवासी विकास संकल्पना :-

महाराष्ट्र राज्यात आदिवासींच्या विकासाकरिता आदिवासी कल्याण विभाग तसेच समाजकल्याण विभाग विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्नरत असल्याचे दिसून येते. "१९७२ सालापर्यंत आदिवासी कल्याण हा विभाग समाजकल्याण विभागांर्तगत कार्यरत होता. १९७२ साली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना झाली व १९७३ साली आदिवासी

कल्याण विभाग स्वतंत्र करण्यात आला." [१९०] ज्या गावातील आदिवासी लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या ५० टक्केहून अधिक असेल त्या गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी प्रकल्पामध्ये करण्यात आला आदिवासी विकास कार्याचे स्वरुप केवळ कल्याणकारी न राहता ते विकास योजना असे झाले. समूह विकासाबरोबर क्षेत्रविकास असे नियोजनाचे सुत्र ठरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणेची गरज होती. त्यासाठी आदिवासी विकास विभाग, आदिवासी सहकारी विकास महामंडळ, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अशा वेगवेगळ्या कामांसाठी राज्य पातळीवर प्रशासकीय यंत्रणा निर्माण करण्यात आल्या. यातुनच पुढे प्रादेशिक व जिल्हा कार्यालये निर्माण झाली. व आदिवासी विकासाची स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात आली.

"आदिवासींची सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन १९७५-७६ साली केंद्र सरकारने आदिवासी विकासासाठी एकात्मिक क्षेत्र विकास पध्दतीचा अवलंब करुन आदिवासी उपयोजना तयार करण्याचे मार्गदर्शन राज्य शासनाला दिले." [१९१] त्यानुसार राज्यातील १४ जिल्ह्यातील ७३ तालुक्यातील ६७६७ गावांचा समावेश उपयोजनेत करण्यात आला. याशिवाय ज्या गावांमधील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्क्यापेक्षा किंचीतशी कमी होती त्या गावांचा समावेश अतिरिक्त आदिवासी उपयोजना (ATSP गट/ प्रकल्प) क्षेत्र म्हणून ओळखली जाऊ लागली. राज्य शासनाची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरिक्त आदिवासी उपयोजना प्रकल्प क्षेत्रे आहेत, कालांतराने विखुरलेल्या स्वरुपातील इतर क्षेत्रामधील आदिवासींची संख्या लक्षात घेऊन, तेथील शैक्षणिक संस्थांचा विचार करुन मुंबई, औरंगाबाद, अकोला येथे प्रकल्प मंजूर करण्यात आला." दरम्यानच्या काळात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रालगतच्या प्रदेशातही काही ठिकाणी आदिवासींची वस्ती असल्याचे भारत सरकारच्या लक्षात आले. म्हणून सुमारे १० हजार लोकवस्तीच्या दोन पेक्षा अधिक गांवामध्ये आदिवासीची संख्या ५० टक्क्यांहून अधिक असेल तर अशा गावांचा समावेश सुधारीत क्षेत्र विकास खंडामध्ये (माडा) करण्यात यावा. त्याचप्रमाणे ५ हजार लोकवस्तीच्या २/३ गावात ५० टक्क्याहून अधिक आदिवासींची संख्या असेल तर त्या गावांचा समावेश मिनीमाडा क्षेत्रामध्ये करण्यात यावा. अशा सुचना आहेत. महाराष्ट्रात एकुण ४३ माडा आणि २४ मिनीमाडा क्षेत्रे आहेत. "[१९२]

- **उपयोजनेची उदिष्टे :-**

१) आदिवासींचे शोषण थांबवणे २) त्यांना मुख्य प्रवाहात आणणे ३) दळवळणाची साधने वाढवणे, शैक्षणिक विकास घडविणे, शास्त्रीय उत्पादन पध्दतीची माहिती देणे. ४) आत्मविश्वास निर्माण करणे. ५) किफायतशीर शेतीसाठी उपाययोजना करुन जीवनमान उंचावण. ६) सामाजिक व आर्थिक विकास करणे ७) आदिवासीच्या हितसंबंधाचे संवर्धन करणे." [१९३]

वरील उद्दीष्टे साध्य करण्यासाठी आणि आदिवासींच्या सर्वागीण विकासासाठी आज शासन निरनिराळ्या पातळीवर निरनिराळ्या प्रकारच्या योजना राबवीत आहे. राज्य पातळीवरील योजना, जिल्हा पातळीवरील योजना व मध्यवर्ती शासनाच्या सहाय्याने कार्यान्वित होणाऱ्या या योजनांचा लाभ सुमारे ५० लाख आदिवासींना मिळतो आहे. "महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी (३,०७,७१३ चौ. कि.मी) १६.५ टक्के (५०,७५७ चौ. कि.मी.) क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते." [१९४] आदिवासी उपयोजना तयार करुन राज्य शासनाने महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यातील आदिवासींची प्रगतीची गती वाढविण्याचे मोठे पाऊल उचलले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सावकारी पाशातून दूर करण्यासाठी "महाराष्ट्र जनजाती आर्थिक स्थिती (सुधारणा) १९७६ हा कायदा केला." [१९५] या कायद्याने उपयोजना क्षेत्रातील आदिवासींना पूर्वीच्या ऋणातून मुक्त करण्यात आले. १९७७-१९७८ मध्ये आदिवासींची व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी शासनाने प्रथम २ व नंतर ७ तालुक्यांमध्ये निर्दिष्ट अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन यांची एकाधिकार खरेदी योजना सुरु केली. पण आदिवासी विकासाचा अपेक्षित वेग व परिणामकारकता ७ व्या पंचवार्षिक योजनेपर्यंत विशेष/उल्लेखनीय होऊ शकली नाही. ही परिस्थिती लक्षात घेऊन आदिवासी विकास योजनांची परिणामकारक अंमलबजावणी, सुसूत्रता व सर्वतोपरी बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने आदिवासी विकास विभागातील प्रशासकीय यंत्रणेची जानेवारी १९९२ मध्ये पुनर्रचना करण्यात आली." [१९६] त्यानुसार राज्यात आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य नाशिक यांचे अधिपत्याखाली चार अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर व २४ प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये कार्यरत असुन त्यापैकी ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अत्यंत संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यामध्ये नाशिक, कळवण, तळोदा, डहाणु, जव्हार, धारणी, किनवट, पांढरवडा, गडचिरोली, अहेरी व भामरागड यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विकास विभागातील प्रशासकीय यंत्रणेची रचना खालील प्रमाणे -

मंत्री,
आदिवासी विकास विभाग

↓

राज्यमंत्री
आदिवासी विकास विभाग

↓

प्रधानसचिव
आदिवासी विकास विभाग

↓

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण
संस्था, पुणे

↓

सहआयुक्त,
अनुसूचित जमाती-पडताळणी समिती
(पुणे, नाशिक, नंदुरबार, ठाणे,
औरंगाबाद अमरावती, नागपुर,
गडचिरोली)

(१) व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य आदिवासी
सहकारी विकास महामंडळ
मर्यादित नाशिक

↓

(२) शबरी आदिवासी वित्त
आणि विकास महामंडळ
मर्यादित नाशिक

आयुक्त,
आदिवासी विभाग
महाराष्ट्र राज्य
नाशिक

↓

अपर आयुक्त,(४)
आदिवासी विका,
(नाशिक, ठाणे,
अमरावती, नागपुर )

↓

प्रकल्प अधिकारी,
ए.आ. वि.
प्रकल्प (२४)

१९९३ पर्यंत उपयोजनेचे नियोजन राज्याच्या एकूण नियोजनाचा भाग होता. हे नियोजन विभागाद्वारेच करण्यात येत होते. हे नियोजन वास्तववादी व्हावे म्हणून १९९३-९४ पासून नियोजन प्रक्रियेत आमूलाग्र परिवर्तन करण्यात आले. हे परिवर्तन करण्यापूर्वी राज्य शासनाने "राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि माजी मुख्य सचिव श्री. द. म. सुकथनकर महाराष्ट शासन यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमली होती. या समितीचा मुख्य उद्देश आदिवासी उपयोजनेची मूळ उद्दिष्टे प्रत्यक्षात साध्य होत आहेत की, नाही हे पाहणे हे होते. या समितीने आपला अहवाल १९ जाने.

१९९२ रोजी दिला. अहवालातील शिफारशी स्विकारुन त्यानुसार सन १९९३-९४ पासुन सुधारित आदिवासी उपयोजना लागु करण्यात आल्या आहेत." [१९७] राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यामुळे सदर लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जनतेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन दयावा अशा आशयाची शिफारस सुकथनकर समितीने केली. त्याप्रमाणे टप्प्या-टप्प्याने प्रतिवर्षी नियतव्ययात वाढ होऊन सन २००५-०६ पासून सरासरी ९% नियतव्यय उपलब्ध होत आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय योजना राबविण्यात येत आहेत. सन २००९-१० या आर्थिक वर्षात डिसेंबर २००९ अन्वये आदिवासी उपयोजना जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती अंमलात आली आहे. यानुसार २०१०-११ या आर्थिक वर्षापासून आदिवासी उपयोजनेच्या कार्यपध्दतीत बदल करुन यापुढे वरील बाबतीचे सर्व अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

**आदिवासी उपयोजनातंर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना :-**

"आदिवासी उपयोजने अंतर्गत खालील विकास शीर्षाखाली आदिवासी जनतेकरिता वैयक्तिक लाभाच्या व क्षेत्रविकासाच्या राबविण्यात येणाऱ्या योजना खालील प्रमाणे आहेत." [१९८]

**१) कृषी व संलग्न सेवा :-**

सुकथनकर समितीच्या शिफारशीनुसार आदिवासी कुटुंबाच्या शेतीची उत्पादकता वाढवून त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आदिवासी उप-योजनेच्या माध्यमातून कृषी व संलग्न सेवा या मुख्य शीर्षक योजनेअंतर्गत पीक संवर्धन फलोत्पादन, मृदसंधारण, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्य व्यवसाय, वनविकास, सहकार अशा उपयोजना राबविल्या जातात.

**२) ग्रामीण विकास :-**

ग्रामीण विकास या मुख्य शीर्षकांतर्गत अनेक उपशीर्ष येतात. ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत दारिद्र्यनिर्मूलन करण्यावर भर देण्यात आला आहे. आदिवासी क्षेत्रातील ग्रामीण जनजीवन फुलवण्यासाठी विविध कार्यक्रम राबवले जातात . या कार्यक्रमात आदिवासी हा प्रमुख लाभार्थी आहे. यामध्ये एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना अवर्षण प्रवण क्षेत्र विकास

कार्यक्रम, जमीन सुधारणा कार्यक्रम, सामुहिक विकास, आदर्श गाव योजना इत्यादी योजना व कार्यक्रमांतर्गत अर्थ सहाय्य दिले जाते.

**३) पाटबंधारे व पूर नियंत्रण :-**

जेथे पाटबंधारे प्रकल्पाचा फायदा जास्तीत-जास्त आदिवासींना होतो अशा प्रकल्पांना आदिवासी उपयोजनेतून आदिवासी लाभधारकांच्या प्रमाणानुसार सहाय्य देण्यात येते. यामध्ये मुख्यत्वेकरुन लहान पाटबंधारे तलाव, बंधारे, पाझर तलाव, उपसा जलसिंचन योजना व मालगुजारी तलाव इ. कामे केली जातात. भुविकासाचे कार्यही केले जाते.

**४) विशेष क्षेत्रीय कार्यक्रम :-**

ही योजना आदिम जमातींसाठी विशेष योजना आहे. आदिवासी जमातीपेक्षा आदिम जमाती अत्यंत मागासलेल्या आहेत. आदिम जमातींना जादा व कायमस्वरुपी अनुदाने उपलब्ध करण्याचे राज्य व केंद्र शासनाचे धोरण आहे.

**५) विद्युत विकास :-**

आदिवासी उपयोजनेतील गावांचे विद्युतीकरण हे उद्दिष्ट ठरवून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावांना पाड्यांना, विद्युतपूरवठा करणे, कृषी पंपांना वीजपुरवठा करणे हा महत्वाचा कार्यक्रम आहे.

**६)उद्योग व खनिजे :-**

या योजने अंतर्गत सुशिक्षित बेकारांना बीज भांडवल दिले जाते. जेणेकरुन तो स्वतःचा व्यवसाय सुरु करु शकेल. त्यात रेशीम उद्योग, छोट्या घटकांसाठी कर्ज योजना, आर्थिकदृष्ट्या दूर्बल कारागीरांना सहाय्य करणे इ. यांत समावेश होतो.

**७) वाहतुक व दळणवळण :-**

१९८६ पासून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमात दुर्गम भागातील रस्ते तयार करुन ते मुख्य रस्त्याला जोडणे या कार्यक्रमास प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे. आश्रमशाळेला जोडणारे रस्ते बांधणे, प्राथमिक आरोग्य केंद्राला जोडणारे रस्ते बांधणे इ. चा यांत समावेश होतो.

**८) सामान्य आर्थिक सेवा :-**

स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये बंधारा बांधकाम इत्यादी १ ते २ वर्षात पूर्ण होणारी छोटी कामे केली जातात. आदिवासी विभागात विकासाबरोबरच आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे.

मागासवर्गीयांचे कल्याण साधण्यासाठी आश्रमशाळा, शिष्यवृत्ती देणे, प्रशिक्षण चालविणे, शेती विकासाकरिता विद्यूतपंप, तेलपंप पुरवठा इत्यादी योजना घेण्यात येतात.

**९) सामाजिक व सामुहिक सेवा :-**

या विकास मुख्य शिर्षातंर्गत एकूण १० उपशिर्षाद्वारे सामाजिक व सामुहिक सेवा या कार्यक्रमांची आखणी केली आहे. उदा. सामान्य शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण, आरोग्य सेवा, पाणीपुरवठा, गृहनिर्माण, नगरविकास, कामगार व कामगार कल्याण, समाजकल्याण इ.

**अ) आदिवासी विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक योजना :-**

**शासकीय आश्रमशाळा :-** शिक्षणाच्या माध्यमातून क्षेत्र विकास या प्रक्रियेत आश्रमशाळा ही एक महत्वाची योजना आहे. अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी जमातीच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी सन १९७२-७३ पासून शासनाने निवासी आश्रमशाळा समूह योजना सुरु केले. आदिवासी मुला-मुलींमध्ये शिक्षाची आवड निर्माण करुन शैक्षणिकदृष्ट्या त्यांना सुशिक्षित करणे व त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते.

"महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास विभागाच्या अधिन ५५२ शासकीय आश्रमशाळा आहेत. त्यापैकी प्राथमिक आश्रमशाळा १२८, माध्यमिक आश्रम ४२४ आहे. आश्रम शाळेतील प्रत्येक वर्गात ४० निवासी व १० अनिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो." [१९९] वरील सर्व आश्रमशाळामधील निवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच अनेक सुविधा मोफत पुरविल्या जातात. यापैकीच इंग्रजी माध्यमाच्या शाळा, केंद्र शाळा, कन्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय कार्यरत आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना बक्षीसपर योजना सुरु करण्यात आलेली आहे. तसेच शिष्यवृत्ती योजना, विद्यावेतन दिले जाते.

**अनुदानित आश्रमशाळा योजना :-** महाराष्ट्र राज्यात दुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी मुला-मुलींसाठी महाराष्ट्र शासनाने १९५३-५४ पासून आश्रमशाळा ही योजना सुरु केली आहे. या आश्रमशाळा शासनातर्फे तसेच स्वयंसेवी संस्थातर्फे चालविण्यात येतात.

महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास विभागामार्फत एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा असून त्यापैकी ८९ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळा आहेत व ४६७ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा

आहेत. सन २००३-०४ पासून अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा संलग्न २५ कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालये मंजूर केलेली आहेत. तसेच २००९-१० या शैक्षणिक वर्षासाठी ५० कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालये मंजूर केलेली आहेत. प्रत्येक अनुदानित आश्रमशाळेत एका वर्गात ४० निवासी व १० बहिस्थ आदिवासी विद्यार्थ्यांना मान्यता देण्यात येते. इथे निवासी विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. बहिस्थ विद्यार्थ्यांना फक्त शिक्षण घेता येते.

**शासकीय वसतिगृहे :-** आदिवासी मुला-मुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी या उद्देशाने सदर योजना सुरु करण्यात आलेली आहे. शासकीय वसतिगृहात सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

**रोजगार योजना :-** राज्यातील अनुसूचीत जमातीच्या मुला-मुलींना विविध सुरक्षा दलात नोकरीची संधी उपलब्ध व्हावी यासाठी खालील योजना कार्यान्वित आहेत.

१) पोलिस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षणार्थीना जेवण, राहणे, गणवेश अशा सुविधा मोफत पुरविल्या जातात.

२) मोटार वाहन चालक प्रशिक्षण :- अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने वाहन चालक प्रशिक्षण देण्यात येते.

३) केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट योजना) अर्थसंकल्पात अंतर्भूत नाहीत अशा विकासाच्या दृष्टीने अभिनव स्वरुपाच्या व स्थानिकदृष्ट्या महत्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घकाळ मंजूरीस्तव अडकून पडू नयेत या उद्देशाने स्थानिक पातळीवर योजना मंजूर करुन तातडीने त्यांचा लाभ गरजू आदिवासींना मिळवून देणे हा उद्देश्य यामागे आहे. ज्या योजना आदिवासींच्या शैक्षणिक आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने स्थलकालानुसार राबविणे आवश्यक आहेत अशा स्वरुपाच्या योजनांची, स्थानिक गरजांचे महत्त्व लक्षात घेऊन त्या प्रभावीपणे राबविणे व गरजू आदिवासींना त्यांचा लाभ देणे हा या योजनेचा उद्देश आहे. "आदिवासी व्यक्ती व कुटूंब केंद्रबिंदू मानून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करुन घेणे या दृष्टीकोनातून ही योजना परिणामकारक ठरली आहे." [२००] महाराष्ट्र विविध भागात राहणाऱ्या आजच्या विकासामध्ये तफावत आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्राच्या विकास कार्यक्रमाच्या गरजाही भिन्न आहेत. आदिवासी विकास कार्यक्रमांच्या योजनांमध्ये स्थलकालानुसार लवचिकता व अभिनवता आणणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठीच" न्युक्लिअस

बजेट ही योजना शासनामार्फत सन १९८१-८२ या वर्षापासून राबविली जात आहे." [२०१] सदर योजनेसाठी ४ गट पाडण्यात आले आहेत.

**१)** उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना

**२)** प्रशिक्षणाची योजना

**३)** मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना

**४)** आदिवासी कल्याण योजना

**५)** आदिवासी उपयोजना अंतर्गत रोजगाराभिमूख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण :- या योजने अंतर्गत १२ योजना/ कार्यक्रम समाविष्ट आहेत. त्यामध्ये प्रशिक्षण आश्रमशाळा, महिला सक्षमीकरण, मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवाराला निर्वाह भत्ता देणे इत्यादी.

**ब)"आदिवासी विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याण योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या इतर योजना"** [२०२]

१) **कन्यादान योजना :-**

राज्यातील अनुसूचित जमातीमध्ये विवाहाच्या पध्दतीत भिन्नता दिसून येते. विवाहाच्या प्रथा व त्यावर होणारा खर्च मोठा असतो. विवाह सोहळ्यातील अनुचित प्रथांना आळा घालण्यासाठी आणि सामुहिक विवाह सोहळ्याला प्रोत्साहन देऊन नवदांपत्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी कन्यादान योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्याचा निर्णय सन २००३-०४ पासून झाला आहे.

२) **स्वाभिमान व सबलीकरण योजना :-**

सदर योजना ही वैयक्तिक लाभाची योजना आहे. सन २००४-०५ या वर्षापासून ही योजना सुरु करण्यात आली आहे. दारिद्र्यरेषेखालील भूमीहीन कुटुंबांना उदरनिर्वाहाचे अन्य साधन नसल्याने त्यांना रोजगार हमी योजना / खाजगी व्यक्तीकडे मजूरी करावी लागते. परिणामी त्यांच्या राहणीमानावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यांना कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन आवश्यक आहे. त्याकरिता भूमिहीन आदिवासी कुटुंबाना उत्तम प्रतीची जमीन माफक दाराने उपलब्ध व्हावी म्हणून ५०% अनुदान व ५०% कर्ज या स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेऊन या योजनेला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

३) **ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार एकात्मिक कार्यक्रम :-** "आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्राचा विकास इतर भागांच्या तुलनेने कमी होत आहे. अशा वस्त्या दुर्लक्षित राहिल्या आहेत. अशा या गावांचा मूलभूत सुविधांसाठी शासनाने दलितवस्ती कार्यक्रमांच्या धर्तीवर सन २००४ मध्ये शासनाने ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार एकात्मिक कार्यक्रम या योजनेला मान्यात दिली आहे. त्यानंतर शासनाने २००६-०७ मध्ये ५०% पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या वस्त्या / पाडे / वाड्या तेथील विकासासाठी आवश्यक सामुहिक विकासाच्या सुविधा पुरविण्याची योजना राबविण्याचे धोरण लागू झालेले आहे.

४) **वीजपंप/ तेलपंप :-** आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीचा विकास करण्यासाठी उपलब्ध साधनांचा व उर्जेचा पुरेपूर उपयोग करुन त्याद्वारे जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणून आदिवासीचा आर्थिक विकास साधण्यासाठी १०० टक्के अनुदानावर वीजपंप/ तेलपंप पुरविण्याची योजना शासनाकडून सन-१९७३-७४ पासून राबविण्यात येत आहे.

५) **पी. व्ही. सी. / एच. डी. पी. ई. पाईप पुरवठा :-** ज्यां आदिवासीकडे तेलपंप/वीजपंप आहे अशा शेतकऱ्यांना न्युक्लिअस बजेट योजना अंतर्गत पी.व्ही.सी पाईपचा पुरवठा प्राधान्याने केला जातो. सन २००८ साली पी. व्ही. सी. पाईप ऐवजी एच.डी. पी.ई. पाईप पुरवठा करणे या योजनेस मंजूरी देण्यात आली आहे. आदिवासी शेतकरी हा स्वत: जमीन कसत असला पाहिजे.

### ३.९.३ उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी विकास कार्यक्रम आणि शासकीय योजना :-

उस्मानाबाद जिल्ह्यात आदिवासी विकासाच्या विविध योजना राबविण्यात येतात. मात्र त्या सर्वच जमातीपर्यंत पोहोचतातच असे नाही. घटनेमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान अधिकार मिळण्याचे धोरण आहे. तसेच योजना राबवितांनाही काही तांत्रिक अडचणीमुळे आदिवासी पारधी समाजातील लोकांना लाभ देता आला नाही. यासाठीच "महाराष्ट्र शासन निर्णय ५ मार्च २००७ प्रकल्प कार्यालय औरंगाबाद अंतर्गत पारधी समाजासाठी राबवावयाच्या विविध योजनांसाठी निधी मंजूर करणे असा निर्णय घेण्यात आला." [२०३] मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २० सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या बैठकीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद यांच्या कार्यक्षेत्रातील पारधी समाजातील लोकांना विविध योजनांतर्गत लाभ देण्यासाठी औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद व लातूर या जिल्ह्यातील आदिवासी पारधी

समाजासाठी विविध योजना राबविल्या जातात. आणि त्यासाठीचा खर्च करण्यास शासनाने मजूंरी दिली आहे.

"आदिवासी पारधी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट ) अंतर्गत राबविण्यात येतात. जिल्ह्यातील विविध आदिवासी जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना लाभ देण्यात यावा अशी सुचना आहे. याशिवाय उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी जमातीसाठी अनेक उपक्रम राबविले गेले आहेत." [२०४]

**तक्ता क्र. ३.६**

**उस्मानाबाद जिल्हा उपयोजना क्षेत्रांअंतर्गत व बाह्य आदिवासी लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

| उस्मानाबाद एकूण आदिवासी लोकसंख्या | आदिवासी उपयोजना क्षेत्रातील लोकसंख्या | अति आदिवासी उपयोजना क्षेत्रातील लोकसंख्या | माडा | मिनीमाडा | आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| २७,८५७ | ० | ० | ० | ० | २७,८५७ |

**(संदर्भ :-** वार्षिक आदिवासी उपयोजना २००९-१० महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग पुणे. पृ. ५०१)

उस्मानाबाद जिल्हा आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर असून तांत्रिक अडचणीमुळे या योजनांचा लाभ पारधी समाजातील लोकांना देता आला नाही. म्हणून प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पारधी समाजातील लोकांना विविध योजनेंतर्गत लाभ देण्यासाठी पुरेसा निधी मंजूर करण्यात आला. त्यात पारधी समाजासाठीच्या विविध योजना राबविण्यात येतात.

**तक्ता क्र. ३.७**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील वर्तमान पारधी विशेष योजना दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | योजनांचे नाव | योजनेचा उद्देश | लाभार्थी संख्या | प्रति लाभार्थी खर्च | प्रस्तावित एकूण तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | भूमिहीन पारधी जमातीच्या कुटुंबांना स्वाभिमान /सबलीकरण योजना | भूमिहीन कुटुंबांना या योजनेत २ एकर बागाईत किंवा ४ एकर जिराईत शेतजमीन देणे | १०० | २.०० लाख | २००.० लाख |
| २. | घरकुल योजना | घरे नसलेल्या कुटंबांना स्थैर्यासाठी पक्की घरे बांधून देणे | ५०० | ०.६० लाख | ३००.० लाख |
| ३. | पारधी समाजासाठी शेळी गटाचा पुरवठा करणे. | शेतीला पूरक व्यवसाय म्हणून उत्पन्नाचे साधन म्हणून १० शेळया व १ बोकडाचा गट पुरविणे | २०० | ०.२५ लाख | ५०.० लाख |
| ४. | आदिवासी पारधी शेतकऱ्यांना विहीर, मोटारपंप व पाईपलाईन देणे | कोरडवाहू जमिनीतत शेतीसाठी पुरेसे उत्पन्न होत नसल्याने विहीर खणून त्यावर पंप व पाईपलाईन देणे | ५० | १.०० लाख | ५०.०० लाख |
| ५. | सिंचनासाठी वीजपंप/तेलपंपाचा पुरवठा करणे | ज्या पारधी शेतकऱ्यांजवळ विहीर आहे परंतु विजपंप नाही अशा शेतकऱ्यांना पुरवठा करणे. | विजपंप २५ तेलपंप २५ | ०.३० लाख व ०.१६ लाख | ७.५० लाख व ४.०० लाख |
| ६. | सिंचनासाठी एचडीपीई. पाईपचा पुरवठा करणे | विहीर व पंपधारक पारधी शेतकऱ्यांना आधुनिक व सिंचनसोयीसाठी एचडीपीई पाईप पुरवठा करणे | १०० | ०.२५ लाख | २५.०० लाख |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ७. | दुधाळ जनावरांचा पुरवठा करणे | दुधाळ म्हशींचा पुरवठा करुन त्यांना उत्पन्नाचे साधन मिळवून देणे | १०० | ०.४० लाख | ४०.०० लाख |
| ८. | पिठाची गिरणी शेडसह बसवून देणे | पिठाची गिरणी यंत्र शेडसह बसवून देणे | १०० | १.०० लाख | २५.० लाख |
| ९. | सायकलचा पुरवठा करणे | सुशिक्षित बेरोजगारांना प्रति लाभार्थी १० सायकल देऊन त्या भाड्याने देण्यासाठी उपलब्ध करणे | ३० गट (३०X१०=३०० सायकली) | ०.२० लाख प्रति गट | ६.०० लाख |
| १०. | मळणी यंत्राचा पुरवठा करणे | शेतीचा व्यवसाय करीत असलेल्या पारधी कुटुंबाना मळणी यंत्राचा पुरवठा करणे व त्याचा उत्पन्नाच्या साधनेत वाढ करणे | २५ | ०.४० लाख | १०.०० लाख |
| ११. | स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी किराणा दुकानासाठी अर्थसहाय्य देणे | स्वंयरोजगाराचे एक नवीन साधन म्हणून दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे / किराणा दुकानासाठी सहाय्य करणे | २५ | ०.५० लाख | १२.५० लाख |
| १२. | पारधी महिलांना शिवणयंत्रे पुरविणे | पारधी महिलांना शिवणकलेचे प्रशिक्षण देऊन व्यवसायासाठी शिवणयंत्र पुरविणे | १०० | ५,००० | ५.०० लाख |
| १३. | कृषीनिगडीत शेती अवजारे पुरविणे | पारधी शेतकऱ्यांना कृषीनिगडीत शेती अवजारे पुरविणे | १०० | ६,००० | ६.०० लाख |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १४. | पारधी कुटुंबाना रोजगारासाठी / व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे | व्यवसाय करण्यासाठी रु. २५,०००/- पर्यंत चे अर्थसहाय्य देणे | १०० | ०.२५ | २५.० लाख |
| १५. | कुकुटपालन व्यवसाय | कुकुटपालन व्यवसायासाठी जागा, इमारत, पक्षी खरेदी, पक्षी खाद्य व वैद्यकीय सुविधेसाठी अर्थसहाय्य देणे | २५ | ३.०० लाख | ७५.० लाख |
| १६. | स्टॉल पुरवून व्यवसाय उपलब्ध करुन देणे | जागा, इमारत, टिनचे पत्रे पूरवून व्यवसायासाठी रोजगार उपलब्ध करुन देणे | ५० | १.०० लाख | ५०.० लाख |
| १७. | जागृती मेळावे आयोजित करणे | पारधी समाजामध्ये जागृती करुन शासनाच्या विविध लाभाच्या योजनांची माहिती देण्यासाठी मेळाव्याचे आयोजन करणे | ५० | ०.२५ लाख | १.२५ लाख |
| **एकूण** | | | १७०५ | - | ८९२.२५ लाख |

(**स्त्रोत :-** प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद महाराष्ट्र शासन पारधी विशेष योजना उस्मानाबाद जिल्हा)

उपरोक्त योजना राबवितांना त्या जिल्ह्यातील पारधी समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना लाभ देण्यात येतो. २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकूण आदिवासी लोकसंख्या २८ हजार आहे. तर पारधी लोकसंख्या १५,१५५ इतकी आहे. वरील आकडेवारी प्रमाणे जिल्ह्यातील एकूण आदिवासींच्या ५४% पारधी लोकसंख्या आहे. पारधी विकास योजनेसाठी सन २००६-०७ मध्ये ८९२.२५ लक्ष निधी देण्यात आला . पण शासकीय आकडेवारी संदिग्ध स्वरुपाची आहे.

# संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | Census of India २००१ | - | Primary Census Abstract, Vol. १ Mh. |
| २. | वार्षिक आदिवासी उपयोजना | - | महाराष्ट्र शासन ,आदिवासी विकास विभाग पुणे, (२००९-१०) पृ. क्र. ५०५ |
| ३. | आदिवासी संशोधन पत्रिर्क्ष्इं | - | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, (मार्च १९९८) पृ. क्र. ४१ |
| ४. | डॉ. गारे गोंविद | - | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती- सामाजिक व सांस्कृतिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, द्वि. आ. (२००२) पृ. क्र. ३९ |
| ५. | आदिवासी संशोधन पत्रिका | - | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, Vol. XXI No.२ (Sept.२००७) पृ. क्र. ४५ |
| ६. | रावत हरिकृष्ण | - | समाजशास्त्र विश्वकोश (Encyclopaedia of Sociology) ,रावत पब्लिकेशन्स जयपूर एवं नई दिल्ली, (२००२) पृ. क्र. २४ |
| ७. | अत्रे त्रि.ना. | - | गुन्हेगार जाती, वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग पुणे, (२००९) पृ. क्र. ८६ |
| ८. | Satya. N. Ratha, George Pfeffer, Deepak Kumar Behra | - | Contemporary Society : Tribal studies, concept publishing company (1997) P. 110 |
| ९. | Dr. Jha Arvind Kumar | - | A study of pardhi's struggle for survival vis. A. vis wild life protection Acts (An Anthro-Ecological Study) P. 02 |
| १०. | Sangave Vilas A. | - | Phanse-pardhi of Kolhapur : A Tribe in Transition, Sociological Bulletin, XVI, (Sept. 1967) P. 81 (229) |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | मांडे प्रभाकर | - | उपेक्षित पर्व, परिमल प्रकाशन औरंगाबाद, पृ. क्र. ५२ |
| १२. | Singh K.S. | - | People of india, Mh. Part III Vol. XXX P.1662 |
| १३. | डॉ. गारे गोविंद | - | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, सामाजिक व सांस्कृतिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, द्वि. आ. (२००२) पृ. क्र. १४६ |
| १४. | प्रभूणे गिरीश | - | पारधी, राजहंस प्रकाशन पुणे, (२००६) पृ. क्र. ३७ |
| १५. | Sangave Vilas A. | - | Phanse-pardhi of Kolhapur : A Tribe in Transition, Sociological Bulletin, XVI, (Sept. 1967) P. 82 (230) |
| १६. | पाटील नितीन | - | स्वातंत्र्यातील पारतंत्र्य, चार्वाक प्रकाशन विरार (पूर्व) , (२००४) पृ. क्र. २९ |
| १७. | डॉ. देवगावकर एस. जी. | - | महाराष्ट्रातील जाती जमाती , श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, प्र. आ. (२००९) पृ. क्र. |
| १८. | Enthoven R.E. | - | The Tribes and Castes of Bombay Vol.III - Cosmo. Publications Delhi (1975) , Page No. 170 |
| १९. | Russell R.V. and Hiralal Raibahadur | - | The Tribes and Castes of the central provinces of India Vol. IV - Rajdhani Book Centre Delhi, Page No. 359 |

| | | | |
|---|---|---|---|
| २०. | Singh K.S. | - | People of India - National Series Vol. III - the Scheduled Tribes - Anthropological Survey of India -Oxfod University Press , Page No. 979 |
| २१. | Chhanna S.M. | - | Encyclopaedia of india Tribes and castes, Vol. 17 Cosmo Publication, new delhi, (2004) P. 5299 |
| २२. | Sherring M.A. | - | The Native races of india, Hindu tibes and castes Vol. II Cosmo Publication delhi , india (1974) P. 64 |
| २३. | Enthoven R.E. | - | The Tribes and Castes of Bombay Vol.III - Cosmo. Publications Delhi (1975) , Page No. 170 |
| २४. | Singh K.S. | - | People of India - Maharashtra Part - III Vol. XXX Page No. 770 |
| २५. | Sangave Vilas A. | - | Phanse-pardhi of Kolhapur : A Tribe in Transition, Sociological Bulletin, XVI, (Sept. 1967) P. 81 (230) |
| २६. | Singh K.S. | - | People of India - Maharashtra Part - III Vol. XXX ,Page No. 2770 |
| २७. | पं. जोशी महादेवशास्त्री | - | भारतीय संस्कृतीकोश खंड - ५ वा - भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे पृ.क्र.५२२ |

२८. पाटील पंढरीनाथ - भटके भाईबंद, सुरेश एजन्सी पुणे , प्र. आ. (१९९०) पृ.क्र. ९०

२९. मांडे प्रभाकर - गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद , प्रथम आवृत्ती - (१९८३) पृ.क्र. १४९

३०. तत्रैव - पृ. क्र. १५०

३१. अत्रे त्रि.ना. - गुन्हेगार जाती - वरदा बुक पुणे, प्रथम आवृत्ती (१९११) दुसरे पुनर्मुद्रण (२००९) पृ.क्र. ८६

३२. Sangave Vilas A. - Phanse Paradhis of Kolhapur : A Tribe in Transition - Sociological Bulletin Vol. 16 No. 1 (1967) Page No. 230

३३. Enthoven R.E. - The Tribes and Castes of Bombay Vol.III - Cosmo. Publications Delhi (1975) Page No. 173

३४. चव्हाण रामनाथ - जाती आणि जमाती - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (१९८९) पृ.क्र.१३९

३५. Chhanna S.M. - Encyclopaedia of india Tribes and castes, Vol. 17 Cosmo Publication, new delhi, (2004) P. 5301

| | | | |
|---|---|---|---|
| ३६. | Enthoven R.E. | - | The Tribes and Castes of Bombay Vol.III - Cosmo. Publications Delhi (1975) Page No. 170 |
| ३७. | Russell R.V. and Hiralal Raibahadur | - | The Tribes and Castes of the central provinces of India Vol. IV - Rajdhani Book Centre Delhi- Page No. 360 |
| ३८. | Singh K.S. | - | People of India - Maharashtra Part - III Vol. XXX Page No.1669 |
| ३९. | चव्हाण रामनाथ | - | जाती आणि जमाती , मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (१९८९) पृ.क्र.१४० |
| ४०. | Enthoven R.E. | - | The Tribes and Castes of Bombay Vol.III - Cosmo. Publications Delhi (1975) Page No. 170 |
| ४१. | मांडे प्रभाकर | - | गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद , प्रथम आवृत्ती - (१९८३) पृ.क्र. १४९ |
| ४२. | तत्रैव | - | पृ. क्र. १५० |
| ४३. | Chhanna S.M. | - | Encyclopaedia of india Tribes and castes, Vol. 17 Cosmo Publication, new delhi, 2004 P. 5299 |
| ४४. | तत्रैव | - | पृ. क्र. ५०३१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५. | अत्रे त्रि.ना. | - | गुन्हेगार जाती, वरदा बुक पुणे, प्रथम आवृत्ती (१९११) दुसरे पुनर्मुद्रण (२००९) पृ.क्र. १५६ |
| ४६. | तत्रैव | - | पृ. क्र. १४० |
| ४७. | प्रभूणे गिरीश | - | पारधी, राजहंस प्रकाशन पुणे, (२००६) पृ. क्र. ६२ |
| ४८. | चव्हाण रामनाथ | - | जाती आणि जमाती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (१९८९) पृ.क्र.२३० |
| ४९. | श्री. खरात शंकरराव | - | भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन पुणे, (२००३) पृ. क्र. ०९ |
| ५०. | मांडे प्रभाकर | - | गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ.- (१९८३) पृ.क्र. ३१८ |
| ५१. | माने लक्ष्मण | - | विमुक्तायन - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - प्र. आ. (१९९७) पृ. क्र.१८१ |
| ५२. | मांडे प्रभाकर | - | गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद , प्रथम आवृत्ती - (१९८३) पृ.क्र. २५५ |
| ५३. | संपादक - पवार जयसिंगराव | - | राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, पृ.क्र. १०३ |
| ५४. | मांडे प्रभाकर | - | गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - (१९८३) पृ.क्र. ५६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५५. | माने लक्ष्मण | - | विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.१२३ |
| ५६. | मांडे प्रभाकर | - | गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - (१९८३) पृ.क्र. २५९ |
| ५७. | तत्रैव | - | पृ. क्र. २६० |
| ५८. | माने लक्ष्मण | - | विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.१२४ |
| ५९. | तत्रैव | - | पृ. क्र. १२४ |
| ६०. | प्रा. राठोड मोतीराज | - | एक्स गुन्हेगार जमाती, प्रथम आवृत्ती (डिसेंबर १९८४) पृ.क्र. ४२ |
| ६१. | तत्रैव | - | पृ. क्र. ४४ |
| ६२. | गर्गे स.मा. | - | भारतीय समाज विज्ञान कोश खंड - ०२ समाज विज्ञान मंडळ पुणे, प्र.आ. (१९८६) पृ. क्र. २२३ |
| ६३. | मराठी विश्व कोश खंड ३ ९ | - | महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ मुंबई पृ. क्र. ५८८ |
| ६४. | तत्रैव | - | पृ. क्र. ३०९ |
| ६५. | डॉ. संगवे विलास | - | आदिवासीचे सामाजिक जीवन पॉप्युलर प्रकाशन पुणे, प्र. आ. (१९७२) पृ. क्र. ८६, |

६६. प्रभूणे गिरीश - पारधी, राजहंस प्रकाशन पुणे, (२००६) पृ. क्र. ७

६७ चव्हाण रामनाथ - जाती आणि जमाती , मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (१९८९) पृ.क्र.१४१

६८. Sangave Vilas A. - Phanse Paradhis of Kolhapur : A Tribe in Transition - Sociological Bulletin Vol. 16 No. 1 (1967) Page No. 229

६९. केतकर श्रीधर व्यंकटेश - महाराष्ट्रीय ज्ञानकोश (शरीर खंड) भाग १७ वा महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ पुणे, पृ. क्र. ९२

७०. प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे - तृतीय आवृत्ती (२००३) पृ.क्र. ९२

७१. आदिवासी संशोधन पत्रिका - आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, (सप्टेंबर २००१) पृ. क्र.८०

७२. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे - द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१४७

७३. प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी , कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती (२००३) पृ.क्र. ९५

७४. Singh K.S. - People of India - Maharashtra Part - III Vol. XXX Page 1669

७५. संपादक पं. जोशी महादेवशास्त्री - भारतीय संस्कृतीकोश खंड - ५ वा - भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे पृ.क्र.५२१

७६. Sangave Vilas A. - Phanse Paradhis of Kolhapur : A Tribe in Transition - Sociological Bulletin Vol. 16 No. 1 (1967) Page No. 229

७७. तत्रैव - पृ. क्र. २३०

७८. Enthoven R.E. - The Tribes and Castes of Bombay Vol.III - Cosmo. Publications Delhi (1975) Page No. 170

७९. पं. जोशी महादेवशास्त्री - भारतीय संस्कृतीकोश खंड - ५ वा - भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे पृ.क्र.५२१

८०. तत्रैव - पृ. क्र. ५२१

८१. पाटील पंढरीनाथ - भटके भाई बंद - पृ.क्र. ९५

८२. माने लक्ष्मण - विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.८७

८३. पाटील पंढरीनाथ - भटके भाई बंद - पृ.क्र. ९६

८४. Enthoven R.E. - The Tribes and Castes of Bombay Vol.III - Cosmo. Publications Delhi (1975) Page No. 170

८५. माने लक्ष्मण - विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.८२

८६. Singh K.S. - People of India - Maharashtra Part - III Vol. XXX Page No.1658

८७. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे , द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१४८

८८. डॉ. देवगावकर एस. जी. ि - महाराष्ट्रातील जाती जमाती , श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर प्र. आ. (२००९) पृ. क्र. ३५६

८९. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१४८

९०. नरके हरी - महात्मा फुले गौरव ग्रंथ शासकीय फोटो झिंको मुद्रणालय पुणे (२००६) पृ. क्र. १२९

९१. दैनिक सम्राट - (१ फेब्रुवारी २००७) पृ. क्र. ५

९२. जाधव सुदाम - आदिवासी साहित्य, सुलभा प्रकाशन, औरंगाबाद (१९९९) पृ. क्र. ५७

९३. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे , द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.२४५

९४. गायकवाड प्रदिप - भारताचे संविधान, सहावी मराठी आवृत्ती, (२००६) पृ. क्र. ११

९५. डॉ. गारे गोविंद - आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन औरंगाबाद प्र. आ. (१९९४) पृ.क्र.६६

| | | | |
|---|---|---|---|
| ९६. | माहिती पुस्तिका | - | आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन (२०११) |
| ९७. | डॉ. गारे गोविंद | - | आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन औरंगाबाद प्र. आ. (१९९४) पृ.क्र.७२ |
| ९८. | Desai A.R. | - | Rural Sociology in india, forth edition popular prakshan P. 66 |
| ९९. | प्रा. खडसे भा. की. | - | भारतीय सामाजिक समस्या, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर (१९७८) पृ. क्र. २६४ |
| १००. | विभागीय समाजकल्याण लेखाधिकारी कार्यालय | - | लातूर विभाग, लातूर |
| १०१. | डॉ. गारे गोविंद | - | आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन औरंगाबाद, प्र. आ. (१९९४) पृ.क्र.४७ |
| १०२. | विभागीय समाजकल्याण लेखाधिकारी कार्यालय | - | लातूर विभाग, लातूर |
| १०३. | माहिती पुस्तिका | - | आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन (२०११) पृ. क्र. १४ |
| १०४. | वाघ नलीनी | - | उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक आणि शिक्षण नलीनी प्रकाशन नागपूर प्र. आ. (१९९५) पृ. क्र. ३ |
| १०५. | जोशी महादेव शास्त्री | - | भारतीय संस्कृती कोश खंड ९ भारतीय समाज विज्ञान कोश मंडळ पुणे, प्र. आ. (१९९८) पृ. क्र. ३६८ |

१०६. डॉ. देवगावकर शैलजा , डॉ. देवगावकर श.गो. - आदिवासी विश्‍व आनंद प्रकाशन, नागपुर प्रथम आवृत्ती (२००१) पृ.क्र.१

१०७. हाकारा - आदिवासी संस्कृती व विकास महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे - त्रेमासिक ऑक्टोबर-डिसेंबर (२००९) - पृ.क्र. ५

१०८. कर्वे इरावती - आमची संस्कृती देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स पुणे (२०१०)- पृ.क्र. ०१

१०९. जोशी बी. आर. व इतर - डायमंड सामाजिक ज्ञान कोश खंड १, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, (२००७) पृ. क्र. ५६१

११०. डॉ. गारे गोविंद - भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृति, अमृत प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. (१९९३) पृ.क्र. ९३

१११. प्रा. राठोड मोतीराज - एक्स गुन्हेगार जमाती, मनोज प्रिंटर औरंगाबाद, प्रथम आवृत्ती (डिसेंबर १९८४) पृ.क्र. ०३

११२. पं. जोशी महादेवशास्त्री - भारतीय संस्कृतीकोश खंड - ५ वा, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे पृ.क्र.५२०

११३. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे , द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१४८

११४. डॉ. देवगावकर एस. जी. - महाराष्ट्रातील जाती जमाती , श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, प्र. आ. (२००९) पृ. क्र. ३५८

११५. पाटील पंढरीनाथ - भटके भाईबंद, सुरेश एजन्सी पुणे , प्र. आ. (१९९०) पृ. क्र. ९२

११६. मांडे प्रभाकर - गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद , प्रथम आवृत्ती - (१९८३) पृ.क्र. १५१

११७. Singh K.S. - People of India - Maharashtra Part - III Vol. XXX Page No.1670

११८. डॉ. व्हटकर जयवंत - महाराष्ट्रातील गुन्हेगार - शोध आणि बोध, दिलीपराज प्रकाशन पुणे पृ. क्र. ८७

११९. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१४७

१२०. माने लक्ष्मण - विमुक्तायन - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.७७

१२१. पाटील पंढरीनाथ - भटके भाईबंद, सुरेश एजन्सी पुणे , प्र. आ. (१९९०) पृ. क्र. ९२

१२२. Sangave Vilas A. - Phanse Paradhis of Kolhapur : A Tribe in Transition - Sociological Bulletin Vol. 16 No. 1 (1967) Page No. 233

१२३. प्रभूणे गिरीश - पारधी, राजहंस प्रकाशन पुणे, (२००६) पृ. क्र. ३७

| | | | |
|---|---|---|---|
| १२४. | मांडे प्रभाकर | - | सांकेतिक आणि गुप्त भाषा, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद (१९९५)  पृ. क्र. १६६ |
| १२५. | तत्रैव | - | पृ. क्र. ७० |
| १२६. | तत्रैव | - | पृ. क्र. १२० |
| १२७. | दैनिक लोकसत्ता | - | (१ सप्टेंबर २०१२)  पृ. क्र. ४ |
| १२८. | चव्हाण रामनाथ | - | जाती आणि जमाती - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (१९८९) पृ.क्र.१४३ |
| १२९. | डॉ. गारे गोविंद | - | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे - द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१४७ |
| १३०. | माने लक्ष्मण | - | विमुक्तायन - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमुंबई ,  प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.७९ |
| १३१. | डॉ. गारे गोविंद | - | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे , द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१४७ |
| १३२. | जोशी बी. आर.  व इतर | - | डायमंड, सामाजिक ज्ञान कोश खंड १, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, (२००७) पृ. ५६७ |
| १३३. | डॉ. देवगावकर एस. जी. | - | महाराष्ट्रातील जाती जमाती , श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, प्र. आ. (२००९) पृ. क्र. ३५६ |
| १३४. | Russell R.V.  and Hiralal Raibahadur | - | The Tribes and Castes of the central provinces of India Vol. IV - Rajdhani Book Centre Delhi- Page No. 171 |

१३५. तत्रैव - पृ. क्र. १७२

१३६. जोशी बी. आर. व इतर - डायमंड, सामाजिक ज्ञान कोश खंड १, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, (२००७) पृ. क्र. २२८

१३७. प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी , कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे , तृतीय आवृत्ती (२००३) पृ.क्र. ३६१

१३८. माने लक्ष्मण - विमुक्तायन - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई , प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.७८

१३९. माडिया - आदिवासी विशेषांक, सुरेशचंद्र वारघडे (१९७९) पृ. क्र. ३२

१४०. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१७२

१४१. चव्हाण रामनाथ - जाती आणि जमाती - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (१९८९) पृ.क्र.१४२

१४२. तत्रैव - पृ.क्र.१४२

१४३. माने लक्ष्मण - विमुक्तायन - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.१५६

१४४. Enthoven R.E. - The Tribes and Castes of Bombay Vol.III - Cosmo. Publications Delhi (1975) Page No. 172

| | | | |
|---|---|---|---|
| १४५. | संपादक पं. जोशी महादेवशास्त्री | - | भारतीय संस्कृतीकोश खंड - ५ वा , भारतीय संस्कृतीकोश मंडळ पुणे, पृ.क्र.५२१ |
| १४६. | मांडे प्रभाकर | - | गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - (१९८३) पृ. १५० |
| १४७. | तत्रैव | - | पृ.क्र. १५३ |
| १४८. | डॉ. देवगावकर शैलजा, डॉ. देवगावकर श.गो. | - | आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन नागपुर, प्रथम आवृत्ती (२००१) पृ.क्र.३५६ |
| १४९. | डॉ. गारे गोविंद | - | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१४७ |
| १५०. | Singh K.S. | - | People of India - National Series Vol. III - the Scheduled Tribes - Anthopological Survey of India - Oxfod U'sity Press - Page 140 |
| १५१. | पवार जयसिंगराव | - | राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी कोल्हापूर, (२००७) पृ. क्र. ५०५ |
| १५२. | डॉ. पिंगळे भिमराव | - | वनवासी व उपेक्षित जग, अभिनव जीवन प्रकाशन बीड प्र. आ. (१९९०) पृ. क्र. १५४ |
| १५३. | जाधव सुदाम | - | आदिवासी साहित्य, सुलभा प्रकाशन औरंगाबाद, (१९९९) पृ. क्र. ५५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५४. | Russell R.V. and Hiralal Raibahadur | - | The Tribes and Castes of the central provinces of India Vol. IV - Rajdhani Book Centre Delhi- Page No. 171 |
| १५५. | डॉ. सौ. काळदाते सुधा | - | भारतीय सामाजिक संस्था- पारंपारिक व आधुनिक, परिमल प्रकाशन औरंगाबाद, पृ. क्र. १४० |
| १५६. | पाटील पंढरीनाथ | - | भटके भाईबंद, सुरेश एजन्सी पुणे , प्र. आ. (१९९०) पृ. क्र. ९३ |
| १५७. | डॉ. झारे | - | पारधी विकास आराखडा, टाटा सामाजिक विज्ञान संस्था तुळजापूर, पृ. क्र. ५ |
| १५८. | तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री | - | मराठी विश्वकोश खंड ८ - महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई (१८७९) पृ.क्र. ३५७ |
| १५९. | तत्रैव | - | पृ.क्र. ३५६ |
| १६०. | माने लक्ष्मण | - | विमुक्तायन - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई,प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.७८ |
| १६१. | चव्हाण रामनाथ | - | जाती आणि जमाती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (१९८९) पृ.क्र.१४१ |
| १६२. | माने लक्ष्मण | - | विमुक्तायन - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई,प्रथम आवृत्ती (१९९७) पृ. क्र.७८ |
| १६३. | अत्रे त्रि.ना. | - | गुन्हेगार जाती , वरदा बुक पुणे, प्रथम आवृत्ती (१९११) दुसरे पुनर्मुद्रण (२००९) पृ.क्र. १६४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६४. | पाटील पंढरीनाथ | - | भटके भाईबंद सुरेश एजन्सी पुणे, (१९९०) पृ.क्र. ९४ |
| १६५. | प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ | - | भारतीय आदिवासी , कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे , तृतीय आवृत्ती (२००३) पृ.क्र. २५८ |
| १६६. | डॉ. पिंगळे भिमराव | - | आदिवासी एवं उपेक्षित जन, अनुवाद ए.एच. जमादार, विकास प्रकाशन कानपूर, (१९९६) पृ. क्र. १०८ |
| १६७. | थाडे समिती अहवाल | - | संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग महाराष्ट्र राज्य पुणे, |
| १६८. | Dr. Arvind Kumar Jha | - | A study of pardhi's struggle for survival vis. A. vis wild life protection Acts (An Anthro-Ecological Study) P. 02 |
| १६९. | सौ. तामस्कर नीला | - | सामाजिक मानव शास्त्र, श्रीकृष्ण विठ्ठल गंधे मुद्रणालय नागपूर प्र.आ. (१९७२) पृ. क्र. १११ |
| १७०. | गायकवाड लक्ष्मण | - | वकिल्या पारधी मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई द्वि.आ.(२००६) पृ. क्र. ३३ |
| १७१. | आदिवासी संशोधन पत्रिका | - | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, (सप्टेंबर २००१) पृ. क्र.७८ |
| १७२. | थाडे समिती अहवाल | - | संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग महाराष्ट्र राज्य पुणे, |
| १७३. | Chhanna S.M. | - | Encyclopaedia of india Tribes and castes, Vol. 17 Cosmo Publication, new delhi, 2004 P. 5308 |

१७४. डॉ. पिंगळे भिमराव - आदिवासी एवं उपेक्षित जन, अनुवाद ए.एच. जमादार, विकास प्रकाशन कानपूर, (१९९६) पृ. क्र. २२६

१७५. तत्रैव - पृ. क्र. २२७

१७६. डॉ. देवगावकर एस. जी. - महाराष्ट्रातील जाती जमाती , श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर प्र. आ. (२००९) पृ. क्र. ३५७

१७७. चव्हाण यशंवतराव - कृष्णाकाठ,प्रेस्टिज पब्लिकेशन्स पुणे,(१९८७)

१७८. अत्रे त्रि.ना. - गुन्हेगार जाती, वरदा बुक्स पुणे, प्रथम आवृत्ती (१९११) दुसरे पुनर्मुद्रण (२००९) पृ.क्र. ८९

१७९. तत्रैव - पृ. क्र. ९१

१८०. हाकारा - महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद पुणे, त्रैमासिक ऑक्टोंबर -डिसेंबर (२००९) - पृ.क्र. ३९

१८१. Dr. Jha Arvind Kumar - A study of pardhi's struggle for survival vis. A. vis wild life protection Acts (An Anthro-Ecological Study) P. 02

१८२. Sen A.K. - Poverty, Inequality and unemployment- economic and political weekly, Mumbai (1973) P-12

१८३. हाकारा - महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद पुणे, त्रैमासिक ऑक्टोंबर -डिसेंबर (२००९) - पृ.क्र. ३८

१८४. तत्रैव - पृ. क्र. ४२

१८५. श्री. दिवेकर एम. के. - २००६ च्या अधिनियमानुसार आदिवासी जमीनीविषयक कायदे ,मुकुंद प्रकाशन ठाणे , (२००८) पृ. क्र. ६९

१८६. इदाते भी.रा. - विमुक्त जाती व भटक्या जमाती ,अभ्यास व संशोधन अहवाल, समाज कल्याण विभाग , महाराष्ट्र शासन, (जानेवारी १९९९) पृ. क्र.१४

१८७. प्रा. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी , कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती २००३ पृ.क्र. ३७६

१८८. हाकारा - महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद पुणे, त्रैमासिक ऑक्टोंबर -डिसेंबर (२००९) - पृ.क्र. २३

१८९. डॉ. मेहता प्रकाशचंद्र - आदिवासी संस्कृती एवं प्रथाएँ - डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली , प्रथम संस्करण(२००९) पृ.क्र.४४

१९०. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे , द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.१९

१९१. माहिती पुस्तिका - आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन (२०११-१२) पृ. क्र. ७

१९२. तत्रैव - पृ. क्र. ८

१९३. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.२०

१९४. माहिती पुस्तिका - आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन (२०११-१२) पृ. क्र. ७

| | | | |
|---|---|---|---|
| १९५. | डॉ. गारे गोविंद | - | महाराष्ट्रातील  आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे. द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.२१ |
| १९६. | माहिती पुस्तिका | - | आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन (२०११-१२)   पृ. क्र. ८ |
| १९७. | तत्रैव | - | पृ. क्र. १२ |
| १९८. | तत्रैव | - | पृ. क्र.५५ |
| १९९. | तत्रैव | - | पृ. क्र. १४ |
| २००. | डॉ. गारे गोविंद | - | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे , द्वितीय आवृत्ती (२००९) पृ.क्र.३६ |
| २०१. | माहिती पुस्तिका | - | आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन (२०११-१२)   पृ. क्र. ३८ |
| २०२. | तत्रैव | - | पृ. क्र. ४५ |
| २०३. | महाराष्ट्र शासन निर्णय | - | आदिवासी विकास विभाग, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद. |
| २०४. | पारधी विशेष योजना २००६-२००७ | - | प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद ,महाराष्ट्र शासन (उस्मानाबाद जिल्हा  ) |

### प्रकरण चौथे

# अभ्यास माहितीचे विश्लेषण

**प्रस्तावना :-**

प्रस्तुत प्रकरणात उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षणाद्वारे संकलित करण्यात आलेल्या माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यात आले आहे. या पूर्वीच्या प्रकरणांमध्ये दुय्यम स्त्रोतांच्या आधारे संशोधन अभ्यासकाळात देशातील, राज्यातील,आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील आदिवासी तसेच त्यापैकीच एक असलेल्या पारधी समाजाच्या सर्वांगीण सामाजिक जीवनाचे विवेचन केले आहे पण पारधी समाजाच्या समाजशास्त्रीय अभ्यासासाठी केवळ दुय्यम साहित्य व संदर्भांचा आधार एकांगी ठरेल.

पारधी समाज हा मागासलेला असून तो आर्थिक विवंचनेत जगतो आहे. समाजात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे आणि गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे प्रगतांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे. प्रगती आणि विकासाच्या प्रवाहापासून हा समाज वंचित आणि उपेक्षित आहे. पण याची त्यांना पुरेशी जाणीवही नाही. या परिस्थितीला स्वतः समाज, इतर समाज आणि शासन जबाबदार आहे. पोलिस व समाजाकडून होणारे अत्याचार, दरोडा, चोरी व वाटमारी इत्यादी नियमित घडणाऱ्या घटना यामुळे पारधी जमात ही प्रसारमाध्यमांमध्ये नेहमी चर्चेत असते. म्हणून प्रस्तूत संशोधनासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी जमातीची निवड केली असून त्यांची परंपरागत संस्कृती, इतर समाजाशी आलेल्या संपर्कामुळे झालेला सामाजिक बदल, त्यांचे कौटूंबिक, धार्मिक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन अभ्यासणे व शासन स्तरावर राबविल्या जात असलेल्या विकास योजनांमुळे त्यांच्यात प्रगती व विकासाच्या संदर्भाने झालेल्या बदलांचा आढावा घेणे व उपाय सुचविणे हा या संशोधनाचा मुख्य उद्देश्य आहे. या संशोधन अभ्यासासाठी नमुना निवडपध्दतीने निवडलेल्या जिल्ह्यातील पारधी समाजाच्या निवडक कुटुंबांकडून प्रत्यक्ष भेटीद्वारे अनुसूची तंत्राच्या सहाय्याने माहिती गोळा केली आहे. या सर्वेक्षणाद्वारे प्राथमिक स्त्रोताचा वापर करुन पारधी समाजजीवनाचा अभ्यास केला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील आठ तालुक्यांपैकी उस्मानाबाद, भूम, परंडा, वाशी, कळंब आणि तुळजापूर या सहा तालुक्यांमध्ये पारधी समाजाचे वास्तव्य जास्त प्रमाणात असून जिल्ह्यात एकूण १०५ ठिकाणी पारधी वस्त्या आहेत. 'पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी ही सर्व गावे नमुना गावे म्हणून निवडून या पारधी वस्त्यांमधील एकूण ३८८० कुटुंबापैकी ३०० कुटुंबप्रमुखांची

उत्तरदाता म्हणून निवड केली आहे. नमुना निवडीसाठी सहेतुक नमुना निवड तंत्राचा उपयोग केला आहे. त्यामुळे अधिक लोकसंख्या असलेल्या वस्त्यांना संतुलितपणे न्याय देणे सोयीचे झाले.

सर्वेक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या अनुसूचीचे विविध भाग करुन त्याद्वारे गोळा करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण सारणीरुपात खालीलप्रमाणे मांडले आहे.

**४.१ कौटुंबिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण :-**

व्यक्ती किंवा समुह सामाजिक नितीनियम, धार्मिक रुढी, पंरपरा, निषेधनियम इ. चे पालन करणे आपले कर्तव्य मानते व ते कर्तव्य कौटुंबिक वातावरणात पार पाडले जाते. म्हणून प्रथमतः पारधी समाजाच्या कुटूंब व्यवस्थेचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे आणि या संदर्भाने प्राप्त झालेली अभ्यास माहिती खालीलप्रमाणे -

**तक्ता. क्र. ४.१**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या दर्शविणारा तक्ता**

| **अ. क्र.** | **सदस्य संख्या** | **एकूण** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | २ ते ४ | ८५ | २८.३३ |
| २ | ५ ते ७ | १६२ | ५४.०० |
| ३ | ८ ते १० | ४६ | १५.३३ |
| ४ | १० पेक्षा अधिक | ०७ | ०२.३३ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.१ मध्ये उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्येबद्दलची माहिती दर्शविली आहे. उपरोक्त तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की ०२ ते ०४ सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ८५ (२८.३३%) असून ०५ ते ०७ सदस्य संख्या असणारे १६२(५४%) इतके सर्वाधिक कुटुंब आहेत. ०८ ते १० सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४६ (१५.३३%) इतके आहे. तर १० पेक्षा अधिक सदस्य संख्या फक्त ७ (०२.३३%) कुटुंबात आढळली. या आकडेवारीवरुन पारधी कुटुंबात सदस्य संख्या जास्त आहे हे स्पष्ट होते.

**तक्ता क्र ४.२**
**उत्तरदात्यांची कुटूंब पध्दती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कुटूंब पध्दती | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | संयुक्त | ५८ | १९.३३ |
| २ | विभक्त | २४२ | ८०.६७ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.२ मध्ये उत्तरदात्यांच्या कुटुंब पध्दतीबद्दलची माहिती दर्शविली आहे. कुटुंबपध्दतीचा व्यक्तीच्या संस्कार, जडणघडण व भावनात्मक वाढीवर परिणाम होतो. त्या अनुषंगाने कुटुंबपध्दती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. वरील आकडेवारीच्या आधारे संयुक्त कुटुंबपध्दती असल्याचे प्रमाण ५८ (१९.३३%) असून सुमारे २४२ (८०.६७%) उत्तरदात्यांनी विभक्त कुटूंबपध्दती असल्याचे सांगितले. पारधी जमातीत विविध कारणांमुळे विभक्त कुटुंबपध्दती रुजली असून विवाहानंतर स्वतंत्र संसार थाटणे ही परंपरा आहे.

**तक्ता क्र .४.३**
**उत्तरदात्यांच्या वास्तव्याचा कालावधी दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | वास्तव्याचा कालावधी | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ० ते ५ वर्षापर्यंत | १७ | ०५.६७ |
| २ | ६ ते १० | १४ | ०४.६७ |
| ३ | ११ ते १५ | १६ | ०५.३३ |
| ४ | १५ हुन अधिक वर्षे | २५३ | ८४.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पारधी जमातीच्या वास्तव्याचा कालावधी तक्ता क्रमांक ४.३ मध्ये दर्शविलेल्या आकडेवारीवरुन स्पष्ट होतो. निवडलेल्या उत्तरदात्यांनी दिलेली माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे-

एकाच ठिकाणी ०५ वर्षापर्यंत वास्तव्य करणाऱ्याचे प्रमाण १७ (०५.६७%) असून ०६ ते १० वर्षे एकाच ठिकाणी वास्तव्य करणाऱ्याचे प्रमाण १४ (०४.६७%) एवढे आहे. तर ११ ते १५ वर्षे वास्तव्य करणाऱ्यांचे प्रमाण १६ (०५.३३%) इतके आहे. १५ हून अधिक वर्षे वास्तव्य करणाऱ्यांचे

प्रमाण सर्वाधिक म्हणजे २५३ (८४.३३%) इतके आहे. याबाबत सखोल माहिती घेतली असता असे समजले की दीर्घकाळ एकाच ठिकाणी वास्तव्य असल्यास कूळ कायदा किंवा जमीन हस्तांतरण कायद्यान्वये वास्तव्य करीत असलेली जागा स्वमालकीची होते या अपेक्षेतूनच कालावधी जास्त वर्षाचा सांगितला गेला. तसेच एकाच ठिकाणी वास्तव्य परंतु वर्षातील कांही महिने कामानिमित्त स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. अपवादात्मक ठिकाणी वास्तव्याचा कालावधी दीर्घ होता. पण ती जागा स्वतःच्या मालकीची नसल्याचे समजले. विवाहानंतर मुलगा स्वतंत्र संसार थाटतो. त्यामुळे सामान्यतः एका कुटूंबात पती - पत्नी व त्यांची अविवाहीत मुले असा परिवार असतो. या समाजाने आपले सामाजिक जीवन घडवतांना कुटूंब व्यवस्थेचा आधार घेतल्याचे आढळते. पारधी समाज आजही जुन्या कल्पनांना सोडण्यास तयार नाही. म्हणून हा समाज इतर समाजाच्या तुलनेत मागास आहे.

**तक्ता क्र. ४.४**

**उत्तरदात्यांचे लिंग व वयनिहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | लिंग | २० पर्यंत | २१ ते ३० | ३१ ते ४० | ४१ ते ५० | ५१ ते ६० | ६१ च्या पूढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुरूष | ०१ | ५० | ८२ | ५० | ३८ | ३८ | २५९ |
| २ | स्त्री | ०३ | १० | १३ | ०८ | ०४ | ०३ | ०४१ |
| | एकूण | ०४ | ६० | ९५ | ५८ | ४२ | ४१ | ३०० |
| | **शेकडा प्रमाण** | **१.३३** | **२०** | **३१.६७** | **१९.३३** | **१४.००** | **१३.६७** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्त्यामध्ये एकूण ३०० उत्तरदात्याचे लिंग व वयनिहाय वर्गीकरण दर्शविले आहे. संशोधनासाठी निवडलेले सर्वच उत्तरदाते विवाहित असून उत्तरदात्यामध्ये एकूण २५९ (८६.३३%) एवढे पुरुष असून फक्त ४१ (१३.६७%) इतक्या स्त्रिया आहेत. निरक्षरता, आत्मविश्वासाचा अभाव, पुरुषांची हरकत असणे इ. विविध कारणांमुळे स्त्री उत्तरदात्यांचे प्रमाण कमी आहे. २० वर्षापर्यंत वय असलेले ०४ (१.३३%) उत्तरदाते आहेत, पैकी १ पुरूष आणि ०३ स्त्रिया आहेत. २१ ते ३० या वयोगटातील एकूण ६० (२०%) उत्तरदाते आहेत. त्यापैकी ५० पुरूष आणि १० स्त्रिया आहेत. संशोधनासाठी निवडलेले सर्वच उत्तरदाते विवाहित आहेत. ३० ते ४० या वयोगटातील ९५ (३१.६७%) उत्तरदाते आहेत. या वयोगटातील उत्तरदात्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यापैकी ८२ पुरूष आणि १३ स्त्रिया

आहेत. यावयोगटातील जास्तीत-जास्त पुरूष उत्तरदात्यांनी कुटूंबाची माहिती दिली. जीवनातील अस्थिरतेमुळे बऱ्याचदा परक्या व्यक्तीबरोबर खुलेपणाने संभाषण टाळले जाते. स्त्रिया विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास असमर्थ ठरल्याने पुरूषांनीच पुढाकार घेतल्याचे निदर्शनास आले. ४१ ते ५० या वयोगटातील एकुण ५८ (१९.३३%) उत्तरदाते असून त्यापैकी ५० उत्तरदाते पुरूष आहेत. तर ०८ स्त्रिया आहेत. या वयोगटातील स्त्रियांचे  प्रमाण कमी आहे. ५१ ते ६० या वयोगटातील ४२ (१४ %) उत्तरदाते आहेत.त्यापैकी ३८ पुरूष आणि ०४ स्त्रिया आहेत. ६१ वर्षाच्या पूढील उत्तरदात्याचे प्रमाण ४१ (१३.६७ %) इतके आहे. त्यापैकी ३८ पुरुष उत्तरदाते आहेत. तर ०४ स्त्रिया आहेत. एकूणच प्रत्येक वयोगटात स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. घरातील स्त्रियांना मुलाखत किंवा माहिती देण्यास हरकत घेऊन पुरूषांनी स्वत : माहिती दिली.   पारधी समाज हा अशिक्षित आहे. पुरूष जरी अनेक कारणाने बाहेर असले तरी स्त्रिया इतरांबद्दल संशयीवृत्तीमुळे उत्तरे देण्यास पुरूषांनाच पुढे करतांना आढळल्या. याशिवाय दिलेल्या माहितीचा योग्य वापर होईलच किंवा नाही याबाबत त्यांच्यात साशंकता आढळली.

**तक्ता क्र. ४.५**

**उत्तरदात्यांच्या घरातील सुविधा दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | घरातील सुविधा | आहे | शेकडा प्रमाण | नाही | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | वीज | ९० | ३० | २१० | ७० |
| २ | पिण्याचे पाणी | ७८ | २६ | २२२ | ७४ |
| ३ | स्नानगृह | ८० | २७ | २२० | ७३ |

(संदर्भ-  क्षेत्रीय पाहणी)

एकूण ३०० उत्तरदात्यांकडे घरातील वीज, पिण्याचे पाणी आणि स्नानगृह या सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाहीत या संदर्भाने आकडेवारी वरील तक्ता क्र. ४.५ मध्ये दर्शविली आहे.  या  तक्त्यावरुन असे लक्षात येते की, २१० (७०%)  कुटूंबाकडे वीज नाही. तर ९० (३०%) कुटूंबाकडे वीज आहे. यातिलही अनेकांनी अवैध मार्गाने वीज जोडणी केल्याचे सांगितले.  जीवनाला स्थिरत्व नसल्याने आवश्यक त्या सुखसोयीनी, जीवनावश्यक गरजांनी समृध्द जीवन त्यांच्या वाट्याला आलेच नाही.  त्यांचे वास्तव्य दुर्गम भागात असल्याने व आर्थिक विवंचनेमुळे वैध पध्दतीने वीज जोडणी झाली नाही. परिणामी हा समाज कौटूंबिक सुविधापासून वंचित आहे.

पिण्याच्या पाण्याच्या सोयीसंदर्भाने २२२ (७४%) उत्तरदात्यांकडे पिण्याच्या पाण्याची सोय नाही.  यांची वस्ती स्वतंत्र  असते, पण ही वस्ती गावाजवळ असूनही ७४ % पारधी समाजाला पाण्यासाठी दाहिदिशा भटकंती करत २ ते ७ किलोमीटरचा पायी प्रवास करावा लागतो. ७८ (२६%)

उत्तरदात्यांकडे पाण्याची सोय आहे. पण ते पाण्याची गरज सार्वजनिक ठिकाणाहून (हातपंप, गावातील नळ, वीज पंप इ.) भागवतात असे सांगितले. मिळालेल्या योजना गावकरी स्वतःच्या फायद्यासाठी वापरतात त्यामुळे पाण्याच्या सुविधेपासून वंचित राहण्याची वेळ आल्याचे उत्तरदात्यांनी सांगितले. गावातील किंवा शेतातील पाणी घेतांना अनेक वेळा अडवणूक होते, विरोध होतो. पण जगण्याची ही धडपड पारध्यांना करावी लागते. आजही पाण्यासारख्या मूलभूत गरजेचा प्रश्न पारधी स्वतः किंवा सरकार सोडवू शकले नाहीत हे मागासपणाचे द्योतकच म्हणावे लागेल.

एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी ८० (२७ %) उत्तरदात्यांकडे स्नानगृह आहे. तर २२० (७३%) उत्तरदात्यांकडे स्नानगृह नाही. स्नानासाठी ते तात्पूरत्या आडोशाचा वापर करतात तर लहान मुले ही उघड्यावरच स्नान करतात. अशा स्थितीत स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होतो. सांडपाण्याचा योग्य निचरा न झाल्याने ते पाणी तिथेच डबक्यात साठते. परिणामी आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. या अभ्यासावरुन असे लक्षात येते की हा समाज आवश्यक सुविधांपासून खूप दूर आहे. यांचे जीवन दैनंदिन गरजा भागविण्यातच गुंतले असून ते अनेक समस्यांनी व्यापले आहे.

**तक्ता क्र. ४.६**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्रियांचे निर्णय स्वातंत्र्य दर्शविणारा तक्ता**

| स्त्रियांना निर्णय स्वातंत्र्य आहे का | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| होय | ३१ | १०.३३ |
| नाही | २६९ | ८९.६७ |
| **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

कुटूंबातील स्त्रियांना स्वतंत्रपणे निर्णय घेता येतात का? असा प्रश्न विचारला असता मिळालेली आकडेवारी वरील तक्त्यामध्ये दर्शविली आहे. या प्रश्नाला फक्त ३१ (१०.३३%) उत्तरदात्यांनी होय असे उत्तर दिले. तर २६९ (८९.६७% ) उत्तरदात्यांनी नाही असे उत्तर दिले. ज्यांनी होय असे उत्तर दिले त्यापैकी १० टक्के उत्तरदाते साक्षर होते त्यामुळेच हा फरक दिसून येतो. ज्या उत्तरदात्यांनी नाही (८९.६७%) असे उत्तर दिले त्याची कारणे जाणून घेतली असता पुरूषप्रधान संस्कृतीमुळे असे ११७ (३९%) उत्तरदात्यांनी सांगितले तर ते निर्णय सर्वांच्या हिताचे नसतात असे उत्तर ६७ (२२.३३%) उत्तरदात्यांनी दिले. ८५ (२८.३३%) उत्तरदात्यांनी सांगता येत नाही असे सांगितले. वरील तक्त्यावरुन

असे लक्षात येते की,  निर्णय प्रक्रियेत स्त्रिचा फार कमी प्रमाणात सहभाग आहे. यावरुन कौटुंबिक जीवनात स्त्रीचा  दर्जा दुय्यम आहे हेच सिध्द होते.

**तक्ता ४.७**

**उत्तरदात्यांनी कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया केली आहे का? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १८ | ०६ |
| २ | नाही | २८२ | ९४ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ-  क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.७ मध्ये पारधी समाजातील स्त्रियांच्या कुटूंबनियोजनाबद्दल माहिती दर्शविली आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी फक्त १८ (०६ %) उत्तरदात्यांनी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केल्याचे सांगितले. या उत्तरदात्यांमध्ये  शिक्षित व शहराच्या आसपास राहणाऱ्याचे  प्रमाण जास्त आहे. २८२ (९४ %) उत्तरदात्यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली नाही असे उत्तर दिले.  याचाच अर्थ जीवनातील अस्थिरता, स्थलांतर, भटकंती, गुन्हेगारी, आणि शिक्षणाचा अभाव असल्यामूळे लहान कुटूंबाच्या फायद्याबद्दलचे अज्ञान यांच्यात मोठया प्रमाणात दिसून येते.

**तक्ता क्र. ४.८**

**उत्तरदात्यांचे कुलनिहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कुळाची नावे | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शिंदे | ७० | २३.३३ |
| २ | काळे | १३५ | ४५ |
| ३ | पवार | ७२ | २४ |
| ४ | भोसले | १९ | ६.३३ |
| ५ | चव्हाण | ०४ | १.३३ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ-  क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.८ नुसार असे दिसुन येते की एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी उस्मानाबाद जिल्ह्यात ५ कुळाचे उत्तरदाते राहतात. त्यांची आडनावे हीच त्यांची कुळे आहेत. शिंदे, पवार, काळे, भोसले आणि चव्हाण ही पाच कुळे संशोधनात आढळली असून पारधी कुळ आणि पारधी पोटजाती या वेगवेगळयाआहेत. पारधी पोटजातीत हीच कुळे आढळतात. उस्मानाबाद जिल्ह्यात फासेपारधी / गायपारधी या पोटजातीमध्ये शिंदे, भोसले, पवार, आणि काळे ही आडनावे (कुळे) आढळली. गावपारधीमध्ये चव्हाण हे आडनाव / कुळ आहे अशी माहिती उत्तरदात्यांनी दिली. त्यांनी गाय / फासे पारध्यांनाच मेवाडे असे म्हणतात तर गावपारध्यांना चोरासिया म्हणतात असे सांगितले. काळे आणि पवार ही कुळे गायपारधी आणि गावपारधी दोन्हीमध्ये आहेत अशी माहिती मिळाली.

उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण संशोधन क्षेत्रात ३०० उत्तरदात्यांपैकी ७० (२३.३३%) कुटुंबे ही शिंदे कुळाची आहेत. तर १३५ (४५%) उत्तरदात्यांची कुटुंबे ही काळे कुळाची आहेत. काळे मध्ये झाडीवाले काळे आणि टीनीवाले काळे हे दोन उपकुळे आहेत. त्यांच्या धर्मश्रध्दा आणि रीतीरीवाज वेगवेगळया आहेत अशी माहिती श्री. परमेश्वर काळे यांनी दिली. पवार कुळाचे प्रमाण ७२ (२४%) आहे. पवार मध्येही धारपवार आणि झारोळे पवार अशा दोन उपजाती आहेत. त्यांच्यातही श्रेष्ठ-कनिष्ठता जोपासली जाते अशी माहिती उत्तरदात्यांनी दिली. पारधी जमातीत काळे सर्वश्रेष्ठ तर पवार कनिष्ठ दर्जाचे मानले जातात. तर भोसले फासेपारध्यांमध्ये स्वतःला श्रेष्ठ समजतात. संशोधन क्षेत्रात प्रत्यक्ष चर्चे दरम्यान ही माहिती मिळाली. वरील सर्वेक्षणात भोसले एकूण १९ (६%) तर चव्हाण आडनावाची ४ (१.३३%) कुटूंबे आढळली. यावरुन जिल्ह्यात काळे, पवार आणि शिंदेची कुटूंबे संख्येने जास्त आहेत तर भोसले व चव्हाण आडनावाची कुटूंबे अगदीच कमी आढळली.

**तक्ता क्र. ४.९**

**उत्तरदाते घरी कोणते इंधन वापरतात? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | इंधन | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | लाकूड | २२५ | ७५ |
| २ | रॉकेल | ०४५ | १५ |
| ३ | गॅस | ०३० | १० |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र ४.९ नुसार असे दिसून येते की, एकूण उत्तरदात्यांपैकी २२५ (७५%) जणांनी घरी इंधन म्हणून लाकडाचा वापर करीत असल्याचे सांगितले. या उत्तरदात्यांना लाकूड सहज उपलब्ध होते असेही नाही तर इंधन म्हणून लाकुड / सरपणाच्या शोधात भटकंती करावी लागते. जंगल क्षेत्र कमी झाल्याने आणि कायद्याच्या बंधनामुळे सरपण मिळवण्यासाठी केलेल्या प्रयत्नात मारहाण झाल्याचे उत्तरदात्यांनी सांगितले. रॉकेलचा वापर करणारे ४५ (१५%) उत्तरदाते आहेत. यातील जे शहरात येतात व जातात त्यांनाही प्रयत्न करूनच रॉकेल मिळवावे लागते. शिधापत्रिकेवरून रॉकेल मिळत नाही असेही सांगितले. तर वरील उत्तरदात्यांपैकी जे स्थिर राहून नोकरी किंवा व्यवसाय करीत आहेत असे इंधन म्हणून गॅसचा वापर करणारे ३० (१० %) उत्तरदाते आहेत.

दैनंदिन गरज म्हणून इंधनाची गरज भागवितांना अनेक प्रयत्न करावे लागतात. गरिबी, स्थलांतर यामुळे रॉकेल किंवा गॅस वापरणे परवडत नसल्याचे सांगण्यात आले.

**तक्ता क्र. ४.१०**

**उत्तरदात्यांची मुले रिकाम्या वेळेत काय करतात? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | रिकाम्या वेळेतील काम | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शिकार | ४१ | १३.६७ |
| २ | भिक्षा | २३ | ७.६७ |
| ३ | भटकणे | ७१ | २३.६७ |
| ४ | अभ्यास | ५३ | १७.६७ |
| ५ | कुटूंबातील कामे | १०२ | ३४ |
| ६ | इतर | १० | ३.३३ |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

रिकाम्या वेळेत तुमची मुले काय करतात असे विचारले असता पारंपारिक व्यवसाय म्हणून शिकारीला जातात असे एकूण ४१ (१३.६७%) उत्तरदात्यांनी सांगितले. सुरूवातीपासूनच शिकार करण्याची कला कुटूंबात असल्याने मुलांना शिकार करता येते हे उत्तरअपेक्षित होते. २३ (७.६७%) उत्तरदात्यांची मुले आजही भिक्षा मागतात असे दिसून आले. भिक्षा मागणाऱ्या मुलांचे प्रमाण जरी एकूण उत्तरदात्यांच्या तुलनेत कमी असेल तरी ही बाब नक्कीच चिंताजनक आहे. परिस्थितीला सामोरे जाताना भिक्षा मागणे यात वाईट काहीच नाही असे त्यांना वाटते. वरील उत्तरदात्यांपैकी ७१ (२३.६७%) उत्तरदात्यांची मुले भटकतात. भटकणे याशिवाय मुले काय करणार असा प्रश्न उत्तरदात्यांनी केला. संगोपन किंवा सामाजिकरणांत मुलांनी विनाकारण भटकणे हे घातक व

नुकसानकारक आहे याबाबतचे अज्ञान उत्तरदात्यांमध्ये दिसून आले. तर ५३ (१७.६७%) उत्तरदात्यांनी मुले घरी असतांना त्यांना मिळालेल्या रिकाम्या वेळेत थोडा वेळ तरी अभ्यास करतात असे मत नोंदवले. पारंपारिक जीवन आणि अत्यंत दारिद्र्यामुळे १०२ (३४%) उत्तरदात्यांची मुले कुटूंबातील कामे करतात. यावरून भावी पिढी घडविण्यात कुटूंब व्यवस्था व इतर घटक अपूरे ठरत आहेत. १० (३.३३%) मुले लहान आहेत.

**तक्ता क्र. ४.११**

**उत्तरदात्यांच्या घराजवळ दारुविक्री होते का? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र** | **घराजवळ दारूविक्री केंद्र आहे का?** | **एकूण** | **प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | होय | २५७ | ८५.६७ |
| २ | नाही | ०४३ | १४.३३ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्त्यानुसार, एकूण उत्तरदात्यांपैकी २५७ (८५.६७%) उत्तरदात्यांनी घराजवळ दारूविक्री केली जाते अशी माहिती दिली. तर फक्त ४३ (१४.३३%) उत्तरदात्यांनी घराजवळ किंवा आसपास दारूचे दुकान नाही असे सांगितले. उत्तरदात्यांच्या वस्तीत घराजवळ किंवा आसपास दारूविक्री होण्याचे प्रमाण ८५ टक्के आहे. यावरून जमातीतील व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त असल्याचे लक्षात येते. मद्यप्राशन हे पारधी समाजाच्या कौटूंबिक, सामाजिक जीवनाचा एक भाग असून त्यास धार्मिक मान्यता आहे अशी त्यांची परंपरेने चालत आलेली समजूत आहे. अनेक उत्तरदाते स्वत : घरी दारूविक्री करतात आणि तो त्यांचा व्यवसाय आहे अशी माहिती उत्तरदात्यांनी दिली.

**४.२ वैवाहिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण :-**

पारधी समाजात विवाह संस्थेला महत्वाचे स्थान आहे. समाजपरत्वे विवाहाचे स्वरूप वेगवेगळे आहे. पारध्यांच्या रूढी, परंपरा, रीतिरिवाज ह्या फार पूर्वीपासून चालत आलेल्या आहेत यास आधार म्हणजे त्यांचे विवाहाचे नियम होत. विवाहविधीत हुंड्याशिवाय इतर गोष्टींसाठी फार खर्च केला जात नाही. पारधी विवाहाच्या नियमांचे पालन काटेकोरपणे करतात. एकाच आडनावात विवाह होत नाहीत. दोन वेगळ्या कुळातील व्यक्तीचा विवाह तिसऱ्या कुळातील व्यक्ती लावते. उदा.मुलगा पवार व मुलगी काळे असेल तर चव्हाण कुळातील व्यक्तीकडुन लग्न लावले जाते. विवाह विधीपूर्वी किंवा नंतर

जमातीचा खास असा धार्मिक विधी नाही. पारधी समाज विवाहाकडे धार्मिकदृष्ट्या न पाहता एक बंधन किंवा करार मानतात. असे असले तरी वैवाहिक संबंधाना जपतात. विवाहबाह्य संबंध निषिद्ध मानले जातात. विवाहाच्या वेळी मुलगा आणि मुलगी यांच्याकडुन विवाहपूर्व संबंध नसल्याची कबुली घेतली जाते. दोषी आढळल्यास आर्थिक वाटाघाटी करुन विवाह संबंध जोडले जातात. खोटे बोलल्यास शिकारीत अपयश येते असे मानतात.

पारधी समाजात विवाहासंबंधी स्त्री-पुरुषांना स्वतंत्र निर्णय घेता येतात. वैवाहिक जीवनात स्वतंत्र निर्णय प्रक्रियेमुळे अगदी क्षुल्ल्क कारणामुळेसुद्धा पती-पत्नी जातपंचायतीमध्ये बसलेला आर्थिक दंड देऊन एकमेकांपासून विभक्त होतात .नंतर मात्र कोणतेही विधी न होता पुरुष मानलेल्या पत्नीला त्याच्या घरी घेऊन जातो आणि त्यांचे वैवाहिक जीवन सुरु होते. प्रत्यक्ष क्षेत्रभेटीमध्ये अभ्यास करतांना ज्या स्त्रियांचे पती जेलमध्ये होते त्यांनी दूसरा घरोबा केल्याचे समजले. तर एकाच पुरुषाने ३ वेळा लग्न करुन पून्हा पहिल्या पत्नीसोबत राहतो असे सांगितले.

**विवाह विधी :-**

पारधी समाजात विवाह विधी अत्यंत साधा असतो. विवाह ठरवताना वरपिता वधुचा शोध घेतो. ही बोलणी वधूमुल्यासंदर्भाने असते. प्राचीन काळी हे मुल्य ठरलेले होते. वधूमुल्याच्या प्रथेमुळे मुलीचा बाप आपल्या मुलीचा विवाह अनेकांबरोबर करतो. दुसरा मुलगा पहिल्याला वधूमुल्य देतोआणि पून्हा मुलीच्या बापालाही रक्कम देतो.

फासेपारधी / गायपारधी आणि गावपारधीमध्ये सोयरीक होत नाही. त्यांचे विवाहाचे विधी वेगवेगळे आहेत. फासेपारधी विवाहाच्या आदल्या दिवशी प्रथमता फासे आणि देवाची प्रतिमा यांना टिळा लावतो. दुसऱ्या दिवशी सकाळी वधू-वरांना हळद लावून आंघोळ घालतात आणि संध्याकाळच्या वेळी अक्षता टाकुन जेवण दिले जाते. वधूच्या घरी एक दिवसाआड वार बघून संध्याकाळी विवाह समारंभ पार पडतो. विवाह विधी बद्दल सविस्तर माहिती क्षेत्र भेटीदरम्यान मिळाली. सुरुवातीला मुलगा-मुलगी पसंती कुटुंबाकडुन केली जात होती. हुंड्याची बोलणी होते. लग्नासाठी मूहुर्त बघत नाहीत. पिंपळाची सात पाने एकावर एक बांधतात. त्याला सात दोरे करुन त्या दोऱ्याला कापसाच्या सरकीची बोंडे बांधून मुंडावळे तयार करतात. ते सरकी बांधलेले सात पदर तोंडावर सोडून देवक मांडतात. त्यात चांदीचे नाणे व देवाची प्रतिमा असते. गरम पाण्याने आंघोळ घालतात. बाशिंग शिवलेला माणूस त्यांच्या अंगावर सर्वांसोबत अक्षता टाकतो. वधू-वर नवीन कपडे परिधान करून

देवकाचे दर्शन घेतात. वधूच्या गळ्यात मंगळसुत्र घातले जाते. नवरीच्या घरुन नवरीला उचलुन नेले जाते. नवरीच्या आईने वाळलेले खोबरे हळदीच्या दोऱ्याने गुंडाळुन नवऱ्याकडच्या मंडळीला द्यायचे असते. त्यानंतर देवाला नैवेद्य म्हणून भात तुप देतात. अशा प्रकारे विवाह विधी पार पडतो. जमातीतला अनुभवी आणि ज्याला धार्मिक ज्ञान आहे तोच जमातीचे विधी करतो. पारधी जमातीचा मुख्य विवाहविधी हाच आहे. पारधी समाजात काळे, पवार, आणि शिंदे हे दोन्हीही आडनावे फासेपारधी आणि गावपारधी या दोन्ही पोटजातीत आढळतात. त्याचे कारण म्हणजे त्यांचा एकमेकांशी आलेला संबंध होय. त्यामुळे पवार आणि पवार यांच्यात विवाह होतो. त्यांचे देवक वेगळे असते. एका पवार पोटजातीचे देवक इखोत आहे. इखोत म्हणजे अरबई देवी म्हणजेच अराई देवक होय. ते मासे खातात. दुसऱ्या पवार या पोटजातीचे देवक कोरब आहे. कोरब म्हणजे रुचकीच्या झाडापासुन निर्मिती असे मानतात. हे पवार मासे खात नाहीत तर मासे देव मानून त्यांची पूजा करतात.

**विवाह विधीचे बदलते स्वरुप :-**

पारधी समाजाच्या अनेक प्रथा-परंपरा ज्या खास जमातीच्या आहेत त्यांचे आजही पालन केले जाते. पारधी समाजातील कांही व्यक्ती सुशिक्षित झाल्याने त्यांनी हिंदु समाजाच्या संपर्कामुळे हिंदु विवाह पध्दतीतील कांही नवीन रिवाज उदा. लग्नात मंगलाष्टके म्हणण्यासाठी ब्राम्हणाची उपस्थिती, वाजंत्री, मंडप इत्यादी स्विकारल्या आहेत. द्येजच्या स्वरुपात बदल झाला आहे. पण हा बदल सार्वत्रिक नसून अत्यंत मर्यादित आहे. आजही विवाहविधीत भोजनानंतर दारु दिली जाते. भोजन मांसाहारी आणि शाकाहारी दोन्ही प्रकारचे असु शकते. पारधी जमात ही शिकारीसाठी भटकणारी जमाती असल्याने या जमातीचे खास असे पारंपारिक नृत्य नाही. हलगीच्या ठेक्यावर ताल धरला जातो. त्यात स्त्री, पुरुष व मुले सहभागी होतात. सद्यःस्थितीत बँड, स्पिकर लावला जातो. बँडच्या तालावर स्त्री-पुरूष नृत्य करतात . पुर्वीच्या काळी या समाजात विवाहाची वेळ, स्थळ, आहेर, नवीन कपडे, अलंकार यांना महत्त्व नव्हते. पण या गोष्टींचा आज काही प्रमाणात पारधी विवाह प्रथेत प्रवेश झाला आहे असे सांगण्यात आले. बोहले तयार करून दोन्ही घरची आडनावे लिहिली जातात. वधू - वरांसाठी नवीन कपड्याची खरेदी केली जाते. बाजारपेठेत मिळणारे मुंडावळे घेतले जाते. आप्त स्वकीयांना निमंत्रणे देवून विवाहाचा विधी एक आनंद सोहळा म्हणून साजरा केला जातो.

एकंदरीत पारधी जमातीतील विवाहपध्दतीच्या अभ्यासावरून या समाजाने आपले विवाहविषयक नियम, प्रथा, पंरपरा यांना जशाच्या तशा स्वरूपात एका पिढीकडून दूसऱ्या पिढीकडे

सोपविलेले दिसते. त्यांची ही विवाहाची पध्दत अत्यंत साधी असली तरी पाहूणचारातील मांसाहार आणि दारूचा आस्वाद स्त्री - पूरूष आणि मुलेही घेतात. त्यांची ही प्रथा त्यांच्या आरोग्यास घातक आहे. आजच्या स्थितीत हिंदुंच्या विवाहाच्या काही प्रथा स्विकारल्या असल्या तरी प्रथमतः जमातीच्या पारंपारिक पध्दतीनेच विवाह विधी होतो आणि मग दुसऱ्या दिवशी हिंदु प्रथेप्रमाणे विवाह विधी होतो. सद्यःस्थितीत कांही बदल अनुकरणाने स्वीकारलेले असले तरी प्रथम पारंपारिक पध्दतीने विवाह करून आधूनिक जगात आपली संस्कृती जपण्याचे काम समाज करीत असल्याचे निदर्शनास आले.

**तक्ता क्र. ४.१२**

**उत्तरदात्यांचे वयोगटनिहाय विवाहावेळचे वय यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | लिंग | १० ते १४ | १५ ते १८ | १९ ते २५ | २५ च्या पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुरूष | ०३ | १९८ | ५६ | ०२ | २५९ |
| २ | स्त्रिया | १२ | १९ | १० | - | ०४१ |
| | एकूण | १५ | २१७ | ६६ | ०२ | ३०० |
| | **प्रमाण** | **०५** | **७२.३३** | **२२** | **०.६७** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.१२ नुसार असे दिसून येते की, पारधी समाजातील व्यक्तीला स्वतःच्या विवाहवयाबाबत निश्चित माहिती नाही हे या ठिकाणी निदर्शनास आले. सततची भटकंती , कैद, स्थलांतर यामुळे वार, तारीख, महिना याचा संबंधच आला नाही. त्यातच शिक्षण, शाळा किंवा इतर निश्चित काम नसल्याने नुकतेच वयात आलेली मुले - मुली यांचा विवाह करून दिला जात असे. आपला विवाह वयाच्या कोणत्या वर्षी झाला? असे विचारुन त्यांची वैवाहिक वयाबद्दल माहिती जाणून घेतली असता १० ते १४ वयोगटात विवाह झाला असे सांगणारे एकूण १५ (५%) उत्तरदाते आहेत. त्यापैकी ३ पुरुष आणि १२ स्त्रिया आहेत. इथे अगदी लहान वयात विवाह झालेल्या स्त्री उत्तरदात्यांची संख्या अधिक आहे. १५ ते १८ वयोगटात विवाह झाला असे एकूण २१७ (७२.३३%) उत्तरदात्यांनी सांगितले. त्यात १९८ पुरूष तर १९ स्त्री उत्तरदात्या आहेत. यावरून असे लक्षात येते की , पारधी जमातीत १८ वर्षाच्या आत विवाह करण्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे. कमी विवाहवयाची कारणे जाणली असता कायद्याविषयी अज्ञान, संपर्काचा अभाव, चारित्र्य संवर्धन, अंधश्रध्दा अशी कारणे उत्तरदात्यांनी सांगितली. १९ ते २५ वयोगटात लग्न झाले असे एकूण ६६ (२२%) उत्तरदात्यांनी सांगितले त्यापैकी ५६ पूरूष आहेत. तर

१० स्त्री उत्तरदाते आहेत. त्यापैकी काहींनी शिक्षण घेतले आहे व ते नोकरी व्यवसायासाठी शहराच्या आसपास राहतात असे निदर्शनास आले. २५ वर्षाच्या पुढे विवाह झाला असे फक्त २ (०.६७%) उत्तरदात्यांनी सांगितले. त्यापैकी दोन्हीही पुरूष आहेत. उत्तरदात्यांच्या विवाहवयानुसार निदर्शनास येते की मुलीचा विवाह लवकर केला जातो आणि बालविवाह घडून आल्याचे प्रमाण जास्त आहे.

**तक्ता क्र. ४.१३**

**उत्तरदात्यांचा लिंगनिहाय वैवाहिक दर्जा दर्शविणारा तक्ता**

| लिंग | विवाहीत | अविवाहीत | विधवा | विधूर | परित्यक्ता | घटस्फोटीत | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरूष | २५७ | - | - | ०२ | - | - | २५९ |
| स्त्रिया | ०२७ | - | ११ | - | ०३ | - | ४१ |
| एकूण | २८४ | - | ११ | ०२ | ०३ | - | ३०० |
| **शेकडा** | **९४.६७** | **-** | **३.६७** | **०.६७** | **०१** | **-** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.१३ मध्ये उत्तरदात्यांचा लिंगनिहाय वैवाहिक दर्जा दर्शविला आहे. त्यानुसार असे आढळून येते की, एकुण उत्तरदात्यांपैकी २८४ (९४.६७%) उत्तरदाते हे विवाहीत आहेत. त्यापैकी २५७ (८५%)पूरूष आहेत. तर २७ (९%) स्त्रिया आहेत. एकही उत्तरदाता अविवाहीत नाही. विवाहीत व्यक्ती आपल्या कुटुंबाचा सामाजिक दर्जा, आर्थिक स्थिती, रीतीरिवाज, परंपरा, विवाह पध्दती याविषयी अधिक चांगल्या प्रकारे माहिती सांगू शकतात. म्हणून समाजाच्या सर्वांगीण आकलनासाठी विवाहीत उत्तरदात्यांची निवड करण्यात आली होती. उत्तरदात्यांमध्ये एकूण विधवांची संख्या ११ (३.६७%) इतकी आहे. येथे विधवांची संख्या जरी ११ असली तरी त्याचा अर्थ पारधी समाजात विधवांची समस्या मोठया प्रमाणावर आहे असे नाही, तर वरील ११ विधवा स्त्रियांपैकी काही विधवा या वयस्कर आहेत तर कांही नुकत्याच विधवा झाल्याचे समजले. गून्हेगारी, दरोडा, जमातींतर्गत वैरभाव यातुन पुरूषांच्या हत्या होतात असे समजले. एकुण उत्तरदात्यांपैकी विधूरांची संख्या फक्त २ आहे. व हे विधूर वयस्कर आहेत. पारधी जमातीत पुनर्विवाह करता येतो. त्यामुळे विधूरांची संख्या जास्त नाही. ३ (०१%) स्त्रिया परित्यक्ता आहेत. संशय, भांडण यामुळे या स्त्रिया पतीपासून विभक्त आहेत. एकूण उत्तरदात्यांपैकी एकही घटस्फोटीत नाही.

**तक्ता क्र. ४.१४**

**पारधी जमातीत प्रचलित विवाह प्रकारासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवाह प्रकार | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एक विवाह | ५७ | १९ |
| २ | बहुविवाह | २४३ | ८१ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

संशोधनादरम्यान उत्तरदात्यांना जमातीतील प्रचलित विवाह प्रकार कोणता असा प्रश्न विचारून त्यांच्या वैवाहिक जीवनाबद्दलची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. वरील प्रश्नाबरोबरच इतर उपप्रश्न विचारून उत्तरदात्याच्या विवाहाचा प्रकार जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तक्ता क्र. ४.१४ अनुसार जमातीत एकविवाह प्रचलित आहे असे एकूण ५७ (१९%) उत्तरदात्यांनी सांगितले तर २४३ (८१%) उत्तरदात्यांनी बहुविवाह होतात अशी माहिती दिली. बहुविवाहात बहुपत्नी विवाह जास्त प्रचलित असून बहुपति विवाहाचे एकही उदाहरण आढळले नाही. संशोधनादरम्यान एकूण ३००उत्तरदात्यांपैकी १८६ (६२%) उत्तरदाते हे एकविवाहीत आहेत.तर १२ (४%) द्विभार्या असलेले उत्तरदाते आहेत. सरमकुंडी वस्ती ता. वाशी येथील देवराव काळे यांना एकूण ७ पत्नी असून वस्तीतील १४ घरे ही त्यांचीच आहेत अशी माहिती त्यांनी दिली. १०२(३४%) उत्तरदात्यांपैकी ११ विधवा, २ विधूर ३ परित्यक्ता स्त्रिया आणि ८६ बहुपत्नीविवाहीतआहेत. पण बहुपती प्रथा मात्र पारधी समाजात अजिबात आढळली नाही. पारधी समाजात बहुपत्नीविवाह प्रथेची अनेक कारणे आहेत. वधूमूल्य देण्याची ऐपत असल्याने बहुपत्नी विवाहात कोणताही अडथळा येत नाही. ते सहज मान्य केले जाते व पसंतीला प्राधान्य दिले जाते. पतीने परस्त्रीशी संबंध ठेवण्यापेक्षा तिच्याशी विवाह करणे पत्नीला योग्य वाटते. एकत्र राहण्यात सातत्य नसल्याने अनेक स्त्रियांशी विवाह केला जातो. सुडभावना किंवा वैरभावनेनेही अनेक स्त्रियांशी विवाह केला जातो. अशी अनेक कारणे उत्तरदात्यांनी सांगितली.

कांही ठिकाणी पतीला कैद झाल्यामुळे स्त्रीला एकटे राहणे अशक्य होते. तसेच इतरांकडून फसवणूक होवू नये म्हणून जमातीतील दुसऱ्या व्यक्तीशी पत्नीने दुसरा विवाह केला आणि पतीची सुटका झाल्यानंतर त्यानेही दुसऱ्या स्त्रीशी विवाह केला, तसेच संशयामुळे पतीने दुसऱ्या स्त्रीशी विवाह केला असे सांगण्यात आले. स्त्रीची कौटुंबिक, वैवाहिक जीवन जगताना होणारी फरफट वेदनादायी

आहे. पारधी समाजात घरजावई प्रथा नाही. संशोधनादरम्यान घरजावई प्रथेबद्दल उत्तरदात्यांना विचारले असता ३०० पैकी एका उत्तरदात्याने घरजावई म्हणून राहतो अशी माहिती दिली. त्यांच्या मूळ वस्तीतल्या भांडणामुळे त्याने कांही दिवस इथे राहण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.

सर्वेक्षणातील उत्तरदात्यांमध्ये वैवाहिक जीवनातील अस्थिरतेचे प्रमाण अधिक आहे. वैवाहिक जीवनातील ही अस्थिरता मुलांच्या सामाजिकरणात अडथळा आहे. याबाबत त्याच्याकडे पूर्ण अज्ञान आहे. मुलांची जबाबदारी पत्नीच घेते किंवा अपत्य एकच असेल तर मुलीची आईच त्यांचा सांभाळ करते. असे सर्वेक्षणादरम्यान आढळून आले. कौटुंबिक जीवनातील या अस्थिरतेमुळे मुलांचे पालनपोषण, संगोपन, सामाजिकरण आणि त्यांचा भविष्यकाळ याचा फारसा विचार होतांना दिसत नाही. जे उत्तरदात्ते सुशिक्षित आहेत ते मुलांच्या भविष्यकाळाबद्दल काळजी घेतांना आढळले.

**तक्ता क्र. ४.१५**

**उत्तरदात्यांचे विवाहाबद्दलचे मत दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | मत | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बंधन | २०९ | ६९.६७ |
| २ | करार | ८७ | २९.०० |
| ३ | संस्कार | ०४ | ०१.३३ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.१५ मध्ये विवाहाबद्दलचे उत्तरदात्याचे मत आकडेवारीने दर्शविले आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी २०९ (६९.६७ %) उत्तरदात्यांनी विवाह म्हणजे बंधन आहे व त्यामुळे मानवी जीवन स्थिर व सुरक्षित आहे असे मत नोंदवले. विवाहाला करार मानणारे एकूण ८७ (२९%) उत्तरदाते आहेत. त्यांच्या मते विवाहप्रसंगी देणे-घेणे बाबत प्रत्येक समाजात आर्थिक स्वरुपाची बोलणी होते. त्यात समझोता नाही झाला तर करार मोडतो. लग्नानंतरही द्येजासाठी भांडणे होऊन विवाह मोडतात म्हणून विवाह हा करार आहे असे मत नोंदविले. तर ०४ (१.३३%) उत्तरदाते विवाहास संस्कार मानतात. अन्याय, अत्याचार, गुन्हेगारी इ. मुळे जीवनातील या महत्वाच्या संस्थेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन उदासीन झाला असावा. त्यामुळे विवाहाला बंधन आणि करार म्हणणाऱ्यांची संख्या अधिक आढळते.

**तक्ता क्र. ४.१६**

**पारधी जमातीत विवाहवयात झालेल्या वाढीचे कारण दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कारण | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण | ८१ | २७ |
| २ | बालविवाहाचे दुष्परिणाम | ०९ | ०३ |
| ३ | कायद्याचे बंधन | ८८ | २९.३३ |
| ४ | प्रगतांचा संपर्क | १२२ | ४०.६७ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्यांना सद्यस्थितीत विवाह वयात वाढ झाली आहे का असा प्रश्न विचारला असता सर्वच उत्तरदात्यांनी होय असे सांगितले. विवाह वयात वाढ होण्याची कारणे विचारली असता शिक्षणामुळे विवाहवयात वाढ झाल्याचे ८१ (२७%) उत्तरदात्यांनी सांगितले तर ०९ (३%) उत्तरदात्यांनी लहान वयात लग्न केल्यास त्याचे दुष्परिणाम होतात असे मत नोंदवले. कायद्याचे बंधन किंवा भिती हे विवाहवय वाढीचे कारण ८८ (२९.३३%) उत्तरदात्यांनी सांगितले. लहान वयात लग्न करणे कायदाविरोधी आहे, याबद्दलची जाण त्यांच्यात दिसून आली. तर सर्वात जास्त उत्तरदात्यांनी म्हणजे १२२ (४०.६७%) जणांनी प्रगतांचा संपर्क हेच विवाहवयातील वाढीचे कारण सांगितले. प्रसार माध्यमे किंवा कार्यक्रम ज्याद्वारे मार्गदर्शन झाले आणि विवाहवयात वाढ झाली असे उत्तर मिळाले नाही. विवाहयोग्य वयातील मुलींच्या बाबतीत त्यांचा विवाह लवकर होणे समाजासाठी योग्य ठरते. सुरूवातीच्या काळापेक्षा सध्या विवाहवयात नक्कीच वाढ झाली आहे. पण मुलींच्या विवाहवयातील वाढ जास्त नसल्याचे संशोधन करतांना निदर्शनास आले.

**हुंडा प्रथा :-**

पारधी विवाहाचे स्वरूप पारंपारिक असले तरी आर्थिकदृष्ट्या विवाहाचा होणारा खर्च म्हणून हुंडा घेण्याचा अलिखीत नियम इतर समाजाप्रमाणे पारधी समाजातही आहे. कायद्याप्रमाणे शारिरीक, धार्मिक व नैतिक संबंध निश्चित करणे हा विवाहाचा प्रधान उद्देश मानला जातो. या समाजात हुंड्याची प्रथा असून विवाह ठरल्यानंतर ज्या बोलणी होतात त्या हुंड्यासंदर्भानेच असतात. पारधी समाजात हुंड्याला 'द्येज' असे म्हणतात. द्येजची बोलणी झाल्यानंतरच विवाह निश्चित होतो. सर्वेक्षणात, पारधी

समाजात हुंडा प्रथा आहे असे सर्वच उत्तरदात्यांनी सांगितले. कालपरत्वे व परिस्थितीनुसार ही रक्कम बदलत आहे. सुरूवातीला मुलीच्या वडिलांना मुलाच्या वडीलांकडून हुंडा मिळत होता. ही रक्कम ठरलेली म्हणजे २०० रू. एवढी असायची. ठरलेली रक्कम एकाच वेळी देणे शक्य होत नसल्यास ती हप्त्याने देण्याची परवानगी होती. तसेच वर मुलगा सासऱ्याच्या घरी द्येजची रक्कम फिटेपर्यंत शिकार करणे, चोरी-दरोडा प्रकरणी मदत करणे अशा स्वरुपाचे काम करायचा. हुंड्याची रक्कम फिटेपर्यंत अशा प्रकारे काम केले जाते. पारधी समाजात मुलीचा बाप हुंड्याच्या रकमेसाठी मुलीची कितीही लग्न लावून देतो. सद्यस्थितीत हुंड्याच्या रकमेत आणि हुंडा घेण्याच्या पध्दतीतही बदल झाल्याचे उत्तरदात्यांनी सांगितले.

मुलीचा बाप पैशासाठी आपल्या मुलीचा विवाह अनेकांसोबत करु शकतो. म्हणूनच पारधी समाजात विवाह हा निव्वळ करार मानला जातो. लग्नानंतर ती मुलगी दुसऱ्या मुलाला आवडली आणि मुलगीसुध्दा पहिल्या पतीकडून दुसऱ्याकडे जाऊ इच्छित असेल तर जेवढा हुंडा पहिल्याने दिला होता तेवढाच हुंडा दुसरा पहिल्याला देतो व मोकळीक घेवून लग्न करतो. त्या मुलीला मुले असतील तर ती मुले तिच्या पहिल्या पतीकडेच राहतात. तसेच पहिल्या पतीने मुलीच्या वडिलांना ठरल्याप्रमाणे द्याज दिले नाही तर मुलीचे वडील मुलीच्या पहिल्या लग्नानंतर सुध्दा दूसऱ्याकडून पैसे घेऊन तिचे दुसरे लग्न करतात एखाद्याने कर्ज घेतले असले तर कर्जाच्या मोबदल्यात कर्ज फिटेपर्यंत त्या कर्ज देणाऱ्या व्यक्तीकडे मुलगी किंवा पत्नी राहते म्हणजेच पारधी समाजात मुलगी किंवा पत्नी गहाण ठेवण्याची पध्दत होती. जर त्या स्त्रिला त्या काळात मुले झाली तर ती मुले त्या व्यक्तीकडेच ठेवून ती स्त्री कर्ज फिटल्यावर आपल्या वडिलांकडे किंवा पतीकडे निघून जाते.

**तक्ता क्र. ४.१७**

**पारधी जमातीत हुंडा कोणाकडून घेतला जातो ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | हुंडा कोणाकडून | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वधुकडून | ३२ | १०.६७ |
| २ | वराकडून | १६० | ५३.३३ |
| ३ | दोन्ही बाजूने खर्च | १०८ | ३६ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

हुंडा कोणाकडून घेतला जातो याबद्दल जाणून घेतांना उत्तरदात्यांना पर्याय देऊन त्याबद्दलची मिळालेली माहिती तक्ता क्र.४.१७ नूसार निदर्शनास येते. एकूण उत्तरदात्यांपैकी त्यांच्या मुलांच्या लग्नात हुंडा कोणाकडून घेतला असा प्रश्न विचारला असता ३२ (१०.६७%) उत्तरदात्यांनी वधूकडून हुंडा घेतला असे सांगितले. इथे हिंदूधर्मातील प्रथेचे अनुकरण केल्याचे अभ्यासातून दिसून आले व या प्रथेचे उत्तरदात्यांनी समर्थनही केले. १६० (५३.३३%) उत्तरदात्यांनी मात्र वधुमुल्य घेतो म्हणजेच वराकडून हुंडा (द्येज) घेतो असे सांगितले. मुलगी दूसऱ्याला देताना मुलाकडून त्याचा मोबदला घेणे ही पूर्वीपासून जमातीची प्रथा आहे असे सांगितले. त्याही पुढे जाऊन प्रगतानांही विचार करायला भाग पडणारा आणि मुलगी ओझे वाटू नये असा प्रगत दृष्टिकोन पारधी स्वीकारीत आहेत. तो म्हणजे विवाह करण्यासाठी किंवा विवाहखर्च पेलण्याची परिस्थिती नसेल तर मुला - मुलींच्या विवाहाचा खर्च दोन्ही बाजूने केला जातो असे सांगणरे एकूण १०८ (३६%) उत्तरदाते आहेत.

पारधी आजही मागास जीवन जगत आहेत. पण विवाहाच्या बाबतीत त्यांनी स्वीकारलेला विचार प्रगल्भ स्वरूपाचा आहे. सुशिक्षित व स्वतःला प्रगत म्हणवणाऱ्या समाजात हुंडा प्रथेमुळे स्त्रीभुण हत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. हुंडा प्रथा कायद्याला मान्य नसली तरी समाजाला ती मान्य आहे. हुंडा प्रथा अनिष्ठ आहे. असे असतांनाही हुंड्याबद्दल समाजात आजही पाहिजे तेवढी संवेदनशीलता नाही. पण पारधी समाजाने स्विकारलेल्या मार्गानुसार खऱ्या अर्थाने विवाह हा आर्थिकदृष्ट्या एक आनंददायी सोहळा होऊ शकतो व समाजातील स्त्री भ्रुणहत्येची समस्या नाहीशी होईल.

**तक्ता क्र. ४.१८**

**पारधी जमातीत विवाहविधी कोण करतो ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | विवाहविधी कोण करतो? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | भगत | २१ | ०७ |
| २ | ब्राम्हण | ६८ | २२.६७ |
| ३ | जमातीतील अनुभवी व्यक्ती | २११ | ७०.३३ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पारधी समाजात विवाहाबद्दल अधिक माहिती जाणून घेताना विवाह विधी कोण करतो याबदलची माहिती तक्ता क्र. ४.१८ मध्ये दर्शविली आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी २१ (०७%) उत्तरदात्यांनी विवाहविधी भगताकडून पार पाडला जातो असे मत व्यक्त केले. भगत हा जमातीतील पवित्र व महत्वाचा घटक मानला जातो. येणाऱ्या सुख दुःखाची चाहूल त्याला लागते व त्याचे निवारण करण्याची विद्या भगताकडे असते असा विश्वास असल्याने विवाहाचा साक्षी त्यालाच केले जाते. विवाह विधी पार पाडल्यानंतर त्याला भोजन व दक्षिणा दिली जाते. ब्राम्हणाकडून लग्न लावले जाते असे ६८ (२२.६७%) उत्तरदात्यांनी नमुद केले. त्यात नोकरी निमित्ताने शहरात राहणारे, व सुशिक्षित उत्तरदात्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. पारंपारिक रिवाज म्हणून एक पिंपळाचे पान आजच्या बाशिंगात बांधले जाते. ब्राम्हण मंगलाष्टके म्हणतो व नवरीच्या गळयात काळी पोत बांधली की विवाहातील विधी संपतात. ब्राम्हणाला दक्षिणा दिली जाते. ब्राम्हणाकडून विवाह विधी केल्यास आसपासच्या देवींना नवविवाहीत देवदेव करण्यासाठी जातात. तर २११ (७०.३३%) उत्तरदात्यांनी जमातीतील अनुभवी व्यक्ती जी धर्मज्ञानी असते, पवित्र व जटाधारी असते तीच जमातीचे विवाह व इतर विधीही करते. लग्न लावणारी व्यक्ती दुसऱ्या कुळाचीच असावी लागते. उदा. काळे - पवार यांच्यातील लग्न चव्हाण कुळातील अनुभवी व्यक्तीकडून लावले जाते. लग्न लावणाऱ्यास लग्नाच्या विधीची सर्व माहिती असावी लागते. विवाह प्रसंगी रीतीरिवाजाप्रमाणे आदर सत्कार, जेवण, मद्यपान, केले जाते. विवाहानंतर काकण सोडणे , देवदेव करणे, मंगलाष्टके, संसार गीते, पाठवणी करणे, बोहला या माध्यमातून हिंदु विवाह पध्दतीचे अनुकरण केलेले दिसून येते.

**तक्ता क्र. ४.१९**

**पारधी जमातीमध्ये प्रचलित विवाहपध्दत कोणती ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | विवाह पध्दती | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पारंपारिक | ८७ | २९ |
| २ | आधूनिक | २१३ | ७१ |
| ३ | सामूहिक | ०० | ०० |
| ४ | नोंदणी | ०० | ०० |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पारधी जमातीमध्ये प्रचलित विवाह पध्दत कोणती याबदल उत्तरदात्यांनी तक्ता क्र. ४.१९ मध्ये दर्शविल्या प्रमाणे मत नोंदविले आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी ८७ (२९%) उत्तरदात्यांनी आजही पारंपारिक पध्दतीने विवाह होतात असे सांगितले. इतर विवाहविधीवर त्यांचा विश्वास नाही. जमातीतील संघटन टिकवण्यासाठी जमातीच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे असेही मत उत्तरदात्यांनी आवर्जुन नोंदविले. २१३ (७१%) उत्तरदात्यांनी विवाह आधूनिक म्हणजेच हिंदूप्रथेप्रमाणे विवाह होतात असे मत नोंदवले. नोंदणी विवाहाचे प्रमाण शून्य टक्के आहे. जाती - जमातीसाठी आज मोठया प्रमाणात शासनामार्फत कन्यादान योजनेसारख्या योजना राबवून आणि सामूहिक विवाह सोहळयाच्या माध्यमातून विवाहासाठी येणारा खर्च वाचवण्याचा प्रयत्न केला जातो. पण या प्रक्रियेपासून पारधी आजही दूर आहे. जमातीच्या परंपरेप्रमाणे, धर्माप्रमाणे विवाह झाला तरच त्याला सामाजिक मान्यता प्राप्त होते. अन्यथा पुढे घडणाऱ्या घटनाचा संबंध विवाहविधीत झालेल्या चुकांशी लावला जातो. त्यामुळे विवाहाच्या बाबतीत उत्तरदाते जमातीच्या विवाह पध्दतीला पसंती देतात असेच निदर्शनास आले.

**तक्ता क्र. ४.२०**

**पारधी जमातीत विवाहासाठी मुला-मुलींच्या मताला प्राधान्य दिले जाते का ?**

| अ.क्र | प्राधान्य देता का | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २७९ | ९३ |
| २ | नाही | २१ | ०७ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पारधी समाजात विवाहाच्या वेळी मुला - मुलींना कितपत स्वातंत्र्य आहे याबद्दल उत्तरदात्यांनी वरील प्रमाणे माहिती दिली. वरील तक्ता क्र.४.२० अनुसार विवाह ठरवतांना मुला - मुलींच्या मताला प्राधान्य दिले जाते असे एकूण २७९ (९३%) उत्तरदात्यांनी नमुद केले. याठिकाणी मुलाला जेवढे स्वातंत्र्य विवाहाच्या बाबतीत दिले जाते तेवढेच मुलीलाही दिले जाते. आज जबरदस्तीने किंवा पसंतीचा विचार न करता विवाह केला जात नाही असे एका उत्तरदात्याने नमुद केले. २१ (७%) उत्तरदात्यांनी मुला- मुलींच्या मताला प्राधान्य देत नसल्याचे सांगितले. त्यांच्या अल्प वयाचा विचार करता मुलांना चांगले वाईट कळण्याइतपत समज नसते. त्यामुळे मोठयांचा हस्तक्षेप आवश्यक आहे असे त्यांना वाटते. पारधी समाजात प्रेमविवाह आणि आंतरजातीय विवाहाचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

**तक्ता क्र. ४.२१**

**पारधी जमातीत घटस्फोट कोणामार्फत घेतला जातो यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | कोणामार्फत | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | जातपंचायत | १८४ | ६१.३३ |
| २ | कायदा | ००९ | ०३ |
| ३ | स्वतः | १०७ | ३५.६७ |
| **४** | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

घटस्फोट कोणामार्फत घेतला जातो याबद्दल उत्तरदात्यांनी वरील प्रमाणे माहिती दिली. घटस्फोटासाठी कायदा असतो याबाबत अज्ञान दिसून आले. वरील तक्ता क्र.४.२१ अनुसार जातपंचायतीमार्फत घटस्फोट घेतला जातो असे मत १८४ (६१.३३%) जणांनी नोंदवले. तर फक्त ०९ (३%) उत्तरदात्यांनी कायदयाद्वारे घटस्फोट घेतला जातो असे मत नोंदवले आहे. तर स्वतःच घटस्फोटाचा निर्णय घेणारे १०७ (३५.६७%) उत्तरदाते आहेत. त्यांच्या मते जातपंचायतीला सामोरे जाताना आर्थिक बाबतीत आपण फसवले जाण्याची भिती आणि खर्च टाळण्यासाठी परस्पर विचार विनिमयाने काडीमोड घेतला जातो. पूर्वी जातपंचायतीने केलेल्या दंडाची रक्कम थोडी असायची. पण आता त्यात वाढ झाली आहे. याशिवाय चारित्र्याच्या अनेक परिक्षा द्याव्या लागतात. पुरूषांना मात्र त्या लागू होत नाहीत अशी माहितीवजा तक्रार पारा वस्ती ता. वाशी मंगल बप्पा काळे या स्त्री उत्तरदात्याने केली.

कायदेशीर पध्दतीचा अवलंब न करता जातपंचायतीमार्फत घटस्फोट घेतला जातो. घटस्फोटाची कारणे विचारली असता पत्नीशी न पटणे, तिची वर्तणूक वाईट असणे, पती नपुंसक असणे, त्याला असाध्य रोग जडणे, चारित्र्याचा संशय विवाहपूर्व व विवाहबाह्य लैगिक संबंध इ. कारणांमुळे पती - पत्नी विभक्त होतात. अविवाहित पुरूषासोबत घटस्फोटीत स्त्री विवाह करीत असेल तर प्रथम त्याचे अंगठीशी लग्न लावले जाते. घटस्फोटाच्या प्रकरणात चूक पत्नीकडे निघाल्यास तिने पतीला लग्नाचा सर्व खर्च द्यावा लागतो. आणि या प्रकरणी पती दोषी ठरल्यास त्याला खर्च मिळत नाही.

### ४.३ धार्मिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण :-

पारधी  आपला धर्म हिंदू असल्याचे सांगतात. पारध्यांचे धार्मिक आचरण, देव-देवता, सण-उत्सव इ.हिंदू धर्माप्रमाणेच असल्याचे निदर्शनास आले. परंतु कांही पारध्यांनी आपला धर्म हिंदू नसुन आदिवासी पारधी  लिहा असे सांगितले पण हे प्रमाण अल्प होते. त्यांचे कारण विचारता त्यांनी  हिंदू धर्माने आम्हाला सामावून घेतले नाही,  शासन दरबारी हिंदू (पोटजात) ठरवले आणि त्यानुसार निकष काढून सवलती दिल्यामुळे आमच्यावर अन्याय झाला असे सांगितले. पूर्वी फासेपारधी विमुक्त जमातीमध्ये होते आता त्यांना आदिवासी पारधी असे म्हटले जाते. तर पूर्वी गावपारधी सेटलमेंटमध्ये बंदीस्त होते आणि  आता त्यांचा उल्लेख हिंदू पारधी असा केल्याने सवलतीपासून दूर रहावे लागल्याचा संताप काही स्त्री उतरदात्यांनी व्यक्त केला. मुळात आदिवासींचा एक वेगळा धर्म असतो. पण  हिंदू जीवन-पध्दतींच्या व्यापक संपर्कामुळे पारधी हिंदूचे अनुकरण करतात असे आढळून आले.  हिंदू धर्म टिकवून ठेवण्याचे काम जमातींनीच केले आहे असेही सांगण्यात आले. संशोधनादरम्यान जिल्ह्यातील पारधी समाजाने आपला धर्म आणि ओळख जपून ठेवली आहे असे आढळले. इतर कोणत्याही धर्माचे नाव याठिकाणी सांगण्यात आले नाही. सर्वेक्षणांतर्गत धर्माबद्दल नितांत श्रध्दा आहे असेच निदर्शनास आले. पारध्यांच्या दैनंदिन जीवनात धर्म सतत लुडबुड करीत असतो. प्रत्येक दिशांना पारधी   धार्मिक महत्त्व देतात. त्यानुसारच सामाजिक नियम बनवले आहेत. पूर्व (वंद), पश्चिम (उपराख), दक्षिण (हंडाऊ) उत्तर (वळाऊ) या दिशांना धार्मिक दृष्टीने पाहिले जाते. पश्चिमेकडे देव ठेवलेले असतात. त्यामुळे स्त्रीने पश्चिमेकडे जायचे नाही. स्त्रीयांनी दक्षिणेकडे झोपायचे तर पुरुषांनी उत्तरेकडे झोपायचे कारण उत्तरेकडे महिला झोपल्यास स्वप्नात देव येऊन त्रास देतात महिलांचे वापरण्याचे कपडे पूर्वेकडे ठेवायचे. असे काही संकेत उत्तरदात्यांनी सांगितले. वरील नियम कुमारिकेला नसतात. तर विवाहीत स्त्रिला वरील नियमांचे पालन काटेकोरपणे करावे लागते.  अन्यथा धर्म ही बाब पारध्यांसाठी अतिसंवेदनशील असून अशा नियमांचे उल्लंघन झाल्यास जातपंचायत बसवली जाते आणि संबंधित गुन्ह्याबद्दल शिक्षा दिली जाते.

संपूर्ण सर्वेक्षणात मुळ धर्म आदिवासी  असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण कमी तर हिंदू धर्म असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण जास्त होते. पण आदिवासी धर्म म्हणजे नेमका कोणता हे त्यांना सांगता आले नाही. काही उत्तरदाते गोंधळून गेलेले दिसून आले तर काहीच्या मते इतरांच्या संपर्काने मूळ संस्कृती व

धर्म प्रभावहीन होत चालला आहे. त्याची पुनर्स्थापना व्हावी असे त्यांना वाटते. सद्यः स्थितीत धर्म आणि धर्मजाणीव, धार्मिक जीवन यात गुंतागुंत निर्माण झाल्याचे निदर्शनास आले.

**देवावरील विश्वास :-**

उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाचा अभ्यास करतांना उत्तरदात्यांना देवावर विश्वास आहे का असे विचारले असता सर्व ३०० उत्तरदात्यांनी देवावर विश्वास असल्याचे नमुद केले. देवाशिवाय पानही हालत नाही अशी त्यांची श्रध्दा आहे. देवतांची पूजा करण्याची खास अशी विधीवत पध्दती नाही. पण पूजाविधीत नियमांचे पालन काटेकोरपणे केले जाते. धार्मिक जीवनाबद्दल अधिक सविस्तर माहिती देण्याचे पारधी टाळतात असेही निदर्शनास आले. पारधी देवासाठी 'पातर' हा शब्द वापरतात तर कुलदेवतासाठी 'जमातनादेव' हा शब्द रुढ आहे. धर्माचा पगडा असलेला हा समाज आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक पातळीवर मागासलेला असला तरी धर्माचे बाजारीकरण या समाजाने केले नाही. धार्मिक स्थळी किंवा धार्मिक कृती करताना पारध्यांचे आचरणाचे नियम वेगळे आहेत. त्यांचे पालन करणे प्रत्येकाचे कर्तव्य मानले जाते. पारध्यांच्या आजच्या जीवनातही धर्मामुळेच पारधी टिकून आहे व त्याला वेगळे अस्तित्व आहे अशी त्यांची दृढ श्रध्दा आहे.

घटनेतील तरतुदी, आरक्षण, शिक्षण व विकास योजना यामुळे पारधी समाज आज स्थिर जीवन जगण्याचा प्रयत्न करतो आहे. पण हे प्रमाण अत्यंत अल्प आहे. सुशिक्षित पिढीचा देवावर विश्वास आहे. पण धर्माची गरज आहे, अंधश्रध्दा कमी झाल्या पाहिजेत आणि माणसाने बदलले पाहिजे अशी अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त करण्यात आली.

पारधी वस्तीत फिरत असतांना कुठेही त्यांच्या देवाची मंदिरे किंवा ठिकाणे आढळली नाहीत. तसेच त्यांच्या जमातीचे देव कुठेही उघड्यावर आढळले नाहीत. लहान-मोठे, साक्षर-निरक्षर आणि नोकरी-व्यवसाय करणारे अशा सर्वच प्रकारचे देवावर विश्वास असणारे पारधी लोक आढळले. यावरुन या समाजात आणि व्यक्तीच्या जीवनात धर्माला आत्यंतिक महत्त्वाचे स्थान असल्याचे लक्षात आले.

**कूलदेवता :-**

पारधी समाजाचे प्रमुख देव आणि हा समाज कोणकोणत्या देव-देवतांना मानतो याबद्दलची माहिती घेतांना उत्तरदात्यांना तुमचे कुलदैवत कोणते? आणि त्याबद्दलची अधिक माहिती संशोधिकेने विचारली असता पारधी जमातीचे देव हे कुळ आणि आडनावानुसार वेगवेगळे असल्याची माहिती मिळाली.

इखोत, वाघजाई, खोडियार, जोगण, नौकड, कोरब, दुगाव, कर्नाटदेवी, पीपळाजदेवी, चावंडदेवी, यल्लमा, मरीआई, शिकोतर, हिंग्ळजदेवी, कालिका, काळुबाई, भवानीमाता इ. कुलदैवतांची नावे सांगण्यात आली. याशिवाय चांदीच्या सुपाऱ्या (ज्याला नागोबा म्हणतात) तो सर्वच कुळांमध्ये असतो. पारधी जमात या देवतांना आपले कुलदैवत मानते. जिल्ह्यात काळे, शिंदे, पवार, भोसले आणि चव्हाण अशा एकूण पाच कुळाचे / आडनावाचे लोक असून त्यांच्या कुलदेवता कुलपरत्वे निरनिराळ्या आहेत.

आडनावानुसार व कुळानुसार प्रत्येकाच्या देवदेवता खालील प्रमाणे असून ही माहिती अनिल रामराया काळे रा. उस्मानाबाद यांनी सविस्तरपणे दिली.

| **आडनाव / कुळ** | | **देवता** |
|---|---|---|
| काळे | - | कालिकादेवी, काळूबाई, हिंग्ळजदेवी (महाकाली-गुजराथ कच्छ/भुज), दुगाव (अंबाबाई) |
| शिंदे | - | वाघजाई (वाघावर स्वार झालेली), इखोत, महालक्ष्मी, मरीआई, शिकोतर |
| पवार | - | जोगण, कोरब, (तुळजाभवानी) हरखत, जाणाई. |
| भोसले | - | नौकड, यल्लमा. |
| चव्हाण | - | खोड्यिारदेवी (काळुबाईचेच एक नाव), चावंडदेवी, अंबाबाई, |

वरील सर्व कुळांचे कुलदैवत, आचार-विचार, पूजाअर्चा यामध्येही वेगळेपण आहे. देवता ठेवण्याच्या जागाही वेगवेगळ्या आहेत. त्यांचा उत्सव आणि जत्रा साजरी करण्याची पध्दत निरनिराळी आहे. या वरील सर्व कुळांमध्ये त्यांच्या देवदेवतेला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

**इतर देव-देवता :-**

पारधी समाज इतर लोकदेवतांनाही देवदेवता मानुन भजतात. सर्वेक्षणात पारधी समाजाच्या धार्मिक जीवनाची अधिक माहिती घेण्यासाठी उत्तरदात्यांना इतर प्रमुख देवदेवताबद्दल आणि पूजापध्दती व धार्मिक कृतीच्या उद्देशाबद्दल विचारुन अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

पारधी स्वतःला हिंदू धर्मिय मानत असल्याने ते हिंदू धर्मातील देवदेवतांना मानतात. हिंदू धर्मात आदिशक्ती भवानीची मोठया भक्तिभावाने उपासना केली जाते. हीच आदिशक्ती भवानी विविध नावाने व रुपाने पारध्यांच्या अनेक उपजातीची कुलदेवता आहे. पारधी लोक खंडोबा आणि नागोबा तसेच विठ्ठल-रुक्मिणी, भैरोबा, मारुती आणि महादेव यांचीही पूजा करतात. महादेवानेच आपल्याला शिकार हे उपजिवीकेचे साधन दिलेले आहे. त्यामुळे महादेवावर यांची गाढ श्रध्दा आहे. शिकारीला धार्मिक आधार असल्यामुळेच शिकारीसाठी पारधी कोणत्याही शस्त्राचा वापर न करता फासे किंवा जाळयाच्या सहाय्यानेच प्राणी, पक्षी पकडले जातात. पारधी आजही स्वतःचा प्रमुख व्यवसाय शिकार मानुन शिकार करतांना आढळतात. पारधी हनुमानावरील श्रध्दा व्यक्त करतांना सांगतो की हनुमान संयमी, बलवान म्हणून लंगोटी वापरतो आणि आम्हीही लंगोटी वापरतो. देवींनी दैत्याचा वध करुन चांगल्याचे रक्षण केले म्हणून पारधी स्वतःवरील संकट निवारणासाठी देवीला शरण जातो. पारधी जंगलात राहत असल्याने त्यांना आक्रमक आणि धोकादायक समजून त्यांच्यावर इतर समाजाकडून अविश्वास दाखवला जातो. परिणामी उपजिवीकेसाठी गुन्हेगारीकडे वळल्याने स्वसंरक्षणासाठी पारधी समाज धार्मिक कार्यात समाधान मानतो.

उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर, येरमाळा, चिवरी, तेर, या ठिकाणी पारधी देवदर्शनासाठी जातात. ते ज्या ठिकाणी राहतात त्या वस्तीस्थानाच्या आसपासच्या गावातील, शहरातील मूख्य देवतांना पारधी मानतात. त्याठिकाणी जाऊन त्या देवाच्या परंपरागत महत्त्वानुसार मिळणारी सामुग्री घेऊन पूजा केली जाते. पुजेचा मुख्य उद्देश संकटनिवारण हाच असतो. पारधान देवी, मालपूरा देवी, आगाखडी, फोड्याची देवी, धणी (मुख्य देव सोन्याचा असतो) अशी इतर देवतांची नावे सांगण्यात आली.

उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी सतत अन्याय - अत्याचाराला बळी पडत आला आहे. त्यामुळे जीवनात अस्थिरता आहे. अशा संकटातुन सुटका होताच देवाकडे धाव घेतली जाते. जेलमधुन सुटका झाल्यास व चोरीत यश आल्यांनतरही देवदेव केले जाते.

कांही पारधी मुस्लीम अवलीया, स्थानिक बैरागी यांनाही भजतात. म्हसोबाची पूजा आषाढ महिन्यात घरीच करुन त्याला मलिदा, नारळ व घुगऱ्यांचा नैवेद्य अर्पण करुन आर्शिर्वादासाठी शरण जातात. सापाला देवता मानुन पूजा केली जाते. सप्तश्रृंगी, मांढरदेवी, भवानी, लक्ष्मी, अशा देवदेवतांचीही आराधना केली जाते.

संशोधन करतांना वरील सर्वेक्षणात असे आढळले की, पारधी स्वतःच्या कुलदेवताशिवाय हिंदूंच्या देवदेवता मानतात. शिवाय जिल्ह्यातील सर्वच स्थानिक देव देवतांना संकटनिवारणासाठी, कृपाशिर्वादासाठी, सुखी जीवनासाठी भजतात. त्यांना प्रसन्न करुन घेण्यासाठी पारधी प्रयत्नशील असतो असेच आढळले. मानत असलेल्या देवदेवतांची वर्गवारी त्यांना करता आली नाही. घरचा देव आणि वस्तीजवळील देवाची प्रामुख्याने पूजा करीत असल्याचे सांगण्यात आले. प्रत्येकाच्या सांगण्यात हिंदूच्या देवदेवता होत्या.

**तक्ता क्र. ४.२२**

**उत्तरदाते देवपूजा करतात का? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | देवपूजा करता का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५९ | ८६.३३ |
| २ | नाही | ०४१ | १३.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.२२ मध्ये उत्तरदात्यांना आपण देवपूजा करता का असा प्रश्न विचारुन मिळालेली माहिती दर्शविली आहे. एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी २५९ (८६.३३%) उत्तरदात्यांनी आपण देवपूजा करतो असे सांगितले तर ४१ (१३.६७%) उत्तरदात्यांनी नाही असे सांगितले. ज्या १३.६७ टक्के उत्तरदात्यांनी आपण पूजा करीत नाही असे सांगितले त्या सर्व स्त्रिया आहेत. पारधी समाजात स्त्रीला देवाला स्पर्श करण्याची परवानगी नाही. घरातील देवाची पूजा पूरुषच करतात. उत्तरदात्यांनी पूजेचा जो विधी सांगितला त्यावरुन असे निदर्शनास आले की पारधी देवाच्या बाबतीत अत्यंत पवित्र भाव ठेवतात. ते देव उघड्यावर ठेवीत नाहीत. त्यांच्या घरात देव्हारा नसतो. पारध्यांचे देव नवीन लाल रंगाच्या कपड्यात बांधुन जमिनीपासुन उंचावर ठेवले जातात. पारध्यांच्या कुळानुसार जी कुलदेवता आहे त्या देवतेची सोन्या-चांदीची प्रतिकरुप टाक तयार केलेली असते. याशिवाय सुपारीला चांदीचा मुलामा दिलेल्या सात सुपाऱ्यांची भैरोबा म्हणुन पूजा करतात. प्रसंगानुरुप पुरुष देवाचे गाठोडे सोडतो आणि शुध्द होऊन देवाची उदबत्ती ओवाळुन पूजा केली जाते. देवाची जत्रा स्वतंत्र ठरलेली असते. घर जरी पाल, झोपडी, पत्राशेड किंवा इतर प्रकारचे असले तरी घराच्या आतील कोपऱ्यावर देव बांधुन ठेवले जातात. त्या जागेकडे स्त्रीचे वावरणे तर दूरच, तिची सावलीही पडू दिली जात नाही.

जिल्ह्यातील सिंदगाव ता. तुळजापूर येथील संगीता काळेच्या आईने देव पत्र्यावर टाकले होते. कारण पती जेलमध्ये होता व मुलीच्या नवऱ्याचा मृत्यू झाल्याने मुलगी आईकडे राहात होती. अशा संकटसमयी घरात पुरुष नसताना त्या देवाची पूजा कोण करणार म्हणून त्यांनी देव पत्र्यावर टाकले होते. आणि पतीची सुटका झाल्याशिवाय देवांचीही सुटका नाही असे तिने सांगितले. यावरुन पारधी समाजाचा धर्मभोळेपणा लक्षात घेतो. आजही पारधी समाज घडलेल्या घटनांचा संबंध देवा-धर्माशी लावून नशिबाला दोष देत जगतो आहे. हे अत्यंत मागासलेपणाचे लक्षण आहे.

**सण-उत्सवासंबंधी माहिती :-**

पारधी समाज साजरा करीत असलेल्या सण - समारंभाविषयी उत्तरदात्यांना माहिती विचारली असता मिळालेली माहिती खालील प्रमाणे -

पारधी जमातीत प्रामुख्याने नवरात्र, दसरा, होळी, महाशिवरात्री व गुढीपाडवा या सणांना विशेष महत्त्व आहे. महाशिवरात्रीनिमित्त दिवसभर उपवास केला जातो, तर नवरात्रात स्त्रिया नऊ दिवस उपवास करतात. पोळा, अक्षयतृतीया, दिवाळी यासारखे हिंदूचे सण साजरे केले जातात. नागपंचमीला (गोरमाळा ता. बार्शी येथे) नागोबाच्या मुर्तीवर तुपाचा अभिषेक करतात. पारधी हिंदू मंदिरामध्ये प्रवेश करु शकतात. या समाजात धर्मगुरु नाही. पारधी समाजाचे स्वतःचे असे पारंपारिक सण - उत्सव नाहीत. त्यामुळे हिंदूंच्या सण - समारंभात पारधी आत्मीयतेने सहभागी होतात. गावाच्या आसपास राहणारे पारधी सणानिमित्ताने गावात जाऊन गोडधोड खाण्याचा उद्देश ठेवतात. सद्यःस्थितीत राखीपौर्णिमा, पोळा, असे सण करीत आहेत. सर्वसाधारणपणे हिंदूचेच सर्व सण आम्ही करतो असे उत्तर सर्वच उत्तरदात्यांनी दिले.

**धार्मिक विधी :-**

कुटूंबाचे आणि जमातीचे धार्मिक विधी जमातीतील अनुभवी व्यक्ती करते. याशिवाय जमातीत स्वतःला पवित्र मानणारी जटाधारी व्यक्ती जमातीचे लहान सहान विधी पार पाडते. त्याची दक्षिणा परंपरेने ठरलेली आहे. पण आज या रक्कमेत वाढ झाल्याचे सांगण्यात आले. बालकांचा जन्म, नामकरण, जावळ, ओंटी भरणे, विवाह, डोहाळजेवण आणि मृत्यू या प्रसंगीच पारधी धार्मिक विधी करतात. पण हे विधी खर्चिक - वेळखाऊ आणि अतिश्रमाचे नसून अत्यंत साध्या स्वरुपाचे असतात. धार्मिक विधीत कर्मकांड नसते. आचरणाच्या नियमांकडे ते धार्मिक दृष्टीने बघतात. इतर धार्मिक विधीप्रसंगी देवाची प्रतिकरुपे समोर ठेवून त्याला तुप - भात / गुळ - भाताचा नैवेद्य दाखवला जातो.

प्रस्तुत संशोधनामध्ये पारधी जरी हिंदू धर्माचे अनुकरण करीत असला तरी हिंदूच्या धार्मिक विधीची नक्कल करतांना आढळला नाही. देवादीकांचे फोटो मांडून व्रतवैकल्य, पोथी - पूराण, पुजा, यामध्ये विविधता कोठेही आढळली नाही. एकाही पारधी कुटूंबात देव्हारा आढळला नाही. यावरुन असे लक्षात येते की पारधी समाजात धर्माबद्दल नितांत श्रध्दा आहे. पण त्याचे स्वरुप अत्यंत साधे आहे. धार्मिक विधी करतांना महिना, वार, नक्षत्र, अमावस्या, पौर्णिमा अशा घटकांचा विचार न करता सोयीच्या दिवशी व सोयीच्या वेळी हा विधी पार पाडला जातो.

**तक्ता क्र. ४.२३**

**पारधी जमातीमध्ये धार्मिक विधी कोण करतो ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **विधीकर्ता** | **एकूण** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | ब्राम्हण | २५ | ०८.३३ |
| २. | भगत | ९० | ३० |
| ३. | कुटूंबातील सदस्य | १८५ | ६१.६७ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र.४.२३ मध्ये जमातीचे धार्मिक विधी करणाऱ्या व्यक्तीबद्दल माहिती दिली आहे. २५(८.३३%) उत्तरदात्यांनी विधी करण्याकरता ब्राम्हण बोलावला जातो असे नमुद केले. हे उत्तरदाते शहराच्या आसपास व नोकरी व्यवसायानिमित्त गावगाड्याजवळ राहत होते. त्यांनी हिंदू धर्माचे अनुकरण केल्याचे दिसून येते. तर ९० (३०%) उत्तरदात्यांनी धार्मिक विधी भगत करतो असे नमुद केले. पारधी लोक त्याला "भवारया" म्हणतात. हा भवारया जमातीचे श्रध्दास्थान असून ती जमातीतीलच व्यक्ती असते. विधी करतांना साक्षात दैवीशक्ती त्याच्या अंगात संचारते असा त्यांचा विश्वास आहे. भगताच्या भुजेवर वार करुन हाताची शिर कापुन ते रक्त मोठ्या ताटात ठेवलेल्या देवावर पाडले जाते. १८५ (६१.६७%) उत्तरदात्यांनी कुटूंबाचे धार्मिक विधी कुटूंबातील अनुभवी व्यक्तीच करते असे नमुद केले.

पारधी समाजात भगत हा श्रेष्ठ दर्जाचा मानला जातो. भगताबद्दल अत्यंत पवित्र भावना जोपासली जाते. भगतामध्ये असलेल्या दैवीशक्तीकडून पारधी भविष्यासाठी कौल घेतो भगताने आपल्या जीवनात चरितार्थ चालवतांना कोणतेही अनुचित कार्य केलेले नसते. भगताच्या अंगात

असलेली दैवी शक्ती भगताचे रक्षण करीत असते. त्याने उकळत्या तेलात हात घातला तरी त्याला भाजत नाही. त्याची शिर कापून रक्ताभिषेक केला तरी ती शिर उपचाराशिवाय पुन्हा जोडली जाते. आणि असे झाले नाही तर ती जमातीवर येणाऱ्या संकटाची चाहूल समजली जाते. भगत हा धार्मिक विधीमध्ये पारंगत असून त्याच्या अंगात देवी संचारते. व ती भगताच्या रुपाने जमातीशी संवाद साधते अशी श्रध्दा उत्तरदात्यांनी व्यक्त केली. पारध्यांच्या विविध कुळांमध्ये भगताला भवऱ्या, जोखऱ्या, भगत्या इ. विविध नावाने ओळखतात. जिल्ह्यात धार्मिक विधी करणारी एकही स्त्री आढळली नाही. स्त्रियांच्या अंगात येते व ती ज्ञानी, अनुभवी असते. तिला धार्मिक ज्ञान असले तरीही धार्मिक विधीत स्त्रिया अशूभ मानल्याने त्यांना जमातीत भगताचे कार्य किंवा स्थान मिळत नाही असे सांगण्यात आले.

**जमातीच्या इतर विधीबद्दल अधिक माहिती :-**

बाळाच्या जन्मापासून पाचव्या दिवसापर्यंत त्याला कपडे घालत नाहीत. पाचव्या दिवशी जुन्या वस्त्राचे कपडे शिवून बाळाला नेसवतात आणि पाचवीचा विधी करुन त्याच दिवशी नामकरण होते. बाळाचे नाव ठेवण्यासाठी पाच कुमारिका बोलावून त्यांना मलिदा वाटतात. तेल न लावता नैवेद्य करुन त्यावर गुळ ठेवतात अशा प्रकारे बाळाचे नामकरण होते. नाव ठेवल्यानंतर सव्वा महिन्यापर्यंत केंव्हाही जावळ काढले जाते. बाळंतपणानंतर पाचव्या दिवशी आईने वापरलेले कपडे टाकून देतात. पुन्हा दोन महिन्यांनी बाळाचे व आईचे कपडे टाकून देतात. त्यानंतरच बाळंतिणीला घरात प्रवेश मिळतो व तिला गृहकाम करता येते. बाळंतपणाच्या दोन महिन्याच्या कालावधीत ती दिलेल्या स्वतंत्र खोलीतच राहते. तिला कोणीही स्पर्श करायचा नाही व तिने इतरांनी करुन दिलेली भाकरी खायची असे नियम बाळंतिणीच्या बाबतीत सांगण्यात आले. बाळंतिणीला आणि बाळाला या सुरुवातीच्या कालावधीत इतरांच्या मदतीची गरज खूप असतांना पारधी समाजात मात्र तिला एकटे ठेवले जाते व तिची इतर कोणतीही काळजी घेतली जात नाही. आजही या नियमांचे पालन केले जाते असे उत्तरदात्यांनी सांगितले. जावळ काढण्याचा दिवस निश्चित नसून ते ३ महिन्यापर्यंत काढावे लागते. जावळ असेपर्यंत देवाला जायचे नाही असा नियम आहे. नामकरणाच्या दिवशी केलेले जेवण फक्त स्त्रियांनीच सेवन करायचे असते. जमातीतील अंगात येणाऱ्या स्त्रिला, पुरुष व मुलांना हे जेवण चालत नाही. नामकरण विधी अत्यंत साधा असून जन्माला येणाऱ्या जीवाचे अशा प्रकारे स्वागत केले जाते. मुलगा - मुलगी असा भेद केला जात नाही. असे उत्तरदात्यांनी आवर्जुन नमुद केले. पारधी समाजात पूर्वी मुलगी वयात येण्याअगोदरच विवाह होत असल्याने ती वयात आल्यानंतर तिला माहेरी बोलावून

हिरवी साडी आणि बांगड्या भरवून सासरी पाठवले जात असे. अविवाहीत मुलीसाठीही ओटी भरण्याचा असाच साधा विधी केला जातो असे यमगरवाडी ता. तुळजापूर येथील जयश्री भोसले यांनी सांगितले. पारध्यांच्या पारंपारिक जीवनपध्दतीत डोहाळजेवण केले जात नसे. गरोदर स्त्रीला जिथे सुखरुप बाळंतपणासाठी मुद्दाम गुन्हा करुन जेलमध्ये जावे लागते तिथे या प्रकारचे विधी केंव्हा करणार असे विदारक सत्य वर्तवण्यात आले. स्त्रीला गरोदरपणात अनेक कष्टाची कामे करावी लागतात. प्रसंगी भीक मागून खावे लागते. त्याच कालावधीत स्थलांतर, संघर्ष, आणि पूरुषावर येणारी संकटे यांच्यासाठी झगडावे लागते. पतीच्या जेलमधील सुटकेसाठी प्रयत्न करावे लागतात. अशा अवस्थेत सुखरुप बाळंत होणे हेच मोठे आव्हान आणि नशीब मानले जाते. ज्या कुटूंबाने कायम व्यवसाय स्विकारुन एका ठिकाणी वास्तव्य केले आहे. अशा कुटुंबातील स्त्रियांनाही अशा अवस्थेत दैनंदिन कामकाज पार पाडावे लागते. एकूण उत्तरदात्यांपैकी एकाही स्त्री उत्तरदात्याने आपले सिझेरियन झ ााल्याचे किंवा बाळंतपणात मूल दगावल्याचे सांगितले नाही. ऊन-वारा, पाऊस, थंडी या सर्वांना तोंड देत जन्माला आलेला जीव जगतो. त्यासाठी पथ्य, औषधे केले जात नाहीत. जन्मल्यानंतर रोगराईने मृत्यू आल्यास दैवी खेळ समजून प्रेताचे दफन केले जाते. हिंदूप्रमाणे तेराव्या व चौदाव्या दिवशी दिवसाचे करतात. मयतीनंतर देव सोनार / भात्याकडे नेऊन उजळून आणतात व देव माहेरी नेऊन त्याचे शुध्दीकरण करतात. त्यानंतर देवावर दारु शिंपडून त्याचा सहज स्विकार केला जातो.

जमातीत इतर कोणते विधी केले जातात याबद्दल माहिती विचारली असता उत्तरदात्यांनी नाही असे सांगितले. लोहारा ता. तुळजापूर येथील श्री. वसंत पवार हे नोकरी निमित्ताने प्रगतांमध्ये राहतात. त्यामुळे त्यांचे जमातीच्या देवाकडे दुर्लक्ष झाल्याने त्यांच्या घरात पुढचा वंशच वाढला नाही. ज्यावेळी त्यांनी जमातीचे देवकार्य केले तेंव्हा वयाच्या ४५ व्या वर्षी त्यांना मुल झाले असे त्यांच्या बंधूंनी सांगितले आणि माणसाची प्रगती धर्मामुळेच होते असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सारांशरुपाने पारधी जमातीत पूर्वीपासुनच धर्म आणि त्यासंबंधीचे विधी साध्या पध्दतीने केले जातात. देवाबद्दल आणि भगताबद्दल आदराची भावना असून या दोन्हीमुळेच जमातीचे संरक्षण होते अशी त्यांची श्रध्दा आहे. २१ व्या शतकातही प्रगती करतांना पारधी स्वतःच्या धर्माला आणि धार्मिक विधीला अत्यंतिक महत्त्व देतो आहे असे संशोधनात आढळले.

**तक्ता क्र. ४.२४**

**उत्तरदाते करीत असलेल्या उपवासाचा उद्देश कोणता ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **उपवासाचा उद्देश** | **एकूण** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | इच्छापूर्ती | २६ | ८.६७ |
| २. | ईश्वर स्मरण | ०६ | ०२ |
| ३. | संकट निवारण | ३४ | ११.३३ |
| ४. | समाधान | २४ | ०८ |
| ५. | सर्वच | २१० | ७० |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

आपण उपवास करता का? या प्रश्नाला सर्वच उत्तरदात्यांनी होय असे सांगितले. उपवास केल्याने देवावरील श्रध्दा दृढ होते अशी त्यांची धारणा आहे. उपवासाचा उद्देश काय असतो याबद्दल मिळालेली अधिक माहिती वरील तक्त्यामध्ये दर्शविली आहे. पारधी व्यक्तीची धर्मावरील अत्यंतिक श्रध्दा उपवासाच्या उद्देशातुन लक्षात येते. इच्छापूर्तीसाठी उपवास करणाऱ्या एकूण २६ (८.६७ %) व्यक्ती आहेत. तर ०६ (२ %) उत्तरदात्यांनी ईश्वराचे स्मरण / चिंतन म्हणून उपवास करतो असे सांगितले. देवाचा कोप झाला की देवाचा राग घालवण्यासाठी आणि आलेल्या संकटाचे निवारण व्हावे या उद्देशाने ३४ (११.३३%) उत्तरदाते उपवास करतात. उपवासाने समाधान प्राप्त होते असे म्हणणारे २४ (०८%) उत्तरदाते आहेत. २१० (७०%) उत्तरदात्यांनी उपवासाचा उद्देश इच्छापूर्ती, ईश्वर चिंतन, संकटहरण आणि समाधान हे सर्व असल्याचे सांगितले. महाशिवरात्रीला दिवसभर उपवास केला जातो. इथे महादेवाचे स्मरण हाच उद्देश असतो. नऊ दिवस नवरात्रात उपवास केला जातो. संकट निवारणासाठी हा उपवास केला जातो. याशिवाय पौर्णिमा, श्रावणी सोमवार या दिवशी ही उपवास केला जातो. गावाच्या सानिध्यात किंवा शहरात राहणारे पारधी लोक एकादशी आणि इतर आठवड्यातील वार करतांना आढळले.

**तक्ता क्र. ४.२५**

**उत्तरदाते नवस करतात का ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | नवस करता का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २९६ | ९८.६७ |
| २. | नाही | ४ | १.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पारधी समाज अतिशय धार्मिक आहे. व्यक्तीकडून चूक झाली की देवदेवता रागवतात, त्यामुळे त्यांची वक्रदृष्टी पडू नये तसेच संकटसमयी किंवा इच्छापूर्तीसाठी देवांचा कृपाशिर्वाद महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे ते नवस करतात. या संबंधीची माहिती वरील तक्ता क्र. ४.२५ मध्ये दर्शविली आहे.

देवदेवतांना नवस करतो असे मत एकूण २९६ (९८.६७% ) उत्तरदात्यांनी नोंदवले आहे. तर केवळ ४ (१.३३%) उत्तरदात्यांनी नवस केला नाही असे सांगितले. प्रामुख्याने जमातीच्या देवीला, कुलदैवताला नवस केला जातो. याशिवाय जिल्ह्यातील ज्या तालुक्यात वास्तव्य आहे तेथील जवळच्या देवीला तसेच चिवरीची लक्ष्मी, तुळजापूरची तुळजाभवानी, येरमाळ्याची येडाई, नागोबा अशा देवतांना नवस करीत असल्याचे सांगण्यात आले. यश मिळणे, आजार बरा होणे, जेलमधुन सुटका होणे, आर्थिक फायदा होणे यासारख्या हेतूंने नवस केला जातो.

ज्या उत्तरदात्यांनी नवस करतो असे सांगितले ते पैसे, वस्तु अर्पण करणे, दंडवत घेणे, मलिदा वाटणे, अन्नदान करणे अशा स्वरुपात नवस फेडतात. नवस फेडणे हे अत्यंत महत्त्वाचे व अनिवार्य समजले जाते.

**तक्ता क्र. ४.२६**

**उत्तरदाते देवदेवतांना पशूबळी देतात का या संबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | बळी देता का | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २९९ | ९९.६७ |
| २ | नाही | ०१ | ००.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१०.०** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पारधी समाजातील मुख्य धार्मिक सण देवकारण हा असून या प्रसंगी बलिदानाला असलेले महत्त्व उत्तरदात्यांनी उपरोक्त प्रश्नाला दिलेल्या उत्तरावरुन लक्षात येते. देवदेवतांना पशूबळी देतो असे २९९ (९९.६७%) उत्तरदात्यांनी सांगितले. तर एक उत्तरदाता श्री. अनिल रामराया काळे हे भारत विद्यालय उस्मानाबाद येथे शिपाई म्हणून कार्यरत असून त्यांनी आपण पशूबळी देत नाही असे सांगितले. एकंदरीत बलिदानाचे प्रमाण फार मोठे असून पारधी समाज आपल्या कुलदेवतेला प्रसन्न करुन घेण्यासाठी बलिदानाचा विधी करतोच. एका कुळात एकाकडेच देव असतात. व देवदेवप्रसंगी देव एका कुटुंबाकडून दुसऱ्या कुटुंबाकडे दिले जातात. दसऱ्याच्या वेळी किंवा वर्षातून किमान एकदा बलिदान केले जाते.

**तक्ता क्र. ४.२७**

**उत्तरदाते कोणत्या पशूचा बळी देतात यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पशू | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बकरा | ८० | २६.६७ |
| २ | कोंबडा | ०२ | ०.६७ |
| ३ | रेडा | २१७ | ७२.३३ |
| ४ | इतर | ०१ | ०.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पशूबळी देण्यांचे प्रमाणे पारधी जमातीत फार मोठे असून कोणत्या पशूचा बळी दिला जातो या बद्दलची माहिती तक्ता कृ. ४.२७ मध्ये दर्शविली आहे. पारधी समाजात कुळी/आडनावानुसार कुलदेवता व त्यानुसार बलिदानासाठीचा पशू निश्चित असतो. बकऱ्याचा बळी देणारे ८०(२६.६७%) उत्तरदाते असून त्यापैकी १९ भोसले आणि ४ चव्हाण आहेत. तर ०२ (०.६७%) उत्तरदात्यांनी कोंबड्याचा बळी दिला जातो असे सांगितले. हे ०२ उत्तरदाते पवार कुळाचे आहेत. याशिवाय पवार प्रामुख्याने कोंबड्यावर स्वार असलेली जाणाई देवी मानतात. त्यामुळे कोंबड्याचा बळी दिला जातो. काही पवार कुळे ज्यांचे देवक अराई आहे ते रेडा - बकरा आणि कोंबड्याचा बळी देतात. तर धार पवार मासे खात नाहीत तर माश्यांची पूजा करुन त्यांना मलिदा खाऊ घालतात. त्यामुळेच ते कधीही मासे न खाता देवतेला कोंबड्याचा बळी देतात. कोंबड्याचे देवकारण भगत करतो. २१७ (७२.३३%) उत्तरदात्यांनी रेडा (हेला) बळी दिला जातो असे मत नोंदवले. वर्षातुन एकदा देवकारणाच्या वेळी

प्रामुख्याने रेड्याचाच बळी दिला जातो.  तर एका उत्तरदात्याने पशूबळी देत नाही असे  ठाम मत व्यक्त केले. पारध्यांच्या बलीदानाचा विधी म्हणजेच देवकारण होय.

**जत्रा :-**

पारधी समाजात दसऱ्याच्यावेळी भवानी मातेची जत्रा मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. जत्रेसाठी १० हजार ते ३ लाखापर्यंत खर्च केला जातो.  प्रत्येक कुळातले लोक ही जत्रा कुळासाठी वाटुन दिलेल्या ठराविक दिशेला जाऊन करतात.  तिथे देवीची पूजा केली जाते.  जत्रेत स्त्रीला अशुभ मानतात.  जत्रेतील खाण्यापिण्याची सोय पूरुषच करतात.  जत्रेत दारुला अत्यंतिक महत्व आहे. देवाला पशूचा बळी देऊन त्याचे रक्त देवतांवर शिंपडले जाते. अशा प्रकारे  देवाला संतुष्ट करतात आणि त्याच्याकडून संरक्षणाची  व आर्शिवादाची अपेक्षा करतात.  पारध्यांची जत्रा तीन  दिवस चालते. जत्रेचे ठिकाण गावापासून दूर असते.  पारध्यांची स्वतःची देवाला संतुष्ट करण्याची ही एवढी एकच पध्दत आहे.  यालाच ते जत्रा असे म्हणतात.  ही जत्रा परंपरेने पारधी करीत आले आहेत.  भटकंती व प्रगतांपासुन  दूर राहत असल्याने रोज या अस्थिर जीवन जगणाऱ्या पारध्यांना उद्या त्याच्या जीवनात कोणते संकट येणार आहे याचीच काळजी असते.  त्यामुळे देव - देवता, पुजा, यात्रा - उत्सव, समारंभ यापासुन तो दूर राहिला गेला.  शिकारीवर उपजिवीका असल्याने पावित्र्य, अहिंसा या संकल्पनांची ओळखच पारध्यांना नव्हती.  स्वतःच्या अस्थिर जीवनाबरोबर देवांनाही बांधुनच ठेवले.  स्वतःसोने - चांदीचा त्याग करुन देव मात्र सोने चांदीचेच बनवले.  इतकी उच्च प्रतीची श्रध्दा पारधी बाळगतो. सद्यस्थितीत जत्रेत मोठा खर्च केला जातो.  हा पैसा जातपंचायतीत जमा झालेल्या दंडाचा असतो.  जत्रेत देवीचे गुण-गान करणारे गीत हलगीच्या तालावर गायले जाते.  विविध रुपात तिने आपले संरक्षण करावे यासाठी चांगले आचरण करण्याची कबुली दिली जाते.  जत्रेत जमातीतील पवित्र, जटाधारी व्यक्ती आणि भगताचा समावेश असतो.  इतर नातेवाईक जमातीतील स्त्रिया, मुले यांचा दुरुनच सहभाग असतो.

प्रत्येक कुळीचा बलिदानाचा  म्हणजेच जत्रेचा वर्षातुन एक दिवस ठरलेला असतो.  हे ठिकाण गावापासून दूर आडरानात असते.  इतर जाती जमातीच्या माणसांचा वावर नसलेली जागा निवडली जाते.  यासाठी लागणारा पैसा वैध/अवैध मार्गाने गोळा केला जातो.  शक्यतो दसऱ्याच्या अगोदर बलिदान केले जाते.  हा विधी तीन दिवस चालतो.  विधीची सुरुवात सोमवार पासून केली जाते. कारण सोमवार शुभ मानतात.  दिवसभर उपवास करुन मध्यरात्री  होम पेटवतात.  यावेळी भगताच्या अंगात

येते व रात्रभर हलगी वाजवून देवीची स्तुतीपर गीते गायली जातात. मंगळवारी पहाटे रेड्याची पूजा करुन त्याच्या अंगावर पाणी टाकतात. पाणी टाकण्याचा मान जमातीतल्या भगतालाच असतो. पाणी टाकल्यानंतर रेड्याची त्वचा थरथरली तरच देवाचा कौल मानुन रेड्याला बांधून त्याच्या मानेची शिर कापली जाते. रेड्याच्या शिरेतून येणारे रक्त देवाच्या पातरावर टाकले जाते व देवीचा भक्त त्या शिरेला तोंड लावून रक्त पितो. मांसाचा तुकडा होमात अर्पण केला जातो नंतर चूल मांडतात. ही चूल सापाच्या वारुळाच्या (टेकीच्या) मातीपासुनच बनवलेली असते त्यावर नक्षी काढून त्याच चुलीवर अगोदर कढईमध्ये तेल ओतून भगत कनकेच्या पूऱ्या टाकतो व हातानेच तळतो. त्याच्या अंगात दैवी शक्तीचा संचार झालेला असल्याने त्याला कोणत्याही प्रकारे भाजत नाही. जर त्याने हाताकडे पाहिले / हात लाल झाले / त्याची उघडी पाठ थरारली तर त्याच्या पावित्र्यावर संशय घेतला जातो किंवा ती येणाऱ्या संकटाची चाहूलही समजली जाते. अशाच प्रकारे बकऱ्याचा विधी केला जातो. तो विधी साधारणतःचैत्र महिन्यात केला जातो तर आषाढ महिन्यात कोंबड्याच्या बलिदानाचा विधी केला जातो. अशी माहिती कन्हेरवाडी ता. कळंब येथील बिभीषण काळे यांनी दिली.

याशिवाय काळे कुळांमध्ये पहिल्यांदा मुलगा झाला की महाकालीला (खोडीयार / हिंग्ळजमाता) त्याचा बळी देण्याची प्रथा पूर्वजांमध्ये होती. त्याबद्दल अधिक माहिती श्री. कल्याण माणिकराव पवार (पो. कॉन्स्टेबल नळदुर्ग ता. तुळजापूर) यांनी पुढीलप्रमाणे दिली.

चांगुणा या पतिव्रतेची सत्व परिक्षा पाहण्यासाठी रुप पालटुन आलेल्या देवतांनी चांगुणाचा मुलगा चिलयाबाळाचा शिरच्छेद करुन जेवण देण्याची मागणी केली. त्या आज्ञेचे पालन चांगुणा मातेने केले. यामुळे शिवशंकर प्रसन्न झाले आणि तिचा मुलगा जिवंत झाला असी आख्यायिका सांगितली. चांगुणाचेच नाव खोडीयार देवी असून ती काळे कुळांचे कुलदैवत आहे. महाकालीला प्रसन्न करुन घेण्यासाठी वरील प्रथा होती. नंतर त्यात बदल झाला आहे. सद्यःस्थितीत अंगात येणाऱ्या व्यक्तीच्या हाताची शीर कापून परातीतल्या देवावर ते रक्त टाकले जाते. या व्यक्तींची जखम दैवी शक्तीने आपोआप दुरुस्त होते. अशी पारध्यांची श्रध्दा आहे. अशा श्रध्देमुळेच ते स्वतःला मागासलेले समजतात. श्रध्दा पाळताना अंधश्रध्दाही पाळल्या जातात. त्यावर दृढ विश्वास ठेवून त्या अंधश्रध्दा चालुच ठेवल्या गेल्याचे दिसून आले.

**तक्ता क्र. ४.२८**

**उत्तरदाते करीत असलेल्या बलिदानाच्या कारणासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कारण | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | परंपरागत प्रथा | १७७ | ५९ |
| २ | ईश्वरप्रसाद | १८ | ०६ |
| ३ | सूख प्राप्ती | १०३ | ३४.३३ |
| ४ | इतर | १ | ०.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.२८ मध्ये बळी देण्याचे कारण विचारुन पर्यायाद्वारे अधिक माहिती मिळवली. धार्मिक कर्मकांडात गुरफटलेल्या पारधी जमातीच्या उत्तरदात्यांना या विधीची कारणे विचारली असता बलिदान ही जमातीची परंपरागत प्रथा आहे असे म्हणणारे एकूण १७७ (५९%) उत्तरदाते आहेत. तर १८(०६%) उत्तरदात्यांनी ईश्वराचा प्रसाद म्हणून बलिदान केले जाते. रक्ताभिषेक करुन रक्त पिणे हा देवाचा प्रसाद असल्याचे ते मानतात. तर प्रगतांकडून उपेक्षित राहिल्याने तसेच सुखप्राप्तीसाठी बलिदान विधी करतो असे १०३(३४.३३%) उत्तरदात्यांनी सांगितले. एका उत्तरदात्याने बळी देत नसल्याचे सांगितले. पारधी समाजातील अंधश्रध्दामुळे त्यांचे जीवन समस्यांनी व्यस्त असल्याचे निदर्शनास आले.

**जमातीच्या श्रध्दा- अंधश्रध्दा-** लंगोटी पारध्यांमध्ये देवीची चांदीची मुर्ती असते. त्यामुळे लंगोटी पारधी स्त्रिया चांदीचे दागिने कमरेच्या वरच्या भागात परिधान करीत नाहीत. देवी ज्या ठिकाणी ठेवलेली असेल त्या उंचीला आपले लुगडे ठेवत नाही. कांही ठिकाणी पारधी स्त्रिया लाल रंगाचे कापड वापरत नाहीत. कारण त्यांच्या देवीला लाल रंगाच्या कापडावर बसविलेले असते. पारध्यांचे देव ज्या ठिकाणी असतात. तेथे स्त्रियांना प्रवेश नसतो. पारधी जरी स्त्री देवतांचे पूजक असले तरी धार्मिक कार्यात स्त्रीला सहभाग नसतो. तिला अपवित्र मानले जाते. कोणतेही काम करण्यापूर्वी देवाचा शकुन घेतला जातो. धान्य पाखडण्याची टोपली किंवा सुप किंवा जाते जर उजव्या हाताला पडले तर ते शुभ मानतात. देवी अंगात आल्याने तिला प्रश्न विचारुन उत्तरे मागितले जातात. अंगात येणारा देव जसे सांगेल त्याप्रमाणे केले जाते. जर एखादा शिकारीला निघाला असेल आणि एखादा शिंकला तर

शिंकणे अपशकून मानून शिकारीसाठी जावू नये अशी अंधश्रध्दा आहे. देवाबद्दल, भगताबद्दल, प्रथांबद्दल अपशब्द बोलणे पाप समजले जाते. या समाजात श्रध्दा आणि अंधश्रध्देतुन पाप - पुण्याची कल्पना दिसून येते. तसेच आजार मंत्राने बरा होतो ही भावनाच अंधश्रध्देला खतपाणी घालणारी आहे. त्यामुळे या समाजातील श्रध्देच्या विश्वासातुन अंधश्रध्देला प्रोत्साहन मिळाल्याचे दिसते.

पारधी समाजात देवी देवतांविषयी अनेक अंधश्रध्दा बागल्या जातात. संकटातुन सुटकेसाठी देवाला संतुष्ट करण्यासाठी बळी देतात व देवीवर रक्ताभिषेक करतात. रेडा बळीचा मोठा कार्यक्रम असतो. त्यात अत्यंत क्रुरपणे रेड्याला ठार मारतात व मांस शिजवून सामुदायिक भोजन केले जाते. धार्मिक कार्यात पाहूणचार म्हणून दारुला अत्यंत महत्व आहे. जमातीत स्वतःला पवित्र मानणारा व्यक्ती जटा ठेवतो. जेंव्हा देव यश देतो, तेंव्हा देवदेव करतात. सुतकात देवाला हात लावयचा नाही. अंत्यसंस्कारास उपस्थित असेल तर देवाला हात लावायचा नाही. स्त्रीयांनी देवपूजा करायची नाही. स्त्रीची सावलीही देवावर पडू दयायची नाही. देवाला स्त्रिने शिवायचं नाही. कारण स्त्री अनेक पातकाचे कारण मानली जाते. स्त्रीच्या चारित्र्याला, पावित्र्याला या समाजात खुप महत्व आहे. त्यामुळे स्त्रीबद्दल पावित्र्य व आदराची लक्ष्मीची उपमा आहे. या समाजात बाळंतिणीच्या बाबतीतही अंधश्रध्दा दिसून येतात. बाळंतिणीला बाज नसते. तिच्या बाजुने जाळे लावले जाते. जाळयात भुत - जादू, टोणा अडकला जातो अशी श्रध्दा आहे.

**धर्मांतर केले आहे का?**

जिल्ह्यातील पारधी व्यक्तीला धर्मांतराबद्दल विचारले असता सर्व ३०० उत्तरदात्यांनी धर्मांतर केले नाही असे नमुद केले.

बऱ्याचदा वर्तमानपत्रातील धर्मांतराबद्दलच्या बातम्या धर्मांतर प्रक्रियेला चालना देत असतील असे वाटते. पारधी आपला धर्म हिंदूच असल्याचे सांगतो. पण हिंदू पारधी असूनही हिंदू म्हणून त्याला कोणतीच सवलत मिळाली नाही. उलट अन्यायच झाल्याचे सांगण्यात आले. मुळ रहिवासी असतांना यांना प्रवाहापासून दूर रहावे लागते. पारधी अन्याय-अत्याचाराला बळी पडतो तेंव्हा त्यांच्या भावनांशी खेळण्याचा प्रकार म्हणजे त्यांना धर्म परिवर्तनाचे आवाहन करण्यात येते. परंतू धर्मांतर हा पारधी समाजाच्या समस्या सोडविण्याचा मार्ग ठरु शकत नाही आणि ठरणारही नाही. त्यासाठी अज्ञान व अंधश्रध्दांना मूठ-माती देऊन सर्व समाजाने एकवटणे, आपले न्याय हक्क मिळवण्यासाठी घटनात्मक मार्गाचा अवलंब करणे योग्य ठरेल असे मत श्री. परमेश्वर काळे (ह.मु. सोलापूर) यांनी व्यक्त केले.

पारधी म्हणून जन्माला येऊन गुन्हेगारीचा शिक्का मिळाला. त्यातून शासकीय सुटका होऊन विमुक्त जमात असे नामकरण झाले पण आजही या जमातीला दुर्दैवाच्या फेऱ्यातून मूक्त होण्यासाठी किती काळ वाट पाहावी लागणार? तरुणांच्या मनात येणारा धर्मातराचा विचार त्यांची संकटे वाढवणारा ठरु शकतो. हातात शस्त्र घेऊन नक्षलवादी होण्यापेक्षा स्वअस्तित्वाची जाणीव होऊन दर्जा उंचावणारी परिस्थिती हिंदू धर्माने निर्माण केली पाहिजे असेही मत उत्तरदात्यांनी व्यक्त केले.

### ४.४ सामाजिक व सांस्कृतिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण :-

**तक्ता क्र.४.२९**

**उत्तरदात्यांचे इतर जाती-जमातीशी असलेल्या सामाजिक संबंधाचे स्वरुप दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | सामाजिक संबंधाचे स्वरुप | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रासंगिक | १८० | ६० |
| २ | आर्थिक | ०९ | ०३ |
| ३ | धार्मिक | ०३ | ०१ |
| ४ | जवळचे | ५४ | १८ |
| ५ | नाही | ५४ | १८ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

इतर जाती जमातींशी संबंध येतात का ? असे विचारले असता ८२ % उत्तरदात्यांनी होय असे मत नोंदवले. तर संबंध येत नाहीत असे १८ % उत्तरदात्यांनी नमुद केले. सामाजिक संबंधाचे स्वरुप उत्तरदात्यांना पर्याय देऊन विचारले असता मिळालेली माहिती तक्ता कृ. ४.२९ मध्ये दर्शविली आहे. . एकूण उत्तरदात्यांपैकी १८० (६०%) उत्तरदात्यांनी प्रासंगिक स्वरुपाचे संबंध येतात असे सांगितले. हे संबंध तात्पूरत्या स्वरुपाचे, कामापूरते असतात. यांत जवळीकतेचा अभाव असतो. केवळ ९ (३%) उत्तरदात्यांनी आर्थिक स्वरुपाचे संबंध येतात असे मत नोंदवले. पारधी धर्माचे पालन करतांना इतरांना मात्र आवर्जून टाळतात. कारण त्यांची धर्म व्यवस्था वैशिष्टयपूर्ण आहे. धार्मिक स्वरुपाचे संबंध येतात असे फक्त उत्तरदात्यांनी ३ (१%) सांगितले. तर इतरांबरोबर जवळचे संबंध येतात असे ५४ (१८%) उत्तरदात्यांनी सांगितले. पण यात रोटीबेटी व्यवहार नसतात असेही सांगितले. तर ५४ (१८%) उत्तरदात्यांनी इतरांशी कोणत्याही प्रकारचे संबंध येत नाहीत असे स्पष्ट सांगितले.

उत्तरदात्यांनी दिलेल्या वरील माहितीवरुन इतर जमातीशी सामाजिक संबंध ठेवणाऱ्यांचे प्रमाण जरी जास्त असले तरी त्याचे स्वरुप मात्र भिन्न आहे. संबंध नाही ठेवला तर संशयी दृष्टिकोन बळावतो

व इतर समस्यांना तोंड दयावे लागते. त्यामुळे प्रासंगिक स्वरुपाचे संबंध निर्माण केले जातात. तर संबंध न येण्याची कारणे सांगतांना ते कमी लेखतात असे ४ उत्तरदात्यांनी सांगितले. वस्ती गावापासून दूर आहे म्हणून इतर जाती-जमातींशी संबंध येत नाहीत असे एकूण ४२ उत्तरदात्यांनी सांगितले. ८ उत्तरदात्यांनी आम्हीच दूरावा बाळगतो कारण त्यांच्यापासून आम्ही सुरक्षित नाही अशी भिती व्यक्त केली.

जमातीच्या आणि प्रगतांच्या नीतीमुल्यांच्या व प्रामाणिकपणाच्या संकल्पनेत प्रचंड विरोधाभास आहे. चारित्र्य, प्रामाणिकपणा याबद्दल वेगळ्याच चौकटी तयार केल्याने इतर जाती-जमाती व प्रगतांबरोबर दूरावा निर्माण होतो. परिणामी पारधी उपेक्षित आहेत असे प्रस्तूत अध्ययनातुन निदर्शनास येते. प्रस्तुत अध्ययनात बहूतेक उत्तरदाते हे स्वतंत्र पारधी वस्तीतच राहतांना आढळले. प्रगत समाजाचा पारधी जमातीकडे बघण्याचा संशयी दृष्टिकोन फारसा बदललेला नाही हे याठिकाणी लक्षात आले. प्रत्यक्ष भेटी दरम्यान पारधी वस्तीचा पत्ता विचारला असता गावातील सदस्यांनी गोपनीयरितीने पत्ता सांगितला. अलीकडच्या काळात हिंदू चालीरिती व भोवतालच्या जीवनाशी पारधी समाजाचे संबंध वाढत आहेत. सुरुवातीइतके सामाजिक दुरत्व राहिलेले नाही. पण अद्याप पारधी समाज या बाह्य जीवनाशी पूर्णपणे एकरुप झाला नाही. पारधी गावातील जातीं पेक्षा स्वतःला श्रेष्ठ मानतात. त्यामूळे यांचे इतर जाती-जमातींशी जे संबंध येतात ते प्रासंगिक स्वरुपाचेच आढळतात.

**तक्ता क्र. ४.३०**

**उत्तरदात्यांना इतर समाजाकडून मिळणाऱ्या सहकार्यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | प्रसंग | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सण-समारंभ | १२ | ०४ |
| २ | आजार-मृत्यू | ३७ | १२.३३ |
| ३ | वैवाहिक | १२ | ०४ |
| ४ | आर्थिक सहकार्य | ६० | २० |
| ५ | इतर | ४२ | १४ |
| ६ | सहकार्य नाही | १३७ | ४५.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.३० मध्ये उत्तरदात्यांना पारधी म्हणून इतर समाजाशी आंतरक्रिया करतांना त्या आंतरक्रियेचे स्वरुप किंवा त्यांच्यातील सहकार्याचे स्वरुप कशा पध्दतीचे आणि कोणत्या मर्यादेपर्यंत असतात याचा अभ्यास करण्यासाठी इतर समाजाकडून आपणांस सहकार्य मिळते का? व ते कोणत्या प्रसंगी मिळते असा प्रश्न विचारला असता वरीलप्रमाणे माहिती मिळाली.

सण-समारंभानिमित्त सहकार्य मिळते असे एकूण १२ (४%) उत्तरदात्यांनी सांगितले. या जमातीचे स्वतःचे असे खास पारंपारिक सण-समारंभ नाहीत पण यांचा हिंदू धर्माशी आलेल्या संबंधामुळे त्यांना अशा स्वरुपाचे सहकार्य मिळते.आजार-मृत्यूप्रसंगी म्हणजेच थोडक्यात संकटसमयी ३७ (१२.३३%) उत्तरदात्यांनी सहकार्य मिळते असे मत नोंदवले. याठिकाणी एक तर सहानुभूती असते, अन्यथा भीती असते असे उत्तरदात्यांनी सांगितले. पारधी विवाह पध्दत ही अत्यंत साधी आहे. हिंदूच्या विवाह पध्दतीचा अलिकडच्या काळात त्यांच्यावर प्रभाव पडलेला दिसतो. त्यामुळे विवाहप्रसंगी सहकार्य मिळते असे १२ (०४%) उत्तरदात्यांनी सांगितले तर ६० (२०%) उत्तरदात्यांनी आर्थिक सहकार्य मिळते असे सांगितले. सामाजिक संबंधातील ही एक जमेची बाजू असून विशिष्ट कारणपरत्वे किंवा अडचणीच्या काळात, आर्थिक संकटात त्यांना सहकार्य मिळते. गावातील लोक गावाशेजारी राहणाऱ्या पारधी लोकांशी केवळ संघर्ष टाळण्यासाठी सहकार्याने वागतात. संपूर्ण जिल्ह्यात इतर समाज आणि पारधी यांच्यातील सहकार्य आणि विश्वासाचे वातावरण फार कमी पहावयास मिळते. उस्मानाबाद जिल्ह्यात अनेक पारधी अत्याचाराच्या घटना घडल्या आहेत. ४२ (१४%) उत्तरदात्यांनी सहकार्य मिळते असे सांगितले व गुन्हयातील सुटकेसाठी, शासकीय योजना-सवलती संदर्भाने, कागदपत्रासंदर्भाने काही अल्प प्रमाणात मदत, रोजगार देणे असे त्यांचे स्वरुप आहे. १३७ (४५.६७%) उत्तरदात्यांनी कोणत्याच प्रकारचे सहकार्य मिळत नसल्याचे सांगितले. याचे कारण म्हणजे अत्यंत दूर्गम भागत राहतात व कामानिमित्ताने सतत स्थलांतर, गुन्हेगारी इत्यादी मुळे इतरांकडून सहकार्य न घेणेच त्यांना बरे वाटते.

**तक्ता क्र. ४.३१**

**उत्तरदात्यांना स्वजमातीकडून मिळणाऱ्या सहकार्यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | स्वजमातीचे सहकार्य | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ९१ | ३०.३३ |
| २ | नाही | २०९ | ६९.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.३१ मध्ये उत्तरदात्यांना अडीअडचणीमध्ये किंवा इतर प्रसंगी जमातीच्या लोकांचे सहकार्य मिळते का याची माहिती दिली आहे. जमातीतील लोकांकडून सहकार्य मिळते असे ९१ (३०.३३%) उत्तरदात्यांनी सांगितले. तर २०९ (६९.६७%) उत्तरदात्यांनी सहकार्य मिळत नाही असे सांगितले. पूर्वी पारधी मोठया संख्येने एकत्र रहायचे पण आता मात्र संशय, भांडणे, अविश्वास इत्यादीमुळे ते विभक्त झाले. ते सतत आपसात भाकरीसाठी, शिकारीसाठी, बायकोसाठी भांडतात. त्यांचा स्वभाव क्षणात बदलणारा, अगतिक अशा स्वरुपाचा असल्याने आपसात सहकार्यवृत्ती कमी आहे. प्रगत समाज किंवा इतर समाजात अंतर्गत सहकार्य पहावयास मिळते. त्यांच्यात स्वकीयांना धरुन राहण्याची वृत्ती दिसते. पण पारधी समाजात मात्र याउलट परिस्थिती पहावयास मिळाली. जे पारधी नोकरीसाठी, शिक्षणासाठी बाहेर पडले ते पून्हा जमातीशी संबंध ठेवणे पसंत करीत नाहीत. कारण एखादया गुन्हयात विनाकारण नाव दिल्यास पूढील भविष्य संपते असे त्यांचे मत आहे. जातपंचायत, परंपरांचे उल्लंघन, अनैतिकता अशा कारणामुळे समाजात सतत तणावाचे वातावरण पहावयास मिळाले.

**तक्ता क्र. ४.३२**

**पारधी संस्कृतीसंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | संस्कृतीबद्दल मत | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | श्रेष्ठ | ०६ | ०२ |
| २ | कनिष्ठ | २०१ | ६७ |
| ३ | मध्यम/सर्वसाधारण | ९३ | ३१ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.३२ मध्ये पारधी संस्कृतीबद्दल उत्तरदात्यांकडून मिळालेली माहिती दर्शविली आहे. दैनंदिन जीवन जगण्याची पध्दत कशा स्वरुपाची आहे आणि ती तुम्हाला समाजात श्रेष्ठ दर्जा देते का? जर नाही तर मग तुमच्या संस्कृती बद्दल तुमचे मत काय असे विचारले असता फक्त ०६ (२%) उत्तरदात्यांनी स्वत:ची जीवन जगण्याची पध्दती श्रेष्ठ वाटते असे मत नोंदविले. तर २०१ (६७%) उत्तरदात्यांनी ती कनिष्ठ वाटते असे नमूद केले. प्राण्याच्या जन्माला यावे पण पारध्याच्या नको असे मत स्त्री उत्तरदात्यांनी नोंदवले. पारध्यांच्या जीवनातली अगतिकता, जातपंचायतीत स्त्रियांना झालेल्या शिक्षा, उदरनिर्वाहाचे अपुरे साधन, पारंपारिक व्यवसायावर आलेली बंदी, अटकसत्र, गुन्हेगारीचा शिक्का आणि कांही पारधी लोक कायम गुन्हेगारी वृत्ती जोपासत असल्याने संपूर्ण पारधी समाजाकडे

बघण्याचा प्रगतांचा दृष्टिकोन आजही नकारात्मक आहे. ९३ (३१%) उत्तरदात्यांनी पारधी संस्कृती मध्यम/सर्वसाधारण वाटते असे सांगितले आणि पारधी समाजाने बदलणे गरजेचे आहे असेही नमूद केले.

पारधी समाजाचे कार्यकर्ते, अभ्यासक श्री. गिरीश प्रभूणे (मु. पो. पुणे) यांच्या मते पारध्यांची स्वतःची संस्कृती स्वतंत्र व स्वायत्त होती. पण ते आज जे जीवन जगतात ते त्यांच्यावर लादलले आहे. परंपरेने त्यांच्यात स्त्री स्वातंत्र्य, वैवाहिक स्वातंत्र्य हे चांगले गुण आले आहेत. पण आजच्या या लादलेल्या संस्कृतीमुळे पारधी समाज बंदीवासात असून इंग्रजांच्या आगमनापासून पारध्यांच्या मूक्त जीवनावर बंधने आली. सद्यःस्थितीत परिस्थितीला शरण जाऊन समाजाला अनैतिक/गैर वाटणाऱ्या मार्गाने तो जगतो आहे. पारधी जगत असलेली जीवन पध्दती गुंतागुंतीची असून ती त्यांनाही नीट समजलेली नाही. त्यामुळेच पारधी स्वतःच्या जन्माला दोष देऊन पारधी संस्कृतीच कनिष्ठ आहे असे सांगणाऱ्यांचे प्रमाण जास्त असून प्रगतांचा संपर्क आणि प्रसारमाध्यमांच्या प्रभावामुळे त्यांना त्यांची संस्कृती कनिष्ठ वाटते.

**तक्ता क्र. ४.३३**

**उत्तरदाते मद्यपान केव्हा करतात ? यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | मद्यपान केव्हा करता? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नाही | २५ | ८.३३ |
| २ | धार्मिक | ५६ | १८.६७ |
| ३ | सणवार | ०६ | ०२ |
| ४ | पाहूणचार | ७० | २३.३३ |
| ५ | नेहमी | १३७ | ४५.६७ |
| ६ | इतर | ०६ | ०२ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

मद्यपानाची सवय आहे का असल्यास मद्यपान केंव्हा करता याची माहिती दर्शविणारा तक्ता कृ.४.३३ एकूण उत्तरदात्यांपैकी २७५ (९२%) उत्तरदाते मद्यपान करतात तर फक्त २५ (८.३३%) उत्तरदाते मद्यपान करीत नसलेले आढळले.

पारधी समाजात वेगवेगळ्या प्रसंगी मद्यपान करणारांचे स्वरुप वेगवेगळे असून धार्मिक उत्सव - यात्रा व देवकारण या प्रसंगी मद्यपान करणारे ५६ (१८.६७%) उत्तरदाते आहेत. अशा प्रसंगी मद्यपान करणे गैर मानले जात नाही. त्यामुळे धार्मिक प्रसंगी आणि देवकारणात स्त्री-पुरुष मुले इ.

मिळून सामुहिकपणे कुटुंबीयांसह मद्यपान केले जाते. सणवारप्रसंगी म्हणजे विविध सण, आनंदाचे प्रसंग, विवाह इत्यादी प्रसंगी मद्यपान केले जाते. सणवार प्रसंगी मद्यपान करणारे एकूण ०६ (२%) उत्तरदाते आहेत. येथे असे दिसून येते की, याप्रसंगी फक्त पुरुषच मद्यपान करण्याचे प्रमाण सर्वाधिक असून स्त्रिया व मुले मद्य घेत नाहीत. घरी पाहुणे आल्यावर पाहूणचार म्हणून मद्यपान करणारे ७० (२३.३३%) उत्तरदाते आहेत. पारधी समाजात पाहुणचारात मद्याचा समावेश प्रतिष्ठेचा समजला जातो. पाहूणचार म्हणून मद्यपान करणारे सर्व उत्तरदाते पुरुषच आहेत, याचा अर्थ घरी पाहूणे आल्यावर फक्त पुरुष अधिक प्रमाणात मद्यपान करतात. नियमित/नेहमी मद्यपान करणारे १३७ (४५.६७%) उत्तरदाते आहेत. यात पुरुष व मुलांचे प्रमाण अधिक आहे. अलिकडे नियमित मद्यपान करण्याऱ्यांमध्ये तरुण पिढीचे प्रमाण जास्त आहे. त्यातही अति मद्यप्राशन केले जाते. तर इतर कारणांमुळे मद्यपान करणारे ०६ (०२%) उत्तरदाते आहेत. यामध्ये एखादी व्याधी-दुखणे, अपयश, दु:ख, निराशा, जातपंचायतीचा निर्णय इ. कारणामुळे मद्यपान केले जाते असे सांगण्यात आले. एकूणच परंपरा आणि परिस्थितीमुळे मद्यपान केले जाते. त्यांचा धार्मिक विधी, देव-देवतांची पूजा इ. मांसाहार आणि दारुशिवाय होणे शक्यच नाही. मुल जन्मल्यापासून ते मृत्यूनंतरही त्याच्या मुखात दारु सोडली जाते. सुरुवातीला पारधी जी दारु तयार करायचे ती मोहाच्या फुलापासून पारंपारिक पध्दतीने तयार केली जायची. ही दारु आरोग्याला फारशी घातक नव्हती आणि त्याला व्यावसायिक स्वरुपही नव्हते. इतर जमातीचे कांही मोजकेच लोक विक्रीसाठी ही दारु तयार करायचे आणि ती दारु बिगरआदिवासी लोकांमध्येही प्रिय होती. त्यामुळे त्यांच्याकडून तिची खरेदी व्हायची. अलीकडच्या काळात गावाच्या संपर्काने पारधी देशी दारु पितात. आज या समाजात दारुचे व्यसन खोलवर रुजलेले असून सण-समारंभ, धार्मिक विधी, देवकारण, विवाह, जातपंचायत इत्यादी प्रसंगी मोठया प्रमाणात मद्यपान केले जाते. नैसर्गिकरित्या काढलेल्या दारुपेक्षा ही देशी दारु प्रकृतीला अपायकारक असते. सुख-दु:खात दारु पिण्याची प्रथा या समाजात असून ही व्यसनाधिनता पारध्यांच्या मागासलेपणाचे एक कारण आहे. दारु पिण्यासाठी पैसे उसने घेतले जातात किंवा भीक मागूनही दारु पितात. पारध्यांच्या पुढच्या पिढीत दारु, तंबाखु, सिगारेट, गुटखा ही व्यसने फार प्रिय असल्याचे निर्दशनास आले.

प्रत्यक्ष भेटीदरम्यान स्त्रियाही तंबाखु, गुटखा खातांना व बाळगतांना आढळल्या. अवघी १२ वर्षापर्यंतची मुलेही दारुच्या नशेत असलेली आढळली. दारु शरिरासाठी घातक असते आणि त्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होतो. या दारुच्या दुष्परिणांमाबद्दल त्यांना काहीही माहिती नाही हे

सर्वेक्षणादरम्यान लक्षात आले. पारधी सद्य:स्थितीत मोठया प्रमाणात दारु विक्री करतात. पण याबाबत अतिशय गुप्तता बाळगली जाते. कारण हातभट्टीच्या दारुस शासनाने बंदी केल्यामुळे पोलिसांचा ससेमिरा सतत त्यांच्या मागे असतो. त्यामुळे अतिशय गुप्तपणे दारु बनविली व विकली जाते.

**तक्ता क्र.४.३४**

**पारधी वस्तीतील सुविधासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| **सूविधा** | **स्वच्छतागृह** | | **दवाखाना** | | **बाजार** | | **मनोरंजनाचे साधन** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **होय** | **नाही** | **होय** | **नाही** | **होय** | **नाही** | **होय** | **नाही** |
| एकूण | २८ | २७२ | ९७ | २०३ | ११२ | १८८ | २३७ | ६३ |
| **शेकडा प्रमाण** | **९.३३%** | **९०.६७** | **३२.३३** | **६७.६७** | **३७.३३** | **६२.६७** | **७९** | **२१** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.३४ मध्ये उत्तरदात्यांना ते रहात असलेल्या वस्तीतील सुविधासंदर्भाने माहिती घेतली आहे. एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी फक्त २८ (९.३३%) जणांकडे स्वच्छतागृह आहे. हे उत्तरदाते जिल्ह्यातील शहरी भागात राहतांना आढळले. तर २७२ (९०.६७%) उत्तरदात्यांनी स्वच्छतागृह नसल्याचे सांगितले. दवाखाना वस्तीत नाही पण जवळ आहे असे एकूण ९७ (३२.३३%) उत्तरदात्यांनी सांगितले तर २०३ (६७.६७%) उत्तरदात्यांनी दवाखाना वस्तीतच काय पण जवळही नाही. विषबाधा, सर्पदंश, जळीत प्रकरणे, अशा वेळी दळणवळणाची साधने नसल्याने शहरात जाऊन उपचार घेण्यास विलंब लागतो. या विलंबामुळे वेळीच औषधोपचार न मिळाल्याने काही जणांना प्राणांस मुकावे लागले असे नमुद केले. जे उत्तरदाते गावालगत राहतात किंवा प्रत्यक्ष शहरात राहतात त्यांची संख्या अत्यंत अल्प आहे, त्यामुळे तेच उत्तरदाते वरील सुविधांचा लाभ घेतांना निदर्शनास आले. ११२ (३७.३३%)उत्तरदात्यांनी बाजार जवळ असल्याचे सांगितले. तर १८८ (६२.६७%) उत्तरदात्यांना बाजारासाठी जवळच्या गावात, शहरात जावे लागते. दैनंदिन जीवन जगतांना वरील सुविधा अभावी पारधी लोकांच्या अडचणीत आणखीच भर पडते. इतर सुविधांचा अभाव असून . ज्याचा सामुहिक लाभ घेता येईल असे मनोरंजनाचे कोणतेही साधन वस्तीत नाही. २३७ (७९%) उत्तरदात्यांकडे मनोरंजनाचे साधन आहे. पण ती वैयक्तिक आहेत. यामध्ये मुख्यत्वे रेडिओ आणि मोबाईलचा वापर

करतो असे उत्तरदात्यांनी नमुद केले आहे. हा समाज फार मोठया प्रमाणावर रेडिओ ऐकतो. ६३ (२१%) उत्तरदात्यांनी कोणत्याही प्रकारचे मनोरंजनाचे साधन नाही असे नमुद केले.

**तक्ता क्र. ४.३५**

**उत्तरदात्याचे स्वतःचे घर आहे का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | स्वतःचे घर | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १४३ | ४७.६७ |
| २ | नाही | १५७ | ५२.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.३५ मध्ये उत्तरदात्यांच्या घराविषयी माहिती दर्शविली आहे. राहते घर स्वतःच्या मालकीचे आहे का याबद्दल विचारले असता १४३ (४७.६७%) उत्तरदात्यांनी होय असे सांगितले. उत्तरदाते ज्या जागेवर राहतात त्या जागेवर काही ठिकाणी योजनेअंतर्गत घरे बांधून दिली आहेत. पण त्याची नोंद नाही असे सांगितले. संबंधित कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. १५७ (५२.३३%) उत्तरदात्यांनी स्वतःचे घर नाही त्यामुळे कामानिमित्तच्या स्थलांतरामुळे मिळेल त्या जागेवर तात्पूरत्या स्वरुपाचा निवारा उभा करुन राहतो अशी माहिती दिली. अनेक ठिकाणी उत्तरदात्यांनी घर म्हणजे चार भांडे ठेवून स्वयंपाक करायला केलेला निवारा असून बाकी बसणे-उठणे उघड्यावरच करतो. पाहुणे आले तरी बाहेरच पाहूणचार होतो, पती-पत्नी संबंधात अडचण येते असेही सांगितले. घराची उंची कमी असल्याने घरात सहज वावरता येत नाही वा उठबस करता येत नाही. याशिवाय पावसाळयात तर घर पूरत नाही आणि बाहेंरही थांबायला वाव नसतो. अशा पध्दतीची पारध्यांची घरे असून त्या ठिकाणी राहतांना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**तक्ता क्र.४.३६**

**उत्तरदात्यांच्या घराच्या प्रकारासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | घराचा प्रकार | घरांची नोंद आहे | घरांची नोंद नाही | एकूण | शेकडा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाल | - | ०४ | ०४ | ०१.३३ |
| २ | झोपडी | - | ३० | ३० | १० |
| ३ | पत्राशेड | - | १२३ | १२३ | ४१ |
| ४ | दगड-माती | ३० | २५ | ५५ | १८.३३ |
| ५ | वीट बांधकाम | ३२ | ४० | ७२ | २४ |
| ६ | सीमेंट काँक्रीट | १० | ०६ | १६ | ०५.३३ |
| **एकूण** | | **७२** | **२२८** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र.४.३६ मध्ये उत्तरदाते रहात असलेल्या घराचा प्रकार आणि त्याची स्वतःच्या नावे नोंद आहे की नाही याची माहिती दर्शविली आहे. एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी ०४ (१.३३%) उत्तरदाते आजही पालात (पाल म्हणजेच गोधडीची, चादर किंवा ताडपत्रीची बांबु व दोरीच्या सहाय्याने उभी केलेली तंबुसारखी झोपडी) राहतात. पालात राहणाऱ्या चारही उत्तरदात्यांनी ज्या जमिनीवर राहतो त्याची नोंद आमच्या नावे नाही असे सांगितले. झोपडीत राहणारे ३० (१०%) उत्तरदाते असून ते झोपडीत राहतात पण ती जागाही त्यांच्या नावे नाही. अशा प्रकारे गावापासून दूरच्या भागात त्यांनी झोपडी टाकून निवाऱ्याचा प्रश्न सोडवला आहे. जागा स्वतःची नसल्याने इथून दुसरीकडे कधीही जावे लागेल असेही मत त्यांनी नोंदवले. १२३ (४१%) उत्तरदाते पत्र्याच्या शेडमध्ये राहतात. पण हे निवासस्थानही स्वतःच्या मालकीचे नाही. पत्राशेडमध्ये राहणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक आहे. राहत्या जागेवर ताबा किंवा हक्क टिकून रहावा यासाठीही अशा स्वरुपाच्या निवाऱ्याची सोय केल्याचे सांगण्यात आले. पारा ता. वाशी या गावाच्या सरपंच असलेल्या सौ. साखराबाई शिंदे यासुध्दा पत्राशेडमध्येच राहतात. दगडमातीची भिंत आणि वर पत्रे अशा स्वरुपाचे घर असलेल्या उत्तरदात्यांची संख्या ५५ (१८.३३%) आहे. त्यापैकी ३० उत्तरदात्यांनी स्वतःच्या मालकीचे निवासस्थान असल्याचे सांगितले तर २५ उत्तरदात्यांनी त्यांचे निवासस्थान त्यांच्या मालकीचे नाही असे सांगितले. यामध्ये शेतराखण करणारे आणि शेतमजूरी करणारे उत्तरदाते यांचा प्रामुख्याने समावेश असून ग्रामीण भागात शेत शिवारात ते बऱ्याच वर्षापासून राहतात पण घराची मालकी किंवा नोंद नाही असे त्यांनी नमुद केले.

स्वतःचे घर आहे आणि ते स्वतःच्या मालकीचे आहे असे सांगणारे उत्तरदाते शहरी भागाच्या जवळपास राहतांना आढळले. सिमेंट विटाच्या भिंतीवर पत्रे अशी निवासस्थानाची रचना असणारे एकूण ७२ (२४%) उत्तरदाते आहेत. त्यापैकी ३२ (१०.६७%)उत्तरदात्यांनी स्वतःच्या मालकीचे निवासस्थान असल्याचे सांगितले. इथे राहतांना पाणी, वीज नाही अशा अडचणी सांगण्यात आल्या. तर ४० (१३.३३%) उत्तरदात्यांचे घर स्वतःच्या मालकीचे नाही व त्यांची नोंदही नाही. घराच्या मालकीसाठी संघर्ष करावा लागेल पण त्यासाठी लागणारी कागदपत्रे नाहीत आणि त्याबद्दल माहितीही नाही असे त्यांनी सांगितले. १६ (५.३३%) उत्तरदाते हे सिमेंट कॉंक्रीटच्या घरात राहत असून त्यापैकी १० उत्तरदात्यांच्या घराची नोंद आहे. सिमेंट कॉंक्रीटच्या घरात राहणारे ५ टक्के उत्तरदाते हे शिक्षीत, नोकरदार आणि सामाजिक-राजकीय कार्यकर्ते आहेत. सुरुवातीपासून येणाऱ्या मिळकतीतुन राहत्या जागेत घर उभे केले असे त्यांनी सांगितले. यापैकी गोलेगाव पारधी वस्ती ता. भूम येथील माजी सरपंच

श्री. कल्याण शिंदे यांनी म्हाडांतर्गत आणि इंदिरा आवास योजनेतून तेथील पारधी बांधवाना घरे बांधून दिल्याचे सांगितले.

योजनेतुन किंवा स्वमिळकतीतून स्वतःच्या मालकीच्या पक्क्या घरात राहण्याऱ्यांची संख्या अल्प आहे. ७६ टक्के उत्तरदाते हे स्वतःच्या मालकीच्या निवासस्थानात रहात नाहीत. तर २४ टक्के उत्तरदात्यांनी घराची नोंद असल्याचे नोंदवले. यावरुन पारधी जमातीच्या आर्थिक, सामाजिक दर्जात फारसा बदल झालेला नाही असे निदर्शनास येते. ५२ टक्के उत्तरदाते हे अत्यंत अपूऱ्या जागेत आणि कच्च्या घरात राहतात. पक्क्या घरात राहण्याऱ्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. याचा संबंध आर्थिक स्थितीशी असून आर्थिक मागासलेपणामुळे जिल्ह्यातील पारधी जमातीचे कच्च्या घरांत राहण्याचे प्रमाण जास्त आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील (मगर सांगवी) ता. तुळजापूर येथे पारधी प्रथमवसनाच्या प्रयोगांतर्गत मुक्तीनगरची स्थापना करुन त्यांना घरे बांधून दिली. पण आज तिथे एकही कुटुंब राहात नाही. पारधी समाजाचे अभ्यासक व कार्यकर्ते श्री. गिरीश प्रभूणे यांच्या मते संशय, गुन्हेगारी आणि आपसातील भांडणामुळे तसेच प्रगतांच्या व पोलिसांच्या नाहक त्रासाला सामोरे जाण्यापेक्षा स्वतःच्या सुरक्षिततेसाठी स्थलांतर करणे त्यांना सोयीचे वाटते. पूर्वी पारधी एकत्र रहायचे. पण आता अविश्वास, संशय यामुळे ते विभक्त राहतात. बहुतेक ठिकाणी गावकरी यांना स्वीकारीत नाहीत. यामुळे राहत्या जागेचा ताबा व संबंधीत कागदपत्रे यासंबंधी अडचणी येतात असे एका पारधी समाजाच्या कार्यकर्त्याने सांगितले. गायरान जमीन, वनखात्याच्या जमिनीवर दीर्घकाळापासुन रहात असल्याने सध्याच्या कायद्याने त्या जमिनीचा ताबा मिळाला असला तरी इतर अटींची पूर्तता न झाल्याने ती जागा व राहाते घर टिकवून ठेवण्यात अनेक अडचणी येतात. वनखात्याच्या जागेत राहात असल्याने वस्ती जाळली, पंचनामा केला पण कसल्याच प्रकारची कारवाई झाली नाही. त्यासाठी उपोषण केले, आत्महत्येचाही प्रयत्न केला पण काही उपयोग झाला नाही असे डिकमल वस्ती ता. तुळजापूर येथील उत्तरदात्याने सांगितले. रहायला निवारा आहे पण मुठभर माती मालकीची नाही. अशी स्वातंत्र्याच्या ६० वर्षानंतरही पारधी समाजाची दैन्यावस्था पहायला मिळाली. या अवस्थेला तो स्वतः तसेच समाज व शासनही जबाबदार आहे. आर्थिक सुरक्षिततेबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक सुरक्षिततेचीही गरज असल्याचे निदर्शनास आले.

**तक्ता क्र. ४.३७**

**उत्तरदाते मतदान करतात का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | मतदान | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २१० | ७० |
| २ | नाही | ९० | ३० |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांना मतदान करता का? याबद्दल माहिती विचारली असता २१० (७०%) उत्तरदात्यांनी आपण मतदान करतो अशी माहिती दिली. ९० (३०%) उत्तरदात्यांनी मतदान करीत नसल्याचे सांगितले.

मतदान का करता याबद्दल मिळालेली माहिती अशी की, निवडणुकीसाठीचे उमेदवार त्या-त्या प्रभागातील लोकसंख्येचा विचार करुन निवडणूक ओळखपत्र पुरवण्याची व्यवस्था करतात. शिवाय येण्याजाण्याची सोयही केली जाते.

मतदान करतांना कोणते निकष महत्वाचे मानले जातात याबद्दल काही पर्याय सांगून त्याबदलचे मत जाणून घेतले असता पैसा , व्यक्ती , चिन्ह , पक्ष, ओळख अशा प्रकारे प्राधान्यक्रम दिसून आला. जो अधिक पैसा देतो त्याला मत दिले जाते असे काही मतदारांनी सांगितले.

**तक्ता क्र. ४.३८**

**उत्तरदात्यांच्या भाषेत बदल झाला का व झालेल्या बदलाच्या कारणांची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | भाषेत बदल झाल्याचे कारण | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बोली भाषा आवडत नाही | ०९ | ०३ |
| २ | प्रगतांचा संपर्क | २१६ | ७२ |
| ३ | जाणीवपूर्वक बदल | ६३ | २१ |
| ४ | शासकीय कामकाज | ०६ | ०२ |
| ५ | बदल नाही | ०६ | ०२ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्याच्या भाषेत बदल झाला का आणि झालेल्या बदलाच्या कारणांची माहिती वरील तक्ता क्र. ४.३८ मध्ये दर्शविली आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाच्या भाषा बदलासंबंधाने एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी ०२ टक्के उत्तरदात्यांनी भाषेत बदल केला नाही असे मत नोंदवले, तर ९८ टक्के उत्तरदात्यांनी भाषेत बदल झाल्याचे सांगितले. असे असले तरी पारधी लोक कुटुंबात आणि स्वकीयांबरोबर पारधी भाषेचाच वापर करीत असल्याचे दिसून आले. जिल्ह्यात मराठी भाषेचा वापर अधिक असल्यामुळे पारधी जमात मराठी भाषेचा वापर मोठया प्रमाणात करीत आहे. सद्यःस्थितीत सुशिक्षित, तरुण पिढी मराठी मिश्रीत पारधी भाषा बोलतात. उत्तरदात्यांना मातृभाषा कोणती असे विचारले असता वाघरी (६४%), गुजर मारवाडी (९१%), मारवाडी (१२%) मेवाडी (०५%) राजस्थानी (०१%)आणि गुजराती (०९%) असे मत नोंदवले.

ब्रिटीश काळात औरंगाबाद आणि सोलापूर येथील पारध्यांच्या ज्या वसाहती (सेटलमेंटस्) होत्या तेथील पारधी लोक उस्मानाबाद जिल्ह्यात स्थलांतरीत झाल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे वसाहतीत असताना हिंदी, मराठी, घिसाडी व बंजारा या भाषेच्या संपर्कात आल्याने त्याचाही परिणाम बोली भाषेवर जाणवतो. असे असले तरी १०० टक्के उत्तरदाते मराठी बोलतात. बोलीभाषेतील या परिर्वतनांची कारणे जाणून घेतली असता ०९(३%) उत्तरदात्यांनी बोलीभाषा आवडत नाही आणि पारधी भाषेत बोलल्यास पोलीस पकडतात असे सांगितले. २१६ (७२%) उत्तरदात्यांनी शेतराखण, मजूरी, भिक्षा, दारुविक्री आणि गुन्हेगारी निमित्ताने पोलिसांशी संपर्क अशा अनेक निमित्ताने प्रगतांशी संपर्क आल्याने भाषेत बदल झाला असल्याचे सांगितले. ६३ (२१%) उत्तरदात्यांनी बोलीभाषेत जाणीवपूर्वक बदल केल्याचे मत नोंदवले. ०६ (०२%) उत्तरदात्यांनी शासकीय कामकाजासाठी भाषेत बदल केल्याचे सांगितले. उत्तरदात्यांच्या मुलांना पारधी भाषा बोलता येत नसल्याने जातीचे प्रमाण पत्र मिळाले नाही. त्यामुळे मुलाला पारधी बोलीभाषा शिकवावी लागली असेही एका उत्तरदात्याने नमुद केले. बोलीभाषेचा व्यवहारात फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे या बोलीभाषेच्या अभ्यास व संवर्धनाकडे दुर्लक्ष केले जात आहे असे एका पारधी कार्यकर्त्याने निदर्शनास आणून दिले. बोलीभाषेतून शिक्षण मिळाले तर मुलांना शिक्षणात गोडी वाटुन साक्षरतेचे प्रमाण वाढू शकते असेही एका उत्तरदात्यांने मांडले. ०६ (०२%) उत्तरदात्यांनी बोलीभाषेत बदल झाला नाही असे मत नोंदले. जमातीत, वस्तीत, पाहुण्यांबरोबर, कुटुंबात पारधी भाषा बोलली तरच जवळीक निर्माण होते असे त्यांचे मत होते.

संशोधिकेला सर्वेक्षणादरम्यान वरील मत सत्य असल्याचे निदर्शनास आले. संशोधिका काय माहिती घेणार आहे हे उत्तरदात्यांना पारधी भाषेतून सांगताच त्यांनी निर्भयपणे आणि विश्वास ठेवून माहिती दिली. जेव्हा पारधी जमातीची व्यक्ती सोबत नव्हती अशा प्रसंगी हे पोलिसांचे खबरी असतील या संशयाने तसेच यांना दिलेल्या माहितीचा गैरफायदा घेतील व संकोची वृत्तीमुळे माहिती देताना मोकळेपणाचा अभाव जाणवला. याच कारणामुळे एक-दोन ठिकाणी माहिती देण्यास नकार दिला तर एका उत्तरदात्यांने माहिती दिल्यानंतर दिलेल्या माहितीचा गैरफायदा घेतल्यास वाईट परिणाम होतील अशी धमकी दिली.

**पारधी बोलीभाषेचे स्वरुप :-**

पारधी लोक ज्या जिल्ह्यात राहतात तेथील भाषा त्यांनी अवगत केली असून पारधी बोलीभाषा ही गुजराती आणि राजस्थानी यांच्या मिश्रणातुन तयार झाल्याचे उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीवरुन लक्षात येते. गुजरातेतून स्थलांतरीत होऊन आल्यामुळे त्यांच्या बोलण्यात अनेक गुजराती शब्द येतात. जिल्ह्यातील पारधी बोलीचा नमुना पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| तान्हू नाम शू छ? | - | तुमचे नाव काय? |
| तूं चेव्हां शाळम शिखस? | - | आपण कोणत्या शाळेत शिकता? |
| ताऱ्ही तबेत चीम छं? | - | तुमची तब्येत कशी आहे? |
| हामारु कुटूम्ब खठलू लय भारी छं. | - | आमचे कुटुंब फार मोठे आहे? |
| तुन्ह चेतरां छोकरा छं ? | - | तुला किती मुले आहेत? |
| हामणे चंतरा वाग्या? | - | आता किती वाजले? |
| म शाळं शिखे तो कायनी. | - | मी शाळा शिकलेलो नाही. |
| आर लढायी शान्ह करोस? | - | अरे ! भांडता कशाला? |
| आज बजार छ. | - | आज सोमवार आहे. |
| म घनूं इचार कऱ्यो. | - | मी खूप विचार केला. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एक - एक, | दोन - ब, | तीन - द्ररण, | चार - चार, | पाच - पांच, |
| सहा - छों, | सात - षात, | आठ - आठ, | नऊ - नऊ, | दहा - दष. |

भाषा हा एक सांस्कृतिक घटक असून ते मानवी जीवनाचे एक वैशिष्ट्य आहे. भावना, विचार, अनुभव व्यक्त करण्यासाठी भाषा हे एक समर्थ माध्यम आहे. असे असले तरी वास्तव्याचे ठिकाण, व्यवसाय यामुळे भाषा बदलत आहे. म्हणूनच जिल्ह्यातील पारधी समाजात बोलीभाषेबरोबरच अशुध्द मराठी भाषा बोलली जात असल्याचे वरील माहितीवरुन असे दिसून येते.

**तक्ता क्र. ४.३९**

**उत्तरदात्यांचा पोषाख कसा आहे? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पोषाख | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आधूनिक | २५० | ८३.३३ |
| २ | पारंपारिक | ५० | १६.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र.४.३९ अनूसार, २५० (८३.३३%) उत्तरदात्यांनी प्रगतांप्रमाणे किंवा आधूनिक पोषाख परिधान करीत असल्याचे नमुद केले आहे. हे उत्तरदाते २० ते ४० वयोगटातील आहेत. स्थलांतर, करमणूकीची साधने, परस्पर संपर्क यामुळे आपल्या पोषाखात बदल घडवून आणलेला आहे असे सांगण्यात आले.

आधुनिक पोषाख म्हणजे पँट-शर्ट आणि स्त्रिया साडी अशा स्वरुपाचा पोषाख असल्याचे आढळले. इथे गावातील लोकांच्या पेहरावाचे अनुकरण केलेले आढळले. बऱ्याच वेळा हा पोषाख अस्वच्छ असून कामाच्या स्वरुपामुळे पोषाख स्वच्छ ठेवणे शक्य नसल्याचे सांगितले गेले. ५० (१६.६७%) उत्तरदात्यांनी पारंपारिक पोषाख परिधान करीत असल्याचे सांगितले. हे उत्तरदाते ४० वर्षापेक्षा अधिक वयाचे असून वाढत्या वयोमानाप्रमाणे पुरुष धोतर-शर्ट तर स्त्रिया नऊवार साडी आणि चोळी असा पोषाख परिधान करताना आढळले. व्यवसायाचे स्वरुप, दूर्गम भागात वस्ती, शिक्षणाचा अभाव, यामुळे लंगोटी, लुंगी आणि काष्टा साडी असा पारंपारिक पोषाख नसला तरी धोतर-कुर्ता आणि नऊवार साडी असा साधा व ग्रामीण भागातील पारंपारिक पोषाख परिधान करीत असल्याचे निदर्शनास आले. मुलांच्या अंगावर मात्र अपुरे, अस्वच्छ व जुने कपडे दिसून आले. गरिबीमुळे कपडे खरेदी करुन अंगावर घालणे आजही अनेकांना शक्य नाही. शाळेत दिलेला गणवेश आणि मागुन आणलेले कपडे वर्षभर पुरवावे लागतात असेही सांगण्यात आले.

**रुढी - परंपरा :-**

या समाजात अंधश्रध्देपोटी बऱ्याच परंपरा पाळल्या जातात. परंपरेने चालत आलेले जमातीचे नियमांचे आजही नित्यनियमाने पालन केले जाते. घर बांधणे अधर्म मानले जाते. पायात वहाणा न वापरणे, डोक्यावरचे केस न काढणे, घरात दिवा न लावणे, देव उघड्यावर न ठेवणे इत्यादी प्रथा पाळल्या जातात. पारधी पुरुष आई किंवा पत्नी शिवाय इतर स्त्रिने केलेला स्वयंपाक खात नाही. परस्त्रीचा स्पर्शही अधर्म मानला जातो. पारधी स्त्री व पुरुष एका अंथरुणावर बसत नाहीत. पारधी स्त्रिने ओलांडलेली वस्तू किंवा चूकून पाय लागलेली वस्तू फेकून दिली जाते. देवकार्य किंवा धार्मिक विधीत स्त्रीचा सहभाग नसतो. देव ठेवलेल्या दिशेला पाय करुन स्त्रिने झोपायचे नाही कारण पारधी बाईचे पाय पापी असतात असे मानले जाते. पारधी स्त्रिने जमीनीवर न बसता उताराकडे बसायचे. पालाच्या वरच्या दिशेने (वरलाकडून) स्त्रिने जायचं नाही. आईच्या व इतर पारधी स्त्रीच्या साडीलाही मुलगा स्पर्श करीत नाही.

स्वत:च्या परंपरेप्रमाणे जीवन जगणे, स्वत:चे वर्तन करणे, देवधर्मांना भजणे, परंपरा म्हणून जुन्या नियमांचे पालन करणे यातच हा समाज गुरफटलेला असतो. रुढी व प्रथांचे पालन केले नाही तर जातनिंदेला व समाज बहिष्काराला सामोरे जावे लागते. हा समाज पारंपारिक नियमांचा आदर करतो. नवस, कर्मकांड, उपवास, बळी देणे या सारख्या रुढी प्रचलित आहेत. परंपरागत संकेतांचा भंग केल्यास जातपंचायतीला समोरे जावे लागते. परंपरेने ते कोणत्याही इतर जातीची सेवा करीत नाहीत. पारधी विवाह प्रथा, धार्मिक विधी, मृतविधी, आर्थिक संकेत, सामाजिक, सांस्कृतिक जीवनात रुढी, परंपरांना जपतो. कारण या प्रथा - परंपरांना धार्मिक आधार आहे. जुन्या प्रथा बाळगणे म्हणजे जात नियमांचे पालन करणे असा होतो. आज या प्रथा, परंपरा प्रगतांच्या दृष्टिने चूकीच्या, अशास्त्रीय असल्या तरी सामाजिक दृष्ट्या त्यांचे महत्त्व नाकारता येत नाही.

**अंत्यसंस्कार :-**

मृतावरील संस्कार हे हिंदू संस्काराप्रमाणेच असून मृत व्यक्तीचे दफन करतो असे २९० (९६.६७%) उत्तरदात्यांनी सांगितले. अंत्यसंस्कार विधी मुस्लीम समाजाशी साधर्म्य दाखवतो पण पूर्वीच्या काळी शिकार या व्यवसायामुळे विधी करण्यास पैसा तसेच स्वतंत्र स्मशानभूमीच्या जागेचा प्रश्न होता. पारधी जमातीत प्रामुख्याने दफनभूमी शक्यतो विहीरीच्या भराजवळ दफन केले जाते त्याचे कारण इतरत्र दफन केल्यास जमीन नांगरणीच्या वेळी ती जागा उखडण्याची शक्यता असते असे

सांगितले गेले. दफन केल्यानंतर त्या ठिकाणी कोणताही विधी नसतो. तिसऱ्या दिवशी भाकरी वाटतात आणि हिंदू धर्माप्रमाणे दिवसाचे करतात. तसेच पितृपक्षात पितरांना जेवू घालतात. मृताचे दहन करणारे १० (३.३३%) उत्तरदाते आढळले. ते शहराच्या आसपास राहतात आणि त्यांनी जागेच्या अभावी मृत व्यक्तीवर अग्निसंस्कार करण्याची पध्दत स्विकारलेली दिसते. पण आजही पारधी समाजाला अंत्यसंस्कार करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यापैकी महत्त्वाचा प्रश्न म्हणजे स्वतंत्र स्मशानभूमी होय.

**तक्ता क्र. ४.४०**

**उत्तरदात्यांना स्वतंत्र स्मशानभूमी आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | स्मशानभूमी | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आहे | ४५ | १५ |
| २ | नाही | २५५ | ८५ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र.४.४० मध्ये दर्शविलेल्या आकडेवारीनुसार ४५ (१५%) उत्तरदात्यांनी शहरालगत राहत असल्याने स्मशानभूमी असल्याचे सांगितले. पण ही उपलब्ध स्मशानभूमी इतर समाजाची असून वापरण्यास परवानगी घेतल्याचे सांगितले. त्यांचा स्वतंत्र स्मशानभूमीचा प्रश्न तात्पुरता मिटला असला तरी हे प्रमाण अत्यंत अल्प असून सुमारे २५५ (८५%) उत्तरदात्यांनी अंत्यसंस्कारासाठी स्वतंत्र स्मशानभूमी नाही असे मत नोंदवले. कामानिमित्त स्थलांतर, जमातीतील ऐक्याचा अभाव, विश्वासाच्या वातावरणाचा अभाव असल्याने आणि शासकीय दुर्लक्षामुळे पारध्यांना अंत्यसंस्कारासाठीसुध्दा अनेक अडचणींना सामोरे जावे लागते अशी दुदैवी परिस्थिती येथे निदर्शनास येते .

**जातपंचायत :-**

पारधी जमातीची जातपंचायतीची स्वतंत्र अशी व्यवस्था आहे. जमातीवरील सामाजिक, अनौपचारिक नियंत्रणाचे ते एक प्रभावी साधन असून जमातीतंर्गत निर्माण झालेले कौटुंबिक, सामाजिक, वैवाहिक, राजकीय, आर्थिक अशा सर्व प्रकारचे प्रश्न व अडचणी आजही जातपंचायतीमार्फतच सोडविले जातात. न्यायव्यवस्थेच्या संदर्भात त्यांच्या ब्रिटीश काळातील जीवनात आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या जीवनात फारसा फरक पडल्याचे दिसत नाही. घटना, तरतुदी, कायद्याची

बंधने त्यांच्यावर जरुर पडतात. पण यामुळे पारध्यांच्या मानसिकतेवर फारसा परिणाम झाला नसून शासकीय योजना आणि कायद्याचे राज्य त्यांच्यापर्यंत पोहोचलेच नाही. त्यामुळेच त्यांची परंपरागत जातपंचायतीवरील श्रध्दा आणखी दृढ होत असून जातपंचायतीचे पालन करणे हा आपला पवित्र धर्म आहे अशी पारध्यांची भावना आहे.

सर्व ३०० उत्तरदात्यांनी आजही जमातीत जातपंचायत आहे असे सांगितले. सद्यःस्थितीत जनगणना किंवा इतर संदर्भाने शासनाचा व पोलिसांचा वाड्या-वस्त्या आणि पारधी वस्तीशी सततचा संपर्क येत असूनही पारधी लोक प्रगतांच्या संस्कृतीशी पूर्ण एकरुप होऊ शकले नाहीत. त्यामुळे प्रत्येक पारध्याच्या जीवनात जातपंचायतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. एखादी व्यक्ती न्यायालयात गेलीच तर ती केस पुन्हा जातपंचायतीत सुनावणीसाठी घेतली जाते. त्याशिवाय पारध्यांना योग्य न्याय मिळल्याचे समाधान वाटत नाही. जमातीचे नियम, परंपरा यांची जातपंचायतीला पूर्ण माहिती असते अशी त्यांची श्रध्दा असल्याने इतर माध्यमातून न्यायनिवाडा झाला तरी त्यात अपूर्णता वाटते आणि तो खटला जातपंचायतीत गेल्यावरच पूर्ण होतो असे मत अनेकांनी नोंदवले.

जातपंचायत सर्वांना समान न्याय देते का ? याबद्दल माहिती विचारली असता ७१ टक्के उत्तरदात्यांनी होय असे मत नोंदवले तर २९ टक्के उत्तरदात्यांनी जातपंचायत समान न्याय देत नाही व तेथेही पक्षपातीपणा होतो आणि जो जास्त पैसा देईल त्याच्या बाजुने निकाल देतात असे मत नोंदविले. उस्मानाबाद जिल्ह्यात जातपंचायतीच्या चुकीच्या निर्णयामुळे काहींनी आत्महत्या केल्या. त्यामुळे काही वर्षापासून जिल्ह्यात जातपंचायती बंद आहेत असे एका उत्तरदात्याने सांगितले.

**तक्ता क्र. ४.४१**

**पारधी जमातीत जातपंचायत असावी का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | जातपंचायत असावी का ? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २३४ | ७८ |
| २ | नाही | ०६६ | २२ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.४१ अनुसार २३४ (७८%) उत्तरदात्यांनी जमातीसाठी जातपंचायत असावी असे मत नोंदवले तर ६६ (२२%) उत्तरदात्यांना जातपंचायत नसावी असे वाटते ज्यात स्त्रियांची संख्या अधिक आहे. आजची जातपंचायत स्त्रीसंबंधी खटल्याभोवती केंद्रीत झाली असून स्त्री हे विनाशाचे,

अनर्थाचे कारण मानुन स्त्रीच्या संदर्भाने अनेक अंधश्रध्दा जमातीत पाळल्या जातात. स्त्रीच्या चारित्र्याबद्दल सतत संशय बाळगल्याने नेहमी अशा स्वरुपाचे खटले जातपंचायतीत घेतले जातात. गुन्हा केलेला नसतांना उकळत्या तेलात हात घातला तरी भाजतेच, मग कबूल करुन आर्थिक दंड देण्यातच भले असते असे रोहकल पारधी वस्ती ता. परंडा येथील एका स्त्री उत्तरदातीने सांगितले. पारध्यांच्या जमातीतंर्गत सुव्यवस्थेसाठी जातपंचायत महत्त्वाची भूमिका बजावते त्यामुळे आजही जातपंचायतीची गरज उत्तरदात्यांना वाटते. आज जमातीचे शिक्षा व दंडाचे पारंपारिक अलिखित नियम बदलत आहेत. पण जमातीत जातपंचायतीचे अस्तित्व टिकून आहे. वादीच्या मागणीनुसार, खर्चाची जबाबदारी निश्चित करुन पंचायत बसवली जाते. शक्यतो देवकारणाच्या वेळी खऱ्या खोटयाचा निवाडा केला जातो. जातपंचायतीत वसून झालेल्या दंडाच्या रक्कमेतून जेवणावळी केल्या जातात. पूर्वी जमातीची एक विशिष्ट व्यक्ती जातपंचायत भरण्याची पूर्वकल्पना देण्यासाठी पोलिसांना संशय येणार नाही याची दक्षता घेत वस्तीवर जाऊन निरोप देत असे. पण आज मात्र वस्तीतल्या एखाद्या व्यक्तीकडे मोबाईलद्वारे निरोप दिला जातो. शक्यतो जातपंचायतीची ठिकाणे ठरलेली असतात. उस्मानाबाद जिल्ह्यात परंडा आणि सोनारी इथे वर्षातून एकदाच जातपंचायत बसते. साध्या खटल्यासाठी वस्तीतच अनुभवी व्यक्ती परंपरेने पंच म्हणून काम पाहते. गुन्हयाचे स्वरुप पाहून शिक्षा देतात. पूर्वी काही शिक्षांचे स्वरुप विकृतीदर्शक, विचित्र अनाकलनीय होते.

**तक्ता क्र. ४.४२**

**पारधी जमातीत जातपंचायतीच्या निर्णय प्रक्रियेची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | जातपंचायतीतील खटल्याचे स्वरुप | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | चोरी / फसवणूक | ५१ | १७ |
| २ | कौटुंबिक कलह | ०९ | ०३ |
| ३ | अनैतिकता | ३६ | १२ |
| ४ | घटस्फोट | ०४ | १.३३ |
| ५ | वरील सर्व | २०० | ६६.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्यांनी जातपंचायतीमध्ये कोणत्या बाबतीत निर्णय प्रक्रिया चालते. यासंबंधी वरीलप्रमाणे माहिती दिली. चोरी किवा फसवणूक संदर्भाने ५१ (१७%) उत्तरदात्यानी पंचायतीत तक्रार केलेली आहे. जमातीत अशा स्वरुपाच्या गुन्ह्याबद्दल आर्थिक दंडाची शिक्षा केली जाते असे उत्तरदात्यांनी सांगितले. कौटुंबिक संघर्षामध्ये पती-पत्नीमधील भांडणे किंवा आरोप, संशय यासंदर्भात जातपंचायतीकडे तक्रार

करुन न्याय मागितला जातो. असे मत नोंदवणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०९ (३%) इतकी आहे. अनैतिक वर्तणूकीच्या संदर्भाने निर्णय दिला जातो असे ३६ (१२%) उत्तरदात्यांनी सांगितले. तर ०४ (०१.३३%) उत्तरदात्यांनी पती-पत्नी विभक्त होण्याबाबतीत जातपंचायत योग्य निर्णय देते असे मत नोंदवले. एकूण उत्तरदात्यांपैकी २०० (६६.६७%) उत्तरदात्यांनी जातपंचायतीत वरील सर्वच तक्रारीबद्दल निर्णय दिला जातो असे मत नोंदवले.

एकंदरीत वरील तक्त्यावरुन जमातीतील सर्व समस्या, तक्रारी यांचे निवारण करण्याचे कार्य पंचायत करते असे दिसून येते. पारधी जमातीच्या परंपरा, वागण्याचे संकेत यात कमालीची गुंतागुंत असून ती सोडवण्यासाठी जातपंचायतच योग्य वाटत असल्याने आजचे कायदे, तरतुदी, बदल त्यांनी समजून घेतले नाहीत आणि समजतही नाही. कायदयाबद्दलचे अज्ञान याठिकाणी निदर्शनास आले. कोर्टकचेरीत अपयश येते. तसेच जातपंचायती ऐवजी कोर्टात गेल्यास देव शिक्षा करतो अशी त्यांची मानसिकता झाली आहे. संघर्ष हा पारध्यांच्या पाचवीला पुजला असल्यामुळे सामाजिक, आर्थिकदृष्ट्या अलिखित स्वरुपाची जातपंचायत परवडते असे मत नोंदवले.

**जातपंचायतीचे कार्य :-**

जातपंचायत ही गुन्हयाचे स्वरुप आणि त्यानुसार शिक्षा देऊन सामाजिक नियंत्रणाचे कार्य पार पाडते. पूर्वी काही शिक्षा अघोरी स्वरुपाच्या होत्या. सद्यः स्थितीत मात्र या शिक्षेच्या स्वरुपात बदल झाला असून आज पंचायतीत अनेक गुन्हयासाठी आर्थिक दंड केला जातो. दंडाची रक्कम फार मोठी असते. सर्वेक्षणामध्ये उत्तरदात्यांनी पंचायतीच्या कार्याचे स्वरुप गुन्हा व शिक्षा देण्याच्या पध्दती पुढील प्रमाणे सांगितले.

| | | |
|---|---|---|
| भांडण / खोटा आळ घालणे | - | आर्थिक दंड |
| अनैतिक संबंध | - | बहिष्कृत करणे, उकळत्या तेलातून नाणे |
| काढणे | | |
| खुन | - | २ लाख रु. खटल्याचा खर्च |
| प्रेमविवाह | - | आर्थिक दंड (जो ५ कुळांमध्ये वाटून घेतात) |
| चोरी / फसवणूक | - | आर्थिक दंड / गाईचे मांस खाण्यास भाग |
| पाडणे. | | (पारधी मांसाहारी आहेत. पण पारधी |

| | | |
|---|---|---|
| | | स्वत:चा धर्म हिंदू सांगतात. हिंदू धर्मात गाईला पवित्र स्थान असून त्याशिवाय पारध्यांना गाईचे इतर फायदे होतात. त्यामुळे पारधी समाजात गोमांस निषिद्ध आहे.) |
| विवाहपूर्व संबंध | - | २५ हजार रु. दंड किंवा सक्तीने लग्न लावणे |
| निंदा किंवा गैरसमज पसरवणे | - | कबुली देणे / आर्थिक दंड |
| बाईचा बट्टा<br>फोकाचा मार | - | इमान करणे (तेलातून पैसे काढणे) / |
| पोलिसांना खोटी नावे सांगणे | - | आर्थिक दंड |
| लाथ मारणे, चप्पल मारणे | - | आर्थिक दंड |
| स्त्रीच्या लुगड्याखालुन जाणे | - | आर्थिक दंड |
| परस्त्रीने बनवलेले अन्न खाणे | - | आर्थिक दंड (पुरुषाने परस्त्रीच्या हातचे, विवाहीत बहीणीच्या हातचे न खाता फक्त अविवाहित बहीण, आई आणि पत्नी यांनीच बनवलेले अन्न खायचे, अन्यथा स्वत:बनवून खायचे. पण परस्त्रीच्या हातचे खाणे गुन्हा मानला जातो.) |
| पती -पत्नी संघर्ष | - | सोडचिठ्ठी देणे / मुलीच्या कुळातील मुलगी पून्हा त्या मूलाला देणे नाही. |
| खोट्या गुन्हयात गोवणे, वैरभावाने नाव सांगणे | - | जबर आर्थिक दंड |

अशा प्रकारे पारधी जमातीत कोणतेही प्रकरण जातपंचायतीमार्फतच मिटवले जाते. पंचायतीच्या विक्षिप्त प्रथांना पारधी आजही मान्य करतात. याशिवाय नवराबायकोतील वाद, चोरीच्या मालाची न्यायवाटणी न करणे, स्त्रीने स्वमुत्र फेकून बाट लावणे, हुंडा बुडवणे, स्त्रीविषयक नियमांचे उल्लंघन

होणे अशा विषयावरही न्यायनिवाडा केला जातो. मागासलेली, अन्याय-अत्याचाराला सतत सामोरी जाणारी पारधी जमात कायदा, पोलीस, ग्रामपंचायत इत्यादी पेक्षा पंचायतीवरच विश्वास ठेवते. जातपंचायतीचे काम ग्रामपंचायतीने करु नये कारण तिला जमातीचे व पंचायतीचे नियम याबद्दल माहिती नसते. तसेच गावकऱ्यानी आजपर्यंत पारध्यांचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करुन घेतला असे अनेक उत्तरदात्यांनी नमुद केले. आजची जातपंचायत पैशासाठी चालू असून जातपंचायतीत बाईच्या इज्जतीची फजिती होते. जातपंचायतीत लाखोंचा दंड केला जातो त्याद्वारे पुरुषांना पैसा मिळतो. म्हणूनच पुरुष पंचायत बंद पडू देत नाहीत. ती पुरुषांच्या आर्थिक सोयीची झाली आहे. असे मत अनेक स्त्री उत्तरदात्यांनी नोंदविले. दंडाची रक्कम भरण्यासाठी दरोडा/चारी केली जाते. म्हणजेच एका संकटातुन सुटकेसाठी प्रयत्न करतांना दुसऱ्या संकटात अडकल्याचे उत्तरदात्यांनी सांगितले.

या जमातीतील वधुमूल्य व लग्नाचा खर्च हप्त्या-हप्त्याने भरण्याची प्रथा जातपंचायतीने मान्य केल्याचे आढळले. पारध्यांच्या जातपंचायतीत स्त्रीलाही स्थान आहे. जिल्ह्यातील परंडा, शेळगाव येथील स्त्रियांनी वकील व पंच म्हणूनही काम केले आहे. जमातीत अनैतिक संबंधाला कडाडून विरोध आहे. अनैतिकतेबाबत जातपंचायतीने निर्णय देऊनही वडिलांना मुलीचे अनैतिक संबंध सहन न झ ााल्याने त्यांनी मुलीचा खुन केला. आजही जातपंचायत पारंपारिक पध्दतीनेच बसते. २१ व्या शतकातही तिचे अस्तित्व असून इतर अनेक जमातीपेक्षा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेली पारधी जमात न्यायनिवाड्यासाठी पंचायतीलाच महत्त्व देते.

**तक्ता क्र. ४.४३**

**जातपंचायतीला असलेल्या कायद्याच्या बंदीसंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | माहिती आहे का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २४० | ८० |
| २ | नाही | ६० | २० |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

सद्यःस्थितीत जातपंचायतीला कायदयाने बंदी आहे याची पारधी जमातीला माहिती आहे की नाही या संबंधीची आकडेवारी वरील तक्ता क्र. ४.४३ मध्ये दर्शविली आहे. एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी २४० (८०%) उत्तरदात्यांना जातपंचायतीला कायद्याने बंदी आहे हे माहिती आहे. तर ६०(२०%) उत्तरदात्यांनी याची माहिती नसल्याचे सांगितले. माहिती असणारे उत्तरदाते संख्येने अधिक आहेत.

पण जमातीचे सर्व सदस्य जातपंचायतीला मानणारे आहेत. पोलिसांच्या त्रासामुळे जातपंचायतीचे कामकाज गुप्तपध्दतीने चालवले जाते. जातपंचायतीमध्ये प्रत्येक कुळाचा एक असे पाच पंच असून ते वंशपरंपरेने ठरलेले असतात. पण सद्यःस्थितीत प्रगतांचा संपर्क, शिक्षण, पोलिसांच्या ओळखी इत्यादी कारणांमुळे जमातीत पंचायतीचा प्रभाव कमी होत आहे अशीही माहिती मिळाली.

एखादया प्रसंगी न्यायासाठी उत्तरदाते पोलिसस्टेशनमध्ये जाऊन तक्रार करतात काय याची माहिती उत्तरदात्यांकडून घेतली. इतरांकडून पारधी म्हणून झालेल्या अन्यायाची दाद मागण्यासाठी पोलिसांकडे तक्रार करतो असे ५१ टक्के उत्तरदात्यांनी सांगितले तर कोणत्याच प्रसंगी पोलिसांना न्यायासाठी तक्रार केली नाही असे ४१ टक्के उत्तरदात्यांनी नोंदवले. पोलिसांकडे केलेल्या तक्रारी या स्वजमातीतील व्यक्तीविरुध्द नसून इतरांबरोबर झालेले वाद, इतर जाती-जमातीच्या लोकांकडून होणारा त्रास यासंदर्भाने जास्त दिसून आल्या. ज्यांनी पोलिसांकडे तक्रार करीत नाही असे सांगितले. त्यांनी त्यासाठी पोलिस समजुन घेत नाहीत, कायदा समजत नाही, कोर्ट-कचेरीसाठी पैसा नाही, मदत, पाठिंब्याचा अभाव, नाहक त्रास इ. कारणे सांगितली. न्यायाच्या आणि कायदयाच्याबाबतीत पारधी जमातीत अज्ञान, पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन व संभ्रम पहावयास मिळाले. दारिद्र्य, मागासलेपणा, प्रगतांचा नकारात्मक दृष्टिकोन या कारणामुळे स्वतःवर झालेल्या अन्यायाची दाद मागण्यासाठी पारंपारिक की प्रचलित पध्दत स्वीकारावी याबाबत अनिश्चितता आणि अज्ञान दिसून आले.

**तक्ता क्र. ४.४४**

**पारधी जमातीला पोलिसांकडून योग्य न्याय मिळतो का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | न्याय मिळतो | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ९१ | ३०.३३ |
| २ | नाही | २०९ | ६९.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्यांनी पोलिसांकडे तक्रार केली तर त्यांना योग्य न्याय मिळतो का याची माहिती वरील तक्ता क्र. ४.४४ मध्ये दर्शविली आहे. एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी ९१ (३०.३३%) उत्तरदात्यांनी योग्य न्याय मिळतो असे मत नोंदवले तर २०९ (६९.६७%) उत्तरदात्यांनी पोलिसांकडून योग्य न्याय मिळत नसल्याचे सांगितले. उस्मानाबाद जिल्हा पारध्यांवर होणाऱ्या अत्याचारामुळे कुप्रसिध्द आहे. चोरी, दरोडा, किंवा इतर प्रकरणात पारधी व्यक्ती पकडली गेल्यास मिळणारी वागणूक दुय्यम दर्जाची असते

असे सांगण्यात आले. उत्तरदाते न्याय मिळत नाही असे सांगतांना असुरक्षित वाटत होते. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे आज पारधी-पोलिस हा खेळ सुरुच आहे. यातुन सुटका करण्यासाठी स्वतः पारधी समाज व शासनाची भूमिका फार महत्त्वाची असल्याचे उत्तरदात्यांनी सांगितले.

**४.५ आर्थिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण :-**

प्रस्तुत संशोधनात पारधी जमातीच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केला आहे. पारधी लोकांचा शिकार हाच मुळ आणि पारंपारिक व्यवसाय असून पूर्वी पारधी अत्यंत चातुर्याने, कुशलतेने शिकार करायचे. त्या सामाजिक व्यवस्थेत पारधी समाजाचे शिकार या व्यवसायावर कसाबसा उदरनिर्वाह चालत होता. शिकार हे देवाचे वरदान म्हणून तेच उपजिवीकेचे साधन स्वीकारल्याचे उत्तरदाते सांगतात. तर इतिहास यांची लढवय्यी जमात म्हणून नोंद घेतो.

श्री. परमेश्वर काळे ह.मु.सोलापूर यांनी असे सांगितले की मुळात पारधी जमात अस्तित्वात नव्हती. पारधी मुळचे 'रजपूत' असून त्यांचे वास्तव्य राजस्थानमध्ये होते. राणाप्रतापाच्या सैन्याचाच एक भाग म्हणून राजस्थानातील मेवाड, चौरासीया या भागात त्याचे वास्तव्य होते. हळदीघाटाच्या युध्दात (इ.स. १८ जून १५७६) महाराणा प्रतापाचा पाडाव झाला पण आदिवासींमुळे अकबराचे संपूर्ण प्रदेशावर स्वामीत्व प्रस्थापित होऊ शकले नाही. असे प्रभाकर मांडे यांनी उपेक्षित पर्व मध्ये (पृ. ५२, ५६) सांगितले आहे. त्याचाच आधार घेत श्री. काळे यांनी सांगितले की महाराणा प्रतापाला एका रजपूतानेच वाचवले. त्यामुळे अकबराने फतवा काढला की, रजपूत दिसताच त्याला ठार मारा. मृत्यूच्या भितीने 'आजचे पारधी' भटकंती करीत राहिले. रहायला घर नाही की हाताला काम नाही. म्हणून जंगलात भटकत शिकार करुन उपजीवीका करु लागले. अशा प्रकारे राजस्थान सोडून उपजीवीकेसाठी गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र इत्यादी प्रदेशात ते भटकंतीचे जीवन जगत आहेत. आज महाराष्ट्रातही पारधी लोक अनेक जिल्ह्यात कमी-अधिक संख्येने निश्चित उपजिवीकेच्या साधनाअभावी अस्थिर, स्थलांतरीत जीवन जगतांना आढळतात.

पारध्यांच्या उपजिवीकेच्या साधनात सतत व्यावसायिक स्थित्यांतरे आली. पण यातला एकही व्यवसाय पारध्यांचे जीवनमान उंचावणारा व त्यांच्या जीवनाला स्थैर्य देणारा आणि प्रगतांशी जोडणारा नव्हता. पारधी समाजाचे अभ्यासक, कार्यकर्ते श्री. अशोक तांबे (ह. मु. करमाळा जि. सोलापूर) यांनी या स्थित्यंतराबद्दल सविस्तर माहिती दिली.

सुरुवातीला शिकार , शिकारीमुळे स्थानिक राजांसोबत परिचय,धाडसी, चपळ व प्रामाणिक या स्वभाव वैशिष्टयांमुळे संस्थानिकांनी या लढवय्या जमातीस सैनिक बनवले. पण ब्रिटीश राजवटीत ब्रिटींशानी तैनाती फौजा पूरविल्याने पारध्यांची गरज संपली. इंग्रजांनी वने सरकारच्या मालकीची केल्याने आदिवासींनी त्यांचा विरोध केला. म्हणून पारध्यांना गुन्हेगार म्हणून घोषित केले. अशा भूमिहीन पारध्यांनी नाईलाजाने चोरी - दरोडा हा मार्ग निवडला. आर्थिक ज्ञान व शिक्षणाच्या अभावामुळे दरोडा टाकून मिळवलेले किलो-किलो सोने विकताना तो फसला जात असे. परिणामी जगण्यासाठी असे धाडसी कृत्य करुनही त्याच्या परिस्थितीत बदल झाला नाही. त्यानंतर पारधी चंदनतस्करीकडे वळले. मागील कांही वर्षापासून पारधी 'ड्रॉप' हा (म्हणजे नकली दागिने सोनाराला विकून फसवणे.) धंदा करतात. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे अशी काळजी त्यांनी व्यक्त केली. पारध्यांच्या मागासलेपणाचे मूळ कारण आर्थिक विवंचना आहे. आर्थिक समस्या सोडवण्यासाठी फक्त शिक्षण नाही तर व्यवसाय शिक्षणाची गरज आहे.

सुरुवातीपासूनच पारधी जमातीस जंगलाचा परिचय असल्यामुळे आजही पारधी जमातीच्या आर्थिक जीवनातील उपजीविकेची साधने शिकारीची फासे, जाळे विणणे, दारु बनविणे ती चोरुन विकणे, व काही प्रमाणात गुन्हेगारी वर्तन करतांना आढळतात. स्वतःकडील साधने उपभोगापूरतेच उत्पन्न घेण्यासाठी वापरतात. अधिक उत्पन्न घेण्याच्या भानगडीत ते पडत नाहीत. कारण यांच्याकडे असलेली सुबत्ता पोलिसांच्या संशयाचे कारण बनु शकते.

सुधार व विकास योजनांचा लाभ घेण्यासाठी लागणाऱ्या ज्ञानाचा अभाव, नवीन व्यवसायाचा स्विकार, पारंपारिक व्यवसायातील कायदयात्मक अडचणी, पर्यावरण पूरक कृतीचा अभाव असल्याने आर्थिक उन्नती गाठता येत नाही आणि सद्यः स्थितीला उपयूक्त कौशल्याचा अभाव असल्याने पारधी व्यक्ती आर्थिक विवंचनेत जगते आहे. पारंपारिक व्यवसायाला संरक्षण न देता शासन नवीन योजना तयार करुन आर्थिक उन्नती साधू पाहतेय. पण त्यामुळे जमातीची ओळख नष्ट होतेय आणि नावानुसार व्यवसाय नाही केल्यास जमातीअंतर्गत कनिष्ठतेची वागणूक मिळते अशाप्रकारची व्यथा उत्तरदात्यांनी व्यक्त केली. पण काबाड कष्ट करुन चोरीचा व्यवसाय सोडून जगत आहेत. पण चोरी-दरोडा पडला की पोलिस पाहिल्यांदा पारध्यालाच धरुन नेतात. त्यामुळे आजही आधूनिक व्यवसायापेक्षा पारंपारिक व्यवसायातच पारध्यांनी स्वतःला गुंतवले असल्याचे सर्वेक्षणा दरम्यान आढळले.

### तक्ता क्र. ४.४५

### उत्तरदाते शिकार करतात का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | शिकार करता का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४८ | १६ |
| २ | नाही | ११२ | ३७.३३ |
| ३ | क्वचित | १४० | ४६.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पारधी समाजाचा पारंपारिक आणि मुख्य व्यवसाय शिकार करणे हा असल्यामुळे जिल्ह्यातील एकूण अभ्यास क्षेत्रात शिकार व्यवसायाबद्दल विचारले असता आजही शिकार करतो असे ४८ (१६%) उत्तरदात्यांनी सांगितले. सुरुवातीपासूनच शिकारीबद्दल सर्व प्रकारचे ज्ञान व साधने अवगत असल्याने आजही शिकार सहज मिळते. असे सांगून त्यांनी प्रत्यक्ष शिकार केलेले पक्षी दाखविले. ११२ (३७.३३%) उत्तरदात्यांनी शिकार करीत नाही असे सांगितले. यात नोकरी करणारे, व्यवसाय करणारे, स्त्रिया आणि शहराच्या आसपास राहणारे उत्तरदाते आहेत. सद्य:स्थितीत शिकारीवर कायद्याने बंदी असल्याने कांही उत्तरदात्यांनी नाही असेच सांगितले. शिकार हा प्रमुख व्यवसाय असला तरी आज रोज शिकार मिळत नाही आणि त्यावर भागतही नाही. पण कधीतरी, क्वचित शिकार करणाऱ्यांचे प्रमाण १४० (४६.६७%) आहे. ज्यावेळी/ज्यादिवशी मांसाहार करायचा असतो तेंव्हाच शिकार करतो असे वरील उत्तरदात्यांनी सांगितले.

थोडक्यात वरील माहितीवरुन आजही शिकार करणे चालुच आहे. शिकार करणाऱ्यांचे प्रमाण (६२.६७%) जास्त आहे. शिकारीकरिता पारधी आजही फासे/ जाळयाचाच वापर करतात. प्राण्यांचे, पक्षांचे हुबेहुब आवाज काढून शिकारीकरीता प्राणी व पक्षांना आकर्षित करतात. शिकार केलेले सर्वच प्राणी-पक्षी स्वत:साठी न वापरता काहींची विक्री केली जाते. हरिणाच्या शिकारीला बंदी आहे. पण ज्यावेळी चोरुन त्याची शिकार केली जाते तेंव्हा १७० रु. किलो या दराने त्यांचे मांस विकले जाते. तर हरणाचे कातडे २५० रु. पेक्षा अधिक किंमतीला विकले जाते. एक हरीण १० ते २० किलोचे असते. त्यांच्या मांसाची विल्हेवाट घरगुती विक्री करुनच लावली जाते. मांस खरेदीचे ग्राहक स्थानिक असून गावातील प्रतिष्ठित, दारुसाठी येणारे ग्राहक आणि पोलिस हे या मांसाचे खरेदीदार असतात असे क्रांतीनगर पारधी पिढी शिराढोण ता. कळंब येथील श्री. नाना डिगा काळे यांनी सांगितले.

भविष्याचा विचार करुन बचत न केल्यामुळे वरील प्राप्त रक्कमेतून रोजचा दिवस घालवला जातो. खाण्यासाठी मांस आणि पिण्यासाठी दारु हेच जीवनातील सुख आणि समाधान मानले जाते. शिकारीबद्दल अधिक माहिती जाणुन घेण्यासाठी कोणकोणत्या प्राण्यांची शिकार केली जाते असे विचारले असता अनेक उत्तरदात्यांनी शिकारीला कायद्याने बंदी असल्याने आपण फक्त छोटे प्राणी व पक्षांचीच शिकार करतो असे आवर्जुन सांगितले. अनेक प्रकारच्या पक्ष्यांची व प्राण्यांची शिकार केली जाते. त्यामध्ये पारवा, पानकुत्रा, रानडुक्कर, हरिण, कोल्हा, ससा, तितर, बदक, मोर, वल्हा, लव्हार, मगर (सुसर), घोरपड, मुंगूस, लांडोर सांबर, गवा, उंदीर, गरुड इ. पशू-पक्षांचा समावेश होतो. तर चिमणी, कावळा, घार, साळुंकी व गाईचे मांस निशिध्द मानले जाते. ते खाणाऱ्याला वाळीत टाकले जाते. म्हणून या पशू-पक्षांची शिकार केली जात नाही. रेडा, बकरा, कोंबडा इत्यादीचे सर्रास मांसभक्षण केले जाते. स्थानिक भुप्रदेशात मिळणाऱ्या प्राण्यांची व पक्षांची ही शिकार केली जाते. उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी घोरपड, पारवा, चित्तर, वल्हा, हरिण, ससा, मोर, कबुतर अशा पक्षी व प्राण्याची शिकार केली जाते असे शिकार करणाऱ्या सर्वच उत्तरदात्यांनी सांगितले. सध्या हरिणाची शिकार दूर्मिळ असून जेव्हा हरणांचा कळप शेतकऱ्याच्या शेतात घुसून पिकाची नासाडी करतो तेंव्हा शेतकरीच शिकार करण्यास बोलावतात आणि अशा प्रकारे हरिणाची शिकार मिळते. कायद्याच्या भितीने मोराची शिकारही चोरुन केली जाते असे सांगितले.

**साधने :-**

शिकारीसाठी वापरली जाणारी साधने जाणून घेण्यासाठी संशोधन क्षेत्रातील उत्तरदात्यांना माहिती विचारली असता त्यांनी ती साधने व त्याबद्दल अधिक सविस्तर माहिती दिली. पारधी कधीही शस्त्राने शिकार करीत नाही. फासे, जाळे घरीच बनवली जातात. विशिष्ट आकाराची फाशाची पेटी सारखी आयाताकृती बांबुच्या काड्यांची नायलॉनच्या दोरीच्या सहाय्याने तयार करतात. विविध प्राणी व पक्षांसाठी छोटया-मोठया आकाराचे जाळे बनवतात. ज्या ठिकाणी प्राणी व पक्षांचा वावर असतो तेथे हे जाळे अंथरले जाते. नायलॉनची दोरी दुरुन दिसत नाही. अमिष दाखवण्यासाठी दाणे टाकून सावजाला आकर्षित केले जाते आणि पक्षी-प्राणी त्यात अडकतात. शिकारीसाठी फासे लावताना वाऱ्याची दिशापाहुन फासे लावले जाते. कारण हरिणांना फासाचा वास येतो. पारध्याचाही वास येतो म्हणून जाळे/फासे टाकुन वाऱ्याच्या विरुध्द दिशेला थांबतात. हरिणासाठी मजबुत जाळे वापरतात तर मोरासाठी, बदक, पारवा अशा लहान मानेच्या पक्षांसाठी लहान जाळे वापरतात.

शिकार करणे हे जोखमीचे काम असते. त्यासाठी कल्पकता, चातुर्य, धाडस, चपळता या गुणांची आवश्यकता असते. शिकारीच्या नियमांचे पालन करुन देवदेवतांचा आशिर्वाद, शुभ-शकून पाहूनच पारधी शिकारीला जातो. प्रथमतः फासाची पूजा केली जाते. त्याच्याबद्दल आदर भावना असते. जोगेश्वरी वस्ती पारा ता. वाशी येथील एका उत्तरदात्याने शिकारीसाठीचे नियम व संकेत याबद्दल माहिती देत असताना असे सांगितले की-

(१) शिकारीला जाताना, चोरीला जाताना गावातील मांत्रिक किंवा दैवी शक्ती असलेल्या व्यक्तीकडे जावून दिशा व यशाबद्दल कौल घेतला जातो.

(२) शिकारीसाठी दगड, विळा, काठी, सुरा, गोफण, कुऱ्हाड, चाकू आणि बंदूक अशा हत्यारांचा वापर केला जात नाही.

(३) आज फक्त पुरुषच शिकारीला जातात. कारण पकडले गेल्यास सुटकेसाठी स्त्रिया प्रयत्न करतात.

(४) शिकारीला जाण्यापूर्वी लैंगिक संबंध टाळले जातात.

(५) गर्भी प्राण्यांची शिकार केली जात नाही. कारण वंशवृध्दी झाली तरच पूढची शिकार मिळते.

(६) संख्यावाढीसाठी पकडलेल्या प्राण्यांतील /पक्षांतील एक नर-मादीची जोडी सोडून दिली जाते.

(७) शिकारीवर गेलेल्या पुरुषाच्या बायकोचे दुसऱ्या पुरुषाबरोबर संबंध आले तर शिकारीत अपयश येते.

(८) शिकारीला जाताना ज्वारीचे दाणे मोजतात. सम संख्या आली तर शुभ, विषम आली तर अपशकून समजतात.

(९) शिकारीत रानटी कुत्र्यांची शिकारी निषिद्ध मानली जाते.

(१०) पारधी दसऱ्याच्या दिवशी शिकारीची सर्व साधने स्वच्छ करुन पूजा करतात.

पारधी समाजात शिकार आणि शिकारीबद्दलचे ज्ञान भरपूर प्रमाणात असल्याचे निदर्शनास आले. विविध पक्षी व प्राण्याची शिकार करतांना वापरली जाणारी साधने, अंगभूत कौशल्य, शिकारीला जाताना पाळावयाचे नियम इत्यादी बाबतीत त्यांच्याकडे ज्ञान आहे. उत्तरदात्यांची शिकार व्यवसायावर उपजिवीका चालत नसल्याने इतर विविध व्यवसाय करतांना आढळले. आज पारध्यांना उपजिवीकेचे कायम साधन उपलब्ध नसून सध्याच्या व्यवसायामध्ये प्रामाणिक, स्थिर, दर्जा उंचावणाऱ्या पुरेसे आर्थिक उत्पन्न देणाऱ्या व्यवसायाचा अभाव आहे. शासकीय योजनेतील समाविष्ट व्यवसायाबद्दल माहिती व ज्ञान नसल्याने त्यात दीर्घकाळ आनंद वाटत नाही. नव्या-जुन्या व्यवसायाच्या निवडीमध्येच

अडकलेली ही जमात आर्थिक स्त्रोताच्या शोधात अजूनही भटकत आहे. या समाजातील रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, शिक्षणाचा व आधुनिक व्यवसाय कौशल्याचा अभाव असल्याने हा समाज आर्थिक विवंचना आणि दारिद्र्यात जगतो आहे.

**तक्ता क्र. ४.४६**

**उत्तरदात्यांना शिकार व्यवसायात येणाऱ्या अडचणी यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | अडचणी | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वन्यजीव संरक्षण कायदा | २६० | ८६.६७ |
| २ | साधनांचा अभाव | १५ | ०५ |
| ३ | मनुष्यबळाची कमतरता | १५ | ०५ |
| ४ | इतर | १० | ०३.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र.४.४६ मध्ये सद्यःस्थितीत शिकार करतांना कोणत्या अडचणी येतात याबद्दलची माहिती दर्शविली आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यामुळेच शिकारीवर बंधने आली असे २६० (८६.६७%) उत्तरदात्यांनी सांगितले. कायदा नेमका काय आहे तसेच तो सर्वच प्रकारच्या शिकारीसाठी लागू होतो का याबाबत उत्तरदात्यांमध्ये पूर्णतः अज्ञान दिसून आले. व्यवसायाच्या पध्दतीमुळे सतत पोलिसांपासून दूर राहणारा समाज पकडले जाऊ या भितीने आणि अगोदर झालेल्या त्रासामुळे शिकार व्यवसायात ही कायद्याची भिती बाळगतो. कायद्याच्या भितीने शिकार व्यवसाय सद्यःस्थितीत प्रमुख व्यवसाय म्हणून गरजा भागवू शकत नाही. साधनाच्या अभावामुळे १५ (५%) उत्तरदात्यांनी शिकार पूर्वीसारखी होऊ शकत नाही असे सांगितले. तर १५ (५%) उत्तरदात्यांनी शिकारीसाठी मनुष्यबळाची कमतरता आहे असे नमुद केले. १० (३.३३%) उत्तरदात्यांनी नोकरीमुळे शिकार करित नाही. असे सांगून त्यामुळे शिकारीतील अडचणींचा विचार केला नसल्याचे मत नमुद केले.

### तक्ता क्र. ४.४७

### उत्तरदात्यांची लिंग व शिक्षणनिहाय एकव्यावसायिक / बहूव्यावसायिकांचे प्रमाण यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | व्यवसाय गट एक व्यवसाय / द्विव्यवसाय | साक्षर | | निरक्षर | | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्त्रिया | पूरुष | स्त्रिया | पूरुष | | |
| १ | शेती | १ | १५ | ४ | ३९ | ५९ | १९.६७ |
| २ | मजूरी | ६ | २१ | २० | ६१ | १०८ | ३६ |
| ३ | पशूपालन | - | ०१ | - | १२ | १३ | ४.३३ |
| ४ | शेतराखण | - | ०१ | - | १० | ११ | ३.६७ |
| ५ | नोकरी | १ | १० | - | ०१ | १२ | ४ |
| ६ | व्यवसाय | - | ६ | - | ३ | ९ | ३ |
| ७ | भिक्षा | - | - | ०२ | ०६ | ८ | २.६७ |
| ८ | शिकार | - | - | - | ३ | ३ | १ |
| ९ | ऊसतोड मजूर | - | ०९ | - | १९ | २८ | ९.३३ |
| १० | दारुविक्री | - | १० | ०२ | ०६ | १८ | ६ |
| ११ | घरकाम | ३ | - | २ | - | ५ | १.६७ |
| १२ | शेती / हमाली | - | १ | - | - | ०१ | ०.३३ |
| १३ | शिकार / मजूरी | - | ४ | - | ४ | ८ | २.६७ |
| १४ | शेती / मजूरी | - | २ | - | ०८ | १० | ३.३३ |
| १५ | शिकार / भिक्षा | - | - | - | ०२ | ०२ | ०.६७ |
| १६ | बांधकाम / शिकार | - | १ | - | ०१ | ०२ | ०.६७ |
| १७ | मजुरी / शेतराखण | - | - | - | ०१ | ०१ | ०.३३ |
| १८ | दारु विक्री / मजूरी | - | - | - | ०२ | ०२ | ०.६७ |
| **एकूण** | | **११** | **८१** | **३०** | **१७८** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.४७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे उत्तरदात्यांची लिंग व शिक्षणनिहाय व्यावसायिक गटातील विभागणी दर्शविली आहे. शेती व्यवसाय करणारे एकूण ५९ (१९.६७%) उत्तरदाते आहेत. त्यात १६ साक्षर आहेत तर ४३ निरक्षर आहेत. शेती करणारी केवळ १ स्त्री साक्षर आहे तर ४ निरक्षर आहेत. १५ साक्षर पूरुष शेती करतात तर ३९ निरक्षर पुरुष शेती करतात. एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी १९.३३ टक्के उत्तरदाते शेती करतात. पण शेती एक एकरपेक्षा कमी आहे. वरील ५९ उत्तरदात्यांपैकी ०३ (१%) उत्तरदात्यांकडे शेतीसाठी पाण्याची सोय आहे तर ५६ उत्तरदात्यांकडे शेतीसाठी पाण्याची सोय नाही. जिथे पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन्मैल भटकावे लागते तेथे शेतीसाठी पाण्याची सोय कशी करणार? असा प्रश्न करण्यात आला. शेती पारंपारिक पध्दतीनेच केली जाते. शेतकरी शेती ठेक्याने घेऊन करतात असेही सांगण्यात आले. जी शेती आहे ती शासनाने दिलेली आहे. वरीलपैकी १०८ (३६%) उत्तरदात्यांकडे आज उत्पन्नाचे कोणतेच साधन उपलब्ध नाही. कुटुंबाचे अर्थार्जन करण्यासाठी सद्यःस्थितीत मिळेल तिथे मजूरी करतो असे या उत्तरदात्यांनी सांगितले. अशा स्थितीत व्यसनाधिनता आणि गुन्हेगारी प्रवृत्तीला चालना मिळते. वरील १०८ पैकी २७ उत्तरदाते साक्षर असून त्यापैकी ६ स्त्रिया आणि २१ पुरुष आहेत तर ८१ उत्तरदाते निरक्षर असून त्यापैकी २० निरक्षर स्त्रिया आहेत तर ६१ निरक्षर पुरुष आहेत. पशूपालन करणारे १३ (४.३३%) उत्तरदाते आहेत. या उत्तरदात्यांचे प्रमाण अत्यंत कमी असून या व्यवसायात एकही साक्षर/निरक्षर स्त्री नाही तर १ साक्षर आणि १२ निरक्षर पुरुष आहेत. शिकारीपेक्षा पशूपालन करणे जास्त फायद्याचे आहे कारण जनावरांपासुन नेहमीकरीता दुध व दुग्धजन्य पदार्थ, लोकर, शेतीस उपयुक्त अशा फायद्यामुळे त्यातून एक चांगला आणि स्थिर आर्थिक उत्पन्नाचा बारमाही स्त्रोत उपलब्ध होऊ शकतो. पण याबाबतीत उत्तरदात्यांकडे अज्ञान असल्याचे लक्षात आले. पशूपालन करणाऱ्या उत्तरदात्यांकडे म्हैस, बैल, मेंढी, कोंबड्या, शेळ्या आढळल्या तर एका उत्तरदात्याकडे चिनी कोंबड्या होत्या. पारधी विकास आराखड्यात इमूचे वाटप झालेले आहे. पण जिल्ह्यातील संशोधन क्षेत्रातील एकाही उत्तरदात्याकडे इमू आढळले नाहीत. अशा वस्तूस्थितीवरुन पारध्यांच्या आर्थिक स्तरात कोणताच बदल झालेला नाही असेच निदर्शनास आले.

शेतराखण करणारे एकूण ११ (३.६७%) उत्तरदाते आहेत. त्यापैकी एकही स्त्री नसून १ साक्षर आणि १० निरक्षर पुरुष उत्तरदाते आहेत. पूर्वी राजांच्या काळी राज्यरक्षणाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. पण ब्रिटीशांच्या तैनाती फौजामुळे पारधी बेकार झाले. त्याच संरक्षणाच्या कामाचे भ्रष्ट रुप

म्हणजे शेतराखण होय. शेतराखणीच्या व्यवसायातून येणाऱ्या आर्थिक उत्पन्नाबाबत सविस्तर माहिती विचारली असतात श्री. धनाजी शिंदे. रा. सांगवी काटी ता. तुळजापूर यांनी सांगितले की, पारधी लोक गावाचे शिवार वाटून घेतात. त्याच गावात लोकांच्या ओळखी करुन शेतकऱ्याच्या शेतीची व पिकांची राखण करण्याचे काम करतात तर बायका भिक मागतात. शेतकरी या कामाच्या मोबदला म्हणून पारधी व्यक्तीला वार्षिक धान्याच्या एका पोत्यामागे पायलीभर धान्य देतो. अशा प्रकारे वर्षाच्या शेवटी शेतकऱ्याच्या घरी धान्य नसेल पण पारध्याकडे असते. त्याच्याजवळ चांगल्या काळात पन्नास ते साठ पोती धान्य जमा होते. या मिळालेल्या धान्यावरही पोलिसांचा डोळा असतो. जमातीत शेतराखणीसंबंधी एकमेकांच्या सीमा ओलांडल्याच्या कारणाने पारध्यांमध्ये अनेक वेळा भांडणे होतात. जमा झालेल्या धान्यावरही पोलिस संशय घेऊन अनेकदा त्या पारधी लोकांना नाहक त्रास देतात.

शेतराखण करुन मिळणाऱ्या धान्यात गहू, ज्वारी, तूर, हरभरा, साळी, उडीद, करडई, अंबाडी, सुर्यफूल, बाजरी इ. धान्याचा समावेश असतो. पारधी ज्या परिसरात राहतात त्या परिसरातील, शेतातील आंबे, भूईमूग इ. तसेच भाजीपाला ही घेतात. कांही वेळा भाजीपाला शेतकऱ्याच्या नकळत किंवा चोरुन घेतला जातो.

नोकरी करणारे १२ (४%) उत्तरदाते असून त्यापैकी एक साक्षर महिला सौ. जयश्री कस्तुऱ्या भोसले यमगरवाडी ता. तुळजापूर येथील शैक्षणिक सेवा प्रकल्पात सेविका म्हणून काम करते आणि त्याठिकाणी महिन्याला वेतन दिले जाते असे मत तिने नोंदवले. तर नोकरी करणारे ११ पुरुष असून उच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदावर नोकरी करणारा एकही उत्तरदाता आढळला नाही. वरील ११ उत्तरदात्यांपैकी ८ उत्तरदात्यांचे शिक्षण हे ७ वी १२ पर्यंत आहे. जिल्ह्यातील अध्ययन क्षेत्रांतर्गत ३०० उत्तरदात्यांपैकी एकही शिक्षक, अधिकारी, प्राध्यापक वकील, आढळला नाही.

इतर व्यवसाय करणारे ९ (३%) उत्तरदाते असून यात एकही स्त्री नाही. यामध्ये ६ साक्षर आणि ३ निरक्षर पुरुष असून ते किराणा दुकान (२), रिक्षा (४), पिठाची गिरणी (१), चहाची टपरी (२) अशा स्वरुपाचा व्यवसाय करतात. व्यवसायाचे स्वरुप अत्यंत मर्यादित असल्याने त्यातून दैनंदिन गरजाही भागत नाहीत. भिक्षा मागून उदरनिर्वाह करणारे ०८ (२.६७%) उत्तरदाते असून त्यात ०२ स्त्रिया व ०६ पुरुष आहेत. हे सर्व निरक्षर आहेत. त्यापैकी १ स्त्री ६० वर्षाची असुन ती विधवा आहे. लग्नानंतर विभक्त राहण्याची मानसिकता पारध्यांमध्ये असल्याने मुले विभक्त राहतात. म्हणून या वयातही एकटी राहुन भीक मागून स्वतःचा चरितार्थ चालवला जातो. एक ३२ वर्षाची स्त्री परित्यक्ता

आहे. तिचा पतीने २ लग्ने केली व तो सध्या जेलमध्ये आहे. म्हणून ती मुलांना सांभाळण्यासाठी भिक्षा मागून उपजिवीका करते. भिक्षा मागणारे ०६ पुरुष असून त्यात ६० ते ७५ वर्षाचे ४ पूरुष आहेत त्यामध्ये एक अपंग आहे. शहरात जाऊन फक्त पैशाच्या स्वरुपात भिक्षा स्विकारतो असे त्याने सांगितले.

शिकार हा प्रमुख व्यवसाय असला तरी फक्त शिकारीतुनच कुटुंबाचे अर्थाजन करणारे ०३ (१%) उत्तरदाते असून ते तिन्ही निरक्षर पूरुष आहेत. शिकारीची सर्व प्रकारची साधने कुटुंबात असल्याने शिकार करणे सोपे जाते असे त्यांनी नमुद केले.

सद्यःस्थितीत काही पारधी लोक शेती, पशूपालन, नोकरी, मजूरी यासारखे प्रामाणिक व्यवसाय करीत आहेत. त्यापैकी ऊसतोड मजूर म्हणून काम करणारे २८ (९.३३%) उत्तरदाते असून धार्मिक व कौटुंबिक कारणामुळे त्यापैकी एकही स्त्री कामगार नाही. या २८ उत्तरदात्यांपैकी ०९ साक्षर आणि १९ निरक्षर उत्तरदाते आहेत. भटकंतीची सवय असल्याने ज्यांना शिक्षण घेता आले नाही पण प्रामाणिक व्यवसाय करण्याची इच्छा आहे असा तरुण वर्ग या क्षेत्रात आल्याचे मत नोंदवले. या व्यवसायातून आर्थिक दर्जा उंचावतो असे नाही पण कामाचा कालावधी निश्चित असतो. तसेच त्याचा मोबदला लगेच मिळतो आणि उरलेला वेळ कुटुंबासोबत व्यतीत करता येतो अशी सकारात्मकता या व्यवसायाबद्दल व्यक्त करण्यात आली. इतर व्यवसायापेक्षा या व्यवसायाबद्दल उत्तरदात्यांनी समाधान व्यक्त करताना या व्यवसायामुळे आपण प्रतिष्ठित, प्रामाणिक जीवन जगतो आहे हा विश्वास त्यांच्यात दिसून आला.

दारु विक्रीचा व्यवसाय करणारे एकूण १८ (६%) उत्तरदाते असून त्यात १० साक्षर आणि ०६ निरक्षर पुरुष आहेत. ०२ निरक्षर स्त्रियांनीही आपण या व्यवसायात असल्याचे नमुद केले. दारुविक्रीला हरकत घेतली जाते. पण पारध्यांच्या जीवनात दारुला धार्मिक महत्त्व आहे. ०५ (१.६७%) उत्तरदात्यांनी घरकाम करतो असेच उत्तर दिले. यात ३ साक्षर आणि २ निरक्षर स्त्रिया असून त्यापैकी एक स्त्री पारा. ता. वाशी या गावची सरपंच आहे. या स्त्रियांचा कुटुंबकर्ता पुरुष मिळेल ते काम करतो असे नमुद केले. वरील संशोधनात एकव्यवसाय करणाऱ्या साक्षर स्त्रियांचे प्रमाण ११ (३.६७%) आहे तर निरक्षर स्त्रियांचे प्रमाण ३० (१०%) आहे एकूण ४१ (१४%) स्त्रिया एक व्यवसाय करतात. एकव्यवसाय करणारे ७३ (२४.३३%) साक्षर पुरुष आहेत आणि १६० (५३.३३%) पुरुष उत्तरदाते निरक्षर आहेत. एकूण २३३ (७७.६७%) पुरुष उत्तरदाते एकच व्यवसाय करतांना आढळले.

निश्चित व्यवसायाचे साधन उपलब्ध न झाल्याने दोन व्यवसाय करणारे उत्तरदाते संशोधनात आढळले. शेती व हमाली असे दोन व्यवसाय करणारा १ (०.३३%) साक्षर उत्तरदाता पुरुष आहे. शिकार आणि मजूरी हा जोडव्यवसाय करणारे ०८ (२.६७%) उत्तरदाते आहेत. त्यात ४ साक्षर व ४ निरक्षर पुरुष आहेत. १० (३.३३%) उत्तरदात्यांनी शेतीस जोडधंदा म्हणून मजूरी करीत असल्याचे सांगितले. त्यात २ साक्षर आणि ०८ निरक्षर पुरुष आहेत. अशा प्रकारचा जोडधंदा करणारी एकही स्त्री या व्यवसाय गटात नाही. शिकार आणि भिक्षा अशा प्रकारचा जोडव्यवसाय करणारे ०२ निरक्षर पुरुष असून यात एकही स्त्री नाही. बांधकाम आणि शिकार व्यवसायात १ साक्षर आणि १ निरक्षर पुरुष आहे. तर मजूरी आणि शेतराखण या प्रकारचा जोडव्यवसाय करणारा केवळ एकच निरक्षर पुरुष आहे. दारु विक्री आणि मजूरी या व्यवसाय गटात ०२ निरक्षर पुरुष अशा प्रकारचा संयूक्त व्यवसाय करतांना आढळले. याशिवाय मिळेल ते काम करणाऱ्यांनी मजूरी हाच व्यवसाय सांगितला. जोडव्यवसाय करणारे सर्वच पुरुष निवेदक आहेत. या व्यवसाय गटात स्त्रिया नाहीत. बहूव्यवसाय करुन उपजिवीका करणारेही उत्तरदाते आहेत. पण त्यांनी प्रामुख्याने करीत असलेले दोनच व्यवसाय सांगितले.

**तक्ता क्र. ४.४८**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न किती आहे? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | वार्षिक उत्पन्न रु. | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १० हजार पर्यंत | १३ | ०४.३३ |
| २ | ११ ते २० हजार पर्यंत | ७८ | २६ |
| ३ | २१ ते ३० हजार पर्यंत | १५३ | ५१ |
| ४ | ३० हजारापेक्षा अधिक | ५६ | १८.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.४८ मध्ये उत्तरदात्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न किती आहे याबद्दल काही पर्याय देऊन माहिती मिळवली. १०,००० रु. पर्यंत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न असणारे १३ (४.३३%) उत्तरदाते आहेत. यामध्ये भिक्षा मागणारे, शिकार करणारे आणि मजूर यांचा प्रामुख्याने समावेश आहे. ज्यांचे वार्षिक उत्पन्न ११,०००० ते २०,००० रु. पर्यंत आहे अशा ७८ (२६%) व्यक्ती सर्वेक्षणांतर्गत आढळल्या. यामध्ये मजुरवर्ग तसेच शिकार आणि भिक्षा मागून उदरनिर्वाह करणारे उत्तरदाते आहेत. ३०,००० रु. पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे १५३ (५१%) उत्तरदाते आहेत. हे प्रमाण सर्वाधिक असून दररोज मजुरी, हमाली, किंवा इतर कोणताही व्यवसाय केला तर १०० रु. तरी मिळतात. ३०,००० रु.

पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणारे एकूण ५६ (१८.६७%) उत्तरदाते असुन यात नोकरी आणि जोडव्यवसाय करणारे उत्तरदाते आहेत. पारधी समाजाच्या व्यवसायाच्या आणि उत्पन्नाच्या विश्लेषणावरुन असे लक्षात येते की, त्यांचे उत्पन्न फारच कमी असून त्यातून दैनंदिन खर्चही भागत नाही. परिणामी आकस्मिक खर्चाच्या प्रसंगी, पैसा देणारा दूसरा वैध/अवैध मार्ग पारध्यांना शोधावा लागतो.

**तक्ता क्र. ४.४९**

**येणाऱ्या उत्पन्नातून दैनंदिन गरजा भागतात का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | गरजा भागतात का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २९ | ९.६७ |
| २ | नाही | २७१ | ९०.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.४९ नुसार असे दिसून येते की, एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी २९ (९.६७%) उत्तरदात्यांनी येणाऱ्या उत्पन्नातुन आपल्या दैनंदिन गरजा भागतात असे नमुद केले. तर २७१ (९०.३३%) उत्तरदात्यांनी आपल्या दैनंदिन गरजा येणाऱ्या उत्पन्नातुन भागत नसल्याचे सांगितले.

वार्षिक उत्पन्न कमी असल्यामुळे आणि यांचे वास्तव्य दुर्गम भागात असल्यामुळे दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पुरेसे उत्पन्न नसल्याने किमान गरजांची पूर्ती होत नसल्याची खंत बोलून दाखवली. सर्वेक्षणादरम्यान ३०० उत्तरदात्यांपैकी एक महिला महिन्याला १०० रु. बचत गटांची मासिक वर्गणी भरत असल्याचे निदर्शनास आले. सकस आहार, शुध्द पाणी या संकल्पना त्यांच्यापासून खूप दूर आहेत. उत्पन्न व खर्च यांचा मेळ घालतांना आर्थिक तुट भरुन काढण्याचे मार्ग उत्तरदात्यांकडून जाणून घेतले.

**तक्ता क्र. ४.५०**

**उत्तरदात्यांचे तुट भरुन काढण्याचे मार्ग यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | तुट भरुन काढण्याचे मार्ग | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | जास्त काम करणे | १०४ | ३४.६७ |
| २ | कर्ज काढणे | ११५ | ३८.३३ |
| ३ | जोड धंदा करणे | १५ | ०५ |
| ४ | उसनवारी करणे | ६६ | २२ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.५० मध्ये असे दिसून येते की एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी १०४ (३४.६७%) उत्तरदात्यांनी जास्त काम करुन खर्च भागवावा लागतो असे सांगितले. तर त्यासाठी कर्ज काढण्याचा मार्ग ११५ (३८.३३%) उत्तरदात्यांना योग्य वाटला, कारण इतर मार्गाने वेळेवर पैसे मिळतीलच असे नाही. त्यामुळेच कर्जबाजारीपणाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. कर्ज हे सावकार, मित्र, बँक किंवा नातेवाईकाकडून घेतले जाते. सावकाराकडून कर्ज घेणे धोक्याचे असले तरी कोणत्याही अडथळ्याशिवाय सावकाराकडे त्वरीत कर्ज मिळते. तर बँकेकडून कर्ज घेतांना अनेक कागदपत्रांची पूर्ती करावी लागते. तसेच हप्ता वेळेत भरावा लागतो. या प्रकारच्या अनेक अडचणी व त्याबाबतच्या अज्ञानामुळे बँकेकडून कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून आले. एकूण ११५ उत्तरदात्यांपैकी, सावकाराकडून - ५०, मित्राकडून-२१, बँकेकडून- १२ आणि नातेवाईकाकडून-३२ असे कर्ज घेणाऱ्याचे प्रमाण आढळले. १५ (५%) उत्तरदाते आर्थिक तुट भरुन काढण्यासाठी जोडधंदा करणारे असून हे प्रमाण खूप कमी आहे. दोन व्यवसाय केल्याने उत्पन्नात, काही प्रमाणात नक्कीच भर पडते. पैशाची गरज पडल्यास उसनवारी करणारे ६६ (२२%) उत्तरदाते आहेत.

**तक्ता क्र. ४.५१**

**उत्तरदात्यांच्या घरातील व शेतीविषयक वस्तुबद्दलची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | घरातील उपलब्ध वस्तू | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सायकल/मोटार सायकल/रिक्षा | ६० | २० |
| २ | पंखा | ४१ | १३.६७ |
| ३ | घड्याळ | १०२ | ३४ |
| ४ | दूरदर्शन | ०६ | ०२ |
| ५ | पलंग | २८ | ०९.३३ |
| ६ | कपाट | ३१ | १०.३३ |
| ७ | शिवणयंत्र | ०६ | ०२ |
| ८ | रेडिओ | १३३ | ४४.३३ |
| ९ | मोबाईल | २०४ | ६८ |
| १० | विहीर | ०२ | ०.६७ |
| ११ | इ. मोटार | ०२ | ०.६७ |
| १२ | नांगर | ०९ | ०३ |
| १३ | बैलगाडी | ३ | १ |
| १४ | मळणी यंत्र | ०१ | ०.३३ |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्यांकडे असलेल्या वस्तुबद्दल माहिती जाणून घेऊन त्यांच्या आर्थिक स्थिती व उन्नतीचे अवलोकन करता येते. म्हणून त्याबद्दलची माहिती संकलित करुन उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविली आहे. ३०० पैकी ६० (२०%) उत्तरदात्याकडे वाहनाची सोय असून त्यापैकी ४२ सायकल धारक आहेत. १६ उत्तरदात्यांकडे मोटार सायकल आहे तर ०२ उत्तरदात्यांकडे ॲपेरिक्षा आहे. त्यापैकी एक शासकीय अर्थसहाय्यातुन घेतल्याचे सांगण्यात आले. ४१ (१३.६७%) उत्तरदात्यांकडे पंखा असल्याचे निदर्शनास आले. हे उत्तरदाते शहरात राहणारे, नोकरी करणारे, आहेत. तर काहींनी अवैध मार्गाने वीज जोडून पंखा वापरत असल्याचे सांगितले. १०२ (३४%) उत्तरदात्यांकडे घड्याळ असल्याचे निदर्शनास आले. त्यातील काहीना घड्याळाची किंमत सांगता आली नाही. तर कांहीनी ते सापडल्याचे सांगितले. दूरदर्शन संच फक्त ०६(२%) उत्तरदात्यांकडे असून हे प्रमाण अत्यल्प आहे. २८ (९.३३%) उत्तरदात्यांच्या घरी लोखंडी वा लाकडी पलंग असल्याचे निदर्शनास आले. यापैकी दोन नोकरदार (शिपाई) आणि एक सामाजिक कार्यकर्ता होता. ३१ (१०.३३%) उत्तरदात्यांकडे कपाट आहे. शिवण यंत्र ०६(०२%) उत्तरदात्यांकडे असून त्यापैकी ०४ शिवणयंत्र पारधी विकास योजनेतंर्गत मिळाल्याचे सांगितले तर दोन उत्तरदात्यांनी विकत घेतल्याचे सांगितले. हा समाज फार मोठया प्रमाणात रेडिओ ऐकतो हे संशोधनासाठीच्या सर्वेक्षणात आढळले. १३३(४४.३३%) उत्तरदात्यांकडे रेडिओ हे मनोरंजनाचे माध्यम आढळुन आले. योजनांची माहिती, मेळाव्यासंबंधीची माहिती रेडिओद्वारे दिल्यास मिळणार प्रतिसाद प्रचंड असतो असे पारधी समाजाचे कार्यकर्ते श्री. अशोक तांबे यांनी सांगितले. ३०० उत्तरदात्यांपैकी २०४ (६८%) उत्तरदात्यांकडे मोबाईल आहे. जमातीतंर्गत संबंधात सातत्य निर्माण करण्याचा हा एक आधूनिक मार्ग पारध्यांनी मोठया प्रमाणात स्वीकारल्याचे निदर्शनास आले. शेतीविषयक साधनांबद्दल माहिती देतांना ०२ उत्तरदात्यांकडे विहीर असून ही शेती ते बटईने करतात. योजनेअंतर्गत मिळालेली शेती असणारे ०५ उत्तरदाते आहेत. त्यापैकी ०२ उत्तरदात्यांनी इलेक्ट्रीक मोटार बसवुन पाण्याची सोय केल्याची माहिती मिळाली.

शेतीची अवजारे असणारे १२ (४%) उत्तरदाते आहेत. त्यापैकी ०९ (३%) उत्तरदात्यांकडे नांगर आहे. तुळजापूर खुर्द येथील एका उत्तरदात्याकडे मळणी यंत्र असल्याचे आढळले. ०३ (१%) उत्तरदात्यांकडे बैलगाडी असल्याची माहिती मिळाली.

**तक्ता क्र. ४.५२**

**उत्तरदाते बँक खातेदार आहेत का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **बँक खातेदार** | **एकूण** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | होय | ६४ | २१.३३ |
| २ | नाही | २३६ | ७८.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.५२ अनुसार एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी ६४ (२१.३३%) उत्तरदात्यांचे बँकेत खाते आहे. त्यांनी योजनांच्या लाभासाठी व अन्य कारणाने खाते उघडल्याचे सांगण्यात आले. मात्र पासबूक किंवा त्याबद्दलचा पुरावा दाखवला नाही. २३६ (७८.६७%) उत्तरदात्यांनी कोणत्याही बँकेत कोणत्याही प्रकारचे खाते नसल्याचे सांगितले. त्यापैकी कांहीनी गरजच नसल्याचे मत व्यक्त केले. स्थलांतर, संशय, विश्वासाचा अभाव असल्याने ही गोष्ट त्यांना गरजेची वाटत नसल्याचे लक्षात आले.

**तक्ता क्र. ४.५३**

**उत्तरदात्यांच्या मुलांनी कोणता व्यवसाय करावा? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **व्यवसाय** | **एकूण** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | पारंपारिक | १४ | ४.६७ |
| २ | आधूनिक | २८६ | ९५.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.५३ मध्ये उत्तरदाते आपल्या मुलांकडून कोणत्या व्यवसायाची अपेक्षा करतात याची माहिती दर्शविली आहे. मुलांनी पारंपारिक व्यवसाय करावा असे १४ (४.६७%) उत्तरदात्यांना वाटते. कारण पारंपारिक व्यवसाय सोडला तर अनर्थ ओढवेल. तसेच हा व्यवसाय देवाचे वरदान मानले जाते म्हणून वंशपरंपरागत शिकार व्यवसाय करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. २८६ (९५.३३%) उत्तरदात्यांनी त्यांच्या मुलांनी आधुनिक व्यवसाय करावा जेणेकरुन त्यांच्या किमान गरजांची पूर्तता होईल अशी अपेक्षा बोलून दाखवली. आधुनिक समाजात पारंपारिक व्यवसायात असंख्य अडचणी येत असून हा व्यवसाय मुलभूत गरजा पूर्ण करण्यास असमर्थ ठरत आहे. पारंपारिक व्यवसायाचे स्वरुप अप्रगत असल्याने त्यातून मिळणारे उत्पन्न अत्यल्प आहे. अशा कारणांमुळे मुलांनी पारंपारिक व्यवसाय त्यागून आधुनिक व्यवसाय स्विकारावा व ते गरजेचे आहे अशी माहिती मिळाली.

## ४.६ शैक्षणिक जीवनविषयक माहितीचे विश्लेषण :-

**तक्ता क्र. ४.५४**

**उत्तरदात्यांची शैक्षणिक स्थिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | लिंग | साक्षर | निरक्षर | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | स्त्री | ११ | ३० | ४१ |
| २ | पुरुष | ८१ | १७८ | २५९ |
| एकूण | | ९२ | २०८ | ३०० |
| **शेकडा प्रमाण** | | **३०.६७** | **६९.३३** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.५४ अनुसार असे दिसून येते की, एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी केवळ ९२ (३०.६७%) उत्तरदाते साक्षर आहेत. तर २०८ (६९.३३%) उत्तरदाते निरक्षर आहेत. एकूण साक्षर उत्तरदात्यांपैकी ११ स्त्रिया साक्षर आहेत. तर ८१ पुरुष साक्षर आहेत. १७८ पुरुष उत्तरदाते हे निरक्षर आहते. तर ३० स्त्रिया निरक्षर आहेत. विशेषत: स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे आहे. शिक्षण घेऊन उपजीवीकेचे साधन शोधले तरी गुन्हेगारीमुळे भविष्यात शिक्षणाचा फायदा होत नाही असे मत काही उत्तरदात्यांनी व्यक्त केले.

**तक्ता क्र. ४.५५**

**उत्तरदात्यांचा लिंगनिहाय शैक्षणिक स्तर दर्शविणारा तक्ता**

| लिंग | शैक्षणिक स्तर | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवी व पुढे | एकूण |
| पुरुष | १७८ | ३७ | ३४ | ०७ | ०३ | २५९ |
| स्त्री | ३० | ०८ | ०३ | ०० | ०० | ०४१ |
| एकूण | २०८ | ४५ | ३७ | ०७ | ०३ | ३०० |
| **शेकडा प्रमाण** | **६९.३३** | **१५** | **१२.३३** | **२.३३** | **०१** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्यांच्या शैक्षणिक स्तराविषयी तक्ता क्र. ४.५५ मधील माहितीवरुन असे दिसून येते की, एकूण २०८ (६९.३३%) निरक्षर उत्तरदात्यांपैकी १७८ (५९.३३%) पुरुष आहेत. तर ३० (१०%) स्त्रिया आहेत. या अभ्यासात असे आढळले की, ४५ (१५%) व्यक्तींनी प्राथमिक शिक्षण घेतलेले आहे. त्यापैकी ३७ (१२.३३%) पुरुष असून ०८ (२.६७%) स्त्रिया आहेत. माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण घेतलेल्या ३७ (१२.३३%) व्यक्ती आहेत. त्यापैकी ३४ (११.३३%) पुरुष आणि ०३ (१%) स्त्रिया

आहेत. यावरुन माध्यमिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांचे प्रमाण किती नगण्य आहे हे दिसून येते. एकूण उत्तरदात्यांपैकी केवळ ०७ (२.३३%) उत्तरदात्यांनी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. त्यात सर्वच पुरुष आहेत. वरील सर्वेक्षणात एकूण उत्तरदात्यांपैकी पदवीपर्यंत शिक्षण घेणारे ३ (१%) उत्तरदाते आहेत. व या तिन्ही व्यक्ती पुरुषच आहेत. संशोधनात समाविष्ट ३०० उत्तरदात्यांपैकी एकही स्त्री उच्च माध्यमिक ते पदवीधारक नाही. यावरुन पारधी समाजातील शिक्षणाची स्थिती, शैक्षणिक अज्ञान, उदासिनता या बाबी लक्षात येतात.

**तक्ता क्र. ४.५६**

**उत्तरदात्यांच्या मुलांची शैक्षणिक स्थिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | मुले शाळेत जातात का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १४६ | ४८.६७ |
| २ | नाही | १५४ | ५१.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.५६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे उत्तरदात्यांना आपली मुले शाळेत जातात का असा प्रश्न विचारला असता १४६ (४८.६७%) उत्तरदात्यांनी होय असे सांगितले. तर १५४ (५१.३३%) उत्तरदात्यांनी त्यांची मुले शाळेत जात नाहीत असे सांगितले. भारतीय घटनेत सर्वंकष तरतुदी करुन शिक्षणाला महत्वाचे स्थान दिले आहे. शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न करुनही या प्रयत्नांपासून पारधी वंचितच राहिला आहे हे शिक्षणाच्या अल्प प्रमाणावरुन लक्षात येते. सततच्या स्थलांतरामुळेही मुलांना शाळेत पाठविण्याचे प्रमाण कमी आहे.

**तक्ता क्र. ४.५७**

**उत्तरदात्यांच्या वस्तीमध्ये/ जवळ शाळा आहे का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | शाळा | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १९४ | ६४.६७ |
| २ | नाही | १०६ | ३५.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

प्रत्यक्ष भेटीदरम्यान उत्तरदात्यांना वस्तीत किंवा जवळ शाळा आहे का ? असा प्रश्न विचारला असता तक्ता क्र. ४.५७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण उत्तरदात्यांपैकी १९४ (६४.६७%) उत्तरदात्यांनी वस्तीजवळ शाळा आहे असे सांगितले.यापैकी ०७ उत्तरदात्यांनी प्रत्यक्ष वस्तीत शाळा आहे असे

सांगितले. ही शाळा प्राथमिक स्तरापर्यंतच आहे. त्याठिकाणी फक्त एक शिक्षक असतो व या प्राथमिक शाळेत सर्वच पण अल्प संख्येने मुले शिक्षण घेतात. पुरेशा इमारतीचा, शैक्षणिक वातावरणाचा अभाव आणि अपुऱ्या सोयीमुळे इथे शिक्षक टिकत नाहीत. त्यामुळे मुलांचेही मन शाळेत रमत नाही असे मत पालकांनी नोंदविले. गावातील खाजगी किंवा जिल्हा परिषदेच्या शाळेत जाताना वस्ती ते गाव हे अंतर जास्त आहे. काही ठिकाणी मुलांना ३ ते ७ किलोमीटर पर्यंत शाळेत चालत जावे लागते. मुलांच्या दृष्टीने हे अंतर नक्कीच जास्त आहे व रस्ता कच्चा व चढ-उताराचा असल्याने लहान मुलांना थकवा येतो असेही मत उत्तरदात्यांनी नोंदविले.

वरील एकूण उत्तरदात्यांपैकी १०६ (३५.३३%) उत्तरदात्यांनी वस्तीजवळ शाळा नाही असे सांगितले. यांची वस्ती दुर्गम भागात असलेली निदर्शनास आली. वसतीस्थानाचा विचार करता हा समाज इतर समाजाच्या संपर्कापासुन अलिप्त असल्याने व शैक्षणिक वातावरणाच्या अभावामुळे शिक्षणाचा प्रसार होऊ शकला नाही. वस्तीत किंवा वस्तीजवळ शाळा असुनही शिक्षणाच्या जाणीवेबाबत हा समाज मागासलेला आहे असेच आढळले.

**तक्ता क्र. ४.५८**

**उत्तरदात्यांच्या मुला-मुलींचा शैक्षणिक दर्जा यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | शिक्षण | मुले | मुली | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ ते ४ | ८६ | ५७ | १४३ | १७.९८ |
| २ | ५ ते ७ | ४२ | २४ | ६६ | ८.३० |
| ३ | ८ ते १० | ४८ | ०८ | ५६ | ७.०४ |
| ४ | ११ ते १२ | ०७ | ०३ | १० | १.२५ |
| ५ | पदवी | ०४ | ० | ०४ | ०.५० |
| ६ | पद्व्यूत्तर | ० | १ | १ | ०.१२ |
| ७ | व्यावसायिक | ०४ | ० | ०४ | ०.५० |
| ८ | अर्धवट शिक्षण | ७७ | २१ | ९८ | १२.३२ |
| ९ | निरक्षर | २४८ | १६५ | ४१३ | ५१.९४ |
| **एकूण** | | **५१६** | **२७९** | **७९५** | **१००** |
| **प्रमाण** | | **६४.९०** | **३५.१०** | **१००** | **-** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.५८ अनुसार, एकूण ३०० उत्तरदात्यांच्या मुला-मुलींची एकूण संख्या ७९५ आहे. त्याच्या शैक्षणिक दर्जाविषयीचा अभ्यास केला असता एकूण सदस्यसंख्येपैकी ५१६ (६४.९०%) मुले

आहेत तर २७९ (३५.१०%) मुलीं आहेत. मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या कमी असून पूर्व प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या मुलांची संख्या ८६ तर मुलींची संख्या ५७ इतकी आहे. म्हणजेच पूर्व प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या एकूण मुलांचे प्रमाण १४३ (१७.९८%) इतके आहे. प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या मुलांची संख्या ४२ आणि मुलींची संख्या २४ इतकी आहे. प्राथमिक शिक्षण घेत असलेली एकूण ६६ (८.३०%) मुले आहेत. माध्यमिकपर्यंत शिक्षण घेत असलेल्या उत्तरदात्यांच्या मुलांची संख्या ४८ असून मुलींची संख्या फक्त ०८ आहे. माध्यमिक शिक्षण घेणारे एकूण ५६ (०७.०४%) एवढे आहेत. यावरुन मुलांपेक्षा मुलींचे शिक्षणाचे प्रमाण हे अल्प असल्याचे दिसून आले. उच्च माध्यमिक शिक्षण घेत असलेली ०७ मुले तर ०३ मुली आहेत. हे प्रमाण १.२५ टक्के इतके म्हणजे अत्यंत कमी आहे.

वरील आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाच्या गळतीचे प्रमाण सतत वाढतच आहे. मुलांच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाचा अभ्यास केला असता हे प्रमाण अत्यंत कमी असून फक्त ०४ मुले पदवीपर्यंतचे शिक्षण घेत आहेत तर एकही मुलगी हे शिक्षण घेत नाही. पद्व्यूत्तर शिक्षण घेत असलेली ०१ मुलगी आहे तर एकही मुलगा पदव्युत्तर शिक्षण घेत नाही. व्यावसायिक शिक्षणाच्या संदर्भाने अभ्यास केला असता एकूण ०४ मुले व्यावसायिक शिक्षण घेत आहेत. यात एकही मुलगी नाही. वरील पदवी, पदव्युत्तर आणि व्यावसायिक शिक्षणातील मुला-मुलींचे एकूण प्रमाण अत्यंत अल्प असून उच्च माध्यमिक शिक्षणापासून पुढे शिक्षण घेणाऱ्यांच्या प्रमाणात गळती झाल्याचे लक्षात येते. मुलांपेक्षा मुलींच्या संख्येत जास्त घट झाल्याचे अभ्यासादरम्यान निदर्शनास आले. अर्धवट शाळा सोडलेल्यांची एकूण संख्या ९८ (१२.३३%) असून यात ७७ मुले आणि २१ मुली आहेत. सद्यःस्थितीत शाळेत जाणेयोग्य वय असतांनाही या मुलांनी शाळा अर्धवट सोडली आहे. दारिद्र्य, शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि पालकांचे होणारे दुर्लक्ष यामुळे शिक्षण चालु ठेवण्यास अडचणी येतात असे लक्षात येते.

एकूण मुला-मुलीपैकी शिक्षण घेणेयोग्य वय असतांना, शाळेत न जाणारी २४८ मुले तर १६५ मुली आहेत.. वरील अभ्यासावरुन असे निदर्शनास येते की, एकूण ४१३ (५१.९४%) सदस्य निरक्षर आहेत.

वरील मुला-मुलींची संख्या व शिक्षणाचे एकूण प्रमाण याची तुलना करता असे दिसून येते की, पूर्व प्राथमिक ते व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण ३५.७२ टक्के इतके आहे. ५१.९४ टक्के

मुला-मुलींनी शिक्षणच घेतले नाही. वरील आकडेवारीवरुन निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. पारधी समाजाची ही शैक्षणिक परिस्थिती त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीवरच अवलंबून असल्याचे दिसते.

**तक्ता क्र.४.५९**

**उत्तरदात्यांची मुले आश्रमशाळेत जातात का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | आश्रमशाळेत जातात का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २६ | ८. ६७ |
| २ | नाही | २७४ | ९१.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

अभ्यास क्षेत्रातील ३०० उत्तरदात्यांना आपली मुले आश्रमशाळेत जातात का असा प्रश्न विचारला असता मिळालेली माहिती वरील तक्ता क्र. ४.५९ मध्ये दर्शविली आहे. त्यानुसार सुमारे २७४ (९१.३३%) उत्तरदात्यांनी आपली मुले आश्रमशाळेत जात नसल्याचे सांगितले. तर फक्त २६ (८.६७%) उत्तरदात्यांनी या प्रश्नाला होकारार्थी उत्तर दिले. आदिवासी समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणावर उपाय म्हणून आश्रमशाळेची योजना शासनाने सुरु केली. मात्र मिळालेल्या आकडेवारीवरुन ही योजना त्यांच्यापर्यंत पोहोचलीच नाही. असे दिसून येते.

**तक्ता क्र. ४.६०**

**उत्तरदात्यांची मुले आश्रम शाळेत जाण्याच्या कारणासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कारण | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | गरिबीमुळे | १४ | ५३.८४ |
| २ | चांगले शिक्षण | ०६ | २३.०७ |
| ३ | शिस्त/वळण | ०४ | १५.३८ |
| ४ | जेवण, कपडे, पूस्तके मोफत मिळतात | ०२ | ७.७ |
| **एकूण** | | **२६** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्यांकडून मुलांना आश्रमशाळेत पाठविण्याची कारणे पर्याय देऊन जाणून घेतली असता त्यांनी पर्यायाना दिलेली पसंती तक्ता क्र. ४.६० मध्ये दर्शविली आहे. पर्याय पसंती दर्शवितांना पालकांनी एकच पर्यायाऐवजी इतर पर्यायांनाही सहमती दर्शविली आहे.

गरिबीमुळे आश्रमशाळा बरी वाटते असे म्हणणारे उत्तरदाते सर्वाधिक असून त्यांचे प्रमाण १४ (५३.८४%) इतके आहे. या उत्तरदात्यांनी अग्रक्रमाने गरिबी हा पर्याय नोंदविला. आश्रम शाळेत चांगले शिक्षण मिळते असे एकूण ०६ (२३.०७%) उत्तरदात्यांना वाटते. तर वळण, शिस्त, संस्काराला प्राधान्य देऊन आश्रमशाळेची निवड केलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण ०४ (१५.३८%) इतके आहे. हे प्रमाण अल्प असले तरी त्यांनी आश्रमशाळेत मुलाला शैक्षणिक वातावरण मिळेल आणि त्यामुळे त्याला शिस्त व वळण लागेल असा विश्वास दर्शविला. आश्रमशाळेत मुलांना जेवण, कपडे, पूस्तके हे सर्व मोफत मिळते म्हणून आश्रमशाळेत पाठविणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ०२ (७.७%) इतके आहे. गरिबीमुळे या सोयी नियमित मिळतात म्हणून मुलांना आश्रमशाळेत पाठवतो असे सांगितले.

**तक्ता क्र.४.६१**

**उत्तरदात्यांची मुले आश्रम शाळेत न जाण्याच्या कारणासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कारणे | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शाळा दूर आहे | २३ | १९.१७ |
| २ | योजनेची माहिती नाही | ६४ | ५३.३३ |
| ३ | सवलती देत नाही | १५ | १२.५ |
| ४ | शिक्षकांचे दूर्लक्ष | १२ | १० |
| ५ | इतर | ०६ | ०५ |
| **एकूण** | | **१२०** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

मुलांना आश्रमशाळेत न पाठविण्याची कारणे किंवा अडचणीसंदर्भाने अभ्यास करतांना त्यांना पाच पर्याय दिले होते. त्यापैकी आश्रमशाळा लांब आहे म्हणून आश्रमशाळेत न पाठविणारे एकूण २३ (१९.१७%) उत्तरदाते आहेत. दुसऱ्या तालुक्यातील आश्रमशाळेत मुलांना ठेवण्याबाबतीत पालकांमध्ये असूरक्षितेची भावना असल्याचे जाणवले. तसेच मुलांच्या भेटीसाठी जाणे-येणे गरिबीमुळे परवडत नाही असेही सांगण्यात आले.

आश्रमशाळेबद्दल माहिती नाही असे सांगणाऱ्यांचे प्रमाण ६४ (५३.३३%) इतके आहे. जमातीच्या शिक्षणाची खास सोय करण्यासाठी सरकारने आश्रमशाळांची योजना लागू केली. पण या आकडेवारीवरुन शासनाच्या या प्रयत्नाला कितपत यश आले हे दिसून येते. आश्रमशाळेतून शासनाने देऊ केलेल्या शिष्यवृत्ती, पोषाख, पुस्तके, जेवण आणि मुलींना दररोज शाळेत उपस्थित राहिल्याबद्दल

मिळणारा १ रु. उपस्थिती भत्ता या शासकीय सवलती मुलांना दिल्या जात नाहीत असे सांगणारे उत्तरदाते १५ (१२.५%) इतके आहेत. तर १२ (१०%) उत्तरदात्यांनी आपल्या मुलांकडे शिक्षक लक्ष देत नाहीत असे कारण सांगितले. शिक्षकांचे होणारे दुर्लक्ष आणि त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी या उत्तरदात्यांनी मुलांना आश्रमशाळेत पाठविण्यास नापसंती दर्शविली. वरील कोणतीच अडचण नाही पण तरीही यांची मुले आश्रमशाळेत जात नाहीत तर ते ज्या शाळेत शिकतात तीच शाळा आश्रमशाळेपेक्षा बरी वाटते असे सांगणारे ०६ (०५%) उत्तरदाते आहेत. आश्रमशाळेद्वारे जमातीच्या शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न होत असले तरी मुलांना आश्रमशाळेत पाठविण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा विचार होणे गरजेचे आहे.

**तक्ता क्र . ४.६२**

**उत्तरदात्यांची मुले शाळेत न जाण्याची /शाळा अर्धवट सोडण्याची कारणांसंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कारणे | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आवड नाही | २० | १३ |
| २ | स्थलांतर / भटकंती | ३२ | २०.७८ |
| ३ | गरिबी | ६२ | ४०.२५ |
| ४ | सोय नाही | २७ | १७.५३ |
| ५ | शिकवलेले समजत नाही | १३ | ८.४४ |
| **एकूण** | | **१५४** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्यांच्या मुलांनी शाळेत न जाण्याची तसेच शाळा अर्धवट सोडण्याची कारणे जाणून मिळालेली माहिती वरील तक्ता क्र. ४.६२ मध्ये दर्शविली आहे. मुलांना शिक्षणाची आवड नाही असे मत २० (१३%) लोकांनी नोंदविले. इथे पालकांमध्ये मुलांच्या बाबतीत असलेल्या शैक्षणिक जागृतीचा अभाव दिसून येतो. ३२ (२०.७८%) उत्तरदात्यांनी स्थलांतर किंवा भटकंतीमुळे शाळा अर्धवट सोडल्याचे सांगितले. ६२ (४०.२५%) उत्तरदात्यांनी गरीबीमुळे शाळा अर्धवट सोडावी लागली असे मत नोंदवले तर २७ (१७.५३%) उत्तरदात्यांनी शिक्षणाची सोय जवळ नसल्याने पाठवले नाहीत असे सांगितले. १३ (८.४४%) लोकांनी मुलांना शाळेत शिकवलेले समजत नाही म्हणून त्यांनी शाळा अर्धवट सोडली असे मत नोंदविले. याशिवाय शिक्षणाचा काहीच उपयोग होत नाही. उलट शिक्षणाने काही अडचणी निर्माण होतात अशी धारणा उत्तरदात्यांनी बोलून दाखविली.

### तक्ता क्र. ४.६३

### उत्तरदात्यांच्या मुलांना शिक्षण घेतांना भाषेसंबंधी अडचण येते का ?

### यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | अडचणी येतात का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८२ | २७.३३ |
| २ | नाही | २१८ | ७२.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता. क्र. ४.६३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भाषेसंबंधी अडचण येते का? या प्रश्नाला होय असा प्रतिसाद फक्त ८२ (२७.३३%) उत्तरदात्यांनी दिला. तर २१८ (७२.६७%) उत्तरदात्यांनी शिक्षण घेतांना भाषेची अडचण येत नाही असे उत्तर दिले. उत्तरदात्यांच्या या प्रतिसादावरुन पारधी लोक ज्या प्रदेशात राहतात ती स्थानिक भाषा ते अवगत करतात. त्यांच्या भाषेसोबतच मराठी भाषेचा वापरही ते करतात हे लक्षात येते. भाषेची अडचण नाही असा प्रतिसाद अधिक उत्तरदात्यांनी दिला असला तरी ८२ उत्तरदात्यांनी भाषेसंबंधीची अडचण आहे व शिक्षण घेताना मुलांना शिक्षकाची तसेच पुस्तकातली भाषा समजत नाही असे मत नोंदविले. भाषेच्या अडचणीमुळे शिक्षणाचा पाया कच्चा राहतो. मुलांना शिक्षणात, शाळेत गोडी वाटत नाही आणि शैक्षणिक गळती कमी होण्याऐवजी वाढ होते.

### तक्ता क्र. ४.६४

### उत्तरदाते शिक्षकांना भेटतात का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | शिक्षकांना भेटता का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५२ | १७.३३ |
| २ | नाही | २४८ | ८२.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तुम्ही शिक्षकांना भेटता का ? या प्रश्नाच्या प्रतिक्रिया तक्ता क्र. ४.६४ मध्ये दर्शविल्या आहेत. वरील तक्त्यावरुन असे दिसते की, ५२ (१७.३३%) उत्तरदाते शिक्षकांना भेटतात. पण प्रत्येकवेळी भेटीचा उद्देश मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा नसतो तर मुलांवर होणारा अन्याय, मुलांचा अभ्यासातील कंटाळा, दूर्लक्ष, अशीही कारणे असतात. जी उत्तरदाते स्वतः शिक्षीत आहेत त्यांनीच मुलांच्या शिक्षणासंदर्भातील अडचणी सोडवण्यासाठी शिक्षकांना भेटतो असे सांगितले. तर २४८ (८२.६७%) उत्तरदात्यांनी आपण शिक्षकांना भेटत नाही असे सांगितले.

**तक्ता क्र.४.६५**

**उत्तरदात्यांना मुलांसाठीच्या शैक्षणिक सवलतीची माहिती आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | शैक्षणिक सवलतीची माहिती आहे का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ११६ | ३८.६७ |
| २ | नाही | १८४ | ६१.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्यांना त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणासंबंधी सरकारने ज्या अनेक योजना कार्यान्वीत केल्या आहेत त्या योजनांची माहिती आहे का? यासंबंधी विचारले असता त्यांनी दिलेल्या प्रतिसादाची माहिती तक्ता क्र. ४.६५ मध्ये देण्यात आली आहे. वरील माहितीवरुन असे दिसून येते की, ११६ (३८.६७%) उत्तरदात्यांना शैक्षणिक सवलती दिल्या जातात याची माहिती होती. पण त्या सवलती किंवा शासकीय योजना कोणत्या हे त्यांना सांगता आले नाही. निवासी आश्रमशाळा, फी माफी, शिष्यवृत्ती / विद्यावेतन, राखीव जागा, मोफत शैक्षणिक साहित्य अशा शैक्षणिक सवलती दिल्या जातात व त्याची माहिती असून फायदा नाही तर सविस्तर माहिती असेल तरच फायदा मिळतो. अन्यथा योजनांच्या नावे फसवले जाण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. १८४(६१.३३%) उत्तरदात्यांनी शैक्षणिक योजना किंवा सवलती माहिती नाहीत असे सांगितले. याचा अर्थ असा होतो की, शैक्षणिक योजनांपासून हा समाज वंचित असून सरकारचे धोरण जरी उदार असले तरी शैक्षणिक सवलती लाभार्थ्यापर्यंत पोहोचत नाहीत. योजनांबद्दल माहिती देणे, त्यांच्या लाभासंबंधीने मार्गदर्शन करणे यापेक्षा जास्त दिशाभूलच केली जाते असे उत्तरदात्यांनी सांगितले.

**तक्ता क्र. ४.६६**

**उत्तरदात्यांच्या मुलांना शिक्षणविषयक सवलतींचा फायदा मिळाला आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | फायदा मिळाला आहे का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०९२ | ३०.६७ |
| २ | नाही | २०८ | ६९.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

तक्ता क्र. ४.६६ मध्ये शिक्षणविषयक सवलतींचा किंवा योजनांचा लाभ घेतला आहे का यासंबंधी माहिती देण्यात आली आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी ९२ (३०.६७%) उत्तरदात्यांनी आपल्या पाल्यांना शिक्षणविषयक सवलतीचा फायदा मिळाला असे सांगितले. तर २०८ (६९.३३%) उत्तरदात्यांनी मुलांना शैक्षणिक योजनेचा लाभ मिळाला नाही अशी माहिती दिली.

**४.७ शासकीय योजनाविषयक माहितीचे विश्लेषण :-**

संशोधनासाठी निवडलेला उस्मानाबाद जिल्हा हा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद अंतर्गत येतो. आदिवासी उपयोजना आणि अतिरिक्त आदिवासी उपयोजनेत समाविष्ट असलेल्या गावामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील एकाही गावाचा समावेश नाही. पूर्ण उस्मानाबाद जिल्हा आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर येतो. आदिवासी विकासाच्या विविध योजना राबविण्यात येतात पण त्या योजना अडचणीमुळे पारधी समाजापर्यंत न पोहोचल्याने पारधी लोकांना त्या योजनांचा लाभ घेता आला नाही. शासनाद्वारे अनेक प्रकारच्या आर्थिक उन्नतीच्या विकास योजना विविध विकास शिर्षकाखाली राबविल्या जातात. वैयक्तिक लाभाच्या व क्षेत्रविकासाच्या योजना तयार करुन त्यांची अंमलबजावणी केली जाते. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद यांना उस्मानाबाद जिल्ह्यातील आदिवासी पारधी समाजासाठी योजना राबविण्यासाठी खर्च करण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली. या योजनेचा लाभ देतांना, जिल्ह्यातील पारधी समाजाच्या लोक संख्येच्या प्रमाणात लाभ देण्यात येतो. उस्मानाबाद जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या १.८७ टक्के इतकी आहे तर पारधी लोकसंख्या एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ५४.१३ टक्के इतकी आहे. जिल्ह्यातील एकूण ३८८० पारधी कुटुंबापैकी ३०० कुटुंबाची निवड प्रस्तुत संशोधनासाठी केली आहे.

**तक्ता क्र. ४.६७**

**उत्तरदात्यांना शासकीय योजनांची माहिती आहे का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | योजनाची माहिती आहे का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२१ | ४०.३३ |
| २ | नाही | १७९ | ५९.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.६७ मध्ये सरकारने सुरु केलेल्या योजनेची माहिती आहे की नाही यासंबंधीची माहिती जाणून घेतली आहे. नमुना पाहणीतुन असे दिसून येते की, ३०० पैकी केवळ १२१ (४०.३३%) उत्तदात्यांना शासकीय योजनांची माहिती होती. तर १७९ (५९.६७%) उत्तरदात्यांना योजनांची माहिती नव्हती. यावरुन असे स्पष्ट होते की, पारधी समाजात आर्थिक उन्नती व प्रगतीच्या, वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांच्या माहितीचा अभाव अधिक आहे असे निदर्शनास आले.

**तक्ता क्र. ४.६८**

**उत्तरदात्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे का यासंबधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ९४ | ३१.३३ |
| २ | नाही | २०६ | ६८.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.६८ मध्ये उत्तरदात्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे का यासंबधीची माहिती जाणून घेतली असता नमुना पाहणीतून असे दिसून येते की, एकूण उत्तरदात्यांपैकी ९४ (३१.३३%) उत्तरदात्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे तर २०६ (६८.६७%) उत्तरदात्यांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळाला नाही . यावरुन असे निदर्शनास येते की, जमातीचा फार मोठा घटक विकास प्रक्रियेपासून दूर आहे. ही बाब चिंताजनक आहे.

**तक्ता क्र. ४.६९**

**उत्तरदात्यांना शासकीय योजनांचा लाभ न मिळण्याच्या कारणासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कारणे | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | माहिती नाही | १७९ | ८६.८९ |
| २ | मदत नाही | १० | ४.८५ |
| ३ | गरिबी | ११ | ५.३४ |
| ४ | कागदपत्रे नाहीत | ६ | २.९२ |
| **एकूण** | | **२०६** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.६९ मध्ये शासकीय योजनांचा लाभ न मिळण्याची कारणे पर्याय देऊन विचारली असता मिळालेली माहिती दर्शविली आहे.

योजनांची माहिती नाही असे सांगणारे १७९ (८६.८९%) उत्तरदाते आहेत. स्वतःला त्या योजनेची माहिती नसल्याने इतर कोणी मदत केली नाही असे एकूण १० (४.८५%) उत्तरदात्यांनी सांगितले. ११ (५.३४%) उत्तरदात्यांनी शासकीय योजनांची माहिती देत नाहीत आणि योजनेच्या लाभासाठी पैसा खर्च करावा लागतो. तो खर्च करण्याएवढीही आर्थिक क्षमता नसल्याने योजनांचा लाभ घेता आला नाही असे सांगितले. ६ (२.९२%) उत्तरदात्यांनी योजनांचा लाभ घेताना आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता होत नाही. काही कागदपत्रे आहेत तर काही मिळालीच नाहीत. परिणामी आवश्यक ते कागदपत्र आणि पूरावा सादर करतांना अनेक अडचणी येतात असे नमुद केले. ज्याच्याकडे पैसा आहे त्यालाच लाभ मिळतो, पैसे दिले तरी काम होत नाही, कागदपत्रे दिली पण पाठपुरावा केला नाही अशा अनेक कारणांचा समावेश आहे.

**तक्ता क्र. ४.७०**

**उत्तरदात्यांनी पारधी समाजासाठी असलेल्या कोणत्या योजनेचा लाभ घेतला आहे? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | योजना | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | म्हैस वाटप | ०४ | १.३३ |
| २ | तेलपंप वाटप | ०२ | ०.६७ |
| ३ | शेळी वाटप | ०२ | ०.६७ |
| ४ | गिरणी वाटप | ०३ | १ |
| ५ | घरकूल योजना | १३ | ४.३३ |
| ६ | शेती वाटप | ०५ | १.६७ |
| ७ | शेतीची अवजारे वाटप | ०३ | ०१ |
| ८ | स्टॉल वाटप | ०६ | ०२ |
| ९ | अर्थसहाय्य | ०४ | १.३३ |
| १० | शिवणयंत्र वाटप | ०४ | १.३३ |
| ११ | गायरान अतिक्रमण | १० | ३.३३ |
| १२ | मळणी यंत्र वाटप | ०१ | ०.३३ |
| १३ | इलेक्ट्रीक मोटार वाटप | ०२ | ०.६७ |
| १४ | शैक्षणिक योजना | २७ | ९ |
| १५ | इतर | ०८ | २.६७ |
| १६ | लाभ नाही | २०६ | ६८.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.७० मध्ये पारधी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभासंबंधीची माहिती दर्शविली आहे. पारधी विशेष विकास योजना शिर्षातंर्गत एकूण १७ योजना राबविल्या जातात. त्यापैकी वरील योजनांचा लाभ घेणारे मोजके उत्तरदाते आढळले. दुधाळ जनावरांचे वाटप म्हणून २ म्हशींचे वाटप या योजनेतंर्गत केले जाते. या योजनेचा लाभ घेणारे एकूण ४ (१.३३%) उत्तरदाते आहेत. त्यापैकी एका उत्तरदात्याने व्यसनासाठी मिळालेली म्हैस विकल्याची माहिती दिली. तेलपंप व शेळीगट योजनेचे प्रत्येकी ०२ लाभधारक आहेत. एकंदरीत दूधाळ जनावरे योजनेतंर्गत वाटत करुन पशूपालन व्यवसायाला चालना देण्याचा प्रयत्न इथे अयशस्वी झाल्याचे निदर्शनास आले. संशोधन क्षेत्रातील ब्रम्हगाव शेंडी येथे कोणत्याही योजनेचा लाभ न घेता वस्तीतील ०३ कुटुंबे मेंढी, गाय-म्हैस पालन अशा स्वरुपाचा व्यवसाय करीत असल्याचे आढळले. पशूपालन करुन स्थिर जीवन जगण्याचा मार्ग स्विकारणाऱ्यांचे प्रमाण १ टक्का एवढेही नाही. वस्तीच्या जवळच्या गावात पिठाची गिरणी शेडसह देण्याची योजना आहे. या योजनेचे लाभधारक ०३ (१%) एवढे आहे. त्यापैकी एका उत्तरदात्यांने गिरणी विकल्याची माहिती दिली. त्याचे कारण विजेची सोय होऊ न शकल्यामुळे आणि वस्ती सोडून रहावे लागते. त्यामुळे लाभ घेतला पण पुढे ती विकली . घर मिळालेले एकूण १३ (४.३३%) लाभधारक आहेत. यापैकी कांहीनी इंदिरा आवास योजनेतंर्गत घरकूलाचा लाभ घेतला आहे. पारधी विशेष विकास योजनेतंर्गत राबविल्या गेलेल्या योजनांचा कालावधी हा अल्प होता. त्यामुळे योजनांची माहिती व लाभ घेता आला नाही. स्वाभिमान सबलीकरण योजनेअंतर्गत ०५ (१.६७%) लाभधारकांनी शेतीचा लाभ घेतला आहे. तर शेतीची अवजारे ०३ (१%) उत्तरदात्यांनी घेतली आहेत. त्यामध्ये बैलगाडी, नांगर, मळणी यंत्र इत्यादीचा समावेश आहे.

वस्तीतील एकांतवासातले जीवन त्यागुन प्रगतांची जीवनपध्दती स्वीकारली जावी, मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात मिसळता यावे यासाठी स्वयंरोजगार योजनेअंतर्गत स्टॉल टाकून देण्याची योजना आहे. या योजनेचे ०६ (०२%) लाभधारक आढळले. पण पुढील मालाची खरेदी, वाहन, लिखापढीचा अभाव, उधारी इत्यादीमुळे या स्टॉल धारकांमध्ये फारसा उत्साह किंवा समाधान आणि परिवर्तन पहावयास मिळाले नाही. किराणा दुकानासाठी अर्थसहाय्य घेतलेले ०४ (१.३३%) उत्तरदाते आहेत. शिवणकामाचे प्रशिक्षण देऊन शिवणयंत्राचे वाटप करण्यात आले त्यापैकी ४ (१.३३%) महिला उत्तरदात्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. गायरान जमीन अतिक्रमण करुन घेतलेले १०

(३.३३%) उत्तरदाते आहेत. २६ डिसेंबर २००७ पासून ज्या जमाती ज्या भुप्रदेशावर राहतात ती जमीन गायरान असेल तर वनहक्क कायदा अंतर्गत त्या जमिनी त्यांच्या नावे करण्याची तरतुद कायद्याने केली आहे. त्यामुळे संशोधन क्षेत्रात उत्तरदात्यांकडून अनुसूची भरुन घेताना राहण्याचा कालावधी विचारला असता, आपण पिढयानुपिढया इथेच राहतो असे सांगण्याची जागरुकता त्यांनी दाखवली तर या संदर्भात काही ठिकाणी केस चालू असल्याची माहिती मिळाली. तुळजापूर तालुक्यातील डिकमल वस्तीतील एका उत्तरदात्याने मळणी यंत्र, इलेक्ट्रीक मोटार मिळाल्याचे सांगितले. वरील पारधी विशेष योजनांच्या लाभ धारकांचे एकूण प्रमाण ५९ (१९.६७%) एवढे आहे.

शैक्षणिक योजनांचा लाभ घेतल्याची माहिती २७ (९%) उत्तरदात्यांनी दिली. (त्यापैकी २६ उत्तरदात्यांनी आश्रमशाळा योजनेचा तर एका उत्तरदात्याने इंग्रजी शाळेचा लाभ घेतला आहे.) ०८ (२.६७%) उत्तरदात्यांनी इतर आदिवासी विकास योजना अंतर्गत येणाऱ्या योजनांचा लाभ घेतल्याचे नमुद केले यात सर्वच योजना सार्वजनिक लाभाच्या होत्या. वस्ती सुधार योजनाअंतर्गत गटार, स्वच्छता गृह इ. आहेत. वरील एकूण लाभधारक ९४ (३१.३३%) इतके आहेत. तर २०६ (६८.६७%) उत्तरदात्यांनी कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नाही असे सांगितले. जमातीचा खूप मोठा घटक शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित आहे. मात्र शासकीय आकडेवारी वेगळेच चित्र सांगते.

**तक्ता क्र. ४.७१**

**उत्तरदात्यांकडे शासकीय कागदपत्रे आहेत का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | शासकीय कागदपत्र | आहे | शेकडा प्रमाण | नाही | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | रहिवाशी प्रमाणपत्र | १६३ | ५४.३३ | १३७ | ४५.६७ |
| २ | मतदार ओळखपत्र | २०७ | ६९ | ९३ | ३१ |
| ३ | जात प्रमाणपत्र | १७२ | ५७.३३ | १२८ | ४२.६७ |
| ४ | शिधापत्रिका | १८७ | ६२.३३ | ११३ | ३६.६७ |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र.४.७१ मध्ये उत्तरदात्यांकडे शासकीय कागदपत्रे आहेत का याविषयीचा माहिती विचारली असता एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी रहिवाशी प्रमाण पत्र असलेले १६३ (५४.३३%) इतके उत्तरदाते आहेत. १३७ (४५.६७%) उत्तरदात्यांकडे रहिवाशी प्रमाणपत्र नसल्याचे सांगण्यात आले. मतदान ओळखपत्र २०७ (६९%) उत्तरदात्यांकडे असून ९३ (३१%) उत्तरदात्यांकडे मतदान ओळखपत्र नाही. जातप्रमाणपत्र असलेले १७२ (५७.३३%) उत्तरदाते आहेत. तर १२८ (४२.६७%) उत्तरदात्यांकडे आजही जातीचा दाखला नाही. जातीचा दाखला मिळवण्यासाठी अनेक पुरावे द्यावे

लागतात. तेव्हाच आपण पारधी असल्याचे सिध्द होते. पण ज्यावेळी गुन्हेगारी, चोरी, दरोडा टाकला जातो तेंव्हा मात्र पोलिसांना आम्ही पारधी असल्याचा कोणताही पूरावा न मागता पारधी वस्तीवर धाड घातली जाते ही प्रचंड चीड आणणारी विसंगती उत्तरदात्यांनी बोलून दाखविली. १८७ (६२.३३%) उत्तरदात्यांकडे शिधापत्रिका आहे. पण रेशन मिळत नाही. ही तक्रार ऐकण्यास मिळाली. ११३ (३६.६७%) उत्तरदात्यांकडे शिधापत्रिका नाही. या कागदपत्रांच्या अभावी शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही. कागदपत्रे असूनही बऱ्याचवेळा मिळणाऱ्या सवलतीपासून वंचित राहिल्याची खंत ऐकण्यास मिळाली.

**तक्ता क्र. ४.७२**

**उत्तरदात्यांना कोणत्या योजनांची गरज आहे? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | योजना | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | घर | ६७ | २२.३३ |
| २ | नोकरी | १५ | ०५ |
| ३ | शेती | ६० | २० |
| ४ | शिक्षण | २८ | ९.३३ |
| ५ | कायदा | ४६ | १५.३३ |
| ६ | व्यवसाय | ७२ | २४ |
| ७ | इतर | १२ | ०४ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.७२ मध्ये समाविष्ट योजनापैकी कोणत्या ना कोणत्या योजनेची गरज आहे असे सर्व उत्तरदात्यांनी नमुद केले. वरील सर्व प्रकारच्या शासकीय योजना राबविण्यात येतात. सरकार त्यावर फार मोठा खर्च करते. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीतील त्रुटीमुळे त्या योजना ज्यांच्यासाठी आहेत तिथपर्यंत पोहोचतच नाहीत. त्यामुळेच पुन्हा त्याच गोष्टींची मागणी उत्तरदात्यांनी केल्याचे दिसून आले. योजनेतून घर मिळावे किंवा घरासाठी शासकीय योजना असावी असे ६७ (२२.३३%) उत्तरदात्यांनी सांगितले. नोकरीची गरज असणारे १५ (०५%) उत्तरदाते आहेत. तर योजनातंर्गत शेती मिळावी असे म्हणणारे एकूण ६० (२०%) उत्तरदाते आढळले. शैक्षणिक योजना व सवलती प्रचंड प्रमाणात उपलब्ध असूनही शिक्षणाची प्रक्रिया सुलभ व्हावी अशी मागणी २८ (९.३३%) उत्तरदात्यांनी केली आहे.

कायदा पारध्यांच्या विरोधात असून तो बदलुन पारध्यांना संरक्षण देणाऱ्या व गुन्हेगारीचा कलंक नष्ट करणाऱ्या कायद्याची गरज असल्याची माहिती ४६ (१५.३३%) उत्तरदात्यांनी दिली. ७२ (२४%) उत्तरदात्यांनी व्यवसायासाठी योजना असावी अशी माहिती दिली तर १२ (४%) उत्तरदात्यांनी जोडधंद्यासाठी अनुदान द्यावे. तसेच जास्त रोजगार उपलब्ध करुन द्यावा, सामुहिक विवाह सोहळा, अटकेतून सुटका इत्यादी संबंधी योजना असावी जेणेकरुन त्यांचा प्रत्यक्ष लाभ घेता येईल अशी माहिती दिली. शिवाय पारंपारिक व्यवसायास संरक्षण देण्याचीही मागणी केली.

**फसवणूक :-**

शासकीय योजना व सवलती संदर्भाने सविस्तर माहिती घेतांना योजनेचा लाभ घेतांना आलेल्या अडचणीसंबंधाने उत्तरदात्यांनी माहिती दिली. १०० टक्के उत्तरदात्यांनी अडचणी येतात, फसवणूक होते व झाली आहे अशी माहिती दिली. शासकीय योजनाचा लाभ घेताना उत्तरदात्यांनी खालील तक्रारी व सूचना केल्या.

- ❖ पैसे (लाच) द्यावे लागतात, योजना राबविण्याऱ्या अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळत नाही.
- ❖ योजना राबविणारे अधिकारी पक्षपात करतात, लाभार्थ्यांना पुरेसे सहकार्य करण्याऐवजी पक्षपात करुन स्वहीत जोपासण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे आमच्यावर अन्याय होतो.
- ❖ योजनांची अंमलबजावणी फक्त कागदोपत्री होते.
- ❖ खऱ्या गरजुंना लाभ नाही. उदा. विहीर आहे पण मोटार नाही, विद्युतपंप आहे पण शेतात वीज पुरवठाच नाही.
- ❖ योजनेचा लाभ घेण्यासाठी कर्ज काढुन अधिकाऱ्याला पैसे दिले. पण कर्ज फेडण्यासाठी योजनेद्वारे मिळालेले साहित्य विकावे लागले.
- ❖ अधिकाऱ्यांना आपल्याबद्दल आपुलकी व आस्था वाटत नाही.
- ❖ निरक्षर असल्याने माहिती अभावी योजनेचा लाभ मिळत नाही.
- ❖ योजनेचा लाभ मिळवून देतो असे सांगून हजारो रुपये घेतले पण योजना व पैसे घेणारे दोघेही गायब झाले.

वरील माहितीवरुन असे स्पष्ट होते की, गरीब, निरक्षर, अज्ञानी असलेल्या या पारधी लोकांना शासकीय योजनांचा लाभ घेतांना सहकार्य मिळण्याऐवजी त्यांची फसवणूकच होते. त्यामुळे या योजनांची परिणामकारकता खूपच कमी असल्याचे दिसून येते. पारधी समाजात शिक्षणाचा अभाव

असल्यामुळे त्यांचे आर्थिक शोषण होत आहे. अशा प्रकारचे योजनेच्या अंमलबजावणीमध्ये असलेले अनेक दोष समोर आले आहेत.

असे असले तरी या योजनांचा लाभ घेणाऱ्या काही लाभधारकाच्या उत्पन्नात, राहणीमानात, आर्थिक व सामाजिक स्थितीत थोडीफार सुधारणा झाल्याचे दिसून येते. फसवणूकी संदर्भाने उत्तरदात्यांनी दिलेले मत, योजनेबद्दलची उदासीनता आणि दोषपूर्ण यंत्रणा, राजकारण, दफ्तरी दिरंगाई, कर्मचाऱ्यांची मानसिकता इत्यादीमुळे योजनांचे चांगले परिणाम दिसून येऊ शकले नाहीत. यावर उपाय म्हणून भ्रष्टाचार थांबवावा, वशिलेबाजी थांबावी, कठोर कायदे करावेत अशा सुचनाही केल्या गेल्या.

**४.८ सामाजिक समस्याविषयक माहितीचे विश्लेषण :-**

पारधी समाज हा पूर्वीपासून अनेक समस्यांनी ग्रासलेला आहे. हा समाज तुटपूंज्या उत्पन्नावर स्वतःची गरज भागवत असल्यामुळे त्याला अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. पारधी जमातीत अनेक समस्या आहेत. व्यसनाधिनता, प्रगतांचा त्यांच्याकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन, अनेक वाईट चालीरिती, प्रादेशिक समस्या, भौगोलिक संकटे, पांरपारिक जीवनपध्दतीशी विसंगत कायदे, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक मागासलेपणा अशा समस्यांचे ओझे घेऊन हा समाज जगत आहे.

उस्मानाबाद जिल्हा पारधी जमातीवर झालेल्या अन्याय अत्याचार आणि हत्याकांडामुळे कुप्रसिध्द असून गुन्हेगारीच्या एकूण प्रकरणात पारधी समाज सहभागाचे प्रमाण ५०% असल्याचे आढळले. जिल्ह्यातील दरोडा व जबरी चोरी या गुन्ह्यात अटक झालेल्या आरोपीची माहिती घेण्यात आली. त्यात एकूण नोंद गुन्ह्यामध्ये ५०% पारधी व्यक्तींचा समावेश असल्याचे आढळले.

संशोधनासाठी अभ्यासक्षेत्रात अनुसूची भरुन घेतांना जसजसा संपर्क वाढत गेला तसतशा अत्याचाराच्या हृदयद्रावक सत्य घटना ऐकावयास मिळाल्या. अत्याचारीत, पिडीत महिला पारधी जमातीतसुध्दा बहिष्कृत, अपमानित असते. या पारधी जमातीचा भुतकाळ तर बदलता येत नाही पण प्रगत समाजाने यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांच्याकडे पाहण्याच्या नकारात्मक दृष्टीकोनात बदल केला पाहिजे याची प्रकर्षाने जाणिव होते.

**तक्ता क्र. ४.७३**

**उत्तरदात्यांना प्रगतांकडून कशी वागणूक मिळते? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | वागणुक | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | चांगली | ८२ | २७.३३ |
| २ | सर्वसाधारण | ९३ | ३१ |
| ३ | वाईट | १२५ | ४१.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्यांना प्रगतांकडून कशा स्वरुपाची वागणूक मिळते याची माहिती तक्ता क्र. ४.७३ मध्ये दिर्शविली आहे. प्रगत समाजाकडून चांगली वागणूक मिळते असे एकूण ८२ (२७.३३%) उत्तरदात्यांनी सांगितले. तर सर्वसाधारण वागणूक मिळते असे म्हणणारे ९३ (३१%) उत्तरदाते आढळले. १२५ (४१.६७%) उत्तरदात्यांना आजही प्रगत समाजाकडून वाईट वागणूक मिळत असल्याचे सांगितले.

प्रत्यक्ष वस्तीत जावून अनुसूची भरुन घेतांना पारधी वस्तीजवळ राहणाऱ्या इतर समाजाकडून त्यांच्याबद्दल सहानुभूती दाखवण्यात आली. हे चित्र गावपारध्यांसंदर्भाने आढळले. गावाने गरज म्हणून त्यांना स्वीकारले आहे. शेतराखण आणि शेतातील हरणांचा किंवा इतर प्राण्यांचा त्रास कमी करणे आणि हरवलेली जनावरे शोधणे या हेतूने गावकरी त्यांना सहकार्य करतात. सुरुवातीला हे काम रामोशी, मांग या जमाती करीत होत्या. भितीमुळेही गावकरी जमातीशी चांगले संबंध ठेवतात. पण गावात पारध्यांचे एकच घर असावे यांची ते काळजी घेत असल्याचे निदर्शनास आले. गावाशेजारी वस्ती / समुहाने राहिल्यास गावकऱ्यांना झालेल्या त्रासामुळे वस्तीवर हल्ले झाल्याची प्रकरणे जिल्ह्यात घडली आहेत. पारधी ही स्वाभिमानी जमात आहे. गावात राहुनही स्वतःचा धर्म, रुढी-परंपरा पाळते. त्यांचा इतरांच्या सामाजिक जीवनात कसलाही हस्तक्षेप नसतो. एकंदरीत प्रगतांकडून चांगली वागणूक मिळते असे २७ % उत्तरदात्यांनी सांगितले. तर सर्वसाधारण वागणूक मिळते असे मत ३१% उत्तरदात्यांनी नोंदवले. हे उत्तरदाते शहराच्या जवळच्या वस्तीत राहणारे असून दैनंदिन जीवन जगतांना शहरी वातावरणात यांचे प्रगतांशी फारसे व जवळुन संबंध येत नाहीत. त्यामुळे कामाचे व संबंधाचे स्वरुप तात्पूरते असते. पोलिस, अधिकारी, कार्यकर्ते यांच्याकडून नकारात्मक वागणूक मिळते. त्यामुळे प्रगत आणि पारधी यांच्यात सर्वसाधारण स्वरुपाचे संबंध असल्याचे आढळले. यासंबंधात जवळीकता, आस्था या गोष्टीचा अभाव असल्याचे निदर्शनास आले.

सर्वात जास्त म्हणजेच ४१.६७% उत्तरदात्यांनी प्रगतांकडून वाईट वागणूक मिळते असे मत नोंदवले. याचे स्वरुप स्पष्ट करताना, पारधी म्हणून सामावून घेतले जात नाही, पोलिसांना खोटी माहिती देणे, संशय घेणे, गरजांकडे दुर्लक्ष करणे, शिधापत्रिकेवरील धान्य योग्य प्रमाणात वाटप न करणे, गैरकामासाठी पारध्यांचा वापर करणे या प्रकारची कारणे वाईट वागणूकीस कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले. उत्तदात्यांचे राहणीमान भाषा, मांसाहार, वर्तनातला रांगडेपणा, शिघ्रकोपी स्वभाव, रुढी, परंपरा, जातपंचायत, व्यसनाधिनता, सततचा संघर्ष, गुन्हेगारी वर्तन, धरपकड सत्र अशा स्वरुपाच्या अनेक कारणांमुळे प्रगतांकडून त्यांना वाईट वागणूक मिळत असल्याचे उत्तरदात्यांनी बोलून दाखवले. तर कांही ठिकाणी प्रगतांशी संबंध येत नसतांनाही त्यांच्याबद्दल राग व्यक्त करण्यात आला.

**तक्ता क्र. ४.७४**

**उत्तरदाते कामानिमित्त स्थलांतर करता का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | स्थलांतर करता का? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५३ | ८४.३३ |
| २ | नाही | ४७ | १५.६७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

भटकंतीसंदर्भाने माहिती घेतांना वास्तव्याचा कालावधी जास्त असल्याचे आढळले तरी कामानिमित्ताने सतत स्थलांतर करावे लागते. त्याबद्दल अधिक माहिती तक्ता क्र. ४.७४ मध्ये दर्शविली आहे.

रोजगाराच्या शोधात स्थलांतर करणारे २५३ (८४.३३%) उत्तरदाते असून स्थलांतर करीत नाही असे ४७ (१५.६७%) उत्तरदात्यांनी नमुद केले. ज्या ठिकाणी ते राहतात तिथे कायम स्वरुपाच्या रोजगाराचे साधन उपलब्ध न झाल्याने कामानिमित्ताने स्थलांतर करणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे. कांही वेळा कामासाठी तर बऱ्याच वेळा पोलिसांचा त्रास, प्रगतांची उपेक्षा, आर्थिक विवंचना, गुन्हेगारी वर्तन इत्यादीमुळे स्थलांतर केल्याचे सांगण्यात आले. अनेकदा स्वतःची ओळख लपवण्यासाठी जवळच्या नातेवाईकांकडे जाऊन स्वतःचे पत्राशेड टाकून राहताना आढळले.

स्थलांतराचा कालावधी निश्चित नसतो. जिल्ह्याच्याच नव्हे तर राज्याच्या विविध भागात मिळेल तेथे आश्रय घेऊन पारधी जीवन जगत आहेत.

**तक्ता क्र. ४.७५**

**उत्तरदात्यांना स्थलांतर थांबावे असे वाटते का ? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | स्थलांतर थांबावे का ? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २९४ | ९८ |
| २ | नाही | ०६ | ०२ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

नमुना पाहणी करत असतांना जिल्ह्यातील ३०० उत्तरदात्यांना स्थलांतर थांबावे असे वाटते का हा प्रश्न विचारुन त्यासंबंधीची माहिती घेण्यात आली. स्थलांतर थांबावे अशी माहिती २९४ (९८%) उत्तरदात्यांनी दिली. यासाठी शासनाने मदत करावी असे १४७ (४९%) उत्तरदात्यांनी नमुद केले. तर रोजगाराच्या संधीमध्ये वाढ करावी अशी माहिती ६० (२०%) उत्तरदात्यांनी दिली. कायमचे हक्काचे घर आणि व्यवसाय द्यावा असे ६३ (२१%) उत्तरदात्यांनी सांगितले. संशय आणि पोलिस यातुन सुटका झाल्यास स्थलांतर थांबेल असे २४ (८%) उत्तरदात्यांना वाटते.

स्थलांतर थांबणार नाही असे मत ०६ (०२%) उत्तरदात्यांनी व्यक्त केले. कारण एकाच ठिकाणी राहुन, नियमित जीवन जगणे आमच्यासाठी धोक्याचे ठरते. जिल्ह्यातील पारधी समाज सतत अस्थिर, असुरक्षित जीवन जगतो आहे.

**तक्ता क्र. ४.७६**

**उत्तरदात्यांचा चोरी किंवा गुन्ह्याशी संबंध लावला जातो का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | चोरी / गुन्ह्याशी संबंध लावला जातो | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १९७ | ६५.६७ |
| २ | नाही | १०३ | ३४.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

अभ्यासक्षेत्रात उत्तरदात्यांशी चर्चा करतांना त्यांचा चोरी किंवा गुन्ह्यांशी संबंध लावला जातो का याची माहिती तक्ता क्र. ४.७६ मध्ये दर्शवण्यात आली आहे. वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी १९७ (६५.६७%) उत्तरदात्यांचा चोरी किंवा गुन्ह्याशी संबंध लावला जातो तर १०३ (३४.३३% ) उत्तरदात्यांनी चोरी किंवा गुन्ह्याशी संबंध लावला जात नसल्याची माहिती दिली. यावरुन असे स्पष्ट होते की, सर्वच पारधी गुन्हेगारी, चोरी करीत नाहीत. काही पारध्यांवर परिस्थितीने

गुन्हेगारी लादली. त्यामुळे आजही या समाजाकडे वाईट दृष्टीने पाहिले जाते. जे मजूरी करतात आणि कामधंद्यासाठी स्थलांतर करतात आणि जे शहराजवळ राहतात त्यांच्यात अधिक गुन्हेगारी प्रवृत्ती आढळली.

नमुना पाहणीतुन असे दिसून आले की, जिल्ह्यातील पारधी समाज आजही गुन्हेगारी चक्रात अडकला आहे. पण सर्वच पारधी जमात गुन्हेगार आहे हा अंदाज चुकीचा आहे.

**तक्ता क्र. ४.७७**

**उत्तरदात्याच्या कुटुंबातील सदस्य अटकेत किंवा तुरुंगात आहेत का ?**

**यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | तुरुंगात आहे का ? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २१ | ०७ |
| २ | नाही | २७९ | ९३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

उत्तरदात्याच्या कुटुंबातील सदस्य अटकेत किंवा तुरुंगात आहेत का या संबंधी माहिती तक्ता क्र. ४.७७ मध्ये दर्शविली आहे. वरील तक्त्यावरुन असे दिसून यते की, एकूण उत्तरदात्यांपैकी २१ (७%) उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य अनुसूची भरुन घेतांना अटकेत असल्याचे सांगितले. तर २७९ (९३%) उत्तरदात्याच्या कुटुंबातील सदस्य अटकेत नसल्याची माहिती मिळाली. गुन्हेगारीशी संबंध लावला तरी प्रत्यक्ष चौकशी अंती सोडून दिले जाते. काहींनी आपली काही दिवसांपूर्वीच सुटका झाल्याचे सांगितले. यात स्त्री उत्तरदात्यांचाही सहभाग असल्याचे आढळले. तुरुंगातील सुटकेसाठी आर्थिक विवंचनेमुळे वाममार्गाने पैशाची सोय करावी लागते. काही ठिकाणी स्त्रीने पती अटकेत असल्यामुळे दूसरा विवाह केल्याचे निदर्शनास आले. सुटकेसाठी प्रयत्न करणारा कोणी नसेल तर गुन्हेगार पलायन करतो आणि सापडलाच तर दूहेरी शिक्षेत अडकतो. अशा परिस्थितीत गुन्हेगारीची तीव्रता, सुडभावना वाढते. परिणामी अशी कारणे मोठ्या प्रमाणात गुन्हयास कारणीभूत ठरतात असे लक्षात आले.नमुना पाहणीतुन असे दिसून येते की, ७ टक्के उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य तुरुंगात शिक्षा भोगत आहेत. त्यामुळे अनेक अडचणींना कुटुंबाला सामोरे जावे लागते आहे. शिक्षणाच्या अभावामुळे आणि कायदाविषयक अज्ञानामूळे त्यांचे आर्थिक शोषण होत असल्याचे दिसून येते. वकीलासाठी पैसा नसतो म्हणून केस एकाच बाजुने चालते .

अटकेबद्दल अधिक माहिती घेतांना तुरुंगात असल्याचा कालावधी, गुन्हयाचे कारण याबद्दल चर्चा केली असता उत्तरदात्यांनी खालील माहिती दिली.

| **गुन्ह्याचे स्वरुप** | | **उत्तरदाते** | | **शिक्षेचा कालावधी** |
|---|---|---|---|---|
| जबरी चोरी, दरोडा | - | ५ | - | ६ वर्ष |
| खून | - | २ | - | आर्थिक दंड, ६ महिने कैद |
| बलात्कार | - | २ | - | ३ महिने ६ दिवस |
| खोटा आळ | - | २ | - | ६ वर्ष तुरुंगवास |
| कौटुंबिक संघर्ष | - | २ | - | ६ ते १२ महिने तुरुंगवास |
| अवैध दारु विक्री | - | २ | - | दंड व १५ दिवस तुरुंगवास |
| शिकार (हरिण) | - | १ | - | दोन वेळा अटक |
| माहिती दिली नाही | - | ५ | - | गुन्हयाबद्दल व शिक्षेच्या स्वरुपाबद्दल माहिती दिली नाही. |

वरील माहितीवरुन हे स्पष्ट होते की, जबरी चोरी-दरोडा, खुन, बलात्कार, दारु विक्री, शिकार इत्यादी कारणांसाठी उत्तरदात्याच्या कुटुंबातील सदस्य अटकेत आहेत. ५ उत्तरदात्यांनी गुन्हयाबद्दल अधिक माहिती दिली नाही.

**तक्ता क्र. ४.७८**

**उत्तरदात्यांना पोलिसांकडून मिळणारी वागणूक यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **पोलिसांकडून मिळणारी वागणूक** | **एकूण** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | चांगली | ३० | १० |
| २ | वाईट | २७० | ९० |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

गुन्हयाचे संदर्भाने अटक झाल्यास पोलिसांकडून मिळणाऱ्या वागणूकीसंदर्भाने उत्तरदात्यांनी दिलेली माहिती तक्ता क्र. ४.७८ मध्ये दर्शविली आहे.

चोरी / गुन्हयाशी संबंध लावून पडकले गेल्यास, अटक झाल्यास चोर किंवा गुन्हेगार म्हणून पोलिसांकडून चौकशी होतांना मिळणारी वागणूक चांगली असते असे मत ३० (१०%) उत्तरदात्यांनी

नोंदवले. तर २७० (९०%) उत्तरदात्यांनी गुन्हेगार म्हणून पकडले गेल्यास वाईट वागणूकीला सामोरे जावे लागते असे मत नोंदवले.

अधिक जाणून घेण्याकरीता उत्तरदात्यांना चांगली वागणूक म्हणजे गुन्हाच्या प्रकरणाची अधिक चौकशी केली जाते, सुड भावनेने नाव दिले असल्यास शिक्षा होत नाही. संपूर्ण चौकशीनंतरच शिक्षा करायची किंवा नाही ठरवले जाते. तुरुंगामध्ये असतांना किंवा बाहेर असतांनाही पोलिसांकडून चांगल्या कार्याची दखल घेतली जाते अशी माहिती दिली.

ज्या उत्तरदात्यांनी पोलिसांकडून वाईट वागणूक मिळते असे सांगितले त्यात गुन्हेगारीचा शिक्का व संशय हेच मुख्य कारण असल्याचे आढळले. मारणे, छळ करणे, शिक्षा वाढवणे, अपमानास्पद वागणूक देणे अशा प्रकारची शिक्षा दिली जाते. याबद्दल सांगतांना जिल्ह्यातील अनेक घटनांचा उल्लेख उत्तरदात्यांनी केला. शेळगाव हत्याकांड, नळदुर्ग पोलिस स्टेशन, हंगेवाडी, भवानवाडी, सिंदगाव, मंगरुळ पाटी, काक्रंबा इत्यादी ठिकाणी उत्तरदात्यांनी स्वत:वरील अत्याचाराच्या घटना सांगून आजही पोलिसी अत्याच्याराला सामोरे जात असल्याचे स्पष्ट निदर्शनास आणले.

**तक्ता क्र. ४.७९**

**गुन्ह्यासंदर्भाने पोलिसांनी पकडण्याच्या कारणासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कारण | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | गुन्हेगारीचा शिक्का | ६८ | २२.६७ |
| २ | संशय | १८३ | ६१ |
| ३ | पोलिसांचा दृष्टिकोन | १५ | ०५ |
| ४ | माहितीस नकार | ३४ | ११.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.७९ मध्ये पोलिसांकडून पकडले जाण्याचे कारण पर्याय देऊन विचारले असता उत्तरदात्यांनी दिलेली माहिती वरील तक्त्यामध्ये दर्शविली आहे. वरील तक्त्यांच्या अवलोकनावरुन असे स्पष्ट होते की, गुन्हेगारीच्या शिक्क्यातुन मुक्त होऊनही जिल्ह्यातील पारधी जमातीला आजही गुन्हेगार म्हणून समस्यांना सामोरे जावे लागते. ६८ (२२.६७%) उत्तरदात्यांनी गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे पोलिस पकडतात अशी माहिती दिली. तर संशयामुळे पकडतात असे १८३ (६१%) उत्तरदात्यांना वाटते. चोरी - दरोडा प्रकरणी सर्वात प्रथम पोलिस पारधी वस्तीकडे वळतात. कोणताही पुरावा नसतांना वस्तीत विचारपूस केली जाते संशयिताला पकडून अटक करतात अशी माहिती दिली. तर १५ (०५%) उत्तरदात्यांनी पोलिसांच्या त्यांच्याकडे बघण्याच्या नकारात्मक

दृष्टीकोनामुळे गुन्ह्यासंदर्भाने पोलिस पकडतात असे मत नोंदवले. ३४ (११.३३%) उत्तरदात्यांनी यासंदर्भात माहिती देण्यास नकार दर्शविला आहे.

**तक्ता क्र. ४.८०**

**उत्तरदाते गुन्हेगारी चक्रातुन बाहेर पडण्यासाठी कोणाची मदत घेतील ?**

**यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कोणाची मदत घ्याल ? | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक कार्यकर्ता | १०२ | ३४ |
| २ | पोलिस | ४० | १३.३३ |
| ३ | शासन | १५७ | ५२.३३ |
| ४ | इतर | ०१ | ०.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

वरील तक्ता क्र. ४.८० मध्ये गुन्हेगारी चक्रातून बाहेर पडण्यासाठी आपणास कोणाच्या मदतीची अपेक्षा आहे? असा प्रश्न नमुना पाहणीतील उत्तरदात्यांना विचारण्यात आला असता तक्त्यात दर्शविलेली आकडेवारी प्राप्त झाली. यावरुन असे स्पष्ट होते की, १०२ (३४%) उत्तरदात्यांना समाजासाठी कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याच्या मदतीची अपेक्षा आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी मदत केली तर गुन्हेगारीच्या चक्रातुन बाहेर पडण्याचा विश्वास उत्तरदात्यांनी व्यक्त केला आहे. ४० (१३.३३%) उत्तरदात्यांनी पोलिसांच्या मदतीची अपेक्षा व्यक्त केली आहे. पोलिसांचा विश्वास त्यांना महत्त्वचा वाटतो आहे. तर १५७ (५२.३३%) उत्तरदात्यांना शासनाची मदत महत्वाची वाटते. शासनाने विश्वास ठेवावा, गुन्हेगार म्हणून न पाहता चांगली वागणुक मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. शासनाच्या मदतीची अपेक्षा करणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. इतर मध्ये ०१ उत्तरदात्यांने कोणाचीही मदत घेणार नाही. स्वता:त बदल करुन प्रगतांप्रमाणे जीवनमान स्विकारल्यास गुन्हेगारीचा संबंधच येणार नसल्याचा विश्वास व्यक्त केला.

यावरुन असे स्पष्ट होते की, इतर घटकांकडून मदत घेण्यापेक्षा शासनाकडून मदतीची अपेक्षा करणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण जास्त आहे.

**तक्ता क्र. ४.८१**

**उत्तरदात्यांना इतरापेक्षा आपण मागासलेले आहोत असे वाटते का? असल्यास कोणत्या बाबतीत? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | मागासलेपणाचे घटक | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आर्थिक | १६० | ५३.३३ |
| २ | शैक्षणिक | ७७ | २५.६७ |
| ३ | धार्मिक | ५० | १६.६७ |
| ४ | राजकीय | ०७ | २.३३ |
| ५ | माहित नाही | ०६ | २.०० |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

इतरांपेक्षा आपण मागासलेले आहोत असे वाटते का ? असा प्रश्न उत्तरदात्यांना विचारला असता उत्तरदात्यांनी दिलेली माहिती वरील तक्ता क्र. ४.८१ मध्ये दर्शविली आहे. ९८ टक्के उत्तरदात्यांनी होय असे सांगितले तर २ टक्के उत्तरदात्यांनी माहिती नाही असे मत नोंदवले. आपण मागासलेले आहोत असे सांगणारे उत्तरदाते सर्वाधिक आहेत. त्यामुळे कोणत्या बाबतीत मागासलेले आहात याची माहिती उत्तरदात्यांनी दिली. आर्थिक बाबतीत मागासलेले आहोत असे सांगणारे १६० (५३.३३%) उत्तरदाते आढळले. आर्थिक घटकात व्यवसाय, नोकरी, घर, संपत्ती वस्तु प्रगतांप्रमाणे आपल्याजवळ नाहीत म्हणून ते स्वतःला मागासलेले समजतात. अज्ञानामुळे विकत घेतलेल्या वस्तुची पावती दुकानदार देत नाही आणि पावती नाही म्हणून पोलिस वस्तु चोरुन आणल्याचा संशय घेतात अशी खंत व्यक्त करण्यात आली. अशा दुष्ट चक्रामुळे मागासलेपणा पाठ सोडत नसल्याचे चित्र निदर्शनास आले.

शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहोत असे सांगणारे ७७ (२५.६७%) उत्तरदाते आढळले. भटकंती, स्थलांतर, व्यवसाय, शिक्षणाची गोडी नसणे, गरिबी, सुविधांचा अभाव, दुर्गम भागातील वास्तव्य अशा अनेक कारणामुळे शिक्षण घेता आले नाही. परिणामी परंपरागत जीवनपध्दतीमुळे आपण इतरांच्या तुलनेत मागे राहिल्याची खंत उत्तरदात्यांनी व्यक्त केली.

जीवनातील धर्माचे स्थान आणि धार्मिक क्रियाचे स्वरुप हे गुंतागुंतीचे असल्यामुळे प्रगत प्रवाहात सामील होता न आल्याने मागास राहिलो असे ५० (१६.६७%) उत्तरदात्यांनी सांगितले. प्रगतांप्रमाणे भावी पिढीवर संस्कार करण्यात आपण कमी पडतो असे मत उत्तरदात्यांनी नोंदवले राजकीयदृष्ट्या मागासलेले आहोत असे ०७ (२.३३%) उत्तरदाते आढळले. राजकारणाविषयीचे

अज्ञान, मतदान करण्याचे निकष, राजकीय जाणीवेबाबतचे अज्ञान, स्वजातीच्या लोकप्रतिनिधीबाबत उदासीनता या सर्व बाबीमुळे प्रत्यक्ष राजकारण आणि जमात यांच्यात खुप अंतर आहे. निवडणुकीत भाग घेऊन लोकशाही प्रणाली समजून घेऊन जमातीचा विकास करता येतो. परिणामी मागासलेपणा दूर करता येऊ शकतो असे प्रगल्भ मत येथे उत्तदात्यांनी व्यक्त केले आहे.

### ४.९ सामाजिक सुधारणाविषयक माहितीचे विश्लेषण :-

**तक्ता क्र. ४.८२**

**पारधी सुशिक्षीत लोक स्वजमातीसाठी काम करतात का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कार्य | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८६ | २८.६७ |
| २ | नाही | २१४ | ७१.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

आपल्या जमातीतील सुशिक्षीत लोक जमातीसाठी काम करतात का? असा प्रश्न विचारुन मिळालेली माहिती तक्ता क्र. ४.८२ मध्ये दर्शविली आहे. जमातीत एकूणच सुशिक्षितांचे प्रमाण कमी आहे. त्यातही जमातीच्या प्रगतीसाठी कार्य करणारे कमीच आहेत. नमुना निवडीतील ८६ (२८.६७%) उत्तरदात्यांनी कार्य करतात अशी माहिती दिली. तर २१४ (७१.३३%) उत्तरदात्यांनी कार्य करीत नसल्याची माहिती दिली. परिणामी जमातीतील व्यक्ती जमातीसाठी कार्य करण्याचे प्रमाण कमी असल्याचे निदर्शनास आले. जमातीसाठी कशा प्रकारचे कार्य केले जाते हे उत्तरदात्यांकडून जाणुन घेतले असता शासकीय योजनांची माहिती देणे, गुन्हा प्रकरणी सुटकेसाठी प्रयत्न करणे, संघटना बांधने, शैक्षणिक जागृती करणे अशा प्रकारचे कार्य करतात अशी माहिती मिळाली.

**तक्ता क्र. ४.८३**

**उत्तरदात्यांना पारधी जमातीसाठी स्वयंसेवी संस्थेच्या कार्याची माहिती आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | कार्याची माहिती | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १७ | ५.६७ |
| २ | नाही | २८३ | ९४.३३ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

जमातीच्या सुधारणाविषयी माहिती घेतांना स्वयंसेवी संस्थांच्या कार्याबद्दल माहिती आहे का? असा प्रश्न विचारला असता मिळालेली माहिती वरील तक्ता क्र. ४.८३ मध्ये दर्शविली आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी १७ (५.६७%) उत्तरदात्यांनी माहिती असल्याचे सांगितले तर २८३ (९४.३३%) उत्तरदात्यांनी माहिती नाही असे मत नोंदवले. स्वयंसेवी संस्था, त्यांची नावे आणि कार्यचे स्वरुप याबाबत उत्तरदात्यांमध्ये कमालीचे अज्ञान दिसून आले. ज्या उत्तरदात्यांनी कार्यची माहिती आहे असे सांगितले त्यांना स्वयंसेवी संस्थांची नावे सांगता आली नाहीत. शिवाय अशा प्रकारचे कार्य या संस्था निस्वार्थी भावनेने करतात यावर त्यांचा विश्वास बसत नाही.

यावरुन असे स्पष्ट होते की, अशा प्रकारच्या संस्था जमातीच्या मुळ प्रश्नापर्यंत पोहोचल्या नाहीत किंवा त्यांचा विश्वास संपादन करण्यात असमर्थ ठरल्या आहेत.

**तक्ता क्र. ४.८४**

**उत्तरदात्यांना जमातीच्या सुधारणेसाठी प्रयत्न करणाऱ्या इतर समाजातील कार्यकर्त्यांची माहिती आहे का? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | इतर समाजातील कार्यकर्त्यांची माहिती | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ११४ | ३८ |
| २ | नाही | १८६ | ६२ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पारधी जमातीच्या सुधारणेसाठी प्रयत्न करणारे कार्यकर्ते माहिती आहेत का? यासंबंधी मिळालेली माहिती वरील तक्ता क्र.४.८४ मध्ये दर्शविली आहे.

जमातीच्या प्रगतीसाठी, सुधारणेसाठी इतर समाजातील व्यक्ती कार्य करीत आहेत याबद्दल माहिती असणारे ११४ (३८%) उत्तरदाते आहेत. तर अशा प्रकारचे कार्य करीत असलेले कार्यकर्ते व त्यांच्याबद्दल माहितीचा अभाव असणारे १८६ (६२%) उत्तरदाते आढळले. ज्या उत्तरदात्यांना कार्यकर्त्यांबद्दल माहिती होती त्यांना कार्यकर्त्यांची नावे विचारली असता स्थानिक पातळीवरील एखादया राजकीय क्षेत्रातील व्यक्तीचे नाव सांगण्यात आले, तर कांहीनी गिरीश प्रभुणे, अशोक तांबे, इदाते सर ही नावे प्रामुख्याने सांगितली. त्यांच्या कार्यामुळेच मागासलेपणाची भावना कमी झाली आहे. आणि स्वत:च्या हक्काची, होणाऱ्या अत्याचाराची जाणीव झाली अशी माहिती कार्यकर्त्यांच्या कार्याच्या स्वरुपाविषयी उत्तदात्यांनी दिली.

**तक्ता क्र. ४.८५**

**उत्तरदात्यांचा राजकारणातील सहभाग यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **राजकीय सहभाग** | **एकूण** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | होय | ०९ | ०३ |
| २ | नाही | २९१ | ९७ |
| **एकूण** | | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

पारधी समाजाचे राजकारणातील स्थान व सहभाग याचा आढावा घेताना हा समाज राजकारणात अत्यंत अल्प प्रमाणात भाग घेताना आढळला . हे वरील तक्त्यात दर्शविलेल्या आकडेवारीवरुन स्पष्ट होते. राजकीय सहभाग किंवा एखादया राजकीय पक्षाचे कार्यकर्ते असणारे ३०० पैकी फक्त ०९ (०३%) उत्तरदाते आढळले. सरपंच, नगरपरिषद सदस्य इतकीच मजल राजकारणात असल्याचे आढळले. जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यात सरपंच पदावर काम पाहणारे चार उत्तरदाते आहेत. त्यापैकी दोन महिला आहेत आणि दोन पुरुष आहेत. दोन नगरपरिषद सदस्यांपैकी एक महिला आणि एक पुरुष आहे. एक ग्रामपंचायत सदस्य आहे. दोन उत्तरदाते राजकीय पक्षाचे कार्यकर्ते असून राजकारणाबरोबर समाजकारणात प्रभावी कार्य करतात असे त्यांच्या इतर पदावरुन आढळले. २९१ (९७%) उत्तदात्यांचा राजकीय पक्षासी किंवा राजकारणाशी संबंधी नसल्याचे सांगण्यात आले. एकंदरीत जमातीत राजकीय अज्ञान आणि नेतृत्वाचा अभाव फार मोठया प्रमाणात आढळला. पारधी समाजातील राजकीय व सामाजिक सहभागाचा आढावा घेताना असे दिसून येते की, या जमातीतील लोक जातीय संघटन, जातबांधवाचा विकास, सामाजिक प्रगती याकडे दुर्लक्ष करतात. राजकीय सहभागामध्ये स्त्रीयांनी ही स्थानिक आरक्षणाचा लाभ घेतल्याचे सांगितले. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचा सहभाग असल्याचे पुढील तक्त्यातून स्पष्ट होते.

**पारधी जमातीचे राजकीय नेतृत्व / सहभाग**

| अ. क्र. | नावे | गाव व पद |
|---|---|---|
| १ | श्री. कल्याण मोहन शिंदे | माजी सरपंच, गोलेगाव ता. भूम |
| २ | श्री. हुलपा काशीराम भोसले यांची पत्नी जानकाबाई भोसले | सरपंच, धनेगाव ता. तुळजापूर |
| ३ | सौ. साखरबाई राजेंद्र शिंदे | सरपंच, पारा ता. कळंब |
| ४ | सौ. वंदना बापू पवार | नगरसेविका ( उस्मानाबाद) |
| ५ | श्री. भीमराव मोतीराम पवार | माजी सरपंच, दशमेगाव ता. वाशी |
| ६ | श्री. संतोष लाला काळे यांची आई | ग्रामपंचायत सदस्य (२००६-१०) तेरखेडा ता. वाशी |
| ७ | श्री. पंज्या भाऊ पवार | उस्मानाबाद नगरपरिषद सदस्य (२००२-०७-शिवसेना) |
| ८ | श्री. बिभीषण उत्तम शिंदे | राजकीय कार्य, कन्हेरवाडी पाटी ता. कळंब (पक्ष कार्यकर्ता ) |
| ९ | सौ. छाया बिभीषण काळे | राजकीय क्षेत्रात कार्य, कन्हेरवाडी ता. कळंब (पक्ष कार्यकर्ती ) |

**तक्ता क्र.४.८६**

**उत्तरदात्यांना सामाजिक परिवर्तनासाठीची प्रेरणा कोणाकडून मिळते? यासंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | प्रेरणा स्त्रोत | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक कार्यकर्ते | ८७ | २९ |
| २ | जमातीचे कार्यकर्ते | ३५ | ११.६७ |
| ३ | शासन | १४८ | ४९.३३ |
| ४ | स्वयंसेवी संस्था | २७ | ९ |
| ५ | डॉ. आंबेडकर | ०३ | ०१ |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

(संदर्भ- क्षेत्रीय पाहणी)

सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा कोणामार्फत मिळते यासंबंधीची माहिती तक्ता क्र. ४.८६ मध्ये दर्शविली आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी ८७ (२९%) उत्तरदात्यांना सामाजिक कार्यकर्त्यांकडून सामाजिक

परिवर्तनाची प्रेरणा मिळते. तर ३५ (११.६७%) उत्तरदात्यांनी ही प्रेरणा जमातीच्या कार्यकर्त्यांकडून मिळते अशी माहिती दिली. स्वयंसेवी संस्थांनी प्रेरीत केल्याचे २७ (०९%) उत्तरदात्यांचे म्हणणे आहे. तर ०३ (०१%) उत्तरदाते डॉ. आंबेडकर हे प्रेरणास्थान असल्याचे सांगतात. तर शासनच आपल्याला ही प्रेरणा देते व प्रयत्न करते असे म्हणणारे सर्वाधिक १४८ (४९.३३%) उत्तरदाते आहेत.

वरील नमुना पाहणीतुन असे दिसून येते की, इतर कोणत्याही घटकापेक्षा शासनावरच विश्वास टाकणारे उत्तरदाते संख्येने अधिक आहेत. शासकीय पातळीवर होणारे प्रयत्न सकारात्मक बदल घडवू शकतात. पण शासकीय यंत्रणेच्या उदासिनतेमुळे सामाजिक परिवर्तनात अडथळा निर्माण होत असल्याचे उत्तरदात्यांचे म्हणणे आहे.

**प्रकरण पाचवे**

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनविषयाच्या अभ्यासातून मिळालेली माहिती व या माहितीच्या विश्लेषणातून काढलेले निष्कर्ष मांडले असून त्या आधारे भविष्यकाळात पारधी जमातीच्या प्रगती व विकासासाठी महत्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. अभ्यासविषयाच्या सखोल माहिती व ज्ञानासंदर्भाने, त्याचे विविध पैलू अभ्यासण्यासाठी अनेक प्राथमिक व दुय्यम स्त्रोंताचा वापर केला आहे. त्यामुळे अभ्यासविषयाला योग्य न्याय देण्यात मदत झाली. प्रस्तुत विषयाच्या आकलनासाठी व अभ्यासासाठी प्राप्त केलेली संदर्भ व अभ्यास माहिती या अगोदरच्या प्रकरणांमध्ये मांडली असून ती सारांशरुपाने पुढीलप्रमाणे-

**५.१ सारांश**

**प्रकरण पहिले - प्रस्तावना :-**

या प्रकरणात आपल्या सांस्कृतिक भिन्नतेमुळे वैशिष्ट्यपुर्ण असलेल्या भारतीय आदिवासींची सर्वांगीण ओळख करुन दिली असून भारतीय आदिवासी समाजाचे वर्गीकरण, क्षेत्रनिहाय विभाजन, आदिवासी लोकसंख्या, आदिवासी समाजाच्या समस्या व त्यावरील उपाय इ. चा सविस्तर आढावा घेतला आहे. महाराष्ट्रात वास्तव्य करीत असलेल्या आदिवासी जमातीची लोकसंख्या व तिची वैशिष्ट्ये, साक्षरता इ. घटकांचा अभ्यासपुर्ण परिचय,शासकीय कागदपत्रांच्या आधारे केलेले त्यांचे वर्गीकरण आणि अभ्यासविषय असलेल्या पारधी जमातीचे वास्तव्य, लोकसंख्या व सद्यस्थिती इ. पैलूचे विवेचन याचाही या प्रकरणात समावेश आहे. पारधी जमात ही भारतीय आदिवासी समुदायाचा एक घटक असल्याने या प्रकरणात मांडलेली संदर्भ माहिती विषय आकलनाच्या दृष्टीने महत्त्वाची व गरजेची वाटते.

जगातील जवळपास ७० देशांमध्ये अनेक आदिवासी जमाती वास्तव्य करीत असून त्या विविध नावांनी ओळखल्या जातात. 'ॲबोरिजिनल्स' या शब्दाने संबोधले जाणारे आदिवासी हे मूळचे रहिवासी असून त्यांना प्राचीन संस्कृती व पराक्रमी इतिहास लाभलेला आहे.

आदिवासी समाज हा सांस्कृतिक भिन्नतेमूळे विभाजित भारतीय समाजाचा प्रमुख घटक असून त्याचे २००१ च्या जनगणनेनुसार भारतीय लोकसंख्येत शेकडा प्रमाण ८.२% इतके आहे. भारतीय

तसेच पाश्चात्य मानववंशशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजाचा अभ्यास करुन त्यांची संस्कृती, जीवन, समस्या इ. संदर्भाने अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे.

आदिवासी समाज हा स्वतःची बोलीभाषा, वैशिष्ट्यपुर्ण जीवनपध्दती, जातपंचायत, साधी अर्थव्यवस्था इ. अनेक वैशिष्ट्यांमुळे स्वतःचे वेगळेपण आणि स्वतंत्र ओळख टिकवून आहे. भारतात २६ राज्यांमधील १८७ जिल्ह्यात ५०० हून अधिक आदिवासी जमाती वास्तव्य करीत असून वर्तमानात घटनात्मक तरतुदीनुसार त्या अनुसूचित जमाती म्हणून ओळखल्या जातात.

भारतीय आदिवासीचे भौगोलिक निकषावर वर्गीकरण करताना त्यांचे उत्तरपुर्व, उत्तरपश्चिम, मध्य आणि पुर्व, दक्षिण आणि पश्चिम भारत अशा पाच प्रादेशिक विभागात वर्गीकरण केले आहे. सर ग्रियर्सन यांनी भाषा या निकषावर वर्गीकरण करताना आदिवासींचे ऑस्ट्रिक भाषासमुह, तिबेटी-चिनी भाषा समूह, द्रविडीयन भाषासमूह आणि इण्डो-यूरोपियन भाषासमूह या चार भाषागटात विभाजन केले आहे. तर भारतीय आदिवासींचे वांशिक वर्गीकरण करताना सर हर्बर्ट रिस्ले यांनी भारतामध्ये इंडो-आर्यन, द्रविडीयन, मंगोलॉईड इ. सात मानववंश आढळतात असे नमुद केले आहे . डॉ. बी.एस. गुहा यांनी आदिवासींचे निग्रीटो, प्रोटो ऑस्ट्रोलॉईड, मंगोलॉईड, नॉड्रिक इ. सहा वांशिक गटात वर्गीकरण केले आहे. डॉ. एल्विन यांनी आदिवासी जगत असलेल्या सांस्कृतिक स्तरावर आधारित त्यांचे खरे गिरीजन, बदलत असणारे, पुर्णतः बदललेले इ. चार गटात भारतीय आदिवासींना वर्गीकृत केले आहे. अनेक मानववंशशास्त्रज्ञानी परस्परविरोधी अनुमाने काढल्याने तसेच जमातीच्या निर्मितीविषयी सर्वमान्य अनुमान प्राप्त नसल्याने या अनेक वर्गीकरणांपैकी कोणतेही एक वर्गीकरण प्रमाण मानता येत नाही.

१९९१ च्या जनगणनेनुसार एकूण भारतीय लोकसंख्येच्या शेकडा ०८.०१% इतके आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण होते तर २००१ च्या जनगणनेनूसार हे प्रमाण शेकडा ८.२% इतके झाले. या दशकात आदिवासी लोकसंख्येत शेकडा ०.१८ % इतकी वाढ झाल्याचे दिसून येते.

भारतीय आदिवासींच्या समस्यांचे स्वरुप बिकट, विदारक व गुंतागूंतीचे असून आदिवासी समस्या या काही अंशी पारंपारिक जीवनपध्दतीमुळे तर काही अंशी इतर संस्कृतीच्या संपर्क व सहवासामुळे निर्माण झाल्या आहेत. डॉ. मुजुमदार यांनी या समस्यांची कारणे शोधताना एकांतवास आणि विकसित समाजाशी संपर्क ही दोन प्रमुख कारणे नमुद केली आहेत. या कारणांमध्येच त्यांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आरोग्य-विषयक समस्यांचे मूळ दडले आहे. मात्र आदिवासींच्या

समस्यांचे स्वरुप जेवढे गुंतागुंतीचे आहे तेवढेच त्यावरील उपाययोजनाचे स्वरुपही गुंतागूंतीचे असून या उपाययोजनांमध्ये एकांगी अलिप्ततावादाचा स्वीकार घातक ठरेल त्याचप्रमाणे घाईने केलेले सामीलीकरणही नुकसानकारक ठरेल. त्यामुळे एकीकरण किंवा एकात्मवाद हा मध्यममार्ग योग्य वाटतो. लोकसंख्यावाढीचा अत्यंत कमी दर,अत्यल्प साक्षरता आणि उदरनिर्वाहाची प्राथमिक अवस्थेतील साधने या कारणांमुळे काही आदिवासी जमातींना अतिमागास जमाती समूह (PTG) असे संबोधले जाते. व शासकीय स्तरावर त्यांच्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जातात.

महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी जमाती असून त्यातील भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कोकणा, कातकरी, ठाकर, गावीत,पारधी, आंध, मल्हार कोळी या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतःची सांस्कृतिक ओळख असून त्या तुलनेने मागासलेल्या आहेत.

महाराष्ट्रात १९९१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी शेकडा ९.२७% इतके आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण असून २००१ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण ८.८५% इतके आहे. या दशकात आदिवासी लोकसंख्या १२,५९००० ने वाढली आहे. २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या एक हजार मुलांमागे ९३३ इतके मुलीचे प्रमाण आहे तर आदिवासी लोकसंख्यामधील एक हजार मुलांमागे ९७७ इतके मुलींचे प्रमाण आहे. यावरुन आदिवासीमध्ये लोकसंख्येतील मुलींचे प्रमाण जास्त आहे हे स्पष्ट होते. याला आदिवासीमंध्ये स्त्री-पुरुष भेदाचा अभाव व लिंगनिदान चाचण्याबद्दलचे अज्ञान कारणीभूत आहेत.

महाराष्ट्रात आदिवासींची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे जिल्ह्यात असून त्या त्याखालोखाल अनुक्रमे नाशिक, नंदूरबार हे जिल्हे असून सर्वात कमी लोकसंख्या अनुक्रमे सिंधुदूर्ग, सांगली, रत्नागिरी या जिल्ह्यात आहे. २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण ७६.९% इतके आहे तर आदिवासी लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण त्याहुनही कमी म्हणजे ५२.२% इतके आहे. मात्र एकूण स्त्री साक्षरता प्रमाणापेक्षा (६७%) आदिवासी स्त्री साक्षरतेचे प्रमाण (४३.१%) २३.९% ने कमी असणे ही शोचनीय बाब आहे.

श्री. बेकन यांनी भटक्या विमुक्त जाती जमातीचे त्यांच्या भटकंतीच्या कालावधीवरुन भटके व अर्धभटके या दोन प्रकारात वर्गीकरण केले आहे तर भटक्या व विमुक्त जमातीचे अभ्यासक श्री. राघवय्या यांनी त्यांच्या व्यवसायावर आधारित सहा प्रकारात वर्गीकरण केले आहे. अशाच प्रकारे श्री. नरेंद्र गोपालराव यांनी त्यांना नऊ गटात विभाजित केले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय दि. २५ जून २००८ नुसार महाराष्ट्रात एकूण ३७ विमुक्त जाती, भटक्या जमाती असून ब्रिटीश शासनाने त्यापैकी काही जमातींना गुन्हेगार जमाती म्हणून घोषित केले होते. त्यांना स्वातंत्र्योत्तर काळापासून विमुक्त जमाती म्हणून ओळख प्राप्त झाली. त्यापैकी एक पारधी जमात आहे. ब्रिटीश कालखंडापूर्वी एक लढवय्यी शुर म्हणून ओळखली जाणारी व शिकार या पारंपारिक व्यवसायावर उपजिवीका करणारी पारधी ही भटकी जमात होती. १८७१ च्या गुन्हेगारी कायद्यान्वये तिला इंग्रजांनी गुन्हेगार जमात म्हणून घोषित केले. तेव्हापासून गुन्हेगार जमातीचा शिक्का आजतागायत सोबत असून १९५२ साली या कायद्यातुन मुक्ती मिळून विमुक्त झाले तरी त्यांच्या संदर्भाने समाज, शासन व प्रगतांचा दृष्टिकोन हा नकारात्मक, व दुजाभाव निर्माण करणारा आहे. सांप्रत काळात पारधी जमात एक अनुसूचित जमात असून तिची २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील लोकसंख्या १,५९,८७५ इतकी असून सर्वाधिक लोकसंख्या अमरावती जिल्ह्यात आहे तर सर्वात कमी लोकसंख्या गोंदिया जिल्ह्यात आहे.

**प्रकरण दुसरे - संशोधन क्षेत्र व संशोधन पध्दती :-**

हे प्रकरण मुख्यतः संशोधन क्षेत्र आणि संशोधन पध्दती या दोन विभागात विभागले आहे. भाग एकमध्ये महाराष्ट्र, मराठवाडा आणि संशोधनक्षेत्र असलेला उस्मानाबाद जिल्हा यांचा समावेश असून भाग दोनमध्ये संशोधनासाठी अवलंबलेली पध्दती व तंत्र यांचे विश्लेषण केले आहे. तसेच या भागामध्ये आदिवासी व पारधी जमातीच्या संदर्भातील संशोधनसाहित्याचा आढावा घेतला आहे. पूर्व अभ्यासाची मांडणी केली आहे.

भारताच्या २८ घटक राज्यांपैकी महाराष्ट्र हे प्रमुख राज्य असून १ मे १९६० रोजी निर्मित या राज्याचे एकूण क्षेत्रफळ ०३,०७,७१३ चौ. किमी आहे. वैभवशाली इतिहासाची परंपरा लाभलेल्या या प्रगत राज्याच्या महाराष्ट्र या नावाची उत्पत्ती 'महान राष्ट्र' यावरुन झाली असावी असे मत म.म. पां.वा. काणे यांनी मांडले आहे. प्राचीन काळी देशाच्या विस्तारावरुन त्या प्रदेशाला तशी नावे पडल्याची उदाहरणे असल्याने ही व्यूत्पत्ती अधिक ग्राह्य मानली जाते.

महाराष्ट्राच्या चार प्रादेशिक विभागापैकी मराठवाडा हा एक विभाग असून मराठवाड्याच्या भौगोलिक परिस्थितीचा मराठवाड्याच्या इतिहासावर दुरगामी परिणाम झाला आहे. सातवाहन, चालुक्य, शिलाहार, यादव, मोगल इ. राजसत्तांनी मराठवाड्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात आपले वैभवशाली

योगदान दिले असून आद्यकवी मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, गोरा कुंभार, समर्थ रामदास इ. संतांच्या अध्यात्मिक मार्गदर्शनावर समाजाची वैचारिक बैठक तयार झाली आहे.

ब्रिटीश कालंखडात हैद्राबाद संस्थानमध्ये समाविष्ट असलेल्या मराठवाड्याने आपला स्वातंत्र्यलढा १५ ऑगस्ट १९४७ नंतरही स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली चालूच ठेवला आणि १७ सप्टेंबर १९४८ ला मराठवाडा निजामाच्या तावडीतून मुक्त होऊन १ मे १९६० रोजी निर्मित महाराष्ट्र राज्यात विनाअट सामील झाला.

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्हा आहे. उस्मानाबाद शहराचे पूर्वीचे नाव धाराशिव असून येथे धारासुरमर्दिनी देवीचे मंदीर आहे. बहूधा या देवीच्या नावावरुन धारशिव हे नाव पडले असावे. १९०४ साली जिल्ह्याचे ठिकाण बनलेल्या या जिल्ह्याचे शेवटचा निजाम मीर उस्मानअली यांच्यानावावरुन धाराशिवचे उस्मानाबाद असे नामकरण झाले. १९०४ पूर्वी नळदुर्ग हे जिल्ह्याचे ठिकाण होते ७ तालुक्यांचा नळदुर्ग जिल्हा हैद्राबाद संस्थानातील सर्वात मोठा जिल्हा होता. राज्य पुनर्रचनेवेळी एकूण ११ तालुक्यांचा समावेश असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्याचे १६ ऑगस्ट १९८२ मध्ये विभाजन होऊन लातूर हा नवीन जिल्हा निर्माण झाला. आज उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, कळंब, भूम, परंडा, वाशी व लोहारा अशा एकूण आठ तालुक्यांचा समावेश आहे.

उस्मानाबाद जिल्ह्याचा विस्तार १७°.३५' ते १८°.४०' उत्तर अक्षांश आणि ७५°.१६' ते ७६°.४' पूर्व रेखांश यामध्ये आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७५१२.४ चौ.कि.मी असून ७२९ गावे व ६२२ ग्रामपंचायतीचा समावेश असलेल्या या जिल्ह्याची २००१ च्या जनगणनेनुसार १४,८६,५७६ इतकी लोकसंख्या आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यात २००१ च्या जनगणनेनुसार २७,८५७ इतकी आदिवासी लोकसंख्या असून तिचे एकूण लोकसंख्येच्या १.८७% इतके शेकडा प्रमाण आहे. जिल्ह्यातील पारधी लोकसंख्या १५१५५ असून आदिवासी लोकसंख्येच्या ५४.४ % इतके शेकडा प्रमाण आहे. जिल्ह्यात एकूण साक्षरतेचे प्रमाण ६८.२८% इतके असून नळदुर्ग, तुळजापूर, येरमाळा, तेर, परंडा, रामलिंग, सोनारी इ. जिल्ह्यातील महत्वाची धार्मिक ठिकाणे आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात दर हजारी पुरुषामागे ९३२ इतके स्त्रियांचे प्रमाण असून शेती हाच जिल्ह्यातील प्रमुख व्यवसाय आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन उद्दिष्टांचा विचार करुन 'अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखड्याची' निवड केली आहे. अभ्यासविषयाच्या विविध पैलुंचा सर्वांगीण आढावा घेणे व प्राप्त वास्तव समोर ठेवून पारधी जमातीच्या विकास व सुधारणांसाठी योग्य त्या शिफारशी मांडणे हा संशोधनाचा मूख्य उद्देश आहे.

या संशोधनाची व्याप्ती संपूर्ण उस्मानाबाद जिल्हा क्षेत्रापूरती मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये निरीक्षण, मुलाखत अनुसूची या पध्दतीचा अवलंब केला आहे. याशिवाय इतर प्राप्त माहितीचे टिपण व नोंदी घेतल्या आहेत. दुय्यम स्त्रोत म्हणून आदिवासी प्रकल्प योजना कार्यालय, संबंधित शासकीय कार्यालये व ज्ञापकांकडून आवश्यक माहिती व आकडेवारी मिळवली आहे. ग्रंथालये व लिखीत साहित्याचा दुय्यम स्त्रोत म्हणून फार उपयोग झाला. प्रत्यक्ष माहिती घेताना अनुसूची तंत्राचा अवलंब केला. संशोधन सुलभ होण्यासाठी अनुसूची भरुन घेताना पारधी लोकवस्तीच्या घनतेनुसार नमुनानिवड पध्दतीचा वापर केला असून संशोधनाला अनुसरुन सहेतूक नमुनानिवड पध्दतीचा अवलंब केला आहे.उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण १०५ पारधी वस्त्या असून त्या सहा तालुक्यातच आहेत. या एकूण ३८८० पारधी कुटुंबापैकी ३०० कुटूंबाची उत्तरदाते म्हणून निवड करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणात आदिवासी तसेच पारधी जमातीच्या समाजजीवनाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक दृष्टिकोनातून तज्ज्ञांनी जे अध्ययन, चिंतन केले आहे, त्यातील निवडक अभ्यासकांनी मांडलेली मते आणि त्या अभ्यासाद्वारे काढलेले निष्कर्ष दिले आहेत. काही तज्ज्ञांनी आपल्या संशोधनाद्वारे महाराष्ट्रातील आदिवासींच्या शैक्षणिक, आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकला असून त्याआधारे त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, आदिवासी हा झोपडपट्टीत/ कच्च्या घरात राहतो. त्याची शेतमजूरी शिकार इ. उदरनिर्वाहाची साधने असली तरी आदिवासींचे जीवन हे जंगलावर अवलंबून आहे. संदर्भ साहित्याचा आढाव्यावरुन हे स्पष्ट होते की, सावकार, जमीनदार मोठ्या प्रमाणात आदिवासींची पिळवणुक करतात. शासनस्तरावरील विकासाचे प्रयत्न अपुरे असून व्यसनाधिनता, मागासलेपणा, निरक्षरता, इ. प्रमुख समस्या आहेत. आदिवासी विकास योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नसून विकास निधीचे समन्यायी वाटप होणे आवश्यक असल्याचे मत अनेक तज्ज्ञांनी मांडले आहे. शासन व समाजाचा उदासीन व नकारात्मक दृष्टिकोन, आदिवासींच्या पारंपारिक प्रथा, परंपरा हा त्यांच्या सामाजिक समस्येचे मूळ असल्याचे मत अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

संदर्भ साहित्याच्या आढाव्याअंतर्गत आदिवासी समाज, भटक्या व विमुक्त जाती जमाती व आदिवासी यांच्याशी संदर्भित संशोधन साहित्याचा समावेश केला आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन संदर्भ संशोधन साहित्यापेक्षा कोणत्या बाबतीत भिन्न आहे याची कल्पना येते.

**प्रकरण ३ रे - पारधी समाजाचा समाजशास्त्रीय आढावा**

प्रस्तुत प्रकरणात दुय्यम स्त्रोतांच्या आधारे पारधी समाजाचा समाजशास्त्रीय आढावा घेण्यात आला आहे. पारधी समाजाच्या कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे व शासन आणि समाज यांच्या माध्यमातून होत असलेल्या त्यांच्यातील प्रगती व सुधारणांचे अवलोकन करुन, समस्यावरील उपाययोजना सुचविणे असे प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्ट आहे. त्यासंदर्भात पाश्चात्य व भारतीय अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ इत्यादींनी केलेल्या संशोधन व अभ्यासाचा या प्रकरणात दुय्यम स्त्रोताद्वारे सविस्तर आढावा घेतला आहे.

पारधी जमात ही आदिवासी जमात असून तिला शौर्याची ऐतिहासिक परंपरा आहे. या जमातीच्या उत्पत्ती व इतिहासाच्या अभ्यासातून ही एक मुळ भारतीय वंशाची जमात असल्याचे व स्वातंत्र्यलढ्यात तिचे योगदान असल्याचे अधोरेखित होते. पारधी बोलीभाषा, त्यांची कुलनामे, देवदेतांची नावे ही त्यांचे राजस्थानातून गुजरात मार्गे महाराष्ट्र, मध्यप्रदेश व कर्नाटक या राज्यात झालेले स्थलांतर दर्शवितात.

पारधी हा शब्द 'पारध' या संस्कृत शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ शिकार असा आहे. शिकार करणारा तो पारधी यावरुन या जमातीचा पारंपारिक व्यवसाय शिकार करणे हा आहे हे स्पष्ट होते. स्वतंत्र न्यायव्यवस्था, बोलीभाषा, वैशिष्टपूर्ण जीवनपध्दती, साधी अर्थव्यवस्था इ.अनेक आदिवासी जमातीची वैशिष्ट्ये पारधी जमातीत आढळतात.पारधी जमातीतील सामाजिक नितीनियम, धार्मिक विधी हे स्त्रीचे स्थान दुय्यम असल्याचे दर्शवितात तर जातपंचायत आणि वैवाहिक जीवनामधील प्रथा, परंपरा तिला पुरुषाच्या बरोबरीने स्थान देतात.

ब्रिटीश शासनाने निर्माण केलेल्या (criminal tribe act १८७१) या कायद्याचा पारधी समाजाच्या जीवनावर अत्यंत घातक व दुरगामी परिणाम झाला. या कायद्यान्वये पारधी जमात ही गुन्हेगार जमात म्हणून घोषित झाली. त्यामुळे गुन्हेगारीचा कलंक घेऊन ही जमात आपल्या आर्थिक व सामाजिक जीवनात आजही अपमान व अवहेलना सहन करत आहे.

महाराष्ट्रात पारधी जमात अनेक जिल्ह्यात कमी अधिक संख्येने वास्तव्य करीत असून १९६१ साली महाराष्ट्रातील या जमातीची एकूण लोकसंख्या २१,४१७ इतकी होती. त्यामध्ये वाढ होऊन २००१ च्या जनगणनेनुसार ती आता ०१,५९,८७५ इतकी आहे. मात्र अचूक जनगणनेअभावी या आकडेवारीबद्दल साशंकता आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील आदिवासी साक्षरतेचे शेकडा प्रमाण ३९.४५ टक्के आहे. त्यामध्ये किंचित वाढ होऊन २००१ साली ५८.३ टक्के इतके झाले. मात्र आदिवासींच्या तुलनेत पारधी जमातीचे साक्षरता प्रमाण कमी असून स्त्री साक्षरता तर अत्यंत कमी आहे. इ. स. १९५४ पासून महाराष्ट्र शासनाने आदिवासीच्या शैक्षणिक विकासासाठी निवासी आश्रमशाळा ही योजना सुरु केली. आजमितीस शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात ५५२ शासकीय आश्रमशाळा, ५५६ अनुदानित आश्रमशाळा अशा एकूण ११०८ आश्रमशाळा चालविल्या जातात. उस्मानाबाद जिल्ह्यात एक शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, एक शासकीय माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा आणि ०३ शासकीय आदिवासी विद्यार्थी वसतिगृहे आहेत. ३७ खाजगी अनुदानित आश्रमशाळा असून त्यामध्ये फक्त विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या मुलांना प्रवेश दिला जातो. पारधी जमात अनुसूचित आदिवासी जमात असल्याने या शाळांमधून पारधी विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला जातो.

पोषाख, आहार, अंधश्रध्दा, बोलीभाषेच्या लिपीचा अभाव, उदरनिर्वाहाची साधने, व्यसनाधिनता, जातपंचायत, सामाजिक प्रथा, परंपरा इ. अनेक कारणांमुळे पारधी समाज आजही अप्रगत आणि मागासलेले सामाजिक व आर्थिक जीवन जगतो आहे. पारधी जमातीत गावपारधी व फासेपारधी या दोन प्रमुख पोटजाती असून त्यांच्या कुलदेवता शाक्तपंथीय आहेत. कुलदेवता या आडनाव (जे कुळही आहेत) परत्वे भिन्न असून एकूणच त्याच्या जीवनावर धर्माचे वर्चस्व दिसून येते. समाजात आजही अनेक पारंपारिक श्रध्दा, अंधश्रध्दा पाळल्या जातात. शिकार हा पारंपारिक प्रमुख व्यवसाय असल्याने भटकंतीचे जीवन क्रमप्राप्त होते. शिकारीसाठीची साधने व कौशल्ये त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे अवगत केली असून सर्व साधने ते स्वतः तयार करतात.

ब्रिटीशांनी वन्यजीव संरक्षण कायदा करुन वनसंपत्तीवर आपले स्वामीत्व प्रस्थापित केले. त्यामुळे पिढ्यानुपिढ्या चालत आलेल्या शिकार व्यवसायावर बंदी आली. प्रगतांशी संपर्काचा अभाव, वैशिष्ट्यपुर्ण व साधी जीवनशैली, निरक्षरता, गावगाड्याशी नसलेला संपर्क यामुळे उदरनिर्वाहाचे पर्यायी साधन उपलब्ध नसल्याने चोरी, दरोडा, वाटमारी करुन उपजीविका करण्याशिवाय कोणताही

पर्याय पारधी समाजासमोर उरला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात इ. स. २००६ च्या वनहक्क संरक्षण कायद्यान्वये त्यांचे वनहक्क पूर्नस्थापित करण्याचे प्रयत्न झाले. पण अद्यापही हा समाज स्वतःच्या हक्कापासून वंचित आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात समाजसुधारकांकडून त्यांच्या विकासासाठी अपुरे प्रयत्न झाले. स्वातंत्र्योत्तर काळात उशिराने का होईना पण भारतीय समाजाचा महत्त्वपूर्ण घटक असलेल्या आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी अनेक घटनात्मक तरतुदी केल्या असून त्याद्वारे त्यांचे न्यायहक्क त्यांना मिळवून देण्याचे प्रयत्न झाले.

महाराष्ट्र राज्यात आदिवासीच्या विकासासाठी १९७३ साली आदिवासी कल्याण विभागाची स्थापना झाली. त्या माध्यमातून आदिवासी क्षेत्राचा संतुलित सामाजिक-आर्थिक विकासासाठी १९७४-७५ मध्ये आदिवासी उपयोजना संकल्पनेची निर्मिती झाली. या योजनेतंर्गत विकासावर जोर देऊन सर्व प्रकारची व स्तरावरची पिळवणूक थांबवणे, सामाजिक, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेस वेग देणे, संघटन कौशल्याची बांधणी करणे इ. उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली. उस्मानाबाद जिल्हा आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर येत असल्याने आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय औरंगाबाद मार्फत शासकीय स्तरांवर उपलब्ध निधीचे जिल्ह्यातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटप करुन त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमाद्वारे प्रयत्न केले जात आहेत. मात्र पारधी समाजाची निरक्षरता, व्यसनाधिनता व शासकीय यंत्रणेची उदासीनता इ. कारणांमुळे प्रगती व विकासाची वाटचाल अपुरी व अडखळती आहे.

**प्रकरण ४ थे :- अभ्यास माहितीचे विश्लेषण**

हे प्रकरण अभ्यासविषयाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असून संशोधनासाठी आवश्यक असलेली अभ्यासविषयाची पार्श्वभूमी, दुय्यम स्त्रोताच्या सहाय्याने आजपर्यंत झालेले संशोधन अभ्यासल्यानंतर प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे व गृहीतके लक्षात घेऊन उत्तरदात्यांकडून माहिती मिळवण्याच्या उद्देशांने, योग्य पध्दतीने प्रथमतः मुलाखत अनुसूची तयार केली व नमुना निवडीचे सुयोग्य तंत्र वापरुन उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी जमातीतील एकूण ३०० उत्तरदात्यांकडून समाजाचे कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक जीवन अभ्यासण्यासाठीची आवश्यक माहिती मिळवली. संशोधकाने स्वतः मिळवलेल्या या माहितीचे तपशीलवार विश्लेषण या प्रकरणात केले आहे.

**कौटुंबिक जीवन :-**

पारधी जमातीच्या कुटुंबातील सदस्य संख्येच्या अभ्यासांती ५ ते ७ कुटुंब सदस्य संख्या असण्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ५४% इतके असून त्याखालोखाल २ ते ४ सदस्यसंख्येचे प्रमाण २८.३३% इतके आहे. या गटातील बहुसंख्य उत्तरदाते नवविवाहित आहेत. ८ ते १० सदस्यसंख्या असणारे १५.३३% आहे. जमातीत ८०.६७% विभक्त कुटुंब पध्दतीचे प्रमाण असूनही कुटुंबसदस्य संख्या जास्त असल्याचे स्पष्ट होते. त्यामागचे कारण जाणण्यासाठी उत्तरदात्यांनी कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया केली आहे का असा प्रश्न विचारला असताना ९४% उत्तरदात्यांनी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केली नाही असे उत्तर दिले. यावरुन पारधीमध्ये कुटुंबनियोजनाबद्दल अज्ञान असून लहान कुटुंबाचे महत्त्व पटलेले नाही. अभ्यासक्षेत्रात पारधी जमातीची शिंदे, काळे, पवार, भोसले, चव्हाण ही पाच कुळे आढळली. त्यांची आडनावे हीच त्यांची कुळे असून सर्वाधिक ४५% काळे कुळाचे आहेत तर २४% पवार व २३.३३% शिंदे कुळाचे आहेत. पारधी जमातीत फासेपारधी/गायपारधी आणि गावपारधी या दोन पोटजाती असून काळे आणि पवार ही कुळे दोन्ही पोटजातीत आढळतात तर चव्हाण हे आडनाव फक्त गावपारधी या पोटजातीत आढळते. गाय/फासेपारधी हे मेवाडे या नावानेही ओळखले जातात तर गावपारध्यांना चोरासिया असेही म्हणतात. या कुळांमध्ये उपकुळेही असतात आणि परस्परांमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठताही जोपासली जाते.

उत्तरदात्यांचे वय व लिंगनिहाय वर्गीकरण केले असता ३१ ते ५० वर्षे या कार्यक्षम वयोगटातील ५१% उत्तरदाते आहेत. एकूण ३०० पैकी ४१ स्त्री उत्तरदाते असून वरील वयोगटात त्याचे प्रमाण ७% आहे. सर्व उत्तरदाते विवाहित असून विवाहित व्यक्ती आपल्या कुटूंबाचा सामाजिक दर्जा, आर्थिक स्थितीबद्दल चांगल्या प्रकारे माहिती सांगू शकतात. उत्तरदात्यांना सध्या राहत असलेल्या ठिकाणचा वास्तव्याचा कालावधी विचारला असता १५ हून अधिक वर्षे कालावधी सांगणारे सर्वाधिक ८४.३३%उत्तरदाते आढळले. त्याखालोखाल ११ ते १५ वर्षे कालावधी सांगणारे ५.३३% उत्तरदाते तर ० ते ०५ वर्षापर्यन्त वास्तव्य करणारे ५.३७% उत्तरदाते आहेत. पारधी जमात ही भटकंती व स्थलांतर करुन उदरनिर्वाह करणारी असल्याने यासंबंधी सखोल माहिती जाणून घेतली असता कुळकायद्याचे कारण समोर आले. वास्तव्याचा कालावधी जास्त सांगितल्याने कुळकायद्याच्या आधारे राहती जागा स्वमालकीची होईल या आशेपोटी अशी उत्तरे देण्यात आली. वास्तविक ही जमात उपलब्ध उपजीविकेच्या साधनांवर एखाद्या ठिकाणी आपले वास्तव्य निश्चित करते व परिस्थिती

प्रतिकूल झाल्यानंतर ताबडतोब इतर ठिकाणी स्थलांतर करते. ३००उत्तरदात्यांपैकी फक्त १३.६७% स्त्रिया आहेत. निरक्षरता, आत्मविश्वासाचा अभाव, संशयी दृष्टिकोनामुळे पुरुषांची हरकत असणे इ. कारणांमुळे स्त्रिया उत्तरे देण्यासाठी पुढे आल्या नाहीत.

पारध्यांच्या घरातील सोयी सुविधासंबंधी आढावा घेतला असता ७०% उत्तरदात्यांकडे वीज, ७४% उत्तरदात्यांकडे पिण्याचे पाणी तर ७३% उत्तरदात्यांकडे स्नानगृह नसल्याचे आढळले. यावरुन या जमातीत प्राथमिक सोयीसुविधांचा अभाव असल्याचे स्पष्ट होते. ज्या उत्तरदात्यांकडे वीजेची सोय होती त्यापैकी बहुतेकांनी ती अवैध मार्गाने मिळवली होती. पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी उत्तरदाते हातपंप, शेतातील विहीर इ. वर अवलंबून राहत असल्याचे दिसून आले. रोहकल ता. परंडा येथील एका उत्तरदात्याने तर शेतीसंबंधीच्या भांडणामुळे गावकऱ्यांनी बहिकृत केल्याने दोन वर्षे इतर गावाहून पाणी आणावे लागले अशी माहिती दिली. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी २ ते ७ कि.मी. पायपीट करावी लागण्याची वस्तुस्थिती आढळली. गावकऱ्यांच्या नकारात्मक दृष्टिकोनामुळे व अविश्वासामुळे सोयीसुविधा मिळवतांना अनेक अडचणींना व संकटांना तोंड द्यावे लागत असल्याचेही आढळले. त्यामुळेच मागासलेपणाचे प्रमाण अधिक आहे.

समाजात व कुटुंबात स्त्रीची भुमिका व कार्य अत्यंत मोलाचे व महत्त्वाचे असते. कुटुंबातील स्त्रियाच्या निर्णय स्वातंत्र्याचा आढावा घेतला असता ८९.६७% कुटुंबातील स्त्रियांना निर्णयस्वातंत्र्य नसल्याचे आढळले. याची कारणे पुरुषप्रधान संस्कृती; निर्णय सर्वहितकारी नसणे अशी होती. यावरुन कौटुंबिक जीवनात स्त्रीचा दर्जा दुय्यम असल्याचे स्पष्ट होते. ७५% पारधी इंधन म्हणून लाकूड वापरतात तर १५% रॉकेलचा वापर करतात. यावरुन इंधनासाठी हा समाज अजूनही वनसंपत्तीवर अवलंबून असल्याचे स्पष्ट होते. रॉकेलचा वापर करणारे उत्तरदाते शहरी भागालगत वास्तव्य करीत असल्याचे आढळले. अनेक उत्तरदात्यांनी इतर पर्याय उपलब्ध झाले तरी आर्थिक विवंचनेमुळे लाकडाचा वापर करण्याशिवाय गत्यंतर नाही असे सांगितले. इंधनासाठी लाकडाची उपलब्धता सहजसाध्य नाही म्हणून ते चोरी करुन मिळवण्याची अनेक उदाहरणे आढळली. रॉकेलचा काळाबाजार होत असल्याने त्याचीही उपलब्धता कमी असल्याची माहिती उत्तरदात्यांनी दिली.

मुलांचे संगोपन, सामाजिकरण व संस्काराच्या दृष्टीने रिकाम्या वेळेत कुटुंबातील मुले काय करतात ही बाब महत्वाची असून २३.६७% उत्तरदात्यांची मुले रिकामा वेळ मिळाला की भटकतात. निरर्थक भटकण्यामुळे कूसंगती, व्यसन इत्यादीचा धोका उद्‌भवतो. ३४% उत्तरदात्यांची मुले

घरातील कामे करतात. तर १३.६७% उत्तरदात्यांची मुले शिकार करतात असे आढळले. ७.६७% उत्तरदात्यांनी रिकाम्या वेळेत मुले भीक मागतात व यात त्यांना काहीही चुकीचे वाटत नाही असे सांगितले. ही धक्कादायक व चिंताजनक बाब असून ती समाजाची प्रगती व विकासाची वाट किती बिकट आहे हे दर्शविते. जमातीमध्ये मद्यपान ही धार्मिक व सामाजिक मान्यता असलेली प्रथा असून ८५.३७% पारध्यांच्या घराजवळ दारु विक्री केंद्र आहे. यापैकी काही उत्तरदाते स्वतः अवैधरित्या दारु विक्री करतांना आढळले.

**वैवाहिक जीवन :-**

पारध्यांच्या वैवाहिक जीवनाचा अभ्यास करत असताना विवाहविधी व त्याचे स्वरुप उत्तरदात्यांचा लिंगनिहाय वैवाहिक दर्जा, जमातीतील प्रचलित विवाहप्रकार, विवाह संस्थेबद्दलचे मत, विवाहवेळचे वय व त्यामधील वाढीची कारणे, हुंडाप्रथा, जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य, घटस्फोट या अनेक पैलूंचा अभ्यास केला.

उत्तरदात्यांना विवाहावेळचे वय विचारले असता सर्वाधिक ७२% उत्तरदात्यांनी १५ ते १८ वर्षे वयोगटात विवाह झाल्याचे सांगितले तर फक्त २२% उत्तरदात्यांनी कायदेशीर विवाह वय म्हणजेच १९ ते २५ या वयोगटात विवाह झाल्याचे सांगितले. १० ते १४ वर्षे या वयोगटात विवाह झालेले ०५ % उत्तरदाते आहेत. यावरुन बालविवाहाचे प्रमाण सर्वाधिक आढळले. यात स्त्रियाचे प्रमाण जास्त आहे. उत्तरदात्यांचा लिंगनिहाय वैवाहिक दर्जा तपासला असता एकही स्त्री अथवा पुरुष उत्तरदाता अविवाहित तसेच घटस्फोटीत नाही. फक्त ०२ उत्तरदाते विधूर आणि ११ उत्तरदाते विधवा असल्याचे आढळले. पारधी जमातीत पुनर्विवाहाची प्रथा असल्याने विधूर तसेच विधवांचे प्रमाण कमी दिसून आले. जमातीमध्ये बहुविवाह प्रचलित असल्याचे ८१% उत्तरदात्यांनी सांगितले तर १९% उत्तरदात्यांनी एकविवाह प्रचलित असल्याचे सांगितले. बहुविवाहामध्ये बहुपत्नी विवाह प्रचलित असून एकही बहुपती विवाहाचे उदाहरण आढळले नाही. प्रत्यक्ष ६२% उत्तरदाते एकविवाहित आहेत, ४% द्विभार्याधारक तर २८.६६% उत्तरदाते बहुपत्नी विवाहित आहेत. याची कारणे जाणून घेतली असता विवाहावेळी देय असलेले वधुमूल्य देण्याची क्षमता हे प्रमुख कारण दिसून आले. अधिक वधूमुल्याच्या हव्यासापोटी मुलीच्या वडिलांने विवाहित पुरुषासोबत लग्न लावल्याची अनेक उदाहरणे आढळली. तसेच पतीने परस्त्रीशी विवाहबाह्य संबंध ठेवण्यापेक्षा तिच्याशी विवाह करणे चांगले असा विचारही याठिकाणी व्यक्त झाला. द्वेष, सूड किंवा वैरभावनेपोटी ही अनेक स्त्रियांशी विवाह केलेले आढळले. काही उदाहरणात

गुन्हेगारी कृत्यांमुळे दीर्घकाळ तुरुंगवासाची शिक्षा भोगत असल्यास सामाजिक व वैयक्तिक सुरक्षेसाठी स्त्रीने दुसरा विवाह केल्याचे आढळले. वधुमुल्याच्या प्रथेमुळे गंभीर आर्थिक अडचणीच्या प्रसंगी विवाहाकडे पैसा प्राप्तीचे साधन म्हणून पाहिले जाते व त्यामुळे विवाह हा संस्कार न राहता बंधन किंवा करार बनतो याबद्दलचे मत जाणले असता २९% उत्तरदात्यांना विवाह म्हणजे करार आणि ६९.६७% उत्तरदात्यांना विवाह म्हणजे बंधन वाटते. सततची भटकंती, अन्याय, अत्याचार, गुन्हेगारी कृत्ये इ. अनेक कारणांमुळे मानवी जीवनाच्या या महत्त्वपुर्ण संस्थेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन उदासीन झ ाला असावा सर्वच उत्तरदात्यांनी सद्यस्थितीत विवाहवयात वाढ झाल्याचे सांगितले. ही वाढ विवाहवयाची कायदेशीर अटीची जेमतेम पुर्ततेपर्यन्तच मर्यादित असून त्यामागची कारणे विचारली असता ४०.६७% प्रगतांचा संपर्क, २९.३३% कायद्याचे बंधन व २७% उत्तरदात्यांनी शिक्षणामुळे हा बदल झाल्याचे सांगितले. जमातीत वधूमूल्याची प्रथा आहे त्यास 'द्येज' असे संबोधले जाते. द्येजची रक्कम देण्यासाठी वर मुलाने भावी सासऱ्याच्या घरी शिकारीसाठी मदत करणे, चोरी-दरोडा मध्ये सहभागी होऊन मदत करणे इ. स्वरुपात काम केल्याचे उदाहरणे आढळली. द्येजच्या स्वरुपात मिळणारी रक्कम ही अनेक विपरित व अनर्थकारी घटनांना कारणीभूत असल्याचे दिसून आले. जावयाला शिक्षा झाल्यास मुलीची जबाबदारी टाळण्यासाठी अनेकदा मुलीचा बाप द्येजच्या हव्यासापोटी विवाहित मुलीचे लग्न दुसऱ्या मुलाशी लावतो. परिणामी मुलांची फरफट होते. शिक्षा भोगून आल्यानंतर जावई व सासरा यांच्यामध्ये दुसरे लग्न वादाचे कारण ठरुन खुनाच्या घटनाही घडल्या आहेत. विवाहावेळी हूंडा कोणाकडून घेतला जातो या प्रश्नाला ५३.३३% वराकडून तर १०.६७% उत्तरदात्यांनी वधूकडून हुंडा घेतल्याचे आढळले. वधूमूल्यांची प्रथा पारंपारिक आहे पण त्यात कालपरत्वे बदल होत असून इतर समाजाच्या संपर्कामुळे वरमुल्याची कल्पना जोर धरत आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही एका पक्षावर विवाहाचा आर्थिक बोजा न टाकता लग्नखर्च विभागला जाण्याचे प्रमाण लक्षणीय असून हुंड्याची देवाणघेवाण न करता विवाहाचा खर्च दोन्ही बाजूने करणाऱ्याचे प्रमाण ३६% आहे. ही नूतन बाब अत्यंत स्वागतार्ह व सामाजिक स्वास्थ वाढवणारी आहे. वधूमूल्य व विवाहाचा खर्च यांच्या चिंतेने स्त्रीभ्रुणहत्या ही नवीन सामाजिक समस्या निर्माण करणाऱ्या इतर तथाकथित प्रगत समाजाने याचा आदर्श घेतला तर सामाजिक समतोल नक्कीच साधला जाईल.

जमातीचा विवाहविधी जमातीतील अनुभवी व्यक्तिकडून लावणाऱ्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ७०.३३% आहे. ब्राम्हणाच्या हस्ते विवाहविधी पार पाडण्यासाठी फक्त २२.६७% उत्तरदात्यांनी पसंती

दर्शविली. यातील बहुतेक उत्तरदाते शहरी भागात व लगत वास्तव्य करणारे असून विवाहविधीसाठी जमातीतील अनुभवी व्यक्तीला प्राधान्य दर्शविण्यामागे पारधी जमातीच्या पारंपारिक विवाह विधीची पूर्ण माहिती व त्यामुळे पारंपारिक सर्व रितीरिवाजांचे पालन केले जाणे ही कारणे आढळली. विवाह ठरवतानाचे जमातीचे नियम जाणून घेताना असे आढळले की एकाच कूळात बेटीव्यवहार निषिध्द असून दोन वेगवेगळयाकूळातील नातेसंबंध जोडणारा विवाहविधी तिसऱ्या कूळातील अनूभवी व्यक्तीच्या हस्ते सर्व प्रथा, परंपरा व नियमांचे पालन करीत पार पडतो.

जमातीमध्ये आजही पारंपारिक पध्दतीने २९% विवाहविधी होतात तर आधुनिक पध्दतीला ७१% उत्तरदात्यांनी प्राधान्य दिले. यामध्ये हिंदू विवाहविधीचा स्विकार आढळून येतो. जमातीतील संघटन टिकविण्यासाठी पांरपारिक विवाहविधीचे पालन गरजेचे आहे असेही मत अनेकांनी व्यक्त केले. नोंदणी विवाहाचे एकही उदाहरण आढळले नाही तर सामुहिक विवाह संबंधाने अज्ञान व नापसंती दिसून आली. या माहितीवरुन विवाहविधीच्या संबंधाने ही जमात संक्रमण अवस्थेत असल्याचे आढळून आले. विवाह ठरवताना मूला-मुलींच्या विचार व मतांना ९३% पालक प्राधान्य देतात. तर पुरेशी समज नसते या कारणास्तव ७% पालक प्राधान्य देत नाहीत. मुलांएवढेच मुलींच्याही मतांना प्राधान्य असल्याचे आढळले मात्र आंतरजातीय विवाहासाठी कर्मठ विरोध आढळला. विवाह ठरवत असताना एकूणच सामाजिक शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीच्या कारणांमुळे कुटूंबांमध्ये पुरेशी प्रगल्भता आढळून आली नाही. घटस्फोटासाठी कायदेशीर प्रक्रिया आहे यासंबंधी जमातीत कमालीचे अज्ञान आढळले. आजही जमातीत घटस्फोटासाठी जातपंचायतीचे माध्यम स्वीकारण्याचे प्रमाण
६१.३३% आहे तर परस्पर काडीमोड घेतला जाण्याचे प्रमाण ३५.६७% तर ३ % कायद्याचा आधार घेतात. याठिकाणी जातपंचायतीचा अजूनही जमातीवर किती पगडा आहे हे दिसून आले. आर्थिक दंड टाळण्यासाठीच जातपंचायतीकडे न जाता परस्पर काडीमोड घेतला जातो. जोडीदाराशी न पटणे अथवा वाईट वर्तणूक, पती नपूंसक असणे वा असाध्य रोगाने पिडीत असणे, विवाहपूर्व किंवा विवाहबाह्य संबंध असणे ही घटस्फोट घेण्याची कारणे आढळून आली.

**धार्मिक जीवन :-**

सर्वेक्षणादरम्यान पारधी आपला धर्म हा हिंदु धर्म सांगतात. जमातीत धर्मसंकेत व नियमांचे पालन अत्यंत कटाक्षाने केले जाते. प्रत्येक दिशेला धार्मिक महत्व असून त्यानुसार धार्मिक नियम पाळले जातात. देव पश्चिम दिशेला स्थानापन्न असतात त्यामुळे पश्चिमेकडे स्त्रियांनी जायचे नाही. कारण जमातीत विवाहित स्त्रीला अशुभ मानून धार्मिक विधीपासून कायम दूर ठेवले जाते. महिलांनी आपले दैनंदिन वापरातील कपडे पूर्वेकडे ठेवले पाहिजेत. स्त्रियांनी दक्षिणेकडे झोपायचे, तर पुरुषवर्गाने उत्तरेकडे झोपायचे मात्र विशेष बाब अशी की स्त्रियांना लागू असणारे नियम कुमारिकेला लागू नाहीत असे आढळून आले. अशा विविध संकेत व नियमांच्या माध्यमातून दैनंदिन जीवनातील धर्माचे स्थान दिसून येते. त्यांचे धार्मिक आचरण, देव-देवता, सण-उत्सव हिंदु धर्माप्रमाणेच असल्याचे सांगितले. मात्र काहींनी आपला धर्म आदिवासी असल्याचे सांगितले. मात्र त्यांना आदिवासी धर्माचे नेमके स्वरुप आणि वेगळेपण सांगता आले नाही. या वेगळ्या उत्तराची कारणमीमांसा जाणून घेताना हिंदू धर्माने पारधी जमातीला अलग ठेवले तर शासनाने हिंदूची एक पोटजात ठरवून सवलती नाकारल्या आणि हिंदू पारधी ऐवजी आदिवासी पारधी असा उल्लेख व नोंद झाल्यास अनुसूचित जमातीसाठीचे शासकीय लाभ व सवलती प्राप्त होतात अशी कारणे सांगितली. आजही फासेपारधी या उपजातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये तर गावपारधी उपजातीचा उल्लेख हिंदु-पारधी असल्याने गावपारधी या उपजातींला शासकीय सवलतीपासून वंचित राहावे लागत असल्याचे उत्तरदात्यांनी सांगितले. यावरुन धर्माविषयीचे हे बदलते मत शासकीय आरक्षणाच्या लाभापोटी असल्याचे लक्षात आले. देवावरील नितांत श्रध्दा व्यक्त करताना सर्व ३०० उत्तरदात्यांनी आपला देवावर विश्वास असल्याचे सांगितले. पारधी भविष्यासंबंधी निर्णय घेताना धर्माचा आधार घेतात.

जमातीमध्ये इखोत, वाघजाई, खोडियार, जोगण, नौकड, कोरब, दुगाव, कर्नाटदेवी, पीपळाजदेवी, चावंडदेवी, यल्लमा, मरीआई, शिकोतर, हिंग्ळजदेवी, कालिका, काळूबाई, तुळजाभवानी, महालक्ष्मी या कुलदेवता आहेत. कुलदैवत हे कूळ आणि आडनावानुसार वेगवेगळे असल्याचे दिसून आले. चांदीने मढवलेल्या सुपाऱ्या (ज्यांना जमातीमध्ये नागोबा म्हटले जाते) सर्वच कूळामध्ये देवता म्हणून पूजनीय आहेत. या कूलदेवतांशिवाय खंडोबा, मारुती, विठ्ठल रुक्मीणी, महादेव, भैरोबा इ. हिंदू देवतांचेही पारधी जमातीत पूजन केले जाते. जमातीमध्ये देवपूजा करणाऱ्यांचे प्रमाण ८६.३३% असून १४% उत्तरदाते स्त्रिया असल्याने त्यांना देवाला स्पर्श करण्यास मनाई आहे.

पारधी घरामध्ये देव्हारा नसतो. देव नेहमीसाठी कपड्यात बांधून ठेवलेले असतात व फक्त प्रासंगिक पूजेसाठी बाहेर काढले जातात. जमातीत देवाच्या मूर्ती वैशिष्टपुर्ण असून या मूर्ती सोने किंवा चांदी या दोनच धातूपासून तयार केलेल्या असतात.यामुळेच पारधी स्त्रिया वा पुरुष सोने चांदीचे दागिने वापरण्यास स्वतःला परावृत्त केल्याचे दिसून आले. देवासाठी 'पातर' हा शब्द जमातीत रुढ असून कूलदेवतेला 'जमातनादेव' असे म्हटले जाते. जमातीत देवतांचे मंदिर कूठेही आढळले नाही. धर्माचे बाजारीकरण दिसून आले नाही. पारंपारिक धर्माचरणामुळे पारधी जमात टिकून आहे असे अनेकांनी सांगितले. समाजातील सुशिक्षित व्यक्तींनी धर्माचरण योग्य मात्र अंधश्रध्दा व चुकीची धार्मिक कृत्ये करण्याची सक्ती या दोनबद्दल नापसंती दर्शविली. धार्मिक आचरणाच्या निरीक्षणातून जमातीतीत मागासलेपण अधोरेखित होते.

जमातीत इतर लोकदेवतांनाही पारधी भजतात. त्यामुळे हिंदू धर्मातील खंडोबा, नागोबा याच बरोबर विठ्ठल रुक्मीणी, भैरोबा, मारुती यांची ही पूजा करतात. याशिवाय जिल्ह्यातील तुळजापूर, येरमाळा व चिवरी अशा ठिकाणी देवदर्शनासाठी जातात. जमातीत पारधान देवी, मालपूरा देवी, अगाखडी, फोड्यांची देवी, धनी अशी इतर देवतांची नावे सांगण्यात आली. काही मुस्लीम अवलियॉ, बैरागी, मसोबा यांचीही पूजा करतात. सप्तश्रृंगी, मांढरदेवी, भवानी, लक्ष्मी अशा देवतांची आराधना केली जाते.

पारधी जमातीत प्रामुख्याने दसरा, शिमगा, महाशिवरात्र, नवरात्र या सणांला विशेष महत्व आहे. गुढीपाडवा, पोळा, आक्षयतृतीया, होळी, दिवाळी यासारखे हिंदूचे सण पारधी आत्मीयतेने करतात. सद्यःस्थितीत राखीपौर्णिमा, नागपंचमी असे सणही करीत आहेत.

जमातीचे धार्मिक विधी करण्यासाठी ८ % उत्तरदाते ब्राम्हण बोलावतात. हे उत्तरदाते शहराच्या आसपास राहतात. तर ३०% उत्तरदाते भगतांच्या माध्यमातून धार्मिक विधी करतात. भगताला पारधी भवारया म्हणतात. विधी करताना साक्षात दैवी शक्ती त्याच्या अंगात संचारते असा विश्वास आहे. तर कुटुंबातील अनुभवी व्यक्तीकडून धार्मिक विधी करण्याचे प्रमाण ६१.६७% आहे. धार्मिक विधीमध्ये विवाहित स्त्रियांना अजिबात सहभागी करुन घेतले जात नाही.

जमातीत इच्छापूर्ती, ईश्वरस्मरण संकटनिवारण, समाधान या कारणांमुळे उपवास केला जातो. जमातीमध्ये भविष्यासंबंधी कमालीची अनिश्चितता असल्याने नेहमी नवस केले जातात आणि त्यामुळे नवस करण्याचे प्रमाण ९८.६७% आहे. या नवसाची पुर्तता देवाला वस्तू आर्पण करणे, मलिदा

वाटणे, दंडवत घेणे, अन्नदान करणे तर जमातीच्या कुलदैवाला केलेल्या नवसाची पूर्ती बलिदानानेच केली जाते. जमातीचा मुख्य धार्मिक सण म्हणजे देवकारण या प्रसंगी देव-देवतांना पशू बळी देण्याचे प्रमाण ९९.६७% इतके असून याप्रसंगी रेड्याचा बळी देण्याचे प्रमाण ७२.३३% आहे. तर बकऱ्याचा बळी देण्याचे प्रामण २६.६७% इतके आहे. पशूबळीच्या प्रथेवरुन जमातीचे धार्मिक मागासलेपण स्पष्ट होते. देवकारण अर्थात जत्रा हे जमातीतील एक महत्वाचा वार्षिक धार्मिक विधी असून आर्थिक जीवनावरही या प्रचंड खर्चीक विधीचा परिणाम होतो. देवकारणामधील अनेक धार्मिक कर्मे ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. केवळ एक पारंपारिक प्रथा म्हणून पशूबळी देण्याचे प्रमाण ५९% असून सुखप्राप्तीसाठी पशूबळी देण्याचे प्रमाण ३४.३३% आहे. या अंधश्रध्देची समीक्षा अथवा त्यात बदल करण्याची मानसिकता जमातीमध्ये नसल्याचे दिसते.

जमातीवरील अन्याय, अत्याचाराच्या घटना घडल्या की प्रसारमाध्यमे धर्मांतराची चर्चा करतात पण जमातीची धर्मांतराची मानसिकता नाही. जिल्ह्यात एकही धर्मांतराचे उदाहरण आढळले नाही. त्यामुळे यांना मुळ प्रवाहात सामिल करुन घेणे व हिंदू म्हणून सन्मान मिळणे गरजेचे आहे. नक्षलवादी चळवळीशी त्यांचा संपर्क होण्याअगोदर त्यांचे सामिलीकरण आवश्यक आहे.

**सामाजिक जीवन :-**

स्वातंत्र्योत्तर काळात शासकीय योजना, सवलती, तसेच प्रगती व विकासासाठी जमातीचे संघटन या विविध माध्यमातून इतर जातीजमातीशी व प्रगतांशी असलेल्या सामाजिक संबंधामध्ये झालेली लक्षणीय वाढ अपेक्षितच होती. या सामाजिक संबंधाचे स्वरुप जाणले असता प्रासंगिक स्वरुपाच्या सामाजिक संबंधाचे प्रमाण ६०% आहे. तर जवळचे संबंध असण्याचे प्रमाण तसेच कसल्याच स्वरुपाचे संबंध नसल्याचे प्रमाण प्रत्येकी १८% आहे. यावरुन सामिलीकरणाची प्रक्रिया अजूनही योग्य पध्दतीने होत नाही हे स्पष्ट होते. इतर जाती जमाती कडून सहकार्य मिळण्याचे प्रमाण ५४.३३% असून जमातीअंतर्गत सहकार्य न मिळण्याचे प्रमाण ६९.६७% असून जमातीत आपसातील भांडणे, मारामाऱ्या, वैरभाव इत्यादीमुळे लहान-लहान वस्तीमध्ये विभागली गेली त्या प्रमाणात जमातीअंतर्गत सहकार्य ही कमी होत असल्याचे आढळले. जमातीअंतर्गत सुशिक्षितांचे, नोकरदार व्यक्तीचे सहकार्य महत्वाचे असते. मात्र पारधी जमातीत असा नवसाक्षर, नोकरी करणारा वर्ग कटाक्षाने आपल्या जमातीपासून दूर राहतो कारण असे की भावकी अथवा वैरभाव असणारे आप्त

गुन्ह्याच्या प्रकरणात केवळ सुडभावनेने साक्षीदार म्हणून नाव सांगून भविष्य संपविण्याचा प्रयत्न करतात.

पारधी संस्कृती वैशिष्टपुर्ण असून तिचे अनेक पैलु इतर प्रगत समाजापेक्षा भिन्न आहेत. पण प्रगतांच्या संस्कृतीशी तुलना करता श्रेष्ठ -कनिष्ठतेची मानसिकता व न्यूनगंडाची भावना निर्माण होते. या संदर्भाने पारधी संस्कृती कनिष्ठ आहे असे ६७% उत्तरदात्यांना वाटते. तर सर्वसाधारण किंवा मध्यम असल्याचे प्रमाण ३१% आहे. पारधी संस्कृती श्रेष्ठ आहे असे अवघे २% म्हणतात. यावरुन पारधी जमात स्वतःच्या संस्कृतीला कनिष्ठ मानते. त्यामुळे सामिलीकरणाची प्रक्रिया अत्यंत मंद गतीने होत आहे.

मद्यपानाविषयी माहिती संकलित केली असता मद्यपान हे जमातीच्या जीवनाचा एक भाग असून त्याला धार्मिक मान्यता आहे. पारध्यामध्ये मद्यपान करण्याचे प्रमाण ९२% इतके प्रचंड आहे. त्यापैकी ४५.६७% नेहमी मद्यपान करतात. तर पाहुणचाराचा भाग म्हणून मद्यपान करण्याचे प्रमाण २३.३३% आहे. तर धार्मिक प्रसंगी मद्यपान करणारे १८.६७% आहेत. मद्यपानाला धार्मिक मान्यता असून स्त्री व मुले ही मद्यपानात सहभागी होतात. कालौघात दारुविक्रीचा व्यवसाय करण्याचे कारण ही मद्यपानाची धार्मिक मान्यता असून एकूण संपूर्ण जमातीत मद्यपान गैर वा चूकीचे मानले जात नाही. मांसाहार व मद्यपानाच्या माध्यमातून केलेला पाहूणचार प्रतिष्ठेचा समजला जातो.

पारधी वस्ती दुर्गम भागात, माळरानावर, इतर गावापासून दूर असल्याने सार्वजनिक सुविधांची उपलब्धता जाणून घेणे महत्वाचे ठरते. वस्तीमध्ये स्वच्छतागृह, दवाखाना, बाजार व मनोरंजनाचे साधन उपलब्ध नसण्याचे प्रमाण अनुक्रमे ९०.६७% , ६७.६७%, ६२.६७% व २१% इतके असून स्वच्छतागृहाच्या अभावाने वस्तीतील सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न गंभीर असून आजारप्रसंगी दवाखाना उपलब्ध नसल्याचे प्रमाणही अधिक असल्याने आरोग्यविषयक समस्यांना सतत सामोरे जावे लागते त्यावरील खर्चात मोठी वाढ होते आणि ती आर्थिक समस्येला कारणीभूत ठरते. मनोरंजनाच्या सार्वजनिक साधनांच्या अभावामुळे व्यक्तीगत पातळीवर मोबाईल व रेडिओचा वापर मोठया प्रमाणात होतो. त्यामुळे जमातीशी सर्वंकष संपर्कासाठी रेडिओ हे महत्वाचे साधन ठरते.

मानवाच्या मूलभूत गरजांपैकी एक म्हणजे निवारा अर्थात घर होय. पारध्यांच्या सामाजिक जीवनात त्यांच्या घराचा आढावा घेतला असता जमातीत स्वतःचे घर असण्याचे प्रमाण ४७.६७% असून निम्म्याहून अधिक म्हणजे ५२.३३% पारधी कूटूंबाची घर या संकल्पनेबाबत अत्यंत

केविलवाणी अवस्था आहे.  अत्यंत अपुरी जागा ती ही स्वमालकीची नाही, बिकट आर्थिक परिस्थितीमुळे पक्के बांधकाम कुवतीच्या पलिकडे, त्यामुळे घराच्या प्रकार वैविध्य आणि दारिद्र्यदर्शक ठरतो. पत्राशेडमध्ये वास्तव्याचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ४१ % असून त्याखालोखाल वीट मातीचे कच्चे बांधकाम असलेल्या घरांचे प्रमाण २४%  आहे.  अद्यापही १०% पारधी झोपडीमध्ये राहतात. तर पारंपारिक पिढी जात परंपरा असलेल्या कापडी पालात राहणाऱ्यांचे प्रमाण १.३३% आहे.  सिमेंट कॉक्रीटच्या पक्क्या घरात राहण्याऱ्यांचे प्रमाण ०५.३३% आहे.  हा वर्ग मात्र प्रगतांच्या संपर्काने व राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून सत्तेत व संघटनेत सहभागी असणाऱ्या जमातीतील गटाचे प्रतिनिधित्व करतो.  घराचा प्रकार कोणताही असो, सरकारी दप्तरी नोंद नसल्याचे अथवा राहती जागा स्वमालकीची नसल्याचे प्रमाण सुमारे ७६% आहे. तात्पुरता निवारा, त्यामुळे सुविधांचा अभाव, अपुरी जागा, ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण देण्यासाठी असमर्थ असणारे घर यावरुन स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षानंतरही घर ही मुलभूत मानवी गरज अद्याप पूर्ण झालेली नाही हे स्पष्ट होते.  इतर समाजाशी होणाऱ्या संघर्षात पारधी वस्ती व घरे आगीच्या भक्षस्थानी पडण्याच्या घटना नेहमी घडतात.

जमातीत राजस्थानी आणि गुजराती भाषेची मिश्रण असलेली वाघरी भाषा  वापरली जाते. सद्य:स्थितीत व्यवसायानिमित्ताने इतर समाज व शासकीय यंत्रणेशी संपर्क  वाढल्याने बोलीभाषेत बदल झाला असल्याचे प्रमाण ७२% असून जाणीवपूर्वक बदलाचे प्रमाण २१% आहे.  मराठी भाषा सर्वांना येते.  पण स्वजमातीत बोलीभाषेचाच वापर केला जातो.  पारंपारिक पोषाखातही बदल झाला असून आधुनिक पोषाख परिधान करण्याचे प्रमाण ८३.३३% असून, स्थलांतर, इतर समाजाशी संपर्क, मनोरंजनाची साधने इ. मुळे पोषाखात बदल दिसून येतो.  जमातीत मृत व्यक्तीचे दफन करण्याचे प्रमाण ९७ % आहे.  दफनविधी पारंपारिक असून दहनाचे प्रमाण ३ % आहे. स्वतंत्र स्मशानभूमी नसण्याचे प्रमाण  ८५ % असून स्थलांतर, समाजातील ऐक्याचा अभाव, इतर समाजाशी नकारात्मक मानसिकता, शासकीय दूर्लक्ष व उदासीनता इ. कारणामुळे स्मशानभूमीचा प्रश्न गंभीर आहे.

जमातीत आजही जातपंचायतीचे १००% अस्तित्व असून जमातीध्ये ७८%  उत्तरदात्यांना जातपंचायत असावी असे वाटते.  जमातीमध्ये जातपंचायत नसावी असे २२ % उत्तरदात्यांना वाटते. त्यामागे जातपंचायतीची चुकीची व भ्रष्ट कार्यपध्दती हे प्रमुख कारण आहे.  जातपंचायतीमध्ये घटस्फोट, चोरी/फसवणूक, कौटुंबिक कलह, अनैतिक संबंध इ. बाबतीची प्रकरणे चालवून न्यायनिवाडा केला जातो.  सामाजिक बहिष्कार किंवा वाळीत टाकणे, जबर आर्थिक दंड, फोकाने

मारणे, निषिध्द असलेल्या गोष्टी जबरदस्तीने करण्यास लावणे पारंपारिक पध्दतीने इमान करावयास लावणे, आर्थिक नुकसानभरपाई इ. प्रकारचे शिक्षेचे स्वरुप असते. जातपंचायतीतील काही शिक्षांचे स्वरुप विचित्र अनालकलनीय असून सामाजिक मागासलेपण दर्शविते. जातपंचायतीच्या समांतर न्यायव्यवस्थेला कायद्याने बंदी आहे हे जमातीला माहित असण्याचे प्रमाण ८० % असून फक्त २० % लोकांना हे माहिती नाही तरीही जातपंचायत असावी असे ७८ % लोकांना वाटते यावरुन प्रचलित शासकीय न्यायव्यवस्था योग्य न्याय देईल यावर जमातीचा विश्वास नाही हे स्पष्ट होते आणि म्हणून पोलिसांकडून योग्य न्याय मिळत नाही असे म्हणणाऱ्याचे प्रमाण ६९.६७% आहे.

**आर्थिक जीवन :-**

जमातीचा पारंपारिक व्यवसाय शिकार असून वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे या व्यवसायावर बंदी आली. परिणामी आर्थिक जीवनावर त्याचा परिणाम होऊन उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. अद्यापही शिकार करणे हा व्यवसाय असण्याचे प्रमाण १६ % असून क्वचित शिकारीसाठी जाण्याचे प्रमाण ४६.६७ % आहे. जमातीत शिकार न करण्याचे प्रमाण ३७.३३ % असून यांनी इतर व्यवसायाचा मार्ग पत्करला आहे. शिकारीसाठी साधने स्वत: तयार करण्याची कला, पशूपक्ष्यांचे आवाज, सवयी इ. बाबतचे ज्ञान, शिकारीचे पिढीजात प्राप्त कौशल्य इ. मुळे शिकार हा परंपरागत व्यवसाय पिढयानुपिढया चालत होता. मात्र या व्यवसायामध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. वन्यजीव संरक्षण कायदा ही अडचण असण्याचे प्रमाण ८६.६७% असून साधनांचा अभाव आणि आवश्यक मनुष्यबळाचा अभाव असण्याचे प्रमाण प्रत्येकी ५% आहे.

पारंपारिक व्यवसायावर कायद्याने बंदी असल्याने इतर व्यवसाय जमातीने स्विकारले. यात शेती १९.६७%, मजूरी ३६%, पशुपालन ०४.३३% , शेतराखण ३.६७%, नोकरी ०४% , भिक्षा, ऊसतोड मजूर ९.३३%, बांधकाम मजूरी, दारुविक्री, हमाली इ. चा समावेश आहे. मात्र या व्यवसायांसाठी आवश्यक कौशल्याच्या अभावामुळे व अंगमेहनतीची सवय नसल्याने कोणत्याही एका व्यवसायावर उदरनिर्वाह चालवणे शक्य नाही. त्यामुळे जमातीत द्विव्यवसाय करण्याचे प्रमाण दिसून येते. अपुरे शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षणाचा अभाव, नकारात्मक मानसिकता यामुळे इतर व्यवसायावर आर्थिक गरजा भागवणे बिकट झाले असून समाज आर्थिक विवंचनाग्रस्त आहे.

कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न २१ ते ३० हजारापर्यन्त असण्याचे प्रमाण ५१ % असून त्याखालोखाल ११ ते २० हजारापर्यन्तचे प्रमाण २६% आहे. ३० हजारापेक्षा अधिक उत्पन्न असण्याचे प्रमाण

१८.६७% आहे. जमातीतील ८१.३३% समाजाचे कमाल वार्षिक उत्पन्न ३० हजार रु. म्हणजे मासिक उत्पन्न २४०० रु. असणे ही बाब समाज आर्थिक विवचनेत जगतो हे सिध्द करण्यास पुरेशी असून त्यामुळेच येणाऱ्या उत्पनातून दैनदिन गरजा भागत नसल्याचे प्रमाण ९०.३३% इतके प्रचंड आहे. फक्त ९.६७ % समाजाच्या दैनंदिन गरजा भागल्या जातात हे आर्थिक मागासलेपणाचे निदर्शक आहे. आर्थिक तूट भरुन काढण्यासाठी जमातीत अनेक मार्ग अवलंबले जातात. त्यामध्ये कर्ज काढण्याचे प्रमाण ३८.३३% असून जास्त काम करण्याचे प्रमाण ३४.६७ % आहे. उसनवारी करुन भागवण्याचे प्रमाण २२ % आहे. तर जोडधंदा करण्याचे प्रमाण ०५% आहे. घरातील वस्तुविषयक आढावा घेतला असता असे लक्षात येते की ६८% मोबाईलधारक आहेत. तर रेडिओचे ४४.३३ % प्रमाण आहे. २०% लोकांकडे सायकल/ मोटारसायकल/ रिक्षा हे प्रवासासाठीचे साधन असून ३४% लोकांकडे भिंतीवरील घड्याळ आहे. दुरदर्शन संच असण्याचे प्रमाण अत्यल्प म्हणजे २% इतके आहे. शिवणयंत्र , बैलगाडी, नांगर, मळणीयंत्र, इ. वस्तूही असून त्यांचे प्रमाण ०१ ते ०२ % आहे व या वस्तू विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून प्राप्त झाल्या आहेत. आर्थिक घडामोडीच्या अभ्यासात बॅक व्यवहार महत्वाचा पैलू असून ७८.६७% बॅक खातेदार नाहीत. आपली आर्थिक कूवत नसल्याचे वाटणे ही मानसिकता यामागे असून फक्त २१.३३% एवढे प्रमाण बॅकेत खाते असण्याचे आहे. यापैकी बहुतेकांनी शासकीय योजनांचे अनुदान मिळवणे या हेतूने खाते काढले असून अनुदान वा रक्कम उचलल्यानंतर पुन्हा या खात्यावर कसलाही व्यवहार केला नाही. निरक्षर असल्याने व बँकेत खाते असण्याची गरजच न वाटणे हे आर्थिक निरक्षरता व दारिद्र्याचे प्रतिक होय.

राजकीय जाणिवेच्या अभ्याससंदर्भाने मतदान हा महत्वाचा पैलू असून जमातीमध्ये मतदान करण्याचे प्रमाण ७०% आहे. राजकीय पक्ष स्वतःच्या स्वार्थासाठी केवळ मतदान ओळखपत्र मिळवून देणे व आर्थिक आमिष दाखवून मत मिळवणे एवढयापूरतेच लक्ष देतात असे सांगण्यात आले. यावरुन राजकीय स्वार्थासाठी जमातीचा वापर केला जातो हे लक्षात येते. जमातीत राजकीयदृष्ट्या अज्ञान आहे. मतदान करण्याचे निकष, पैसा, ओळख, व्यक्ती असे असतात. येथे राजकीय जागृतीचा अभाव दिसून येतो.

जमातीत भावी पिढीने शिकार हा पारंपारिक व्यवसाय सोडून देऊन आधुनिक व्यवसाय करावा असे ९५.३३% उत्तरदात्यांना वाटते. तर आपल्या मुलांनी पारंपारिक व्यवसायच करावा असे ४.६७% उत्तरदात्यांना वाटते.

**शैक्षणिक जीवन :-**

शिक्षण हे मानवाच्या व समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठीचे प्रभावी माध्यम आहे. शैक्षणिक जीवनाचा अभ्यास हा समाजाच्या समस्या जाणणे व त्यामागची कारणे लक्षात घेऊन प्रगतीसाठीच्या प्रयत्नात बदल व सुधारणांसाठी उपयोगी ठरतो. पारधी समाजात सुरुवातीला कुटुंब हेच अनौपचारिक शिक्षण देणारे माध्यम होते. ते शिक्षण पारंपारिक, धार्मिक, लैगिंक इत्यादी स्वरुपाचे होते. इंग्रजांच्या काळापासून औपचारिक शिक्षणाची सुरुवात झाली असली तरी खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच समाजातील सर्वांना शिक्षणाची द्वारे खुली झाली. त्याचाच परिणाम आदिवासी मुलांना शिक्षण मिळावे म्हणून आश्रम शाळांची निर्मिती झाली.

जिल्ह्यात आश्रम शाळेच्या माध्यमातून अनेक पारधी शिक्षित होत आहेत. पण आजही हे प्रमाण अत्यंत अल्प आहे. जिल्ह्यातील आश्रमशाळेत इतर जाती-जमातीच्या तुलनेत पारधी मुलांची संख्या अत्यंत कमी आहे. शिक्षणांच्या बाबतीत भाषेची अडचण नसली तरी त्यांची बोलीभाषा आणि पुस्तकी भाषा यात फरक पडतो. पालक आणि विद्यार्थी या दोघांनाही शाळेचे तितकेसे आकर्षण नसल्याचे दिसते. शिक्षक पारधी आणि इतरामध्ये फरक करतात. जमातीच्या विद्यार्थ्यांना समजून घेणे व अभ्यासक्रम समजून सांगण्यात प्रयत्न करीत नाहीत. अलिकडे पालकांमध्ये मुलांच्या शिक्षणांच्या बाबतीत जागृकता येत असल्याचे दिसते. परंतु शैक्षणिक अडचणी दुर झाल्या पाहिजेत असे त्यांना वाटते.

एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी ३०.६७% साक्षर तर ६९.३३% निरक्षरतेचे प्रमाण आहे. यापैकी फक्त ३.६७% स्त्रिया आणि २७% पुरुष साक्षर आहेत. स्त्री साक्षरतेचे अत्यंत कमी प्रमाण ही बाब जमातीसाठी चिंताजनक आहे. जिल्ह्यातील जमातीच्या शैक्षणिक स्तराविषयी असे चित्र दिसते की, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शालेय शिक्षणांची सोय आहे. तरीही पारधी जमातीचा शैक्षणिक स्तर उंचावलेला नाही. फक्त १५% उत्तरदात्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले आहे. तर १२.३३% माध्यमिक पर्यंत शिकले. उच्च माध्यमिकचे प्रमाण २.३३% आहे आणि १% पदवी व पुढचे शिक्षण घेतले आहे. यावरुन शिक्षणाबद्दलची उदासिनता लक्षात येते. शिवाय संशोधनातील एकही स्त्री उच्च माध्यमिक ते पदवी शिकलेली नाही. शिक्षणांची विविध माध्यमे परिणामकारकरित्या त्यांच्यापर्यंत पोहचले नाहीत. हे वरील प्रमाणावरुन लक्षात येते.

अलिकडच्या काळात मुलांच्या शिक्षणांच्या बाबतीत पालंकामध्ये जागृकता येत असल्याचे जाणवले. ४८.६७% पालकांची मुले शाळेत जातात. तर ५१.३३% पालकांची मुले आजही शाळेत जात नाहीत. हे प्रमाण ५०% पेक्षा जास्त आहे. आश्रमशाळेसारख्या अनेक योजना आणि प्रयत्न करुनही या सर्वांनपासून पारधी वंचित राहिला आहे. पण मागच्या पिढीपेक्षा पुढच्या पिढीत शिक्षणाबद्दल ओढ जाणवते. मुलांना शाळेत पाठवताना जमातीत वस्ती शाळा असण्याचे प्रमाण ६४.६७% आहे. ही शाळा म्हणजे पत्र्यांचे शेड जिथे १ ली ते ४ थी चे सर्व वर्ग एकच शिक्षक घेतात. इमारतीचा अभाव, शैक्षणिक वातावरणाचा अभाव अशा त्रुटीमुळे मुलांचे मन शाळेत रमत नाही. मुले शाळेत जातात पण गळतीचे प्रमाणही सतत वाढत आहे. एकूण ३०० उत्तरदात्यांच्या ७९५ मुलांचा शैक्षणिक स्तर अभ्यासला असता १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण घेणारे १७.९८% मुले आहेत. तर पदवी पर्यंत शिक्षण घेणारे फक्त ५ मुले आहेत. हा आकडा गळतीचा निदर्शक आहे. शाळेत नियमित न गेल्याने शिक्षणाचा पाया कच्चा राहतो. अभ्यासक्रम बोजड वाटतो. परिणामी कंटाळून शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. अर्धवट शाळा सोडली जाते. एकूण ७९५ पैकी ५१.९४% निरक्षर आहेत. तर ३५.१०% साक्षर आहेत. तर १२.३२% मुलांनी अर्धवट शाळा सोडली आहे. जमातीच्या शिक्षणाच्या अडचणी दूर होण्यासाठी आश्रमशाळांची निर्मिती झाली पण आश्रमशाळेस अत्यंत कमी प्रतिसाद दिल्याचे चित्र जमातीत दिसते. ३०० उत्तरदात्यांपैकी ८.६७% पालकांची मुले आश्रमशाळेत जातात. शाळा निवडताना जे ठिकाण सहज उपलब्ध झाले. तेथे पाठवले गेले पसंतीपेक्षा पर्याय निवडला आहे. आश्रमशाळा निवडण्याच्या कारणांमध्ये १४ उत्तरदाते गरिबी व ६ उत्तरदाते चांगले शिक्षण तर शिस्त आणि वळण लागते असे म्हणणारे ४ उत्तरदाते आहेत. तर मोफत जेवण, कपडे, पुस्तके मिळतात म्हणून २ पालकांना चांगली वाटते. एकंदरित आश्रमशाळेला मिळालेला प्रतिसाद कमी आहे.

आश्रमशाळेत न पाठविण्याचे प्रमाण ९१.३३% आहे. याचे कारण योजनेची माहिती नाही असे ५३.३३% उत्तरदात्यांकडून समजले. तर १९.१७% आश्रमशाळा दूर असल्याने मुलांना आश्रमशाळेत पाठवत नाहीत. शासकीय सवलती मिळत नाहीत म्हणून १२.५% तर १०% शिक्षकांच्या दुर्लक्षामुळे मुलांना आश्रमशाळेत पाठवत नाहीत. जमातीतील निरक्षरतेची कारणे जाणून घेतली असता. गरिबी स्थंलातर, भटकंती , जवळपास शाळा नसणे आणि शिक्षणाची अवड नसणे, शिकवलेले समजत नाही अशी आढळली. यावरुन जमातीची आर्थिक स्थिती व मानसिकता ही शैक्षणिक विकासास मारक ठरत असल्याचे स्पष्ट होते. मुलांना शिक्षण घेतांना भाषेची अडचण येत नाही असा ७२.६७% प्रतिसाद

मिळाला. तर २७.३३% उत्तरदाते भाषेची अडचण निर्माण होते असे म्हणतात. यावरुन जमातीला स्थानिक मराठी भाषा अवगत असल्याने भाषेची अडचण मोठ्या प्रमाणात जाणवत नसल्याचे स्पष्ट होते. आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीविषयी व शाळेतील अडचणी विषयी १७.३३% पालक शिक्षकांना भेटतात. तर ८२.६७% पालकांना शिक्षकांच्या भेटीची वा चौकशीची गरजही वाटत नाही. यावरुन पालकांतील शैक्षणिक उदासीनता दिसून येते. शासकीय स्तरावर आरक्षणच्या माध्यमातून शिष्यवृती व इतर अनेक माध्यमातून मागासवर्गातील अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती दिल्या जातात. पण या शैक्षणिक सवलतीबद्दलची माहिती नसण्याचे प्रमाण ६१.३३% असून ३८.६७% उत्तरदात्यांना याबद्दलची माहिती आहे. मात्र माहिती असूनही आपल्या पाल्यांना त्याचे लाभ मिळवून देण्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते असे सांगितले.

आपल्या पाल्यांना या ज्ञात असलेल्या शैक्षणिक सवलतींचा लाभ मिळाला असल्याचे फक्त ३०.६७% उत्तरदात्यांनी सांगितले तर सवलतींची माहिती असूनही पाल्यांना लाभ मिळाला नाही असे ६९.३३% उत्तरदात्यांनी सांगितले.

शैक्षणिक समस्याबद्दल अधिक माहिती मिळवताना, शिक्षणाचा उपयोग नाही कारण नोकरी मिळत नाही, नोकरीसाठी संस्था चालकांना देणगी देण्यासाठी पैसा नाही, गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे चोरीचा संशय पारधी मुलांवर प्रथमतः घेतात, अंतर्गत गुण व सवलती देतांना सापत्नभावाची वागणूक देणे, मुलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन संशयी असतो अशा विविध तक्रारी ऐकण्यास मिळाल्या. या सर्व शैक्षणिक माहितीवरुन पारधी जमातीचा शैक्षणिक मागासलेपणा स्पष्ट होतो. या मागासलेपणाला नाहीसे करताना, जमातीची शिक्षणाबद्दल उदासीन व नकारात्मक वृत्ती, आर्थिक दारिद्र्य, शैक्षणिक सुविधांचा अभाव इ. प्रमुख अडथळे शैक्षणिक प्रगती पर्यायाने आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्न करण्याऱ्या समाज व शासनाला पार करावे लागणार आहेत.

**शासकीय योजना व सवलती :-**

आदिवासींच्या प्रगती व सर्वांगीण विकासासाठी शासन स्तरावर आदिवासी विकास विभाग हे स्वतंत्र खाते कार्यरत असून या खात्यामार्फत विविध शिर्षकाअंतर्गत अनेक योजना राबविल्या जातात. यापैकीच एक आदिवासी उपयोजना ही योजना असून उस्मानाबाद जिल्हा हे प्रस्तूत संशोधनाचे कार्यक्षेत्र आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर आहे. जिल्ह्याचा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद विभागातर्गत समाविष्ट असून या विभागामार्फत सर्वेक्षण करुन पारधी विशेष विकास योजना अतंर्गत

विविध वैयक्तिक लाभाच्या योजनाचा समावेश असणाऱ्या योजना राबविण्यात येतात. शासनाने सुरु केलेल्या या योजनांची माहिती ४०.३३% उत्तरदात्यांना असून ५९.६७% उत्तरदात्यांना या योजनासंबंधी कसलीही माहिती नाही. यावरुन जमातीचा आर्थिक उन्नती व वैयक्तिक लाभांच्या शासकीय योजनांच्या माहितीचा अभाव स्पष्ट दिसून येतो व शासनाच्या कल्याणकारी योजना जमातीपर्यंत पोहोचवण्यासाठी शासकीय प्रयत्न आणखी वाढविण्याची गरज अधोरेखित होते.

या शासकीय विकास योजनांचे लाभधारक फक्त ३१.३३% असून लाभांपासून वंचित असण्याचे प्रमाण ६८.६७% आहे. जमातीतील निरक्षरता, शासकीय यंत्रणेची निष्क्रीयता व उदासीनता ही प्रमूख कारणे आहेत. अनेक उत्तरदात्यांना शासकीय योजना माहिती असूनही ते लाभापासून वंचित आहेत. शासकीय योजनांचा लाभ न मिळण्याची कारणे जाणून घेतली असता योजनांची माहिती नाही असे ८६.८९% उत्तरदात्यांनी सांगितले निरक्षर असल्याने इतरांची मदत आवश्यक आहे पण मदत मिळाली नाही असे म्हणण्याचे प्रमाण ०४.८५% आहे. तर गरिबीमुळे लाभापासून वंचित असण्याचे प्रमाण ०५.३४% आहे. आवश्यक शासकीय कागदपत्रांच्या अभावी योजनांचा लाभ न घेता आल्याचे प्रमाण ०२.९२% आहे. यावरुन लाभापासून वंचित राहण्यासाठी निरक्षरता व गरिबी ही प्रमुख कारणे आहेत हे स्पष्ट होते.

शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना व्यवसायासाठी, तेलपंप, पिठाची गिरणी, दुभती जनावरे, शिवण्यंत्र, मळणीयंत्र, इलेक्ट्रीक मोटार, वाहनासाठी अर्थसहाय्य इ. उपलब्ध झाले असून काहींना स्वाभिमान योजनेअंतर्गत दोन एकर पर्यन्तच्या शेतीसाठी अर्थसहाय्य मिळाले आहे. तर काहींना निवास योजनेअंतर्गत घरबांधकामासाठी अर्थसहाय्य मिळाले आहे. शैक्षणिक अर्थसहाय्य घेऊन आपल्या पाल्यांना शिक्षण देण्याचे प्रमाण ०९% आहे. या विविध शिर्षकांतर्गत लाभार्थ्यांचे प्रमाण अत्यल्प असून शासकीय योजना कागदावरच असलेल्या दिसून येतात. योजना तयार आहे. निधीही उपलब्ध आहे मात्र लाभार्थ्यांची संख्या अत्यंत कमी ही शाकांतिका इथे आढळली. विभागीय कार्यालय औरंगाबाद येथून प्राप्त पारधी विशेष योजनांची माहिती, त्यासाठीचा खर्ची पडलेला निधी आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांचे अत्यंत कमी प्रमाण ही विसगंती या संशोधनादरम्यान आढळून आली. दुधाळ जनावरे सांभाळण्यासाठी चाऱ्याचा प्रश्न, यंत्रे चालविण्यासाठी वीज जोडणीचा प्रश्न, व्यवसाय करण्यासाठी अनुभवाचा अभाव, प्रशिक्षणाची उणीव, योजनांचा लाभ घेण्यासाठी द्यावी लागणारी लाच इ. अनेक

समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे उत्तरदात्यांनी सांगितले. यावरुन योजना व निधी उपलब्ध असला तरी जमातीला आर्थिक प्रगती साधने किती कठीण आहे हे लक्षात येते.

पारधी जमातीच्या विकास व प्रगतीसाठी जिल्ह्यात पारधी विशेष योजना राबविली जात असून या योजनेतंर्गत विविध लाभ मिळण्याचे प्रमाण ३१.३४% इतके आहे. ६८.६७% पारधी समाज अद्यापही या योजनेच्या लाभापासून वंचित आहे. हे प्रमाण शासकीय यंत्रणेचे अपयश तसेच तिच्या अंमलबजावणीतील त्रुटी दुर करण्याची किती गरज आहे हे दर्शविते.

योजनांचा लाभ घेण्यासाठी अनेक कागदपत्रांची गरज असते. उत्तरदात्यांकडे शासकीय कागदपत्रांची उपलब्धता पाहिली असता ५४.३३% उत्तरदात्यांकडे रहिवासी प्रमाणपत्र ६९% उत्तरदात्यांकडे मतदान ओळखपत्र, ५७.३३% उत्तरदात्यांकडे जातप्रमाणपत्र तर ६२.३३% उत्तरदात्यांकडे शिधापत्रिका आहे.

जातप्रमाणपत्र हे अत्यंत महत्वाचे दस्तऐवज असून त्यासाठी पुरावे म्हणून विविध कागदपत्रे सादर करावी लागतात. ही आवश्यक कागदपत्रे नसल्याने तसेच त्यासाठीचा खर्च गरिबीमुळे घेलणे शक्य नसल्याने जात प्रमाणपत्र मिळवणे अत्यंत अवघड बनले आहे. चोरीचा तपास करताना पारधी प्रथम पकडला जातो तेव्हा जात प्रमाणपत्र मागितले जात नाही. मात्र जात प्रमाणपत्र मिळवताना पुरावे मागितले जातात अशी अत्यंत अगतिक प्रतिक्रिया उत्तरदात्यांनी व्यक्त केली. मतदान ओळखपत्र सर्वाधिक प्रमाणात उपलबध असले तरी त्यामागे राजकीय पक्षाचा स्वार्थी हेतू असल्याचे लक्षात येते. उदरनिर्वाहाच्या निश्चित साधनाअभावी स्थलांतरामुळे निश्चित ठिकाणी वास्तव्य नाही त्यामुळे रहिवाशी प्रमाणपत्र मिळवणे अवघड आहे. शिधापत्रिका असली तरी धान्यपुरवठा होत नाही अशा अनेक समस्या ऐकावयास मिळाल्या. या कागदपत्रांच्या अभावामुळेशासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. जमातीच्या प्रगतीसाठी व विकासासाठी शासन विविध योजना तयार करते परंतु त्यासाठी जमातीची सद्य:स्थिती व गरजा काय आहेत याचा विचार केला जात नाही. म्हणून कोणत्या योजनांची गरज आहे हे जाणून घेतले असता व्यवसायासाठी शासनाने मदत करावी असे म्हणण्याचे प्रमाण २४% असून घरे बांधून द्यावीत असे म्हणण्याचे प्रमाण २२.३३% आहे. तर २०% उत्तरदात्यांनी शासनाने शेती द्यावी असे सांगितले. १५.३३% उत्तरदात्यांनी गुन्हेगारी शिक्क्यामुळे पोलिसांच्या त्रासाला व कोर्टकचेरीला समोरे जावे लागत असल्याने शासनाने कायदेविषयक मदत करावी असे सांगितले. यावरुन घर आणि व्यवसाय या जमातीच्या दोन प्रमुख मागण्या आहेत हे स्पष्ट होते. वास्तविक पाहता या गरजांची पूर्तता

करण्याऱ्या शासकीय योजना उपलब्ध असून देखील त्यांची पुन्हा मागणी करणे हे शासकीय योजनांच्या अंमलबजावणीमधील अपयश दर्शविते.

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी जमातीतील अज्ञान, निरक्षरता, गरिबी हे अडथळे असून त्यामुळे फसवणूक होण्याची शक्यता बळावते. सर्वच उत्तरदात्यांनी अडचणी येतात व बहुतेकांची फसवणुकही झालेली आहे. जमातीतील तसेच इतर काही लोक लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवून, शासकीय अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागतात असे सांगून फसवणूक केल्याची उदाहरणे आढळली. याशिवाय भ्रष्टाचार, वशिलेबाजी, पक्षपातीपणा, अधिकाऱ्यांचे असहकार्य इ. योजनांपासून दूर ठेवणाऱ्या कारणांचा पाढा वाचण्यात आला. शासकीय योजना व लाभासंबंधीच्या या प्राप्त माहितीवरुन स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षानंतरही शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून पारधी जमात किती दुर आहे हे स्पष्ट होते आणि अंमलबजावणीच्या त्रूटी दूर करणे किती गरजेचे व तातडीचे आहे हे लक्षात येते.

**सामाजिक समस्या :-**

पारधी जमात अनेक समस्यांना सामोरे जात असून व्यसनाधिनता, प्रगतांचा नकारात्मक दृष्टिकोन, अंधश्रध्दा, निरक्षरता, गुन्हेगारीचा शिक्का इ. त्यापैकी प्रमुख समस्या होत. स्वातंत्र्योत्तर काळात पारधी जमातीचा प्रगतांशी वाढलेला संपर्क अनेक बदल घडवीत आहे. प्रगतांकडून कशा प्रकारची वागणूक मिळते हे जाणून घेतले असता चांगली वागणूक मिळण्याचे प्रमाण फक्त २७.३३% असून सर्वसाधारण वागणूक मिळण्याचे प्रमाण ३१% आहे. वाईट वागणूक मिळण्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ४१.६७% आहे. प्रगतांशी संपर्काचे स्वरुप प्रासंगिकअसल्याने कही उत्तरदात्यांनी चागली वागणूक मिळत असल्याचे सांगितले. त्यापैकी काही उत्तरदाते शहरालगत राहतात. मात्र वाईट वागणुकीचे स्वरुप भयंकर असून गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे नाहक चोरीच्या प्रकरणात गोवणे, मूलभूत गरजाही मिळू न देणे, शिधापत्रिकेवरील धान्य न देणे, बेकायदेशीर कृत्य करावयास लावणे इ. प्रकारे प्रगतांकडून त्रास दिला जात असल्याचे ग्रामीण व दुर्गम भागात वास्तव्य कराणाऱ्या उत्तरदात्यांनी सांगितले. शीध्रकोपी स्वभाव, मद्यपान, वाईट रुढी, पंरपरा, रांगडेपणा, पोलिसांकडून पकडले जाणे, उध्दट वाटणारे वर्तन व असभ्य भाषा, राहणीमान व अस्वच्छता इ. जमातीच्या वाईट गोष्टीमुळेही प्रगतांकडून वाईट वागणूक मिळते. उदरनिर्वाहाची साधने अपूरी असल्याने तसेच दैनदिन गरजा भगविण्यासाठी कामानिमित्त स्थलांतर हे क्रमप्राप्त आहे. त्यामुळेच स्थलांतर करण्याचे प्रमाण

८४.३३% इतके जास्त असून त्यामागे प्रगतांकडून उपेक्षा, गुन्हेगारी वर्तन, पोलिसांचा त्रास, उपजीविकेसाठीची अपूरी साधने, दीर्घकालीन रोजगाराचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत. स्थलांतरामुळे जीवनास अस्थिरता येते. यामुळे शैक्षणिक व कोटुंबिक तसेच आर्थिक समस्या निर्माण होतात. या समस्यांमुळेच स्थलांतर थांबावे असे म्हणण्याचे प्रमाण सुमारे ९८% आहे. यावरुन स्थलांतर हे अनेक समस्यांचे मूळ आहे हे स्पष्ट होते. ज्या कारणांमुळे स्थलांतर होते ती कारणे तशीच असून स्थलांतर हे समस्यांमध्ये भरच टाकते हे यावरुन स्पष्ट होते.

गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे पारधी लोकांचा चोरी किंवा गुन्ह्याशी संबंधी लावून चौकशीसाठी धरपकड करणे ही पोलिसांची नित्याची बाब असून 'Habitual Act' ची ढाल पुढे केली जाते. उत्तरदात्यांचे चोरी किंवा गुन्ह्याशी संबंध लावण्याचे प्रमाण ६५.६७% इतके आहे तर ३४.३३% उत्तरदात्यांनी आपल्याला त्याचा त्रास नसल्याचे सांगितले. यावरुन सर्वच पारधी जमात गुन्हेगार नाही हे स्पष्ट होते. मात्र प्रगत समाजाचा व पोलिसांचा दृष्टिकोन बदलण्याची गरज सर्वच उत्तरदात्यांनी बोलून दाखवली. पोलिसांचा त्रास वाचविण्यासाठी दैनदिन हजेरीचा उपक्रम काही उत्तरदात्यांनी चालु केला आहे. सदरील संशोधनात गुन्हेगारी कृत्यात पारधी लोक सामील असल्याचे आढळले. मात्र गुन्हेगार सर्वच जाती-जमातीत असतात म्हणून सर्व पारधी जमातीला गुन्हेगार समजणे चुकीचे व अन्यायकारक आहे.

गुन्हेगारीच्या कृत्यामधील सहभागासंबंधी ०७% उत्तदात्यांच्या कूटूंबातील सदस्य अटकेत आहेत. यावरुन जमातीत गुन्हेगारीच्या कृत्यामधील सहभाग कमी होत आहे हे स्पष्ट होते. धरपकड सत्रानंतर चौकशीअंती पोलिस निर्दोष व्यक्तीला लगेच सोडतात असे समजले. पोलिसांनी पकडल्यास त्यांच्याकडून मिळणारी वागणूक वाईट असते असे ९०% उत्तरदात्यांनी सांगितले. निवळ संशयावरुन सातत्याने होणारी धरपकड, चौकशीवेळी होणारी मारहाण, एकदा गुन्हा केल्यास पुन्हा प्रत्येक घटनेनंतर संशयित म्हणून पकडून होणारी मारहाण अशा प्रकारचे या वागणूकीचे स्वरुप असून अनेकदा या मारहाणीमुळे पारधी व्यक्तीचा पोलिस ठाण्यात मृत्यू झाल्याच्या घटना उस्मानाबाद जिल्ह्यात घडल्याची उदाहरणे आहेत. पोलिस नेमक्या कोणत्या कारणांमुळे धरपकड करतात हे जाणून घेतले असतात ६१% उत्तरदात्यांनी निव्वळ संशयामुळे तर २२.६७% उत्तरदात्यांनी गुन्हेगारीचा पिढीजात शिक्का हे कारण सांगितले. या प्रश्नाचे उत्तर सांगण्यास नकार देण्याचे प्रमाण ११.३३% आहे. पोलिसांकडून मिळणाऱ्या या वागणूकीमुळे सामाजिक, कौटूंबिक जीवनात अप्रतिष्ठा होते. अनेकदा हा त्रास

टाळण्यासाठी गुन्हा केला नसतानाही पलायन / स्थलांतर केले जाते. या दुष्टचक्रातून सुटका करुन घेण्यासाठी शासनानेच मदत करावी असे ५२.३३% उत्तरदात्यांना वाटते. तर सामाजिक कार्यकर्त्याकडून मदतीची अपेक्षा ३४% उत्तरदात्यांनी व्यक्त केली आहे. तर १३.३३% उत्तरदात्यांना पोलिसांनीच मदत करावी असे वाटते. यावरुन पारधी जमातीचा शासनावर विश्वास व अपेक्षा असल्याचे स्पष्ट होते.

इतर समाजाच्या तुलनेत जमातीत मागासलेपणाची भावना आढळणे हे अपेक्षित होते. सुमारे ९८% उत्तरदात्यांनी आपण मागासलेले आहोत असे सांगितले. हे प्रमाण जमातीतील न्युनगंडाची भावना किती सर्वव्यापी व दृढ आहे हे स्पष्ट करते. हे मागासलेपण नेमके कोणत्या बाबतीत जाणवते याची माहिती घेतली असता आर्थिक मागसलेपणाची भावना सर्वाधिक असून त्याखालोखाल शैक्षणिक २५.६७%, धार्मिक १६.६७% तर राजकीय २.३३% असे प्रमाण आहे. व्यवसाय, नोकरी, घर, घरातील वस्तु, संपत्ती इ. वानवा असल्याने आर्थिक मागासलेपण सर्वाधिक म्हणजे ५३.३३% असून भटकंती, स्थलांतर गरिबी, दुर्गम भागात वास्तव्य, शिक्षणाची नावड इ. कारणामुळे शैक्षणिक मागासलेपण दिसून येते. धार्मिक विधी, प्रथा, परंपरा, चाली - रिती अंधश्रध्दा, पशूबळी इ. तुलनेने इतर समाजापेक्षा वेगळ्या व अनाकलनीय असल्याने धार्मिक मागसलेपण जाणवते.

**सामाजिक सुधारणा :-**

स्वातंत्र्योत्तर काळात मंद गतीने का होईना जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. समाजाची दयनीय अवस्था पाहता जमातीशी सामाजिक बांधिलकी समजून समाजातील सुशिक्षित लोकांनी नेतृत्व करुन प्रगतीसाठीचे प्रयत्न करावेत हे अपेक्षित होते. जमातीतील अशा सुशिक्षित लोकांनी जमातीसाठी काम करण्याचे प्रमाण फक्त २८.६७% आहे. शासकीय योजनासाठी माहिती देणे, गुन्हाप्रकरणी सुटकेसाठी प्रयत्न करणे, शैक्षणिक मार्गदर्शन अशा माध्यमातून सुशिक्षित लोक काम करतात मात्र मदत न करण्याचे प्रमाण ७१.३३% एवढे असून ही चिंताजनक बाब आहे. यासाठी जमातीतूनच योग्य सहकार्य मिळत नाही असे सुशिक्षितांनी सांगितले. जमातीच्या प्रगतीसाठी सुशिक्षितांचा प्रयत्न व सहभाग वाढवणे गरजेचे आहे. पारधी जमातीच्या प्रगती व सुधारणांसाठी इतर जाती-जमातीतील अनेक व्यक्ती सक्रिय असतात. अशा लोकांबद्दल काहीही माहिती नाही. ज्यांना माहिती होती त्यांनी बहुतेक वेळी स्थानिक राजकीय व्यक्तीची नावे सांगितले. यावरुन सामाजिक कार्य करण्याऱ्या व्यक्तीचे प्रयत्न अपूरे असल्याचे स्पष्ट होते. मागासलेपणाची भावना बाळगणाऱ्या या

जमातीचा  राजकीय सहभाग व त्याची जाण याची माहिती घेतली असता ९७% उत्तरदात्यांनी आपला कसलाही राजकीय सहभाग नसल्याचे सांगितले.  ज्या ३% उत्तरदात्यांनी सहभागाविषयी सकारात्मक मत नोंदविले त्यांचा राजकीय सहभाग हा राजकीय पक्षाचा सभासद, ग्रामपंचायत अथवा नगरपरिषद सदस्य इ. पर्यन्त मर्यादित आढळला असून आरक्षणाचे कारण त्यासाठी सांगितले.  यावरुन पारधी जमातीत राजकीय हक्कांची जाणीव व सहभाग अल्प आहे. राजकीयदृष्ट्या ही जमात प्रबळ व जागृत नाही.  विविध माध्यमातून जमातीत चालू असलेल्या परिवर्तनाला  कोणाकडून प्रेरणा मिळते हे जाणून घेतले असता शासन हीच परिवर्तनाची प्रेरणा असण्याचे प्रमाण ४९.३३% असून त्यानंतर समाजिक कार्येकर्ते हे प्रेरणास्त्रोत असण्याचे प्रमाण २९% असून स्वजमातीतील कार्येकर्ते प्रेरणा देतात असे ११.६७% उत्तरदात्यांनी सांगितले.  यावरुन शासनावरील जमातीचा विश्वास पुन्हा एकदा अधोरेखित होतो.  शासकीय पातळीवरुन सकारात्मक बदल घडू शकतात असा विश्वास जमातीला आहे.

वरील सर्व प्राप्त संशोधनमाहितीच्या अभ्यासाअंती निश्चित झालेली मते निष्कर्षाच्या स्वरुपात खालीलप्रमाणे नोंदवली आहेत.

**निष्कर्ष :-**

संशोधन विषयावरील अभ्यासाअंती काढलेल्या खालील निष्कर्षात गृहीतकांची सिध्दता तपासून पाहिली आहे.  संशोधनातील गृहीतके अनुकूल असल्याचे निष्कर्षात आढळले.

१)  उस्मानाबाद जिल्हा संशोधन क्षेत्रात पारधी कुटुंबामध्ये वीज, पिण्याचे पाणी आणि स्नानगृह या प्राथमिक सुविधाही मोठया प्रमाणात उपलब्ध नाहीत.  पारधी वस्त्यांमध्ये दवाखाना, स्वच्छतागृहे, मनोरंजनाची साधने यांची वानवा आहे.  धार्मिक जीवनात स्त्रीचा दर्जा दुय्यम असून कुटुंबाच्या निर्णयप्रक्रियेत स्त्रियांना निर्णय स्वांतत्र्य नाही.  शिक्षणयोग्य वयात मुले शाळेत न जाता भटकणे, शिकार करणे, भिक्षा मागणे इ. कामे करतात.  शाळा अर्धवट सोडण्याचे प्रमाण जास्त असून जमातीत २१ वर्षे पुर्ण होण्याच्या अगोदर विवाह केले जातात.  विवाहाचे स्वरुप हे संस्कार न राहता ते एक बंधन किंवा करार मानले जाते.  जमातीत बहुपत्नी विवाहाचे प्रमाण जास्त असून अद्यापही जातपंचायत ही परंपरागत, योग्य न्याय न देणारी समांतर न्यायव्यवस्था कार्यरत असून त्याची जमातीवर घट्ट पकड आहे.  पारधी जमातीला आपली संस्कृती कनिष्ठ वाटते.  स्वजमातीत परस्पर सहकार्याच्या मानसिकतेचा अभाव असून मद्यपान व इतर व्यसनांचे खूप जास्त प्रमाण आहे.   स्वतःचे घर ही मुलभुत सुविधाही जमातीमध्ये मोठ्या प्रमाणात नाही.  उपलब्ध निवारा हा अपूरा व ऊन, वारा, पाऊस

यापासून संरक्षण करण्यास असमर्थ आहे. पारधी समाज उदरनिर्वाहासाठी शिकार व्यवसायावर मोठया प्रमाणात अवलंबुन असून या व्यवसायातून दैनंदिन गरजाही पूर्ण होत नाहीत. जमातीमध्ये राजकीय जागृती व सक्रिय सहभागाचा अभाव असून या सर्व कारणांमुळे आपण शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेले आहोत ही वास्तव धारणा जमातीत मोठ्या प्रमाणात आढळते. यावरुन

**पारधी समाज मागासलेला आहे** हे सिध्द होते. अशाप्रकारे पहिले गृहीतक अनुकूल ठरते.

२) पारधी जमातीत मुले शाळेत जाण्याचे प्रमाण कमी असून शाळा अर्धवट सोडण्याचे प्रमाण जास्त आहे. मुलांच्या शिक्षणाकडे कुटुंबाचे दुर्लक्ष असून कौंटुबिक वातावरण पोषक नसल्याने आणि योग्य शैक्षणिक वातावरणाच्या अभावामुळे मुलांमध्येही शिक्षणाप्रती नावड आहे. आर्थिक विवंचनेमुळे मुलांनी काम करुन कौटुंबिक चरितार्थासाठी मदत करावी अशी अपेक्षा असते. त्यामुळे समाजात पदवीपर्यन्त शिक्षण पुर्ण करण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. शिक्षणाच्या अभावामुळे शासकीय योजनांच्या लाभ घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी असून कुटूंबसदस्य संख्या जास्त असल्याने शिक्षणावरील खर्च परवडत नाही. पारधी समाजाच्या मुलांसाठी जिल्ह्यात एकच शासकीय आश्रमशाळा आहे. इतर शाळांमध्ये मुलांना पाठविण्याची मानिसकता नाही. समाजाची वस्तीस्थाने दुर्गम भागात असल्याने वस्तीजवळ शाळा उपलब्ध असण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. पालकांमध्ये निरक्षरता मोठया प्रमाणात असल्याने मुलांना उच्चशिक्षित करण्यात अनेक अडचणी येतात. या सर्व कारणांमुळे

**पारधी समाजात शिक्षण व साक्षरतेचे प्रमाण कमी आहे** हे सिध्द होते. अशाप्रकारे दुसरे गृहीतक अनुकूल ठरते.

३) पारधी जमातीचे वार्षिक उत्पन्न जेमतेम तीस हजार रु. असून या उत्पन्नातून कुटुंबाच्या दैनंदिन गरजाही भागत नाहीत. ही आर्थिक तुट भरुन काढण्यासाठी खाजगी सावकाराकडून कर्ज घेतले जाते. मात्र तुटपुंज्या आर्थिक उत्पन्नामुळे कर्ज फेडणे कठीण होते. अशाप्रकारे कर्जबाजारीपणाचे प्रमाण जास्त आहे. मुले शाळेत न जाणे अथवा शाळा अर्धवट सोडणे यासाठी गरिबी हे प्रमुख कारण असून बचतीचा अभाव हे बँकेत व्यवहाराचे प्रमाण अत्यल्प असण्याचे कारण आहे. विभक्त कुटुंबपध्दतीमुळे, कमावती माणसे कमी तर शिक्षणाच्या अभावामुळे अपुरे आर्थिक उत्पन्न अशी परिस्थिती आहे. पारंपारिक शिकार व्यवसायातून दैनंदिन गरजा भागत नसल्याने आधुनिक व्यवसायाकडे वळण्याची समाजाची इच्छा आहे. वीज, पाणी, स्वच्छतागृह, इ. मूलभूत सुविधांची पूर्तता गरिबीमुळे होत नाही. इंधन म्हणून गॅस वापरणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही म्हणून लाकडाचा वापर करण्याचे प्रमाण जास्त

आहे. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे सातत्याने पोलिसांच्या त्रासाला सामोरे जावे लागते. व त्यातून स्वत:ची सुटका करण्याच्या प्रयत्नात पारधी समाजाला मोठ्या आर्थिक खर्चाला सामोरे जावे लागते. या सर्व माहितीवरुन **तो आर्थिकदृष्ट्या विवंचनेमध्ये जीवन जगतो** हे सिध्द होते. अशाप्रकारे तिसरे गृहीतक अनुकूल ठरते.

४) पारधी समाजाचे वास्तव्य दुर्गम भागात असते. त्यामुळे इतर जाती जमातीशी संबंध हे प्रासंगिक स्वरुपाचे असतात. इतर समाज पारधी समाजाप्रती सहकार्याची भावना ठेवत नाही. पोलिसांचा ससेमिरा व मद्यपानाचे व्यसन यामुळे प्रगत समाजाकडून पारधी जमातीची अवहेलना केली जाते. आपल्या गावात पारधी लोकांनी वास्तव्य करु नये यासाठी प्रगत समाजाकडून त्यांच्यावर चोरीचा नाहक आळ घेऊन हाकलुन दिले जाते. आश्रमशाळेत जाणीवपूर्वक प्रवेश प्रक्रियेत टाळून शिक्षणापासून पारधी मुलांना वंचित ठेवले जाते. प्रगत समाजाकडून पारधी समाजाला रोजगाराच्या संधी प्राप्त होत नाहीत. प्रगतांच्या या दृष्टिकोनास पारधी लोकांचा शीघ्रकोपी स्वभाव, बेपर्वा वृत्ती, व्यसनाधिनता, परंपरागत जीवनशैली इ. गोष्टीही कारणीभूत आहेत. या कारणांमुळे

**प्रगत समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे.** अशाप्रकारे चौथे गृहीतक अनुकूल आहे.

५) पारधी जमातीचे धार्मिक जीवन अत्यंत वैशिष्ट्यपुर्ण असून जमातीमध्ये अनेक प्रथा, पंरपरांचे कटाक्षाने पालन केले जाते. जातपंचायतीची पारंपारिक न्यायव्यवस्था अद्यापही कार्यरत असून त्याद्वारे अनेक रुढी, परंपरा, धार्मिक नियम इ. चे जमातीकडून पालन करण्याबाबत नियंत्रण ठेवले जाते. जमातीमध्ये इच्छापूर्तीसाठी नवस करण्याचे प्रमाण खूपच जास्त असून पशुचा बळी देऊन नवसपूर्ती केली जाते. जमातीमध्ये रेडा, बकरा, कोंबडा इ. पशुंचा बळी दिला जातो. देवकारण हा एक प्रमुख धार्मिक विधी असून त्याप्रसंगी रेड्याचा बळी दिला जातो. आरोग्यास हानीकारक असणाऱ्या मद्यपानाचे प्रमाण जमातीमध्ये खूप जास्त असून मद्यपानास धार्मिक मान्यता आहे. धार्मिक विधीत स्त्रीचा सहभाग नसतो व दैनंदिन जीवनात स्त्रियांवर अनेक धार्मिक रुढी, परंपराची बंधने आहेत. समाजात दैनंदिन कार्यातही देवांचा कौल घेतला जातो. भविष्यकाळातील संभावित संकटे टाळण्यासाठी व उज्ज्वल भविष्याकाळासाठी देवाला शरण जाण्याचे प्रमाण खूप आहे. अशाप्रकारे **पारधी समाजात अनेक रुढी व अंधश्रध्दा अस्तित्वात आहेत.** याठिकाणी पाचवे गृहीतकही अनुकूल ठरते.

६) पारधी जमातीचे जीवन हे कष्टप्रद असून अनेक दशकांपासूनच्या गुन्हेगारी जमातीच्या कलंकामुळे पारधी समाज आपल्या सामाजिक जीवनात अनेक यातना सहन करीत आहे. शिकार हा पारंपारिक व्यवसाय असून त्यावर बंदी आल्याने तो व्यवसाय सोडावा लागला. मात्र इतर व्यवसायाचे कौशल्य, प्रशिक्षण व अनुभव नसल्याने उदरनिर्वाह करणे कठीण बनले. प्राप्त कौटुंबिक उत्पन्नातून दैनंदिन गरजाही भागत नाहीत व उपजीविकेची साधने निश्चित नसल्याने कायम आर्थिक समस्या आहेत. जमातीमध्ये व्यसनाधिनता मोठ्या प्रमाणात आहे. शासकीय योजनांचा लाभ घेण्यामध्ये निरक्षरता हा प्रमूख अडथळा असून जात प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र या आवश्यक शासकीय कागदपत्रांच्या अभावी शासकीय योजनांच्या लाभापासून दुर रहावे लागते. प्रगतांचा दृष्टिकोन नकारात्मक असल्याने तसेच स्वजमातींचे सहकार्य नसल्याने अडचणींना कायम सामोरे जावे लागते. उपजीविकेची साधने अपूरी असल्याने उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करणे भाग पडते. प्राथमिक सुविधांच्या अभावामुळे व आरोग्यविषयक सुविधाच्या उणीवामुळे आरोग्याच्या समस्या आहेत. गुन्हेगार जमातीचा शिक्का असल्याने चोरी/गुन्हयाच्या घटनेशी संबध लावून निव्वळ संशयाने पोलिसांकडून धरपकड केली जाते. अशा प्रकारे नेहमी पोलिसांच्या त्रासाला सामोरे जावे लागते. पकडले गेल्यास पोलिसाकडून अत्यंत वाईट वागणुक मिळते. रहायला घर नाही, पिण्यासाठी पाणी नाही, उदरनिर्वाहाचे निश्चित साधन नाही, जवळ दवाखाना नाही, इतरांकडून सहकार्य नाही, घरात नवीन वस्तू घेतली तर चोरीचा आळ घेतला जातो. अशा प्रकारे **पारधी समाजाचे जीवन अनेक समस्यांनी व्यापले आहे.** याठिकाणी सहावे गृहीतकही अनुकूल ठरते.

**५.३ शिफारशी :-**

पारधी जमातीच्या समाजशास्त्रीय अभ्यासाअंती प्राप्त निष्कर्षांचे अध्ययन करुन जमातीच्या विकास व सर्वांगीण प्रगतीसाठी पुढील शिफारशी सूचवत आहे -

१) पारधी जमातीची लोकसंख्या नक्की किती आहे? याविषयी निश्चित व विश्वसनीय माहिती नाही. त्यामुळे केंद्र शासनाने त्यांची स्वतंत्र जनगणना करावी. या जनगणनेपूर्वी सर्व पारधी लोकांना त्यांचे गावपातळीवर मेळावे घेऊन जात प्रमाणपत्रांचे वाटप करावे. जेणेकरुन त्यांची गणना करणे सुलभ होईल. जनगणनेमधून प्राप्त आकडेवारी व माहिती ही जमातीची सद्यस्थिती जाणण्यासाठी उपयुक्त ठरेल आणि त्यायोगे प्रगती व विकासाच्या योजना आखणे व त्यांचे प्राधान्यक्रम ठरवणे सोपे होईल.

२) पारधी जमातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये आहे. मात्र काही पोटजातींचा समावेश भटक्या व विमुक्त जाती-जमातींच्या शासकीय यादीमध्ये आहे. सर्व पोटजाती या मानववंशदृष्टया व प्रत्यक्ष व्यवहारात पारधी जमातीच्याच असून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक स्थितीत साम्य असल्याने सर्व पोटजातींचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करावा.

३) सामाजिक व आर्थिक जीवनाच्या अभ्यासाअंती असे लक्षात आले की समाजात स्थलांतर थांबावे असे सर्वाना वाटते. त्यामुळे गृहबांधणी कार्यक्रम हाती घेऊन सर्वांना संपुर्ण शासकीय अनुदानाने घरे बांधून द्यावीत.

४) उदरनिर्वाहाचे निश्चित साधन नसणे हे स्थलांतराचे प्रमुख कारण असून नवीन वस्तीत रोजगाराच्या व उपजीविकेसाठीच्या आवश्यक संधी उपलब्ध करुन द्याव्यात.

५) शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सशक्त माध्यम आहे. पारधी जमातीत शिक्षणांचे प्रमाण अत्यल्प असून निरक्षरता हे अनेक समस्यांचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे जमातीसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यंत महत्वाचे आहे. याअतंर्गत पारधी वस्तीतच किमान माध्यमिक स्तरापर्यंत शाळा सुरु कराव्यात. या शाळा सर्व शैक्षणिक सोयीसुविधांनी युक्त असाव्यात व या शाळांच्या माध्यमातून शिक्षण, निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था व शैक्षणिक सवलती पुर्णतः मोफत उपलब्ध करुन द्याव्यात.

६) शासनाने पदवीपर्यंतचे शिक्षण पुर्णतः मोफत उपलब्ध करुन द्यावे. पदवीनंतरच्या शिक्षणासाठी भरीव विद्यावेतन किंवा शिष्यवृत्तीची तरतूद करावी. शैक्षणिक प्रगतीसाठी पारधी जमातीचा प्रतिसादही महत्वाचा असून ज्या कुटुंबातील मुले शिक्षण घेत नाहीत अथवा शाळा अर्धवट सोडतात त्यांच्यासाठी स्थानिक पातळीवर प्रयत्न करावा व मोफत शैक्षणिक सुविधा, प्रवास सवलत देऊन पाल्य व पालकांमध्ये शिक्षणांबद्दल गोडी वाढेल अशा प्रलोभनांची योजना आखावी.

७) शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी कठोरपणे करावी व त्यामध्ये कसूर वा भ्रष्टाचार करण्याऱ्या व्यक्तीस कठोर शिक्षेची तरतूद असावी.

८) जात प्रमाणपत्राच्या वाटपासोबतच शिधापत्रिका, रहिवासी प्रमाणपत्र, मतदान ओळखपत्र इ. महत्वाची शासकीय कागदपत्रे सामुदायिक मेळाव्यांच्या माध्यमातून वाटप करावीत. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेमधून विशेष बाब म्हणून सवलत मिळावी.

९) पारधी वस्त्यांना महसूली गावाचा दर्जा द्यावा जेणेकरुन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वस्तीमध्ये वीज, पाणी, दवाखाना इत्यादी सार्वजनिक सोयी सुविधा उपलब्ध होतील.

१०) पारधी जमातीच्या विकासासाठी स्वतंत्र योजना आखाव्यात. या योजनांची माहिती पारधी समाजाला प्रचाराच्या माध्यमातून मिळावी. या योजनांचे अनुदान हे इतर ठिकाणी खर्च न करता त्यासाठीच खर्ची पडावे.

११) शासकीय सेवेतील अनुसूचित जमातीसाठीच्या नोकरीच्या आरक्षणातंर्गत लोकसंख्येच्या आधारावर पारधी जमातीसाठी स्वतंत्र आरक्षण असावे.

१२) पारधी जमातीचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी स्वतंत्र राजकीय आरक्षणाची तरतूद करावी.

१३) जातपंचायतीच्या माध्यमातून जमातीचे संघटन टिकून असून याच माध्यमातून जमातीतील अनुभवी, प्रतिष्ठित व्यक्तींच्या मदतीने अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी व जमातीच्या सामाजिक, धार्मिक प्रगतीसाठी प्रबोधन करावे.

१४) इतर व्यवसायाकडे जमातीला कल वाढत असून या व्यवसायासाठी आवश्यक भागभांडवल, प्रशिक्षण, भौतिक सुविधा व अनुदान शासनाने उपलब्ध करुन द्यावे.

१५) गुन्हेगारी/ चोरीच्या संशयावरुन पारधी लोकांचे धरपकड सत्र पुर्णतः थांबाव. वास्तविक गुन्हेगारास विशिष्ट जात वा धर्म नसतो व गुन्हेगारवृत्ती समाजाच्या सर्वच स्तरात आढळते. त्यासाठी संपूर्ण पारधी जमातीस जबाबदार धरणे पुर्णतः चुकीचे आहे. कसलाही पुरावा नसताना केवळ पारधी आहे म्हणून पकडून अटकेत टाकणाऱ्या पोलिस खात्यातील व्यक्तीस कठोर शिक्षेची तरतूद करावी.

१६) प्रगत समाजाने पारधी समाजाकडे बघण्याचा आपला नकारात्मक दृष्टिकोन सोडून द्यावा व पारधी जमातीने त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा. जेणेकरुन परस्पर सहकार्यातून प्रगतीचे मार्ग खुले होतील.

१७) ज्या ठिकाणी जमातीचे लोक शासकीय रिकाम्या जागेवर राहतात. त्या जमीनी त्यांना हस्तांतरीत कराव्यात या संदर्भाने ज्यांच्यावर कोर्टात केस चालू आहेत त्या त्वरीत मागे घ्याव्यात.

१८) पारधी जमातीची जीवनशैली व उपजिविका ही वनसंपत्तीवर अवलंबून असल्याने वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे त्यांच्या उपजिविकेचे साधन धोक्यात आले. म्हणून जमातीचा जंगलावरील हक्क अबाधित राखताना त्यांच्यासाठी आरक्षित जंगले निर्माण करावित व त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी जमातीवरच सोपवावी.

१९) पारधी जमात इंधनासाठी जंगलावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच जमातीत अद्यापही शिकार केली जाते.शिकार व जंगल तोड या बाबी पर्यावरणास हानी पोहचवणाऱ्या व वनसंपत्तीचा नाश करणाऱ्या आहेत त्यामुळे पर्यायी उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे.

२०) पारधी अत्याचाराच्या घटनांनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा गैरफायदा घेवून धर्मांतराची चर्चा केली जाते. शासनाचे दुर्लक्ष व प्रगतांची उपेक्षा यामुळे जमातीने नक्षलवादी चळवळीसारखी संघर्षात्मक भुमिका स्विकारु नये यांची काळजी घ्यावी. हिंदू धर्माचाच एक भाग असलेल्या या जमातीला प्रगत समाजाने हिंदू म्हणून सन्मान मिळवून देणे गरजेचे आहे.



१. जेष्ठ पारधी बांधवाकडून प्रथा—परंपरासंबंधी माहिती घेताना संशोधिका



२. पारधी वस्तीतील घराचा प्रकार दर्शविणारे छायाचित्र



३. पारधी कुटूंबातील सदस्य संख्या व अपुरे उपजिविकेचे साधन दर्शविणारे छायाचित्र




४. शासकीय घरकुल योजनेच्या लाभार्थींची सद्यस्थिती दर्शविणारे छायाचित्र.



५. पारधी जमातीत देवाचे प्रतीक हे सोने व चांदी या धातूचेच बनविलेले असतात.



६. पारधी जमातीत देवांचे प्रतीक हे नेहमी लाल कापडात बांधून ठेवले जातात.



७. पारधी वस्तीतील अपु—या सार्वजनिक सोयीसुविधा दर्शविणारे छायाचित्र



८. शिकारीसाठी वापरण्यात येणा—या फासाचे प्रात्यक्षिक
दर्शविताना पारधी बांधव



९. शिकारीचे सावज व शिकारीच्या साधनासहीत पारधी बांधव



१०. धार्मिक विधीप्रसंगी स्वत:च्या शिरेतील रक्त देवाला वाहत असताना पारधी बांधव.




११. आदिवासी विकास प्रकल्प पारधी योजना
अंतर्गत लाभार्थ्यांला मिळालेली पिठाची गिरणी.




१२. शिकार या पारंपरिक व्यवसायात वापरले जाणारे फासे.



१३. पारधी वस्तीतील वस्ती शाळेची वस्तुस्थिती दर्शविणारे छायाचित्र



१४. पारधी जमातीत वापरले जाणा—या अत्यंत
मोजक्या दागिन्यांपैकी एक दागिना



१५. शिकार या पारंपरिक व्यवसायात मोठया प्राण्यांसाठी वापरले जाणारे जाळे.



१६. पारधी कुटूंबात स्नानगृह म्हणून वापरला जाणारा तात्पुरता निवारा दर्शविणारे छायाचित्र

# मुलाखत अनुसूची

**अ. क्र.** [ ]

## १.वैयक्तिक माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| नाव :- | | | |
| पत्ता :- | | जात | :- |
| लिंग :- | | पोटजात | :- |
| वय :- | | मातृभाषा | :- |
| शिक्षण :- | | वैवाहिक दर्जा | :- |
| व्यवसाय :- | | वस्तीतील घरांची संख्या | :- |

## २. कौटूंबिक माहिती

१) कुटूंबातील सदस्यांची माहिती द्या.

| अ. क्र. | कुटूंबातील सदस्यांची नावे | वय | उत्तरदात्याशी नाते | वैवाहिक स्थिती | शिक्षण | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |
| ६. | | | | | | |
| ७. | | | | | | |
| ८. | | | | | | |
| ९. | | | | | | |
| १०. | | | | | | |

२) या ठिकाणी आपण किती वर्षापासून राहता :- ------- वर्ष

३) यापूर्वी कुठे होता? :- ----------------------------------------

४) या ठिकाणी येण्याचे कारण :- ----------------------------------------

५) इथे राहताना कांही अडचणी येतात का? :- होय [ ] नाही [ ]

६) अडचणी सोडवण्यासाठी कोणते प्रयत्न केले :- ----------------------------------------

----------------------------------------

७) पूर्वीच्या गावी जाता काय ? :- होय [ ] नाही [ ]

८) जात असल्यास कोणत्या कारणासाठी :- ----------------------------------------

----------------------------------------

९) कुटूंब पध्दती कशी आहे ? :- १) संयूक्त [ ] २) विभक्त [ ]

१०) कुटूंबातील स्त्रियांना स्वतंत्रपणे निर्णय घेता येतात का ? :- होय ☐ नाही ☐

११) नसल्यास कारण :- १) पुरुषप्रधान संस्कृती ☐
२) निर्णय सर्वांच्या हिताचे नसतात ☐
३) सांगता येत नाही. ☐

१२) कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया केली आहे का? :- होय ☐ नाही ☐

१३) घरी खालील सुविधा आहेत का? :- १) वीज ☐ २) नळाचे पाणी ☐
३) स्वच्छतागृह ☐ ४) स्नानगृह ☐
५) मनोरंजनाची साधने ☐

१४) वस्तीत खालील सुविधा आहेत का? :- १) शाळा ☐ २) दवाखाना ☐
३) बाजार ☐ ४) वाहतूकीसाठी वाहने ☐
५) मनोरंजनाची साधने ☐

१५) घरी कोणते इंधन वापरता ? :- १) लाकुड ☐ २) रॉकेल ☐ ३) गॅस ☐

१६) रिकाम्या वेळेत मूले काय करतात ? :- १) शिकार ☐ २) भिक्षा ☐ ३) भटकणे ☐
४) अभ्यास ☐ ५) कुटूंबातील कामे ☐

१७) मुलगी झाली तर नाराज होता काय ? :- होय ☐ नाही ☐

१८) नाराज होत असल्यास कारण सांगा :- ---------------------------------------

१९) घराजवळ गावठी दारु अड्डा, सरकारी दारुदुकान, ताडी विक्री केंद्र आहे काय ? :- होय ☐ नाही ☐

## ३. वैवाहिक माहिती

१) जमातीत प्रचलित विवाह प्रकार कोणते ? :- १) एक विवाह ☐ २) बहूपत्नी ☐
३) बहूपती ☐ ४) द्विभार्या ☐

२) तुमचा विवाह कोणाच्या संमतीने झाला ? :- १) स्वतःच्या ☐ २) कुटूंबियांच्या ☐
३) नातेवाईक ☐ ४) इतर ☐

३) विवाह म्हणजे तुमच्या मते काय ? :- १) बंधन ☐ २) करार ☐
३) संस्कार ☐ ४) इतर ☐

४) तुमचा विवाह वयाच्या कोणत्या वर्षी झाला ? :- १) १० ते १४ ☐ २) १५ ते १८ ☐
२) १९ ते २५ ☐ ४) २५ च्या पुढे ☐

५) जमातीत समान आडनावाच्या व्यक्तीमध्ये विवाह होतात का? :- होय ☐ नाही ☐

६) जमातीत नात्यामध्ये विवाह होतो का? :- होय ☐ नाही ☐

७) होत असल्यास कोणत्या नात्यात? :- १) मावस भावंडामध्ये ☐

२) आते - मामे भावंडामध्ये ☐

३) मेव्हणा - मेव्हणी (साटंलोटं) ☐

४) इतर

८) सध्या विवाहवयात वाढ झाली आहे काय? :- होय ☐ नाही ☐

९) असल्यास कारण कोणते :- १) शिक्षण ☐

२) बालविवाहाचे दुष्परिणाम ☐

३) कायद्याचे बंधन ☐

४) प्रगतांचा संपर्क ☐ ५) इतर ☐

१०) हुंडयाची पध्दत आहे का? :- होय ☐ नाही ☐

११) असल्यास हूंडा कोणाकडून घेतला जातो? :- १) वधूकडून ☐ २) वराकडून ☐

१२) जमातीत घरजावई आणण्याची प्रथा आहे का?:- होय ☐ नाही ☐

१३) विधवा / विधूर यांचा पूनर्विवाह केला जातो का ?:- होय ☐ नाही ☐

१४) विवाह विधी कोणाकडून केला जातो? :- १) भगत ☐ २) ब्राम्हण

३) जमातीतील अनुभवी व्यक्ती ☐

४) इतर ☐

१५) तुमचा विवाह कोणत्या प्रकारे झाला ? :- १) पारंपारिक ☐ २) आधूनिक ☐

३) सामूहिक ☐ ४) नोंदणी ☐

१६) विवाह प्रसंगी कोणकोणते धार्मिक विधी केले जातात? :-

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

१७) मुला मुलींचे विवाह ठरवताना त्यांच्या मताला प्राधान्य देता का ? :- होय ☐ नाही ☐

१८) घटस्फोट घेतला जातो का? :- होय ☐ नाही ☐

१९) असल्यास कोणामार्फत :- १) जातपंचायत ☐ २) कायदा ☐

३) स्वतः ☐ ४) इतर ☐

२०) घटस्फोटाचे कारण काय? :- १) संशय ☐ २) वंध्यत्व ☐

३) पुत्रप्राप्तीचा अभाव ☐

४) विवाहबाह्य लैंगिक संबंध ☐

५) इतर ☐

## ४. शैक्षणिक माहिती

१) वस्तीजवळ शाळा आहे का? :- होय ☐ नाही ☐

२) तुमची मुले शाळेत जातात का? :- होय ☐ नाही ☐

३) शिक्षण घेताना भाषेची अडचण येते का? :- होय ☐ नाही ☐

४) तुमची मुळे आश्रमशाळेत जातात का? :- होय ☐ नाही ☐

५) असल्यास कारण :- १) गरीबीमूळे आश्रमशाळा बरी वाटते
२) जेवण, कपडे, पुस्तके मोफत मिळतात ☐
३) चांगले शिक्षण मिळते ☐
४) वळण, संस्कार व शिस्त लागते ☐

६) नसल्यास कारण :- १) आश्रमशाळा लांब आहे ☐
२) आश्रमशाळेबद्दल माहिती नाही ☐
३) शासकीय सवलती दिल्या जात नाहीत ☐
४) शिक्षक लक्ष देत नाहीत ☐ ५) इतर ☐

७) तुम्ही शिक्षकांना भेटता का? :- होय ☐ नाही ☐

८) तुमच्या मुलांसाठी शासनाने दिलेल्या सवलती माहिती आहेत का? :- होय ☐ नाही ☐

९) असल्यास कोणत्या ? :- १) निवासी आश्रमशाळा ☐ २) फी माफी ☐
३) शिष्यवृत्ती / विद्यावेतन ☐
४) राखीव जागा (शिक्षण, नोकरी) ☐
५) मोफत शैक्षणिक साहित्य ☐
६) इतर ☐

१०) तुमच्या मुलांना या सवलतींचा फायदा मिळाला आहे का? :- होय ☐ नाही ☐

११) तुमच्या मुलांनी अर्धवट शाळा सोडली आहे काय? :- होय ☐ नाही ☐

१२) शाळा सोडण्याचे कारण :- १) गरीबी ☐
२) पूढील शिक्षणाची सोय नाही. ☐
३) शिकवलेले समजत नाही ☐
४) भटकंतीमूळे ☐ ५) आवड नाही ☐
६) इतर ☐

१३) इतर शैक्षणिक समस्या कोणत्या :- ------------------------------------
------------------------------------

## ५. सामाजिक व सांस्कृतिक जीवनविषयक माहिती

१) आसपास इतर जातीजमातीचे लोक राहतात का? :- होय ☐ नाही ☐

२) इतर जमातीशी सामाजिक संबंध आहेत का? :- होय ☐ नाही ☐

३) असल्यास कशा स्वरुपाचे ? :- १) प्रासंगिक ☐ २) आर्थिक ☐ ३) धार्मिक ☐ ४) जवळचे ☐ ५) इतर ☐

४) नसल्यास कारण :- १) श्रेष्ठ कनिष्ठता ☐ २) आम्हीच दूर ठेवतो ☐ ३) वस्ती दूर आहे. ☐ ४) इतर ☐

५) आपल्याला इतर जाती जमातीकडून सहकार्य मिळते का? :- होय ☐ नाही ☐

६) मिळत असल्यास कोणत्या कार्यात ? प्रसंग :- १) सण-समारंभ ☐ २) आजार - मृत्यू ☐ ३) विवाह ☐ ४) आर्थिक संकट ☐ ५) इतर ☐

७) भाषेत बदल झाला आहे काय? :- होय ☐ नाही ☐

८) झाल्यास कारण :- १) बोली भाषा आवडत नाही ☐ २) इतरांचा संपर्क ☐ ३) जाणीवपूर्वक ☐ ४) शासकीय कामकाजासाठी ☐

९) पारंपारिक पोषाख कसा आहे? :- पुरुष :- ------------- स्त्री :- -------------

१०) पारधी संस्कृती कशी वाटते :- १) श्रेष्ठ ☐ २) कनिष्ठ ☐ ३) मध्यम ☐

११) पारधी जमातीतील कुळांची नावे सांगा :- १) -------- २) -------- ३) -------- ४) -------- ५) -------- ६) --------

१२) आपल्या जमातीच्या उत्पत्तीबद्दल माहिती सांगा :- ------------------------------------
------------------------------------
------------------------------------

१३) अडचणीत जमातीचे लोक सहकार्य करतात का? :- होय ☐ नाही ☐

१४) जमातीच्या परंपरांची माहिती द्या. ------------------------------------
------------------------------------

१५) मद्यपानाची सवय आहे काय? :- होय ☐ नाही ☐

१६) घरात मद्यपान कोणकोण करतात? :- ------------------------------------

१७) मद्यपान केव्हा करता? :- १) उत्सव ☐ २) सणवार ☐ ३) नेहमी ☐ ४) पाहूणचार ☐ ५) इतर ☐

१८) स्वतंत्र स्मशानभूमी आहे काय ? :- होय ☐ नाही ☐

१९) मृत व्यक्तीवर कशाप्रकारे संस्कार केले जातात ? :- दहन ☐ दफन ☐

## जातपंचायत

१) जमातीत जातपंचायत आहे काय? :- होय ☐ नाही ☐

२) असल्यास जातपंचायत सर्वांना समान न्याय देते का? :- होय ☐ नाही ☐

३) जातपंचायत असावी का? :- होय ☐ नाही ☐

४) जातपंचायत कोणत्या प्रकारची कामे करते ? :- १) जमातीवर नियंत्रण ☐ २) न्याय - निवाडा ☐ ३) शिक्षा व दंड ☐ ४) वरील सर्व ☐

५) जातपंचायतीत कोणत्या बाबतीत निर्णय घेतले जातात ? :- ☐ १) चोरी ☐ २) कौटूंबिक संघर्ष ☐ ३) अनैतिकता ☐ ४) घटस्फोट ५) जमिन विषयक ☐ ६) इतर ☐

६) जातपंचायत वर्षातुन किती वेळा व कोणत्या प्रसंगी भरते? ----------------------------------- -----------------------------------

७) त्यासंबंधी पूर्व कल्पना दिली जाते का? :- होय ☐ नाही ☐

८) जातपंचायत कशा प्रकारे कार्य करते?

| अ.क्र. | गुन्हा | शिक्षा |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |
| ६. | | |

९) जातपंचायतीचे निर्णय सर्वजण मानतात का? :- होय ☐ नाही ☐

१०) जातपंचायतीला कायदयाने बंदी आहे याची
माहिती आहे काय? :- होय ☐ नाही

११) एखाद्या प्रसंगी न्यायासाठी पोलीसात तक्रार
करता का? :- होय ☐ नाही ☐

१२) पोलीसांकडून योग्य न्याय मिळतो का? :- होय ☐ नाही ☐

१३) जातपंचायतीचे कार्य ग्रामपंचायतीने करावे का? :- होय ☐ नाही ☐

## ६. धार्मिक जीवनविषयक माहिती

१) तुमचा देवावर विश्वास आहे काय ? :- होय ☐ नाही ☐

२) तुमचे कुलदैवत कोणते ? :- ------------------------------

३) जमातीतील प्रमुख देव देवतांची माहिती द्या.

| अ.क्र. | देव | ठिकाण | पूजा | उद्देश |
|---|---|---|---|---|
| १) | | | | |
| २) | | | | |
| ३) | | | | |
| ४) | | | | |

४) आपण देवपूजा करता का? :- होय ☐ नाही ☐

५) पूजेचा विधी सांगा :- ------------------------------
------------------------------

६) उपवास करता का? :- होय ☐ नाही ☐

७) उपवासाचा उद्देश काय ? :- १) इच्छापूर्ती ☐
२) ईश्वराचे स्मरण / चिंतन ☐
३) संकट निवारण ☐
४) समाधान ☐ ५) इतर ☐

८) कोणत्या देवाची जत्रा भरते ? :- ------------------------------

९) तुम्ही नवस करता काय ? :- होय ☐ नाही ☐

१०) करत असल्यास कोणत्या देवाला? :- ------------------------------------

११) नवस कसा फेडता? ------------------------------------

१२) देव देवतांना पशूबळी देता का? :- होय ☐ नाही ☐

१३) कोणत्या पशुचा बळी दिला जातो ? :- १) बकरा ☐ २) कोंबडा ☐
३) रेडा ☐ ४) इतर ☐

१४) बळी देण्याचे कारण सांगा :- १) परंपरागत ☐
२) ईश्वर संतृष्टीचा प्रसाद ☐
३) सुख प्राप्ती साठी ☐
४) इतर ☐

१५) धार्मिक विधी कोण करते ? :- १) ब्राम्हण ☐ २) भगत ☐
३) कुटूंब सदस्य ☐ ४) इतर ☐

१६) तुमच्या कुटूंबातील धार्मिक सण सभारंभाची माहिती द्या.

| अ.क्र. | सण - समारंभ | कोणत्या महिन्यात | स्वरुप व महत्व |
|---|---|---|---|
| १) | | | |
| २) | | | |
| ३) | | | |
| ४) | | | |
| ५) | | | |
| ६) | | | |

१७) तुम्ही धर्मांतर केले आहे का? :- होय ☐ नाही ☐

१८) केले असल्यास धर्मांतरामुळे जीवनात कोणता बदल झाला ? :- १) स्व-अस्तित्वाची जाणीव झाली. ☐
२) दर्जा उंचावला. ☐
३) न्युनगंडाची भावना गेली ☐
४) प्रगत संस्कृतीचे ज्ञान झाले. ☐
५) इतर ☐

# ७. आर्थिक व व्यावसायिक माहिती

१) शिकार करता का? :- होय ☐ नाही ☐

२) असल्यास कोणत्या प्राण्याची शिकार करता? :- १) ---------------- २) ------------
३) ---------------- ४) ------------

३) शिकारीसाठी कोणती साधने वापरता? ----------------------------------

४) या व्यवसायात कोणत्या अडचणी येतात ? :- १) वन्यजीव संरक्षण कायदा ☐
२) साधनांचा अभाव ☐
३) मनुष्यबळाची कमतरता ☐
४) इतर ☐

५) सध्या कुटूंबाचे उत्पन्न कशातुन येते ? :- १) शेती ☐ २) नोकरी ☐
३) मजुरी ☐ ४) व्यवसाय ☐
५) भिक्षा ☐ ६) दारु गाळणे ☐
७) इतर ☐

६) शेती आहे का? :- होय ☐ नाही ☐

७) स्वत:चे घर आहे का? :- होय ☐ नाही ☐

८) घराची सरकारी दफ्तरी नोंद आहे का? :- होय ☐ नाही ☐

९) राहते घर कोणत्या प्रकारचे आहे? :- १) पाल ☐ २) झोपडी ☐
३) दगड मातीचे ☐ ४) पत्राशेड ☐
५) सिमेंट काँक्रीटचे ☐ ६) इतर ☐

१०) कुटूंबात किती जण कमवतात? :- १) एक जण ☐ २) दोघे ☐
३) तिघे ☐ ४) त्यापेक्षा जास्त ☐

११) एकूण वार्षिक उत्पन्न किती? :- १) १० हजार पर्यंत ☐
२) ११ ते २० हजार ☐
३) २१ ते ३० हजार ☐
४) त्यापेक्षा जास्त ☐

१२) आपल्या मूलांनी कोणता व्यवसाय करावा
असे वाटते ? :- १) पारंपारिक ☐ २) आधूनिक ☐
३) इतर ☐

१३) येणाऱ्या उत्पनातुन तुमच्या दैनंदिन गरजा भागतात का? :- होय ☐ नाही ☐

१४) आपण कर्ज घेतले आहे काय? :- होय ☐ नाही ☐

१५) कोणाकडून? :- १) सावकार ☐ २) मित्र ☐
३) बँक ☐ ४) नातेवाईक ☐

१६) कशासाठी कर्ज घेतले ? :- १) सण समारंभ, यात्रा, विधी ☐
२) विवाह, घर ☐
३) आजार, दवाखाना ☐
४) शिक्षण
५) अपराधातून सुटका ☐
६) इतर ☐

१७) सायकल/दुचाकी/पंखा/घड्याळ/रेडिओ/मोबाईल/ दुरदर्शन/पलंग/स्टील कपाट/ शिवण यंत्र आहे/आहेत का? ------------------------------------

१८) उत्पन्न व खर्च यातील फरक कसा भरुन काढता ? :- १) जास्त काम करुन ☐
२) कर्ज ☐ ३) इतर ☐

१९) आपण बँक खातेदार आहात का? :- होय ☐ नाही ☐

२०) शासनाकडून आर्थिक प्रगतीसाठी काय अपेक्षा आहेत? :------------------------------------
------------------------------------
------------------------------------

# ८.शासकीय योजना व सवलतीविषयक माहिती

१) शासकीय योजनांची माहिती आहे का? :- होय ☐ नाही ☐
२) शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे का? :- होय ☐ नाही ☐
३) पारधी समाजासाठीच्या योजना माहीत आहेत का? :- होय ☐ नाही ☐
४) असल्यास योजनांचा लाभ घेतला आहे का? :- होय ☐ नाही ☐
५) योजनांची नावे सांगा :- १)----------- २) -----------
३)----------- ४) -----------

६) शासकीय योजनांचा आजपर्यंत लाभ न मिळण्याची कारणे :-

१) योजनांची माहिती नसणे. ☐
२) प्रकरण (फाईल) करण्यास कोणाची ☐
मदत नसणे. ☐
३) जामीन सुरक्षितता नसणे. ☐
४) आवश्यक ते कागदपत्रे नसणे. ☐
५) इतर ☐

७) कोणत्या योजनांची गरज आहे? :- १) घर ☐ २) नोकरी ☐
३) व्यावसाय ☐ ४) शिक्षण ☐
५) कायदा व न्यायालय ☐ ६) इतर ☐

८) यापैकी कोणती शासकीय कागदपत्रे आहेत. :- १) मतदार ओळखपत्र ☐
२) रहिवाशी प्रमाणपत्र ☐
३) जात प्रमाणपत्र ☐ ४) शिधा पत्रिका ☐

९) कागदपत्रे नसल्यास कारण :- ----------------------------------------
----------------------------------------

१०) शासकीय योजना व सवलती संदर्भाने फसवणुक झाली असल्यास थोडक्यात माहिती द्या.

------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

## ९. सामाजिक समस्याविषयक माहिती

१) प्रगत समाजाकडून कशी वागणूक मिळते? :- १) चांगली ☐ २) वाईट ☐
३) संशयास्पद ☐ ४) सर्वसाधारण ☐

२) स्थलांतर करता का? :- होय ☐ नाही ☐

३) स्थलांतर थांबावे असे वाटते काय ? :- होय ☐ नाही ☐

४) गावात वस्ती मिळाली तर भटकंती थांबेल असे वाटते का? :- होय ☐ नाही ☐

५) तुमच्याशी चोरी / गुन्हयाचा संबंध लावला जातो का? :- होय ☐ नाही ☐

६) कुटूंबातील कोणी सदस्य सध्या अटकेत / तुरुंगात आहे का?:- होय ☐ नाही ☐

७) असल्यास कालावधी व कारण :- ----------------------------------------
----------------------------------------

८) पोलीसांकडुन पकडले गेल्यास कशी वागणूक मिळते ? :- १) चांगली २) वाईट ☐

९) पकडण्याचे कारण काय असते? :- १) गुन्हेगारीचा शिक्का ☐
२) संशय ☐
३) पोलिसांचा दृष्टीकोन ☐
४) प्रगतांचा संशय ☐
५) इतर ☐

१०) इतरांपेक्षा आपण मागासलेले आहोत असे वाटते काय ? :- होय ☐ नाही ☐

११) असल्यास कोणत्या बाबतीत ? :- १) घर, संपत्ती ☐ २) शिक्षण ☐ ३) संस्कार ☐ ४) इतर ☐

१२) तुम्ही गुन्हेगारीच्या चक्रातुन बाहेर पडू इच्छिता का? :- होय ☐ नाही ☐

१३) त्यासाठी कोणाची मदत घ्याल? :- १) सामाजिक कार्यकर्ता ☐ २) पोलीस ☐ ३) शासन ☐ ४) इतर ☐

## १०. सामाजिक चळवळी व सुधारणा विषयक माहिती

१) आपल्या जमातीतील सुशिक्षित लोक जमातीसाठी कार्य करतात काय ? :- होय ☐ नाही ☐

२) करत असल्यास कशाप्रकारे? :-

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

३) स्वयंसेवी संस्थांचे कार्य माहिती आहे का? :- होय ☐ नाही ☐

४) पारधी जमातीत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करणारे कार्यकर्ते माहिती आहेत का? :- होय ☐ नाही ☐

५) माहिती असल्यास नावे सांगा :- १) ---------------- २) ---------- ३) --------------- ४) ----------

६) आपण एखाद्या राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आहात का ? :- होय ☐ नाही ☐

७) आपण एखाद्या सामाजिक संघटनेचे सदस्य आहात का ? :- होय ☐ नाही ☐

८) सामाजिक परिर्वतन घडून येण्यास कोणाकडून प्रेरणा मिळते? :- १) सामाजिक कार्यकर्ते ☐ २) जमातीतील कार्यकर्ते ☐ ३) शासन ☐ ४) स्वयंसेवी संस्था ☐ ५) डॉ. आंबेडकर ☐ ६) इतर ☐

९) जमातीतील कर्तृत्ववान व क्रांतीकारी व्यक्तीबद्दल माहिती द्या.

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

**मुलाखतकर्त्याची स्वाक्षरी / निशाणी अंगठा**

# सामान्य ग्रंथ सूची

## मराठी ग्रंथ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ. काचोळे दा. धों. | - | भारतीय समाजरचना, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद (२००७) |
| २ | कर्वे इरावती | - | आमची संस्कृती, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स पुणे (२०१०) |
| ३ | वर्मा आर.सी. | - | भारतीय जमाती काल, आज आणि उद्या, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली (२००३) |
| ४ | डॉ. देवगावकर शैलजा- डॉ. देवगावकर शं.गो. | - | आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन, नागपूर (२००१) |
| ५ | तर्कतीर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री | - | मराठी विश्वकोश खंड- २ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई (१९७६) |
| ६ | डॉ. पिंगळे भिमराव | - | वनवासी व उपेक्षित जग, अभिनव प्रकाशन बीड. प्र.आ. (१९९०) |
| ७ | प्रा.डॉ. नाडगोंडे गुरुनाथ | - | भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती (१९८६) |
| ८ | ॲड. मोरे माधव बंडू | - | आदिवासी बोलू लागला, सुगावा प्रकाशन पुणे (२००२) |
| ९ | डॉ. गारे गोविंद | - | भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. (१९९३) |
| १० | प्रा. कोंडेकर अशोक | - | समाजशास्त्र महाराष्ट्र लोकसेवा आयोग, राज्यसेवा मुख्य परिक्षा) के. सागर पब्लिकेशन्स पुणे, (२००७) |

११ श्री. लामखडे मा.रा. - आदिवासी ठाकर आणि त्यांची लोकगीते, पद्मगंधा प्रकाशन एरंडवणे पुणे, (२००३)

१२ प्रा. ठाकूर सुंदरसिंह - आदिवासी समाजाचे समाजशास्त्र , निर्मल प्रकाशन नांदेड, प्रथम आवृत्ती (२००६)

१३ हुसेन माजिद - मानवी भुगोल (मराठी अनुवाद)- प्रा. ए.व्ही. भागवत, प्रा.संजीव नलावडे, प्रा. इरावती नलावडे, डॉ. प्रवीण सप्तर्षी, प्रा. मुकूंद नातु, आणि श्रीकांत क्षीरसागर , के.सागर पब्लिकेशन्स पुणे, चौथी आवृत्ती (२०११)

१४ घाटे निरंजन - आदिवासींचे अनोखे विश्व , मनोविकास प्रकाशन पुणे , प्रथम आवृत्ती (२००९)

१५ संगवे विलास (१९७६) - सामाजिक मानवशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, (१९७६)

१६ डॉ. तेगमपुरे मारोती - आदिवासी विकास आणि वास्तव, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती (२००९)

१७ डॉ. साळुंखे संजय भा. - आदिवासी समाजशास्त्र, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद , प्रथम आवृत्ती (२००९)

१८ गायकवाड प्रदीप - भारताचे संविधान (अनूवादित), समता प्रकाशन लष्करी बाग, नागपूर २००४

१९ वाणी प्रकाश - जात प्रमाणपत्र आणि वैधता तपासणी, सामाजिक कृती संस्था जळगांव प्र. आ. (२०१०)

२० डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे (२००२)

२१ मांडे प्रभाकर - गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन औरंगाबाद , प्रथम आवृत्ती, (१९८३)

२२ प्रा. राठोड मोतीराज - गुन्हेगारी जमाती कायदा आणि परिणाम , निर्माण संस्था पुणे, (जानेवारी २०१२)

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | डॉ. देवगावकर शैलजा | - | महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर आवृत्ती (२००१) |
| २४ | पाटील पंढरीनाथ | - | भटके भाईबंद, सुरेश एजन्सी पुणे , प्र. आ. (१९९०) |
| २५ | महाराष्ट्र वार्षिकी | - | द युनिक अकॅडमी पूणे, संपादक- तुकाराम जाधव, (२००८-२००९) |
| २६ | तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री | - | मराठी विश्वकोश, खंड -१२ महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई (१९८५) |
| २७ | डॉ. केतकर श्रीधर | - | प्राचीन महाराष्ट्र , वरदा बुक्स, (जानेवारी १९८९) |
| २८ | भांडवलकर- हनवते | - | मराठवाड्याचा इतिहास, अभिजीत पब्लीकेशन लातूर , (जुन १९९९) |
| २९ | डॉ. रोडे सोमनाथ | - | मराठवाड्याचा इतिहास, अभिजीत पब्लीकेशन लातूर , (जुन १९९९) |
| ३० | विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार | - | भारताचे संविधान (दि. २७ सप्टेंबर २००६ पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे) सहावी आवृत्ती २००६, |
| ३१ | प्रा. काळे भगवान | - | मराठवाडा : काल आणि आज (पूर्वार्ध) संकेत प्रकाशन जालना, प्रथम आवृत्ती (१९८६) |
| ३२ | डॉ. कठारे अनिल,डॉ. नगराळे एम. एस. | - | मराठवाड्याचा इतिहास,प्रारंभ ते १९६०, कल्पना प्रकाशन नांदेड, (नोव्हे. १९९९) |
| ३३ | पोतदार वसंत ब. | - | हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम सन्मती मुद्रणालय, शुक्रवार पेठ सोलापूर. द्वि. आवृत्ती (१९८४) |
| ३४ | डॉ. भांडारकर पु. ल. | - | सामाजिक संशोधन पध्दती , महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर तृ. आ. (१९८७) |
| ३५ | प्रा. घाटोळे रा.ना. | - | समाजशास्त्रीय संशोधन , तत्वे व पध्दती , श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर (२००३) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | डॉ. पाटील वा.भा. | - | संशोधन पध्दती , प्रशांत पब्लिकेशन जळगाव, (२०१०) |
| ३७ | डॉ. ढगे एस. के.<br>डॉ. हासे सी. पी. | - | संशोधन पध्दती, के एस. पब्लिकेशन पुणे, प्र.आ.(२०११) |
| ३८ | मांडवकर भाऊ | - | कोलाम, सेवा प्रकाशन अमरावती प्र. आ. (१९६६) |
| ३९ | चव्हाण रामनाथ | - | जाती आणि जमाती, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, (१९८९) |
| ४० | डॉ. गारे गोविंद | - | आदिवासी लोककथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पूणे, (२००३) |
| ४१ | डॉ. कदम नागनाथ धों. | - | महाराष्ट्रातील भटका समाज, प्रतिमा प्रकाशन संस्कृती व साहित्य पुणे,(१९९०) |
| ४२ | माने लक्ष्मण | - | विमूक्तायन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, (१९९७) |
| ४३ | परुळेकर गोदावरी | - | जेव्हा माणूस जागा होतो, मौज प्रकाशन मुबई,(२००६) |
| ४४ | मांडे प्रभाकर | - | भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, (२००६) |
| ४५ | खडसे भा. कि. | - | सामाजिक समस्या, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर प्र. आ. (१९७८) |
| ४६ | प्रा. मुठे सुमन | - | आदिवासी स्त्री जीवन, सुगावा प्रकाशन पुणे,(२००१) |
| ४७ | डॉ. जाधव सुदाम | - | आदिवासी साहित्य, सुलबा प्रकाशन औरंगाबाद, (१९९९) |
| ४८ | डॉ. खरात शंकरराव | - | भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न, प्र.आ. सुगावा प्रकाशन पुणे, (२००३) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४९ | कालेलकर गोविंद मंगेश | - | मुंबई इलाख्यातील जाती , वरदा प्रकाशन पुणे, (१९९९) |
| ५० | प्रभुणे गिरीश | - | पारधी , राजहंस प्रकाशन पुणे, द्वि.आ. (२००६) |
| ५१ | गायकवाड लक्ष्मण | - | वकिल्या पारधी मॅजिस्टिक प्रकाशन मुंबई , द्वि.आ. (२००६) |
| ५२ | माने लक्ष्मण | - | भटक्याचं भारुड , ग्रंथाली प्रकाशन मुंबई,(२००३) |
| ५३ | गायकवाड लक्ष्मण | - | उचल्या, श्रीविद्या प्रकाशन शनिवार पेठ पुणे, |
| ५४ | मोरे विमल | - | पालातली माणसं , पद्मगंधा प्रकाशन पुणे, (२००७) |
| ५५ | प्रभुणे गिरीश | - | पालावरचं जिणं , साप्ताहिक विवेक मुंबई, (२००३) |
| ५६ | काळे किशोर | - | कोल्हाट्याचं पोर , ग्रंथाली प्रकाशन मुंबई,(२००८) |
| ५७ | अत्रे त्रि.ना. | - | गुन्हेगार जाती , वरदा प्रकाशन पुणे (२००९) |
| ५८ | डॉ. गारे गोंविद | - | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती ,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, द्वि. आ. (२००२) |
| ५९ | मांडे प्रभाकर | - | उपेक्षित पर्व, परिमल प्रकाशन औरंगाबाद |
| ६० | पाटील नितीन | - | स्वातंत्र्यातील पारतंत्र्य, चार्वाक प्रकाशन विरार (पूर्व) (२००४ ) |
| ६१ | संपादक पं. जोशी महादेवशास्त्री | - | भारतीय संस्कृतीकोश खंड - ५ वा , भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे |
| ६२ | संपादक - पवार जयसिंगराव | - | राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर (२००७) |
| ६३ | प्रा. राठोड मोतीराज | - | एक्स गुन्हेगार जमाती , प्रथम आवृत्ती (डिसेंबर १९८४) |
| ६४ | गर्गे स.मा. | - | भारतीय समाज विज्ञान कोश खंड - ०२ समाज विज्ञान मंडळ पुणे, प्र.आ. (१९८६) |

६५ तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश खंड -९ महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई (१९७९)

६६ डॉ. संगवे विलास - आदिवासीचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन पुणे, प्र. आ. (१९७२)

६७ केतकर श्रीधर व्यंकटेश - महाराष्ट्रीय ज्ञानकोश (शरीर खंड) भाग १७ वा महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ पुणे,

६८ नरके हरी - महात्मा फुले गौरव ग्रंथ, शासकीय फोटो झिंको मुद्रणालय पुणे, (२००६)

६९ डॉ. गारे गोविंद - आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन औरंगाबाद प्र. आ. (१९९४)

७० वाघ नलीनी - उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक आणि शिक्षण, नलीनी प्रकाशन नागपूर, प्र. आ. (१९९५)

७१ जोशी बी. आर. व इतर - डायमंड सामाजिक ज्ञान कोश खंड १, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, (२००७)

७२ डॉ. व्हटकर जयवंत - महाराष्ट्रातील गुन्हेगार - शोध आणि बोध, दिलीपराज प्रकाशन पुणे

७३ मांडे प्रभाकर - सांकेतिक आणि गुप्त भाषा, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद (१९९५)

७४ डॉ. सौ. काळदाते सुधा - भारतीय सामाजिक संस्था पारंपारिक व आधुनिक, कैलास पब्लीकेशन औरंगाबाद

७५ तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश खंड ८ , महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई (१९७९)

७६ सौ. तामस्कर नीला - सामाजिक मानवशास्त्र, श्रीकृष्ण विठ्ठल गंधे मुद्रणालय नागपूर प्र.आ. (१९७२)

७७ चव्हाण यशंवतराव - कृष्णाकाठ, प्रेस्टिज पब्लीकेशन्स पुणे,(१९८०)

७८ श्री. दिवेकर एम. के. - आदिवासी जमिनीविषयक २००६ च्या अधिनियमानुसार कायदे, मुकुंद प्रकाशन ठाणे (२००८)

७९ डॉ. आगलावे प्रदिप समाजशास्त्रीय संकल्पना, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर (१९९६)

८० प्रा. कांबळे. सी.टी. , प्रा. पवळे टी. एस. भारतातील सामाजिक चळवळीची रुपरेषा, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स, नांदेड (२०१०)

८१ डॉ. धारणकर सरल - इतिहासाचा अभ्यास आणि संशोधन, बिना प्रकाशन नाशिक

८२ डॉ. बोधनकर सुधीर, प्रा. अलोनी विवेक - सामाजिक संशोधन पध्दती, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर (२००७) पृ. क्र. २६५


**हिंदी ग्रंथ सूची**


१ वर्मा रुपचंद - 'भारतीय जनजातीयाँ,अतीत के झरोखेसे' प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार नई दिल्ली: (१९७७)

२ दास शिवतोष (१९८३) - भारत की जनजातीयाँ- किताबघर दिल्ली

३ भारत का संविधान - विधी और न्याय मंत्रालय भारत सरकार नई दिल्ली- (१९७३)

४ डॉ. मेहता प्रकाश चन्द्र - आदिवासी संस्कृती एवं प्रथाएँ डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस प्रायवेट लि. दरिया जंग नई दिल्ली. (२००९)

५ रावत हरिकृष्ण - समाजशास्त्र विश्वकोश (Encyclopaedia of Sociology) रावत पब्लिकेशन्स जयपूर- एवं नई दिल्ली- (२००२)

## इंग्रजी ग्रंथ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | India 2000 | - | Publication Division- Ministry of Information and Broadcasting- Government of India- |
| 2 | Baines A. | - | Census of India- (1891) Report Vol. 1 pt 1 pp- 158 |
| 3 | Hutton J.H. (1938) | - | Census Report of India (1931) Vol. 1 New Delhi |
| 4 | Ghurye G..S. | - | The Scheduled Tribes 2nd Edition- - Popular Book Depot Bombay (1959) |
| 5 | Elwin V. | - | The Baiga- Londan |
| 6 | Ghurye G..S. | - | The Aborigines So-called and their Future- Poona- (1943) |
| 7 | Gillin and Gillin (1950) | - | Cultural Sociology- the Macmillan Co. New York |
| 8 | Risley H.H. (1968) | - | The People of India- Culcutta. |
| 9 | Ghosh S.K. | - | The Constitutional of India- Law Publishers Allahabad- (1985) |
| 10 | An Overview of tribal Research Studies | - | Edited by Navinchandra Jain- Dr. Robin D. Tribhuvan - TRTI- Pune -(1995) |
| 11 | Singh K.S. | - | People of India - Maharashtra Part - III Vol. XXX |
| 12 | Dr. Sharma, Pathan and Others | - | Intellectual Sandharbh Maharashtra (State and Districts At a Galance) Vol.-11- First Pub - (2004) Intellectual Book Bureau- Bhopal (M.P.) P. 769 |

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | Selltiz, charie, Johoda, Morie, Deitsch, Morton and Cook- Stuart W. | - | Research Method Social Relations- Halt Rinehart and Winston Inc. New York- (1959) |
| 14 | Festinar Leon and Daniel Katz (Eds.) | - | Research Methods in the behavioural Science - Halt Rinenart & Winston New York |
| 15 | R.V. Russell and Rai Bahadur Hiralal | - | The Tribes and Castes of the central provinces of India- Rajdhani Book centre Delhi (1916) |
| 16 | Ghurye G.S. | - | The Scheduled Tribes- Popular publications Bombay (1966) |
| 17 | Y.P.S. TomarDr. Robin D. Tribhuwan | - | Development of primitive Tribes in Maharashtra status- continuity and change –TRTI Pune (2004) |
| 18 | Dr. Jha Arvind Kumar | - | A Study of pardhi's Struggle for survival VIS. A VIS Wild life protection acts : An Anthro - Ecological Study (2003) |
| 19 | Herbert Spencer | | The Principles of Sociology- Appleton- New York (1891) |
| 20 | M. Francis Abraham | - | Modern Sociological Theory- An Introduction- Published by Oxford University press. New Delhi (2002) |
| 21 | Goode- Willion J and Hatt Paul K | - | Methods in Social Research- Mc Groaw- Hill- International Book Company- New Delhi (1981) |
| 22 | Census of India 2001 | - | Primary Census Abstract- Vol. 1 MH. |

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | Satya. N. Ratha- George Pfeffer- Deepak Kumar Behra | - | Contemporary Society : Tribal studies- concept publishing company (1997) |
| 24 | Sangave Vilas A. | - | Phanse-pardhi of Kolhapur : A Tribe in Transition- Sociological Bulletin- XVI- (Sept. 1967) |
| 25 | Enthoven R.E. | - | The Tribes and Castes of Bombay Vol.III – Cosmo Publications Delhi (1975) |
| 26 | Singh K.S. | - | People of India - National Series Vol. III - the Scheduled Tribes - Anthropological Survey of India Oxford University Press |
| 27 | Chhanna S.M. | - | Encyclopedia of india Tribes and castes- Vol. 17 Cosmo Publication- New Delhi (2004) |
| 28 | Sherring M.A. | - | The Native races of india- Hindu tribes and castes Vol. II- Cosmo Publication Delhi -6- India (1974) |
| 29 | Sen A.K. | - | Poverty- Inequality and unemployment- economic and political weekly- Mumbai (1975) |
| 30 | Desai A.R. | - | Rural Sociology in India - forth edition - popular Prakshan Bombay |

## वर्तमान पत्रे, नियतकालिके, मासिके, शासन निर्णय व शासकीय माहिती पुस्तिका

| | | | |
|---|---|---|---|
| १ | हाकारा | - | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद- पुणे - त्रैमासिक एप्रिल (२००९) |
| २ | महाराष्ट्र शासन निर्णय | - | निर्णय क्रमांक संकीर्ण - २००८ /यादी/पृ.क्र. ५५३/मावक५ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मुंबई- दि. २६/०९/२००८ |
| ३ | आदिवासी संशोधन पत्रिका | - | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था- पुणे सप्टेंबर - 2001 |
| ४ | आदिवासी विकास विभाग माहिती पूस्तिका सन -२०११-१२ | - | आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन |
| ५ | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन -२०१० | - | अर्थ व सांख्यिकी संचालनालय- महाराष्ट्र शासन- मुंबई. |
| ६ | माडिया | - | आदिवासी विशेषांक, सुरेशचंद्र वारघडे (१९७९) |
| ७ | आदिवासी संशोधन पत्रिका | - | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे- (मार्च १९९८) |
| ८ | आदिवासी संशोधन पत्रिका | - | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे- Vol. XXI No.२ (Sept.२००७) |
| ९ | दैनिक सम्राट | - | १ फेब्रुवारी २००७ |
| १० | हाकारा | - | आदिवासी संस्कृती व विकास महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद- पुणे - त्रैमासिक ऑक्टोबर- डिसेंबर (२००९) |
| ११ | दै. लोकसत्ता | - | १ सप्टेंबर २०१२ |
| १२ | थाडे समिती अहवाल | - | संशोधन अधिकारी- राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे- |
| १३ | आदिवासी संशोधन पत्रिका | - | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे- मार्च १९९८ |
| १४ | आदिवासी संशोधन पत्रिका | - | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे- Vol. XXI No.२ Sept.२००७ |
| १५ | माहिती पुस्तिका | - | आदिवासी विकास विभाग - महाराष्ट्र शासन २०११-१२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | वार्षिक आदिवासी उपयोजना | - | महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग पुणे, (२००९-१०) |
| १७ | माहिती पुस्तिका | - | आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन (२०११) |
| १८ | आश्रमशाळा माहिती पुस्तिका | - | विभागीय समाजकल्याण लेखाधिकारी कार्यालय, लातूर विभाग, लातूर |
| १९ | डॉ. झारे | - | पारधी विकास आराखडा, टाटा सामाजिक विज्ञान संस्था तुळजापूर |
| २० | इदाते भी.रा. | - | विमुक्त जाती व भटक्या जमाती ,अभ्यास व संशोधन अहवाल, समाज कल्याण विभाग , महाराष्ट्र शासन, (जानेवारी १९९९) पृ. क्र.१४ |
| २१ | पारधी विशेष योजना २००६-२००७ | - | प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद ,महाराष्ट्र शासन (उस्मानाबाद जिल्हा ) |

**संशोधन शोधप्रबंध**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. उईके हमराज उदयभान | - | आदिवासी (प्रधान) लोकसाहित्यातील स्त्री - पुरुष चित्रण (मराठी पीएच.डी. प्रबंध डॉ.बा.आं.म.वि. औरंगाबाद ) |
| २ | प्रा. जाधवर रमेश बलभीम | - | डॉ. गोविंद गारे यांच्या आदिवासी साहित्याचा विवेचक अभ्यासक (मराठी पीएच.डी. प्रबंध) डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद २०१० |
| ३ | प्रा. शिकलगार आदम महमद | - | पुणे जिल्ह्यातील नागरी वसाहतीतील स्थलांतरीत शिकलगार जमात - १९९९ (पीएच.डी. प्रबंध. समाजशास्त्र) टि.म.वि. पुणे |
| ४ | श्री. सहारे पद्माकर नागजी | - | नाशिक जिल्ह्यातील कोकणा जमातीचा सामाजिक - सांस्कृतिक अभ्यास.(पीएच.डी. प्रबंध समाजशास्त्र) डॉ. बा.आ.म.वि. औरंगाबाद - २००४ |
| ५ | श्री. साळुंके संजय भा. | - | २००८ - गोंड आदिवासी जमातीचे सामाजिक आणि आर्थिक अवलोकन - पीएच.डी प्रबंध समाजशास्त्र डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद |
| ६ | प्रा. डोंगरे महादेव दत्तु | - | पुणे जिह्यातील कातकरी जमातीचा सा. आर्थिक अभ्यास टि.म. वि. पुणे (पीएच.डी. प्रबंध) अर्थशास्त्र. |
| ७ | प्रा. गायकवाड यशवंत जंगलू | - | आदिवासी पारधी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास -२००६ डॉ.बा.आं.म.वि. औरंगाबाद (पीएच.डी.) |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्री. मोरे कल्याण विठ्ठल | - | धुळे जिल्ह्यातील कोकणा जातीचा समाजशास्त्रीय अभ्यास (अप्रकाशित पीएच.डी.प्रबंध) डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद |
| ९ | Dr. Jha Arvind Kumar | - | A Study of pardhi's Struggle for survival VIS. A VIS Wild life protection acts : An Anthro - Ecological Study (२००३) |
| १० | शेळके प्रताप शिवाजीराव | - | उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक अभ्यास (कळंब तालुका संदर्भात) एम.फील. प्रबंध (२०१०) |

# गोषवारा (Final synopsis)

## पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास
## विशेष संदर्भ - उस्मानाबाद जिल्हा

**१. प्रस्तावना :-**

भारतीय समाजात विविध धर्म, भाषा, वंश, जाती आणि जमातींचा समावेश असून त्यामुळे जीवनपध्दती संदर्भाने समाजव्यवस्थेत वैविध्य दिसून येते. भारतीय समाजाचा महत्वाचा घटक असलेल्या आदिवासी समाजातील भटक्या व विमूक्त जाती व जमाती, स्वातंत्र्याच्या ६० वर्षानंतर आजही सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत.

जगाच्या कोणत्या तरी भूभागावर जे आपले पाय रोवून स्थिर राहिले, दुर्गम जंगल, नद्या, डोंगरकपारीत ज्यांचे वास्तव्य आहे त्यांना खऱ्या अर्थाने आदिवासी म्हणतात. 'आदिवासी' हा इंग्रजीतील 'ॲबोरिजीन्स' या इंग्रजी शब्दाचा रुढ मराठी पर्याय आहे. दऱ्याखोऱ्यातील व जंगलातील वास्तव्यामुळे त्यांना गिरीजन असेही संबोधले जाते. आदिवासी समाज विविध वैशिष्ट्यांनी ओळखला जातो व वर्गीकृत केला जातो. आदिवासीसाठी भारतीय संविधानात 'अनुसूचित जमाती' असा शब्दप्रयोग केला आहे.

भारतात २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या शेकडा ८.२ टक्के इतकी आदिवासी लोकसंख्या आहे. तर महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येच्या शेकडा ८.८५ टक्के इतकी आदिवासी लोकसंख्या आहे. महाराष्ट्रातील आदिवासींचे वास्तव्य सह्याद्री, सातपुडा, गोंडवन इ. विभागात असून राज्याच्या अनूसुचित जमातीच्या यादीमध्ये एकूण ४७ जमाती समाविष्ट आहेत. त्यापैकी एक पारधी जमात आहे.

पारधी ही मुळ आदिवासी जमात असून १८७१ च्या ब्रिटीशकालीन गुन्हेगारी कायद्यामुळे तिची अद्यापही गुन्हेगार जमात म्हणून सामाजिक ओळख आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, सोलापूर, यवतमाळ, जळगांव, धुळे, अहमदनगर आणि उस्मानाबाद या जिल्ह्यात पारधी जमातीचे वास्तव्य असून राज्यात २००१ च्या जनगणनेनुसार तिची एकूण लोकसंख्या १५९८७५ इतकी आहे. संशोधन क्षेत्र असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण पारधी लोकसंख्या १५१५५ इतकी असून जिल्ह्याच्या एकूण आदिवासी लोकसंख्येत तिचेशेकडा ५४.४ टक्के इतके प्रमाण आहे. पारधी जमातीमध्ये विविध पोटजाती असून निरक्षरता, परंपरागत जीवनशैली, प्रथा, परंपरा, दारिद्र्य इ. अनेक

कारणांमुळे ही जमात अद्यापही मागासलेले जीवन जगत आहे. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे पोलीसांकडून होणारे अटकसत्र, सामाजिक जीवनात प्रगत समाजाकडून होणारी उपेक्षा व अवहेलना, शिक्षणाबद्दल अनास्था, आर्थिक विपन्नावस्था इ. सामाजिक शाप सोबत घेऊन पारधी समाज आपले अस्तित्व टिकविण्यासाठी धडपड करीत आहे.

**२. संशोधन क्षेत्र व संशोधन पध्दती :-**

**अभ्यासविषयाचे महत्त्व :-** प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे व विकासासाठीच्या शासकीय योजनांचे यशापयश अभ्यासून उपाय सुचविणे हा आहे. त्यांच्या मागासलेपणाची स्थिती व त्यातील बदलासंदर्भाने त्यांची मते व इतर समाजाच्या संपर्कामुळे त्यांच्यावर झालेले परिणाम इ. बाबींचा अभ्यास करणे हा सुध्दा प्रस्तुत संशोधनाचा हेतू आहे.

प्रस्तुत संशोधनात उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी जमातीचा सामाजिक व संस्थात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. वेगवेगळ्या जमातींचा काही प्रमाणात अभ्यास झालेला असला तरी महाराष्ट्रातील पारधी जमातीचा अभ्यास व संशोधन अल्पच आहे. प्रस्तुत संशोधनांतर्गत पारधी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास करुन काढलेल्या निष्कर्षाच्या आधारे जमातीच्या प्रगती व विकासासाठी उपाय योजना सुचविणे हा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे शासन, राजकीय-सामाजिक कार्यकर्ते, सर्वसामान्य जनता, अभ्यासक, विचारवंत व पारधी जमातीला या अभ्यासाचा उपयोग होऊ शकेल असा विश्वास वाटतो. पारधी जमातीची सद्यःस्थिती व त्यांच्या समस्यांचा अभ्यास करुन काढलेल्या निष्कर्षाअंती त्यावरील सुचवलेली उपाययोजना अंमलात आणणे जमातीच्या प्रगतीसाठी व विकासासाठी गरजेचे आहे. त्या दृष्टीने उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास हा विषय महत्त्वाचा वाटतो.

**संदर्भ साहित्याचा आढावा :-**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून समाजशास्त्रज्ञांनी आणि संशोधकांनी आदिवासी जमातींचा अभ्यास केलेला आहे. भारतातील आदिवासी जमातीवर ज्या अभ्यासकांनी, संशोधकांनी संशोधन केले आहे, त्याचा याठिकाणी आढावा घेण्यात आला आहे. तसेच भटक्या विमुक्तांवरील संदर्भ साहित्याचाही आढावा घेतला आहे.

पारधी जमातीवरील संशोधन विशेषतः प्रकाशित लिखाण अतिशय अल्प आहे. पारधी जमातीसंदर्भात जे कांही लिखाण झालेले आहे, त्यातून या जमातीच्या एकंदरीत जीवनसंस्कृतीचे

आकलन होण्यास काही अंशी मदत होते. याठिकाणी खरात शंकरराव (भटक्या विमुक्त जाती व त्यांचे प्रश्न) कालेलकर गो. मं. (मुंबई इलाख्यातील जाती), प्रभूणे गिरीश (पारधी), रसेल आणि हिरालाल (The Tribe and castes of central provinces of india), एन्थोवेन(The Tribe and castes of Bombay), के. एस. सिंग (People of India), गारे गोंविद (महाराष्ट्रातील आदिवासी जमाती), पिंगळे भीमराव (वनवासी व उपेक्षित जग), पं. जोशी महादेवशास्त्री (भारतीय संस्कृती कोश) इत्यादींनी केलेले आदिवासी पारधी जमातीचे लिखाण विशेष उल्लेखनीय आहे. यात प्रामुख्याने पारधी जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक जीवन, शैक्षणिक अनास्था आणि विकासाच्या समस्या याबाबत वर्णन केलेले आहे.

**संशोधन पध्दती :-**

**उद्दिष्ट्ये :-**

प्रस्तुत संशोधनाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत -

६. पारधी समाजाच्या कौटुंबिक, वैवाहिक जीवनाचा आढावा घेणे.

७. पारधी समाजाच्या शैक्षणिक जीवनाचा अभ्यास करणे.

८. पारधी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचे आकलन करणे.

९. पारधी समाजाच्या आर्थिक व व्यावसायिक जीवनाचे विश्लेषण करणे.

१०. पारधी समाजाचे सामाजिक प्रश्न आणि सुधारणा चळवळी या अनुषंगाने आढावा घेण आणि उपाय सुचविणे.

**गृहीतके :-**

प्रस्तुत संशोधनासाठी पूढील विधाने गृहितकृत्याच्या स्वरुपात निवडली आहेत.

७. पारधी समाज मागासलेला आहे.

८. शिक्षणाचे व साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

९. तो आर्थिकदृष्ट्या विवंचनेमध्ये जीवन जगतो.

१०. प्रगत समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक आहे.

११. पारधी समाजात अनेक रुढी-परंपरा, अंधश्रध्दा अस्तित्वात आहेत.

१२. पारधी समाजाचे जीवन अनेक समस्यांनी व्यापले आहे.

**व्याप्ती :-** प्रस्तुत संशोधनासाठी 'उस्मानाबाद जिल्हा' हे संशोधनाचे क्षेत्र असून जिल्ह्यातील पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, कौटुंबिक, इ. जीवन व समस्या अभ्यासणे आणि शासकीय योजनांचे यशापयश अभ्यासण्यापर्यंत व्याप्ती राहील. प्रस्तुत संशोधनासाठी २००१ ते २०१२ हा कालावधी निश्‍चित करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी 'अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखड्याची निवड केली असून तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**प्राथमिक तथ्य :-**

तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोताद्वारे माहिती घेताना मुलाखत अनुसूचीच्या आधारे माहिती घेण्यात आली आहे. तसेच सहभागी - असहभागी निरीक्षण, सर्वेक्षण या साधनांचाही वापर केला असून शास्त्रीय पध्दतीने निवडलेल्या गावातील वस्त्यांना भेटी देऊन तथ्य संकलन केले आहे.

**दुय्यम तथ्य :-**

आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये, शासकीय कार्यालये, समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, पोलिस खाते, सामाजिक संस्थांचे सेवा प्रकल्प इत्यादी घटकांकडून आवश्यक आकडेवारी व माहिती घेतली आहे. तसेच अनेक ज्ञापकांचीही मदत घेतली आहे. याशिवाय विविध लेखकांची पुस्तके, विविध विद्यापीठाची ग्रंथालये, वर्तमानपत्रे, योजना पुस्तिका इत्यादी दुय्यम स्त्रोतांचाही संशोधनासाठी उपयोग केला आहे.

**नमुना निवड :-**

प्रस्तुत संशोधन विषयासाठी प्रश्नावलीच्या माध्यमातून आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील ३०० पारधी उत्तरदात्यांची लोकसंख्येच्या घनतेनुसार सहेतुक नमुना निवड पध्दतीने निवड केली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील आठ तालुक्यांपैकी सहा तालुक्यांत १०५ पारधी वस्त्या आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी गावाची (वस्तीची) निवड करतांना जास्त लोकसंख्या असणाऱ्या वस्तीची निवड करण्यात आली. निवडलेला नमुना गट प्रातिनिधीक असावा यासाठी उत्तरदाता म्हणून कुटुंब प्रमुखच निवडण्यात आला.

**मुलाखत अनुसूची :-**

संशोधनाच्या संदर्भात माहिती घेताना प्रत्यक्ष निरीक्षण व मुलाखत अनुसूचीचा वापर करुन आवश्यक असलेली माहिती भरुन घेतली आहे. जमातीत अशिक्षितांचे प्रमाण जास्त असल्याने संशोधिकेने पारधी कुटूंबांच्या घरी जाऊन मुलाखत अनुसूची भरुन घेतल्या.

**तथ्य विश्लेषण :-**

मुलाखत अनुसूची भरुन झाल्यावर प्राप्त माहितीची क्रमवारी लावून योग्य रीतीने विश्लेषण केले. प्राप्त माहिती वेगवेगळ्या स्वरुपाची असल्याने प्रश्नावलीतील मुख्य घटकांचे वर्गीकरण केले. मिळालेल्या माहितीचेही संख्यात्मक आणि गुणात्मक वर्गीकरण केले. संशोधन विषयांतर्गत स्वतंत्र विभाग करुन त्या त्या विभागाचे विश्लेषण करुन या संशोधनांती निष्कर्ष काढण्यात आले.

उत्तरदात्यांकडून खालील विविध घटक शिर्षकांतर्गत माहिती मिळविली आहे. १. वैयक्तिक २. कौटुंबिक ३. वैवाहिक ४. सामाजिक व सांस्कृतिक ५. जातपंचायत ६. धार्मिक ७. शैक्षणिक ८. आर्थिक ९. शासकीय योजना १०. सामाजिक प्रश्न

प्रस्तुत संशोधनातील सदर माहिती फक्त पारधी जमातीशी संबंधित आहे.

**मर्यादा :-**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासातील मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

९. नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या उत्तरदात्यांकडून कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक आर्थिक व शासकीय योजना संदर्भाने प्रश्न इ. माहिती मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने मिळवून अभ्यासांती काढलेले निष्कर्ष परिपूर्ण व अचूक असावेत यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. तरीही उत्तरदात्यांचा प्रतिसाद व अचूक आणि नेमकी माहिती मिळण्यासंदर्भाने कांही उणिवा असण्याची शक्यता आहे.

१०. प्रस्तुत संशोधनातून काढलेले निष्कर्ष हे प्रातिनिधीक स्वरुपाचे आहेत.

११. प्रस्तुत संशोधन उस्मानाबाद जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

१२. या संशोधनात पारधी जमातीच्या राजकीय व आरोग्यविषयक जीवनाच्या अभ्यासाचा समावेश नाही. म्हणून प्रस्तुत विषयावर अजून सुक्ष्म संशोधन करण्यास वाव आहे.

१३. औपचारिक शिक्षणाच्या अभावामुळे तार्किकदृष्ट्या सुसंगत अशी माहिती देण्यात पारधी कुटुंबे काही अंशी असमर्थ होती.

१४. दुय्यम स्त्रोतातील माहिती व वस्तुस्थिती यात काहीशी तफावत जाणवली.

१५. पारधी जमातीच्या उत्तरदात्याचे पूर्वगृह, भाषा, इत्यादी  मर्यादित आहेत.

१६. प्रस्तुत संशोधन विषयाचा कालावधी २००१ ते २०१२ असा मर्यादितच आहे.

**प्रकरण नियोजन :-**

"पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ-उस्मानाबाद जिल्हा. "   या संशोधन विषयाच्या सर्व घटकांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला असून विषयाचे घटकनिहाय अहवाल लेखन खालीलप्रमाणे केले आहे.

**प्रकरण १ - प्रस्तावना**

"पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास" या संशोधन विषयाच्या पहिल्या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना करुन भारतीय समाज रचना, जाती व्यवस्था, आदिवासी जमाती, आदिवासी समुदायाचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, जगातील आदिवासी, भारतातील आदिवासी आणि महाराष्ट्रातील आदिवासींचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमाती, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती आणि पारधी जमातीचे वास्तव्य व लोकसंख्या इत्यादीचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण २ - संशोधन क्षेत्र व संशोधन पध्दती**

या प्रकरणात संशोधन आराखड्याची मांडणी करत असताना संशोधन समस्या, संशोधनाची उद्दीष्ट्ये, संशोधनाच्या मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पध्दती, नमुना निवड आणि संशोधनासाठी अवलंबलेली पध्दत व तंत्रे, तथ्य संकलन, अहवाल लेखन, संशोधन साहित्याचा विस्तृत आढावा, संशोधन अहवालाची उपयूक्तता इ.  विविध संशोधन टप्प्यांची विस्तृत मांडणी करण्यात आली आहे.

**प्रकरण ३ - पारधी समाजाचा समाजशास्त्रीय आढावा**

या प्रकरणात पारधी समाजाचा पूर्वेइतिहास,  जमातीचा उगम, उपजाती, न्यायव्यवस्था व गुन्हेगारीच्या कायद्याचा अभ्यास करण्यात आला आहे.  तसेच  त्यांचे कौटुंबिक, वैवाहिक आणि शैक्षणिक जीवनाच्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. पारधी कुटुंब व्यवस्था, वैवाहिक जीवन, शैक्षणिक स्थिती व समस्यांचा आढावा घेण्यात आला आहे. पारधी जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना त्यांची साक्षरता, धार्मिक जीवन, अंधश्रध्दा, आर्थिक क्रिया, कायदे, शासकीय योजना,

शासनाचे प्रयत्न व सुधारणा इत्यादी संदर्भाने आढावा घेण्यात आला आहे. पारधी जमातीचा हा समाजशास्त्रीय आढावा दुय्यम स्त्रोंताच्या आधारे घेण्यात आला आहे.

**प्रकरण ४ थे- अभ्यास माहितीचे विश्लेषण**

या प्रकरणात मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले असून विषयाला अनुसरुन कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक समस्या व शासनाचे प्रयत्न इत्यादी संदर्भाने प्रश्न विचारुन प्रत्यक्ष प्राथमिक स्त्रोतांच्या आधारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रकरण ५ - सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी**

संशोधनाचे हे महत्त्वाचे प्रकरण असून या प्रकरणात पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यासांतर्गत उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले आहेत. आणि सारांशरुपाने समाजाची सद्यस्थिती व समस्या लक्षात घेवून शिफारशीच्या स्वरुपात काही उपाय सुचविण्यात आले आहेत.

प्रस्तुत संशोधनातुन प्राप्त निष्कर्ष व त्या अनुषंगाने सुचविण्यात आलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे-

**३. निष्कर्ष :-**

१. संशोधनासाठी निवडलेले सर्वच उत्तरदाते विवाहीत असून त्यापैकी ८६.३३ टक्के पुरुष आणि १३.६७ टक्के स्त्रिया आहेत.
२. संशोधनासाठी निवडलेल्या कुटुंबप्रमुख उत्तरदात्याचे ३१ ते ५० या वयोगटातील प्रमाण ५१ टक्के आहे. त्यापैकी ७ टक्के स्त्रिया आहेत. कुटुंबात ५ ते ७ सदस्य असण्याचे प्रमाण ५४ टक्के आहे. ८०.६७ टक्के विभक्त कुटुंबपध्दती असूनही जास्त कुटुंब सदस्य संख्या असण्यामागे ९४ टक्के कुटुंबनियोजनाबाबतचे अज्ञान हे कारण आहे.
३. जिल्ह्यात काळे कुळाचे प्रमाण ४५ टक्के आहे. गावपारधी आणि फासेपारधी या पारधी जमातीच्या दोन पोटजाती असून त्यांच्यात श्रेष्ठ कनिष्ठता जोपासली जाते.
४. पारधी जमात कायमस्वरुपी एकाच ठिकाणी वास्तव्य करुन राहत नाही. पण सद्यस्थितीत १५ पेक्षा अधिक वर्षे एकाच ठिकाणी वास्तव्य करणारे ८४.३३ टक्के उत्तरदाते आहेत. कुळ कायद्यांतर्गत

जमीन हस्तांतरण तरतुदीनुसार वास्तव्याचा कालावधी जास्त असल्यास जागा स्वमालकीची होईल या अपेक्षेने वास्तव्याचा कालावधी जास्त सांगितला गेला.

५. पारधी कुटुंबातील सुविधांचा विचार केला असता ७० टक्के कुटुंबात वीज, ७४ टक्के कुटुंबात पाणी आणि ७३ टक्के कुटुंबात स्नानगृहाचा अभाव आहे. ७५ टक्के पारधी कुटुंबे इंधन म्हणून लाकडाचा वापर करतात. यावरुन आजही हा समाज इंधनासाठी वनसंपत्तीवर अवलंबून असल्याचे स्पष्ट होते.

६. ८९.६७ टक्के कुटुंबातील स्त्रियांना निर्णय स्वातंत्र्य नसल्याचे आढळले. यावरुन स्त्रियांचा दर्जा दुय्यम असल्याचे स्पष्ट होते. मुलांच्या सामाजिकरणाच्या दृष्टीने मुलांनी रिकामा वेळ विधायक पध्दतीने व्यतित करणे गरजेचे आहे. पण जमातीत २३. ६७ टक्के भटकणे, १३.६७ टक्के शिकार करणे, ७.६७ टक्के भीक मागणे आणि ३४ टक्के घरातील काम असे मुलांनी रिकामा वेळ घालविण्याचे प्रमाण असून ही बाब चिंताजनक आहे.

७. १५ ते १८ वर्षे या वयोगटात विवाह झालेले ७२.३३ टक्के उत्तरदाते आहेत. यावरुन बालविवाहाचे प्रमाण जास्त आढळले. यात स्त्रियांची संख्या जास्त असल्याचे स्पष्ट होते. जमातीत बहुविवाह प्रचलित असल्याचे ८१ टक्के उत्तरदात्यांनी सांगितले. बहुविवाहात बहुपत्नी विवाह जास्त प्रमाणात प्रचलित आहे. जमातीत वधुमुल्याची प्रथा आहे. पण सद्य:स्थितीत ते ५३.३३ टक्के वराकडून तर १०.६७ टक्के वधुकडून घेतले जाते. ३६ टक्के उत्तरदाते विवाहाचा खर्च दोन्ही बाजुने करतात, ही नवीन बाब सामाजिक स्वास्थ्य वाढवणारी आहे.

८. सर्वच उत्तरदात्यांनी विवाहवयात वाढ झाल्याचे सांगितले. प्रगतांच्या संपर्कामुळे ४०. ६७ टक्के , कायद्याचा परिणाम म्हणून २९.३३ टक्के आणि शिक्षणामुळे म्हणून २७ टक्के अशी या बदलाची कारणे आहेत. विवाह ठरवतांना ९३ टक्के पालक मुला-मुलींच्या मताला प्राधान्य देतात याचे कारण पूढील वैवाहिक जीवन स्थिर रहावे हे असते.

९. जमातीचा विवाह विधी जमातीतील अनुभवी व्यक्तींकडून करण्याचे प्रमाण ७०.३३ टक्के आहे. जमातीत प्रथम पारंपारिक विवाह होतो. ७१ टक्के पारधी लोकांनी आधूनिक म्हणजे हिंदू विवाह पध्दतीचा स्वीकार केल्याचे आढळले. नोंदणी विवाह आणि सामुहिक विवाह सोहळे याबाबत अज्ञान व नापसंती आढळली.

१०. घटस्फोटाची प्रक्रिया अत्यंत लवचिक आहे. आजही जमातीत घटस्फोटासाठी ६१.३३ टक्के उत्तरदाते जातपंचायतीचाच आधार घेतात. विधवेला पूनर्विवाह करण्याची परवानगी आहे. यावरुन विवाह संस्था लवचिक आहे हे स्पष्ट होते. पण विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंधांना आक्षेप आहे. विवाह विधीचे स्वरुप अत्यंत साधे आहे. आधूनिक पध्दतीने म्हणजे हिंदूप्रमाणे विवाह होतात पण प्रथमतः जमातीच्या नियमांचे पालन व पूर्तता केली जाते.

११. पारधी आपला धर्म हिंदू सांगतात. जमातीचे धर्मसंकेत व नियमांचे पालन अत्यंत कटाक्षाने केले जाते. दैनंदिन जीवनात प्रत्येक घटनेला धार्मिक आधार आहे. धार्मिक बाबतीत स्त्रियांवर अत्यंत खडतर बंधने आहेत. जमातीचा देवावर प्रचंड विश्वास आहे. पारधी भविष्यासंबंधी तसेच शिकार व इतर प्रतिकूल कारणांसाठीही धर्माचा आधार घेतात. धर्मावरील या श्रध्देतून अनेक अंधश्रध्दांची निर्मिती झाली आहे. त्याचे अनेक नियम असून त्यांचे पालन बंधनकारक असते. धार्मिक अंधश्रध्देतून जमातीत अनेक अरिष्ट ओढवतात.

१२. जमातीत कूळ व आडनावानुसार वेगवेगळे कुलदैवत आहे. कुलदैवत व घरातील देव हे सोने चांदीचे प्रतिकरुप असतात. त्याला पातर असे म्हणतात. घरातील देवाची पूजा फक्त पुरुषच करतात. स्त्रियांना अशूभ मानुन स्त्रियांचा वावर किंवा सावलीही देवावर पडू दिली जात नाही. पारधी हिंदू देवदेवतांनाही पूजतात. जमातीत ९८.६७ टक्के नवस करतात. तर १०० टक्के उपवास करतात. संकट निवारण, समाधान, यश इ. साठी नवस व उपवास केले जातात.

१३. पारधी जमातीचा देवकारण हा वार्षिक धार्मिक विधी असून प्रत्येक कुळाची या धार्मिक विधीची जागा ठरलेली असते. त्या जागेला पवित्र स्थान म्हणून महत्व असते. हा विधी प्रचंड खर्चिक असतो. या विधीत केवळ एक पारंपारिक प्रथा म्हणून पशूबळी देण्याचे प्रमाण ५९ टक्के आहे. तर सुखप्राप्तीसाठी पशूबळी देण्याचे प्रमाण ३४.३३ टक्के आहे. बलिदानाप्रसंगी बकरा, कोंबडा आणि सर्वाधिक ७२.३३ टक्के रेड्याचा बळी दिला जातो. त्या पशूच्या रक्तात देवाची प्रतिमा बुडवून ते रक्त प्रसाद म्हणून पितात. या विधीच्या खर्चासाठी प्रसंगी चोरी करुनही पैसा गोळा केला जातो. या अंधश्रध्देबद्दल साधक बाधक चर्चा किंवा चिकित्सा करण्याची मानसिकता जमातीत दिसत नाही.

१४. जमातीत धर्मांतराचे एकही उदाहरण नाही. ते आपला धर्म हिंदूच सांगतात. पण न्याय मिळत नसल्याची खंत आहे. भावी पिढीने हातात शस्त्र घेऊन न्याय मिळवण्याचा प्रयत्न करण्याची वेळ

येऊ न देता व  त्यांचा नक्षलवादी चळवळीशी संबंध येण्यापूर्वीच हिंदू म्हणून सन्मान मिळणे व त्यांचे सामीलीकरण होणे आवश्यक आहे.

१५.स्वातंत्र्योत्तर काळात जमातीचा विविध माध्यमातून इतर समाजाशी संपर्क व सामाजिक संबंधात वाढ अपेक्षितच होती.  या संबंधाचे स्वरुप ६० टक्के  प्रासंगिक, १८ टक्के  जवळचे असे असल्याचे आढळले.  प्रासंगिक स्वरुपाचे संबंध तात्पूरते असुन त्यात जवळीकतेचा अभाव असतो.  प्रासंगिक स्वरुपाच्या संबंधाचे प्रमाण जरी जास्त असले तरी हे संबंध जाणीवपूर्वक ठेवले जातात. कारण इतर जाती जमातीशी संबंध न ठेवल्यास संशयी दृष्टिकोन बळावतो व इतर समस्यांना तोंड द्यावे लागते. १८टक्के  पारधी, संबंध येत नाहीत असे मत नोंदवतात.  यावरुन आजही इतर जमातीपासून अलिप्तता दिसून येते.  जमातीअंतर्गत सहकार्य न मिळण्याचे प्रमाण ६९. ६७ टक्के  आहे. आपापसातील भांडणे, वैरभाव, संशयी वृत्ती, संघटनशक्तीबाबत अज्ञान इत्यादी कारणांमुळे पारधी छोट्या - छोट्या वस्तीत विभागले गेले आहेत.

१६. श्रेष्ठ-कनिष्ठतेची मानसिकता व न्यूनगंडाची भावना यामुळे जमातीत परात्मवृत्ती आढळते. स्वतःची न्याय ओळख व्यवसायामुळे होती पण या शिकार व्यवसायावर कायद्याने बंदी आली. परिणामी  जमातीअंतर्गत स्वतः ची संस्कृती कनिष्ठ वाटण्याचे प्रमाण ६७ टक्के  आहे.

१७.    पारध्यांमध्ये ९२ टक्के  मद्यपानाचे प्रमाण आहे.  स्त्री-पुरुष, मुले सर्वच मद्यपान करतात. मद्यपानाला धार्मिक मान्यता आहे.  पाहुणचारात मांसाहार व मद्यपानाला महत्व आहे. कालौघात दारुविक्री व्यवसाय करण्याचे हेच कारण असावे.

१८.पारधी वस्ती गावापासून दूर असल्याने अनेक असुविधांना तोंड द्यावे लागते.  वस्तीमध्ये स्वच्छतागृह ९०.६७ टक्के, दवाखाना ६७.६७ टक्के, बाजार ६२.६७ टक्के  आणि २१ टक्के मनोरंजनाची साधने नसण्याचे प्रमाण आहे.  व्यक्तिगत पातळीवर, रेडिओ व मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो.

१९.पारध्यांच्या जीवनात घर या मूलभूत गरजेबाबत अत्यंत केविलवाणी अवस्था आहे. स्वतःचे घर असल्याचे प्रमाण ४७.६७ टक्के  तर नसल्याचे प्रमाण ५२.३३ टक्के  इतके आहे. राहती जागा मालकीची नाही व घराचा निकृष्ट प्रकार, अपूरी जागा, तात्पुरता निवारा अशा स्थितीत ४१ टक्के पत्राशेडमध्ये राहतात तर १० टक्के  झोपडीत राहतात.  घराचा प्रकार कोणताही असो, राहती जागा स्वमालकीची नसणे अथवा त्यांची सरकारी दप्तरी नोंद नसण्याचे प्रमाण ७६ टक्के  आहे.

२०. सद्यः स्थितीत भाषेत बदलाचे प्रमाण ९८ टक्के असून हा बदल जाणीवपूर्वक करण्याचे प्रमाण २१ टक्के आहे. तर प्रगतांच्या संपर्कामुळे भाषेत बदल होण्याचे प्रमाण ७२ टक्के आहे. जमातीच्या पारंपारिक पोषाखात ८३.३३ टक्के बदल झाला आहे. जमातीत मृत व्यक्तीचे दफन करण्याचे प्रमाण ९७ टक्के आहे.

२१. जमातीत आजही १०० टक्के जातपंचायतीचे अस्तित्व आहे. जातपंचायत असावी असे ७८ टक्के पारधी म्हणतात. जातपंचायतीत कौटुंबिक कलह, अनैतिक संबंध, चोरी, फसवणूक, प्रथा-परंपरांचे उल्लंघन, घटस्फोट इ. बाबतची प्रकरणे चालवून न्यायनिवाडा केला जातो. सामाजिक बहिष्कार, जबर आर्थिक दंड, व निषिध्द धार्मिक गोष्टी शिक्षा म्हणून जबरदस्तीने करण्यात भाग पाडणे असे जातपंचायतीतील शिक्षेचे स्वरुप असते. कांही शिक्षांचे स्वरुप विचित्र व अनाकलनीय असून ते मागासलेपणाचे निदर्शक आहे. ८० टक्के उत्तरदात्यांना जातपंचायतीला कायद्याने बंदी हे माहिती आहे. तरीही जातपंचायत असावी असे ७८ टक्के पारधी म्हणतात. यावरुन प्रचलित शासकीय न्यायव्यवस्था योग्य न्याय देईल यावर जमातीचा विश्वास नाही, हे स्पष्ट होते. म्हणूनच पोलिसांकडून योग्य न्याय मिळत नाही असे ६९.६७ टक्के उत्तरदात्यांनी सांगितले.

२२.जमातीचा पारंपारिक व्यवसाय शिकार असून वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे या व्यवसायावर बंदी आली. परिणामी उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला. त्यामुळे ३७.३३ टक्के सद्यःस्थितीत शिकार करीत नाहीत. तर १६ टक्के आजही शिकार करतात. क्वचित प्रसंगी शिकार करण्याचे प्रमाण ४६.६७ टक्के आहे. या व्यवसायात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी ८६.६७ टक्के पारधी, वन्यजीव कायद्याचा परिणाम म्हणून शिकार हा व्यवसाय बंद पडल्याचे सांगतात.

२३.सद्यःस्थितीत इतर अनेक व्यवसाय करुन उदरनिर्वाह केला जातो. जमातीच्या पारंपारिक व्यवसायावर कायद्याने बंदी आल्याने शेती, मजूरी, पशूपालन, शेतराखण, भिक्षा, ऊसतोड मजूरी, बांधकाम, दारुविक्री, हमाली असे इतर व्यवसाय असून फक्त ४ टक्के नोकरी करतात. अपुरे शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षणाचा अभाव, परंपरांचे पालन, देवकारणातील खर्च, नकारात्मक मानसिकता, उदरनिर्वाहाचे निश्चित साधनाचा अभाव यामुळे आर्थिक गरजा भागवणे कठीण झाले असून हा समाज आर्थिक विवंचनेत जगतो आहे.

२४. जमातीत ८१.३३ टक्के उत्तरदात्यांचे कमाल वार्षिक उत्पन्न ३० हजार रु. म्हणजे मासिक २५००/- रु. आहे. त्यामुळे येणाऱ्या उत्पन्नातून दैनंदिन गरजा भागत नसल्याचे प्रमाण ९०.३३

टक्के इतके आहे. ही आर्थिक तुट भरुन काढण्यासाठी अनेक चांगले वाईट मार्ग अवलंबले जातात. उत्तरदात्यांकडे असलेल्या वस्तुबद्दल माहिती घेतली असता जास्तीत जास्त ६८ टक्के मोबाईल धारक आहेत. तर ४४.३३ टक्के लोकांकडे रेडिओ आहे. दूचाकी, दूरदर्शन संच, घड्याळ, शिवणयंत्र, बैलगाडी इ. असण्याचे प्रमाण अत्यंत अल्प आहे.

२५. आर्थिक घडामोडीत बँक व्यवहार महत्वाचा घटक असून ७८.६७ टक्के पारधी बँक खातेदार नाहीत. निरक्षरता व आर्थिक विवंचनेमुळे बँकेत खाते असण्याची गरज वाटत नाही असे मत व्यक्त केले गेले. जमातीत भावी पिढीने आधूनिक व्यवसाय करावा असे ९५.३३ टक्के उत्तरदात्यांना वाटते.

२६. राजकीय जागृतीबाबत अज्ञान आढळते. मतदान करण्याचे प्रमाण ७० टक्के असले तरी त्यांच्यातील राजकीय जागृती खरी नाही. कारण मतदान करण्यासाठी पैसा, ओळख, व्यक्ती हे निकष मानले जातात. राजकीय सत्ता कोणाचीही असो, फरक पडत नाही अशी मानसिकता जमातीत आढळली.

२७. पारधी जमातीत शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये इतर जमातीच्या तुलनेत पारधी मुलांची संख्या अत्यंत कमी असून पालक आणि मुले दोघांनाही शाळा व शिक्षणाबद्दल आकर्षण नाही. जमातीत ६९.३३ टक्के निरक्षरता आहे तर फक्त ३.६७ टक्के स्त्रिया साक्षर आहेत. शिक्षणाचा स्तर उंचावलेला नाही. उत्तरदात्यापैकी फक्त १५ टक्के प्राथमिक, १२.३३ टक्के माध्यमिक शिक्षण घेतलेले आहेत.

२८. मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत पालकांमध्ये अल्प प्रमाणात जागृतता आली असली तरीही अद्याप ५१ टक्के पालकांची मुले शाळेत जात नाहीत. इमारतीचा अभाव, शैक्षणिक वातावरणाचा अभाव इ. मुळे मुलांना शिक्षणात गोडी वाटत नाही. जिल्ह्यात फक्त ८.६७ टक्के पालकांनी मुलांना आश्रमशाळेत पाठवले आहे. यावरुन आश्रमशाळेस मिळणारा प्रतिसाद अत्यल्प असल्याचे स्पष्ट होते.

२९.शैक्षणिक अडचणी दूर करण्यासाठी अनेक शैक्षणिक सवलती दिल्या जातात. पण या शैक्षणिक सवलतीबद्दल ६१.३३ टक्के उत्तरदात्यांना माहितीच नाही तर ३८.६७ टक्के उत्तरदात्यांना माहिती आहे पण त्यांना त्यांचा लाभ मिळवण्यात अनेक अडचणी येतात. ६९.३३ टक्के उत्तरदात्यांनी

लाभ मिळाला नसल्याचे सांगितले. या शैक्षणिक वस्तुस्थितीतुन जमातीचा शैक्षणिक मागासलेपणा स्पष्ट होतो.

३०. ४०.३३ टक्के उत्तरदात्यांना शासकीय सवलतीची माहिती आहे. तर ५९.६७ टक्के उत्तरदात्यांना या योजनांची माहिती नाही. यावरुन शासनाच्या कल्याणकारी योजना जमातीपर्यंत पोहोचवण्यासाठी शासकीय प्रयत्न आणखी वाढविण्याची गरज आहे हे लक्षात येते. जिल्ह्यात शासकीय योजनांचे लाभधारक ३१.३३ टक्के आहेत. तर ६८.६७ टक्के लाभापासून वंचित आहेत. योजना आहेत हे माहिती आहे पण त्या नेमक्या काय आहेत व त्याचा लाभ कसा मिळवावा हेच माहिती नाही असे ८६.८९ टक्के उत्तरदात्यांनी सांगितले. यामागे गरिबी, अज्ञान, शासकीय कागदपत्रांचा अभाव, इ. कारणे आहेत.

३१. जिल्ह्यात पारधी विशेष योजना अंतर्गत १७ योजना राबविल्या जातात. त्यापैकी कांही मोजक्याच योजनांचा लाभ जमातीला झाल्याचे सर्वेक्षणादरम्यान आढळले. पारधी विशेष योजनांचे एकूण लाभधारक १९.६७ टक्के आहेत तर शैक्षणिक योजनांचा लाभ ९ टक्के उत्तरदात्यांच्या पाल्यांना झाला आहे. इतर सार्वजनिक लाभाच्या योजनांतर्गत २.६७ टक्के लाभधारक असून गटार, स्वच्छतागृह, पाण्यासाठी सार्वजनिक कुपनलिका असे या योजनांचे स्वरुप होते. फक्त ३१.३३ टक्के उत्तरदात्यांना वरील स्वरुपात योजनांचा लाभ झाला आहे तर ६८.६७ टक्के उत्तरदाते अद्यापही शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. मात्र शासकीय आकडेवारी वेगळेच चित्र दर्शविते.

३२.योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय कागदपत्रांची गरज असते. त्यापैकी ५४.३३ टक्के रहिवासी प्रमाणपत्र, ५७.३३ टक्के जातप्रमाणपत्र, ६२.३३ टक्के शिधापत्रिका तर ६९ टक्के मतदान ओळखपत्र असे शासकीय कागदपत्रे उपलब्ध असण्याचे प्रमाण आहे. अशी कागदपत्रे मिळवतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. जमातीच्या प्रगतीसाठी शासन विविध योजना तयार करते परंतु त्यासाठी जमातीची सद्यःस्थिती व गरजा काय आहेत याचा विचार केला जात नाही. म्हणूनच व्यवसायासाठी शासनाने मदत करावी असे २४ टक्के उत्तरदात्यांना वाटते. २२.३३ टक्के उत्तरदाते घर व २० टक्के उत्तरदाते शेतीची मागणी करतात. गुन्हेगारीच्या शिक्क्यामुळे पोलिसांच्या त्रासाला व कोर्ट कचेरीला सामोरे जावे लागत असल्याने १५.३३ टक्के उत्तरदाते शासनाकडून कायदेविषयक मदतीची अपेक्षा करतात.

३३. शासकीय योजनांचा लाभ घेताना अज्ञान, निरक्षरता, गरिबी, शासकीय कागदपत्रांचा अभाव, मदतीचा अभाव इ. अडथळे असून भ्रष्टाचार, फसवणूक, पक्षपातीपणा, अधिकाऱ्यांचे असहकार्य व दूय्यम वागणूक अशा समस्यांना सामोरे जावे लागते. यावरुन अंमलबजावणीतील त्रुटी तसेच प्रगतांचे असहकार्य, जमातीचे असंघटन आणि शासनाचे दूर्लक्ष या बाबी स्पष्ट होतात.

३४. पारधी जमातीचे सामाजिक जीवन अनेक समस्यांनी व्यापले आहे. व्यसनाधिनता, प्रगतांचा नकारात्मक दृष्टीकोन, अंधश्रध्दा, गुन्हेगारीचा शिक्का, आर्थिक विवंचना, निरक्षरता या प्रमुख समस्या असल्याचे लक्षात येते. आजही या समस्यांची तीव्रता जाणवते. कारण ४१.६७ टक्के उत्तरदाते प्रगतांकडून वाईट वागणूक मिळते असे सांगतात तर ३१ टक्के उत्तरदाते सर्वसाधारण वागणूक मिळते असे मत नोंदवतात.

३५. उदरनिर्वाहाची साधने अपूरी असल्याने दैनंदिन गरजा भागविण्यासाठी जमातीला सतत स्थलांतर करावे लागते. स्थलांतराचा कालावधी कमी जास्त असतो. जमातीत स्थलांतराचे प्रमाण ८४.३३ टक्के आहे. त्यामागे प्रगतांची उपेक्षा, पोलिसांचा त्रास, उपजिवीकेची अपूरी साधने, दीर्घकालीन रोजगाराचा अभाव ही प्रमुख कारणे असल्याचे आढळले.

३६. चोरी किंवा गुन्ह्याशी पारधी लोकांचा संबंध लावण्याचे प्रमाण ६५.६७ टक्के इतके आहे. सर्वच पारधी जमातीला गुन्हेगार समजणे चुकीचे व अन्यायकारक आहे. कारण गुन्हेगारी सर्वंच समाजात कमी जास्त प्रमाणात आढळते. गुन्हेगारी कृत्यातील सहभागासंदर्भाने ७ टक्के उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्य अटकेत आहेत. ९० टक्के उत्तरदात्यांनी पोलिसांकडून मिळणारी वागणूक वाईट असते असे सांगितले. या दुष्टचक्रातुन सुटकेसाठी शासनानेच मदत करावी असे ५२.३३ टक्के उत्तरदात्यांना वाटते. तर ३४ टक्के उत्तरदाते सामाजिक कार्यकर्त्यांकडून मदतीची अपेक्षा करतात. १३.३३ टक्के लोकांनी पोलीसांनीच विश्वास दाखवावा अशी अपेक्षा करतात.

३७. पारधी स्वत:ला आजही अनेक बाबतीत मागासलेले समजण्याचे प्रमाण ९८ टक्के इतके आहे. शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, व्यवसाय, नोकरी, घर, भटकंती, स्थलांतर अशी अनेक कारणे मागासलेपणाची भावना निर्माण करतात. या दयनीय अवस्थेतुन बाहेर पडण्यासाठी सक्षम नेतृत्वाची व सामाजिक बांधीलकीची गरज अपेक्षित आहे. पण जमातीतील सुशिक्षित लोक जमातीसाठी कार्य करण्याचे प्रमाण फक्त २८.६७ टक्के आहे. तर ६९.६७ टक्के लोकांनी स्वजमातीतुन सहकार्य मिळत नाही असे सांगितले.

३८. जमातीचा राजकीय सहभाग व जाण अत्यंत कमी आहे. ९७ टक्के उत्तरदात्यांचा राजकीय सहभाग नसल्याचे आढळले. यावरुन जमातीत प्रभावी नेतृत्वाचा अभाव आणि राजकीय जागृतीबाबत अज्ञान दिसुन येते. जमातीला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रभावी नेतृत्व आणि संघटन न लाभल्याने आजही मागासलेपणा दुर झाला नाही. आज पारधी जमातीत अल्प प्रमाणात का होईना परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. परिवर्तनासाठीची प्रेरणा शासन आहे असे ४९.३३ टक्के उत्तरदाते सांगतात. तर २९ टक्के उत्तरदाते सामाजिक कार्यकर्ते परिवर्तनाची प्रेरणा देतात असे सांगतात. ११.६७ टक्के उत्तरदाते जमातीतूनच प्रेरणा मिळत असल्याचे सांगतात. यावरुन शासकीय पातळीवरुन सकारात्मक बदल घडू शकतात असा विश्वास जमातीला आहे हे स्पष्ट होते.

## ४. शिफारशी :-

पारधी जमातीच्या समाजशास्त्रीय अभ्यासांती प्राप्त निष्कर्षांचे अध्ययन करुन जमातीच्या विकास व सर्वांगीण प्रगतीसाठी पुढील शिफारशी सूचवत आहे -

१) पारधी जमातीची लोकसंख्या नक्की किती आहे? याविषयी निश्चित व विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध नाही. त्यामुळे केंद्र शासनाने त्यांची स्वतंत्र जनगणना करावी. या जनगणनेपूर्वी सर्व पारधी लोकांनागावपातळीवर मेळावे घेऊन जात प्रमाणपत्रांचे वाटप करावे. जेणेकरुन त्यांची गणना करणे सुलभ होईल. जनगणनेमधून प्राप्त आकडेवारी व माहिती ही जमातीची सद्यस्थिती जाणण्यासाठी उपयुक्त ठरेल आणि त्यायोगे प्रगती व विकासाच्या योजना आखणे व त्यांचे प्राधान्यक्रम ठरवणे सोपे होईल.

२) पारधी जमातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये आहे. मात्र काही पोटजातींचा समावेश भटक्या व विमुक्त जाती-जमातींच्या शासकीय यादीमध्ये आहे. सर्व पोटजाती या मानववंशदृष्ट्या व प्रत्यक्ष व्यवहारात पारधी जमातीच्याच असून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक स्थितीत साम्य असल्याने सर्व पोटजातींचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करावा.

३) सामाजिक व आर्थिक जीवनाच्या अभ्यासांती असे लक्षात आले की समाजात स्थलांतर थांबावे असे सर्वांना वाटते. त्यामुळे गृहबांधणी कार्यक्रम हाती घेऊन सर्वांना संपुर्ण शासकीय अनुदानाने घरे बांधून द्यावीत.

४) उदरनिर्वाहाचे निश्चित साधन नसणे हे स्थलांतराचे प्रमुख कारण असून नवीन वस्तीत रोजगाराच्या व उपजीविकेसाठीच्या आवश्यक संधी उपलब्ध करुन द्याव्यात.

५) शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सशक्त माध्यम आहे. पारधी जमातीत शिक्षणांचे प्रमाण अत्यल्प असून निरक्षरता हे अनेक समस्यांचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे जमातीसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यंत महत्वाचे आहे. या अतंर्गत पारधी वस्तीतच, किमान माध्यमिक स्तरापर्यंत शाळा सुरु कराव्यात. या शाळा सर्व शैक्षणिक सोयीसुविधांनी युक्त असाव्यात व या शाळांच्या माध्यमातून शिक्षण, निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था व शैक्षणिक सवलती पुर्णतः मोफत उपलब्ध करुन द्याव्यात.

६) शासनाने पदवीपर्यंतचे शिक्षण पुर्णतः मोफत उपलब्ध करुन द्यावे. पदवीनंतरच्या शिक्षणासाठी भरीव विद्यावेतन किंवा शिष्यवृत्तीची तरतूद करावी. शैक्षणिक प्रगतीसाठी पारधी जमातीचा प्रतिसादही महत्वाचा असून ज्या कुटुंबातील मुले शिक्षण घेत नाहीत अथवा शाळा अर्धवट सोडतात त्यांच्यासाठी स्थानिक पातळीवर प्रयत्न करावा व मोफत शैक्षणिक सुविधा, प्रवास सवलत देऊन पाल्य व पालकांमध्ये शिक्षणांबद्दल गोडी वाढेल अशा प्रलोभनांची योजना आखावी.

७) शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी कठोरपणे करावी व त्यामध्ये कसूर वा भ्रष्टाचार करण्याऱ्या व्यक्तीस कठोर शिक्षेची तरतूद असावी.

८) जात प्रमाणपत्राच्या वाटपासोबतच शिधापत्रिका, रहिवासी प्रमाणपत्र, मतदान ओळखपत्र इ. महत्वाची शासकीय कागदपत्रे सामुदायिक मेळाव्यांच्या माध्यमातून वाटप करावीत. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेमधून विशेष बाब म्हणून सवलत मिळावी.

९) पारधी वस्त्यांना महसूली गावाचा दर्जा द्यावा जेणेकरुन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वस्तीमध्ये वीज, पाणी, दवाखाना इत्यादी सार्वजनिक सोयी सुविधा उपलब्ध होतील.

१०) पारधी जमातीच्या विकासासाठी स्वतंत्र योजना आखाव्यात. या योजनांची माहिती पारधी समाजाला प्रचाराच्या माध्यमातून मिळावी. या योजनांचे अनुदान हे इतर ठिकाणी खर्च न करता त्यासाठीच खर्ची पडावे.

११) शासकीय सेवेतील अनुसूचित जमातीसाठीच्या नोकरीच्या आरक्षणातंर्गत लोकसंख्येच्या आधारावर पारधी जमातीसाठी स्वतंत्र आरक्षण असावे.

१२) पारधी जमातीचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी स्वतंत्र राजकीय आरक्षणाची तरतूद करावी.

१३) जातपंचायतीच्या माध्यमातून जमातीचे संघटन टिकून असून याच माध्यमातून जमातीतील अनुभवी, प्रतिष्ठित व्यक्तींच्या मदतीने अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी व जमातीच्या सामाजिक, धार्मिक प्रगतीसाठी प्रबोधन करावे.

१४) इतर व्यवसायाकडे जमातीला कल वाढत असून या व्यवसायासाठी आवश्यक भागभांडवल, प्रशिक्षण, भौतिक सुविधा व अनुदान शासनाने उपलब्ध करुन द्यावे.

१५) गुन्हेगारी/ चोरीच्या संशयावरुन पारधी लोकांचे धरपकड सत्र पुर्णतः थांबाव. वास्तविक गुन्हेगारास विशिष्ट जात वा धर्म नसतो व गुन्हेगारवृत्ती समाजाच्या सर्वच स्तरात आढळते. त्यासाठी संपूर्ण पारधी जमातीस जबाबदार धरणे पुर्णतः चुकीचे आहे. कसलाही पुरावा नसताना केवळ पारधी आहे म्हणून पकडून अटकेत टाकणाऱ्या पोलिस खात्यातील व्यक्तीस कठोर शिक्षेची तरतूद करावी.

१६) प्रगत समाजाने पारधी समाजाकडे बघण्याचा आपला नकारात्मक दृष्टिकोन सोडून द्यावा व पारधी जमातीने त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा. जेणेकरुन परस्पर सहकार्यातून प्रगतीचे मार्ग खुले होतील.

१७) ज्या ठिकाणी जमातीचे लोक शासकीय रिकाम्या जागेवर राहतात. त्या जमीनी त्यांना हस्तांतरीत कराव्यात या संदर्भाने ज्यांच्यावर कोर्टात केस चालू आहेत त्या त्वरीत मागे घ्याव्यात.

१८) पारधी जमातीची जीवनशैली व उपजिविका ही वनसंपत्तीवर अवलंबून असल्याने वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे त्यांच्या उपजिविकेचे साधन धोक्यात आले. म्हणून जमातीचा जंगलावरील हक्क अबाधित राखताना त्यांच्यासाठी आरक्षित जंगले निर्माण करावित व त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी जमातीवरच सोपवावी.

१९) पारधी जमात इंधनासाठी जंगलावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच जमातीत अद्यापही शिकार केली जाते.शिकार व जंगल तोड या बाबी पर्यावरणास हानी पोहचवणाऱ्या व वनसंपत्तीचा नाश करणाऱ्या आहेत त्यामुळे पर्यायी उपजिविकेचे

साधन उपलब्ध करुन देण्यासाठी व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे.

२०) पारधी अत्याचाराच्या घटनांनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा गैरफायदा घेवून धर्मांतराची चर्चा केली जाते. शासनाचे दुर्लक्ष व प्रगतांची उपेक्षा यामुळे जमातीने नक्षलवादी चळवळी सारखी संघर्षात्मक भुमिका स्विकारु नये यांची काळजी घ्यावी. हिंदू धर्माचाच एक भाग असलेल्या या जमातीला प्रगत समाजाने हिंदू म्हणून सन्मान मिळवून देणे गरजेचे आहे.

**संशोधिका** — **संशोधन मार्गदर्शक**


**प्रा. सुलभा कोरेकर** — **प्रा. डॉ. श्री. श्रीकांत गायकवाड**




उस्मानाबाद जिल्हयात पारधी या अनुसूचित जमातीचे मोठया प्रमाणातील वास्तव्य दर्शविणारा नकाशा.




संशोधन क्षेत्र असलेल्या उस्मानाबाद जिल्हयातील सर्व तालुके दर्शविणारा नकाशा.




उस्मानाबाद जिल्हा हे संशोधन क्षेत्र समाविष्ट असलेले महाराष्ट्र राज्य